TIGHT BINDING

UNIVERSAL
LIBRARY
OU_192793
UNIVERSAL
LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M 83 N95K Accession No. M386

Author नाशिककर, शांता बाई.

Title कीर्ति.

This book should be returned on or before the date last marked below.

# कीर्ति

लेखिका

सौ. शांताबाई नाशिककर, बी. ए.

प्रकाशक

शेठ हिरजी मोहनजी.

जून, १९४२ किंमत ३॥ रुपये

प्रकाशक
शेठ हिरजी मोहनजी,
केशवजी नाईकाची चाळ, कांदेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

[ सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन ]

मुद्रक
जयराम दिपाजी देसाई,
राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई

# सौ. शांताबाई नाशिककर यांचें वाङ्मय

## प्रकाशित

**कादंबऱ्या**

लग्नाचा बाजार
हाच का धर्म ?
साम्राज्यासाठीं
कौमुदी
चिखलांतलें कमळ
माझीं कोरीव लेणीं
कीर्ति

**कथा-संग्रह**

नीलेचा दिलरुबा

**इतर**

शांतिकुंज ( निबंध पखरण )
शांतिकुंज ( कविता पखरण )
म्हैसूरकडील प्रवास
( प्रवास वर्णन )
मुलांकरितां सुबोध गोष्टी

## आगामी

शांतिकुंज भाग २
( कविता पखरण )

पेढे
( लहान मुलांकरितां
कथा-संग्रह )

वाळूतलें सरोवर
( कथा-संग्रह )

? ? ? ( कादंबरी )

# कीर्ति

—१—

आपले घारे डोळे एकवार कीर्तीवर मिष्किलपणानें रेखून नंतर जरा लाडकीशी मान मुरकून, कातरतेचा मुलामा चढवलेल्या पण खरोखरी चेष्टागर्भित स्वरांत शीला म्हणाली, " अगबाई, निळाची अंगठी ! संभाळ ग बाई कीर्ति. "

कीर्तीचे टपोरे काळे नेत्र निमिषमात्र कसल्यातरी अंतस्थ सुप्त भीतीच्या जागृतीमुळें विस्फारित होऊन त्यांच्या लांब पापण्या थरारल्यासारख्या झाल्या.

स्फटिकाप्रमाणें निर्मल अशा तडागांत कासव अगदीं शांत पडून असलें कीं तें आहे कीं नाहीं हेंसुद्धां कळत नाहीं. निर्जीव पाषाणाप्रमाणें तें निश्चल असतें. परंतु तीरावरून सहज कुणी त्याला दगड मारला कीं तें हळूंहळूं हातपाय उघडून पोहूं लागतें आणि आधींच्या संथ पाण्यांत तरंग उठून तें गढुळतें.

कीर्तीची अंतःस्थ भीति या वेळीं अशीच जागी झाली.

कीर्तीनें एरवीं या बोलण्याकडे लक्ष दिलें नसतें. नव्हे. तिनें आपली प्रिय मैत्रीण शीला हिची खूपशी चेष्टा करून, कुठून आपण निळाच्या अंगठीविरुद्ध बोललों असें तिला करून टाकलें असतें. पण शीलेच्या स्वरांतील कंप कीर्तीच्याही अंतःकरणांत प्रतिध्वनित होऊन गेला. एका वीणेच्या तारा उगीचच जरी छेडल्या तरी दुसरीच्या तारांतून कंपन होऊन सूक्ष्म ध्वनि उमटतो, तसेंच झालें अगदीं. तिचा तिलाच मोठा विस्मय वाटला. कारण आज दिवसभर ती अंगठी तिच्या हातांत असूनसुद्धां, तिला आतांपर्यंत त्या अंगठीविषयीं, प्रेमाची देणगी आणि म्हणूनच अत्यंत सुखमय भावना जिच्यांत निगडित झालेल्या आहेत अशी वस्तू, यापलीकडे कसलीही वाईट कल्पना तिच्या मनांत आली नव्हती.

पण रात्रींचा काळोख खोलींत कोंदून राहिला असला म्हणजे साधें पांढुरकें वस्त्र बघूनही भुताखेतांच्या काल्पनिक भीतीनें मन बावरून जातें. नजरचुकीमुळें औषधा-

ऐवजीं विष आपल्या पोटांत गेलें आहे अशी एकदां मनुष्यांची भावना झाली कीं तो प्रथम अतिशय गांगरतो.

आज कौस्तुभ लग्नाबाबत आईवडिलांची संमति विचारण्याकरतां म्हणून पुण्यास गेल्यापासूनच–नव्हे, तो जायचा होता तेव्हांपासूनच, काय होतें कोण जाणें म्हणून कीर्तीला भीति वाटत होती. मैत्रिणींशीं गप्पागोष्टी करीत असतां ती भीति सुप्त झाली होती. मैत्रिणींच्या सहवासांत आपल्या काळजीचा तिला विसर पडल्यासारखें झालें होतें. पण आतां तिची भीति पुन्हां जागृत झाली. काळजी तिला ग्रासूं लागली.

उन्हाच्या झोतांत हळूंच जरी फुंकर मारला तरी तोंवेळपर्यंत स्तब्ध असलेले अणूरेणूं हलूं लागून आसपासच्या शेकडों अणूरेणूंना धक्के देत देत जणूं वादळच उठवून देतात. कीर्तीच्या मनांतही आतां त्रासदायक विचारांचें वादळ माजलें. तिला निळाच्या अशुभतेबद्दल ऐकलली एक गोष्ट झर्रकन् आठवून गेली.

इंग्लंडमध्यें कीर्तीची एक दारिया नांवाची रशियन मैत्रीण होती. तिनें झारिनाच्या रत्नभांडारांतील अपयशी जडजवाहिराबद्दल अनेक वेळां गोष्टी सांगितलेल्या होत्या. दारियाची आई ओल्गा ही आपल्या रसाळ वाणीनें हावभावांसहित जेव्हां रत्नांबद्दल विलक्षण गोष्टी सांगूं लागे तेव्हां कांहीं कांहीं वेळां रक्त गोठून गेल्यासारखें होई. आतांही त्या गोष्टींच्या आठवणींनीं कीर्तीच्या हृदयाचा थरकांप उडाला. विशेषतः ओल्गानें सांगितलेली स्वतःसंबंधींची एक गोष्ट तिला विशेषच ठळकपणानें आठवूं लागली.

दारिया ही वास्तविक रशियांतील सरदार घराण्यांतली. तिची आई ओल्गा ही झारीनाची मैत्रीण होती. एकदां कांहीं महत्त्वाच्या कामगिरीबद्दल झारिनानें ओल्गाला एक मध्यें नीळ बसवलेलें रत्नपदक आठवणीदाखल दिलें. अन् तेव्हांपासून लेझॉव्ह घराण्याला ओहोटी लागली. ओल्गा सांगत असे कीं, “ तें रत्नपदक हातांत घेतल्याबरोबरच माझ्या अंगांतून वीज चमकून गेल्यासारखें झालें आणि माझा थोरला मुलगा, त्याच दिवशीं घोड्यावरून पडून मेला. त्यानंतर पुन्हां जेव्हां जेव्हां म्हणून तें रत्नपदक मी घातलें तेव्हां तेव्हां मला अगदीं असाच वाईट अनुभव आला. तें पदक कंठ्यांत घालूं नये, तें फेकूनसुद्धां द्यावें असें मला केव्हां केव्हां वाटे पण मला तसें करवत नसे. मला त्याचें जबरदस्त आकर्षण होई. तिजोरींत

चोरकप्प्यांत ठेवलेलें तें पदक काढून त्यांतून निघणारे तेजस्वी किरण बघण्यांत मी किती तरी वेळ घालवी आणि एकाद्या मेजवानीला किंवा नाचाला जातांना तें पदक मी मोठ्या डौलानें माझ्या मोत्यांच्या कंठ्यांत मध्यभागीं लटकावून माझ्या हृदयावर रुळूं देई. त्यांतला नीळ पहाणाराला जणुं भुरळ घाली. " गोष्ट सांगतांना ओल्गा एक दीर्घ उसासा सोडून मान दुःखानें इकडे तिकडे हलवीत भीतियुक्त पण गद्गद स्वरांत म्हणे, " अन् त्या दिवशीं हटकून कांहींतरी अशुभ गोष्ट घराण्यांत घडून येई. त्या दुष्ट निळानं माझे तीन राजबिंडे मुलगे बळी घेतले. रशियांतल्या बंडाच्या वेळीं आमची सर्वांची सुटका झाली असती. चीजवस्त घेऊन आम्ही सर्व वेष बदलून जवळजवळ सुरक्षित जागीं पोंचलों होतों. पण तें पदक हरवेल म्हणून गळ्यांत घालायची दुर्बुद्धि मला झाली आणि त्या पदकानंच शेवटीं आमचा घात केला. एका मोलकरणीच्या नजरेला तें पदक पडलं आणि तिनं मला वेष बदललेला असूनसुद्धां ओळखलं. नंतर माझे पती आणि दोन राजबिंडे मुलगे आणि सर्वांच्या सर्व संपत्ती बोल्शेव्हिकांच्या हातीं लागली. " ओल्गा डोळे पुशीत कंपित आवाजांत सांगे. " मी त्यावेळीं गरोदर होतें. म्हणून एका शिपायाला दया येऊन त्यानं मला मदत केली. माझ्या जिवलग माणसांना गोळी घातल्याचं ऐकलं तेव्हां मी जिवाला खरोखरी वैतागलें होतें. त्याच भरांत मी एकदां विहिरींत जीव देण्याचा प्रयत्न केला. पण एका दयाळू शेतकऱ्यानं मला सुरक्षित वर काढलं. मी अपुऱ्या दिवसांची बाळंतीण झालें. त्यावेळीं पुष्कळ आजारी असतां त्यानं आणि त्याच्या बायकोनं प्रेमळपणानं माझी सेवाशुश्रूषा करून मला बरी केली. थोड्या दिवसांनीं त्यांनींच मला वाटखर्चाला पैसे देऊन माझ्या लहानग्या दारियासह गुप्तपणें रशियांतून निघून यायला मला मदत केली. "

प्रथम ही हकिकत ऐकून कीर्तीनें विचारलें होतें, " अन् मग तें पदक अजून आहे कां तुमच्याजवळ ? "

त्यावर मिसेस लेझॉव्हनें अंगाला शहारे देऊन घाईनें सांगितलें होतें, " छेः छेः मी विहिरींत उडी टाकली ना तेव्हांच तें मेलं माझ्या गळ्यांतून पडून हरवलं. तें अजून माझ्याजवळ असतं तर न जाणों माझ्या लाडक्या दारियालासुद्धां मी अंतरलें असतें. तें पदक हरवल्यापासून खरोखर मी पुष्कळ सुखासमाधानांत आहे. मला कामधंदा मिळाला आहे. अन् माझी हुषार, सौंदर्यसंपन्न दारिया दिवसेदिवस मला

जास्तच आनंद देते आहे. आणि या लबाड मुलीनं कदाचित् सांगितलं नसेल तुम्हांला पण हिचं एका छानशा श्रीमंत इंग्लिश तरुणाशीं लग्न जमलं आहे बरं."

ओल्गा आपल्यासमोर बसून ही हकिगत आपल्याला आत्तां सांगत असल्याप्रमाणें किर्तीला क्षणभर भास झाला. आपल्या हातांतील निळाच्या अंगठीकडे पहात असतां तिच्या मनांत विचार आला, "ही निळाची अंगठी मलाही अपयश देणार नाहीं ना? कौस्तुभ आमच्या लग्नाला आईवडिलांना आमंत्रण देण्यासाठीं गेला आहे. कोण जाणे तिथें काय काय प्रकार होनात! मागल्याप्रमाणेंच कौस्तुभाच्या वडिलांनीं आक्रस्ताळेपणा केला तर–उद्यांचं लग्न नीटपणीं" पुढले शब्द कीर्तीला मनांतल्यामनांतसुद्धां उच्चारवले नाहींत. तिच्या हृदयांत कंप उत्पन्न झाला. आंगठी काढण्यासाठीं अधीर झाल्याप्रमाणें उजव्या हाताचीं बोटें तिनें डाव्या अनामिकेंतील अंगठीभोंवतीं जुळवून धरली. पण लगेच तिचें तिलाच हंसूं आलें.

"त्या अंधश्रद्ध लेझॉव्हबाईप्रमाणेंच मी आपली या बिचाऱ्या निळावर रागवायला लागलें कीं."

कीर्तीनें हंसून शीलेला उत्तर केलें, "इश्श, माझा नाहीं बाई असल्या गोष्टींवर विश्वास." आपल्या स्वरांत दुर्बलता होती कीं काय असा कीर्तीला भास झाला.

पण ती गोष्ट तिच्या दोघी मैत्रिणींच्या लक्षांत आली नाहीं.

कारण आपली गंभीर दृष्टि आळीपाळीनें आपल्या मैत्रिणींकडे वळवून, स्मितपूर्वक, परंतु नेहेमींच्या शांत व संथ स्वरांत धारिणी म्हणत होती, "शीले, तूं तरी वेडीच आहेस! अग तो नीळ म्हणजे काय असातसा समजलीस तूं? प्रत्यक्ष कौस्तुभानं आपल्या कीर्तीला–आपल्या म्हणजे कौस्तुभाच्या हो. नाहींतर आपल्या समजशील.—आपल्या कीर्तीला दिलेला प्रीतिकौस्तुभ आहे हो तो! मग तो कीर्तीला लाभेल कीं नाहीं अशी शंका तरी कशाला पाहिजे?"

यांतला दुहेरी अर्थ लक्षांत येऊन कीर्ति आणि शीला मनःपूर्वक हंसल्या.

धारिणीला सांथ करीत शीला म्हणाली, "आणि ती प्रीतिसुद्धां अशीतशी नव्हे. कीर्तीसाठीं कौस्तुभ जात जुमानीत नाहीं इतकंच नव्हे पण तो आईवडिलांनासुद्धां सोडायला तयार झाला आहे."

कीर्तीला या बोलण्यामुळें धन्यता वाटली. तिला मनोमन खात्री वाटली, "आमचा दिव्य प्रीतिकौस्तुभ कुणासाठींही माझा कौस्तुभ दूर फेकणार नाहीं." अंगठी काढण्याकरतां तिजभोंवतीं कीर्तीनें घातलेली पकड आपोआप सैल झाली.

शीलेनें कीर्तीचा गोंडस गौरवर्ण हात हातीं घेतला आणि तिच्या करांगुलींतील अंगठी आपल्या दोन्हीं बोटांनीं धरून तिच्याकडे नीट बघत ती प्रशंसेनें उद्गारली, " बघ बघ धारिणी, किती सुरेख खडा आहे पण. रंग कसा गडद निळा, अन् पैलू किती सुरेख रेखीव. असं वाटतंय कीं एकादं चिमुकलं निळं कमळच पाषाणाचं रूप पावलंय. पण काय ग, कालशी दिली अंगठी ही तुला कौस्तुभानं ? तुमचा वाङ्‌निश्चय झाल्याला वर्ष झालं आणि लग्न उद्यां तेव्हां या देणगीला नांव काय ? "

कीर्तीनें हंसून सांगितलें, " कांहीं नाहीं. मी अशीच सारखी तुझ्याप्रमाणें त्या निळाची प्रशंसा करीत असे तेव्हां काल कौस्तुभानं आपली ती माझ्या बोटांत घातली. अन्–" कीर्ति मध्येंच थांबल्याचें पाहून शीलेनें विचारलें, " अन् काय " ?

" कांऽहीं नाहीं. "

" कांहीं नाहीं कसं ? पुष्कळच आहे. "

तितक्यांत धारिणीनें अचानक विचारलें, " पण कीर्ति, तुझ्या हातांतील हिऱ्याची अंगठी कुठेय ग ? "

कीर्तीच्या गौरवर्ण मुखावर हळूं हळूं रक्तिमा पसरली. जणुं ती रक्तिमा तिच्या गालावरल्या चिमुकल्या खळ्यांत साठवलेली होती. ती आतां बाहेर उसळल्यामुळें त्या खळ्या स्पष्ट दिसूं लागल्या. कमलकोशांतील सुधारसाच्या कुप्याच जणूं ! आपली लांबसडक वेणी पुढें घेऊन तिच्या कुंचल्याशीं ती खेळ करीत होती. आतां आपलें लाजणें लपवण्यासाठीं तिनें केसांचा कुंचा उगीचच हळुवारपणें तोंडावरून फिरवला आणि वरल्या शुभ्र व बारीक दंतपक्तीनें तिनें आपला खालचा लाल व मृदु ओठ दाबून धरला. धारिणीचा प्रश्न आपण ऐकलाच नाहीं अशी बतावणी तिला करायची होती. परंतु तिच्या टपोऱ्या काळ्याभोर डोळ्यांनीं तिला फसवलें. आपला बनाव कितपत यशस्वी झाला हें बघण्यासाठीं ते धारिणी व शीलेकडे आपोआप वळले आणि त्या डोळ्यांनीं तिच्या अंतःकरणांतले कोमल भाव एकाद्या बिलोरी आरशांतल्या प्रतिबिंबाप्रमाणें स्वच्छपणें धारिणीला आणि शीलेला दाखवून दिले.

" अस्सं. आंगठ्यांची अदलाबदल केलीय होय ? " शीला मान हळूंहळूं हलवीत मिष्किलपणें हंसत, जरा तिरक्या नजरेनें कीर्तीकडे पाहून बोलली. " किती पण यथार्थ देणगी दिलीस तूं कौस्तुभाला. कारण कीर्ति, तुला आतां हिरा काय करायचा ? कौस्तुभाच्यासारखा तेजस्वी, कीर्तिमान्, कलांच्या पैलूंनीं शोभणारा हिरा उद्यां कायमचा लाभणार ना तुला. "

" हो. अन् पुन्हां पाषाणहृदयी नव्हे तर कीर्ति ज्याच्या हृदयांत अधिष्ठित आहे असा हो. नव्हे अगदीं अंतर्बाह्य कीर्ती आहे असा. "

" मग त्या दृष्टीनं पहातां हिच्या अंगठींतल्या निळाच्या जागीं जर उत्तमपैकीं टपोरं मोतीं बसवलेलं असतं तर फार बरं झालं असतं. कारण आमची कीर्ति म्हणजे शुभ्र, हंसरं निर्वेज मोतींच. शुद्ध हृदय आणि सात्त्विक तेजानं मन मोहून घेणारं. आंतून बाहेरून सारखंच शुभ्र. "

शीला कीर्तीकडे स्नेहभरानें बघत होती. त्या स्नेहनिर्भर नजरेनें कीर्तीचीही स्नेहभावना उचंबळून आली. ती मधुरपणें हंसली.

तितक्यांत धरिणी म्हणाली,

" शीला, किती पण सुरेख वर्णन केलंस तूं हिचं ? " धरिणी कौतुकानें कीर्तीकडे पहात होती. " आमची कीर्ति म्हणजे खरोखरच शुभ्र मोतीं आहे. पण अजून तें निर्वेज आहे. जरा धक्का लागला कीं तें घरंगळत सुटतं आणि मोठ्या प्रयासानं तें थांबतं. नाहीं ग कीर्ति ? "

कीर्ति जरा ओशाळल्यासारखी झाली. कारण धारिणीनें आतां तिच्या अल्लडपणा-बद्दल जी प्रेमळ सूचना केली ती कीर्तीला कांहीं नवीन नव्हती. कांहीं कांहीं वेळां भावनांच्या आहारीं जाऊन, कीर्ति कांहींतरी चूक करी. त्यांच्या शाळाकॉलेजांतल्या चिमण्या आयुष्यांत मोठ्या चुका घडाव्या असें वातावरणच नव्हतें म्हणा. पण येवढ्या तेवढ्या गोष्टी मनाला लावून घेऊन ती जिवाला त्रास करून घेई, रागवारागवी, रुसवारुसवी होई आणि मग धारिणीला आणि शीलेला सर्व सारवासारव करून तिची समजूत घालावी लागे. आपल्या दोघीं मैत्रिणींवर कीर्तीचें अढळ प्रेम आणि विश्वास होता. आणि इतरही मैत्रिणी तिला कांहीं थोड्या नव्हत्या. कारण तिचा स्वभाव अतिशय मधुर होता. ती मोठी झाल्यापासून तिच्या मनाला लागण्याजोगी एकादी

गोष्ट झाली तरी ती दुसऱ्याला कांहीं बोलून दाखवीत नसे. स्वतःच मनाला लावून घेई, आणि त्रास भोगी.

म्हणूनच आतां धारिणीनें तिला अल्लडपणाबद्दल जरा टोंचणी दिली तरी ती मुळींच रागावली नाहीं. आपला स्वभावदोष कीर्ति जाणून होती. पण तिच्या स्वभावाला तिच्याजवळ औषध नव्हतें. अजून तिला तें सांपडलें नव्हतें.

पुन्हां धारिणी तिला म्हणाली, " इतकं हळवं मन काय बाई कामाचं ! अग, गुलाबाचं फूल इतकं नाजूक आणि कोमल असतं पण उन्हानं करपून त्याच्या पाकळ्यासुद्धां कणखर नी चिवट बनतात. पण कीर्ति, तूं बकाली मुंबईत राहून बी. ए. झालीस, इंग्लंडमध्यें राहून बी. एस्. सी. पदवी मिळवून आलीस. आतां इंग्लंडहून आल्यापासून आपल्या जातीच्या उद्धारासाठीं सहा महिने वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून इतकी तळमळतेस, व्याख्यानं देतेस, पण कितीही जग पाह्यलंस तरी अजून तुझं तें हळवं हृदय मात्र जसंच्या तसं मखमलींतल्या मोत्यासारखं—"

तिला मध्येंच थांबवून शीला म्हणाली, " चुकलीस धारिणी, मोती कठीण असतं. त्यापेक्षां कमलकोशांतल्या दंवबिंदूसारखी म्हणेनास."

" बरोबर आहे शीले," कीर्ति चेष्टेनें म्हणाली, " अन् तूं म्हणजे हंसरं मोगरीचं फूलच. नाहींतर नाजूक प्रफुल्ल कमळच."

" कीर्ति, ही तुझी उपमा फारच समर्पक आहे. शीला खरोखरच कमलासारखी कोमलहृदयी आहे. पण कीर्ति, कांहीं झालं तरी ती तुझ्यासारखी कांहीं भलतीच हळवी नाहीं. कमलावर कितीही पाणी पडलं तरी तें ओलं होत नाहीं किंवा नासून जात नाहीं त्याप्रमाणें शीला किती कां नाजूक हृदयाची असेना, तिला दुःखांचे आघात स्पर्श करूं शकत नाहींत. ती प्रफुल्ल ती प्रफुल्लच रहाते. तिच्या स्वभावसौंदर्याचा परिमल चोंहीकडे पसरतच असतो." प्रथम धारिणीनें सुरवात चेष्टेनें केली होती परंतु मागून गंभीरपणानेंच शेवट केला.

पण शीला खिदळत दोन्ही हातांनीं धारिणीला ओवाळीत म्हणाली, " अहाहाहा धारिणी, संगतीसंगदोषेण कां होईना पण उपमा खरोखरच सुरेख बोललीस. तुझ्यासारख्या शस्त्रविद्याविशारद डॉक्टरणीच्या तोंडून हें काव्य ऐकून माझ्या हृदयाची अगदीं घालमेल व्हायला लागली बघ."

सर्वांचें हंसणें ओसरल्यावर धारिणी पुन्हां गंभीरपणें म्हणाली, " खरोखर या जगांत शीलेसारखंच राह्यलं पाहिजे. कावेरीबाईसारख्या सावत्र आईच्या हाताखालीं आणि तिच्या सर्वस्वीं मुठींत राहून आपल्या मुलीला छळणाऱ्या भाऊसाहेबांच्या-सारख्या वडिलांच्या अंमलाखालीं राहूनसुद्धां ही शीला किती आनंदी स्वभावाची आहे बरं."

" पण धारिणी, मी तर म्हणतें कीं अशा दुस्सह परिस्थितींत ही वाढली म्हणूनच ही बाहेरून अशी शिळेसारखी टणक झाली आहे. आंतला आनंदाचा झरा मात्र सतत पाझरतोच आहे." कीर्तीनें नेहेमींप्रमाणेंच स्वतःच्या स्वभावाचें समर्थन केलें.

शीलाही गंभीरपणानें म्हणाली, " कीर्ति म्हणते तें कांहीं खोटं नाहीं धारिणी. कीर्तीला आई नाहीं. तिची आई इतक्या लहान वयांत वारली कीं तिला तिची आठवणसुद्धां नाहीं. आणि दादासाहेबांनीं मुलीला त्रास होईल म्हणून पुन्हां लग्न न करतां मुलीला स्वतःच्या काळजासारखी जपली, वाढवली. श्रीमंतीमुळें आणि मुंबईंत आयुष्य गेल्यामुळें जातीबद्दलसुद्धां तिला कधीं त्रास झाला नाहीं. कोणत्याही गोष्टीची उणीव कधीं हिला भासलीच नाहीं मुळीं. गोड मोकळ्या स्वभावामुळें नोकरचाकरसुद्धां हिला जीव कीं प्राण करतात. बरं तैलबुद्धीमुळें शाळा कॉलेजांत शिक्षकांनीं हिचं कौतुक केलं."

" होय होय. आणि इंग्लंडमधें कुणी हिचं कौतुक नी लाड करायला नाहीं म्हणून देवानं कौस्तुभांना त्याच वेळीं डी. एस. सी. होण्याकरतां पाठवून दिलं."

या धारिणीच्या बोलण्यावर पुन्हां दिवाणखाना हंसण्यानें दुमदुमून गेला.

शीलेनें लाडकासा स्वर काढून मिष्किलपणानें विचारलें, " ए कीर्ति खरं सांग तूं कौस्तुभावर किती वेळां रुसलीस. अन् त्यांनं तुझी कशी समजूत घातली. बाई बाई बाई. काय पण गुलाब फुलले लगेच गालावर. तुझे ते टपोरे डोळे फसवताहेत हो तुला. तुला वाटत असेल आपण रागाचा अभिनय करतो आहों म्हणून. पण ते डोळे हंसताहेत बरं का. अयाई, माझा कान कां ओढतेस ? तो कांहीं कौस्तुभाचा कान नाहीं."

कीर्तीनें शीलेचा कान सोडून दिला. हंसूं येत असलेलें दाबून आपल्या विस्तीर्ण अर्धचंद्राकृति कपाळावर आंठ्या घालून ती म्हणाली, " ए हें असलं कांहींतरी

बोलायला आलांत कां ग तुम्ही माझ्या घरीं ? उद्यां लग्न व्हायचं म्हणून म्हटलं आज मोकळेपणीं आपण बोलून घ्यावं तर—"

शीलेनं कीर्तीला पुढें बोलूंच न देतां हातांचे पंजे पसरून ते हलवीत असा कांहीं गंमतीदार मुखाविर्भाव केला अन् मान इकडेतिकडे हलवली. मग ती म्हणाली, "भले. तुला असं वाटलं कीं काय कीर्ति कीं, उद्यां तुझं लग्न झाल्याबरोबर तुला आम्ही कौस्तुभाला पूर्णपणें बहाल करूं म्हणून. मियांबिब्बीचं राज्य हवं असेल तर जा मधुचंद्रासाठीं पुन्हां विलायतेंत नाहींतर बंगलोरला. इथं मुंबईत तूं आहेस तोंवर आम्ही मनांत आलं कीं तुझ्या घरीं येणार. अजून आठ दिवस मुंबईतच रहाणार आहां ना तुम्ही ?"

कीर्तीनें हंसून कोपरापासून हात जोडले. मग तिघी मैत्रिणी मनमुराद हंसूं लागल्या.

तितक्यांत एका क्रिश्चन बटलरनें एका चांदीच्या ट्रेमध्यें खाद्य पदार्थ आणि गुलाबी आईस्क्रीमनें भरलेलीं कांचपात्रें आणून एका नक्षीदार सागवनी चौपाईवर स्वच्छ चादर घालून तो ट्रे ठेवला. नंतर ती चौपाई या तिघी मैत्रिणींच्या शेजारीं ठेऊन आणखी कांहीं आज्ञा आहे कीं काय हें समजाऊन घेण्यासाठीं मान किंचित् लववून तो उभा राहिला. शीलेकडे त्यानें हळूंच एकदां ओझरती दृष्टि टाकली. शीलेनें आपल्याशीं बोलावें ही त्याची अपेक्षा उघड होती.

लगेच शीलेनें स्मितपूर्वक विचारलें, "क्यों एडी, तुम्हारी माँकी तबियत तो ठीक है न ?"

"जी. हाँ. आपकी कृपाकी कारण सबही अच्छा है. थेंक यू शीलाताईसाब."

किती गंभीरपणानें एडीनें ( एडवर्डनें ) उत्तर दिलें होतें. त्याची ती काळीकुट्ट पण तरतरीत साहेबी बटलरच्या पांढऱ्या शुभ्र पोषाखांतली मूर्ती दादासाहेबांच्या घरीं येणाऱ्या सर्वांना सुपरिचित झालेली होती. मूळ हिंदू पण कुणीतरी पूर्वज क्रिश्चन झाले होते. तो आज पंधरा वर्षें दादासाहेबांच्या घरीं नोकरींत असून त्याची काळीकुट्ट, लठ्ठ आणि गंमत्या स्वभावाची पोक्त वयाची आई मेरी तेथेंच स्वैपाकाला होती. एडीसुद्धां खरोखरी अत्यंत गंमत्या स्वभावाचा. पण साहेबलोकांच्या बटलरांचें अनुकरण करून तो कधींही भावनाप्रदर्शन करीत नसे. त्यामुळें त्याची चर्या नेहेमीं हंसण्याची उकळी दाबून ठेवलेल्या माणसासारखी दिसे. आणि त्यावर ओढून आणलेलें गांभिर्य बघणाऱ्याला हंसूं आणीत असे. शीला त्याला नेहेमींच मुद्दाम हंसवण्याचा प्रयत्न करी. मग तर हंसूं दाबण्याकरतां एडीचे जे प्रयत्न चालत ते फारच हास्यास्पद होत. पुढल्या दोन मोठाल्या दांतांनीं धूम्रपानामुळें जांभळे झालेले ओठ दाबीत तो बोले तरी ओठ हंसण्याकरतां हालचाल करीतच. आंवढा गिळून तो हंसूं गिळण्याचा जणुं प्रयत्न करी. चेहरा गंभीर व करारी दिसावा म्हणून तो भुंवया उंचावून धरी.

हा त्याचा अभिनय बघून कीर्ति आणि धारिणी यांना आपलें हंसूं आवरणें कठीण होई पण शीला मात्र बिलकुल न हंसतां सहजगत्या बोलत असे. एडीला हंसूं आवरण्याचें शीलेचें मनःसामर्थ्य बघून जणुं शीलेचा मत्सर वाटे. पण शीला बोलली नाहीं तर मात्र त्याला चैन पडत नसे. तो शीलेकडे पुन्हां अपेक्षेनें बघूं लागला. इकडे त्याचें काम चालूंच होतें.

शीलेनें पुन्हां त्याला म्हटलें, "अब तुम्हारी ताईसाब ब्याहकर पतिघर जाय तो तुम्हारा काम बहोत कमती हो. मालुम पडता है कीं ताईसाब तुमको बहुत सताती है."

"ओ नो नो" एडी फक्त स्वरानें निषेध दर्शवीत बोलला, "हमारी ताईसाबकी तरह दयालु स्त्री कभी न दिखायी. बाईसाब तो एँजल हैं एँजल."

"ओ" शीला विस्मययुक्त नाराजी दर्शवून म्हणाली. "क्यों एडी, तू मेरे सामने और धारिणीताईसाबके सामने क्या बात कह रहा है. क्यों धारिणीताईसाब और मै भी ताईसाबकी तरह दयालु और एँजल नहीं हूँ?"

एडी अगदीं गोंधळून गेला. दोन्हीं हात एकावर एक चोळीत तो घाईघाईनें म्हणाला, "माफ कीजिये, माफ कीजिये शीलाताईसाब, आप सब एँजलही हैं."

कीर्ति आणि धारिणी यांना हंसूं येऊं लागलें.

तितक्यांत शीला टाळी वाजवून म्हणाली, "हाँ हाँ. तू तो बहोत सची बात कहता है. हम सब एँजलही हैं. लेकिन एडी, तू क्या डार्क एँजल है?"

हे शब्द ऐकतांच कीर्ति आणि धारिणी या मोठ्यानें हंसत सुटल्या. एडीला अनावर हंसूं येत होतें. तें दाबण्यासाठीं त्यानें लांबलचक श्वास घेतला, कसाबसा आवंढा गिळला, आणि लवून घाईघाईनें जातां जातां म्हटलें, "थेंक यू. थेंक यू. शीलाताईसाब."

एडी जातांच कीर्ति शीलेला म्हणाली, "कां नेहेमीं त्या बिचाऱ्याच्यामागें लागतेस ग?"

शीलेनें मान उडवून उत्तर दिलें, "अहाहा, तूं मोठी खरोखरची एँजल लागून गेलीस किनई."

नंतर शीला कांहीं गंमत आठवल्याप्रमाणें म्हणाली, "मी अलीकडे तुझ्याकडे खातेपिते असा आमच्या माईसाहेबांना संशय आला. अन् लागल्या मला बोलायला. तेव्हां मी त्यांना काय सांगितलं माहीत आहे कां? कीं तुझ्या घरीं दूधफळांखेरीज मी कांहीं म्हणतां कांहीं खातपीत नाहीं. तें पुष्कळ दिवस पचलं, पण तो मेला केसूभाई आहे ना. त्यानं एक दिवस सगळं गुपित फोडलं अन् मग मी चक्क सांगितलं कीं तुमच्याकडे एक ब्राह्मण स्वैपाकाला ठेवला आहे म्हणून."

पुन्हां एकदां दिवाणखान्यांत हास्यनाद दुमदुमला.

कीर्ति मग शीलेला अर्धवट थट्टा, अर्धवट गांभिर्य यांनीं मिश्र स्वरांत म्हणाली, “कशाला आतां हे जाचकाच सहन करतेस शीला ? भूषणाशीं लग्न करून टाक ना लवकर.”

शीलेनें कांहीं विचित्रच मुखाविर्भाव केला. खांदे उडवून, दोन्ही पंजे पसरून मोठ्या गंमतीनें हंसून ती म्हणाली, “कसं करूं लग्न ? भूषण मुळीं कांहींच बोलत नाहीं. आमचे भाऊसाहेब माईसाहबांच्या भीतीनं भूषणाला त्याबाबतींत कांहीं विचारीत नाहींत. मग लग्न व्हायचं कसं ?” शीलेनें एक निश्वास टाकला. नंतर लगेच हंसून ती म्हणाली, “बरं राहूं दे आतां तें भारूड, तें आइस्क्रीम वितळून जाईल उगीच.”

नंतर एडीनें आणलेल्या सुंदर, लज्जतदार पदार्थावर ताव मारीत, गप्पागोष्टी, हास्यविनोद यांमध्यें त्या तिघी जिवलग मैत्रिणींचा आणखी एक तास भुर्रकन् निघून गेला.

शीलाधारिणी जायला निघाल्या तेव्हां कीर्तीनें त्यांना बजावलें, “उद्यां सकाळ-पासून यायचं हं. मी गाडी पाठवीन. लवकर उठून तयार रहा. जर उशीर केलांत तर पहा. अन् धारिणी, लयलाताईला मी उद्यां जरूर बोलावलं आहे म्हणून सांगितलंस ना ? आज पुन्हां सांग हं.”

“लयलाताई !”

अंधारांत मनुष्य सुस्तपणें बसला असतां डोळ्यावर एकदम प्रकाशाचा झोत पडल्यानें दचकतो त्याप्रमाणेंच धारिणी आतां दचकली. पण लगेच ती सांवरली.

फक्त अबोलपणें दुःख सांगणारा एक दीर्घ निश्वास टाकून धारिणीनें उत्तर दिलें, “लयलाताई ना ? मी सांगितलाय तिला निरोप तुझा.”

“मग येईल ना ती उद्यां ?”

धारिणी मान हलवीत म्हणाली, “छेः ती कसली येतेय ! आज पुन्हां आमचे भाऊजी हेंगलवाडकर यांचं पत्र आलंय ना.”

“काय म्हणतात मग ? कांहींच आशा नाहीं का ?”

“कांहीं नाहीं.” धारिणीनें आत्यंतिक निराशेनें उत्तर दिलें.

“बिचारी लयलाताई !” कीर्तीनें दुःखोद्गार काढला. “पण तिला म्हणावं घरीं रडत बसून तरी काय होणार ? तूं घेऊनच ये तिला.”

" हो तेंही खरंच. मी पहातें प्रयत्न करून. " धारिणीनें उत्तर दिलें.

मग कीर्तीनें आपल्या दोघी मैत्रिणींना निरोप दिला.

आज कां कोण जाणें निरोप देतांना कीर्तीला विशेषच वाईट वाटलें. आजपर्यंत शेकडों वेळां तिनें आपल्या घरून निघालेल्या शीलाधारिणी या दोघींना निरोप दिलेला होता. परंतु आज तिला कांहींतरी खुपतेसें वाटत होतें. आपल्या या मनस्थितीबद्दल तिचा तिलाच विस्मय वाटला. कारण उद्यां लग्न होऊन लगेच ती कांहीं कुठें साता समुद्रापलीकडे जाणार नव्हती. तिच्या मैत्रिणीही तिला कांहीं आजच अंतरणार नव्हत्या.

पण—पण तिला आज कांहीं तरी वेगळें वाटलें खरें. लग्नापूर्वीचें आयुष्य आणि लग्नानंतरचें आयुष्य यांत तिला आज सातां समुद्रांचें अंतर आहेसें वाटलें. प्रत्यक्षांत नव्हे तरी भावनासृष्टीच्या दृष्टीनें आपण आपल्या मैत्रिणींपेक्षां वेगळ्या सृष्टींत वावरणार असें तिला वाटलें. जिना उतरून पुढल्या कमानीशीं येईपर्यंत अनेक विरोधी भावनांनीं तिच्या मनांत गर्दी करून सोडली.

त्याच आवेगाच्या भरांत भारावलेल्या कंठानें शीला आणि धारिणी यांचे हात आपल्या हातीं घेऊन कीर्ति म्हणाली, " थँक्स हं. फॉर एव्हरीथिंग माय डिअर फ्रेंडस्. " माय डिअर फ्रेंडस् हे शब्द जणुं कीर्तीला हृदयंगम वाटत असल्याप्रमाणें तिनें त्यांचा हळुवारपणें व आदराने उच्चार केला.

आश्चर्यचकित होऊन शीला आणि धारिणी थट्टेनें कांहीं बोलणार तोंच त्यांना कीर्तीच्या काळ्याभोर नेत्रांत आंसवें थरथरत असल्याचें दिसलें. कृष्णकमलावरील शुभ्र परागकण जणूं !

शीला आणि धारिणी यांचे थट्टेचे शब्द ओठावरल्या ओठावरच राह्यले. त्या म्हणणार होत्या, " अजून कांहीं आमची मैत्री संपलेली नाहीं. यापुढेंही आम्ही डिअर फ्रेंडसच रहाणार आहों. " परंतु हे शब्द अनुच्चारितच राहिले. त्यांनाही एकदम वाटलें कीं यापुढें मानसिक दृष्ट्या आपणांत आणि हिच्यांत अंतर पडणार. या विचारानें त्या दोघींच्याही डोळ्यांत अश्रू जमूं लागले.

कीर्तीच्या आसवांना त्यांच्या आसवांनीं मूक उत्तर दिलें. पण शाब्दिक उत्तर त्यांना सुचलें नाहीं. आपल्या हातांनीं कीर्तीचा हात प्रेमभराने दाबून त्यांनीं तिचा निरोप घेतला.

---

# —३—

कीर्ति किती वेळ तरी कमानीच्या पाद्यऱ्यांवर उभी राहून बागेंतील डाव्या रस्त्यानें जाणाऱ्या आपल्या दोघी मैत्रीणींच्या पाठमोऱ्या आकृतींकडे बघत होती. तिला वाटलें कीं आपलें आजपर्यंतचें पावशतकाचें आयुष्यही आपला निरोप घेऊन यांच्याबरोबरच निघून चाललें आहें. उद्यां उजव्या हातानें आपलें भावी आयुष्य प्रवेश करणार आहे.

तितक्यांत रस्त्यालगतच्या फाटकाशीं पोंचलेल्या शीलेनें मागें वळून आपला चिमुकला रुमाल उडवून पुन्हां दूरचा निरोप घेतला. मोगरीच्या फुलासारखी हंसरी, अल्लड, संध्याकाळच्या आरक्त उज्वल प्रकाशांत अत्यंत मोहक दिसणारी शीला, तिचे ते भुरुभुरु उडणारे भुरे केस, तिचा तो रुमाल वर उडवण्याकरतां उचललेला गोंडस बाहु. तिच्या प्रत्येक अंगविक्षेपांत, मोहकता आणि अल्लडपणा यांचें मधुर मिश्रण असे.

कीर्तीला भास झाला कीं हें आपलें मोहक मधुर पूर्वायुष्य शीलेच्या रूपानें आज आपला निरोप घेत आहे. या संध्याकालीन आरक्तोज्वल प्रकाशाबरोबरच आपलें तें आयुष्यही हळूंहळूं विलीन होत चाललें आहे. कीर्तीनें आपला रुमाल हलवून, जड चित्तानें, केवळ शीलेलाच नव्हे तर त्या पूर्वायुष्यालाही जणूं निरोप दिला.

धारिणीही मागें वळून उजवा हात हलवीत होती. कीर्तीला वाटलें, कोमल वेलीला मंडपीचा आश्रय असला म्हणजे ती सुंदर सुवासिक सुमनांनीं बहरते, सूर्य-किरणांबरोबर हंसते, समीरणाबरोबर नाचते बागडते. नंतर त्या वेलीनें वृक्षाचा आधार घेतला कीं मंडपीचें काम रहात नाहीं; त्याप्रमाणें ही धारिणी, जिनं आपल्या प्रेमाचा आधार आजवर आपल्याला दिला ती त्या पूर्वायुष्याबरोबरच आतां निघून चालली आहे.

त्या डाव्या वाटेवर आतां कोणीही नव्हतें. ज्या वाटेनें त्या दोघी मैत्रिणी गेल्या—तें पूर्वायुष्य गेलें, ती वाट मात्र आतां दिसत होती.

कीर्ति कमानीच्या वरल्या पाद्यरीवर उभी होती. तिला वाटलें आपण आज पूर्वायुष्य आणि भावी आयुष्य या दोन्ही वाटांच्या मध्यावर उभ्या आहोंत.

त्या पूर्वायुष्याच्या विरहाच्या कल्पनेनेंच कीं काय कीर्तीच्या तोंडून एक व्याकुलतेचा निश्वास बाहेर पडला.

नंतर चारी बाजूला तिनें एक स्नेहार्द्र नजर टाकली. कमानीपुढील ती विस्तीर्ण, लहानलहान कुंजनिकुंज, वाटिका यांनीं सजवलेली आणि आतां वसंतऋतूमुळें विविध फलपुष्पांनीं बहरलेली बाग. कीर्तीला त्या बागेंतील प्रत्येक वृक्षलतेचा, कुंडींतील प्रत्येक रोपाचा इतिहास, त्यांवर आलेलीं बारीकमोठीं संकटें; त्या संकटांतून त्यांची सुटका, त्यांना प्रथम आलेले अंकुर, फुलें, फळें; कांहीं वठत चाललेले वयस्कर वृक्ष या सर्वांची माहिती होती. त्या बागेंतील वृक्षलतांबरोबर कीर्तीनें केवढें तरी भावनामय आयुष्य घालवलें होतें. एकाद्या वेलीला कीड लागली कीं कीर्तीला धसका बसे. माळ्याला सांगून औषधें घालून एकाद्या रोग्याप्रमाणें त्या वेलीची शुश्रूषा ती करी. एकाद्या झाडाला फळाफुलांचा बहार आला कीं कीर्तीचें अंतःकरणही बहरून येई. यथेच्छ फलपुष्पें देऊन आतां वयोपरत्वें वठत चाललेल्या झाडांबद्दल तिला मोठा आदर वाटे. असे वृक्ष तोडण्याची वेळ आली कीं कीर्तीला मनस्वी वाईट वाटे.

कॉलेजांतील प्रथम वर्षी शाकुंतल शिकत असतां शीला नेहमीं म्हणे, "काय त्या झाडांचं कौतुक वाटतंय शकुंतलेला. कधीं तरी झाडांबद्दल इतकं प्रेम वाटणं शक्य आहे कां?"

यावर कीर्ति तिला सांगे, "कुंडींत कां होईना, पण एक तरी रोप तूं आपल्या हातानं लाव, त्याला पाणी घालून वाढव अन् मग मला सांग कीं वनस्पतिसृष्टीही किती सजीव आणि भावनात्मक आहे ती. एकेक वृक्ष, एकेक रोप म्हणजे विधात्यानं निसर्गपटावर लिहिलेली एकेक कादंबरी आहे समजलीस."

परंतु शकुंतलेनें निसर्गाचा निरोप घेतांना जी व्याकुलता दाखवली ती मात्र कीर्तीला जरा जास्त वाटे. पण आज तिला कळून आलें कीं त्यांत अवास्तव कांहींही नव्हतें. कीर्तीला अनिवार इच्छा उत्पन्न झाली कीं आपण आतां बागेंत जाऊन प्रत्येक वृक्षलतेला, प्रत्येक रोपाला स्नेहस्पर्श करून त्यांचा निरोप घ्यावा. तिच्या मनांत अशी शंकासुद्धां उद्भवली कीं रोजच्या रोज आपण यांच्याजवळ जाऊन यांची वास्तपुस्त घेतों तशा जर आपण यांच्याजवळ आतां यापुढं गेलों नाहीं तर यांना आपला विरह खरोखरीं जाणवेल कां? इतकी सजीवता या वनस्पतींत असेल कां? पण शंका कशाला? खरोखरच त्यांना आपला विरह

जाणवेल. आपण त्यांचा निरोप घेऊन भावी विरहाबद्दल त्यांचं सांत्वन केलं पाहिजे. कधींमधीं येऊन भेटण्याचं त्यांना आश्वासन दिलं पाहिजे. या विचारानें कीर्ति एक पायरी उतरलीसुद्धां. पण लगेच ती तेथल्यातेथेंच थबकली.

निसर्गाच्या सांनिध्यांत वाढलेली ती अजाण शकुंतला, आणि विसाव्या शतकांतली उच्चविद्यासंपन्न कीर्ति !

कीर्तीनें आपल्या उचंबळणाऱ्या भावना आवरल्या. किंचित् हंसून ती स्वतःशींच म्हणाली, “ काय आज मला असं वेड्यासारखं झालंय तरी. ”

एकवार हळूंहळू सबंद बागेकडे बघून तिनें एक नाजूक स्नेहमय आवरणच जणुं त्या बागेवर पसरलें. ती बागही जणुं म्लानवदन होऊन ऊष्ण उसासे टाकीत अंधकारांत विलीन झाली. बंगला आणि बाग यांच्यावरील आकाशभाग देखील कीर्तिच्या स्नेहार्द्र निरोपानें म्लान झाला. मोठ्या कष्टानें कीर्ति वळली. डाव्या बाजूच्या जिन्यानें आपल्या माडीवरल्या खोलींत ती पुन्हां आली. अंधार पडल्यामुळें दाराजवळच असलेली कळ दाबून तिनें विजेचा दिवा लावला. अन् तेथल्या तेथेंच थबकून ती उभी राहिली. ती प्रशस्त नानापरींच्या बहुमूल्य वस्तूंनीं सजवलेली, कित्येक वर्षांची चिरपरिचित खोली आज तिला कांहीं वेगळीच दिसूं लागली. खोलीचा कोपरान् कोपरा बघतांना तिला कितीक पूर्वस्मृति आठवूं लागल्या. त्या पूर्वस्मृति बऱ्याचशा अंधुक स्वरूपांत आहेत, त्या पूर्णपणें आठवाव्या अशी तिला तीव्र इच्छा झाली. तिला काय वाटलें कोण जाणे तिनें भराभर फळीवरल्या दुसऱ्याही कळी दाबून छतांतले तीन दिवे, मधलें पांच दिव्यांचें झुंबर, भिंतीवरील छताजवळील कंगोऱ्यांत लपवलेले चार गुलाबी दिवे आणि त्याखालचे आकड्याचे चार दिवे लावून सबंद खोलींत रोषणाई करून टाकली.

कीर्तीचा गौरवर्ण गोंडस उजवा हात अजून शेवटल्या कळीवरच होता. डावा हात वांकवून कटिभागावर त्याचा पंजा पसरून ठेवलेला होता. गुडघ्यांत बांक आणून, डाव्या पावलाचीं टांच उचलून, फक्त अंगुलींचा आधार घेऊन मान किंचित् डाव्या बाजूला कलती ठेवून ती बघत होती. या एकंदर मनोहर अंगविक्षेपामुळें तिची गोंडस तनुलता अत्यंत सौष्ठवयुक्त दिसत होती.

कीर्तीच्या अस्मानी रेशमी वस्त्राचा पदर पाठीवर लांबसडक वेणीबरोबरच रुळत असून उजव्या बाजूच्या गोंडस स्तनभागावरून जरीचा कांठ घसरून खालीं

आला होता. मोठा गळा असलेल्या बिनबाह्यांच्या ब्लाऊजमुळें कंठाजवळचा बराचसा केतकीपत्रासारखा गौरवर्ण भाग आणि पाणिदार मोत्यांची एकदाणी स्पष्टपणें दिसत होती. प्रातःकालीन अरुणप्रभेप्रमाणें, उज्वल आणि थोडा गुलाबी प्रकाश मिसळलेल्या विद्युत्प्रकाशांत तिचा तांबूस गौरवर्ण कितीतरी पटीनीं जास्त रक्तगौर आणि तेजस्वी दिसत होता.

प्रकाशलहरींवर एकादी कमलिनीच जणूं तरंगून उभी राहिली होती !

तिच्या काळ्याभोर विशाल नेत्रांत, खोलीभर भिरीभिरी हिंडणाऱ्या दृष्टीच्या योगानें आकाशखंडांतील लुकलुकणाऱ्या तारकांप्रमाणें दिव्यांचीं प्रतिबिंबें नाचत असल्याचा भास होत होता. जणूं तिच्या बाहुलींतील तेजकणिका एक्सरे कॅमेऱ्यांतील तीव्र शक्तीच्या किरणांप्रमाणें खोलींतील एकूण एक पदार्थ व त्यांच्याशीं संलग्न असलेल्या पूर्वस्मृतींच्या सुखदुःखांच्या छायाप्रकाशांचें सुस्पष्ट प्रतिबिंब, हृदयाच्या कांचेवर क्रमाक्रमानें उमटवून दाखवीत होत्या.

कीर्तीचा विस्तीर्ण अर्धचंद्राकृति भालप्रदेश विचारांची गर्दी झाल्यामुळें जणूं अधिकच विस्तृत दिसत होता. त्यावर विखुरलेल्या दोन तीन अल्लड, कुरळ्या केसांच्या बटांकडे लक्ष द्यायला त्याला बिलकूल अवसर नव्हता आणि म्हणूनच जणूं त्या रुसून अगदीं निश्चल बसल्या होत्या. तो भालप्रदेश कीर्तीचें बुद्धिवैभव आणि विचारविलसित दर्शवीत होता तर तिची किंचित् बाक असलेली नासिका हृदयांतील प्रत्येक भावनेबरोबर रेषामात्र हालचाल करणाऱ्या पातळ नाकपुड्यांनीं तिची भावनोत्कटना उघड करीत होती. तिचे नाजूक, विद्रुमतुल्य ओठ किंचित् स्फुरत असल्यामुळें पूर्वस्मृतींबरोबर जणूं संभाषण करण्यासाठीं उद्युक्त झाल्याप्रमाणें दिसत असून, वरली शुभ्र दंतपक्ती त्या उच्छृंखलपणापासून आंवरण्याकरतां अधरोष्ठाला दाबीत होती.

सरोवराच्या कांठावरून, समोरल्या पाण्याच्या पृष्ठभागावर राजहंसांचा थवा झरझर पोहत जातांना दिसावा, नंतर तो पुढें जाऊन पाण्यावर नुसत्या लहरी दिसाव्यात, नंतर तो थवा पूर्ण दृष्टीआड जाऊन त्या लहरीही शांत होत जातात तोंच दुसरा कलहंसांचा समूह समोर पोहत येऊन निघून जावा, अन् तितक्यांत चक्रवाक् पक्षांचा समुदाय पोहत येतांना दिसावा, त्याचप्रमाणें कीर्तीच्या मुखमंडलावर

पूर्वस्मृतिनिष्ठ भावना झरझर तरंगून जातांना आणि त्या निरनिराळे विचारतरंग उठवतांना दिसत होत्या.

कीर्तीची ती खोली ! तिच्यांतील प्रत्येक वस्तू म्हणजे दादासाहेबांच्या वात्सल्याचें मूर्तिमंत प्रतीक होतें !

दादासाहेबांचें लग्न लहानपणींच गीताबाईशीं झालें. नंतर त्यांना दोन तीन मुलें होऊन तीं सर्व दुर्दैवानें कालवश झालीं. आणि मग मध्यें पंधरा वर्षांचा खंड पडून दादासाहेबांना चाळीसाव्या वर्षी कीर्तिरूपी ठेवा लाभला. कीर्तिमालिनी हें नांव दादासाहेबांनीं मुद्दामच मुलीला दिलें. कारण याचवेळीं सामाजिक व राजकीय दृष्टयाही त्यांच्यावर कीर्तीचा पाऊस पडत होता. हरिजन चर्मकार जातींत जन्मूनही त्यांनीं आपल्या प्रदीप्त बुद्धिमत्तेनें, प्रयत्नशीलतेनें व एकलव्याप्रमाणें कपटप्रयोग करून विद्या हस्तगत केली. ॲडमधर्मबुवाच्या हांतून त्यांनीं विद्येचें फळ हिसकावूनच घेतलें म्हणाना. व्यापारी पदवी घेऊन ते पुढील शिक्षणासाठीं इंग्लंडमध्यें गेले. तेथें व्यापारी शिक्षण घेऊन त्यांनीं अनुभविक ज्ञानही हस्तगत केलें. लगेच त्यांना मोठी सरकारी नौकरी मिळाली. परंतु थोड्याच वर्षांत त्या नौकरीवर लाथ मारून दादासाहेबांनीं देशी परदेशी मालाचा स्वतंत्र, मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरू केला. त्यांच्या धाडसानें जातगोत न जाणणारी श्री ही सहज प्रसन्न होऊन तिनें त्यांना लक्षावधि रुपयांनीं संपत्ति मिळवून दिली. नंतर त्यांनीं हळूं हळूं सामाजिक आणि राजकीय बाबतींत लक्ष घालण्यास सुरवात केली. आपल्या जातीचा उद्धार करण्यासाठीं त्यांच्या जिवाची चाललेली तळमळ आतां बाहेर उमटूं लागली होती. ओढा किती कां ओढाळ असेना त्याचें पाणी बेताचें असतें तोंवर त्याचें फुरफुरणें बाहेर फारसें उमटत नाहीं. त्याला पावसाच्या पाण्याचा लोंढा मिळाला म्हणजे त्याचा पराक्रम इतरांना दिसतो. मर्जीला येईल तें तो आपल्याबरोबर वाहून नेतो. दादासाहेबांच्या व्यापारानिमित्त पुष्कळ मोठमोठ्या लोकांशीं ओळखी झाल्या होत्या. त्यांचा फायदा घेऊन, त्यांनीं आपल्या जातीच्या शिक्षणविषयक अडचणी दूर करण्याचे प्रयत्न चालवले. आपल्या जातीचा सर्वांगीण उद्धार व्हावा म्हणून ते यथाशक्ति प्रयत्न करीत.

या त्यांच्या कार्यामुळें कीर्ति त्यांच्यावर प्रसन्न झाली. त्याच वेळीं त्यांना कीर्तिमालिनीही लाभली. त्यानंतर एकच वर्षांत कांहीं लोखंडी यंत्रांच्या आयातींत

दादासाहेबांना एकदम विलक्षण नफा मिळाला. हा कीर्तीचाच पायगुण असें उभयतां पतिपत्नींना वाटून ते शक्यतर तिच्यावर अधिकच प्रेम करूं लागले.

दादासाहेबांनीं मलबारहिलवर स्वतःसाठीं एक विस्तीर्ण बंगला बांधला, त्यासभोंवतीं मोठी बाग उठवली आणि सर्वप्रकारच्या सुखविलासांचा ते उपभोग घेऊं लागले. त्यांनीं आपल्या बंगल्याचें नांव विजय ठेवलें.

परंतु बंगल्यांत राहून चार वर्षें होतात तोंच गीताबाईंना काळानें ओढून नेलें. दादासाहेबांना मोठाच धक्का बसला. नक्षीदार सोन्याचा देव्हारा करावा आणि त्यांतली देवीची मूर्ति चोरीला जावी तसेंच झालें. आठव्या वर्षी त्यांचें लग्न झालें. तेव्हांपासून त्या उभयतांचें आयुष्य सुखदुःखांनीं पिळलेल्या सुंभानें जणूं निगडित झालें होतें. दादासाहेब दिसण्यांत जितके देखणे तितक्या गीताबाई कुरूप होत्या, निरक्षर होत्या. त्यांना शिकवण्यासाठीं मडमा ठेऊनसुद्धां त्या शिकेनात. परंतु पुस्तकी विद्या जरी त्या शिकल्या नाहींत तरी दादासाहेबांनीं समजाऊन सांगितलेली प्रत्येक गोष्ट त्यांना पूर्ण स्वरूपानें समजे. त्या प्रत्येक बाबतींत सल्लामसलतही देऊं शकत. अनेक संकटकाळीं गीताबाईंनीं दादासाहेबांना धीर दिला होता. दादासाहेबांनीं काळ्या, निरक्षर बायकोच्या तावडींतून सुटल्यावर एकाद्या सुंदर, सुशिक्षित व सामाजिक, राजकीय बाबतींत त्यांच्याबरोबरीनें पुढाकार घेऊन साहाय्य करील अशा मुलीशीं विवाहबद्ध होण्याला कां नकार द्यावा हें लोकांना कळत नसे. लोकांना तें कळणार नाहीं हें दादासाहेब ओळखून होते. म्हणून ते सर्वांना सांगत कीं माझ्या कीर्तीला त्रास होऊं नये म्हणून मी लग्न करीत नाहीं. ही सबबही सर्वस्वी खोटी नव्हती. लोकांचा त्यांच्यावरील आदर त्यामुळें अधिकच दुणावला.

पन्नाशी उलटेपर्यंत कुणी पारशी तरुणीबद्दल व त्यांच्याबद्दल लोक कुचेष्टेनें बोलत. परंतु त्यानंतर कुणी कांहीं बोलेनासे झाले.

दादासाहेबांचें कीर्तीवरील प्रेम म्हणजे उत्कृष्ठ वात्सल्याचें उदाहरणच होऊन बसलें होतें. आपल्या मुलीला शाळेंत व कॉलेजांत शिक्षण देऊन शिवाय त्यांनीं उत्तम शिक्षक नेमून तिला संगीतकला, चित्रकला वगैरेंत निपुण केली होती. शिवाय इंग्लंडला पाठवून तिला उच्चविद्यासंपादित करून आतां सहा महिने त्यांनीं तिला आपल्याबरोबर समाजसेवेचें बाळकडूही देण्यास सुरवात केली होती. कीर्तीनें मुंबईत व इतर मोठ्या गांवांत आठ दहा व्याख्यानें आतांपर्यंत दिलीं होतीं. तिचा मधुर आवाज, तेजस्वी

पण स्निग्ध सौंदर्य, अस्खलित वाक्प्रवाह, आणि अंतर्यामींची तळमळ यामुळें तिचीं व्याख्यानें फार परिणामकारक होत. तिच्या व्याख्यानाला पुष्कळच जनसंमर्द लोटत असे.

तिच्याबद्दल लोक दादासाहेबांना धन्यवाद देत.

दादासाहेबांना तर कीर्तीबद्दलचा आपला अभिमान, वाटत असलेली धन्यता कुणाजवळ कशी नी किती सागूं असें होऊन जाई.

लहानपणापासूनच मुळीं कीर्ति दादासाहेबांच्या उज्वल महत्त्वाकांक्षा सफल करण्याचीं चिन्हें दाखवूं लागली होती. फार स्तुतीनें ती बिघडेल या धास्तीनें ते बेताबातानेंच तिची प्रशंसा करीत पण त्यांचा आनंद, त्यांचें वात्सल्य त्यांच्या मनांत न मावून कोणत्या ना कोणत्या बहुमूल्य देणगीच्या रूपानें प्रगट होई.

कीर्तीच्या खोलींत अशाच दादासाहेबांच्या देणग्यांनीं विलक्षण हृदयंगम शोभा आणली होती.

मॅट्रिकमध्यें कीर्ति पास झाली तेव्हां मुलींच्या शाळेंत सर्व मुलींत तिनें पहिला नंबर मिळवून हरिजन विद्यार्थिनी म्हणून कांहीं बक्षिसेंही मिळवलीं होतीं. त्यानंतर लवकरच दादासाहेब व्यापारानिमित्त इटलीला गेले असतां तेथून येतांना त्यांनीं एक सागवानी लाकडाची उत्कृष्ठ कोरीवकाम केलेली चौपाई आणली होती. तीवर कीर्ति असें नांवसुद्धां सुबकपणें कोरलें होतें. ती देऊन कीर्ति जणूं दहा वर्षांची पोरगी असल्याप्रमाणें तिचा गालगुच्चा घेऊन दादासाहेब म्हणाले होते,

"किल्यामाल्या, विद्या या कोरीव कामाइतकीच कठीण आणि अमोल व विविध-स्वरूपी आहे. न कंटाळतां परिश्रम केले तरच ती साध्य होते समजलास." दादासाहेब वात्सल्यभरांत आले कीं लहानपणीं कीर्तीला किल्यामाल्या म्हणून म्हणत. कीर्तिमालिनीचें त्यांनीं बनवलेलें तें अपभ्रष्ट पण लाडकें रुप होतें. कीर्ति मोठी झाल्यावर तें नांव विसरल्यासारखेंच झालें होतें. दादासाहेब तिला आतां कीर्तीच म्हणत.

डाळीयेवढे शंखशिंपलेमोतीं यांनीं जडवलेली ती कपाटांतली जपानी पेटी! किती कलाकुसरीचें काम होतें. तींतील प्रत्येक शंख, शिंपला व मोतीं इंद्रधनुष्याच्या रंगांनीं चमकतांना दिसे.

आरामखुर्चीवर पडल्या पडल्या त्या पेटीकडे एके दिवशीं पहात असतां दादासाहेब उद्गारले होते, “ जग या पेटींतल्या बहुरंगी शंखशिपले मोत्यांप्रमाणेंच आहे. त्याचं वास्तवस्वरूप ओळखून वागलें पाह्यजे. ”

जर्मनींतलें तें व्हायोलिन, फ्रान्सची कॅथ्रियल सुरांची बाजाची पेटी, तो इप्स्टीन ग्रँड पिआनो हीं सर्व जणूं एक अंतरिंद्रियगोचर असें मधुर संगीत गाऊन दादा-साहेबांच्या वात्सल्याची ओळख पटवून देत होतीं.

तो उंची पर्शिअन गालिचा, ते सुंदर पुतळे, त्या तजबिरा, तें उंची फर्निचर ! किती किती मौल्यवान् वस्तू त्या खोलींत सांठवलेल्या होत्या ! कीर्तीनें मोठ्या रसिकतेनें त्यांची सुबक मांडणी केल्यामुळें सर्व खोली मोठी सुंदर व शोभिवंत दिसे.

आतां खोलींतील प्रत्येक वस्तू जणूं कीर्तीला सांगत होती, आम्ही म्हणजे दादासाहेबांचें वात्सल्य आहोंत. कीर्तीची दृष्टि आपोआप भिंतीवरील दोन तैल-चित्रांकडे वळली. दादासाहेबांचें आरामखुर्चीवर बसून वाचीत असल्याचें तें चित्र स्वतः कीर्तीनें तयार केलें होतें. पुस्तक हातांत होतें पण दृष्टि मात्र समोर होती. इंग्लंडहून आल्यावर अगदीं नुकतें केलें होतें तें. त्यामुळें व अतिशय परिश्रम लावल्यामुळें हुबेहुब दादासाहेब बसले आहेतसा भास होई.

तें चित्र पहातां पहातां कीर्तीचा कंठ सद्गदित झाला. तेथें बसून ते आपल्यावर अखंड कोमल प्रेमकिरणांचा वर्षाव करीत आहेत किंवा वात्सल्यदृष्टीच्या धाग्यांचा नाजूक कोश गुंफून, झाड आपल्या कळीला पाऊसवाऱ्यापासून जतन करतें त्याप्रमाणें दादासाहेब आपलें संरक्षण करीत आहेतसें तिला भासलें. दादासाहेबांच्या-सारखा पिता आपल्याला लाभला, आजवर त्यांच्या मायेचें छत्र आपल्या मस्तकावर राहिलें या भाग्याबद्दल कीर्तीला अतोनात धन्यता वाटली.

त्यांच्या शेजारींच गीताबाईचें तैलचित्र असून त्यांच्या मृत्यूपूर्वी वर्षभर आधीं तें काढलें होतें. तें चित्र पहातांच कीर्तीच्या हृदयानें आई, म्हणून निश्वासरूपानें आर्तपणें हांक मारली.

दादासाहेब वारंवार आपल्या पत्नीची आठवण काढीत. कीर्ति इंग्लंडहून आली तेव्हांसुद्धां दादासाहेबांनीं उद्गार काढले होते कीं “ कीर्ति, आज जर गीता असती तर तिला केवढा आनंद झाला असता. तूं येवढीशी चिमुरडी असल्यापासून तुला विद्या शिकवायची, विलायतेला पाठवायची म्हणून ती केवढे मनोरथ करीत असे. ”

कीर्तीला वाटलें, " आतां उद्यां तर आपलें लग्न. आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाची वेळ. आणि त्या वेळींही आपल्या आईचा आशीर्वाद आपल्याला मिळणार नाहीं." अश्रुपूरित नेत्रांनीं गीताबाईंच्या तैलचित्राकडे पहात कीर्ति मनोमन म्हणाली, " आई, आई, कुठें असशील तिथून मला आणि माझ्या कौस्तुभाला आशीर्वाद दे हं."

कौस्तुभ !

कौस्तुभ समोरल्या टेबलावरून चांदीच्या फ्रेमींतून कीर्तीकडे बघून हंसत होता. लंडनमधील " माय स्टुडिओ " मध्यें कीर्तीनें सांगितलेल्या पद्धतीनुसार तो फोटो काढलेला होता. त्याचवेळीं कौस्तुभाच्या आवडीप्रमाणें बैठक घेऊन कीर्तीनेंही आपला फोटो काढून कौस्तुभकुमाराला अर्पण केला होता. त्या फोटोमागें स्वाक्षरी करून सप्रेम समर्पण म्हणून लिहिलें होतें आणि समोरल्या कौस्तुभाच्या फोटोमागें त्याची स्वाक्षरी व समर्पणलेख होता.

कीर्तीच्या सौंदर्याला साजेल असेंच कौस्तुभाचें देखणेपण होतें. गौरवर्ण, पिंग्या डोळ्यांचा, रेखीव मुखावयव आणि बळकट सौष्ठवयुक्त शरीरबांध्याचा तो होता. फोटोंत मात्र त्याचा फक्त बस्ट दिसत होता. त्याची खळीनें युक्त असलेली हनुवटी इतका आत्मविश्वास दर्शवित होती कीं, एकादे वेळीं गर्वोद्धततेंत तिचें रूपांतर झालेंसें भासलें असतें परंतु वरली गोड हंसणारी जिवणी आणि सर्व जगाविषयीं विश्वास आणि प्रेमभावना दर्शवणारे पाणिदार डोळे यांनीं सर्व मुखाला अवर्णनीय मोहकता आणली होती.

कौस्तुभ सुमारें सत्तावीस वर्षाचा होता. परंतु मिशा साफ काढल्यामुळें तो दोन तीन वर्षांनीं लहान दिसे. फोटोंतील तो हंसरा कौस्तुभ बघून कीर्तीलाही हंसूं आलें. फोटोच्यावेळीं कीर्तीनें त्याला विचारपूर्वक मुद्रा करून अदृष्टांत बघत रहाण्याचा हुकूम फर्मावला होता पण तें न ऐकतां अचानक कीर्तीकडे बघून तो हंसला होता. कीर्तीच्या अंतःकरणांत प्रेमभावना उचंबळून येऊन उद्यां आपल्या प्रेमसर्वस्वाचा आपल्याला लाभ होणार म्हणून ती हर्षनिर्भर झाली. त्या फोटोकडे बघत असतां जणुं त्यांतलें हास्य तिच्या मुखावर प्रतिबिंबित झालें.

तितक्यांत डाव्या खांद्यावर कोणी हात ठेवल्याचा स्पर्श जाणवून कीर्ति केवढ्यानें तरी दचकली. प्रथम तिला वाटलें, मनांतील तीव्रतम भावना आपल्याला फसवीत

आहेत. नंतर चटकन डावा हात वर उचलून तिनें खांद्याकडे नेला आणि मान मागें फिरवली.

खरोखरी कौस्तुभच आला होता. त्यानेंच दाराशीं पाठमोऱ्या उभ्या असलेल्या कीर्तीच्या खांद्यावर हात ठेवला होता. कीर्तीला दचकलेली पाहून त्याला मोठी मौज वाटून तो हळूंहळूं हंसूं लागला, आणि मागें वळवलेल्या कीर्तीच्या मुखावरील लज्जाप्रणययुक्त हास्य बघून त्यानें उजव्या हातानें तिची हनुवटी धरून आपलें तोंड खालीं वांकवून तिचें चुंबन घेतलें.

कीर्तीनें लगेच वळून कौस्तुभाच्या कंठांत आपली करमाला घालून त्याला प्रतिचुंबन अर्पण केलें.

नंतर तोंड बाजूला न करतांच अधरोष्ठस्पर्श कायम ठेऊन कीर्तीनें हळुवार स्पर्शानें अस्फुट वीणाझंकार व्हावा तशा हळूं व मधुर स्वरानें विचारलें, " हें काय हें कौस्तुभ, आतांच आलास होय पुण्याहून ? कदाचित उद्यां सकाळीं येईन म्हणून म्हणाला होतास ना ? "

कीर्तीच्या प्रश्नाचें सरळ उत्तर न देतां वर मान करून खोलीभर आपली नजर फिरवीत कौस्तुभानें हंसत हंसत विचारलें, " केवढी ही रोषणाई कीर्ति ? मनांतल्या मनांत उद्यांच्या समारंभाची रंगीत तालीम करते आहेस कीं काय ? "

कीर्ति फारच लाजली. अगदीं चोर पकडला जावा तसें तिला वाटत होतें म्हणून तिनेंही कौस्तुभाचा प्रश्न टाळला. त्याच्या कंठाभोंवतालचे हात काढून जरा दूर उभी राहून, कौस्तुभाची खाकी अर्धी विजार, अर्धे बाटाबूट, पोलो कॉलरचा शर्ट आणि त्यावरील लंडनमध्यें शिवलेला उंची ट्वीड कोट आणि हॅट खालीं स्टँडवर ठेऊन वर आल्यामुळें सुंदर मृदु केसांचा तो नीटनेटका भांग या साध्यासुध्या पोषाखामुळेंही प्रमाणशुद्ध, आणि देखण्या दिसणाऱ्या कौस्तुभाकडे दृष्टिक्षेप करून कीर्तीनें विचारलें, " तूं उद्यां ना येणार होतास परत ? मग आजच कसा आलास ? कीं गेलाच नाहींस पुण्याला ? "

" वा वा: चांगले कपडे बघते आहेस प्रवासाचे अन् पुन्हां प्रश्न विचारतेस गेलाच नाहींस कां म्हणून ? तुझं डोकं या रोषणाईनं दिपून गेलं आहे. पण सांगना मला कशाला केलीस ही रोषणाई ? " कौस्तुभानें मधुर दृष्टीनें कीर्तीकडे बघून विचारलें.

लाडकेपणानें आपल्या ओठांचा चंबू करून कीर्तीनें सांगितलें, "मला आपलं वाटलं आज सर्व दिवे लावून पहावे म्हणून."

कीर्तीचा पुढें आलेला अधरोष्ठ अंगठा व तर्जनीनें दाबून कौस्तुभ हंसून म्हणाला, "हृदयांतही अशीच आनंदाची रोषणाई झाली आहे ना?"

कीर्तीच्या गालावर खुललेल्या खळ्या पाहून व तिच्या नेत्रांत अंतस्थ रोषणाईचे किरण चमकलेले पाहून कौस्तुभ प्रेमभरानें हंसला.

पण कीर्तीनें कांहीं न बोलतां भराभर कळी बंद करून दिवे मालवण्यास सुरवात केली.

"अग मालवूं नको दिवे." असें म्हणून कौस्तुभानें पुन्हां दिवे लावण्याकरतां हात पुढें केला.

पण कीर्तीनें डाव्या हातानें त्याचा हात धरून ठेवला व एक खेरीज करून बाकी सर्व दिवे मालवले आणि मग त्याच्याकडे बघून ती उगीचच हंसली.

तिच्या हंसण्याला कांहीं वेगळ्याच स्मितहास्यानें प्रत्युत्तर देऊन कौस्तुभानें तो उरलेला दिवाही मालवून टाकला आणि तो मालवल्याबद्दल निषेधाचा उद्गार काढून त्याला प्रतिरोध करूं पहाणाऱ्या कीर्तीला जवळ ओढून त्यानें तिच्या ओठांचें चुंबन घेतलें. नंतर लगेच त्यानें सर्वच्या सर्व कळी उघडून पुन्हां जिकडेतिकडे रोषणाई करून सोडली, व कीर्तीचे दोन्ही पंजे पकडून तिला कोचावर बसवून व आपण तिच्याजवळच बसून तिच्या नाजूक गौरवर्ण अंगुलींत अतिशय शोभणाऱ्या निळाच्या अंगठीशीं तो खेळूं लागला.

—४—

तितक्यांत दारावर टिकटिक करून गंभीर मुद्रेचा एडी प्रविष्ट झाला, आणि सलाम करून त्यानें क्षणभर कौस्तुभाकडे आणि क्षणभर कीर्तीकडे बघून विचारलें, " कुछ ड्रिंक होना ? "

" हाँ. जरूर होना. एक पोर्टवाईनकी बॉटल लाव और ताईसाबकेवास्ते ऑरेंज लाव " कौस्तुभानेंच उत्तर केलें.

कीर्ति लगेच चमकून अं ? म्हणून उद्गारली पण लगेच सांवरून तिनें म्हटलें, "अरे पण मला नकोय कांहींच. आम्ही इतक्यांत फराळ केला नी आइस्क्रीम खाल्लं."

एडी गोंधळून उभा राह्यला. त्याला कौस्तुभानें सांगितल, " अरे लाव लाव. वाईन लाव और ऑरेंजभी लाव.

एडी सलाम करून गेल्यावर कौस्तुभानें चेष्टेनें विचारलें, " शीलाधारिणी आल्या होत्या वाटतं ? मग काय आतां ताटातूट होणार म्हणून तिघीजणी गळ्यांत गळा घालून रडलांत कीं नाहीं ? "

मैत्रिणी आपला निरोप घेऊन गेल्यावेळची आपली विकल मनस्थिती कीर्तीला आठवली, पण तिनें आतां हंसून उत्तर दिलें, " चल् त्यांत काय रडायचं ? आणखी आठ दिवस तर आपण इथंच आहोंत ना ? मग आपण महाबळेश्वरला गेलों तरी बंगलोरला जातांना पुन्हां दोनचार दिवस मुंबईला रहाणारच आहोंत. "

" म्हणजे मग रडायला अजून अवकाश आहे म्हणतेस होय ? खरोखर माझी मोठीच चूक झाली. दादासाहेबांचं ऐकून लग्नानंतर मी उगीच इथें आठ दिवस रहायचं कबूल केलं, आणि उगीच खटपट करून इतकी रजा मागून घेतली. आतां या पोरी सारख्या येऊन मला सतावून सोडतील. महाबळेश्वरला बोलावूं नको हं त्यांना. तिथें जर त्या आल्या तर पहा मी रजा कॅन्सेल करीन हं सांगून ठेवतों तुला. "

कीर्ति या प्रेमळ धमकीला केवळ हंसण्यानें उत्तर देऊन आंतल्या ड्रेसिंगरूममध्यें गेली आणि तिनें टेबलावरील तीन बाजूच्या तीन आरशांत आपलें प्रतिबिंब न्याहाळीत केस सारखे केले, लिपस्टिकही ओंठावरून हलुवारपणें फिरवली. नंतर

पावडरचा मखमाली गोंडा तोंडावरून फिरवतां फिरवतां एक आरशाचा कोन जरा फिरवून ती पाहूं लागली तों बाहेर बसलेल्या कौस्तुभाचें प्रतिबिंब बाहेरल्या खोलींतल्या एका आरशांतून परावर्तन होऊन येत होतें तिकडे तिची दृष्टि जाऊन तिला किंचित् धक्का बसल्यासारखें झालें. इतका वेळ हंसणाऱ्या कौस्तुभाच्या मुद्रेवर केवढी तरी दुःखाची छाया पसरली होती ! कोचाच्या हातावर ठेवलेल्या रेशमी उशीवर डाव्या हाताचें कोपर रेलून, बोटांनीं कपाळावरल्या केसांच्या दोन तीन बटींशीं खेळत खालच्या गालिच्यावरील एका नक्षीकडे तो बघत होता. पण त्याची अंतर्दृष्टि कुठें तरी दूर प्रदेशांत वावरत असावीसें दिसत होतें. कीर्तीला जशा अंगविक्षेपांत कौस्तुभाचा फोटो हवा होता तसाच हुबेहुब तो बसला होता. पण आतां कीर्तीला तें दृश्य मनोज्ञ दिसेना. कौस्तुभाची अंतर्दृष्टि काय देखावा बघत आहे, त्याच्या अंतःकरणाला काय दुःख जाणवत आहे तें कळून घेण्याची कीर्तीला तीव्र उत्कंठा वाटूं लागली. कौस्तुभ पुण्याला आपल्या आईवडिलांना भेटण्याकरतां म्हणून जाऊन आला होता. त्याबद्दलच्या आपल्या प्रश्नाला त्याने अजून नीटसें उत्तर दिलेलें नाहीं याची तिला आठवण झाली. कौस्तुभानें केलेली वधूची निवड त्याच्या मातापितरांना अगदीं मुळींच आवडलेली नव्हती.

कौस्तुभ हा सहस्रबुद्धे या कोकणस्थ ब्राह्मण घराण्यांतला. त्याचें घराणें मूळचें श्रीमान् असून पुण्यांत त्यांचा एक मोठा पेशवाई वाडा होता. शिवाय कौस्तुभाच्या वडिलांनीं जंगलीमहाराज रोडवर गतवर्षींच एक सुंदर बंगला बांधला होता. कौस्तुभाचे आजोबा धारवाडला कित्येक वर्ष नौकरीनिमित्त स्थायिक झालेले होते. कौस्तुभाचे वडील अण्णासाहेब फारसे शिकलेले नसूनही अंगच्या हुषारीवर म्हैसूर संस्थानांतील जंगलखात्यांत मोठ्या हुद्याच्या जागेवर चढले. तीस वर्षांच्या नोकरीनंतर ते आपल्या आवडत्या पुण्यनगरीला आल्याला दोन वर्षें झालीं होतीं. अण्णासाहेबांची थोरली मुलगी म्हैसुरांतच दिली असून ती पतिपुत्रांसह तिकडेच रहात होती. कौस्तुभ या मुलीपेक्षां धाकटा व एकुलता एक मुलगा. आपण फारशी विद्या शिकलों नाहीं तरी आपल्या मुलाला मात्र खूप शिकवायचें हा अण्णासाहेबांचा प्रथमपासून संकल्प होता. आणि कौस्तुभाच्या तैल बुद्धीमुळें तो संकल्प निवळ मनोरथाप्रमाणें वाऱ्यावर न जातां खरोखरीच हळूंहळूं सफल होत चाललेला पाहून अण्णासाहेब आणि पार्वतीबाई ( म्हैसुरांत त्यांना सर्व पारम्मा म्हणत. ) यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. बंगलोरच्या सायन्सइन्स्टिटयूटमध्यें शिक्षण घेतल्यावर सरकारी खर्चानें

त्याला जेव्हां इंग्लंडला पाठवण्याचें ठरलें तेव्हांच कौस्तुभाचें लग्न करावें असा पार्वतीबाईंचा हट्ट चालला होता, श्रीमंत व सुंदर मुलीही पुष्कळ सांगून येत होत्या, पण अण्णासाहेबांना वाटलें कीं मुलगा इंग्लंडहून पदवी मिळवून आला, त्याला मोठी सरकारी नोकरी लागली कीं त्याला यापेक्षांही चांगल्या मुली सांगून येतील. न जाणों एखाद्या संस्थानिकाशींही शरीरसंबंध जुळून येईल.

कौस्तुभ इंग्लंडला गेला तो बी.एस्सी होऊन लगेच डी.एस्सीही झाला. त्यानें विद्या मिळवून मेंदूचें महत्त्व वाढवलें पण इकडे बी.एस्सीच्या परीक्षेचा अभ्यास करीत असलेल्या कीर्तीला अभ्यासांत मदत करतां करतां तो आपलें हृदय मात्र हरवून बसला. लंडनमधील एक दोन स्नेह्यांनीं अण्णासाहेबांना या दोघांच्या वाढत्या परिचयासबंधीं पत्रद्वारें सूचना दिल्या. त्यावर अण्णासाहेबांनीं घाबरून कौस्तुभाला पत्रांवर पत्रें पाठवून खूप उपदेश केला पण तो व्यर्थ गेला. प्रथम आमची नुसती मैत्री आहे असें कौस्तुभ लिहीत असे आणि तें त्यावेळीं खरेंही होतें. पुढें वाङ्निश्चयानंतर कीर्तीच्या अनेक गुणांचें वर्णन करून ती ब्राह्मणच नव्हे तर देवांच्या प्रेमालासुद्धां कशी योग्य आहे हें पटवून देण्याकरतां कौस्तुभ अण्णासाहेबांना लांब लांब पत्रें लिहूं लागला तेव्हां अण्णासाहेब स्वतःच मुलाची समजूत पाडण्यासाठीं इंग्लंडला जायला निघाले. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आणि मित्रमंडळी व पार्वतीबाई यांनींही त्यांच्या बेताला विरोध केल्यामुळें त्यांना आपला बेत रहित करावा लागला. त्याबरोबरच त्यांनीं मुलाला पत्रें लिहिणेंही सोडून दिलें. एकाच वेळीं कौस्तुभ डी.एस्सी. आणि कीर्ति बी. एस्सी झाल्यावर दोन महिने बरोबरच युरोपांतील प्रेक्षणीय स्थळें बघून दोघें परत स्वदेशीं आलीं. कौस्तुभाचें स्वागत करण्याला त्याच्या मित्रांखेरीज कोणीही आलें नव्हतें. तीन वर्षांच्या विरहानंतर आपल्या मुलाला भेटण्याकरतां पार्वतीबाई अत्यंत अधीर झाल्या होत्या, परंतु अण्णासाहेबांनीं त्यांना सांगितलें कीं, " महारचांभारांच्या पोरीशीं लग्न करणारा हा माझा मुलगाच नव्हे. आपला मुलगा मेला. " यावर पार्वतीबाईंना आपलें उचंबळणारें वात्सल्य हृदयांतच कोंडून ठेवून केवळ दुःखाश्रूंना तेवढी बाहेर वाट करून देणें नशिबीं आलें.

दादासाहेबांनीं आणि मुंबईच्या स्त्रीशिक्षणचाहत्यांनीं मात्र कीर्तीच्या आणि तिचा नियोजित वर म्हणून कौस्तुभाच्याही स्वागताचा प्रचंड थाट उडवून दिला.

अण्णासाहेबांचा आपल्या लग्नाला फार विरोध आहे हें कीर्तीला माहीत होतें पण मुलाला इतक्या वर्षानंतर ते नुसते भेटायलासुद्धां येणार नाहींत असें तिला कधींही वाटलें नव्हतें. आपण कितीही दादासाहेबांच्या मर्जीविरुद्ध वागलों तरी ते आपली भेट घेतल्यावाचून रहातील ही कल्पनासुद्धां कीर्तीला पटली नसती. पण इकडे बघावें तों अण्णासाहेबांनीं मुलाचें आजन्म मुखावलोकन न करण्याचा निश्चय केला होता आणि कौस्तुभाच्या आईलाही अर्धांगी या नात्यानें तसाच निश्चय पाळणें भाग होतें.

त्यादिवशीं बोटीवरून उतरतांना जिकडेतिकडे इतक्या हास्य विनोदाच्या लाटा उचंबळत होत्या पण कौस्तुभ त्यांत समरस झाला नव्हता. वरूनवरून तोही हंसत होता, थट्टामस्करींत भाग घेत होता परंतु तें सर्व वरवरचें होतें हें कीर्ति पूर्णपणें जाणून होती. कौस्तुभाचे डोळे किती वेळ तरी आजूबाजूच्या जनसंमर्दांत, आपल्या मातापितरांचे आणि बहिणीचे चेहेरे दिसतात काय म्हणून भिरीभिरी हिंडत होते. कित्येक वेळां ओळखीचा चेहेरा दिसल्यासारखा भास होऊन कौस्तुभाची मुद्रा अभ्र दूर झालेल्या चंद्रासारखी उजळून निघे पण दुसऱ्याक्षणीं निराशेचें ढग त्यावर येऊन पसरत. त्यादिवशीं दादासाहेबांना झालेला आनंद आणि त्यांनीं आपलें केलेलें स्वागत यामुळें कीर्तीचें हृदय एका क्षणाला आनंदानें उचंबळून येत होतें तर दुसऱ्या क्षणाला कौस्तुभाच्या मनःस्थितीची जाणीव होऊन त्याची कालवाकालव होत होती. कौस्तुभाच्या अंतरींचा आनंद कृष्णपक्षांतील चंद्राप्रमाणें हळू हळू कमी कमी होत पूर्ण अदृश्य झाला होता.

ओहोटीच्या वेळीं समुद्र खळबळून लाटा उठत असतात पण अनुक्रमानें त्या मागें मागें राहूं लागतात, व त्या लहान लहान होत जातात. कीर्तीचाही आनंद त्या दिवशीं असाच क्रमाक्रमानें ओसरत गेला होता.

दुसऱ्या दिवशीं कीर्तीच्या आगमनाप्रीत्यर्थ दादासाहेबांनीं थाटाचा उपाहार मित्रमंडळींना दिला होता. त्या वेळीही कौस्तुभ खिन्नमुख होता. विलायतेंत त्यानें क्वचित् मित्रमंडळींच्या आग्रहावरून थोडें मद्यपान केलें होतें पण या दिवशीं त्यानें बरेंच मद्य घेतलें. दादासाहेबांनीं तें पाहून किंचित् नाराजीची मुद्रा केलेली कीर्तीला चांगली आठवत होती. त्या दिवसानंतर थोडे दिवस तो मुंबईला होता. त्या अवधींत मात्र कौस्तुभानें मद्याला केवळ शोभेपुरताच स्पर्श केला होता. कौस्तुभ

विलायतेहून आल्यावर आठ दिवसांनीं बेंगलोरला इन्स्टिटयूटमध्यें नोकरीनिमित्त गेला. या उपाहारसमारंभाच्या दिवशीं दादासाहेबांनीं आपल्या मुलीचा वाङ्‌निश्चय जाहीर केला. दुसऱ्याच दिवशीं कौस्तुभ पुण्याला वडीलमातुश्रींच्या भेटीकरतां गेला. तेथें प्रथम अण्णासाहेब त्याची गांठसुद्धां घेईनात पण मागून पार्वतीबाईच्या अश्रुसिंचनानें त्यांना द्रव येऊन त्यांनीं मुलाची भेट घेतली. त्या वेळीं त्यांनीं मुलाची समजूत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पार्वतीबाईनींसुद्धां आपलें सामर्थ्य खर्ची घातलें. पण कौस्तुभानें त्या बाबतींत कांहीं न ऐकण्याचा आपला निश्चय त्या दोघांना मोठ्या विनयपूर्वक कळवला आणि एकदां कीर्तीला भेटावयास आणण्याबद्दल परवानगी मागितली. आणि मग मात्र अण्णासाहेबांचा इतका वेळ आंवरून धरलेला क्रोधाग्नि भयंकर भडकून, कीर्ति आणि कौस्तुभ यांना त्यांनीं वाटेल त्या अपशब्दांनीं बोलून घेतलें, व त्या चांभारणीशीं लग्न करण्याचा बेत बदलीत नाहींस तोंवर आम्हां दोघांना तुझं तोंडही पहायचं नाहीं किंवा पत्रसुद्धां वाचायचं नाहीं असें बजाऊन मुलाला त्यांनीं चालता हो म्हणून दाराची वाट दाखवली होती. या भेटीहून परततांना कौस्तुभ अतिशय व्यथितचित्त झाला होता.

कौस्तुभ मुंबईला परत आल्यावर, बंगलोरला जाण्यापूर्वीचे आठ दिवस कीर्ति-कौस्तुभांनीं मिश्र स्वरूपाचे काढले. पुण्याची आठवण झाली कीं कौस्तुभ आणि मग कीर्तीही खिन्न होई. तो आनंदांत असे तेव्हां दोघांचाही वेळ मजेंत जाई. लग्न ताबडतोब उरकून घेऊन कीर्तीसहच बंगलोरला जावें असें कौस्तुभाला आणि कीर्तीलासुद्धां वाटत होतें, परंतु दादासाहेबांनीं या उतावळ्या बेताला मोडता घातला. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, बंगलोरला कौस्तुभानें अगोदर जाऊन नोकरीवर स्थिरस्थावर होऊन रहाण्याकरतां चांगली जागा वगैरे पहावी आणि एप्रिलमध्यें महिन्याची रजा घेऊन मुंबईला लग्नसमारंभासाठीं यावें.

सहा महिन्यांत कौस्तुभाला पुण्याहून पत्र आलें नव्हतें. कौस्तुभानें त्यांना पत्रें लिहिलीं होतीं. दोन पत्रें त्यानें आईच्याच नांवावर पाठवलीं होतीं. पण एकाही पत्राचें उत्तर आलें नव्हतें. नंतर कौस्तुभानें तिकडे पत्रें घालण्याचें बंद केलें.

किर्ति, दादासाहेब आणि मित्रमंडळी यांचीं पत्रें मात्र सारखीं येत.

तीं पत्रें विशेषतः कीर्तीचीं पत्रें, आणि व्यवसाय या दोन गोष्टी कौस्तुभाचें मन शांत ठेवण्याला पूर्णपणें समर्थ झाल्या होत्या. कौस्तुभ ज्या संस्थेंत विद्यार्थी म्हणून होता त्याच संस्थेंत आतां अध्यापक म्हणून आला होता.

कौस्तुभाचा स्वभाव अतिशय गोड असल्यामुळें बंगलोरला मित्रमंडळींना त्याला मुळींच तोटा नव्हता. शिवाय संस्थेमध्यें बरेचसे विद्यार्थी महाराष्ट्रीय व त्यांतही बरेचसे ब्राह्मण असल्यामुळें मद्रासी, तेलंगी वगैरेंच्या त्या गांवांत महाराष्ट्रीयांचे स्नेहसंबंध एकंदरींत फार जिव्हाळ्याचे असत.

उत्खननशास्त्र हा विषय कौस्तुभाचा अत्यंत आवडीचा. त्याच विषयांत तो डी. एस्सी होऊन आला होता. शिलालेख, ताम्रपट, त्यांच्या लिपी, निरनिराळे दगड, कोरींव काम यासंबंधीं तो शिकवूं लागला किंवा वाचूं लागला म्हणजे तो जणूं जग विसरून जात असे.

या सर्व गोष्टींमुळें सहा महिन्यांपूर्वी पुण्यांत घडलेला प्रसंग त्याच्या स्मृतिपटला-वरून जवळजवळ पुसून गेला होता. तो मुंबईला लग्नासाठीं म्हणून सहासात दिवसांपूर्वींच आला असून या वेळीं मुद्दामच ताजमध्यें उतरला होता. तरी बहुतेक तो दादासाहेबांच्या घरीं किंवा बाहेर गेला तरी कीर्तीच्या सांनिध्यांत असे. हे सहासात दिवस त्या दोघांनीं अतिशय मजेंत काढले होते. आम्रवृक्षाचा मोहोर खाऊन आम्ररसाची वाट पहात असतां बेहोषपणीं कूंजन करणाऱ्या कोकिलयुगुलाप्रमाणें संसारफल चाखण्यासाठीं दोघें उत्कंठित हृदयानें, कसलीतरी मधुर हुरहूर लागून राहिल्याप्रमाणें वाट पहात होतीं.

परंतु लग्नापूर्वी पुन्हां एकदां पुण्याला जाऊन यायचें, होतां होईतों बंगलोरहून आल्याबरोबरच जाऊन यायचें हा कौस्तुभाचा निश्चय झालेला होता.

लग्नानंतर पुण्याला जावें असें दादासाहेबांचें म्हणणें होतें, पण कौस्तुभाला तें पटेना, आणि पुण्याला जाण्याचा धीरही होईना. शेवटीं आज जाऊं उद्यां जाऊं करतां करतां तो आज लग्नाच्या आदल्या दिवशीं पुण्याला जाऊन आला होता, आणि मागल्या भेटीची पुनरावृत्तीच नव्हे तर आज सुधारून—नव्हे दुर्धारून वाढवलेली आवृत्ती झाली होती. जन्मांत कधीं वैऱ्यालासुद्धां बोलले नसतील इतक्या अद्वातद्वा ते आपल्या एकुलत्या एक मुलाला बोलले आणि शेवटीं तूं मला मेलास असं मी

समजतों, उद्यां तुझ्या लग्नाच्या वेळीं मी सचैल स्नान करून दहा दिवस तुझं सुतक पाळीन, असें म्हणून अण्णासाहेब तडक आपल्या खोलींत गेले आणि धाडकन् त्यांनीं दरवाजा बंद केला.

कीर्तीला किंवा कोणालाही कधीं कळण्याचा संभव नव्हता, परंतु आईला धाय मोकलून रडतांना पाहून आणि लग्न ठरेपर्यंत ज्यांनीं आपल्यावर इतकें प्रेम केलें त्या वडिलांच्या तोंडचे रागाचे भयंकर शब्द ऐकत असतां कौस्तुभसुद्धां टेबलाशीं डाव्या हातावर डोकें टेकून स्फुंदून स्फुंदून रडला होता.

आण्णासाहेब आपल्या खोलींत गेल्यावर कौस्तुभाच्या आईनें त्याची इतक्या परोपरीने विनवणी केली! पार्वतीबाईनीं अण्णासाहेबांच्याप्रमाणें आक्रस्ताळीपणा केला असता तर त्याला तें बरेंच सोपें गेलें असतें परंतु पार्वतीबाईचे अश्रुसिक्त, स्नेहार्द्र मुख, डोळ्यांतला केविलवाणेपणा, पती आणि पुत्र या दोघांकडे सारखेंच खेचून घेत असलेले मायापाश आणि त्या व्यर्थ ओढाताणीमुळें आलेली मानसिक व शारिरिक दुर्बलता यांच्या दर्शनानें खरोखरी कौस्तुभाच्या मनाची विलक्षण चलबिचल झाली. असाही एक क्षण आला कीं ज्या वेळीं त्याला वाटलें कीं स्वतःच्या सुखाची आपल्या आईवडिलांच्याप्रीत्यर्थ आहुति देऊन टाकावी. कीर्तीला सांगावें–कीर्तीला—

पण छेः शक्य नाहीं. कीर्तीचें या रीतीनें स्मरण होतांच कीर्तीची मूर्ती त्याच्या अंतश्चक्षूसमोर उभी राहिली. त्याच वेळीं त्याच्या चित्ताची चंचलता नष्ट होऊन एकाद्या सापाचें वळवळणें पाण्यांत दिसतांदिसतांच एक मोठी लाट येऊन तें कायमचें अदृश्य व्हावें तसें त्याचें मन पुन्हां स्वच्छ झालें. आईबापांचे मायापाश तोडणें आणि आपल्या प्रेमावर जीवित अवलंबून असणाऱ्या कीर्तीचा विश्वासघात करणें या दोन गोष्टींची तुलनाच करणें शक्य नाहीं असा त्याचा निश्चय झाला.

नंतर त्यानें निग्रहपूर्वक आपल्या आईला आपला बेत कधींही फिरणार नाहीं म्हणून सांगितलें आणि त्याचा काय नेम अण्णासाहेबांचें मन बदलून ते आपण होऊन मला आणि माझ्या बायकोला भेटायला बोलावतील असाही आशावाद त्यानें आईसमोर मांडला.

यावर पार्वतीबाई व्यथित चित्तानें, दुर्बल स्वरानें म्हणाल्या होत्या, " पण त्या मुलीशीं लग्न केल्यानं तूं धर्मद्रोही ठरशील कीं रे. "

यावर कौस्तुभानें तेजस्वी वाणीनें उत्तर दिलें होतें, "आई, मनुस्मृतीच्या काळचा धर्म तो आजचा धर्म नव्हे, मी वागतों आहें तेंच कृत्य समाजधारणेला आज योग्य आहे. मी माझ्या हिंदुधर्माला सोडीत नाहीं. त्याचे जे लचके निघताहेत ते जोडण्याला हाच एक शहाणपणाचा मार्ग आहे तोच मी आचरतों आहें. आणि आई, तुम्ही एकदां कीर्तीला पहा तरी. तिला हीन जातीची म्हणायला तुम्हीसुद्धां कचराल."

यानंतर कौस्तुभानें आपल्या आईच्या पायांवर डोकें ठेऊन तिचा मोठ्या कष्टानें निरोप घेतला.

त्याच्या आईनें त्याला उठवून आशीर्वाद दिला, "असशील तिथें सुखांत रहा. उदंड आयुष्याचा हो." नंतर आपला आशीर्वाद कचा वाटूनच कीं काय त्या माउलीनें दोन्ही हात जोडून, डोळे मिटून मनोमन परमेश्वरस्वरूपाला अनन्यभावानें आळवीत, सद्गदित कंठानें म्हटलें, "माझ्या बाळाच्या हांतून जर पाप घडत असेल तर देवा, माझी पुण्याई तूं खर्ची घाल आणि याला सुखी कर."

या अतुलनीय स्वार्थत्यागानें कौस्तुभ स्तिमित होऊन गेला. "आई" म्हणून गद्गद स्वरांत हांक मारून आईचे जोडलेले हात त्यानें आपल्या दोन्हीं हातांनीं धरले आणि अत्यादरपूर्वक, अश्रुपूरित नेत्रांनीं तो क्षणभर आपल्या मातेच्या पावित्र्यानें झळकणाऱ्या मुखाकडे बघत राहिला. कौस्तुभाला आपल्या आईबद्दल अत्यंत प्रेमादर वाटत असे तो आज अनंतपटींनीं वाढला. त्यानें आजपर्यंत मातृप्रेमाची थोरवी ऐकली होती, तिचा सुखानुभव घेतलेला होता, परतु मातृप्रेमाच्या थोरवीचें पराकाष्ठेचें प्रत्यंतर आज आपल्याला दिसत आहे असें त्याला वाटलें.

कौस्तुभानें पूर्वी कुठेंतरी एक गोष्ट वाचली होती. एका दुष्ट स्त्रीनें आपल्या प्रियकराच्या प्रेमाची परीक्षा पहाण्यासाठीं आपल्या आईचें हृदय आणण्याला सांगितलें. त्या मनुष्यानें खरोखरींच आपल्या आईला ठार मारलें आणि तिचें हृदय घेऊन तो जाऊं लागला. दारूच्या धुंदींत चालतां चालतां त्याला ठेंच लागली. तेव्हां त्या मातृहृदयांतून कळवळून शब्द बाहेर पडले, "बाळा, लागलं नाहींना रे तुला?"

कौस्तुभाला वाटलें, "आपणही आपल्या आईचें हृदयच घेऊन चाललों आहों. कीर्तीकरतां—

पण कीर्ति कांहीं त्या दुष्ट, अघोरी स्त्रीप्रमाणें नाहीं. तिचेंही हृदय आपल्य आईप्रमाणेंच प्रेमरसानें निथळतें आहे. तें हृदय तरी पायदळीं देणें योग्य आहे काय? आईला पतिप्रेम आहे. संसार आहे. पण कीर्तीवांचून आपला जन्म जसा व्यर्थ तसाच कीर्तीचाही व्यर्थ होईल. पाणी नेहमीं पुढें वहातें. तसें तें न वाहील तर डबकें सांचून तें घाण होईल. रुद्ध कंठानें कौस्तुभ आईला म्हणाला, " आई, तुझी पुण्याई इतकी थोर आहे कीं तिच्या सामर्थ्यानें आपली ताटातूट थोड्या काळापुरतीच ठरेल. आपली लवकरच पुन्हां भेट होईल. "

पार्वतीबाई आशायुक्त स्वरानें तथास्तु म्हणून म्हणाल्या.

मग किती वेळ तरी " आई, येतों. " म्हणून शब्द कौस्तुभाच्या तोंडून निघेनात. त्याचे पाय हलेनात. तितक्यांत अण्णासाहेब गरजले, " गेलास कीं नाहीं अजून घरांतून ? धर्मबुडव्या, कुळबुडव्या कार्टा ! "

त्या जहरी स्वरानें पाठीवर चाबकाचे फटके मारल्याप्रमाणें होऊन कौस्तुभ कळवळला. नंतर आपल्याकडे आर्त दृष्टीनें बघून, दोन्ही हात उचलून, आपल्याला जणूं, जाऊं नको रे बाळा, ये रे जवळ. असें म्हणणाऱ्या आईला एकवार शेवटलें म्हणून आपादमस्तक न्याहाळून येतों हं म्हणून सांगून कौस्तुभ घराबाहेर पडला. गाडीला बराचसा अवकाश होता म्हणून तो स्टेशनवरल्या वेटिंगमरूमध्यें येरझारा घालीत विचार करीत होता. त्याला इतकें बेचैन झालें होतें कीं बसून समाधान नाहीं, फिरून समाधान नाहीं, चहा पिऊन समाधान नाहीं कीं वाचून समाधान नाहीं अशी त्याची तळमळ चालली होती. गाडींत देखील त्याची तळमळ कमी न होतां, वाढतच होती. आपण आईवडिलांचें हृदय बरोबर नेत आहोंत हीच कल्पना त्याला डांचीत होती. आपल्यांत आणि मातापितरांत मैलोंगणतीं अंतर वाढत आहे असें त्याला वाटत होतें. हळूंहळूं मुंबई जवळ येत चालली, कीर्तीच्या जवळजवळ तो येऊं लागला तसतसें कौस्तुभाचें मन शांत होत गेलें, आणि मुंबईला येतांच आतां त्याला एकच एक उरलेलें प्रेमनिधान कीर्ति हिच्या भेटीला तो धांवत गेला.

कौस्तुभाचा पुण्याला जाण्याचा बेत ऐकल्यापासूनच कीर्तीला त्या बाबतींत मोठी धाकधूक वाटत असे. त्याला सकाळीं स्टेशनवर पोंचवून आल्यापासून तर तिला मुळीं चैनच पडत नव्हतें. म्हणूनच तिनें आपल्या मैत्रिणींना बोलावून घेतलें होतें.

कौस्तुभ आला हें पाहून कीर्तीची भीति एकदम नष्ट झाली. आणि त्याच्या आनंदी वृत्तीमुळें तिला अगदीं निश्चिंत वाटूं लागलें होतें.

आणि आतां कौस्तुभानें वाईन मागितली होती !

त्याची ती आनंदी वृत्ति क्विनीनवरील अभ्रमय आवरणाप्रमाणें वरवरचीच होती तर !

त्यामुळें कीर्तीला अस्वस्थ वाटूं लागलें होतें. इंग्लंडहून आल्यावर कौस्तुभ पुण्याला जाऊन आला तेव्हां त्यानें बरेंच मद्य घेऊन आपलें दुःख विसरण्याचा प्रयत्न केला होता. दादासाहेबानांसुद्धां थोडी काळजी वाटली होती. मग कौस्तुभ बंगलोरला कामांत गुंतल्यावर आपोआपच त्याच्या मानसिक दुःखाची तीव्रता कमी होऊं लागली. मुंबईला येतांच, मी बंगलोरला मद्याला स्पर्शही केलेला नाहीं असें कौस्तुभानें तिला मोठ्या अभिमानानें सांगितलें होतें व गेल्या पांचसहा दिवसांत त्यानें खरोखरींच मद्य घेतलें नव्हतें.

आणि आतां आज कौस्तुभाला पुन्हां मद्याची जरूर वाटली होती !

कीर्तीला धसकल्यासारखें वाटूं लागलें.

"काय बरं झालं असेल आज पुण्याला ? कांहींतरी भयंकर—"

पावडर लावण्याला कीर्तीला जो कांहीं अर्ध्या एक मिनिटाचा वेळ लागला तेवढ्यांतच वरील सर्व इतिहास तिच्या मनःफलकावर उमटून गेला.

मनुष्याच्या मनांत पूर्वेतिहास येतो तेव्हां एकच विचार एका वेळीं या अनुक्रमानें एक लांबलचक सांखळी कधींच तयार होत नाहीं. आकाशाकडे पाहिलें कीं एका दृष्टिक्षेपांत असंख्य तारका दिसतात. मात्र त्यांतल्या दोन चार आपल्या तेजानें चित्त अधिकच वेधून घेतात, नंतर बाकीच्या तारांची आपल्याला पूर्णत्वानें जाणीव होत जाते; किंवा आरशांत एकदमच सर्व प्रतिबिंब पडतें. पण आपले नेत्र आरशांतील एकाद दुसऱ्याच अवयवानें प्रथम वेधले जातात, तरी आपल्याला सर्व प्रतिबिंब दिसतच असतें, पण तें पूर्णत्वानें आपल्याला जाणवत नाहीं आणि म्हणून आपण नंतर क्रमाक्रमानें एकेक अवयवाचें निरीक्षण करतों.

विचारही एका वेळेला असंख्य उद्भवतात. नंतर वेळ मिळाला तर त्यांपैकीं

कांहीं अधिक स्पष्ट होऊन, पूर्वी न स्मरलेल्या त्या विचारांभोंवतालच्या सूक्ष्म घटनांचीही हळूं हळूं आठवण होऊन एक विचारमाला तयार झाल्यासारखें भासतें.

आणि जितक्या झरकन् आपण तारामंडल पहातों किंवा आरशांत प्रतिबिंब पहातों तितक्याच वेळांत आपण एक विचारमाला अनुभवूं शकतों.

पावडर लावून झाली तरी मखमाली गुलाबी गोंडा तसाच गालाशीं धरून कीर्ति क्षणभर कौस्तुभाकडे बघत राहिली. कोणत्या तरी सहाव्या इंद्रियानें या गोष्टीची जाणीव करून दिल्यामुळेंच जणुं त्यानें वर पाहिलें. आरशांत चार नेत्रांची भेट झाली, आणि दोघांनाही नकळत हंसूं आलें.

गोंडा डबीत ठेवतां ठेवतां कीर्तीनें आंतूनच कौस्तुभाच्या प्रतिबिंबाला प्रश्न केला, " कौस्तुभ, बंगलोरला गेल्यापासून तूं वाइन सोडली होतीस ना ? "

प्रतिबिंबाचे डोळे निमिषमात्र खालीं वळले. कीर्तीच्या शोधक दृष्टीला आपल्या नेत्रकिरणांच्या साहाय्यानें आंत प्रवेश करून कांहीं कळतां कामा नाहीं हाच जणुं त्याचा उद्देश होता. नंतर लगेच किंचित् चेष्टेनें कीर्तीच्या नजरेला नजर देऊन बेपर्वाईच्या स्वरांत कौस्तुभानें विचारलें, " हो. मग ? "

कीर्ति बाहेरल्या खोलींत येत म्हणाली, " मुंबईला आल्यापासून या पांचसहा दिवसांतसुद्धां तूं कधीं वाईनच काय पण बीरसुद्धां घेतली नाहींस आणि आजच तुला इतकी वाइनची जरूर कां भासली ?

कौस्तुभ मोठ्यानें हंसला. पण त्या हंसण्यामुळें कीर्तीच्या कमानदार बारीक भुंवयांमध्यें एक नाजुकशी आठी मात्र आली.

कौस्तुभ म्हणाला, " कीर्ति, नेहमींच मनुष्यानं आपल्या मनाला करकचून बांधीत असावं कां ? उमर खाय्यमप्रमाणें सर्व जग विसरून फक्त मदिरा आणि मदिराक्षी यांच्याच सहवासाची अपेक्षा कुणी कधीं धरूंच नये कां ?"

कौस्तुभाचा थट्टेचा प्रयत्न अगदींच अयशस्वी झाला. खेदमिश्रित स्वरांत कीर्तीनें विचारलें, " फक्त मदिरेच्या जोडीची मदिराक्षी इतकीच कां तुला माझी किंमत वाटते ? "

कौस्तुभ घाईनें म्हणाला, " किती विपर्यास केलास तूं माझ्या बोलण्याचा. मी उगीच कुठं थट्टेनं बोललों तर—"

तितक्यांत एडी मोठा ट्रे घेऊन आलेला पाहून त्याला कौस्तुभानें सांगितलें, " एडी, अब मैं वाईन नहीं चाहता हूं. वो बॉटल और गलास अंदर ले जाव, और मेरेवास्तेभी ऑरेंज लाव. "

" अच्छा साब. " असें जरा आश्चर्ययुक्त स्वरांत म्हणत एडी ट्रेसह निघून गेला.

कीर्तीला जरा विरमल्यासारखें झालें. नाराजीच्या स्वरांत तिनें म्हटलें, " तूं आतां वाईन घेऊं नको असं कां म्हटलं मी कौस्तुभ ? "

" मुळींच नाहीं. " कौस्तुभानें खिशांतून सिगरेटची प्लॅटिनम पेटी काढून तींतील एक सिगरेट त्या पेटीवर अलगद ठोकून पेटी खटकन बंद करून ती खिशांत ठेवली आणि सिगरेट दातांत हलकेंच दाबून धरून खिशांतला इलेक्ट्रिक लायटर काढून ती पेटवल्यावर एक धूम्रवलय सोडून नंतर आपल्या प्रत्येक कृतीकडे लक्षपूर्वक अधीरतेनें पहाणाऱ्या, आणि आपल्या पुढल्या बोलण्याची वाट बघणाऱ्या कीर्तीकडे, कांहीं गूढ विचार ज्याच्या पाठीमागें आहेत असें स्मित हास्य करीत कौस्तुभ म्हणाला, " वाईन न पिण्याबद्दल तूं मला ऑर्डर सोडली नाहींस हें अगदीं खरं पण तुझं बोलणं मला पटलं, म्हणून मी वाईन परत पाठवली. कीर्ति, तूं माझी मदिराक्षी नाहींस तर—" नवीन पेटवलेली सिगारेट राखपात्रांत टाकून, कीर्तीला दोन्ही हात धरून आपल्या जवळ बसवीत कौस्तुभ अगदीं हळूं, कोमल स्वरांत म्हणाला, " तूं माझं जीवन आहेस. "

---

—५—

पुन्हां टिकटिक करून एडी आंत आला आणि त्यानें चौपाईवर चादर अंथरून तीवर ट्रे ठेवला.

कौस्तुभानें त्याला विचारलें, " क्यों एडी, कल मैं तुम्हारी ताईसाबको चुरलेंता हूं इस्के वास्ते मेरेपर गुस्सा नहीं न ? "

एडीनें गंभीरपणें उत्तर दिलें, " गुस्सा किस वास्ते ? आपके तरह अच्छे पती ताईसाबको मिलते हैं इसके वास्ते मेरे मनमें फूले न समाते. "

" हमारेसाथ बंगलोर आवेंगे ? "

एडीनें दोन्ही पंजे पसरून म्हटलें, " क्या करना ? साब मेरेको नही छोडेंगे. आप दोनोबी बंबईमें रहाते तो बहुत अच्छा होता. "

" क्या नोकरी छोड दूंगा ? "

कौस्तुभ आपल्याला बनवतो आहे हें एडीला चांगलें समजून चुकलें. त्याचे डोळे विनोदानें हंसूं लागले आणि चेहेराही हंसरा दिसूं लागला, पण गंभीर स्वरांत एडी म्हणाला, " नोकरी छोड देनेपर आप क्या करेगें ? "

" क्या करेगें ? मजा मारेंगे. "

" ओ नो, साब जैसे फेमस हैं वैसे आपभी होना जरूर है. "

" राईट ओ. " असें म्हणून कौस्तुभ हंसूं लागला. कीर्तीही हंसूं लागली.

आणि एडी हंसणें दाबीत घाईनें निघून गेला.

नंतर कीर्ति आणि कौस्तुभ नळीनें ऑरेंज घेऊं लागले. जरा वेळ लग्नसमारंभ, कपडे, निमंत्रणें यांबद्दल त्यांचें बोलणें झालें. नंतर अवांतर गोष्टी करतां करतां अचानक कौस्तुभ म्हणाला,

" आपली ती लंडनची लँडलेडी मिसेस ग्रीन आठवते कां ग ? "

" हो. आज कां तिची आठवण झाली ? "

" नाहीं मला ती दुधाची गंमत आठवली. " कौस्तुभ हंसूं लागला.

" हं हं. "

कीर्तीलाही अनावर हंसूं लोटलें.

लंडनला दोघेही मिसेस् ग्रीनच्या घरीं कांहीं दिवस राहिले होते. त्या ठिकाणीं आणखीही चार पांच हिंदी विद्यार्थी असून एका महाराष्ट्रीय गृहस्थांना परीक्षा पास होतांच तेथेंच नोकरी लागल्यामुळें ते पांच वर्षें मिसेस् ग्रीनच्या खाणावळींत जेवण-खाण करून राहिले होते.

हे गृहस्थ—मिस्टर शरच्चंद्र—इतकीं वर्षें आपल्या घरीं राहलेले, सुस्वभावी, पैशाच्या बाबतींत चोख आणि कायम गिऱ्हाईक या सर्व गोष्टींमुळें लँडलेडींची त्यांच्यावर फार मेहेरबानी होती. त्यांचीं बारीक सारीक कामें ती चोख बजावी आणि त्यांच्या संवयी माहीत झाल्यामुळें त्या बाबतींतही ती मोठी काळजी घेत असे.

मिस्टर शरच्चंद्रांना रात्रीं ग्लासभर दूध पिण्याची संवय होती.

आपल्याकडे रात्री पतीला पत्नीनें दूध नेऊन देण्यांत कांहीं विशेष नाजुक आणि गोड भावना सांठवलेल्या आहेत. त्यामुळें सहसा कोणी परकी स्त्री एकाद्या पुरुषाला विडा किंवा दूध देण्याचें काम करीत नाहीं.

पण त्या बिचाऱ्या इंग्लिश बाईला या गोष्टी कांहींच माहीत नसल्यामुळें ती स्वतःच बरोबर वेळेवर मि. शरच्चंद्रांच्या खोलींत दूध नेऊन देई आणि पांच मिनिटें जरा गप्पागोष्टी करून गुडनाईट इच्छून पेला घेऊन ती निघून जात असे.

त्या घरांत नवीन रहायला आलेल्या दोनतीन खवचट हिंदु मुलांना ही गोष्ट समजून येतांच त्यांच्या मनाला अगदीं गुदगुल्या झाल्याप्रमाणें झालें. नंतर मिसेस ग्रीन दूध घेऊन शरच्चंद्रांच्या खोलींत गेली कीं इकडे या दुसऱ्या विद्यार्थ्यांना खोकल्याची उबळ येऊं लागली. मिस्टर शरच्चंद्रांना या साथीचा नेमल्यावेळीं प्रादुर्भाव कां होतो हें चांगलें कळत असे, पण त्या बाईला ते कसे सांगणार ?

नंतर मि. शरच्चंद्रांनीं वाईट वाटून मुलांची सौम्य हजेरी घेऊन घर सोडून जाण्याची इच्छा दर्शविली तेव्हां तें औषध नीट लागूं पडलें आणि इतर विद्यार्थ्यांचा तो खोकला थांबला.

हंसणें जरा ओसरल्यावर कीर्तीनें विचारलें, "खूप गंमतीगंमती केल्या नाहीं आपण तिकडे ?"

" हूं " येवढा हुंकार देऊन कौस्तुभ जरा थांबून पुन्हां म्हणाला, " माझ्या बंगलोरच्या स्वैपाकीण अम्माचं वर्णन मी तुला लिहून पाठवलं होतं ना ? "

इंग्लंडच्या गौरकाय तन्वंगी मिसेस् ग्रीनबद्दल बोलतां बोलतां कौस्तुभाला बंगलोरच्या काळया, लठ्ठ अम्माची आठवण कां झाली याबद्दल कीर्तीला कांहीं तर्क होईना.

म्हणून जरा आश्चर्यानेंच ती म्हणाली, " हो. "

संकोच वाटल्याप्रमाणें कौस्तुभ जरा थांबला. नंतर कीर्तीकडे कांहीं विशेष दृष्टीनें पहात हंसून तो मृदु स्वरांत बोलला, " बंगलोरला गेल्यापासून मी पण एक ग्लास दूध घेत असतों. आतां उद्यांपासून–उद्यांपासून—"

पुढलें वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच कीर्तीनें लज्जानिर्भरतेनें आपल्या अस्मानी पातळाच्या रेशमी पदरानें आपलें तोंड झांकून घेऊन पुढल्या चौपाईवर कपाळ टेकलें. त्या वस्त्रांतूनच पानाआडल्या पक्षाच्या अर्धस्फुट संगीताप्रमाणें तिचें हास्य उमटलें.

कौस्तुभानें चौपाटीवरून सूर्यास्तसमयीं समुद्रांत बुडत असलेल्या आरक्त सूर्यबिंबाचा हृदयंगम देखावा पाहिलेला होता. त्याचेंच स्मरण त्याला आतां झालें. त्याला राहवेना. तो उठून कीर्तीजवळ गेला आणि आपल्या दोन्ही हातांनीं तिचे तोंडावरले हात त्यानें हळूच बाजूला केले. नंतर दोन्हीं हातांनीं तिचें मुखकमल धरून त्यानें तिचें चुंबन घेतलें.

दोघांनाही नसानसांतून विद्युल्लहरी चमकून गेल्याप्रमाणें वाटलें. कीर्तीनें त्याच्या गळ्याभोंवतीं घातलेली मिठी घट्ट केली. परंतु तिचे हात झटकन् काढून कौस्तुभ बाजूला होऊन म्हणाला, " जाऊं आतां ? "

कीर्तीला हो म्हणवेना.

कौस्तुभानें हंसून तिचा गालगुच्चा घेतला. नंतर तो इंग्रजींत म्हणाला, " फक्त उद्यांपर्यंत. सो लॉंग हनी, गुड नाईट. " नंतर क्षणभरानें तो आणखी बोलला, " अँड ल्व्हली वनस् फ्रॉम टुमॉरो. "

" येस, सो लॉंग डार्लिंगेस्ट डिअर " कीर्तीनें मदालस नेत्रांनीं त्याच्याकडे बघून मधुर हंसत उत्तर दिलें.

कौस्तुभ दाराशीं जातो तोंच एडीनें येऊन सांगितलें, " साब आपको बुलाते हैं. "

कौस्तुभ स्वर्लोकांतून जणूं पुन्हां पृथ्वीलोकावर आला. त्याच्या मुखमंडलावर एक दु:खछटा येऊन गेली. " अच्छा, बोलो अवि आता हूं. "

" जी. हाँ. " सलाम करून एडी जाऊं लागला.

" साब किदर है ? "

" लैब्ररीमें हैं " एडीनें दोन पावलें मागें येऊन उत्तर दिलें आणि पुन्हां सलाम करून तो निघून गेला.

" अच्छा. " इतकें म्हणून कौस्तुभानें कीर्तीकडे हंसून पाहिलें. पण तें हंसणें वरवरचें होतें.

पुण्याला घडलेल्या गोष्टींची कौस्तुभाला आठवणही नको होती. तो त्याचा प्रयत्न कीर्तीजवळ सफळ झाला पण दादासाहेबांच्या जवळ मात्र तो प्रयत्न साध्य होणार नाहीं हें तो जाणून होता. दादासाहेब आपल्याला सर्व हकिगत विचारून घेणार आणि पुन्हां नको त्या गोष्टींची उजळणी होणार आणि मग ती गोष्ट पुन्हां विसरण्याचा उपाय नसल्यामुळें रात्र त्याच गोष्टी उगाळून तळमळण्यांत जाणार हीच भीति कौस्तुभाला वाटली. तो जड पावलानें लायब्ररीकडे निघाला.

कीर्तीनें एक सुस्कारा सोडला. कौस्तुभाकरतां तिला सहानुकंपा वाटत होती. तिला एकदम इच्छा झाली कीं धावत लायब्ररींत जाऊन दादासाहेबांना सांगावें कीं आज कौस्तुभाला पुण्याची हकिगत विचारूं नका. त्याला ती गोष्ट विसरूं द्या, तुम्ही दुसऱ्याच गोष्टी त्याच्याजवळ बोला.

पण तो विचार अमलांत आणणें अशक्य होतें. तिनें पुन्हां एक सुस्कारा सोडला. कौस्तुभ गेल्याक्षणीं ती खोली तिला जणूं ओसाड भासूं लागली. तिला उजेड सहन होईना. मधला छतांतला दिवा खेरीज करून बाकी सर्व दिवे तिनें भराभर मालवून टाकले आणि ती कौस्तुभ बसला होता त्याच कोचावर बसली. जिवाची तळमळ होत असल्यामुळें विचारांबरोबरच तिच्या शरिराची हालचाल सारखी चालू होती.

" केवढं हें दिव्य कौस्तुभापुढें येऊन पडलं आहे ! उद्यां दिव्य करून दाखवायचं आणि त्याचा परिणाम जन्मभर भोगायचा. " कीर्ति हातांतील उशीचा चुरगळा करीत होती. " त्यामुळें कौस्तुभाच्या आयुष्यांत कायम निराशा तर नाहीं ना घर करणार ? " फार अस्वस्थ वाटून कीर्ति उभी राहिली. " बाकीचीं समळीं प्रेमबंधनं

तोडून फेकून देऊन कौस्तुभ—"कीर्ति खिडकीशीं येऊन कठड्याला टेकली. आणि तिचें लक्ष बाहेरल्या हृदयंगम निसर्गदृश्यानें वेधून घेतलें.

विद्युद्दीपांच्या योगानें खालची बाग चंदन, अरगजाची उटी लावलेल्या नववधू-प्रमाणें शोभत होती. आपला स्वामी चंद्रमा कामकाजाच्या गर्दीमुळें आज कालच्या-पेक्षांही उशिरा, जवळजवळ मध्यरात्रीपर्यंत आपल्याला दर्शन देणार नाहीं, म्हणून विरहव्याकुलतेनें अधीर होऊन गेल्यामुळें ती जणुं मंद मंद सुस्कारे टाकीत मदालस अवस्थेंत दीपनेत्रांची उघडझांप करीत होती. वायुलहरी आपल्या सखीची चेष्टा करण्यासाठीं पानांफुलांमधून हंसतखिदळत जातांजातां तिनें अंगाला लावलेले सुगंध आपल्या अंगाला घर्षणयोगानें लावून घेत होत्या. त्यांनीं व घरट्यांतील पक्षांनीं, कानाशीं कुजबुजलेल्या नर्मविनोदामुळें मनांत नसतांसुद्धां जणुं त्या उद्यानकामिनील हळूंहळूं हंसूं येत असून ते हास्यतुषार कारंज्याच्या रूपानें मोहिनी पाडीत होते.

तें मोहक हास्य आणि वायुलहरींनीं हरण केलेला सुगंध या दोहींच्या योगानें कीर्तीचें मन प्रसन्न झालें. पिटुनियाच्या मादक सुगंधानें तिच्या अंगभर एक गोड संवेदना जाणवून गेली. खालच्या बागेला उद्देशून ती मनांतल्यामनांत म्हणाली, "तुझा प्रियकर चंद्रमा तुला आणखी सातआठ घटकांनीं खचित भेटेल. पण मला मात्र अजून कितीतरी प्रहर वाट बघावी लागणार आहे–"

तितक्यांत एक कावळा का का असा कर्कश आवाज करीत येऊन बागेंतल्या एका आम्रवृक्षावर बसला. एकदम दचकून कितीतरी पिलांनीं नापसंतीदर्शक किलबिल केली.

कीर्तीसुद्धां केवढयानें दचकली. तिच्या मनांतले कल्पनातरंग हिनकळलेल्या पाण्याप्रमाणें विस्कळित झाले.

तेवढयांत पुन्हां हांकलून काढल्याप्रमाणें तो कावळा कां कां करीत झाडावरून उठला आणि पंखांची फडफड करीत दूर दिसेनासा झाला.

टोलेजंग मुंबापुरी आपल्या विस्ताराप्रमाणेंच दिवसाचे अफाट व्याप आवरून क्रीडामग्न झालेली दिसत होती. लुकलुकणारे असंख्य विद्युद्दीप वाऱ्याबरोबर जणुं लपंडाव खेळत आहेतसें कीर्तीला भासलें. कितीही एकांत स्थान असो, मुंबईचें वातावरणच मुळीं सतत बडबडत असतें. हवेबरोबरच शहरांतले आवाज

प्रतिध्वनि घेत घेत दूरवर पसरतात. त्यामुळें हिलवरून चाललेल्या मोटारींचे किर्र करणारे कर्णे, गाडीवर माल विकणाऱ्यांच्या आरोळ्या, दूरच्या ट्रामची घरघर, आणि मधूनच लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांतला गंभीर घंटानाद कीर्तीच्या कर्णपथापर्यंत येऊन पोंचत होता. आणि त्या सर्व आवाजांत मिसळून अगोचरपणें समुद्राच्या लाटांची शिवाशिवी आणि खेळतांना उमटणारें हंसणें खिद्‌ळणेंही जाणवत होतें. अदृष्ट भविष्याप्रमाणें समुद्राचा प्रचंड काळासांवळा विस्तार पसरला होता. ग्रह, तारे ज्याप्रमाणें थोडें लुकलुकतें भविष्य समजाऊन देण्याचा प्रयत्न करतात त्याप्रमाणें किनाऱ्यावरील दिवे समुद्राचा कांहीं भाग अस्पष्ट दाखवीत होते.

वर निळ्या आकाशांत असंख्य तारका चमचमत होत्या. पश्चिमेला कापसासारखे असे कांहीं सुंदर ढग जमले होते ! अस्ताला गेलेल्या सूर्याच्या कांहीं रेंगाळणाऱ्या किरणाग्रांचा प्रकाश अजून मिळत असल्यामुळें ते लहान लहान मेघखंड तेजस्वी दिसत असून ते जेथें एकमेकांना लागलेले होते त्या कडा मात्र जरा काळसर दिसत होत्या. जणुं लहानमोठ्या शिंपाच पसरून ठेवलेल्या होत्या, आणि त्यांच्यांतून काढलेले दिव्य मोतीं तारकारूपानें आकाशाच्या निळ्या कापडावर विखुरले होते.

ते ढग पाहून कीर्तीला एक मोठी गंमतीची उपमा सुचली.

बागेच्या दूरच्या एका कोपऱ्यांत एक पत्र्याची शेड उभारली असून तेथें आज सकाळपासून दोन ब्राह्मण आचारी हिंदु पद्धतीचे फराळाचे जिन्नस तयार करीत होते.

ते आचारी दादासाहेबांच्याकडे काम करण्याला तयार झाले ते बरेंच दाम पदरांत पडण्याच्या आशेनेंच. तरी आऊटहाऊसमध्यें काम करण्याचें नाकारून त्यांनीं शेड बांधायला लावली आणि एक मराठा गडी ने आण करण्याला आणि निरोप पाठवण्यासाठीं तैनातीला घेऊन त्यांनीं एडी, त्याची आई, यांनीं त्या बाजूला फिरकतांसुद्धां कामा नये अशी बोली करून घेतली. दादासाहेब आणि कीर्ति यांना सांवली पडणार नाहीं इतक्या अंतरावरून सर्व बघण्यास किंवा बोलण्यास परवानगी मिळाली होती.

कीर्ति दुपारीं तेथवर गेली तेव्हां तिची सांवली जणुं भिऊनभिऊन पाठीमागें पळत होती. या कारणानें कीर्तीला शेडच्या बरेंच जवळ जातां आलें.

बाकी कीर्तीची सांवलीसुद्धां त्या ब्राम्हणांच्यापेक्षां अधिक निर्मल ठरली असती !

मोतीचुराचे लाडू तयार झाले असून करंज्या चालल्या होत्या. दादासाहेबांच्या

सांगण्यावरून गड्यानें बरेचसें मांजरपाट परटाकडून धुवून ब्राम्हणांच्या हवालीं केलें होतें. तें भिजवून आचारी त्याचा लागेल त्या कामाकडे उपयोग करीत होते.

तें शुभ्र निळी छटा मारणारें कापड पत्रावळींवर पसरुन ते ब्राम्हण त्यावर शुभ्र करंज्या लावून ठेवीत होते.

कीर्तीला बघून त्या आचाऱ्यांना मोठें बरें वाटलें होतें. दोन करंज्या तळणींतून निघतांच देवाला नैवेद्य दाखवून दोन करंज्या आणि एक लाडू असें नमुन्यादाखल दुरून कीर्तीच्या हातावर एका ब्राम्हणानें आणून घातलें.

कीर्तीनें दोन्हींचा थोडथोडा मासला बघून त्या जिनसांची खूप प्रशंसा केली. तेव्हां त्या आचाऱ्यांना फारच आनंद झाला. मग आणखी कांहीं हवें नको वगैरे सूचना करून व सर्व नीट चाललें असल्याची खात्री करून घेऊन ती बंगल्याकडे परतली होती.

समोरले मेघखंड बघतांना कीर्तीला त्या दुपारच्या करंज्यांची आठवण होऊन हंसूं आलें. तिच्या मनांत कल्पना आली, अन् हे तारे म्हणजे मोतीचूरच जसे ”
“ कुणाच्या बरं लग्नाची ही तयारी ?

कीर्ती मोठ्यानें हंसली. नंतर आपलें हंसणें कुणी ऐकलें तर नाहींना म्हणून दचकून तिनें वळून पाहिलें पण खोलींत कोणीही नव्हतें. कौस्तुभ बसला होता तें कोच पहातांच कीर्तीला आपल्या तुटलेल्या विचारशृंखलेची आठवण झाली. तिच्या मनांत विचार आला. “ बाकीचीं सर्व प्रेमबंधनं तोडून फेकून देऊन कौस्तुभ माझं प्रेमबंधन तेवढं अढळ राखणार आहे. माझ्या प्रेमाखातर कौस्तुभ सर्व–अगदीं सर्व कांहीं सोडून द्यायला उद्युक्त झाला आहे. काय बरं तो मघांशीं म्हणाला ? तो म्हणाला, कीर्ति, तूं माझी मदिराक्षी नाहींस. तूं माझं जीवन आहेस. ” कौस्तुभ बसला होता त्या कोचाच्या पाठीवर हात ठेऊन कीर्ति मनोमन म्हणाली, “ कौस्तुभ, तुझ्याकरतां मला कुणाचं नातं तोडावं लागलं नाहीं तरी तूं माझं जीवनसर्वस्व आहेस. दादासाहेबांचं माझ्यावर अढळ प्रेम असलं तरी तुझ्या प्रेमावांचून माझं जीवन व्यर्थ होईल. माझ्याकरतां तूं सर्वस्व सोडायला तयार झालास याबद्दल मला तुझ्याकरतां म्हणून वाईट वाटतं पण खरं म्हणजे मला त्याबद्दल अभिमान वाटतो आहे. तुझं माझ्यावर किती प्रेम आहे त्याची दिव्यता तुझ्या दिव्य स्वार्थत्यागामुळेंच सिद्ध होते आहे.”

कीर्ति आतां आनंदोत्फुल्ल झाली होती. तिच्या मुखावर विजयाचा अभिमान झळकत होता. हृदयांत आनंद मावत नसल्याप्रमाणें तिनें वक्षस्थलावर आपले दोन्ही पंजे एकावर एक दाबून धरले.

कीर्ति हंसून पुन्हां मनांतल्या मनांत अभिमानानें म्हणाली, "कौस्तुभ एक उच्च-वर्णीय ब्राह्मण. मी निकृष्ठ समजल्या गेलेल्या हरिजन जातींतली. तरी कौस्तुभ माझ्याकरतां जातगोत सोडायला तयार झाला आहे. किती मी भाग्यवान्." कौस्तुभ मस्तक टेकून बसला होता त्या जागेचें कीर्तीनें चुंबन घेतलें.

नंतर तिला आठवण झाली. "खरंच दादासाहेबांचं नी कौस्तुभाचं कायकाय बरं बोलणं चाललं असेल ? त्यानं आणखीच अस्वस्थ व्हावं असं तर नसेल ना कांहीं बोलणं निघालं ? खरंच आपण मघां कौस्तुभाबरोबर लायब्ररींत गेलों असतों तर बरं झालं असतं. पण आतां तरी जाऊन पाहूं या."

क्षणभर जावं न जावं म्हणून कीर्ति विचारांत पडली. नंतर मनाचा निश्चय करून तिनें आपले मखमली चढाव घातले आणि ती लायब्ररीकडे निघाली.

कौस्तुभ वाचनालयांत जाण्यापूर्वी दादासाहेब आरामखुर्चीवर पडून, खुर्चीच्या पाठीच्या वर भिंतीला मोठ्या सोयिस्कर जागीं लावून घेतलेल्या दिव्याच्या प्रकाशांत जपानी व्यापराविषयीं जर्मन भाषेंत नुकतेंच प्रसिद्ध झालेलें एक पुस्तक वाचीत होते. वाचीत असतां त्यावर ते खुणाही करीत असावे असें त्याच्या उजव्या बाजूला जवळच ठेवलेल्या नक्षीदार तिपाईवरील, पंचरंगी लिहिण्याची सोय असलेल्या पेनसिलीवरुन, अनुमानतां येण्याजोगें होतें.

दादासाहेबांच्या ग्रंथालयांत नमुनेदार पुस्तकसंग्रह असून, चारी भिंतींजवळ मांडलेल्या कपाटांतून पुस्तकांची विषयवार रचना केलेली होती. कपाटांच्या मध्यें मोठाल्या कांचेच्या खिडक्या असून, प्रत्येकीजवळ कोच किंवा खुर्ची मांडलेली होती. खोलीच्या मध्यभागीं मोठें लंबवर्तुळ मेज असून त्यासभोंवतीं खुर्च्या मांडल्या होत्या. घरीं कामकाजाकरितां किंवा खाजगी सभेकरितां मंडळी जमली कीं दिवाणखान्यापेक्षां ग्रंथालयांत बसणेंच दादासाहेबांना विशेष आवडे. या बाबतींत ते नेहमीं विनोदानें म्हणत कीं, वाचनालयांत पुस्तकमित्रांच्या गराड्यांत आपण बसलों कीं कसें घरगुती प्रेमळ वातावरण निर्माण होतें. तेंच दिवाणखान्यांत बसल्यावर एक प्रकारचें औपचारिक आवरण जीव जणूं उबवून टाकतें.

कीर्ति विनोदानें म्हणे, " मला कांहीं विशेष वस्तु मागायची असली कीं दादासाहेब लायब्ररींत असतांना मी ती मागते अन् मग मला ती हटकून मिळते. "

एका खिडकीसमोर, कपाटाच्या अंधारांत दादासाहेबांचा आल्सेशिअन जातीचा, सहा वर्षें वयाचा कुत्रा स्वस्थ पडला होता. हा कुत्रा दादासाहेबांचा तसाच कीर्तीचाही जीव कीं प्राण होता. येवढा येवढा चिमुकला असतां त्यानें विजय बंगल्यांत प्रवेश केला आणि त्यांतील सर्व मंडळींच्या हृदयांतही त्यानें लवकरच प्रवेश मिळविला. एकाद्या लांडग्यासारखें धिप्पाड, धष्टपुष्ट असें त्याचें शरीर होतें. बारीक कंबर, भरदार छाती, निमुळतें सुंदर तोंड, झुपकेदार मोठें शेंपूट असा अंगाचा अत्यंत सुबक घाट, केसांचा पांढुरका तपकिरी रंग, आणि तीक्ष्ण व उजेडाच्या मानानें काळे किंवा पिंगे दिसणारे डोळे, अशा वर्णनाचा तो कुत्रा होता. त्याची चालचलणूक आणि वागण्याची पद्धत अतिशय रुबाबदार व राजस असल्यामुळें त्याचें नांव दादासाहेबांनीं ड्यूक असें ठेवलें होतें. त्याला बोललेलें बहुतेक समजत असे. ड्यूक या वेळीं स्वस्थ

पडलेला दिसत असला तरी त्याचीं तिखट ज्ञानेंद्रियें आपलें काम यथायोग्य रीतीनें बजावीत होतीं. मधूनच तो आपले कान जरा टंवकारून कानोसा घेई, नाकपुड्यांची थोडी हालचाल करून शत्रूचा अभाव असल्याबद्दल गंधपरीक्षेनें खात्री करून घेई आणि हळूंच डोळे किलकिले करून मालकाकडे दृष्टिक्षेप करून ते पुन्हां मिटून घेई.

दादासाहेब घरांत असले कीं शुभ्र तलम धोतरें आणि मलमलीचा सदरा घालीत. शुद्ध खादी वापरण्याइतकी त्यांची स्वदेशीची आवड गेलेली नव्हती, परंतु ते गिरणीचें कापड वापरीत. परदेशीं व्यापारांत पडल्यामुळें त्यांना विदेशी वस्तू घेण्यांत तितकीशी ओशाळगत वाटत नसे. त्यांचें म्हणणें असें होतें कीं आपण परदेशी मालाच्या तोडीला तोड देणारा माल तयार केला पाहिजे. आज प्रत्येक देशाचें महत्त्व त्यांतील उदीम व्यापारावर अवलंबून असतें. दादासाहेब असेंही म्हणून दाखवीत कीं गांधीनीं सव्वा कोट रुपये खादीवर नासले. त्यापेक्षां पूर्ण स्वदेशी अशा, तलम परदेशी मालाइतक्याच स्वस्त मिळणाऱ्या कापडाच्या दोनचार गिरण्या काढल्या असत्या तर फार चांगलें झालें असतें.

गौरवर्ण, तेज:पुंज, देखणें स्वरूप आणि फार कृश नाहीं फार स्थूल नाहीं असा उंच शरीरबांधा पाहून कुणालाही वाटलें नसतें कीं दादासाहेब हरिजन चर्मकार जातींत जन्मले असतील म्हणून. ते हिंदूंच्या उच्च वर्णातील असावेत असेंच त्यांना बघून कुणाला वाटलें असतें आणि त्यांच्याशीं संभाषण केल्यावर तर तोच समज अधिकाधिक दृढ होत जाऊन, ते हरिजन आहेत या गोष्टीवर विश्वास बसणें अशक्य झालें असतें.

आपल्या बांधवांना दादासाहेब कळकळीनें सांगत, " क्षत्रियकुलोत्पन्न विश्वामित्रांनीं जशी घोर तपश्चर्या करून ब्रम्हर्षिपद मिळविलें तसेंच आपण परिश्रम करून ब्राम्हणत्व मिळवलें पाहिजे. पण असें करतांना कितीही कष्ट पडले तरी आपण शिव्याशाप देतां कामा नयेत. त्या बाबतींत आपण विश्वामित्राचें अनुकरण करतां कामा नये. "

खरोखरीं दादासाहेबांनीं उच्च विद्येच्या योगानें ब्राम्हणत्व मिळवलें होतें, विद्या हस्तगत करतांना आणि नंतरही चिकाटी आणि शौर्यधैर्य प्रगटवून क्षात्रतेज सिद्ध केलें होतें, आणि व्यापारांत यशस्वी होऊन ते वैश्यश्रेष्ठही बनले होते. विद्या मिळवण्याला आणि चरितार्थसाधनासाठीं त्यांनीं पूर्वी कित्येक वेळां शूद्रवृत्तीचा अवलंब केला होता.

आपल्या बांधवांविषयीं अहर्निश वाटणारी तळमळ आणि त्यांच्या उन्नतीप्रीत्यर्थ करावयाच्या चळवळी यांच्यापुरते मात्र दादासाहेब आतां हरिजन राहिलेले होते.

दादासाहेब या वेळीं सुमारें पासष्ट वर्षांचे झाले असून आतां वयाच्या मानानें त्यांना अशक्त वाटत असे. शिवाय त्यांना थोडा मधुमेहाचा विकारही होता, पण खाणें, पिणें, धूम्रपान मर्यादित ठेवल्यामुळें तो विकार फारसा न बळावतां अजून बेताबातांत होता. तीन वर्षांपूर्वी त्यांच्या रोगानें एकाएकी उचल खाल्ली होती, परंतु उत्तम डॉक्टर आणि कीर्तीची प्रेमळ शुश्रूषा यांमुळें ते चांगले बरे झाले होते. दादासाहेबांचे सर्व केस पिकले असून, त्यांच्या डोक्याला टक्कलही होतें. ते वृद्ध दिसत परंतु त्यांच्या वार्धक्यदर्शनानें पहाणाऱ्याच्या मनांत आदरभावना जागृत होई. त्यांची बुद्धिमत्ता, कर्तबगारी यांचेंही दर्शन त्यांच्या विस्तीर्ण भालप्रदेशामुळें आणि तेजस्वी डोळ्यांमुळें घडून येई. बघणाराला असें एकदम वाटे कीं या तेजस्वी पुरुषाजवळ दोन शब्द बोलावे. त्यांच्याजवळ थोडें बोलल्यावर त्यांचा सहृदय, दिलदार, उदात्त स्वभाव आणि विद्वत्ता याबद्दल खात्री पटून अशी इच्छा होई कीं या आपल्या सुहृदाजवळ आपलीं सुखदुःखें सांगावीं, इतरांजवळ ज्या गोष्टी सांगण्याचा आपल्याला संकोच वाटतो त्या गोष्टी या मनुष्याला सांगाव्या, आणि त्याचे सहानुभूतिपूर्ण, उपदेशपर असे किंवा आपल्या सुखांत मनापासून समभागी झाल्यामुळें तें सुख द्विगुणित करणारे असे दोन शब्द याच्या तोंडून ऐकावे; दादासाहेबांचे सहानुभूतीचे शब्द म्हणजे कातणीच्या घराप्रमाणें आपल्या हृदयाच्या जखमेचा स्राव थांबवून ती बरी करण्याला मदत करतील अशी बोलणाराला खात्री वाटे आणि त्यांच्या बहुमोल उपदेशानें आपला बिकट मार्ग चंद्रप्रकाशित राजरस्त्याप्रमाणें सुलभ होऊन आपला उत्साह वाढेल अशीही त्यांच्याशीं संभाषण करणाऱ्याची खात्री असे.

परंतु आपल्या संभाषणचातुर्यानें इतरांची काळजी निवारण करण्यांत चतुर असे दादासाहेब आज स्वतःच चिंताव्याकुल दिसत होते. आठदहा दिवस लग्नसमारंभाच्या तयारीसाठीं त्यांना दगदग पडली होती. कालपासून विजेची रोषणाई, मांडव, उपाहार, हारतुरे, पानसुपारी आणि अनेक मोठाल्या जबाबदारीच्या व किरकोळ कामांच्या बाबतींत त्यांना जातीनें लक्ष घालावें लागलें होतें. निमंत्रणपत्रिका व्यवस्थित नांवपत्ते घालून दोनतीन दिवसांपूर्वीच रवाना झाल्या होत्या. दादासाहेब कीर्तीचा लग्नसमारंभ अत्यंत श्रीमंती थाटानें करणार होते.

समारंभाची तयारी चालू असतां दादासाहेबांना आपल्या पत्नीची कितीदां तरी आठवण झाली होती. परंतु दादासाहेब आतां व्याकुलचित्त झाले होते ते गीताबाईच्या आठवणीमुळें नव्हेत. समारंभाची व्यवस्था घरांतले नोकरचाकर, जादा लावलेले नोकर आणि कंत्राटें यांच्याकडे पूर्ण सूचना देऊन सोपविलेली असल्यामुळें त्याही बाबतींत ते आतां बरेचसे निश्चिंत झाले होते. त्यांची मित्रमंडळीही त्यांना यथामति मदत करीत असून उद्यांही मदत करणार होती. तेव्हां समारंभाच्या बाबतींत त्यांना फारशी काळजी करीत बसण्याचें कारण नव्हतें.

आतांच्या दादासाहेबांच्या काळजीचें कारण अगदीं वेगळेंच होतें. त्या काळजीमुळें त्यांचें वाचन मुळींच होत नव्हतें. विश्रांतीसाठीं म्हणून ते वाचनालयांत तासापूर्वी आले होते पण मनाला चैन पडेना म्हणून त्यांनीं एक पुस्तक काढून वाचण्यास सुरवात केली होती, तरी अर्ध्या तासांत त्यांचें अर्धें पानही वाचून झालें नव्हतें किंवा तिपाईवरील पेन्सिलीचा कांहीं उपयोगही झाला नव्हता.

शेवटीं त्यांनीं पुस्तक तिपाईवर टाकलें आणि आपल्या मनांतील विचारांना पूर्ण मोकळीक करून दिली. पाईप उचलून त्यांनीं ती भरून पेटवली आणि धूम्रवलयांकडे बघत, डावा तळवा, आपल्या केस नसलेल्या टाळूवरून फिरवीत ते साधकबाधक प्रश्नोत्तरें मनांतल्या मनांत करूं लागले.

मालकाची ही चिंताक्रांत स्थिति ड्यूकला एका अतींद्रियाच्या साहाय्यानें कळली असावी. उठून त्यानें आपलें अंग झाडल्यासारखें केलें आणि क्षणभर विचारांत पडल्याप्रमाणें उभा राहून नंतर तो दादासाहेबांच्या समोर येऊन उभा राहिला.

दादासाहेब तक्तपोशीवरील नक्षीकडे विमनस्कपणें बघत होते. आणि शिवाय त्यांनीं डोळे अर्धवट मिटले असल्यामुळें ड्यूक समोर येऊन उभा राहिल्याचें त्यांना कळलें नाहीं.

मालकाचें आपल्याकडे लक्ष जात नाहींसें पाहून ड्यूकनें आपलें नाक आणि हनुवटी दादासाहेबांच्या मांडीवर हळूं हळूं घासण्यास सुरवात केली.

दादासाहेबांनीं दचकून डोळे उघडले. ते बघतात तों ड्यूक समोर उभा राहून, स्वामिप्रेमानें पूर्ण अशा डोळयांतील भावना आणि प्रश्नार्थी मुद्रा यांच्या साहाय्यानें त्यांना मूकप्रश्न विचारीत होता कीं, " धनीसाहेब, आपल्याला चैन कां नाहीं ? आपल्याला समाधान रहावं म्हणून माझे प्राणसुद्धां मी देण्याला तयार असतां—"

दादासाहेबांना ड्यूकचा मूकप्रश्न समजला. त्यांनीं हातांतली पाईप राखपात्रांत ठेवली. बसतें होऊन त्यांनीं प्रेमभरानें ड्यूकच्या डोक्यावरून हात फिरवला, आणि त्याचा एक कान दाबीत त्यांनीं इंग्रजींत उत्तर दिलें, "Dont worry, old boy. Everything's all right. Go:and take a nap." ( बेट्या, कांहीं काळजी करूं नको. सर्व ठीक आहे. आतां जा आणि झोंप. )

ड्यूकचें समाधान झालें. जोरजोरानें शेपूट हलवून आपला आनंद व्यक्त करून आणि दादासाहेबांचा हात चाटून तो पुन्हां एका कोपऱ्यांत जाऊन स्वस्थ पडला.

पण दादासाहेबांनीं ड्यूकला जरी काळजी करूं नको म्हणून सांगितलें तरी त्यांची काळजी कुठें निरस्त झाली होती ? ती अजून त्यांना त्रासवीतच होती. ते उठले आणि डाव्या मुठीनें पाईप ओठांत धरून मधून मधून ओढीत खोलींत येरझारा घालूं लागले.

"पुण्याला काय बरं झालं असेल ? मागल्याप्रमाणेंच कांहीं झालं असेल कां ? झालं असलं तर कौस्तुभाचं मन उद्यां स्वस्थ राहील कां ? त्याच्या मनाची चलबिचल तर नसेल ना झाली ? एका बाजूला आईवडील आणि दुसऱ्या बाजूला कीर्ति." दादासाहेबांना आंतड्यांत पिळवटल्याप्रमाणें भास झाला. नंतर त्यांचा श्वास जोरांत होऊं लागला. "मला अधिकार आहे कां असं वागण्याचा ? कौस्तुभाच्या आई-वडलांच्या जवळून त्यांचा मुलगा हिरावून घेण्याचा मला अधिकार आहे कां ? काय करूं मी यावेळीं ? काय करूं मी ? माझ्या एका वक्यानं त्या दोघांना मी पूर्ण सुखी करूं शकेन." दादासाहेबांनीं मधल्या टेबलावर पाईप टाकली. ती जरा वांकडी पडल्यानें तींतील थोडी जळकी नि कढत राखसुद्धां टेबलावर पडली. पण त्यांचें तिकडे लक्ष नव्हतें. आजवर दादासाहेबांच्या आयुष्यांत जे दोन तीन पेचप्रसंग आले होते त्या सर्वांत भर टाकणाराच आतांचा पेचप्रसंग होता. हा आतांचा पेचप्रसंग कांहीं आज-काल निर्माण झालेला नव्हता. इंग्लंडमध्यें कीर्तिकौस्तुभांनीं आपसांत वाङ्निश्चय केल्याचें कळल्यापासून त्याचें बीं रुजलें होतें. कौस्तुभ कीर्तीबरोबर मुंबईला आला आणि नंतर पुण्याला जाऊन आला. तेव्हांच तें बीं जोरांत मूळ धरून फोंफावूं लागलें. बंगलोरला असतांही कौस्तुभाचा आईवडिलांशीं पत्रव्यवहार नव्हता. आतां लग्नदिवस नक्की ठरल्यावर दादासाहेबांनीं स्वतः अण्णासाहेबांना सविस्तर पत्र घालून लग्नाला येण्याबद्दल त्यांची परोपरीनें विनवणी केली होती. त्यावर अण्णासाहेबांचें दादासाहेबांना

जिव्हारीं लागेल असें उत्तर आलें होतें. तें पत्र त्यांनीं कौस्तुभ आणि कीर्ति या दोघांना मुळीं दाखवलेंच नाहीं. फक्त थोडा सारांश सांगितला. तेव्हांपासून तो पेचप्रसंगाचा वृक्ष इतका फोंफावला होता कीं दादासाहेबांचें शेष आयुष्य त्याच्या बेफाम वाढलेल्या मुळ्यांमुळें उन्मळून पडण्याची वेळ आली होती.

" पंचवीस वर्षं जतन केलेलं गौप्य आतां कोणत्या तोंडानं मी जगाला सांगूं ? आजवर या गौप्यवृक्षाचं मी पोषण केलं, त्याचीं गोडगोड फळं चाखलीं ती आतां विषवृक्ष ठरून ...' घातक तर नाहींना ठरणार ? काय करूं मी यावेळीं ? "

आपलें हृदयांतील सुखमंदिर गदगदां हलत आहे असें दादासाहेबांना वाटलें, आणि तें हलणें थांबण्यासाठींच जणूं त्यांनीं छातीवर हात दाबून धरला. त्यांचें हृदय धाडधाड उडत होतें. त्यांच्या कानशिलांवर घणाचे ठोके पडल्याप्रमाणें आवाज निघत होते.

दादासाहेबांची प्रत्येक हालचाल ड्यूक अस्वस्थ चित्तानें बघत होता. दादासाहेब येरझारा घालीत होते त्यांच्याबरोबरच ड्यूकचे स्वामिभक्तिपूर्ण पिंगे डोळे भिरभिरत होते. आपल्या सहानुभूतीनें आपल्या धन्याला बरें वाटणार नाहीं, कदाचित् त्रासच होईल हें ओळखूनच जणूं तो शरिरानें स्वस्थ पडून होता पण दादासाहेबांच्या भावना तो आपल्या अतींद्रियानें, आणि डोळ्यांच्या साहाय्यानें जाणून घेत होता.

दादासाहेबांनीं पाईप ठेऊन दोनतीन फेऱ्या घातल्यावर त्यांना पुन्हां धूम्रपानाची तलफ आली. पाईप कुठें ठेवली हें त्यांना आठवेना म्हणून त्यांनीं घाईघाईनें आरामखुर्चीजवळ जाऊन तिपाईवर पाईप आहे कीं काय तें पाहिलें. नंतर खिडक्यांमध्यें, कोचावर सर्वत्र शोधल्यावर त्यांना पाईप सांपडली. त्यांनीं सांडलेली राख बाजूला उडवली. टेबलावर जळका काळा डाग पडला होता तो बघूनही त्यांना कांहींच विशेष वाटलें नाहीं. त्यांनीं उरलेली राख राखपत्रांत ठोकून टाकली, पुन्हां पाईपमध्यें तंबाकू भरली आणि ती पेटवून त्यांनीं जोरानें दोनचार झुरके ओढले. त्यामुळें त्यांचें चित्त बरेंच शांत झालें.

" मी आतां सारं सांगितलं तर कीर्तीला काय वाटेल ? माझ्याबद्दल तिचा काय ग्रह होईल ? तिला नंतर कधींतरी पूर्ण सुख लाभेल कां ? नाहीं लाभणार. माझं सुखसर्वस्व ! माझी कीर्ति ! माझी, माझी माझी कीर्ति. " पुन्हां दादासाहेबांनीं दोन फेऱ्या घातल्या. पुन्हां त्यांचें चित्त व्यथित झालें. " पण आईवडिलांना दुरावलेला

कौस्तुभ तरी पूर्ण सुखी होईल कां ? आज नव्हे तरी कांहीं वर्षांनीं त्याचं मन त्याला खाणार नाहीं ना ? स्वार्थी म्हणून त्याचा त्यालाच तिरस्कार वाटणार नाहीं ना ? ”

या प्रश्नाचें उत्तर लगेच त्यांना मिळालें असावें. ते म्हणाले, “ नाहीं वाटणार ! कौस्तुभ निवळ स्वार्थासाठीं कांहीं कीर्तीशीं लग्न करीत नाहीं आहे. त्याचे विचार अत्यंत उदात्त आहेत. कौस्तुभ ध्येयवादी आहे. पूर्ण विचारांतींच तो हें सर्व करीत आहे. अन् इतकं असून पुन्हां त्याचं माझ्या कीर्तीवर प्रेम आहे. माझी कीर्ति अत्यंत भाग्यवान् म्हणूनच—”

दादासाहेबांची मुद्रा या विचारांबरोबर उजळत चालली. वारा पडल्यावर जलपृष्ठावरले तरंग हळूं हळूं शांत होत जावे तशा त्यांच्या भालप्रदेशावरील चिंतारेषा नष्ट झाल्या. तरंग शांत झाल्यावर पाण्याचा निर्मळ तळ स्पष्ट दिसूं लागावा तसा त्यांचा प्रसन्न स्वभाव पुन्हां स्मितरूपानें स्पष्ट मुद्रेवर उमटला.

विचारांच्या ओघांत असतांच निश्चयाच्या स्वरांत जणूं सर्व विषयाची परिसमाप्ति करून टाकण्यासाठीं जरा मोठ्यानेंच ते उद्गारले, “ गौप्यस्फोटाचं तें वाक्य मला मुळींच उच्चारतां कामा नये. सध्यां तरी त्याची आवश्यकता आलेली नाहीं. गौप्यगोपनामुळंच एकप्रकारें माझ्या जातीचं हित साधणार आहे. माझ्या दुबळ्या जातीसाठीं, माझ्या कीर्तीच्या आणि कौस्तुभाच्याही सुखासाठीं कौस्तुभाच्या आईवडिलांच्या सुखाचा बळी गेला तरी कांहींच हरकत नाहीं. त्या गौप्याचा भार आजवर मी माझ्या शिरावर वाहून आणला त्याप्रमाणेंच तो यापुढेंही वाहून न्यायला समर्थ आहें. त्या बरोबर पापाचा कांहीं अंश असेल तरीही मी भीत नाहीं. ” पाईपमधील तबांकू काडीनें जरा सारखी करीत असतां कांहीं विचार मनांत येऊन त्यांना हंसूं आलें. “ त्याचा काय नेम ! आणखी वर्षा दोन वर्षांनीं सुदैवानं कीर्तीला मूलबाळ झालं तर ते दोघे सुनेवरला राग विसरतीलही. होय होय. खात्रीनं विसरतील. अण्णासाहेब आपल्या नातवंडाला पहाण्यासाठीं आतुर होतील आणि मुलाला पुन्हां जवळ करतील. ”

दादासाहेबांनीं मनांतला पेचप्रसंग पाईपमधल्या तंबाकूसारखा जाळून टाकला. त्याचा धूर किंवा जळका डाग कुठें शिल्लक असला तरी तिकडे कानाडोळा करण्याइतकें त्यांचें मन स्वस्थ झालें होतें.

———

म्हणूनच कौस्तुभ जेव्हां हळूंच दार उघडून आंत आला तेव्हां दादासाहेब आराम-खुर्चीवर पडून, वाचीत असलेल्या पुस्तकावर खूण करीत असल्याचें त्याला दिसून आलें.

कौस्तुभाला दादासाहेब वाचनांत इतके गढले असल्याचें पाहून मोठें नवल वाटलें. त्याचा त्यांच्याविषयींचा आदरभाव वृद्धिंगत झाला. सर्व आकाश मेघमंडलांनीं व्यापून टाकलें असतांही सूर्यानें प्रसन्नपणें आपलें कार्य करीत रहावें !

" उद्यां एकुलत्या एक मुलीचें लग्न. आणि यांना इतकें स्वस्थपणानें वाचन सुचतें तरी कसें ? मला या दोन महिन्यांत–" कौतुभला या शेवटल्या विचारानें जरा हंसूं आलें.

तितक्यात ड्यूकनें कौस्तुभ आल्याचें दादासाहेबांना कळवल्यामुळें त्यांनीं पुस्तका-वरून वर नजर फिरवली. कौस्तुभचें प्रसन्न, दिलदार हास्य पाहून वाचनालयांत एकदम रातराणीच्या सुवासाप्रमाणें एक सुखाची लहर पसरल्याचा त्यांना भास झाला. ती लहर हृदयाला स्पर्शून गेल्याप्रमाणें दादासाहेबांना जरा आनंदानें शहारल्यासारखें झालें. क्षणभरांत त्यांच्या मनांत विचार आला, " हा उमदा तरुण माझ्या कीर्तीला किती अनुरूप आहे. कीर्तीला हा खचित सौख्यशिखरावर घेऊन जाईल. "

दादासाहेबांचें सोज्वल, प्रेममय हास्य बघून कौस्तुभाला वाटलें, " माझ्या वडिलांना दुर्दैवानं मी मुकत असलों तरी उद्यांपासून कीर्तीबरोबरच दादासाहेबांचं पितृप्रेमही मला लाभेल. "

ज्याला ज्याला मराठी समजेल त्याच्याबरोबर शुद्ध मराठींत बोलण्याचा दादा-साहेबांचा परिपाठ होता. त्यांची वाणी अतिशय स्पष्ट आणि शब्दोच्चार शुद्ध असत. ते आतां जवळच्या खुर्चीकडे हस्तनिर्देश करून मराठींतच कौस्तुभाला म्हणाले, " ये कौस्तुभ, " कौस्तुभाच्या सांगण्यावरूनच दादासाहेब त्याला अरेजारे म्हणूं लागले होते. " आलास जाऊन पुण्याला ? "

किती साधें वाक्य. बोलण्याची पद्धत किती सहज पण कौतुभाला त्या सहज वाक्यांआडून चमकणारे अंतस्थ सहानुभूतीचे आणि तळमळीचे किरण चमकतांना आढळून आले.

मृगाच्या वेळीं आकाशांत सहजगत्या तरंगत आलेला क्षुद्र काळाभुरा जलधर पाहून आतां आपल्या उन्हानं रखरखलेल्या जमिनी भिजणार, थंडावणार म्हणून शेतकरी समाधानाचा उसासा सोडतो त्याप्रमाणें वडिलांच्या रागानं होरपळून निघालेल्या कौस्तुभाला या साध्यासुध्या पण हिताकांक्षी वाक्यामुळें धीर आला. समाधानाचा निश्वास सोडून तो जरा हंसला.

उमाळ्याबरोबर सर्व सांगून टाकावें यासाठीं कौस्तुभ अधिर झाला होता, पण त्यानें मन आंवरलें. खुर्चीवर बसून तो खालच्या चिनी तुकड्यांच्या नक्षीकडे बघत उत्तरला, " हो. इतक्यांतच आलों मी. आणि लगेच इकडेच आलों. " त्याच्या स्वरांत खिन्नपणा कायम होता. बोलतां बोलतां त्याच्या विस्तीर्ण भालपटलावरही, नांगरट भूभागाप्रमाणें रेषा पडल्या.

दादासाहेब कौस्तुभाच्या मुखावरील भावनालहरी निरखीत होते. त्यांनीं पुन्हां विचारलें, " कांहीं उपयोग नाहीं झाला जाण्याचा ? " उद्गार आणि प्रश्न यांच्या मध्येंच दादासाहेबांचा स्वर तरंगत होता.

एकदम वर मान करून दादासाहेबांच्या नजरेला नजर देऊन कौस्तुभानें उदासपणें मान हालवून सांगितलें, " कांऽहींसुद्धां उपयोग नाहीं झाला. एकापरीनें नसतों गेलों तरी बरं झालं असतं. " कौस्तुभाचा निराशामय स्वर आणि शेवटलें बोंचरें हंसणें ऐकून दादासाहेब जरा चमकले. पुन्हां त्यांना तो पहिलाच प्रश्न भेडसावूं लागला, " आईवडिलांपासून दुरावलेला कौस्तुभ पूर्ण सुखी होईल कां ? तो जर दुःखी झाला तर कीर्तीही दुःखी होईल खास ! मी मघां केलेला निश्चय तिला दुःखदायक ठरणार असेल तर मला गौप्यस्फोट करणं भाग आहे ! काय बरं करूं मी यावेळीं ? काय बरं करूं ? " याप्रमाणें दादासाहेबांची मनस्थिति पुन्हां व्याकुळ झाली असतां आपल्या खऱ्या भावना लपवून जरा निष्काळजीपणा दर्शवीतच ते म्हणाले, " काय मग गेल्या खेपेची पुनरावृत्तीच झाली कां ? "

" गेल्या खेपेची पुनरावृत्ति झाली असती तर मला इतकं कांहीं वाईट वाटलं नसतं. " कौस्तुभ पुन्हां कसासाच हंसला.

डयूक कौस्तुभाच्या खुर्चीजवळ उभा राहून त्याचा हात चाटूं लागला. कौस्तुभाचें जणूं तो सांत्वन करीत होता. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत कौस्तुभ कांहीं क्षण

विमनस्कपणें खिडकीबाहेरील विद्युद्दीपानें मंदप्रकाशित बागेकडे पहात राहिला. यावेळीं गडद हिरवीं, जवळजवळ काळी दिसणारीं पानें हलतां हलतां दिव्याच्या झोतांत आलीं कीं चमकत त्याप्रमाणेंच त्याच्या स्मृतीच्या योगानें पुण्याला घडलेले दुःखद प्रसंग अंतःचक्षूसमोर तळपून जात होते. मृगाची सर येतांच उन्हानें रखरखलेल्या जमिनींतून ऊष्ण वाफा उफाळून वर येतात तसे कौस्तुभाच्या दुःखाचे कढही आतां सळसळून वर आले. त्यानें एक आर्त सुस्कारा सोडला.

ज्वालामुखींतून जरा कढत वाफारा बाहेर आला कीं पृथ्वीच्या पोटांत तप्तधातु-रसांचा केवढा हलकल्लोळ माजला असावा याची कल्पना करतां येते. कौस्तुभाचा तो आर्त सुस्कारा ऐकून दादासाहेबांनीं काळजीयुक्त स्वरांत विचारलें, " म्हणजे ? कौस्तुभ, असं झालंय तरी काय ? " बोलतां बोलतांच जणूं धीर देण्यासाठीं म्हणून त्यांनीं कौस्तुभाच्या उजव्या हाताच्या पंजावर आपला उजवा पंजा थोपटला. मनांतल्या मनांत ते म्हणाले, " मला सर्व कांहीं सांगितलं पाहिजे. कीर्तीकरतां— पण कसं सांगूं ? "

दादासाहेबांच्या कृतीनें कौस्तुभाच्या अंतर्हृदयाचा बांध फोडला. दादासाहेबांच्या-कडे दृष्टि वळवून त्यानें स्मरणांत येतील तसतसे प्रसंग भावनांनीं हेलावलेल्या स्वराविर्भावांनीं परंतु हळूं स्वरांत व सावकाशीनें सांगण्यास सुरवात केली. त्या हकिगतींत सुसंगतपणा नसला तरी तींतील महत्त्व, आणि कौस्तुभाच्या दृष्टीनें काळजाला कायमचा चावा घेणारें तिचें स्वरूप मात्र, दादासाहेबांना पूर्णांशानें कळून आलें. प्रथम कौस्तुभ त्यांच्याकडे बघून बोलत होता तरी तो जसजसा अधिकाधिक भावनाविकल होत चालला तसतसा बाजूला बघून तो हकिगत सांगत होता. दादासाहेबांच्या नेत्रांतली सहानुभूति जर दिसली तर कदाचित् आपलें दुःख आपल्या हृदयाचा बांध फोडून असहाय अश्रुपाताच्या स्वरूपांत बाहेर फुटेल अशी त्याला थोडी भीति वाटत असावी. तो आपल्या भावनावेगांत इतका बुडून गेला होता कीं ड्यूक उभा राहून त्याचा गाल चाटूं लागला तेव्हां दादासाहेबांनीं त्याला " डाऊन, ड्यूक डाऊन " असें हलक्या स्वरांत सांगून त्याला खालीं बसवलें हेंही कौस्तुभाला समजलें नाहीं. तो बोलतच होता. डावें कोपर खुर्चीच्या हातावर रेलून केसांच्या बटीशीं चाळा करण्यांत त्याचीं बोटें गुंतलीं होतीं.

सर्व सांगून झाल्यावर भानावर आल्याप्रमाणें एकदम दादासाहेबांच्याकडे बघून कौस्तुभ मोठ्यानें पण रुक्षपणें हंसला. नंतर तो म्हणाला, " खरोखर आज अस

एक क्षण आला होता कीं माझा ध्येयवाद जर माझ्या मदतीला नसता तर मी आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीला कायमची सोडायला तयार झालों असतों. ”

कौस्तुभ हें वाक्य बोलत असतांच ड्यूक दाराशीं जाऊन, शेपूट हलवीत, किलकिल्या उघडलेल्या दाराच्या फटींतून आपलें नाक बाहेर घालण्याचा प्रयत्न करीत होता आणि पुढल्या पंज्याच्या नखांनीं दार खरवडीत होता हें कौस्तुभाच्या तर लक्षांत आलें नाहींच पण दादासाहेबांच्यासुद्धां लक्षांत आलें नाहीं.

कारण—

संथ जलप्रवास चालू असतां सोसाट्याचा वारा वाहूं लागला कीं नावाडी भीतीनें गणबणून जातो. पण थोडक्याच वेळांत सर्व शांत होऊन वर स्वस्छ निळें आकाश व भोंवतालीं संथ पाचूच्या जमिनीसारखा समुद्र दिसूं लागून त्याला हायसें वाटावें तसें दादासाहेबांचें आतां झालें होतें. त्यांच्यावरला पेचप्रसंग वादळाप्रमाणें आतां पडला होता.

कौस्तुभाचें वाक्य ऐकून, एकादें मोठें थोरलें उरावरलें दडपण अनायासें दूर झाल्याप्रमाणें दादासाहेबांना हलकें वाटूं लागलें होतें. इतका वेळ गुदमरून आतां मोकळें झाल्याप्रमाणें त्यांनीं एक दीर्घ श्वास घेतला.

आतां दादासाहेबांचा जातिविषयक ध्येयवाद कौस्तुभाच्या उज्ज्वल ध्येयवादाला पूरक असाच ठरणार होता. कीर्तिकौस्तुभांच्या उद्यां होणाऱ्या लग्नाबाबत त्यांना अगदीं निःशंक मनानें मागून पुढें चालू करणेंच अत्यावश्यक ठरणार होतें. कौस्तुभानें आपले आईवडिल ध्येयाकरतां तोडले होते आणि त्याच्या आईवडिलांपासून कौस्तु-भाला तोडणें आतां दादासाहेबांना कठीण वाटण्याचें कारण नव्हतें. कौस्तुभाच्याच सुखाचा आणि पर्यायानें कीर्तीच्या सुखाचा प्रश्न त्यांत गुंतला असता तर गोष्ट निराळी होती. आतां दादासाहेब सर्व शंकाकुशंकांतून पूर्ण मुक्त झाले होते.

मुलीला सुख लागावें म्हणून घरदार गहाण टाकून हुंडा देण्याला तयार झालेल्या मनुष्याला त्याच्या जांवयानें येऊन सांगावें कीं मला एक पैसुद्धां हुंडा नको तर त्याला जसा आनंद झाला असता, त्याला जसा जांवयाबद्दल कौतुकादर वाटला असता त्याच्या शतपट आनंद यावेळीं दादासाहेबांना झाला. कौस्तुभाबद्दलच्या कौतुकादरानें त्यांचें हृदय दुथडीं भरून निघालें.

कारण कौस्तुभ आईवडिलांपासून भांडून वेगळा झाला तर त्याला जन्मभर ती गोष्ट डांचत राहील, त्यामुळें तो पूर्ण सुखी होणार नाहीं आणि त्यामुळें कीर्तीलाही टोंचणी लागून तीही दुःखी होईल या कल्पनेनें दादासाहेब आपलें अत्युच्च सुख, आपल्या सर्व जीवितकार्यावर उद्यां चढणारा कळस, आपल्या लाडक्या कीर्तीकरतां पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें फुंकून टाकायला उद्युक्त झाले होते.

पण आतां एकाच वाक्यानें कौस्तुभानें त्यांना त्या दिव्व्यांतून सोडवलें होतें. या उदात्त ध्येयवादी तरुणाच्या सहवासांत आपली कीर्ति अगदीं पूर्ण सुखी होईल अशी त्यांची खात्री झाली. आधीं खात्री होतीच पण ती आतां दसपट वाढली.

आणि कीर्तिकौस्तुभ तर सुखी होणारच होते पण दादासाहेबांचें ध्येयही अढळ रहाणार होतें. नव्हें, तें अत्युच्च विजय गांठायला निघालें होतें.

कौस्तुभाचें तें इतकें महत्वपूर्ण वाक्य उच्चारून होतांच वरील सर्व विचार क्षणा दो क्षणांत दादासाहेबांच्या डोक्यांत येऊन गेले आणि कौतुकाभिमानानें कौस्तुभाचा खुर्चीच्या हातावर ठेवलेला उजवा पंजा हलके हलके गौरवार्थ थोपटून, ते इंग्रजींत म्हणाले, “ That’s the spirit, असाच बाणा असला पाहिजे. याबद्दल मी तुझं हार्दिक अभिनंदन करतों. ” नंतर किंचित् काळजी वाटून मनाची पूर्ण खात्री करून घेण्यासाठीं म्हणून त्यांनीं विचारलें, “ पण कौस्तुभ, कांहीं दिवसांनीं-कांहीं वर्षांनीं तुला या गोष्टीचा पश्चात्ताप तर नाहींना होणार ? तुझ्या आईला आज दुःख झालं तें पाहून तुझं मन पोळल्यासारखं झालं आहे. कांहीं काळानं त्या आठवणीनं तुला पुन्हां पुन्हां चटके तर नाहीं ना बसणार ? तूं जें दिव्य करतो आहेस तें तुझ्या पुढच्या आयुष्याचा नाश तर नाहीं ना करणार ? तूं अगदीं पुरता विचार केला आहेस ना ? ”

कौस्तुभ क्षणभर थांबला. तो क्षण दादासाहेबांना अधीरतेमुळें केवढा तरी लांब वाटला. त्या एका क्षणांत त्यांच्या हृदयाचे धाड धाड चार सहा ठोके पडले. त्यांना वाटलें कौस्तुभाच्या मनाची चलबिचल चालली आहे.

पण तसें कांहींच नव्हतें. कोणत्या शब्दांनीं दादासाहेबांना आपला निश्चय, आपला पक्का निर्धार पटवून द्यावा आणि त्यांचें मन स्वस्थ करावें याच विचारांत कौस्तुभ क्षणभर पडला होता. तितक्यांत त्याला भास झाला कीर्ति आपल्याशेजारीं

उभी आहे. तिनें आपलें वाक्य लवकर ऐकणें अत्यावश्यक आहे. म्हणून गडबडीनें तो म्हणाला, " माझा या बाबतींत अगदीं पूर्ण निर्धार झालेला आहे. आणि मला कधींही या गोष्टीमुळें पश्चात्ताप होणार नाहीं. कीर्तीसारखी सद्गुणी, सुस्वभावी पत्नी मला मिळते आहे हें माझें महद्भाग्य मी समजतों. कीर्तीचं प्रेम मला लाभलं आहे म्हणूनच माझ्या ध्येयवादाला बळकटी आली आहे. कीर्तीकरतां मी आईवडीलच काय पण सर्व जगसुद्धां सोडायला तयार होईन. "

—८—

पण—पण—

अरेरे !—अरेरे ! !—

कौस्तुभाचे हे शब्द कीर्तीच्या कानावर पडलेच नाहींत.

कीर्ति वाचनालयाशीं येतांच आंत जाण्यासाठीं ती दार उघडूं लागली होती, चार बोटें दार तिनें उघडलेंही होतें.

आणि अचानक पिन करतां करतां स्टोव्हच्या येवढ्याशा छिद्रांतून रॉकेलची धार बाहेर पडून वरल्या ज्योतीनें भडकावी आणि तें पेटलेलें रॉकेल अचानक तोंडावर उडून भाजून मांस बाहेर निघावें आणि असह्य वेदनांनीं जीव कासावीस व्हावा, त्याप्रमाणें त्या चार बोटांच्या फटींतून कीर्तीला कौस्तुभाचें वाक्य ऐकूं आलें.

कौस्तुभ म्हणत होता, " खरोखर आज असा एक क्षण आला होता कीं, माझा ध्येयवाद जर माझ्या मदतीला नसता तर मी आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीला कायमची सोडायला तयार झालों असतों. "

त्या एका वाक्यानें कीर्तीच्या हृदयांतील सौख्यमंदिराचा भडका उडाला. असह्य वेदनेनें ती व्याकूळ होऊन गेली. क्षणभर मूर्च्छना आल्याप्रमाणें सुन्न मनस्थितींत दार उघडण्यासाठीं मुठीला धरलेला हात तसाच्या तसाच कायम राहून डाव्या पंजानें संकट दूर लोटीत असल्याप्रमाणें तिनें तो तोंडापुढें पाठमोरा पसरला. नंतर शरिरांत त्राण न राहिल्याप्रमाणें तिनें आपलें कपाळ त्या पंजावर टेकलें आणि तळहात बंद फळीला टेकून बोटांनीं दाराचें आडवें लांकूड पकडण्याचा ती प्रयत्न करूं लागली.

ड्यूक फटींतून नाक बाहेर काढीत होता. बाहेर येऊन तो कीर्तीवर प्रेमाचा वर्षाव करणार होता याचें कीर्तीला भानच नव्हतें.

दाराच्या फटींतून पुन्हां पुन्हां तें कौस्तुभाच वाक्य तीक्ष्ण बाणांप्रमाणें बाहेर पडत असल्याचा भास होऊन कीर्तीनें झटकन् आंतल्या माणसांना आपण आल्याचें कळूं नये इतक्या सावधगिरीनें, दार पुन्हां लावून टाकलें.

त्यामुळेंच जरा दाब पडतांच ड्यूकनें आपलें तोंड आंत घेतलें आणि तें चेंगरलें नाहीं. कीर्तीच्या या आजपर्यंत कधीं न केलेल्या कठोर वर्तणुकीबद्दल ड्यूकला नवल

वाटत होतें. दादासाहेब, कीर्ति आणि कौस्तुभ असे तिघे गप्पा मारीत असले कीं नेहेमीं फार आनंदांत असत. मजेंत हंसतां बोलतां ते ड्यूकचें कौतुक करीत.

आणि आज सर्व गोष्टी बाजूलाच राहून आपली मालकीण आली तशी आंतही न येतां, नुसतें आपल्याला भेटूंही न देतां निघून गेली. आपलं नाकतोंड चेंगरलं असतं याचीही तिला किंमत वाटली नाहीं!

पण कुत्रे आपल्या स्वामीला कधींही दोषी समजत नाहींत. आजच्या कीर्तीच्या वागणुकीला कांहीं वेगळेंच कारण असलें पाहिजे, ती आपल्यावर रागावल्याचें हें लक्षण नव्हे हें ड्यूकला कळून आलें. मात्र त्याच्या चिमुकल्या मेंदूला तें कारण काय हें मात्र तर्कितां येईना. म्हणूनच आपल्या धन्याला ही गोष्ट लवकर कळवली पाहिजे आणि काळजीचें कारण नष्ट केलें पाहिजे हें जाणून तो दादासाहेबांच्याकडे गेला.

कीर्ति जवळजवळ धांवतच माडीवर आपल्या पुढल्या खोलीशेजारील शयन-मंदिरांत आली. तिनें धाडकन् अंग पलंगावर टाकलें आणि भणभणणारें डोकें उशींत खुपसून, होरपळल्याप्रमाणें तळमळत ती विचार करूं लागली.

खोलींत अंधार पडला होता.

अंधारांत भुताखेतांना वावरायला मोकळीक असते.

कीर्तीच्या अंतःकरणांतही निराशेचा अंधकार पसरला होता. कुविचारांचीं भुतेंखेतें तेथें स्वैर धिंगाणा घालीत होतीं.

" कौस्तुभाचं माझ्यापेक्षां आपल्या ध्येयावरच अधिक प्रेम आहे म्हणायचं! आणि मी आजवर स्वतःला फसवीतच आले कां? मला वाटत होतं कीं कौस्तुभाचं माझ्या-वर—अगदीं निवळ माझ्यावर प्रेम आहे. मला वाटत होतं कीं माझं जसं कौस्तुभावर—केवळ त्याचा स्वभाव, त्याचे गुण, त्याचं बुद्धिवैभव, त्याची विद्या, या सर्वस्वीं त्याच्याच सद्गुणांवर प्रेम आहे— "

कीर्ति किंचित् थांबली. नंतर आवेशांत म्हणाली, " होतं "

लगेच तिनें स्वतःलाच प्रश्न केला, " होतं? "

कीर्तीला एक नवीनच धक्का बसल्याप्रमाणें झालें. तिला वाटलें कीं आपण आपलें हृदयसर्वस्व कौस्तुभाला अर्पण करून चुकलों, त्यांत आतां कालत्रयीं फरक होणार

नाहीं, पण कौस्तुभानेंही आपल्याला हृदयसर्वस्व अर्पण केलें असें आपल्याला वाटत होतें तें मात्र चुकीचें होतें. कौस्तुभानें आपलें हृदयसर्वस्व आपल्या ध्येयाला वाहिलें आहे. आपण केवळ त्या ध्येयमंदिराच्या पायाप्रमाणें आहों. काय बरं म्हणाला तो ?" एकाद्या गाण्याचें पालुपद जसें पुनरावृत्ति होऊन होऊन कानांत अगदीं बसून जातें आणि गाणें संपल्यावरही तें पालुपद कानांत कुणी गुणगुणत आहेसा भास होतो त्या-प्रमाणें कौस्तुभाचें दादासाहेबांच्यासमोर उच्चारलेलें वाक्य कीर्तीच्या विचारांना पालु-पदासारखें होऊन बसलें होतें. पुन्हां पुन्हां तें वाक्य ती आपल्या मेंदूवर घाशीत होती. प्रत्येक वेळेला मेंदूवर जणूं त्याचे चरे पडत होते.

" काय बरं म्हणाला तो ? 'खरोखर आज असा एक क्षण आला होता कीं माझा ध्येयवाद जर माझ्या मदतीला नसता तर मी आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीला कायमच सोडायला तयार झालों असतों.' असंच ना ? "

एक हुंदकेवजा निश्वास कीर्तीच्या हृदयांतून बाहेर पडला.

" म्हणजे प्रथम ध्येय, नंतर आईवडील आणि शेवटीं मी. "

जातिभेदाच्या अनिष्टतेबद्दल कीर्तिकौस्तुभांचे कित्येक वेळां वादविवाद झालेले होते. कौस्तुभाच्या प्रगल्भ विचारांबद्दल कीर्तीला अत्यंत आदर वाटत असे. किंबहुना या वादविवादांमुळेंच त्यांचा सहवास आणि हळूंहळूं परस्पराकर्षण वाढत गेलें असें म्हणणेंच योग्य होईल.

" त्याच्या सुंदर, उदार विचारांबद्दल मला केवढा आदर वाटायचा. कौस्तुभाची पुन्हां गांठ पडते केव्हां आणि त्याचें बोलणें ऐकतें केव्हां असें होऊन जायचें. तो आपल्या ओजस्वी वाणीनं जातिभेदाविरुद्ध बोलूं लागला म्हणजे त्याचे तेजस्वी डोळे अधिकच आकर्षणक्षम बनत. त्याच्याकडे बघत रहावेसेंच वाटे, त्याचें तें कळकळीचें बोलणें कानावर सारखें पडत रहावेसें होई.

" आपलं त्याच्यावर प्रेम बसलं. तो आपलं जीवनसर्वस्व–जीवन–जीवन–" कीर्तीच्या स्मृतीला पुन्हां धक्का बसला. कौस्तुभ तिला मघांच म्हणाला होता. " कीर्ति, तू माझी मदिराक्षी नाहींस. तूं माझं जीवन आहेस. " कीर्तीला तो सर्व प्रसंग आठ-वला, आणि सर्व निराशा धुवून काढल्याप्रमाणें तिचें चित्त निर्मल होऊन त्यावर

हळूंहळूं आनंदलहरी ऊठूं लागल्या. "कौस्तुभाचंही माझ्यावर प्रेम आहे. खात्रीनं आहे." पण तितक्यांत—

सरोवरावर वायुलहरींच्या योगानें सुंदर वर्तुलाकृति तरंग उठत असतांच, एकाद्या माशानें पृष्ठभागावरला किडा पकडण्यासाठीं डुबुककन् वर येऊन पाण्याला भोंक पाडल्याप्रमाणें करून बुडी मारावी आणि तरंगवर्तुळें बिघडवून टाकावीं तसेंच कौस्तुभाचें वाचनालयांत उच्चारलेलें वाक्य तिच्या गोड विचारतरंगांना भेदून वर आलें. 'माझा ध्येयवाद जर माझ्या मदतीला नसता तर मी आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीला कायमची सोडायला तयार झालों असतों.' या वाक्यानें पुन्हां तिला धक्का दिला, तिच्या आशेचा, आनंदाचा विच्छेद करून टाकला.

"कौस्तुभाला ध्येय हें हवेसारखं आहे. नंतर मी, जीवन. कौस्तुभाचं माझ्यावर कितीही प्रेम असलं तरी त्यापेक्षां अधिक त्याचं ध्येयावर प्रेम आहे. ध्येयाच्या हातीं माझ्या प्रेमाचं बाहुलं खेळण्यासाठीं त्यानं दिलं आहे. त्या बाहुल्याविषयीं त्याला कितीही आकर्षण वाटत असलं तरी बाहुलंच तें." चक्रव्यूहांत अडकलेल्या माणसाप्रमाणें कीर्ति त्याच त्या विचारांत गुरफटली होती. वाटेवरले तेच ते खुणेचे जिन्नस दिसून तो अधिकच त्रस्त होतो त्याप्रमाणेंच त्याच त्या वाक्यांनीं ती अधिकाधिक निराश होऊन दुःख करून घेत होती.

"कौस्तुभाला ध्येय नसतं तर त्यानं माझ्याशीं लग्न केलं असतं कां? निवळ प्रेमाच्या आधारावर जर लग्न ठरलेलं असतं तर कौस्तुभ उद्यांच्या दिव्याला तयार झाला असता कां?"

"कौस्तुभाला ध्येय नसतं तर कौस्तुभ आज पुण्याहून आला तो लग्न मोडलं असं सांगायला आला असता—माझा ध्येयवाद जर माझ्या मदतीला नसता तर मी आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीला कायमची सोडायला तयार झालों असतों. असंच म्हणाला तो. कौस्तुभानं उद्यांच्या दिव्याकडे पाठ फिरवली असती. स्वतः न येतां कदाचित् त्यानं नुसतं पत्र पाठवलं असतं कीं, नाइलाज आहे. आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीशीं लग्न करणं मला अशक्य आहे. याबद्दल मला फार वाईट वाटतं."

संतापानें कीर्तीचें सर्वांग थरथरूं लागलें. ताडकन् बसली होऊन डोक्याखालीं घेतलेली उशी तिनें दूर भिरकावून दिली. नंतर ती उठून उभी राहिली. दांत

आंवळून, उजव्या हाताची गच्च वळलेली मूठ डाव्या हाताच्या पंजांत घट्ट धरून समोर कौस्तुभ उभा असल्याप्रमाणें त्याच्यावर संतापाच्या ठिणग्या नेत्रांवाटें फेकीत असल्याप्रमाणें पहात, कंठात हालचाल करून ती अदृश्य कौस्तुभाला अस्फुट शद्बोच्चारांनीं म्हणाली, " माझाही नाइलाज आहे. माझं प्रेम हेंच माझं ध्येय आहे. तशाच प्रेमाची मला अपेक्षा आहे. ध्येयापुढें आणि आईवडिलांच्या इच्छेखातर ज्या प्रेमाचा बळी देणं सहजशक्य होतं असलं प्रेम मला नको आहे. मलाही तुझ्याशीं लग्न करणं अशक्य आहे. याबद्दल मला फार फार वाईट वाटतं. पण—पण—" आपल्या निश्चयाचें पूर्णस्वरूप विश्वरूपाप्रमाणें अंतर्दृष्टीला दिसतांच कीर्ति भयभीत होऊन गेली. असहायपणें, भयचकित मुद्रेनें तिनें खोलीभर दृष्टि फिरवली. अंधारांत कौस्तुभाचे सहस्रगणती डोळे आपल्याकडे चकितपणें बघताहेत असा भास होऊन ती ओरडण्याच्या बेतांत होती पण तिनें डाव्या हाताचीं बोटें गळ्याभोंवतीं वेष्टून जणुं ती किंकाळी आंतल्या आंत दाबून धरली. ते अंधारांतले डोळे दिसूं नयेत म्हणून तिनें आपले डोळे घट्ट मिटून घेतले.

दादासाहेब कौस्तुभाचे शब्द अतृप्तपणें ऐकत होते.

ड्यूक समोर उभा राहून प्रश्नार्थी मुद्रेनें त्यांच्याकडे बघत होता. त्याच्या डोळ्यांत एकादी गोष्ट समजत नसल्याप्रमाणें व्याकुलता उमटली असून तीच जणुं तो धन्याला विचारीत होता. त्याच्या दोन डोळ्यांच्या मध्यें कपाळावर एक चिंतादर्शक आठी पडली होती.

दादासाहेबांचें ड्यूककडे लक्षच नव्हतें. त्यांना धन्यधन्य वाटत असून त्यांच्या नेत्रांत आनंदाश्रू आले होते.

आपण विचारीत असलेल्या महत्त्वाच्या गोष्टीकडे धन्याचें लक्ष जात नाहींसें पाहून ड्यूकनें आपला उजवा पंजा उचलून दादासाहेबांच्या मांडीवर हळूंहळूं खाजवल्यासारखें केलें.

या व्यत्ययामुळें दादासाहेब त्रासून म्हणाले, " काय पाह्यजे रे तुला ? पाणीबिणी पाह्यजे काय ? " ड्यूकनें होकारार्थी शेपूट हलवलें नाहीं व तो पुन्हां हेतुपूर्वक दादासाहेबांच्याकडे बघूं लागला. तेव्हां त्यांनीं घणकन् तिपाईवरील घंटी वाजवली. एडीला ते ड्यूकला जरा बागेंत सोडण्यास सांगणार होते.

घंटी ऐकतांच एडी दार उघडून आंत आला.

पण त्याला कांहीं सांगण्याच्या आंतच ड्यूक उघडलेल्या दारांतून निसटला आणि वेगानें धांवत जिना चढून तो कीर्तीच्या शयनमंदिरांत आला.

कीर्ति पलंगावर निश्चल पडून होती !

तें पहातांच ड्यूकनें धपकन् तिच्या पलंगावर उडी मारली.

कीर्तीनें दचकून जरा उशींतून डोकें वर उचलतांच ड्यूकनें तिचें तोंड चाटण्यास सुरवात केली.

कीर्तीच्या तोंडावर नकळत स्मित उमटलें. ती उठून बसली आणि ड्यूकला जवळ ओढून त्याच्याच पिंग्या कोटाला त्यानें चाटलेला आपला गाल पुशीत, प्रेमरस घट्ट करून त्यांचीं दोन पिंग्या रंगाचीं रत्नें बनवून बसवल्याप्रमाणें चमकणाऱ्या त्याच्या डोळ्यांकडे कीर्तीनें कांहीं क्षण बघितलें. ड्यूक मूकपणें किती किती तरी तिच्याशीं बोलला, त्याचें प्रत्यंतर कीर्तीच्या मुखावर कुणाही प्रेक्षकाला दिसून आलें असतें. दुःखामुळें कीर्तीच्या शरिराला, मनाला, आणि बुद्धीला एकप्रकारची मूर्च्छना आली होती ती ड्यूकच्या प्रेमकिरणांच्या स्पर्शानें हळूं हंळू दूर होऊन तिच्या डोक्यांत विचारविकारांची आतां गर्दी उसळून आली.

कीर्तीकडे पहात असतां ड्यूकला जणूं तिच्या दुःखाची तीव्रता समजून येऊन त्याच्या डोळ्यांत पाणी तरंगूं लागलें आणि आपल्या गळ्याजवळचा भाग कीर्तीच्या खांद्यावर घाशीत त्यानें ऊं ऊं म्हणून हळूच एक विव्हलशब्द काढला. त्याची झुबकेदार लांब शेपटी हळूं हळूं हलतच होती.

त्या मुक्या जनावराच्या या गाढ सहानुभूतीनें कीर्तीच्याही गळ्यांतून एक कोरडा हुंदका बाहेर पडण्यासाठीं धडपडूं लागला. तो मोठ्या कष्टानें आंवरून पण बाष्परुद्ध कंठानें ती ड्यूकच्या कानाशीं बोलली, " ड्यूक, तुम्हां मुक्या प्राण्यासारखं खरं निस्वार्थ प्रेम आम्हां माणसांना करतांच येत नाहीं कां रे ? "

कीर्तीनें ड्यूक म्हणून म्हणतांच ड्यूकनें कीर्तीच्या खांद्यावरून मान उचलून, कान टवकारून तो तिचें भाषण एकाद्या मित्राप्रमाणें गंभीर चेहरा करून, डोळे विस्फारून आणि शांत बसून ऐकूं लागला.

कीर्तीच्या मनोभावना खरोखरी अनुकूल नसतांही ड्यूकच्या या अभिनयाचें तिला हंसूं आलें.

जणूं आपला सांत्वनोपाय यशस्वी झाला या समाधानानें ड्यूकचें शेपूट हलूं लागलें. त्याच्या डोळ्यांत आणि चेहेऱ्यावर स्पष्ट हास्य उमटलें. नंतर आपला उजव्या हाताचा पुढला पंजा उचलून कीर्तीच्या हातावर क्षणभर ठेवून लगेच पलंगावरून उडी मारून तो खोलींतून पसार झाला.

ड्यूक गेला त्या दाराकडे किंचित्काल कीर्ति उदासपणें बघत राहिली. नंतर पुन्हां मानसिक क्षोभानें गात्रें विकल झाल्याप्रमाणें होऊन ती पलंगावर आडवी झाली. तिच्या मस्तकांतील विचारांची आग पुन्हां हळूं हळूं भडकत चालली.

इकडे दादासाहेब आणि कौस्तुभ आनंदनिर्भरतेनें समारंभाविषयीं कांहीं विचार-विनिमय करीत होते. जरा वेळानें कौस्तुभ दादासाहेबांचा निरोप घेऊन घरीं जावयास उठला. त्याला वाटलें पुन्हां एकदां कीर्तीला गुडनाईट करून जावें. पण मघांचें मोहक गुडनाईट आठवून त्याची किंमत आतां या दुसऱ्या गुडनाइटनें उतरवूं नये असा विचार करून तो फुलपांखराप्रमाणें जणूं आनंदाच्या वातावरणावर तरंगत ताजमहालमध्यें आला. दादासाहेबांच्या मोटारींत बसल्याची त्याला जाणीवही नव्हती. आल्हाददायी धवल चंद्रप्रकाशांत धुवून निघणाऱ्या आग्र्याच्या ताजमहालाप्रमाणें कौस्तुभाचा आनंद नितांत सौंदर्यशाली, सोज्ज्वल व विशालस्वरूपी होता !

परंतु त्या अतीव सुंदर ताजमध्यें मुमताजचें थडगें आहे, शोकाचें वास्तव्य आहे. त्याप्रमाणें कौस्तुभाला मधूनमधून टोंचल्यासारखें होई. रात्रीं झोपेंत गोड गोड स्वप्नें अनुभवीत असतांच पुण्याकडील गोष्टी विलक्षण स्वरुपांत दिसून त्याला जाग येई. थोडा वेळ विव्हलतेनें तळमळल्यावर पुन्हां तो झोपेच्या आधीन होऊन गोड स्वप्नांत मग्न होऊन जाई. याप्रमाणें कौस्तुभ रात्रभर त्याग आणि भावी सुखाशा यांच्या द्वंद्वामध्यें सांपडला होता. एकाद्या पानावर बसून पांखरूं सूर्याचे कोवळे किरण अंगावर घेऊन मजेदार ऊब अनुभवीत असतें, पण मध्येंच जो वारा त्याला झोकें देत असतो त्याच वाऱ्यामुळें वरल्या फांदीवरून रात्रीच्या पावसाचे थेंब ओघळून थंडीनें तें गारठतें. तशीच कौस्तुभाची अवस्था झाली होती.

कौस्तुभ जातांच दादासाहेब स्वस्थ मनानें येरझारा घालीत उद्यांसंबंधीं विचार

करूं लागले. जरा वेळानें त्यांना एकदम आठवलें कीं कीर्ति इतक्या वेळांत वाचनाल्यांत कशी आली नाहीं ? काय करते आहे ती पोरगी ?

" कीर्ति, कीर्ति ! "

दादासाहेब कीर्तीच्या बैठकीच्या खोलीच्या दारांतून अंधारांत डोकावून पहात हांका मारूं लागले.

दादासाहेबांची वात्सल्यपूर्ण हांक ऐकतांच कीर्ति भानावर आली. रात्रीं भयंकर स्वप्न पडत असतांच अंगावर मायेचा हात आहे याची जाणीव होऊन भीति नष्ट व्हावी त्याप्रमाणें कीर्तीच्या विचारांच्या वावटळी बऱ्याचशा शांत झाल्या. तिनें चटकन दिवा लावला आणि ती बाहेरील खोलींत आली.

दादासाहेब कीर्ति कुठें गेली असें आश्चर्य करीत परत जाण्याच्या विचारांत होते. तेवढ्यांत शयनगृहांत दिवा लागलेला पाहून त्यांनीं बाहेरच्या खोलींतलाही दिवा लावला.

कीर्तीला पाहून ते अती आश्चर्यानें म्हणाले, " हें काय कीर्ति, अंधारांत कां बसली होतीस ? काय झालं तुला ? डोकंबिकं दुखतंय कीं काय ? अगदीं आजाऱ्यासारखी दिसते आहेस. " कीर्तीकडे बघतां बघतां दादासाहेबांचा स्वर काळजीयुक्त होत गेला.

अस्ताव्यस्त पदर, विसकटलेला केशकलाप, तारवटलेले, भयचकित नेत्र, आजाऱ्यासारखी निस्तेज, दुर्बल व फिकट मुखचर्या, शुष्क दिसणाऱ्या अलग ओष्ठद्वयांमधून भराभरा चाललेला हुंदक्यांशीं सादृश्य असलेला निश्वास आणि वक्षःप्रदेशाचें धडधडणें, या सर्व गोष्टी बघून दादासाहेबांची काळजी अधिकाधिकच वृद्धिंगत होत गेली. त्यांनीं कीर्तीजवळ येऊन पुन्हां व्याकुळतेनें भराभर प्रश्न करण्यास सुरवात केली, " कीर्ति, काय झालं तुला ? कौस्तुभ गेला ना ? मला भेटल्यावर पुन्हां इकडे आला होता कीं काय ? भांडला बिंडलां कीं काय दोघं ? अं ? होय ? " शेवटीं दादासाहेबांनीं हंसून विचारलें. पण काय उत्तर द्यावें म्हणून कीर्ति क्षणभर विचार करते तोंच त्यांनीं पुन्हां विचारलें, " कां लग्नाच्या कल्पनेनं नर्व्हस ॲटॅक आला आहे ? " त्यांनीं मनाला ग्वाही दिली, " तेंच कारण दुसरं काय ? " विलायतेत कितीक अशीं उदाहरणें त्यांनीं पाहिलीं होतीं. दादासाहेबांनीं कीर्तीच्या

पाठीवरून हात फिरवला आणि तिला एका कोचावर बसवून आपण तिच्याशेजारीं बसून पुन्हां तिच्या पाठीवरून ते वात्सल्यभरांत हात फिरवूं लागले.

कीर्तीचा दुःखभार या प्रेमस्पर्शानें उचंबळून आला. दादासाहेबांच्या छातीवर आपलें तोंड लपवून उजव्या हातानें त्यांच्या गळ्याला मिठी मारून कीर्ति स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

डावा हात तिच्या पाठीवरून घालून तिला हृदयाशीं बिलगून धरून दादासाहेब तिचे केस सारखे करून कुरवाळूं लागले. कीर्तीच्या दुःखानें दादासाहेब भारावून गेले. आवेगभरांत ते बोलून गेले, "किल्यामाल्या, खुळा कां रे तूं?"

ते शब्द ऐकतांच कीर्तीला आणखीच उमाळा आला.

दादासाहेबांचेंही हृदय भरून आलें. कंठाची हालचाल होऊन डोळे भारावल्या-सारखे झाले.

दादासाहेबांच्या आयुष्यांतील पहिलें प्रेमनिधान, त्यांची पत्नी गीताबाई, केव्हांच काळानें त्यांच्याजवळून ओढून नेली होती. आणि आतां शुभ निमित्तानें कां होईना, त्यांचें दुसरें प्रेमनिधान आतां दूर चाललें होतें.

कितीतरी पूर्वीच्या आठवणी त्यांना येऊं लागल्या. लहानपणची ती साजिरी गोजिरी कीर्ति. केतकीचें नाजूक पानच. येवढीशी लहान तिचीं तीं चिमुकलीं दोन पावलें एका हातांत मावत. कमळाच्या गुलाबी पाकळ्यांप्रमाणें सुकुमार! तिला तळहातावर उभी करून उंच धरली कीं मोठमोठ्यानें खिदळत टाळ्या वाजवायची आणि ती पडेल म्हणून गीताबाई घाबऱ्या होऊन पुरे पुरे म्हणून बोलायच्या, आणि दादासाहेबांनीं ऐकलें नाहीं कीं बघवत नसल्याप्रमाणें डोळे मिटून घ्यायच्या नाहींतर दूर निघून जायच्या.

नंतरची ती दुडुदुडु धांवणारी गोंडस बालिका. लहानशीशी सुवासिक कळ्या-फुलांनीं बहरलेली नाजूक फुलवेलच. तिचे गोड बोबडे बोल ऐकून प्रत्येकानं तिचं कौतुक करावं, तिला गोंजारावी, कुरवाळावी असं गीताबाईंना वाटत असतां, आणि लोकांनीं तसें केल्यावर खरोखरीं धन्यता वाटत असतां, माझी पोर हाताळते अशी त्यांना भीति वाटे. युरोपिअन, पार्शी लोकांनींदेखील त्या राजस पोरीचे पापे घ्यावे आणि दृष्ट लागेल म्हणून गीताबाईंचा जीव वरखालीं व्हावा. पण त्यांनीं लावलेलें गालबोटसुद्धां शशांकाप्रमाणें तिला शोभवीत असे.

दादासाहेब आणि गीताबाई यांना आपल्या गेलेल्या मुलांची आठवण फारशी होईनाशी होऊन कीर्तीबरोबरच त्यांचा सौख्यचंद्रही कलांनीं पूर्ण होत चालला होता. आणि तो पूर्ण होतो तोंच त्याला ग्रहण लागलें. कधीं न सुटणारें मृत्यूचें ग्रहण लागलें. त्यानें गीताबाईचा सर्वस्वीं ग्रास केला.

नंतरचें दादासाहेबांचें आयुष्य कीर्तीमुळेंच सुसह्य झालें होतें. कीर्तीच्या बुद्धीचा, सौंदर्याचा विकास, आपल्या बरोबरीनें समाजसेवेची तिला वाटणारी तळमळ बघून त्यांना कृतार्थ वाटत असे.

गीताबाई शेवटीं कीर्तीचा चिमुकला हात दादासाहेबांच्या हातीं देऊन म्हणाल्या होत्या, " ही पोर फार सुलक्षणी आहे बरं. आपल्या डोळ्यांतल्या बाहुलीसारखी तिला जपा. "

दादासाहेबांनीं कीर्तीला आपल्या जीवकलेसारखी जपली होती. ती आतां मोठी झाली होती. आणि तिनें आतां आपलें हृदयसर्वस्व कौस्तुभाला अर्पण केलें होतें. पितृप्रेमाकडे पाठ फिरवून द्रुतगतीनें सर्वस्व सागराच्या स्वाधीन करावयास निघालेल्या कैलासकन्यकेप्रमाणें कीर्ति उद्यां कौस्तुभाची होणार होती.

दादासाहेबांनीं एक जड निश्वास टाकून आपल्याला सोडून चाललेल्या कीर्तीला आणखीच जवळ कुरवाळली.

कीर्तीचे हुंदके ओसरून ती आतां दमल्यासारखी स्वस्थ राहिली होती.

दादासाहेबांच्या मनांत विचार आला, " खरोखरच कीर्ति सुलक्षणी. कौस्तुभा-सारखा अत्यंत अनुरूप वर तिला लाभणार आहे. उद्यां होणारा हा विवाह म्हणजे आमच्या जातीचा खरोखर केवढा विजय आहे हा. "

दादासाहेबांच्या इतक्या वेळच्या दुःखावेगाचें हर्षामध्यें रूपांतर झालें. कीर्तीचा तोंडावळा त्यांना दिसत असता, तिच्या मनांत इतक्या वेळांत विचारांच्या काय काय घडामोडी झालेल्या होत्या हें जर त्यांना समजलें असतें तर ते पुढील शब्द बोलले नसते. ते म्हणाले, " कीर्ति, तूं खरोखर किती भाग्यवान् आहेस. कौस्तुभासारखा ध्येयवादी, धीरोदात्त तरुण तुला जन्माचा सहचर लाभणार आहे. ",

ध्येयवादी हे शब्द ऐकतांच विजेचा धक्का बसल्याप्रमाणें शहारल्यासारखें करून कीर्तीनें तोंड वर उचललें. रडून लाल झालेल्या तिच्या डोळ्यांत निश्चयाची छटा

चमकली. दूर सरकून, तिनें हुंदक्यांनीं भारावलेल्या, पण तिरस्कारपूर्ण आवाजांत एकेका शब्दावर निश्चयाचा जोर देऊन सांगितलें, " मला त्या ध्येयवादी कौस्तुभाशीं लग्न करायचं नाहीं. "

कीर्तीचे ते शब्द ऐकतांच आपलें काळीज हातीं धरून कुणी निर्दयपणें पिळवटीत असून त्यांतलें रक्त नष्ट होत असल्याचा भास होऊन दादासाहेबांच्या हृदयाचे ठोके क्षणभर थांबले, व हातपाय निर्जीव व थंडगार झाल्याप्रमाणें त्यांना वाटलें. ही कीर्तीच बोलते आहे कां अशा शंकेनें जणूं व्याकूळ होऊन तिच्याकडे चमत्कारिक दृष्टीनें पहात तीक्ष्णपणें त्यांनीं विचारलें, " काय म्हणालीस ? कौस्तुभाशीं लग्न करायचं नाहीं ? "

दादासाहेबांना आपल्या निश्चयानें केवढा धक्का बसला तें पाहून कीर्ती हतबुद्ध झाल्याप्रमाणें त्यांच्याकडे बघत राहिली. आपल्या बोलण्यांतला भयंकरपणा तिचा तिलाच जाणवूं लागला. आपलें तोंड तिनें दोन्ही हातांनीं झांकून घेतलें.

दादासाहेब अधीरपणें कीर्ति काय बोलते इकडे लक्ष लावून होते. ती बोलत नाहींसें पाहून त्यांनीं गदगदां तिचा खांदा हलवून पुन्हां तोच प्रश्न केला पण कीर्तीच्या तोंडून तें वाक्य पुन्हां बाहेर पडेना. तरी आपला निश्चय कीर्तीनें पुन्हां उच्चारल्याप्रमाणें दादासाहेब हताश शब्दांत म्हणाले, " कीर्ति, तुला कल्पना आहे तूं काय बोलते आहेस याची ? लग्नाची सगळी तयारी झाली. पांचहजार निमंत्रणपत्रिका मुंबईत आणि गांवोगांवीं पोंचल्या. परगांवचे कांहीं पाहुणेसुद्धां पाहुण्यांच्याकरतां घेतलेल्या बंगल्यांत आज येऊन पोचले. उद्यां सकाळीं आपल्या जातीचे शेकडो लोक आपल्या बंगल्यांत येतील. तुझ्या लग्नाकरतां येतील. आणि कीर्ति, मी त्यांना सर्वांना सांगूं तरी काय ? कोणत्या तोंडानें सांगूं ? " दादासाहेबांनीं आपलें तोंड दोन्हीं पंजांनीं झांकून घेतलें. उकळत्या धातूप्रमाणें त्यांचें रक्त अंगभर सळसळत होतें. त्यांच्या कपाळावर घर्मबिंदू जमले होते. ड्यूक पलीकडल्या कोपऱ्यांत थरथर कांपत दोन्ही पायांवर डोकें ठेऊन पडला होता.

दादासाहेबांचा प्रत्येक शब्द घणाचा घांव घातल्यासारखा कीर्तीला भासत होता. आपले हात हृदयाशीं धरून असहायपणें ती दादासाहेबांच्याकडे बघत होती.

सर्व आयुष्यांतला मोठ्यांत मोठा पेचप्रसंग तिला या क्षणीं सोडवावयाचा असून त्या बाबतींत तिचे जीवनाधार दादासाहेब यांचें साहाय्य तिला मिळणार नव्हतें.

दादासाहेब तिच्याविरुद्ध होते. लग्नासाठीं आलेले पाहुणे तिच्याविरुद्ध होते. जात, गोत, शिष्टाचार–सर्व जगच जणूं तिच्याविरुद्ध होतें.

दादासाहेब हात तोंडावरून काढून कपाळावरला घाम पुशीत पुन्हां म्हणाले, "कीर्ति, कौस्तुभाला या तुझ्या निश्चयामुळें काय वाटेल, त्याला केवढा धक्का बसेल याची तुला जाणीव तरी आहे ! तुझ्याकरतां जातगोत सोडायला तो तयार झाला, हें तुला माहीत आहे ना ?"

कीर्ति तिरस्कारानें म्हणाली, "माझ्याकरतां नव्हे. ध्येयाकरतां तो सर्व सोडतो आहे."

दादासाहेब हंसले. पण त्यांत कठोरपणा आणि उद्वेग यांचें मिश्रण होतें. "त्याकरतां तर तो तुला आणखीच प्रिय असायला हवा."

कीर्तीनें अती आश्चर्यानें विचारलें, "काय ? माझ्यापेक्षां त्याचं ध्येयावर जास्त प्रेम आहे म्हणून तो मला जास्त प्रिय व्हावा ?"

कीर्तीच्या आश्चर्य वाटण्याचाच जणुं विस्मय वाटून दादासाहेब म्हणाले, "अर्थात्. ध्येयविहीन पुरुष म्हणजे दांताशिवाय सिंहच म्हणायचा."

"ही तुमची पुरुषी विचारसरणी मला पटत नाहीं." कीर्ति उद्वेगभरानें बोलूं लागली. "दादासाहेब, मला वाटत होतं कीं कौस्तुभाचं हृदयसर्वस्व मलाच मिळालेलं आहे पण–'

"कीर्ति, खरोखरच तूं भाग्यवान् म्हणून तुला कौस्तुभाचं हृदयसर्वस्व लाभलेलं आहे. उगीच कांहींतरी शंका काढून समोर असलेला सुखाचा ठेवा नको लाथाडूं."

दादासाहेबांचें कळकळीचें बोलणें ऐकून कीर्तीला बुचकळ्यांत पडल्याप्रमाणें झालें.

"पण दादासाहेब, मी माझ्या स्वतःच्या कानांनीं कौस्तुभाच्या तोंडचे शब्द ऐकले. तो तुम्हांला म्हणाला ना कीं, माझा ध्येयवाद जर माझ्या मदतीला नसता तर मी आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीला कायमची सोडायला तयार झालों असतों, म्हणून."

"कीर्ति, त्यामुळेंच तर कौस्तुभाच्या अत्यंत उदात्त स्वभावाची साक्ष पटते. आणि तुझ्या समजुतीप्रमाणें म्हटलं तरीसुद्धां त्या क्षणावर त्यानं विजय मिळवला ना ? इतर सर्व गोष्टी दूर लोटून तुझाच त्यानं स्वीकार करायचं ठरवलं ना ?"

" ध्येयाचा त्यानं आधीं स्वीकार केला. नंतर माझा केला. ध्येयाकरतां त्यानं सारं सोडलं. माझ्याकरतां नाहीं." ध्येय या शब्दावर कीर्ति प्रत्येक वेळीं जोर देत होती.

" कीर्ति, कौस्तुभाच्या ध्येयाबद्दल तुला इतकं काय वाईट लागतं आहे तेंच मला समजत नाहीं. मी जर तुला सांगितलं कीं तुझं हें लग्न होण्यांत माझ्याही जाति-विषयक ध्येयाचा विजय झाल्याचं समाधान मला लाभणार आहे, तर माझं तुझ्यावर कमी प्रेम आहे असं तूं म्हणशील कां ? "

कीर्तीनें चमकून विचारलें, " काय ? माझं कौस्तुभाशीं लग्न झाल्यानं तुमचं ध्येय साधणार आहे ? "

दादासाहेबांनीं उत्साहभरांत उत्तर दिलें, " होय होय. कीर्ति, आयुष्यांतली माझी अत्युच्च महत्त्वाकांक्षा कौस्तुभाशीं तुझं लग्न झाल्यानं सफल होणार आहे. "

कीर्तीने विवळल्याप्रमाणें एक निश्वास टाकला. उदास डोळ्यांनीं दादासाहबांच्या-कडे पहात, विरक्त स्वरांत ती म्हणाली, " पण कौस्तुभाशीं लग्न करून मला आतां सुख लागणार नाहीं. त्याच्या प्रेमाविषयीं मला शंका आली आहे. "

दादासाहेबांनीं कठोर स्वरांत विचारलें, " काय म्हणतेस ? कौस्तुभाचं दुसऱ्या कुणा मुलीवर प्रेम आहेसं वाटतं तुला ? तसं असलं तर मात्र— "

" तसं नाहीं हो दादासाहेब. " दादासाहेबांना आपलं बोलणं कसं पटवावं हेंच कीर्तीला कळेना. म्हणून ती जिकिरीला येऊन बोलूं लागली " त्याचं माझ्यावर जितकं प्रेम आहेसं मला वाटत होतं तितकं नाहीं असं मला वाटतं. "

दादासाहेबांनीं एकदम स्वस्थतेचा निश्वास टाकला. ते हंसून म्हणाले, " मूर्ख आहेस झालं. तुला नर्व्हस ॲटॅक आलाय दुसरं कांहीं नाहीं. कौस्तुभाचं तुझ्यावर किती प्रेम आहे याची खात्री असल्याखेरीज कां मी या लग्नाला संमति दिली ? आणि इतक्या दिवसांनीं आज एकदम तुला त्याचं प्रेम कमी असल्याचा शोध लागला होय ? वेडी पोरगी. कौस्तुभाचं तुझ्यावांचून आणि तुझं कौस्तुभावांचून आयुष्य कसं वैराण होईल याची कांहीं कल्पना आहे तुला ? "

आपल्या प्रिय पत्नीच्या तजबिरीवरून दादासाहेबांनीं ओझरती नजर फिरवून एक निश्वास टाकला. कांहींसें स्वगत बोलल्याप्रमाणें ते म्हणाले, " आज ती असती

तर तिनं तुझी नीट समजूत घातली असती. तूं तिच्याजवळ मोकळेपणानं बोलली असतीस. कीर्ति, संकोचानं तूं माझ्याजवळून कांहीं लपवून तर नाहीं ना ठेवीत? कौस्तुभाच्या हातून कांहीं अनुचित—

" नाहीं नाहीं. दादासाहेब " कीर्तीनें घाईघाईनें उत्तर दिलें. " तसं कांहीं एक नाहीं. "

" मग झालं तर " दादासाहेबांनीं सर्व स्थीरस्थावर करण्याच्या हेतूनें हंसून विचारलें, " मग आतां नाहीं ना मनांत कांहीं शंका ? "

कीर्ति क्षणभर आवंकलेली पाहून दादासाहेबांचें हृदय भीतीनें पुन्हां जलद उडूं लागलें.

तितक्यांत दारावर टिचक्या ऐकूं आल्या. दादासाहेबांनीं येस म्हणतांच पायानें दार उघडून एडी आणि त्याच्यामागोमाग त्याची आई मेरी आणि आणखी दोन मेरीचे मदतनीस यांनीं खोलींत प्रवेश केला. ते चौघेजण या कानापासून त्या कानापर्यंत दंतपंक्ती उघडून आपल्या शुभ्र एप्रनशीं त्यांचें साम्य प्रदर्शित करीत हंसत होते. चौघांनीं एक मोठा ट्रे तोलून आणला असून त्यावर एक मजल्या मजल्यांचें उत्कृष्ट नक्षीकाम आणि रंगीबेरंगी आयसिंग केलेली वेडिंगकेक नक्षीदार कागदावर मांडलेली होती.

एडीच्या आईनें सानंद अभिमानानें हंसत दादासाहेब आणि कीर्ति यांना म्हटलें, " देखो पसंद है न ? "

दादासाहेब लगेच गडबडीनें उठून केकजवळ आले. दादासाहेब मेरीला म्हणाले, " मेरी तसदी लेकर केक यहाँ केऊं ले आई ? अगर आप हमे बुलाती तो हम किचनमे आकर देख लेते. ये कीर्ति, बघ ना. "

मेरीनें आणखीच तोंड रुंदावून हंसून उत्तर केलें, " कहती के आपको तरास देने के बदले केक ले आऊं. भला आयसिंग वगैरा आपको पसंद है न ? "

" हाँ हाँ तो " दादासाहेबांनीं प्रशंसापूर्वक केक न्याहाळीत सांगितलें. " आप लोगोने ये केक कितनी सुंदर बनाई ! नकसीकाम तो बहुतही कमाल दरजेका है."

ताजमहाल हॉटेलांतला एक केक करणारा आला होता त्याच्याच मदतीनें मेरीनें केक केली होती. तो आतां केकबरोबर आलेलाच होता. त्याच्याकडे मोठ्या कौतुकानें मेरीनें पाहिलें. केकच्या स्तुतीनें त्यालाही फार आनंद झाला होता.

इकडे एडी केव्हांपासून आपल्या पायानें आईचा पाय दाबीत तिला खुणा करीत होता. पण त्याच्याकडे मधूनमधून एक ओझरता रागाचा दृष्टिक्षेप करून मेरीनें आपल्या मदतनिसाच्या कलाप्रविणतेची स्तुति सुरू केली. दादासाहेबांनीं त्या केकवाल्याचे काळजीपूर्वक केक करून दिल्याबद्दल आभार मानले व त्या मनुष्यानें उलट दादासाहेबांचे थँक्स मानले तेव्हां मेरीला एडीच्या खुणांचा अर्थ कळला. आणि मग ओशाळल्याप्रमाणें प्रथम एडीकडे बघून थँक्स देण्याची खरी वेळ गेली असतांनादेखील ती दादासाहेबांना थँक्स साब म्हणून म्हणाली.

दादासाहेबांनीं एडीच्या खाणाखुणा पाहिल्याच होत्या. तेव्हां त्यांना मेरीच्या थँक्सबद्दल खरोखर मनांतून हसूं आलें. पण त्यांनीं तें दिसूं दिलें नाहीं. त्यांनीं विचारलें, " लेकिन मेरी, दुसरी और तैयारी तो ठीक हुई न ? "

" हाँ तो. सब हो चुका. अभी सिर्फ ताईसाबका विवाह ही जो कुछ रह गया. " आपण केवढा विनोद केला अशा अभिमानानें बरोबरच्या लोकांकडे बघून मग प्रेमळ हंसून मेरीनें कीर्तीकडे पाहिलें. कीर्ति केवढ्यानें तरी दचकली. मेरीच्या वाक्यामुळें दादासाहेबही दचकल्यासारखे झाले. ताईसाबका विवाह ही जो कुछ रह गया. हें वाक्य त्यांना वेगळयाच अर्थानें जाणवून त्यांनीं भयचकितपणें कीर्तीकडे दृष्टिक्षेप केला.

कीर्ति टक लावून केकच्या वरच्या बाजूला केलेल्या नकशीकामाकडे बघत होती. तिच्या मुखावरलें मंद हास्य मेरी वगैरेंना प्रशंसेचें वाटलें पण दादासाहेबांना त्यांत कांहींतरी चमत्कारिकपणा भासला. कीर्तीच्या दृष्टीच्या अनुरोधानें त्यांनीं पाहिलें. केकवर एका कोपऱ्यांत चिमुकला मदन एका बाणावर दोन हृदयें धरून उभा असून दुसऱ्या कोपऱ्यांत फिकट जांभळ्या रंगांत दोन सुंदर प्रेमी पांखरें एका हिरव्या फांदीवर, चोंचीला चोंच लावून बसलेलीं काढलीं असून त्यांच्या तोंडून आशीर्वादाप्रमाणें बाहेर पडणाऱ्या साखरेच्या रसाच्या धारेनें A Happy Life (सुखमय आयुष्य) अशीं मोहक अक्षरें लिहिलीं होतीं.

" कीर्ति, केक सुंदर झाली आहे नाहीं ? " स्तब्धता मोडली पाहिजे हें लक्षांत येऊन दादासाहेबांनीं मुद्दामच प्रश्न केला.

कीर्ति एकदम सावध झाली. सर्वांचें लक्ष आपल्याकडे आहेसें पाहून ती एकदम मोठ्यानें हंसली. नंतर ती मेरीला म्हणाली, " वाह मेरी, केक तो बहुत सुंदर बनाई है. "

मेरीनें घाईघाईनें थँक्स म्हणून म्हटलें आणि एडीकडे गर्वानें दृष्टिक्षेप केला. आतां तरी थँक्स मी आपणहून म्हटलें कीं नाहीं ? विसरलें नाहीं ना ? असाच जणूं तिच्या मनांतील आशय होता.

नंतर दादासाहेबांनीं सांगितलें, " अच्छा मेरी, केक ले जाव. अच्छी जगहपर रख दो. "

चौघांनीं माना लववून निरोप घेतला आणि केक खोलीबाहेर नेली. जातांना मेरीनें सूचना दिली, " खाना तैयार है. " दादासाहेबांनीं " हाँ " म्हणून तिला उत्तर दिलें.

नंतर अर्थपूर्ण दृष्टीनें कीर्तीकडे बघत त्यांनी " काय कीर्ति ? " म्हणून प्रश्न केला. कीर्तीनें हळूं हळूं गालिच्यावरून दृष्टि वर उचलून त्यांच्या नजरेला नजर देऊन नुसती संमतिदर्शक मान हलवून मूक उत्तर दिलें. त्याबरोबरच आपलें सुख फुंकरून टाकल्याप्रमाणें तिनें एक निश्वास सोडला. त्यांत कितीक भावना होत्या तें तिचें तिलाच माहीत !

दादासाहेबांना या क्षणीं त्यांची किंमत वाटली नाहीं. एकदम उरावरलें मोठें थोरलें दडपण उतरावें तसें त्यांना वाटलें. तरी त्यांच्या मनांत थोडी हुरहूर वाटतच होती. म्हणूनच पुन्हां खात्री करून घेण्यासाठीं ते कीर्तीच्या खांद्यावर हळूंहळूं थोपटीत बोलले, " कीर्ति, तूं आतां जर नाहीं म्हणाली असतीस तर माझी आणि कौस्तुभाचीच नव्हे तर या इतर सर्व लोकांचीसुद्धां केवढी भयंकर निराशा झाली असती. किती उत्साहानं सर्वजण कामं करताहेत. तुझ्यावर किती प्रेम आहे सर्वांचं. "

कीर्ति हंसली पण तिच्या डोळ्यांत पाणी आलें.

तेव्हां दादासाहेब घाईघाईनें म्हणाले, " पण कीर्ति, आतां तूं नाहीं म्हणाल्यानं माझी निराशा होईल त्याहीपेक्षां जास्त निराशा तूं या लग्नामुळें दुःखी झालीस तर होईल. तेव्हां अजून सांग. "

आपल्या सुखासाठीं दादासाहेब आपल्या सुखाची, ध्येयाची आहुति द्यायला तयार आहेत तर ? मग आपण...

कीर्ति अत्यादरानें दादासाहेबांच्याकडे बघत म्हणाली, " दादासाहेब, तुमच्या आशीर्वादावर माझ्या भवितव्याची सर्व जबाबदारी मी सोंपवतें. "

दादासाहेब सद्गदितपणें म्हणाले, “ कीर्ति, तूं अगदीं खात्रीनं कौस्तुभाशीं लग्न करून सुखी होशील. माझी खात्री आहे. तशी जर माझी खात्री नसती, कौस्तुभ तुला अत्यंत अनुरूप आहे असं जर मला वाटत नसतं तर कीर्ति, कौस्तुभ ब्राह्मणच काय, पण प्रत्यक्ष देव असता आणि त्याच्याशीं तुझं लग्न झाल्यानं माझ्या ज्ञातिविषयक ध्येयाची पराकोटी लाभणार असती तरी तुला मी त्याच्याशीं लग्न करायला सुखानं संमति दिली नसती. उलट तुला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला असता.”

कीर्ति हंसली. ध्येयामुळें दुरावलेले दादासाहेब पुन्हां आपल्याला पूर्णपणें लाभल्याप्रमाणें तिला स्वस्थ वाटलें.

दादासाहेब कोमल स्वरानें म्हणाले, “ चल जेवायला येतेसना ? ”

भूक नाहीं म्हणून कीर्ति म्हणणार होती पण लगेच विचार बदलून “ हो येतें ” म्हणून तिनें केस जरा नीट केले आणि मग दोघेही जेवणघरांत गेले.

अळेंबळें चार घास खाऊन वर आल्यावर कीर्ति किती वेळ तरी गीताबाईंच्या तैलचित्राकडे बघत उभी राहिली. शेवटीं तिनें हात जोडून गद्गद स्वरांत आशीर्वाद मागितला, “ आई, तूंच मला या दिव्यांतून पार पडण्याचं धैर्य दे. आज तूं असतीस तर तुला माझं म्हणणं समजलं असतं. पण आतां मला या दिव्याला तयार राह्यलं पाहिजे. आई, आई ग. तूंच मला धैर्य दे. धैर्य दे. ”

मोठा दिवा मालवून रात्रीचा अंधुक निळा दिवा लावून कीर्ति पलंगावर पडली. पण तिचा डोळ्याला डोळा लागेना. एकदां तिला वाटे असंच्या असंच जाऊन दादासाहेबांना सांगावं कीं काय वाटेल तें होवो मला उद्यां लग्न करायचं नाहीं. नंतर लगेच तिला दादासाहेबांची केवढी निराशा होईल याची जाणीव होई. ती पुन्हां पुन्हां हात जोडून करुणेनं म्हणे, “ आई, मला तूंच धीर दे ग. ”

उरकलेलीं कामें आंवरून दादासाहेब कितीतरी वेळांनीं आपल्या शयनमंदिरांत गेले पण त्यांनाही दगदगीमुळें व काळजीमुळें झोप आली नाहीं.

---

धारिणी रात्रीं पलंगावर पडली ती जणूं झोंपण्याकरतां नसून तळमळण्याकरतांच. काळजीनें तिला घेरून सोडलें होतें.

धारिणी अत्यंत स्थिरचित्त आणि गंभीरवृत्तीची होती. वर्णानें काळ्यांत जमा पण रेखीव नाकडोळे आणि पिढ्यानुपिढ्या खानदानीचें घराणें असलेल्या लोकांच्या तोंडावर आणि वागण्याबोलण्यांत जो नैसर्गिक रुबाब आणि तेजस्विता असते तीमुळें धारिणीबद्दल पाहिल्याबरोबर आदरभावना उत्पन्न होई. वयानें कीर्ति, शीला यांच्यापेक्षां एकदोन वर्षांनींच ती वडील असून दिसण्यांत बरीक तीसबत्तीस वर्षांची दिसे. अंगापिंडानें ती मध्यम उंचीची आणि जरा भरलेल्या अंगाची असल्यामुळें ती वयानें खरोखरी होती त्यापेक्षां अधिक असावी अशी कल्पना दृढच होत असे.

शिवाय अंगीं अकालीं पोक्तपणा यावा अशाच जबाबदाऱ्या तिच्यावर समजूं लागल्यापासून येऊन पडल्या होत्या.

अलिकडल्या तीन चार पिढ्यांनीं संपत्ति आणि नांवलौकिक मिळवण्यापेक्षां घालवण्यांतच आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केल्यामुळें पणोदें संस्थानांत तांबडा मळा गांवचें इनामीचें उत्पन्न चांगलें असूनही आवांक्याबाहेरली चैन आणि आपल्या फायद्यापुरते गोमाशांप्रमाणें भोंवतालीं जमलेले हांजीखोर मित्र आणि नोकरचाकर यांनीं कर्जाव्याजाच्या हत्तीच्या पायांत, सुंदर कमलासारखी विकसलेली इनामी, पार नष्ट करून टाकली.

धारिणीचे वडील नानासाहेब यांनीं गतवैभवाच्या आठवणीं रसाळपणानें सांगून, हळहळण्यापेक्षां, इनामीकडे जास्त लक्ष घातलें नाहीं. फोलकटी इनामदारीच्या उच्चासनावर बसून पहिलाच बडेजाव राखण्यांत आणि निरुद्योगीपणांत सर्व जन्म त्यांनीं वांया घालवल्यामुळें इनामी आणखीच खचली.

धारिणीची आईदेखील नानासाहेबांच्या पावलावर पाऊल टाकून इनामीची दिखाऊ बडेजावी राखण्यांत नेहेमीं दंग असे.

पण धारिणीचा भाऊ सूर्यदेवराव मात्र अगदीं खरोखरींच सूर्याप्रमाणें तेजस्वी

निघाला. तो शिक्यांच्या चिखलांत बुडलेल्या इनामीच्या कमलाला पुन्हां प्रफुल्लित करणार अशीं चिन्हें लहानपणापासून दिसूं लागलीं होतीं.

पण तो सूर्य अकालींच मृत्यूनें ग्रासून टाकला. एम्. बी. बी एस्. होतांच तो कुणाचेंही न ऐकतां १९१४ सालीं लढाईवर गेला आणि कॅप्टन म्हणून हुद्दा मिळाल्यावर लढाई संपण्यापूर्वी चारच महिने छातींत गोळी लागून मरण पावला.

सूर्यदेव लढाईवर गेला तेव्हां त्याचा मुलगा फक्त सहा महिन्यांचा होता. जगन्नाथ दोन वर्षांचा असतांच मातृविहीन झाला होता. आतां पांचव्या वर्षींच तो पोरका झाला.

नानासाहेब आणि सारजाबाई यांना वेड लागण्याची वेळ आली होती, पण घराण्याचा आतां एकमेव आशातंतु जो जगन्नाथ त्याच्याकडे व आपल्या तीन मुलींकडे बघून ते दिवस कंठीत होते.

या वेळीं लयला आठ वर्षाची आणि धारिणी सहा वर्षाची होती.

वडील मुलगी प्रभावती वीस वर्षांची असून हेंगलवाड संस्थानचे युवराज विक्रमसिंह यांच्याशीं तिचा विवाह झालेला होता. तिला दोन मुलें झालेलीं होती.

प्रभावतीचें लग्न दहाव्या वर्षीच झाल्यामुळें तिला शिक्षणाची दिशाच दिसली नव्हती. तिला ती दाखवावी असेंही कुणाला वाटलें नाहीं.

पण लयला आणि धारिणी या मोठ्या होत चालल्या तेव्हां मात्र गुरुरावांनीं मित्राची मनधरणी केली. नानासाहेबांची आई बायजाबाई या बेताला अगदीं प्रतिकूल होती. पोरींना आपल्या घरीं घालवा असें तिचें म्हणणें होतें. पण सूर्यदेवाच्या वेळेप्रमाणें या वेळींही डॉ. मोऱ्यांच्या प्रयत्नांना यश येऊन लैलीधारिणींच्या शिकण्याची व्यवस्था झाली.

लैलीच्या मराठी चार इयत्ता होतात तोंच गुरुराव नको नको म्हणत असतां तिचा विवाह करून देण्यांत आला. लयला प्रभावतीप्रमाणेंच दिसण्यांत चांगली असल्यामुळें तिला स्थळ उत्तम मिळालें.

पण दोन वर्षांत नवरा मेल्यामुळें ती माघारीं आली.

नंतरचा सर्व इतिहासही असाच शोकमय झाला. पणोद्याचे संस्थानिक वारले, युवराज गादीवर आले, तेव्हां सर्व कारभार बदलला. डॉ. गुरुरावांना आडपडद्यांतून

सूचना देण्यांत आली. आपला मुलगा उदय लवकरच डॉक्टर होईल व आपल्यामागें संस्थानी डॉक्टरी चालवील अशी गुरुरावांना मोठी आशा होती ती भग्न झाली. संस्थानात जुन्या नोकरांना इतका त्रास होऊं लागला कीं एकेकानें हळूंहळूं काढता पाय घेऊन परप्रांतीं बिऱ्हाडबाजलें नेलें. गुरुरावही शक्य तोंवर जमीनजुमला विकून सर्व परिवारासह मुंबईत आले आणि त्यांनीं दवाखाना उघडून पुन्हां मूलारंभ केला. त्यांच्या दोन मुली आपल्या सासरीं नांदत होत्या, आणि धारिणीपेक्षां तीन वर्षांनीं वडील असलेला मुलगा उदय नुकता इंग्रजी तिसरींत गेला होता.

धारिणी या वेळीं दहा वर्षांची असून इंग्रजी पहिलींत शिकत होती. तिला उदयाला करून घ्या म्हणून नानासाहेब गुरुरावांच्या मागें लागले होते. गुरुरावांच्याही मनांत ती गोष्ट होतीच पण ते म्हणत कीं मुलें मोठीं होऊं द्यात, म्हणजे मग लग्न करूं. तोंवर धारिणीलाही शिकूं दे.

पण आपल्या मुलीला सुस्थळीं पडलेली पाहून समाधानाचा सुस्कारा सोडण्या-इतकें भाग्य नानासाहेबांचेंही नव्हतें आणि सारजाबाईचेंही नव्हतें. सारजाबाई काळपुळीच्या विकारानें लवकरच वारल्या आणि धारिणी तेरा वर्षांची होते तों नानासाहेबही वारले.

सूर्यदेव गेल्यापासूनच नानासाहेबांची आई सारखी देवासमोर बसून देवा सोडीव रे आतां म्हणून देवाची करुणा भाकीत असे. पण ती म्हातारी काळावर मात करून अजून टिकून होती. तिचें नांव बायजाबाई.

बायजाबाई आतां मात्र म्हणत, कीं या पोरींना मार्गी लावीन नी मग मी मरेन. मी आधीं मेलें तर माझा मुलगा, माझी सून अन् माझा सूर्या माझ्यावर रागावतील.

बायजाबाईनीं गुरुरावांना बोलावून घेतलें. गुरुरावांनीं असा सल्ला दिला कीं आता सर्वांनीं पणोदें सोडून मुंबईला लहानशी जागा घेऊन रहावें, आणि पणोद्याचें घर येईल त्या भाड्यानें द्यावें. शिर्क्यांनीं आपलें चारचौकी घर सोडल्याखेरीज त्यांचा खर्च कमी होणार नाहीं ही गुरुरावांची खात्री असल्यामुळें त्यांनीं ही सूचना नानासाहेबांनाही वारंवार केली होती पण ती त्यांना पटली नव्हती. परंतु आतां समंजस बायजाबाईंना ती पटली.

मुंबईला चाळींत दोन खोल्यांत गरिबीच्या संसाराला आरंभ करतांना बायजा-

बाईंना अतोनात वाईट वाटलें. सर्वांना अतिशय जड गेले. पण हळूंहळूं सगळ्या गोष्टी अंगवळणीं पडून गेल्या.

या मंडळींनीं मुंबईत रहाण्याच्या या बेताला प्रभावतीच्या नवऱ्यानें म्हणजे आतां संस्थानाधिप झालेल्या हेंगलवाडकरांनीं अत्यंत विरोध केला. त्यांनीं बायजाबाईना या बेतापासून परावृत्त करण्यासाठीं आकांडतांडव केलें. माझ्या सासुरवाडचीं माणसें भिकाऱ्यांसारखीं चाळींत राहिलीं तर आमची अब्रू जाते असा त्यांचा मुद्दा होता. आजपर्यंत त्यांनीं आपल्या सासुरवाडीविषयीं मोठा जिव्हाळा कधींच दाखवला नव्हता पण आतां त्यांनीं इथवर मजल मारली कीं धारिणीशीं माझ्या भावाचें मी लग्न करतों आणि तुम्हां सर्वांचा सांभाळ करतों. हा भाऊ अर्धवट आणि शिवाय दुर्व्यसनी होता.

धारिणीला या गोष्टीची इतकी चीड आली कीं तिनें बहिणीच्या नवऱ्याची तोंडावर चांगली हजेरी घेतली. आणि बायजाबाईनींही जांवयाकडे भीक मागण्याइतकं अजून सत्त्व गमावलेलं नाहीं म्हणून स्पष्ट सांगून टाकलें.

यावर माझ्या बायकोला तुम्हां कोणाचं तोंड याउपर दाखवणार नाहीं अशी निर्वाणीची भाषा बोलून हेंगलवाडकर संस्थानाधिपति विक्रमसिंह तणतणत शिर्क्यांच्या मुंबईच्या चाळींतल्या बिऱ्हाडांतून बाहेर पडले.

लयलेनें शिकावें म्हणून गुरुरावांनीं फार प्रयत्न केले पण ती त्या बाबतींत उदासीन राहिली. आजीनीं तिला भर दिली. लैली आजीना घरकामांत मदत करीत वेळ काढीत असे.

धारिणी शाळेंत जाऊं लागली. तेथेंच शीला व कीर्ति यांची धारिणीशीं ओळख होऊन तिचें गाढ मैत्रींत रूपांतर झालें.

तिघी मैत्रिणी मॅट्रिक झाल्या. उदय ग्रँट मेडिकल कॉलेजांत गेला.

धारिणीउदयांचें आतां लग्न करून टाकावें असें बायजाबाईनीं सुचवलें आणि गुरुरावांनाही ती सूचना मान्य झाली. पण धारिणीला आतां समजूं लागलें होतें. आपलें कर्तव्य आणि आपल्या उच्च घराण्यासंबंधीं योग्य तो अभिमान प्रज्वलित असल्याकारणानें तिनें त्या बेताला संमति दिली नाहीं. तिनें उलट गुरुरावांना सांगितलें कीं या सर्व मंडळींची जबाबदारी आतां माझ्यावर आहे. ती पूर्णपणें

पार पाडीपर्यंत मला लग्न करणें अयोग्य वाटतें. पण मी तुम्हांला बांधून ठेवीत नाहीं. तुम्ही योग्य मुलगी बघून उदयाचें लग्न करून द्या."

उदय दोन वर्षें धारिणीकरतां थांबला. नंतर त्यानें अनुरूप वधूशीं विवाह करून घेतला.

धारिणीनें स्वतःच जरी ही आपत्ति आपणांवर ओढून घेतली होती तरी तिला प्रेमभंगाचें असह्य दुःख आंतल्या आंत जाळणाऱ्या तापाप्रमाणें सहन करावें लागलें. तिच्या मैत्रिणींना मात्र तिचें अंतस्थ दुःख जाणवलें. कारण धारिणी या घटनेनंतर अत्यंत गंभीर बनली. कीर्ति आणि शीला उदयाच्या लग्नापूर्वी उदयावरून धारिणीची कितीतरी चेष्टा करीत असत. आतां धारिणीचें लग्न हा विषयच संभाषणांतून त्यांनीं हद्दपार केला. धारिणी आतां अभ्यासांत सर्व बुद्धि व शक्ति खर्च करूं लागल्यामुळें सर्व वैद्यकीय परीक्षा अतिशय मानासन्मानानें उत्तीर्ण झाली.

धारिणीनें उदयाशीं लग्न करण्याचें नाकारल्याबद्दल गुरुरावांना फार निराशा वाटली, परंतु त्यांना तिच्या हेतूबद्दल खरोखरीं आदर वाटला. ती एम्. बी; बी. एस. होतांच त्यांनीं तिला आपल्या उत्तम भरभराटींत चाललेल्या दवाखान्यांत चांगला पगार देऊन मोठ्या आग्रहानें नेमून घेतली.

आग्रह करण्याचें कारण असें कीं गुरुरावांना आतां फारसें काम होत नसल्यामुळें उदयावरच दवाखान्याची बहुतेक जबाबदारी येऊन पडली होती. पण अजून लोकांना गुरुरावांच्या अनुभविक वैद्यकीय ज्ञानाबद्दल विश्वास वाटत असल्यामुळें ते मधून मधून थोडा वेळ दवाखान्यांत येऊन बसत आणि सल्लामसलत देत.

म्हणजे वास्तविक धारिणीला उदयाच्या हाताखालीं, त्याच्या नित्य सहवासांत काम करावें लागणार होतें, म्हणून धारिणीला जरा पेंच पडल्याप्रमाणें झालें होतें. आणि शिवाय उदयाची पत्नी चार महिन्यांपूर्वीच वारली होती. म्हणूनही तिला कठीण वाटत होतें.

पण गुरुरावांनीं तिच्या शंकाकुशंका दूर सारल्या आणि उदयानेंही त्यांना मनापासून दुजोरा दिल्यामुळें धारिणीचें मन अनुकूल झालें.

शिवाय धारिणीची घरची परिस्थिती या वेळीं इतकी बिघडलेली होती कीं धारिणीचा स्वाभिमान, झुलणाऱ्या नागाच्या फडेवर काठी हाणून निर्जीव केल्याप्रमाणें झाला असून त्याची जणूं वळवळ तेवढी शिल्लक होती.

पाऊणशे वर्षे उलटलेल्या बायजाबाईंना काळानें वांकवलेंच होतें, दुःखानें त्यांच्या पाठीवर भार घातलाच होता, पण आतां त्यांच्या लाडक्या पणतूनें जगन्नाथानेंही त्यांची मान लाजेनें खालीं नेण्याचा जणूं पण केला होता. बायजाबाई घटकेघटकेला देवीसमोर बसून बोलत, " आई, किती आतां अंत पहातेस ? जगूला सद्बुद्धि दे ग मायमाउली. "

जगन्नाथानें मात्र आपली बुद्धि गहाण टाकली होती.

बुद्धीनें जगन्नाथ फार हुषार होता. तो शिकून शिर्क्यांचें नांव वैभवाला चढवील अशी सर्वांना मोठी आशा वाटत होती पण तो वयांत येत चालला तसतसा बापाचे गुण न उचलतां आजाचे गुण दाखवूं लागला. त्याला कुसंगति मिळाली. चैनीसाठीं पैसे लागले कीं तो धारिणी आणि बायजाबाई यांना छळून पैसे काढी.

तरी तो कसाबसा कॉलेजपर्यंत पोंचला. तेथेंच त्याची व पणोद्याच्या युवराजांची मैत्री जमली. युवराजांच्या पैशावर मोटारी, खाद्यपेयें व चैनी भागूं लागल्यामुळें त्याला घरच्या मंडळींची मुळीं कदरच राहिली नाहीं. बायजाबाई आपल्या पणतूला कांहीं उपदेश करूं लागल्या तर तो उद्धटपणानं म्हणे, " धारिणीआत्यानं नाहीं कां चांभारणीशीं मैत्री केली ? तिच्यापेक्षां मी पुष्कळच बरा. त्या चांभारणीच्या घरीं ही क्रिश्चनच्या हातचं हवं ते खाते माहीत आहे तुला आजी ? " बायजाबाईंना जगन्नाथही आजीच म्हणे.

मग आजी, कुळच शापलेलं तिथं कशीं कुणाला सद्बुद्धि होणार ? चांगलं उदयाशीं लग्न केलं असतंन् म्हणणे नसती राज्यावर बसली ? पण शाप आहेना ? अशी बडबड करीत व्याकुळ होत.

युवराज कसे बसे बी. ए. झाले. पण जगन्नाथ नापास झाला. तरी त्याला त्याबद्दल पर्वा वाटली नाहीं. कारण युवराज संस्थानांत परत गेले तेव्हां त्यांनीं जगन्नाथालाही आपल्याबरोबर नेलें. जगन्नाथ शिर्क्यांच्या वाड्यांत पुन्हां इतमामासह राहूं लागला. जगन्नाथ युवराजांचा नर्मसचिव बनला. सगळ्या पंचक्रोशींत त्याला तळतळाट मिळूं लागले आणि ते कर्णोपकर्णी मुंबईपर्यंत येऊन पोंचले. पण पूर्वींचें इनामी उत्पन्न व भाडें मात्र मुंबईपर्यंत येईनासें झालें.

आतां दोनअडीच वर्षें जगन्नाथ पणोद्याला असून धारिणी उदयाबरोबर दवाखाना चालवीत होती. तिच्यावांचून उदयाचें चालेनासें झालें होतें. आतां गुरुराव

क्वचितच दवाखान्यांत येत पण संवयीमुळें धारिणीला आतां उदयाबरोबर काम करतांना संकोच वाटेनासा झाला होता.

पण उदयाशीं धारिणीचा कितीही सहवास असला तरी घरीं कांहीं अडचणी आल्या, कांहीं सल्लामसलत हवी असली म्हणजे मात्र ती गुरुरावांच्याकडे धांव घेई, त्यांच्याजवळ मन मोकळें करून सर्व सांगे आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मोठ्या भक्तिभावानें ती आचरी.

आतांही तिनें ठरवलें की लैलीबद्दल गुरुरावांना विचारावें.

सुखाविषयीं निराश झालेली, सौख्यप्रवृत्ति मनांत उसळत असून त्यांना दाबून ठेऊन आयुष्य कंठणारी लैली प्रेमपाशांत गुंतली गेली होती.

त्या प्रेमपाशांनीं लैलीचा गळा कायमचा करकचून आंवळण्याची तयारी केली होती !

सदैव म्लानमुख रहाणारी लैली या वर्षांत किती हंसरी बोलकी बनली आहे आणि तिचें कोमेजत चाललेलें सौंदर्य किती बहरून आलें आहे याबद्दल धारिणीला साश्चर्य आनंद वाटूं लागला होता. त्याचप्रमाणें सर्व गोष्टींत विरक्ती दाखवणारी लैली आतां इंग्रजी शिकूं लागली होती आणि विणकामांत मन घालूं लागली होती हें पाहूनही धारिणीला फार समाधान वाटूं लागलें होतें.

लैलीला नवचैतन्य देणारा सहस्त्ररश्मि म्हणजे शेजारल्या बंगलींत रहाणारे नुकतेच विलायतेंतून आलेले बॅरिस्टर धनंजय हें लवकरच सर्वांना कळून चुकलें. मुळीं धनंजयानें लैलीला लग्नाकरतां मागणीच घातली. आजीच्या भीतीनें लैली कबूल होईना. पण धनंजयानें तिचें मन वळवलें. धनंजय लैलीवर जितकें एकनिष्ठ प्रेम करीत होता तितकीच लैलीही त्याच्यावर प्रेम करीत होती.

धारिणीला ही गोष्ट धनंजयानें कळवतांच तिचा आनंद गगनांत मावेना. जुन्या संस्कारांत बुडून निघालेल्या आजींचीही लैलीच्या भावी सौख्यमय आयुष्याच्या मनोरम शब्दचित्रांनीं गुरुरावांनीं समजूत पाडली.

आणि प्रभावतीचे पतिराज विक्रमसिंह हेंगलवाडकर यांना ही बातमी कळतांच इतक्या वर्षांत कधीं चिठीसुद्धां न पाठवणारे आणि पत्नीला मुंबईच्या माहेराला पायधूळही झाडूं न देणारे (नाहीं म्हणायला दोन वर्षांत प्रभावतीदेवीना त्यांनीं पणोद्याला भाच्याकडे भेटावयाला पाठवलें होतें.) ते पुन्हां खडबडून जागे झाले.

त्यांनीं लैलीच्या नांवावर एक जाड थोरलें पाकीट पाठवलें. त्यांत त्यांनीं लैलीला दुर्वर्तनी म्हणून हवेंतसें अद्वातद्वां लिहून जर आपण पुनर्विवाह केला, तर आमच्या घराण्याला कलंक लागेल त्याकरतां आम्ही प्रभावतीदेवींचें नांव सोडून देऊं आणि पुन्हां लग्न करूं अशी धमकी दिली होती. प्रभावतीदेवींच्या पोटीं चार मुलें झालेलीं असलीं तरी आम्ही अशा परिस्थितींत त्यांना टाकण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं, त्यांना त्यांच्या मुलांचें मुखावलोकनदेखील जन्मभर घडूं देणार नाहीं असें आणखी वर लिहिलें होतें. त्याबरोबर प्रभावतीदेवीनींही माझ्या संसाराला आग लावूं नको म्हणून बहिणीला कळवळ्याची प्रार्थना केली होती.

लयलेनें पुनर्विवाहाचा बेत सोडून दिला. धनंजयाला धक्का बसला. चार महिने तो लैलीशीं बोलला नाहीं. लयलेला इकडे आड अन् तिकडे विहीर होऊन गेलें.

याही गोष्टीला सहासात महिने झाले होते, आणि आतां लयलाधनंजय पुन्हां भेटत असले पाहिजेत, अशी धारिणीला जबरदस्त भीति वाटूं लागली होती.

धारिणीनें आपले मेहुणे हेंगलवाडकर यांना नुकतेंच पुन्हां एक पत्र पाठवून लयलाधनंजयांच्या बाबतींत निवळ रूढीकडे न पहातां लयलेच्या सुखाकरतां विवेकदृष्टीनें संमति देण्याबद्दल परोपरीनें विनवणी केली होती.

तें पत्र गेल्यापासून अलीकडे पंधरा दिवसांत लयला पुष्कळच आशेला आली होती. पण त्या आशेचा सर्वस्वीं भंग करणारें पत्र पुन्हां आज संध्याकाळीं येऊन थडकलें. हेंगलवाडकरांनीं आपल्या पहिल्या पत्राची पुनरावृत्ति आणखीच असभ्य शब्दांत केली होती. पत्र वाचतांच लयलेचें उतरलेलें तोंड, तिच्या तोंडून निघालेला अर्धस्फुट आर्तोद्गार आणि अत्यंत असहायपणें भिंतीला टेकलेली मान, आढ्याकडे सुन्नपणानें बघणारे डोळे व मधूनच भेदरलेल्या हरिणीप्रमाणें भिरभिरणारी तिची नजर पाहून धारिणीला आंतडी तोडल्याप्रमाणें होऊन करूं तरी काय असें वाटूं लागल होतें.

अनंत दुःखें पचवलेल्या आजीनीं उठून कसेंबसें जेवण तयार केलें. परंतु जेवलें नाहीं कोणीच.

याच काळजीनें चूर होऊन गिरगांवांतील चाळींतल्या फ्लॅटमधील आपल्या खोलींतील पलंगावर धारिणी तळमळत पडली होती. चाळींतल्या चिरपरिचित

धडपडीच्या पार्श्वसंगीतामुळें तिचे विचार आणखीआणखीच वादळी, अस्ताव्यस्त स्वरूपाचे बनत चालले.

आणि सोसाट्याच्या वादळांत सांपडलेला मनुष्य शेवटीं वाट दिसेनाशी होऊन, जीव घाबरून, गुदमरून अगतिकपणें धरणीवर अंग टाकतो आणि अचेतन होऊन पडतो त्याचप्रमाणें धारिणी सुन्न होऊन पडली. त्या अवस्थेला झोप म्हणण्यापेक्षां ग्लानीच म्हटलेलें अधिक शोभलें असतें.

# — ११ —

धारिणीला वाटलें—

पण एकच एक अशी कल्पना तिच्या मनांत स्थिर झालीच नाहीं. एका क्षणांत कितीतरी कल्पना झोंपेंतून अकल्पितपणें जाग्या होत असलेल्या तिच्या मेंदूला स्पर्शून गेल्या. वळिवाच्या पावसाचा एक थेंब तापलेल्या जमिनीवर टपकन् पडून आपलें त्याकडे लक्ष जातें तितक्यांत अंतराअंतरांवर अनेक मोठमोठाले थेंब पडलेले दिसावे, तशीच धारिणीची अवस्था झाली.

आपण जाग्या कां झालों हें तिला कळेना. आपण कुठें आहोंत याचाही क्षणभर तिला बोध होईना. आपल्या कानावर कांहीं अस्पष्ट हालचाल पडली कीं कांहीं शब्द पडला कीं नुसत्या कसल्या तरी स्वप्नांतील भीतीनें आपल्याला अचानक जाग आणली हेंही तिच्या लक्षांत येईना. परंतु ती अतिशय भेदरून जागी झाली होती हें मात्र खरें. तिच्या अंगावर शहारे उठले असून तिला घाम आला होता. अंग गारठून कांहीं हालचाल करण्याची तिला ताकद वाटत नव्हती. तोंडांतून शब्द काढण्यालाच काय पण नीट श्वासोच्छ्वास करण्याला किंवा डोळे उघडून पहाण्यालाही तिला क्षणमात्र धीर होईना.

पण ही धारिणीची अवस्था क्षणकालच टिकली. पूर्ण जाग येऊन तिनें डोळे उघडून खोलींतल्या चंद्रप्रकाशानें अस्पष्ट उजळलेल्या खोलींत सर्वत्र नजर फिरवली. टेबलाजवळ एक मनुष्याकृति कांहीं करीत असल्याचें बघून तिला रक्त गोंठल्याप्रमाणें होऊन विस्मय वाटला.

चाळींत यावेळीं अगदीं निःशब्दता होती. समोरच्या हॅाटेलांतून कपबशा विसळण्याचा किंवा टेबलेंखुर्च्या मांडण्यापुसण्याचा आवाज येत नहव्ता. रस्त्यावरही ट्रॅम, टॅक्सीज व गाडीवर माल विकणाऱ्यांची रहदारी सुरू झाली नव्हती. त्यावरून बहुधा मध्यरात्र उलटून दोनतीनाचा सुमार असावा.

यावेळीं आपल्या खोलींत आपल्या टेबलापाशीं कोण येऊन काय करीत आहे हें गूढ धारिणीला उकलेना.

डोळे ताणताणून ती त्या व्यक्तीच्या हालचालीकडे पाहूं लागली. तितक्यांत चंद्रप्रकाशांत कांहीं चमकलें.

धारिणीच्या लक्षांत आलें कीं तो चमकणारा जिन्नस म्हणजे लयलेच्या हातांतली काचेची नळी होती. लयलेनें ती नळी टेबलावरील कातडी पिशवींतून काढली असली पाहिजे आणि त्या नळींत—

त्या नळींत—

"लैले, काय करतेस तूं ?" धरिणी ताडकन् पलंगावरून उडी मारून उठली आणि टेबलाजवळ आली.

भेदरून लयलेच्या हातांतली कांचेची नळी फरशीवर पडली आणि फुटलेल्या नळींतून मॉर्फियाच्या वड्या इकडेतिकडे विखरून पडल्या.

कंठ्यांतून ओघळलेल्या मौल्यवान् मोत्यांप्रमाणें त्या सांडलेल्या वड्यांकडे आर्तता-पूर्ण अभिलाषानें पाहून, एक दुःखोद्गार काढून, लयला गुडघे टेकून बसून खालीं वांकली, आणि घाईघाईनें त्या वड्या गोळा करूं लागली.

धारिणी पण चटकन् खालीं गुडघ्यांवर बसली. तिनें लयलेचा वड्या धरलेला हात आपल्या हातानें जमिनीवर गच्च दाबून धरला आणि तीक्ष्ण दृष्टिपात करीत कठोरपणानें विचारलें, "लैले, काय करते आहेस तूं हें ?"

वड्या दाबून धरलेल्या हातांत जणुं सुखसर्वस्व सांठून राहिलें आहे आणि तें आपल्याला मिळत नाहीं अशा आशाळभूतपणें आपल्या पालथ्या पंज्याकडे लयला पाहूं लागली. धारिणीचा कठोर प्रश्न ऐकतांच तिला कसेसेंच झालें. वड्यांवरला तिचा दाब सैल झाला. धारिणीनेंही आपला दाब कमी केला तेव्हां लयलेनें आपला हात काढून घेतला व दोन्हीं हातांचीं बोटें एकमेकांत गुंतवून घट्ट दाबीत एक निश्वास टाकून ती हताशपणें म्हणाली, "सर्व घराण्याची अब्रू आतां या वड्यांतच आहे. धारिणी, मी या जगाचा निरोप घ्यावा हीच सर्वांत शहाणपणाची गोष्ट होणार आहे."

विमनस्कपणें धारिणी पडलेल्या एकेका वडीकडे आळीपाळीनें टक लावून पाहूं लागली. जणूं लयलेच्या म्हणण्याचें प्रत्यंतर आपल्याला मिळतें कीं काय हेंच ती बघत होती.

लयलेला पुन्हां मोह पडला. ती भराभर वड्या गोळा करूं लागली.

पण धारिणीनें तिचा हात सौम्यपणेंच पण बलपूर्वक आपल्या हातीं धरला आणि आपण उठून तिनें लयलेला दोन्ही हात धरून वर उठवलें. नंतर आपल्या शेजारीं लयलेला पलंगावर बसवून धारिणीनें दुःखभरानें पण जरा भीतभीतच प्रश्न केला, " लैलाताई, एकूण मला अलिकडे भयंकर संशय येत होता तो खराच तर. "

लयलेच्या हृदयांतून एक अर्धस्फुट हुंदका बाहेर उमटला. अंधार असतांनासुद्धां लज्जेनें तोंड वळवून शुष्क स्वरांत ती म्हणाली, " होय. आपल्या पवित्र घराण्याला माझ्या उच्छृंखल वर्तनानं मी काळोखी लावली. दुःखानं खचलेली माझी म्हातारी आजी. प्राणापलीकडे तिनं मला जपलं, मी ही अशी म्हणून तुझ्यापेक्षां तिनं माझ्यावर प्रेम केलं, तिला माझं हें पाप कळलं तर मरणापेक्षां दुःख होईल. धारिणी, उदयासारखा शिकलेला नी राजबिंडा नवरा मिळत असतां, आमचं कसं होईल या काळजीनं तूं त्याला झिडकारलंस, आणि आमच्या सुखांत सुख मानून तूं आयुष्य काढते आहेस. मी त्याबद्दल तुला काय दिलं तर बेअब्रू. माझं पाप थोड्या दिवसांत चव्हाट्यावर आलं तर तुझ्यासारख्या निष्कलंक मुलीला लाजेनं खालीं मान घालावी लागेल. धारिणी, तुझ्याशेजारीं बसण्याची सुद्धां माझी योग्यता नाहीं ग. " लयला उठून खरोखरींच खालीं बसली आणि धारिणीचीं पाउलें आपल्या दोन्हीं हातांत धरून अगतिकपणें विनवणी करीत म्हणाली, " धारिणी—नव्हे मी तुला आई म्हणून हांक मारून पदर पसरतें कीं मला मरणाची भिक्षा घाल. मला एकादं जालीम विष दे. माझ्या अभागिनीच्या मरणाआड तूं येऊं नको. आई, मला येवढी शेवटली भिक्षा घाल. "

धारिणी पाय सोडवून घेण्याला पहात होती पण लयलेनें वज्र मिठीनें ते धरले होते. लयलेच्या कळवळून निघालेल्या उद्गारांनीं धारिणीचें आतांपर्यंतचें धैर्यानें सहन केलेलें मूक दुःख अनावर झालें. तिचे अश्रु लयलेच्या मस्तकावर ओघळूं लागले आणि लयलेच्या ऊष्णाश्रूंनीं धारिणीच्या पावलावर अभिषेक चालवला.

धारिणीला ते ऊष्णाश्रू सहन होईनात. ती तशीच उठून लयलेशेजारीं खालीं बसली आणि तिनें लैलीच्या गळ्याला मिठी मारली. लयलेनेंही तिला जवळ ओढलें. नंतर कांहीं क्षण दोघी बहिणी स्फुंदूनस्फुंदून रडल्या. आजी जागी होईल हा विचारही त्यांच्या मनांत आला नाहीं.

पण सुदैवानें आजी जाग्या झाल्या नाहींत. त्यांना कितीतरी उशिरां झोप

लागली होती. या वेळीं त्या पहिल्या गाढ झोपेंत होत्या. आणि शिवाय त्यांना वयोपरत्वें बरेंच कमी ऐकूं येत असे.

रडण्याचा भर जरा ओसरल्यावर धारिणीनें विचारलें, "लैला, पुन्हां नाहीं ना तूं असा वेडेपणाचा विचार मनांत आणणार? सांग ना. नाहीं ना तूं असा प्रयत्न पुन्हां करणार?"

अश्रुपातामुळें लैलीच्या अंतःकरणांतलें भेसूर चित्र जणूं पुसटल्यासारखें झालें होतें. आतां तें पुन्हां तिच्या अंतश्चक्षूंना स्पष्टपणें दिसून तिला भेवडावूं लागलें. शहारल्याप्रमाणें करून कंपित, हताश स्वरांत तिनें उलट प्रश्न केला,

"धारिणी, तूंच सांग मला मी या अशा परिस्थितींत काय करूं? लग्न करून प्रभाताईच्या संसारावर तर निखारा नाहीं ना ठेवायचा? आणि मी तिला दुःखांत लोटून मला सुख कधीं तरी लागेल कां? तूंच सांग धारिणी. माझी, आपल्या घराण्याची अब्रू रक्षण करण्याचा कांहींतरी मार्ग आहे कां? माझ्या पापाचं प्रायश्चित्त—"

धारिणीनें एकदम लयलेच्या तोंडावर हात दिला. प्रथम ती मोठ्या विचारांत पडली होती पण लयलेचें शेवटलें वाक्य ऐकतांच ती उसळून तिरस्कारानें म्हणाली, "प्रायश्चित्त! लैला, या पापाचं प्रायश्चित्त त्या आपल्या परमपूज्य, हृदयशून्य भाऊजींना दिलं पाहिजे. आमच्या चांगल्यासाठीं एकही गोष्ट आजवर त्यांनीं केलेली नाहीं." धारिणीचा आवाज संतापानें चढत चालला होता. ती उठून पलंगावर बसली. लयलाही तिच्याशेजारीं बसून तिचा हात हातीं धरून तिला आजी उठेल म्हणून खुणावूं लागली. पण धारिणी आवेगभरानें बोलतच होती. "इतक्या संकटांतून आम्ही तिघी बायकाबायकानीं वाट काढली. भाऊजींचा काडीइतका उपयोग आम्हांला झाला नाहीं. गुरुरावांची मदत नसती तर आम्ही काय केलं असतं?" एकदम धारिणी थांबली. क्षणभर ती आवंकली. नंतर मनाच्या अनिश्चित स्थितींत तिनें हांक मारली. "लैला."

धारिणीच्या मनांत कांहीं नवीनच कल्पना आली आहे आणि ती आपल्याला सांगूं कीं नको याबद्दल तिला प्रश्न पडला आहे हें लयलेच्या लक्षांत आलें. तिनें उत्सुकतेनें विचारलें, "काय धारिणी?"

" लैला, गुरुरावांची आपल्याला केवढी तरी मदत झाली आहे. ते आपल्याला पितृतुल्य झाले आहेत. त्यांचं आपल्यावर स्वतःच्या मुलींप्रमाणें प्रेम आहे. मग आतांची ही अडचण त्यांना कळवली तर ते खात्रीनं आपल्याला कांहीं चांगला मार्ग दाखवितील. नाहीं तुला असं वाटत ? "

लयलेनें तिला पुढें बोलूंच दिलें नाहीं. व्यथितचित्त होऊन ती काकुळतीनें म्हणाली, " नको, नको धारिणी, कृपा करून त्यांना ही गोष्ट सांगूं नको. त्यांना सारं कळलं तर मला लाजेनं मेल्यापेक्षां मेल्यासारखं होईल. ते आपल्यावर इतकं प्रेम करतात म्हणूनच त्यांना ही गोष्ट कळूं नयेसं मला वाटतं. आजीलासुद्धां कांहीं कळतां कामा नये. धारिणी, तुलासुद्धां कांहीं समजावं अशी माझी इच्छा नव्हती. म्हणूनच तुम्हां सर्वांना संशय येण्यापूर्वीच जगांतून काळं करण्याचा माझा बेत होता. खरंच धारिणी, दे ना एखादं विष मला, तुम्हां सर्वांचा मार्ग त्यामुळं अगदीं मोकळा होऊन जाईल. किती सोपा उपाय आहे तो. " लज्जामरणापेक्षां प्रत्यक्ष मृत्यू अधिक सुखद वाटल्याप्रमाणें लयला बोलत होती.

" सोपा उपाय ? लैला ? " धारिणी निषेधपूर्वक बोलली. " लैला, तो विचार तूं मनांतून अगदीं काढून टाकला पाहिजे. "

" मग काय करायचं धारिणी ? "

" माझ्यावर विश्वास आहे ना तुझा ? मग या संकटांतून मी तुझी नीटपणानें सुटका करीन ही अगदीं खात्री ठेव. "

" पण गुरुरावांना नाहीं ना तूं कांहीं सांगणार ? "

" नाहीं सांगणार. कारण मला तुझं म्हणणं पटतं. लैला, "—क्षणभर थांबून धारिणीनें हलक्या स्वरांत विचारलें, " किती दिवस झाले असावेसं वाटतं तुला ? "

लाजेनं खालीं मान घालून लयलेनें अर्धस्फुट आवाजांत सांगितलें, " तीन. "

" तीन ? " धारिणीनें आश्चर्यानें विचारलें, " अन् तुझ्या लक्षांत ही गोष्ट केव्हां आली ? "

" दोन महिन्यांपूर्वी. "

" अरेरे, लैला, त्याच वेळीं तूं मला कां बरं सर्व सांगितलं नाहींस ? आतां आपल्या आवांक्याबाहेर गेलं ग ? लैला, केवढी चूक केलीस तूं. मागेंच सांगितलं असतंस—

" तरी कांहीं झालं नसतं. मी एका डॉक्टरणीकडून सर्व इलाज केले पण कांहीं उपयोग झाला नाहीं." लयलेनें निराशेच्या भरांत सांगितलें.

" कोण डॉक्टरीण ? "

लयलेनें एका डॉक्टरणीचें नांव सांगितलें.

धारिणी तें ऐकून हताशपणें म्हणाली, " मग तिच्यापुढें मी तरी आणखी काय केलं असतं ! नशीब आपलं दुसरं काय ? मूल हवं असतं त्यांना गर्भरक्षणासाठीं हवीं तितकीं औषधं इंजेक्शनं देऊनही केव्हांकेव्हां इलाज चालत नाहीं. आणि नको असतांना उलट इलाज निरुपयोगी ठरतात. कसलं आमचं वैद्यशास्त्र !—पण वैद्यशास्त्राला नांवं ठेऊन काय आतां होणार ? आपल्याला ताबडतोब उपाय शोधला पाहिजे." धारिणी किंचित्काल विचार करण्यासाठीं थांबली. नंतर तिनें प्रश्न केला, " लैला, धनंजयांना माहीत आहे ही गोष्ट ? "

" हो "

" मग काय वाटतं त्यांना ? अन् लैला, माझ्या बॅगींतून विष चोरण्याचा इलाज त्यांनींच सुचवला कां तुला ? "

" नको. धारिणी, त्यांच्याबद्दल अशी रागावून बोलूं नको. ते इतके हीन मनोवृत्तीचे नाहींत हें माझ्याइतकंच तुलाही पूर्णपणें माहीत आहे. ते मला म्हणताहेत, कीं आपण ताबडतोब लग्न करूं. चार मुलें झालेल्या बायकोला हेंगलवाडकर कशाचे टाकतात असं त्यांना वाटतं आहे. मी त्यांना सांगितलं कीं, भाऊजींचा स्वभाव तुम्हांला माहीत नाहीं. "

धारिणी कांहीं वेळ निःशब्द बसून राहिली. लयलाही कष्टी होऊन जखमी पक्षानें स्वतःलाच चोंच मारून घायाळ करून घ्यावें, त्याप्रमाणें मनांतल्या मनांत स्वतःला दोष लावून घेत होती. आपणच निर्माण केलेल्या पेचप्रसंगांतून आपली कोणत्या उपायानें सुटका करून घ्यावी तें कांहीं केल्या न सुचल्यामुळें गांधिलमाशानीं पुन्हां पुन्हां डंख मारल्याप्रमाणें तिचें काळीज वेदनाव्याकुळ झालें होतें.

चार वाजले असल्यानें खोलींत अंधुक उजेड आला होता. चाळ हळूं हळूं जागी होऊन दारांची उघडझांप, पाणी भरतांना होणारा भांड्यांचा खडखडाट, स्टोव्हचा

आवाज, आणि दूधवाल्यांजवळ चाललेली बोलाचाली स्पष्ट स्वरूपांत नव्हे पण गडबडीच्या रूपानें ऐकूं येऊं लागली होती.

रस्त्यावर ट्रॅमबसेसचा धडधडाट सुरू झाला होता. माणसांची रहदारी विशेष सुरू झाली नसली तरी दुकानांत व रस्त्यावर झाडलोट चालू होती. हॉटेलांतील मोठाल्या भट्टया पेटूं लागल्या होत्या.

धारिणी आपल्याच विचारांत चूर झाली होती. थोड्या वेळानें ती म्हणाली, " लैला, याला आतां एकच उपाय आहे. तूं कुठेंतरी परगांवीं हवापालट करण्याच्या निमित्तानं म्हणून जाऊन राह्यलं पाहिजे. इतक्यांत नको. कारण तूं इतके दिवस कुठें होतीस म्हणून लोकांना शंका येऊं लागेल. निभतील तितके दिवस तूं स्वस्थ मनानं इथेंच रहा. मग इथं राहून भागणार नाहींसं वाटलं कीं ताबडतोब तूं परगांवीं रहायला तयार झालं पाहिजे. अन् तुला एकटीलाच बहुधा रहावं लागेल. त्यालाही तुझी तयारी असली पाहिजे."

लयला कांहींच बोलली नाहीं. तेव्हां धारिणीनें पुन्हां तिला म्हटलें, " काय, असंच करायला हवं मग? अं?"

तेव्हां लयला एक निश्वास सोडून विरक्तपणें म्हणाली, " धारिणी, कशाला या सगळ्या यातायाती? समज मी परगांवीं राहिलें. कुणाला कांहीं संशय आला नाहीं. तरी पुढें काय करणार? मुलाची व्यवस्था काय करणार? त्याला सर्व आयुष्य लाजिरवाणं कंठायला लावायचं कां? त्यापेक्षां आतांच माझ्या अन् त्याच्याही आयुष्याचा शेवट—"

" लैला, तुला शपथ आहे माझ्या गळ्याची तूं पुन्हां असली गोष्ट मनांत आणलीस तर."

" बरं नाहीं आणीत. पण मी काय म्हटलं त्याबद्दल काय करणार?"

" तें सगळं मी व्यवस्थित करीन. तूं कांहीं काळजी करूं नको त्यासंबंधीं. फक्त तूं आपल्या प्रकृतीची नीट काळजी घे. जितके जास्त दिवस तूं इथें रहाशील तितकं चांगलं हें लक्षांत ठेव."

लयलेनें हा उपाय पूर्ण पटत नसतांही मान हलवून संमति दिली. धारिणी तिला एकाद्या देवतेप्रमाणें वाटून ती अत्यादरानें म्हणाली, " धारिणी,

तूं माझ्यापेक्षां लहान पण किती शहाणी अन् धीराची आहेस ग. मी पण तुझ्यासारखी शिकले असते तर कामकाजांत मनाला विरंगुळा वाटला असता."

धारिती हंसली. मनांतून तिला वाटलें, "खरोखर कसल्या आपल्या रूढी नि धर्मकल्पना. त्यांत माणुसकी मुळीं सांपडतच नाहीं. विधवेल पवित्र शिक्षण घेण्याचीसुद्धां पूर्वी चोरी होती. म्हणूनच लैली शिकली नाहीं."

आजी अंथरुणांत खोकूं लागल्या होत्या. लवकरच उठून त्या भूपाळ्या म्हणत देवापुढें बसतील हें लयलेला आणि धारिणीलाही माहीत होतें. त्या दोघींचा नेत्रसंकेत झाला. धारिणीनें एकवार लयलेचा उजवा हात दाबून धरून जणूं धीर दिला. लयलेनेंही विश्वासदर्शक स्मित केलें. नंतर ती हलकेंच आपल्या अंथरुणावर जाऊन पडली. आणखी अर्ध्यापाऊण तासानें सर्वांची उठण्याची वेळच होणार होती.

धारिणीनें आपला बिछाना साफसूफ केला. वेणीफणी करून जरा वाचीत बसावें आणि मग स्नान करून दवाखान्यांत जावें असा विचार करून तिनें कंगवा काढण्यासाठीं कपाट उघडलें, तों वरल्याच कप्यांत तिला जरीपातळाशेजारीं ठेवलेली मखमाली मंजूषा दिसली. माणिक मोतीं जडवलेला कर्णफुलांचा जोड होता त्यांत. सर्ववैभवसंपन्न कीर्तीला लग्नांत काय भेट द्यावी याबद्दल बराच विचार करून कीर्तीला निरनिराळ्या कर्णफुलांची आवड असल्याचें लक्षांत घेऊन धारिणीनें तो जोड आदल्या दिवशींच विकत आणला होता.

ती पेटी पहातांच धारिणीला आठवलें कीं आज आपल्या कीर्तीचें लग्न आहे. त्याकरतां आपण रजा घेतलेली असल्यामुळें आपल्याला आज दवाखान्यांत जावयाचें नाहीं.

आणि कीर्तीकडे लवकरच आपण गेलें पाहिजे. कारण कीर्तीनें उजाडतच येण्याबद्दल बजावून ठेवलें होतें.

त्या आनंदसमारंभांत भाग घेण्याच्या बाबतींत धारिणीला जरा अनिच्छा उत्पन्न झाली. त्या समारंभांत मिसळून आनंद उपभोगण्याला आपलें मन तयार नाहींसें तिला वाटलें. 'क्वचिद्वीणावाद्यम् क्वचिदपि च हाहेतिरुदितम्' या सुभाषिताची आठवण होऊन तिला खिन्न हंसूं आलें.

स्टोव्ह विझवून लयला चहा कपांत गाळीत होती. तिला धारिणीनें विचारलें, "लैला, तूं येशील लग्नाला?"

" कोण मी ? " लयलेनें आश्चर्यानें विचारलें.

" हो. त्याला काय झालं ? रजिस्टर लग्न आहे. नी कीर्तीला फार आनंद होईल तूं आलीस तर. काल तिनं मला पुन्हां सांगितलं तुला घेऊन यायला ? "

" छेः छेः मी कशाची येते ! मागें एकवेळ आलें असतें. पण— "

येवढेंच बोलून लयलेनें एक दुःखपूर्ण उसासा सोडला. तिच्या स्वरांतला उदासपणा आणि डोळ्यांत जमलेलीं आंसवें धारिणीच्या लक्षांत आल्यावांचून राहिलीं नाहींत. नकळत तिच्याही तोंडून एक निश्वास बाहेर पडला.

क्षणभरानें कांहीं अर्थपूर्ण दृष्टीनें लयलेकडे बघून ती म्हणाली, " मला वाटतं तूं आज यावंस. "

धारिणीच्या बोलण्याचा अर्थ लयलेच्या पूर्णपणें लक्षांत आला. टोपल्यांत भाजी घेऊन वयोमानामुळें वांकत वांकत येणाऱ्या आजींच्याकडे बघून तिनें डोळयांनीं खुण केली. आजीनीं आजवर लयलेला कीर्तीकडे जाण्यास बंदी केलेली होती धारिणी या बाबतींत त्यांचें ऐकत नसे म्हणूनच केवळ त्यांनीं तिला बोलण्याचें सोडून दिलें होतें.

धारिणीनें डावा पंजा हलवून आजींच्याकडे पाहून " तिला कळवूं नको. पण ये. " असें हलक्या स्वरांत लैलीला सांगितलें.

लयलेनें मान डावीकडे कलती करून, मुद्रेवर अनुत्सुकता दर्शवीत उत्तर केलें, " बरं पाहीन. "

जरा निराशेनें हंसत धारिणी कीर्तीकडे जाण्याच्या तयारीला लागली.

---

# — १२ —

अरुणाच्या अगोदर थोडाच वेळ निद्रादेवीला कीर्तीच्या शयनमंदिरांत प्रवेश मिळाला. तिच्या सर्व दूती रात्रभर अयशस्वी झाल्यामुळें ती आतां स्वतःच आली होती. पण ती दोन पावलें पलंगाकडे येते तोंच कीर्ति स्वप्नांत दचकल्यामुळें आपल्यालाही सुरक्षित पळ काढावा लागणार कीं काय अशी निद्रेला मोठी भीति पडली. पण कीर्तीचें भीतियुक्त मुखमंडल बघून तिला फार कळवळा आला. ती धीर धरून तशीच उभी राहिली.

कीर्तीला स्वप्न पडलें होतें कीं आपल्या लग्नाची सर्व तयारी झाली आहे. मांडवांत सर्वत्र रोषणाई केलेली असून हजारों लोक येऊन बसले आहेत. कौस्तुभ रजिस्ट्रार-समोर उभा होता. रजिस्ट्रार त्याचें लग्न लावीत होता. पण कीर्तीचा कुठें पत्ताच नव्हता.

कीर्ति सर्व खोलीभर कांहींतरी शोधीत होती. बाकीची सर्व तयारी झाली होती, पण त्या वस्तूवांचून अडलें होतें. आणि गंमत अशी कीं ती वस्तू कोणती हेंही कीर्तीला आठवत नव्हतें. शेवटीं ती वस्तू शोधीत असतांच कीर्तीला बँडचा धडधडाट आणि टाळ्यांचा कडकडाट ऐकूं आला. कौस्तुभाचें लग्न रजिस्ट्रारनें लावून टाकलें होतें. कीर्ति नसतांना एकट्या कौस्तुभाचें लग्न लागलें होतें. लोकांनीं टाळ्या वाजवल्या होत्या व बँड वाजूं लागला होता. म्हणून कीर्ति झोपेंत घाबरून दचकली होती.

दूर चाललेल्या ट्रॅमचा धडधडाट ऐकून निद्रा याच वेळीं क्रोधाविष्ट झाली होती पण अजून तिनें धीर सोडला नाहीं. ती हळूं हळूं पदन्यास करीत कीर्तीच्या पलंगाजवळ येऊं लागली.

बँड व टाळ्या ऐकून कीर्ति आणखीच अधीरपणें शोध करूं लागली. तिनें कपड्यांचें कपाट उघडलें तों कौस्तुभ त्यांतल्या करंज्यांच्या ढिगावर हंसत बसला होता. त्याच्या बोटांतला नीळ सूर्यासारखा दिसत होता. धारिणी तो खायला मागत होती, म्हणून कौस्तुभ लपला होता.

कीर्तीची चळवळ थांबलेली बघून निद्रादेवीला बरें वाटलें. ती जवळ आली.

कीर्तीच्या उशागतीं मंचकावर बसून कौतुकानें तिच्याकडे पहात, झोप अधिकच गाढ व्हावी म्हणून ती प्रेमानें कीर्तीच्या अंगावरून अलगदपणें हात फिरवूं लागली. रात्रभर तळमळत पडलेल्या कीर्तीला आतां थोडा विराम मिळाला. निद्रादेवीनें तिच्या मुखावरून आपला जादूचा हात फिरवून त्यावर आलेल्या काळजीच्या रेषा घालवून टाकल्या.

अन् तितक्यांत खिडकीच्या अस्मानी रेशमी पडद्यांतून हंसत हंसत अरुणाला प्रवेश करतांना बघून निद्रेनें आपल्या उजव्या हाताची तर्जनी ओठावर ठेऊन त्याला हळूं म्हणून सूचना दिली.

निद्रेनें थोडक्या वेळांत केलेलें कार्य बघून अरुण अगदीं प्रसन्न झाला. आपणही तिला थोडा हातभार लावावा म्हणून त्यानेंही आपले सुकोमल आरक्त कर कीर्तीच्या मुखावर टाकले.

अस्मानी उशीवर कीर्तीचें मुख जलाशयांतील गुलाबी कमलाप्रमाणें शोभूं लागलें. झोपेंत मंदहास्य केल्यामुळें तिची दंतपंक्ति हिममौक्तिकांप्रमाणें दिसूं लागली.

निद्रादेवीनें हंसून अरुणाकडे बघून त्याला प्रशंसिलें. तेव्हां त्याला अधिकच स्फुरण चढलें. त्यानें आपले गुलाबी कर आंवरून घेतले आणि कीर्तीच्या मुखमंडलावर सोनेरी प्रभा पसरून दिली. आरक्त कमलाच्या जागीं आतां सुवर्णकमल विलसूं लागलें.

निद्रादेवीनें पुन्हां अरुणाचा प्रशंसादृष्टीनें सन्मान केला. आपल्या अंगची कला दाखवण्याच्या ईर्षेनें त्यानें सुवर्णकमलाचें थोडक्याच अवधींत श्वेतकमल करून दाखवलें असतें. परंतु तें अरसिक यंत्र घड्याळ !

त्यानें अचानक घर्रदिशीं गर्जना करण्यास सुरवात केली.

निद्रादेवी दचकून मंचकावरून उठली आणि तिरस्कारानें तिनें घड्याळाकडे बघितलें. घड्याळानें तिला क्षणार्धांत पटवून दिलें कीं मी तरी काय करूं ? बरोबर सहा वाजतां गजर देण्याची कीर्तीनेंच आज्ञा केली होती.

निद्रादेवी निराशेनें अरुणाकडे बघत खोलींतून अदृश्य झाली. तिच्यामागोमाग अरुणही निघून गेला.

गजर होतांच कीर्ति दचकून जागी झाली. तिला कोणतही स्वप्न आठवत नव्हतें. तिला अगदीं शांत वाटत होतें. हात लांबवून तिनें गजर बंद केला आणि जरा वेळ ती उगीचच पडून राहिली. नंतर अंगाला आळोखे पिळोखे देत खोलीभर तिनें दृष्टि फिरवली.

समोरच एक कॅलेंडरवरली तारीख टक लावून जणूं तिच्याकडे पहात होती. ती तारीख दिसतांच कीर्तीची स्मृति तिला टोचूं लागली. या तारखेचें कांहींतरी महत्त्व तिच्या अंत:पटावर कोरलें गेलें होतें, तें ती आठवूं लागली. पडद्यांतून येणारीं कोंवळीं सूर्यकिरणेंही तिला जणूं टोंचून सांगत होतीं कीं आमच्यांत आज कांहीं विशेषता आहे. आजचा दिवस अत्यंत संस्मरणीय आहे.

क्षणभरांत कीर्तीला आठवलें कीं आज आपला लग्नदिवस. या आठवणीनें तिच्या शरिरांतून विद्युल्लहरी चमकून गेल्या.

लगेच कीर्ति पलंगावरून खालीं उतरली, आणि स्नानगृहाकडे जाऊं लागली.

तोंच दाराच्या बाहेरून हळूंच भू: करून ड्यूकनें कीर्तीला गुडमॉर्निंग केलें.

कीर्ति हंसतहंसत गुडमॉर्निंग ड्यूक असें म्हणून मागें वळली व तिनें दार उघडून ड्यूकला आंत घेतल.

विजय बंगल्यांत आज चार वाजल्यापासून हालचाल सुरूं झाली होती. दादासाहेब व सर्व नोकर चाकर कामें करण्यांत गुंतले होते.

दादासाहेबांनीं सर्वांना ताकीद देऊन ठेवली होती कीं ताईसाहेबांना स्वस्थ निजूं द्यावयाचें. तिला कुणी उठवावयाचें नाहीं किंवा तिची झोपमोड होईल अशी चाहूलही तिच्या शयनगृहाजवळ करावयाची नाहीं. ड्यूकलासुद्धां कीर्तीच्या खोलीकडे बोट दाखवून त्यांनीं सांगितलें होतें, सायलेन्स ड्यूक. आणि ती आज्ञा पूर्णपणें समजून व शिरसामान्य करून ड्यूकनें कीर्तीला भेटण्याची उत्कंठा आंवरून धरली होती. तो रोजच्याप्रमाणें टेकडीवरून रपेट करून आला, आणि कीर्तीच्या दाराशीं पुढल्या दोन पंजांवर हनुवटी टेकून झोप घेत पडला. कीर्तीची चाहूल लागतांच मात्र त्यानें आनंदभरांत तिला अभिवादन केलें. कीर्तीनें दार उघडून आंत घेतांच जणूं ती कित्येक वर्षांनीं भेटते आहे असा त्याला आनंद झाला. त्या भरांत शेपूट हलवून अंगावर उडया मारून, तिचे हातपाय चाटून त्यानें तिला बेजार करून सोडलें.

डयूकच्या प्रेमदर्शनानें कीर्ति पुन्हां स्वस्थचित्त झाली. तिनें डयूकला सांगितलें, " जा. एडीला म्हणावं चहा घेऊन ये. "

डयूक ताबडतोब निघाला. त्याला तोंडानें निरोप सांगणें शक्यच नव्हतें म्हणून स्वैपाकघरांत एडीसमोर जाऊन त्यानें शेपूट हलवण्यास प्रारंभ केला.

एडीनें मोठी चिनी थाळी कपाटांतून काढून विचारलें, "क्या बेटा, क्या होना ?"

डयूक साभिप्राय एडीकडे बघत राहिला.

" क्या साब मुझे बुलाते हैं ? "

तरी डयूक नुसता बघत राहिला.

तेव्हां एडीनें पुन्हां विचारलें.

" ताईसाबको चाय होना क्या ? "

ताईसाब आणि चाय हे शब्द ऐकतांच आपला अभिप्राय एडीला कळला या आनंदाच्या भरांत डयूकनें जोरजोरानें शेपूट हलवून एडीच्या अंगावर उडया मारण्यास सुरवात केली. त्याला हाँ बेटा, हाँ बेटा करून एडी ताजा चहा बनवून टोस्ट करण्याच्या तयारीला लागला.

डयूक दादासाहेबांची हालहवाल बघून पुन्हां कीर्तीकडे गेला आणि टोस्टचहा येईपर्यंत टेबलाखालीं निजून राहिला. दादासाहेब आणि कीर्ति यांच्याबरोबर त्यांनीं आपल्या हातांनीं घातलेली ब्रेड खाण्यांत आणि त्यांच्या उष्टया बशींत चहा पिण्यांत त्याला फार धन्यता वाटे.

कीर्ति चहा प्यायला बसते तों दादासाहेब खोलींत आले. एडीनें त्यांच्या सांगण्यावरून आणखी चहादूध व कप आणला.

दादासाहेबांनीं पहांटेपासून कितीतरी कामांचा उरक पाडला होता. चहा पितां पितां त्यांनीं कीर्तीला त्यासंबंधीं सांगण्यास सुरवात केली. रात्रींच्या मानसिक वादळासंबंधीं त्यांनीं एक शब्द उच्चारला नाहीं पण त्यांची दृष्टि मात्र त्या वादळानें काय काय प्रताप घडवून आणले आहेत हें सूक्ष्मपणें न्याहाळीत होती. कीर्तीच्या बोलण्याहंसण्यावरून त्यांचें बरेंचसें समाधान झालें असावें.

चहा पिऊन होतांच दादासाहेब जावयास उठले. ते म्हणाले, "गेलं पाहिजे मला. आतां मांडववाले येतील. मग इलेक्ट्रिक फिटिंग व्हायचं आहे."

"दादासाहेब, तुम्ही स्वतः कशाला इतकी दगदग करतां ? कितीतरी लोक आहेत कीं या गोष्टी करायला." कीर्ति लडिवाळपणें म्हणाली.

"हो. पण सर्व मनाजोगं व्हायला हवं ना ? सर्व समारंभ अगदीं पूर्ण दोषरहित झाला पाहिजे. सर्व जन्मांत--तुझ्या अन् माझ्याही म्हणेनास--आजचा प्रसंग संस्मरणीय आहे आणि तो रमणीय व्हावा अशी माझी फार इच्छा आहे."

दादासाहेबांनीं लक्षपूर्वक कीर्तीकडे पाहिलें.

कीर्तीला अचानक पहांटेचें स्वप्न आठवलें. स्वप्नांत आपल्याशिवाय एकट्या कौस्तुभाचें लग्न झालें, आपण घाबरलों, आणि करंजांवर कौस्तुभ कपाटांत बसला होता या कल्पनेनें तिला मनांतल्या मनांत हंसूं आलें. तिनें हंसतमुखानें उत्तर दिलें, "बरं तर करा सर्व तुम्हीच. पण आजारी पडलांत तर पहा हं."

दादासाहेबांच्या मनांतली सर्व काळजी दूर झाली. तेही हंसून म्हणाले, "कांहीं काळजी करूं नको. तुमचं महाबळेश्वर कांहीं बुडवणार नाहीं मी."

कीर्ति दादासाहेबांच्या या थट्टेनें फार लाजली. घाईनें ती म्हणाली, "दादासाहेब, मी कांहीं तशा अर्थानें कां बोललें ?"

---

# — १३ —

दादासाहेब निघून गेल्यावर जराशानें शीला आली आणि मग तिनें जें कांहीं थट्टासत्र आरंभलें कीं, गंभीर रहाणें अशक्य झालें.

शीलेनें आपले घारे टपोरे डोळे आणखीच विस्फारून भुंवया उंचावून मान हळूं हळूं मुरकीत, एकादी विशेष गोष्ट सांगावी तशा स्वरांत म्हटलें, "काल आमच्या-कडे पाव्हणे आले होते."

" ओ हो हो " कीर्ति हंसून म्हणाली. " केवढी पण अद्भुत गोष्ट सांगितलीस ! म्हणे पाव्हणे आले होते. तुमच्या घरीं पाव्हणे येत नाहींत कधीं ? आठ दिवसांत पाव्हणे आले नाहींत असं सांगितलंस तर मात्र आम्हांला नवल वाटेल."

धारिणीही होकारार्थी हंसली.

तेव्हां शीला म्हणाली, " अग तें खरं. पण कुणी विशेष पाव्हणे आले म्हणून सांगितलं मी."

" होय का ? असे कोण विशेष पाव्हणे आले तुमच्याकडे ? " धारिणीनें कुतूहलानें विचारलें. नंतर आपल्या मतानें अतिशय विनोदानें म्हणून ती म्हणाली, " इतके अगदीं विशेष पाव्हणे म्हणते आहेस. केसूभाई तर नव्हेत ना ? '

कीर्ति आणि धारिणी खूप हंसूं लागल्या, पण शीलेनें न हंसतां उलट खिन्न मुद्रा करून त्रासिकपणें उत्तर दिलें कीं, " होय. मेला तोच आला होता." तेव्हां त्या दोघींच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं.

कारण केसूभाईंनीं गुप्त्यांच्याकडे पाहुणा म्हणून येणें यांत नवीन असें कांहींच नव्हतें. एकादी दुष्ट जाचक सामाजिक रूढी ज्याप्रमाणें समाजांत पुनः पुनः उपटून सतावीत असते त्याचप्रमाणें केसूभाईंची स्वारी नेहमीं गुप्त्यांच्या घरीं या न् त्या कारणानें अवतीर्ण होत असे. नागपूरच्या एका कापडाच्या गिरणीचा एजंट असल्या-मुळें ते गांवोगांवीं हिंडत. मुंबईस महिन्या दोन महिन्यांनीं त्यांची एक तरी फेरी होतच असे. आणि मग आठ दिवस कायन् पंधरा दिवस काय त्यांचा मुक्काम आपल्या मावशीकडेच असायचा. अन् मग मावशीभाच्यांचें जें काय प्रेम पाघळें तें अगदीं औरच. आपली सावत्र मुलगी शीला, आपले पती भाऊसाहेब यांचा तर त्यांना विसर पडेच परंतु आपल्या दोन मुली शेवंती अन् चमेली यांची

सुद्धां त्यांना फारशी किंमत वाटत नसे. बहिणीचा मुलगा कावेरीबाईंना स्वतःच्या मुलींहून प्यार वाटे. त्या मुळीं स्वतः म्हणतच तसें. घरांत इतकीं माणसें असतांना केसूभाई नसले कीं कावेरीबाईंना चैन पडत नसे. स्वैपाकाकडे त्या ढुंकून पहात नसत. स्वैंपाकीबाई आणि शीला सर्व कांहीं बघत. केसूभाई आले म्हणजे मात्र त्या आनंदानें जशा नाचूं लागत. स्वतः केसूभाईंच्या आवडीचे पदार्थ बनवायचे, त्यांची चहा फराळाची व्यवस्था जातीनें ठेवायची, आणि त्यांचें अंथरुण पांघरूण स्वतः घालायचें आवरायचें इथपर्यंत त्या केसूभाईची सेवा करीत.

बरं इतकं करण्याजोगे आणि करून घेण्याजोगे केसूभाई तरी सुस्वभावी असायला हवे होते. पण नाहीं. त्यांचा स्वभाव महा चिडचिड्या होता. कावेरीबाईंच्या प्रत्येक गोष्टीवर ते नांवें ठेवून तोंडसुख घेत. मावशीच्या घरीं आपण पाहुणे आहों ही गोष्ट जणूं त्यांच्या ध्यानांतही नसे. तीच अनाथ असून आपल्या घरीं राबते आहे असें ते कावेरीबाईंना वागवीत. कावेरीबाईकेसूभाईंच्या कितीतरी गंमतीच्या गोष्टी शीला आपल्या मैत्रिणींना सांगून हंसवीत असे.

शीलेशीं मात्र केसूभाई असे कांहीं लघळपणा करीत कीं तिला त्यांची अगदीं किळस येई. ते असतांना आपण घरांत सुद्धां राहूं नयेसें तिला वाटे. ती त्यांना शक्य तोंवर हिसडून टाकी पण त्यांना त्याचें कांहीं वाटत नसे. ते पुन्हां पुन्हां लोचटपणा करीत. तिनें आपले वडील भाऊसाहेब यांच्याजवळ याबद्दल तक्रारही केली होती पण दुर्बल स्वभावाच्या भाऊसाहेबांनीं बायकोच्या भीतीनें ‘ हो कां ? त्याला मी काय करूं ? ’ म्हणून हातपाय गाळण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं. उलट शीलेच्या वागण्याविरुद्ध कावेरीबाईनीं त्यांच्याजवळ तक्रार केली म्हणजे मात्र बायकोची बरोबर नक्कल करून ते मुलीला रागें भरत.

अलीकडे वर्षभर केसूभाईनीं मावशीजवळ शीलेबद्दल आपल्याला वाटत असलेलें प्रेम बोलून दाखवून तिच्याशीं आपलें लग्न करून देण्याबदल सूचना केली होती.

केसूभाईना सारा शंभर रुपये पगार होता, त्यांची घरची अगदीं गरिबी होती. त्यांचे वृद्ध वडील नागपुरांत कारकुनीची नोकरी सोडून आतां घरीं बसले होते. आई कावेरीबाईंच्यापेक्षां बरीच वडील असून चार मुलांचा संसार ती घरांत काबाड-कष्ट करून कसा तरी चालवीत असे.

केसूभाई मॅट्रिक फेल होते.

तरी कावेरीबाईंना केसूभाईंची शीलेशीं लग्न करण्याची मनीषा ऐकून प्रथम धक्काच बसला. शीला बी. ए. होऊन केसूभाईंच्या इतकाच पगार मिळवीत असे.

शिवाय दोघांच्या रूपांत केवढा फरक होता. केसूभाई कोळसा तर शीला माणिक. केसूभाईंची ती किचकट काळी उंच शरीरयष्टि, बसके गाल, काळे ओठ, आणि छाकटी वागण्याबोलण्याची पद्धत पाहून कुणाही मुलीला चुकूनसुद्धां भुरळ पडली नसती.

पण कावेरीबाईंना वाटलें कीं शीला आपल्या केसूभाईंच्या पासंगालासुद्धां लागणार नाहीं. त्यांनीं केसूभाईंना परोपरीनें सांगून पाहिलें कीं तूं एकदां लग्नाला कबूल हो कीं मुलींना काय तोटा ? हव्या तितक्या हुंडेवाल्या मुली मिळतील. शिवाय शीला भूषणाला द्यावी असं एकापरीनं ठरलेलंच होतं.

पण भाचा ऐकत नाहींसें पाहून त्यांना हळूं हळूं ती कल्पना पटूं लागली. आपल्या सावत्र मुलीला मिळणारी थोडीशी इस्टेट आपल्या भाच्याला मिळेल या कल्पनेनें त्यांना बरें वाटलें. केसूभाईनीं आपली बहीण गुलाब ही भूषणांना द्यावी म्हणून म्हणतांच त्या एकदम त्याही बेताला अनुकूल झाल्या.

कावेरीबाईंना वाटून राह्यलें होतें कीं आपण नुसतें बोलण्याचा अवकाश शीला केसूभाईशीं लग्न करण्याकरतां तुटून पडेल, आणि भाऊसाहेबांना असला जांवई मिळणार म्हणून धन्यता वाटेल. भूषणाची त्या दोघांना किंमतही वाटणार नाहीं.

पण सर्वच उलट झालेलें पाहून त्यांना मनुष्यस्वभावाचा मोठा चमत्कार वाटला. भाऊसाहेबांनीं मुळमुळीत नको म्हटलें तर शीलेनें मी साफ यांच्याशीं लग्न करणार नाहीं म्हणून सांगून टाकलें.

कावेरीबाई या अनपेक्षित नकारानें अपमानित होऊन, दुसऱ्या मुली तुला दाखवतें, शीलेपेक्षां सात सवाई सुंदर मुली लोटांगण घालीत तुझ्या पायाशीं आणतें म्हणून तावातावानें केसूभाईंना सांगूं लागल्या.

पण केसूभाई चिडक्या आवाजांत मावशीला म्हणाले, " तुला कांहींच कसं ग कळत नाहीं मावशी ? मी तुला हजारदां सांगितलं ना माझं शीलेवर प्रेम आहे म्हणून ? "

कावेरीबाई मवाळून म्हणाल्या, " अरे पण ती आणि तिचे वडील नाहीं म्हणताहेत ना ? "

" अग म्हणून तर तिच्याशींच लग्न करायचं. भाऊसाहेब येवढं कां तुझं ऐकत नाहींत ? तूं त्यांना कसं अगदीं चतुरपणानं मुठींत आणलं आहेस हें काय मी पहात नाहीं ? त्यांना तूं निक्षून सांग कीं हें लग्न झालंच पाह्यजे नाहींतर मी जातें माझ्या बहिणीकडे, मग पुन्हां तुमचं तोंड बघणार नाहीं. पहा मग कसा तो म्हातारा येईल ताळ्यावर. अन् शीलेच्या मनांत नसतांना तिचं माझ्याशीं लग्न लावण्यांत तिनं केलेल्या अपमानाची भरपाई नाहीं कां होणार ? "

हा शेवटला मुद्दा कावेरीबाईंना इतका पटला कीं शीलेचं लग्न केसूशीं झालंच पाहिजे असें त्यांनीं मनाशीं पक्कें ठरवलें.

लवकरच केसूभाईनीं मुंबईचा मुक्काम हलवला.

शीलेला वाटलें पीडा गेली. पुन्हां हा केसूभाई आपल्याशीं लघळपणा करणार नाहीं.

पण केसूभाई गेले तरी कावेरीबाई मधूनमधून तिला अजून त्या प्रश्नाबद्दल त्रास देत. आणि भाऊसाहेबही त्यांना हो हो करूं लागले.

गुलाबला करून घेण्यासाठीं त्या भूषणाचेंही मन वळवण्याचा प्रयत्न करीत असत.

इतकी ही हकिगत कीर्ति आणि धारिणी यांना माहीत होती. असो.

शीलेचा त्रासिक उद्गार ऐकून त्या दोघींना आश्चर्य वाटलें. कांहीं तरी विशेष गोष्ट घडली असली पाहिजे, असें त्यांच्या लक्षांत येऊन दोघींनी उद्गारपूर्वक प्रश्न विचारला, " कांहीं विशेष दिसतंय आज प्रकरण ? "

हा प्रश्न ऐकतांच शीलेच्या मुखावर कितीतरी विकारांच्या छाया भराभर उमटून गेल्या. एखादे वेळीं भिंतीवर सूर्यप्रकाशाचा लहानसा कवडसा पडलेला असतो, आणि त्यावर विरल मेघांच्या छाया भराभर सरकत असतांना दिसून कवडसा निष्प्रभ दिसूं लागतो. आकाशांत सूर्यबिंबाला ग्रासण्याचा मेघमाला सारखा प्रयत्न करते त्याची अप्रत्यक्षपणें भिंतीवरील छाया जाणीव करून देतात. नंतर चारदोन थेंबही अंगणांत पडतात, नी वारा सुस्कारून जातो.

आदल्या दिवशीं कावेरीबाईनीं भाऊसाहेबांच्या मदतीनें शीलेला ज्या पेचप्रसंगांत आणून टाकलें, त्यासाठीं जें रण माजवलें त्या सर्व गोष्टींच्या आठवणींनीं शीलेच्या मुखमंडलावर भराभर अनेक दुःखद छाया उमटविल्या. त्यावर म्लानता पसरून तिच्या डोळ्यांत अश्रुबिंदु चमकले. तिनें एक जड निश्वास टाकला.

पण शीलेची ही मनस्थिति क्षण अर्धक्षणच टिकली. ती हंसूं लागली.

कीर्ति आणि धारिणी यांना वाटलें कीं आपण इतक्यांत हिच्या चर्येवर ज्या छटा पाहिल्या त्या खऱ्या कीं तो निवळ भास होता ?

जणूं दुसऱ्याच कुणाबद्दल आपण बोलत आहों इतका निष्काळजीपणाचा स्वर काढून शीला दोन हात कोपरापर्यंत जोडून, कपाळाला अंगठ्यांचा स्पर्श करून, हंसत म्हणाली, "कोण ग बाई तो कालचा आमच्या घरचा गोंधळ. हरे राम राम ?"

"कशाबद्दल गोंधळ ?" धारिणीनें विचारलें.

"अग माझ्या लग्नाबद्दल ? तो मेला केसूभाई आलाय म्हणून सांगितलंना तुम्हांला मघां ?"

"म्हणजे पुन्हां लागला कां त्रास द्यायला ? तूं इतका झिडकारलास त्याला."

"म्हणूनच तर या वेळेला त्यानं इतकं मोठं कारस्थान रचलं. इतके दिवस भाऊसाहेबांचा थोडा तरी आधार होता मला. पण पायाखालच्या वाळूसारखा तो आधार दोन तीन महिने घसरत होता याची मला दादच नव्हती. आमच्या माई-साहेबांनीं भाऊसाहेबांना पूर्णपणें कह्यांत घेतलं आहे. पण कसं झालं तरी काल जो त्यांनीं प्रकार केला त्याबद्दल मला राहून राहून नवल वाटतं."

"अय्या ! झालंय तरी काय इतकं ? सांग कीं ग लवकर." कीर्तीनें अधीरपणे विचारलें.

"काल पुन्हां पहिल्यापासून सगळं महाभारत झालं. अगदीं अथपासून इतीपर्यंत. कालपर्यंत इति झाली नव्हती तीसुद्धां काल झाली.–म्हणजे लग्नाबद्दल आधीं सर्वांनीं माझं मन वळवण्याचा प्रयत्न केला. रात्रीं बारा वाजेपर्यंत माईसाहेब, भाऊ-साहेब आणि केसूभाईसुद्धां आपापल्यापरीनं मला केसूभाईशीं लग्न करण्यांत माझं केवढं सुख सांठवलं आहे हें पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. पण मी मुळींच ऐकत नाहीं असं बघून भाऊसाहेब भयंकर संतापले. मी त्यांना इतके संतापलेले जन्मांत पाहिले नव्हते. अन् शेवटीं—शेवटीं—मला खरंसुद्धां वाटत नाहीं हो. पण मला वाटतं माईंच्या टोंचणीला कंटाळून ते अगदीं वैतागून गेले असावेत आणि वेड्यापिशासारखी अवस्था होऊन ते इतके चिडले. भाऊसाहेबांनीं मला सांगितलं कीं केसूभाईशीं लग्न कर नाहींतर माझं घर उद्यांपासून तुला वर्ज्य."

कीर्ति आणि धारिणी दोघीनींही व्याकुलतेचे उद्गार काढले.

" अन् मग ? " धडधडत्या हृदयावर हात ठेऊन कीर्तीनें चिंतातुरतेनें विचारलें.

निश्चयदर्शक स्वरांत शीलेनें उत्तर दिलें.

" मी सांगितलं कीं काय वाटेल तें झालं तरी मी केसूभाईशीं लग्न करणार नाहीं.

कीर्ति आणि धारिणी उत्सुक होऊन, प्रश्नार्थी मुद्रेनें शीलेकडे टकमकां पहात होत्या. शेवटीं धारिणीनें विचारलें " मग ? " तेव्हां शीला पुढें सांगूं लागली.

" मी असं म्हटलं तेव्हां माईसाहेब म्हणाल्या, केसूशीं लग्न करायचं नाहीं तर एखाद्या चांभार महाराशीं लग्न कर जा. तुझी ती कीर्ति देईल तुला नवरा शोधून. मग मी त्यांना सांगितलं कीं–" प्रसन्नपणें हंसून शीलेनें वाक्य पुरें केलें, " मी त्यांना सांगितलें कीं, केसूभाईपेक्षां महारसुद्धां बरा. "

" धन्य आहे बाई तुझी ! " धारिणी हंसून उद्गारली.

" मग हें ऐकून माईनीं नुसता थयथयाट केला असेल ? "

" मग त्यांच्या तोंडांतून जो काय आगडोंब उसळला तो कांहीं विचारूं नका. " तोंडाजवळ घोंघावणाऱ्या मधमाशांच्या थव्याला उडवून लावण्यासाठीं तोंड हलवावें तसें शीलेनें हलवलें.

" मग आतां पुढें ? " कीर्तिनें विचारलें.

" पुढें काय ? मी उद्यांपासून होस्टेलमध्यें रहाणार. "

" खरंच ? पण नाहीं इतकी वेळ येणार ग." कीर्ति म्हणाली, "भाऊसाहेब शेवटीं माघार घेतील बघ."

" नाहीं ग. शक्य नाहीं तें. माईसाहेबांनीं मुळीं त्यांना सांगून ठेवलं आहे कीं शीलेला तरी घराबाहेर काढा नाहीं तर मी तरी घराबाहेर जातें. "

" काय तरी भयंकर बाई ही ! " धारिणी तिरस्कारानें हात हिसडून उद्गारली.

" हूंः पहांटेपर्यंत माझ्या खोलीशेजारल्या खोलींत बसून त्या न् केसूभाई जी कांहीं बडबड करीत होते अन् मला नांवं ठेवीत होते. कमाल अगदीं. वाटेल तसले खोटे नाटे आरोप चालले होते माझ्यावर. अन् मला ऐकूं यावं म्हणून मुद्दाम अगदीं मोठ्यानं बोलत होते. "

" पण तूं ऐकून कां घेतलंस ? चांगलं त्यांना बोलून घ्यायचंस. त्यांच्या दुष्ट-पणाचं माप त्यांच्या पदरांत घालायचं होतंस ! " कीर्ति चिडून म्हणाली.

" नाहींतरी तूं उद्यां जाणारच ? मग काय भीति ? "

शीला शांतपणानें उत्तरली. " उगीच वाऱ्याशीं कुणी जायचं बाई भांडायला ? त्याचा कांहीं उपयोग झाला नसता कांहीं नाहीं. "

" बरोबर आहे. पण मग काय. झोपेचं खोबरं नी वर पुन्हां तोंडाला तोबरं. "

" नाऽई. मी आपलं व्हायोलिन काढलं नी आजच्या गाण्याची प्रॅक्टिस केली. तिलंग रागांत बसवलंय माझं पद मी. " शीला आपल्या मधुर आवाजांत पदाचे पहिले चरण गुणगुणूं लागली.

" कसलं पद ? " कीर्तिनें विचारलें.

शीलेनें भ्रुकुटी उंचावून मान इकडे तिकडे हलवून, कीर्तीचा खांदा हलवून चेष्टेच्या स्वरांत विचारलें, " म्हणजे ? विसरलीस वाटतं आज तुझं लग्न आहे तें ? शुभाशीर्वादपर पद करायला सांगितलं होतं ना मला ? "

" हं हं " कीर्तीनें हुंकार दिला.

अमोनियाच्या झोंबणाऱ्या वासानें जसा मूर्च्छित मनुष्य खडबडून शुद्धीवर येतो त्याप्रमाणें कीर्तीची किंचित्काल सुप्त असलेली स्मृति जागी झाली.

तिच्या हृदयाचे ठोके धाड धाड पडूं लागले.

* * *

दुपारीं दादासाहेबांनीं एका वृद्ध चर्मकार स्त्रीशीं कीर्तीची ओळख करून दिली.

आलेल्या पाहुण्याबाई जरी भडक जरीकांठी लुगडें आणि, गोठ, तोडे, पुतळ्यांची माळ, बोरमाळ असल्या दागिन्यांनीं भरगच्च मढलेल्या दिसत होत्या तरी वार्धक्य-रेषांनींच त्यांना जास्त अलंकृत करून वांकवलेलें दिसत होतें. काळासांवळा वर्ण, डोकीवरल्या पदरांतून दिसणारा घट्ट आंवळलेल्या पांढऱ्या केसांचा लहान बुचडा, भांगांतलें टक्कल आणि कपाळावर या टोकापासून त्या टोकापर्यंत भरलेलें आडवें कुंकू असा त्या स्त्रीचा थाट होता.

दादासाहेबांनीं आदरपूर्वक हंसत म्हटलें, " कीर्ति, हीच माझी चुलत आते.

हिला आम्ही बाया म्हणतों. मी हिच्याबद्दल तुला सांगितलेलं आहे बरंच. आठवतं ना तुला ?"

"हो तर. यांनींच तुम्हांला शिक्षणाच्या बाबतींत पुष्कळ-मदत केली ना ?"

कीर्तीला बायाबद्दल एकदम आपलेपणा वाटूं लागला. तिनें पुढें होऊन सहास्य मुद्रेनें त्या वृद्धेचे दोन्ही हात धरून तिला कोचावर बसवलें आणि ती जवळच बसली.

बायाच्या मनांतला संकोच या स्वागतानें दूर झाला. कीर्तीकडे आपल्या गढुळलेल्या डोळ्यांनीं प्रेमळपणें पहात, तिनें कानशिलावर कडाकडा बोटें मोडून म्हटलें, "बाई, मी या शिरप्याला" ( म्हातारीनें यावेळीं दादासाहेबांच्याकडे पाहिलें. ) लहानपनीं हाताखांद्यावर वाढवला तवा मला सपनांत बी आलं नाय कीं त्यो इत्का मोटा साहेब व्हईल. अन् तुज्यावानी ग्वाड सभावाची नात मला मिळल असंबी मला कंदी वाटलं नाय.

आतां लगिनासाठीं म्हणून बोलावनं आलं तवां म्हनलं जाऊं कीं नको ? माजा ल्येंक मारत्याबी येईना. पन घरधनी म्हंगाले, आपुन जाया होवं. शिरप्या आपला हाये. तवां आमी समदी आलों. तुला शिरप्यानं कंदी आमच्या गांवीं आनली नाय. आमांला वाटायचं तूं मडमिणीवाणी ऐट करशील. आमांला हिडहिड करशील. पन बाई तूंबी आपल्या आईवाणी गरीब हायेस."

बायानें कीर्तीच्या पाठीवरून हात फिरवला. कामाधामांनीं राकटलेला तो हात पण कीर्तीला आईच्या प्रेमळ आठवणीमुळें अत्यंत स्निग्ध वाटला. तिच्या डोळ्यांत आंसवें आलीं.

विजय बंगला आज विजयोत्साहानें नुसता तळपत होता. विजय बंगल्याला आज अवर्णनीय शोभा प्राप्त झाली होती. नुकत्याच अस्मानी रंगवलेल्या बंगल्यावरील नकशीनकशीनें लावलेल्या विद्युद्दीपांच्या माळांच्या योगानें तारकाखचित आकाशविभागच खालीं आल्यासारखें दिसत होतें. क्षणाक्षणाला चमकून मालवणारीं निरनिराळ्या रंगांतील " विजय " हीं अक्षरें सर्वांचें लक्ष वेधून घेऊन विजय, विजय, विजय म्हणून अट्टाहासानें सर्वांना सांगत असल्याप्रमाणें भासत होतें. बंगल्यापुढील भव्य, शोभिवंत मांडवांतही मनोहर रोषणाई करून पताकांच्या माळा आणि आम्रअशोक पल्लवांच्या कमानी मधून मधून लावल्या होत्या.

लष्करी बँडचे ऐटदार पोषाखांतील बँडवाले मंडपाबाहेर खुर्च्यांवरून बसले असून केव्हां मोठमोठ्यानें तालांत धुडुम धुडुम धाड धाड करून लोकांचीं हृदयें बेतालपणें धाड धाड उडायला लावीत, तर केव्हां बॅगपाइपच्या श्रुतिमनोहर संगीतानें, नाजुक भावनातरंग उमटवून नादब्रम्हांत हृदय विलीन करून टाकीत.

बँडवाले विश्रांतीसाठीं पांच मिनिटें थांबले कीं वाजंत्रीवाले सुस्वर सनईतील सायंकालीन तान आलापयुक्त रागरागिण्यांनीं लोकांच्या आनंदोत्साहाला सात्त्विक आनंदाचा पूर आणीत.

मंडपांत पुष्कळ खुर्च्या मावाव्या म्हणून कितीतरी कुंड्यांचीं बंगल्याच्या मागल्या बाजूला उचलबांगडी झाली होती. माळ्यानें कांहीं मौल्यवान् नवीं रोपडीं अशींच मागें लाऊन वांचवण्याचा प्रयत्न केला होता. मोठीं झाडेंझुडपें तोडण्यास कीर्तीनें साफ नकार दिला असल्यानें मधूनमधून रांगा तुटल्यासारख्या दिसत होत्या. तरी मोकळी जागाही भरपूर असल्यानें तशी मोठीशी अडचण झाली नव्हती.

तीनचार हजार लोकसमुदाय लग्नासाठीं उपस्थित असूनहि त्या मानानें स्त्रिया अगदीं थोड्या होत्या. हिंदु पुरुष लग्नाला पुष्कळ आले असून स्त्रियांनीं जणुं बहिष्कार टाकलेला दिसत होता. तरीही पुढारलेल्या हिंदु समाजांतील दीडदोनशें बायका आल्या होत्या. कांहीं पार्शी, चारपांच युरोपियन, कांहीं युरेशियन आणि एक मुसलमान जातीची स्त्री उपस्थित होती.

चर्मकार जातींतल्या वीसपंचवीस स्त्रिया त्यांच्या रंगरूप पेहेरावावरून चांगल्या ओळखूं येत होत्या. पुरुष मात्र इतर हिंदु लोकांत ओळखूं येत नव्हते.

चर्मकार जातींतही या लग्नाबाबत कितीतरी प्रकारचे लोकमताचे प्रवाद उठत होते. कांहींना दादासाहेब आणि कीर्ति यांनीं अगदीं स्वर्ग गांठला असें वाटत होतें तर कांहींना—पुष्कळांनाच दादासाहेबांनीं आपल्या जातीला लाथाडलें असें वाटत होतें. त्यांच्या मतें त्यांनीं आपल्याच जातींतला मुलगा जांवई करून घ्यायला हवा होता. मग तो तिच्या योग्यतेचा नसेना का. कुणी म्हणत, त्यांनीं जातींतला मुलगा शिकवून तयार करायचा होता. कांहीं बोलणारे शेवटीं, हा सारा विलायती धुंदीचा परिणाम, पोर बेताल झाली, ती काय बापाचं ऐकतीय, असेंही बोलत.

त्यामुळेंच दादासाहेबांच्या अपेक्षेपेक्षां त्यांच्या जातींतले फार थोडे लोक लग्नाला आले. त्यांच्या नांदवड गांवच्या आसपासचेच बहुतेक लोक होते.

धारिणी आणि शीला आलेल्या स्त्रियांच्या स्वागतार्थ उभ्या होत्या.

मध्यें थोडी फुरसत असल्यामुळें त्या दोघी एका बाजूला उभ्या होत्या. तेव्हां शीला धारिणीला म्हणाली, “ पाहिल्यास त्या कीर्तीच्या जातींतल्या बायका ? कशा खड्यासारख्या डोळ्यांना खुपताहेत. पण त्यांच्यातले पुरुष मात्र इतर पांढरपेशा हिंदूंत ओळखूं येत नाहींत. पुरुष कसे चटकन् सुधारणा आत्मसात् करतात. ”

धारिणीला आपल्या मेहुण्यांची आठवण झाली. लैलीच्या लग्नाबाबत ते कसा घोळ घालून बसले होते ! ती म्हणाली, “ पुरुषच बायकांना पुढें येऊं देत नाहींत. आपण स्वतः मात्र ते भराभरा आवडेल त्या मार्गानं जातात. ”

मनांतल्या मनांत ती विचार करीत होती, “ लैली कां बरं अजून आली नाहीं ? येईल ना ती ? ” शीला आपलें मत प्रतिपादीत होती, ” कांहीं नाहीं. बायकाच वाईट असतात. रूढीनीं लादलेल्या गाढवाप्रमाणें पुढें पाऊल न टाकण्याच्या निर्धारानें एका जागीं उभ्या रहातात आणि दुसऱ्या कोणी पुढें गेल्या तर ओरडत सुटतात. ”

धारिणी इकडेतिकडे मांडवांत दृष्टिक्षेप करीत होती. तितक्यांत दादासाहेबांनीं दर्शवलेल्या खुर्चीवर बसतां बसतां धनंजयानें स्मितमुखानें तिला अभिवादन केलें. उच्च मराठावंशीय, काळसर पण तेजस्वी वर्णाचा, उंच, सशक्त अंगलटीचा आणि तरतरीत नाकडोळ्यांचा तरुण होता तो. इंग्लिश पद्धतीच्या पोषाखांत तो मोठा

रुबाबदार दिसत होता. चर्येवरील नैसर्गिक गांभिर्यछटा, व सात्त्विक वृत्ति यांनीं पहाणाराचें मत ताबडतोब अनुकूल होऊन जाई.

धनंजयाला पहातांच धारिणीला मात्र चरकल्यासारखें झालें. आदल्या रात्रीच्या हृदयविदारक प्रसंगांची तिला आठवण झाली; तिच्या मनांत विचार तरंगून गेला, " लैलाधनंजयांचं लग्न झालेलं असतं तर तीं दोघं आतां बरोबरच समारंभाला आलीं नसतीं कां ! मग लैलीची अवस्था भाग्यदर्शक ठरली असती. पण आतां तिला लोकांत तोंड दाखवायची शरम वाटते आहे. धनंजय मात्र लैलीइतकाच दोषी असून निसर्गानं सवलत मिळाल्यामुळें समारंभाला येऊं शकतो. "

या विचारामुळें धारिणीचें स्मित लोपलें. तिनें धनंजयाला नुसता नमस्कार करून लगेच मान वळवली.

इकडे तिला शीला विचारीत होती, " सगळ्याजणी कीर्ति कुठेय म्हणून विचारताहेत, बोलवून आणूं कां मी तिला ? तुमच्या मागोमाग येते म्हणून म्हणाली. काय करतेय कुणास ठाऊक. "

" येईलच इतक्यांत. दादासाहेब तिला आणणार आहेत. " धारिणीनें घड्याळा-कडे बघत म्हटलें. नंतर ती शीलेच्या कानाशीं म्हणाली, " कीर्तीला आज काय झालंय ग ? असावी तितकी मजेंत दिसत नाहीं. नाहीं ? फार नर्व्हस झालीय कीं काय कोण जाणें ! "

पण शीलेनें हें बोलणें ऐकलें नाहीं.

" ए पोरी " म्हणून भूषणाची हांक ऐकतांच शीलेनें चमकून वळून पाहिलें आणि हंसून ती त्याच्या पोषाखाकडे साभिप्राय बघत खोडसाळपणानें म्हणाली, " या दाराशीं कशाला आलास तूं ? बायकांत कां बसणार आहेस ? "

" हो तर काय ? " भूषणाला शीलेची खोंच कळली होती पण तसें न दाखवतां त्यानें उत्तर दिलें.

भूषण म्हणजे एक नमुनेदार प्रभु तरुण होता. उंच, किडकिडीत बांधा, पिवळसर गोरेपणा, कपाळाची चौकोनी ठेवण, दोन बाजूला आंत गेलेले कपाळ, बसके गाल, वर उचललेलीं हाडें, काळेभोर तीक्ष्ण डोळे, तरतरीत नाक, व हनुवटी आणि अत्यंत ऐटदार उत्तम शिलाईचा पोषाख, काळ्या तुळतुळीत केसांचा कुरळ करून

पाडलेला भांग आणि शक्यतोंवर इंग्लिशमध्यें बोलण्याची हौस अशा प्रकारचा भूषण होता.

भूषण म्हणाला, " तिकडे पुरुषांच्या बाजूला इतकी गर्दी झाली आहे कीं आंत जायलाही वाट नाहीं. म्हणून मला कुणी सांगितलं कीं इकडून जा. "

" असं होय ? मग जा तर आंत जाऊन बैस. "

भूषण " काय पण स्वागत करते आहे ! ". अशा अर्थी मान उडवून हंसला आणि पुढें जाऊं लागला. तेव्हां हंसत हंसत शीला त्याच्याबरोबर चालूं लागली.

भूषण म्हणाला, " काय ग तुझा केसूभाई आला आहे कीं नाहीं ? "

शीलेनें आपल्या भ्रुकुटी व नाक उंचावून तिरस्कारानें विचारलें, " माझा ? "

" हो तर काय ! केसूभाईच सांगत होता मला कीं तूं त्याच्याशीं लग्न करणार आहेस म्हणून. "

" अडलाय माझं खेटर त्याच्याशीं लग्न करायला. " शीला फणकारली.

भूषण हंसून म्हणाला, " मग कुणाशीं करणार आहेस तर ? "

" तुला त्याची पंचाईत ? "

" त्याची नाहीं पंचाईत. तुझी आहे. "

" कांहीं जरूर नाहीं तुझ्या पंचाइतीची मला. " इतकें फणकारून शीला परत फिरणार होती, पण तिला सरळ परतणें कुठलें मानवायला ? तिनें औपचारिक हंसून विचारलें, " कायरे तुझी गुलाब आली आहे कां ? "

" माझी कोण ? "

" तुझी ना ? तुझी भावी अर्धांगी गुलाब. "

" ती माझी भावी अर्धांगी आहे हें मला तर कांहीं अजून माहीत नाहीं. "

" केसूभाईच सांगत होते हो तसं. "

" असं होय ? "

या भूषणाच्या निष्काळजी उद्गारामुळें शीला चिडली.

" होय हो. असंच. मग करणार आहेस कां तूं तिच्याशीं लग्न ? "

बाजारांतल्या एकाद्या सौद्याबद्दल बोलत असल्याप्रमाणें भूषणानें उत्तर दिलें, " करूं कीं. केसूभाई सांगत होते कीं गुलाब तुझ्या दसपट सुंदर आहे."

भूषणाचा हा जाणूनबुजून सोडलेला वाग्बाण शीलेला चांगलाच झोंबला. ती म्हणाली, " दसपटच काय चांगली माझ्यापेक्षां शंभरपट सुंदर आहे ती."

" खरंच कीं काय ? मग जरूर आपण तिच्याशीं लग्न करणार. कारण तूंच आज इतकी सुरेख दिसते आहेस. कीं तुझ्यापेक्षां शंभरपट—" भूषणानें मुद्दामच वाक्य अर्धें सोडून हंसूं लपवून मुद्दाम रोषानें बघणाऱ्या शीलेकडे प्रशंसायुक्त नजरेनें पहात म्हटलें, " आणि तूं आज मला आवडणारंच फिकट हिरवं पातळ नेसली आहेस. खरोखरच तुला फार शोभतं हें."

भूषणाचे वाग्बाण शीला पार विसरून गेली. तिचें हृदय जसें फुलांवर तरंगूं लागलें. पण याही स्तुतीचा आपल्यावर यत्किंचित् परिणाम झालेला नाहीं, आपण नाराजच आहोंत अशा अर्थी भूषणाकडे बघत जरा मान वेळावीत शीला मंडपाच्या दाराकडे गेली.

तितक्यांत मंडपांत एकदम श्वाससुद्धां ऐकूं येईल इतकी शांतता पसरल्याचें पाहून शीलेनें लोक पहात होते तिकडे नजर टाकली.

दादासाहेब बंगल्याच्या पोर्चमधून मंडपाच्या दारांतून आंत शिरले.असून त्यांच्या उजव्या हातांत आपला डावा हात दिलेली, आणि उजवा हात धडधडत्या वक्षस्थलावर दाबून धरून, मंडपद्वारांत पुढें पाऊल टाकूं कीं नको अशा संभ्रमित मनस्थितीनें चहूंकडे, एकाद्या हरिणीप्रमाणें आपल्या टपोऱ्या नेत्रांनीं भिरीभिरी बघत, कीर्ति उभी होती.

लोकांच्या स्वागतस्मिताला प्रत्युत्तर देण्यासाठीं म्हणून तिचे विद्रुमकांति अधरद्वय अलग झाल्यामुळें तिची मौक्तिकतुल्य दंतपंक्ति अर्धस्फुट दिसत होती.

पण तिचें हास्य मात्र उमटलें नाहीं. अस्ताला गेलेल्या सूर्याचे थोडे किरण तांबूस क्षितिजावर पसरलेले दिसावेत पण सूर्यबिंब मात्र दिसूं नये तसेंच तिचें हास्य लोपलेलें होतें.

प्रत्यक्ष सौंदर्यलक्ष्मीच जणुं मंडपद्वारांत उभी होती. मुद्दाम पॅरिसहून काढवून आणलेलें फिकट गुलाबी रंगाचें, रेशमी, अतिशय तलम असें पातळ आणि त्याहूनही जरा फिक्या रंगाचा, अस्मानी फुलांची नकशी विणलेला ब्लाऊज कीर्तीनें परिधान केला होता. पातळावर आणि ब्लाऊजवर केलेलें नाजूक जरीचें काम विजेच्या प्रकाशांत, चमचमत होतें. पातळाचे अस्मानी जरतारी कांठ पातळाची, शोभा वाढवीतच होते.

उष:कालीन गुलाबी प्रभा, सोनेरी सूर्यकिरणें, आणि कांठपदराला आकाशगंगेचे बेतशीर पट्टे यांनीं मिळून जणूं तिला मनोहर वस्त्रें विणून दिलीं होतीं.

डाव्या खांद्यावर लावलेल्या चमकदार हिरकण्यांच्या पिनमुळें चालतांनासुद्धां पातळाच्या चुण्या जेथच्या तेथें राहिल्या होत्या.

मस्तकावर बांधलेले मोत्यांचे दोन सर सुंदर केशरचनेंत अधिकच भर टाकीत होते. लग्नाची खास देणगी म्हणून कौस्तुभानें दिलेलीं तांबूस लोलकांची हिरेजडित कर्णफुलें कीर्तीच्या आरक्त गालांवर प्रभा पाडून त्यांचा नाजूकपणा व रंगसौंदर्य अधिकच खुलवीत होते. रत्नपदकें गुंफलेल्या मोत्यांच्या कंठीमुळें तिच्या कंठाचा, व मोठ्या गळ्याच्या ब्लाऊजमुळें दिसणाऱ्या खालच्या थोड्या भागाचा डौलदारपणा स्पष्ट होत होता. गोंडस हातांतील दोन माणिकमोत्यांच्या बांगड्या, आणि गोऱ्या,

नाजूक बोटांतील कौस्तुभानें सहजपणें दिलेली निळाची आंगठी फारच सुरेख दिसत होती.

दादासाहेबांनीं शुद्ध ब्राम्हणी पद्धतीचा पोषाख केलेला असून डोक्याला रुमाल बांधला होता.

कीर्तीकडे प्रशंसेनें पहाणारा प्रेक्षकवृंद पाहून दादासाहेबांनी कौतुकपूर्ण दृष्टीनें तिच्याकडे हंसून पाहिलें.

त्याच क्षणीं डोक्यावर लावलेल्या कागदी विमानांतून पुष्पवृष्टि झाली.

क्षणभर मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणें मंडपद्वारांतील स्वरूपसौंदर्य आणि अमूर्त असें वात्सल्यसौंदर्य पहाणारा जनसमूह एकदम जणुं भानावर येऊन स्वागतार्थ उभा राहिला आणि टाळ्यांच्या कडकडाटानें बँडचा धडधडाटही लोपल्यासारखा झाला.

कीर्तीनें चमकून सभोंवार दृष्टि फेंकली. मंडपांतील जनसमुदाय, सर्वत्र केलेला थाटमाट या सर्वांचा अर्थ जणूं आतांच तिच्या ध्यानीं आला. लोकांनीं तिचें अभ्युत्थानानें आणि टाळ्यांनीं केलेल्या स्वागताचा, किंचित् मस्तक विनीत करून, व नमस्कार करून तिनें स्वीकार केला.

मग तिनें पंधरा फुटांवर असलेल्या व्यासपीठाकडे पाहिलें. तेथें उंची रेशमी सूट घालून, आणि दादासाहेबांनीं मुद्दाम कीर्तीच्या पातळाबरोबर पॅरिसहून काढवून आणलेला फिकट गुलाबी जरतारी मंदील, तुऱ्या शेमल्यासह बांधून कौस्तुभ उभा होता.

त्याची ती राजबिंडी मूर्ती, त्याचें मोहक हास्य, आणि त्याच्या दृष्टींतील प्रेमकिरण बघून कीर्तीला आनंदाचा उमाळा आल्याप्रमाणें झालें, तिला ममत्वाचा अभिमानही वाटला. त्या प्रेमकिरणांनीं कीर्तीचें मालवलेलें मुखकमल पुन्हां उमलून टाकलें व तेथें प्रीतीचा मादक सुगंध दरवळूं लागला. दादासाहेबांनीं धरलेल्या हाताचीं बोटें तिनें घट्ट मिटून पुन्हां उघडलीं.

नंतर दादासाहेबांनीं, चल कीर्ति, असें हळूं म्हणतांच आकर्षित झाल्याप्रमाणें ती व्यासपीठाकडे पदन्यास करूं लागली.

कौस्तुभ व्यासपीठाच्या दोन पायऱ्या उतरून खालीं आला व दादासाहेबांच्या हांतून कीर्तीचा हात त्यानें आपल्या हातीं घेऊन तो कीर्तीसह वर चढला.

कीर्तीच्या सर्वांगांत विद्युल्लहरी चमकून गेल्याप्रमाणें झालें.

त्या दोघांच्याकडे अभिमानपूर्वक हंसून बघत दादासाहेब त्यांच्या मागोमाग वर चढले. सर्व मंडळी स्थानापन्न झाली.

मग सुंदर पोषाख केलेल्या पांच मुलींनीं स्वागतपद्य म्हटलें.

पद चालू असतां कौस्तुभानें हळूंच आपल्या बुटानें कीर्तीचा पंपशू दाबला. त्या खोडीमुळें कीर्तीला मनापासून हंसूं आलें व तिनें हंसून कौस्तुभाकडे पाहिलें. कौस्तुभ मिष्किलपणानें हंसत होता.

कौस्तुभाची खोडी दादासाहेबांना दिसली नव्हती, परंतु ही मंदस्मितांची देवघेव मात्र त्यांनीं पाहिली आणि त्यांना समाधान वाटलें.

पद म्हणून झाल्यावर दादासाहेबांनीं आठदहा वाक्यांतच उपस्थित मंडळींचें स्वागत केलें. त्यांचें हृदय कन्यादानाच्या कल्पनेनें किती भरून आलें होतें हें त्यांच्या रुद्ध स्वरावरून समजून येत होतें.

त्यांच्यानंतर एका बड्या राजकीय पुढाऱ्यांनीं असेंच थोडक्यांत चालू समारंभाचें वैशिष्ठ्य सांगितलें. कीर्ति आणि दादासाहेब यांच्याबद्दल उदारपणें बोलून ते शेवटीं म्हणाले कीं " वर हे उच्चकुलोत्पन्न व उच्चविद्यासंपन्न श्रीमान कुलांतले ब्राह्मण तरुण आहेत. या लग्नाप्रीत्यर्थ त्यांनीं मोठेंच मनोधैर्य व्यक्त केलें आहे. या लग्नामुळें प्रतिगामी जनतेचा विरोध त्यांना पतकरावा लागतच आहे पण आणखी आपल्या परमपूज्य मातापितरांचाही रोष त्यांनीं आपणांवर ओढून घेतला आहे. मि. सहस्रबुद्धे हे एकुलते एक चिरंजीव असूनही त्यांचे आईवडील त्यांना आशीर्वाद देण्याला आज हजर नाहींत, हें लक्षांत ठेवून आणि ध्येयसाधनासाठीं मि. सहस्रबुद्धे यांनीं केवढें सामाजिक दिव्य शिरावर घेण्याची धडाडी दाखविली आहे हें जाणून आपण हजर असलेल्या मंडळींनीं त्यांच्या लग्नप्रसंगीं हार्दिक शुभेच्छा ठेऊन वधुवरांचें भावी आयुष्य अत्यंत सुखपूर्ण व समाजाला हितकर होवो असे मनःपूर्वक आशीर्वाद द्यावे."

हें भाषण वक्त्यांनीं इतकें कळकळीनें केलें कीं मंडपांतील लोक खरोखरीच मनोमन आशीर्वाद देत असावेत अशी गंभीर शांतता पसरली. वक्त्यांनीं श्रोत्यांचीं अंतःकरणें लग्नसमारंभाला अत्यंत अनुकूल करून घेतलीं परंतु पुन्हां एकदां कौस्तुभाच्या ध्येयवादित्वाचा ठसा त्यांनीं कीर्तीच्या प्रेमी हृदयावर तप्तमुद्रेप्रमाणें कोरला. तिला वेदना होऊं लागल्या.

कौस्तुभाचें ध्येयवादित्व ! सर्वांना त्याचीच भुरळ पडली होती. त्याचंच महत्त्व वाटत होतं !

भाषण ऐकतां ऐकतां कीर्तीची मान खालीं गेली. व्यासपीठावर अंथरलेल्या गालिच्याची नकशी तिनें आजपर्यंत इतकी कधीं निरखून पाहिली नसेल ! त्या नकशीइतकेंच जणूं तिचें भवितव्यही तिला गुंतागुंतीचें वाटत असावें !

दादासाहेबांनीं सचिंतपणें किती वेळां तरी किर्तीकडे बघितलें.

नंतर एक चर्मकार जातींतले, दादासाहेबांचा उजवा हात म्हणून सामाजिक कार्य करणारे व धंद्यानें शिक्षक असलेले गृहस्थ बोलावयास उठले.

तेही थोडाच वेळ बोलले. पण त्यांनींही दादासाहेबांनीं आज अत्युच्च ध्येय गांठलें आणि पायदळीं गेलेल्या चर्मकार जातीला अभिमानाचा दिवस दाखवला म्हणून दादासाहेबांचें अभिनंदन केलें.

लोकांनीं टाळ्या वाजवून कौस्तुभाचें अभिनंदन केलें होतें. आतां त्यांनीं त्याच प्रकारानें दादासाहेबांचें अभिनंदन केलें.

कीर्तीच्या डोक्यांत त्या टाळ्यांच्या कडकडाटानें घणाचे घांव बसल्याप्रमाणें होऊं लागलें. डावा हात तिनें कपाळावर दाबून धरला. तिला वाटलें, असेंच उठून ताडदिशीं सांगावें कीं नाहीं मला लग्न करायचें.

तितक्यांत दादासाहेबांचा शब्द ऐकून दचकल्याप्रमाणें तिनें वर मान केली. ते तिच्या खांद्यावर हात ठेऊन म्हणत होते, "ऊठ कीर्ति."

दादासाहेबांच्या दृष्टींत जी स्निग्धता, जें कारुण्य उमटलेलं होतं तें पाहून, त्यांच्या स्वरांत जी दुःखकातरता ध्वनित झाली होती ती ऐकून, समुद्राच्या लाटेनें वाळूचा किल्ला ढांसळावा तसा कीर्तीचा नकाराचा बेत ढांसळूं लागला. मंडपांत आतां निस्सीम शांतता पसरली होती. पण प्रत्येकजण आपल्याला ऊठ ऊठ म्हणत आहेसें तिला भासलें. इतक्या सर्वांच्या इच्छामात्रेकरून भारल्याप्रमाणें ती उठली.

लग्न नोंदण्याचें सुरूं झालें. कीर्ति स्वप्नांत असल्याप्रमाणें उत्तरें देत होती. दादासाहेबांनीं तिचा हात कौस्तुभाच्या हातीं देण्याकरतां उचलला तेव्हां ती असहायपणें दादासाहेबांच्याकडे पाहूं लागली. दादासाहेबांच्या डोळयांत अक्षरशः अश्रू आले होते.

कौस्तुभानें कीर्तीचा हात हातीं घेतला तेव्हां दादासाहेबांनीं अशा व्याकुळतेनें त्याच्याकडे पाहिलें कीं, " माझा हा अमोल ठेवा रक्षण कर बरं. "

कौस्तुभानें अत्यादरानें कीर्तीचा हात आपल्या हृदयाशीं क्षणभर धरला, आणि त्यानें कीर्तीकडे पाहिलें. लग्नसभारंभापूर्वी कौस्तुभाचा आनंद, त्याचें सहास्य मुख आणि बारीकसारीक हालचालींतसुद्धां व्यक्त होत होता; परंतु प्रत्यक्ष समारंभ सुरू झाला तेव्हां तो अत्यंत गंभीर झाला होता. आपल्या आयुष्यांतील अत्यंत आनंदाची तर खरीच पण महत्त्वाचीही गोष्ट घडत असल्याची पुरेपुर जाणीव त्याला होती. त्याच्या दृष्टीनें कीर्तीला असाच बहुविध संदेश दिला.

पण तो संदेश समजण्याच्या मनस्थितींत कीर्ति नव्हती. कौस्तुभाच्या हस्तस्पर्शानं, त्यानें हृदयाशीं तिचा हात नेला त्या कृतीनें, उकळत्या पाण्याच्या वाफेला जरासा शीतल वायूचा स्पर्श होतांच तिचें दंवबिंदूंत रूपांतर होतें त्याप्रमाणें कीर्तीच्या दुःखाच्या कढाची वाफ तिच्या नेत्रांतून मोत्यांच्या दाण्याप्रमाणें तिच्या गालांवर ओघळली. कीर्तीनें चटदिशीं मान वळवली आणि ब्लाऊजच्या खिशांतून चिमुकला रेशमी रुमाल काढून ते अश्रुबिंदु टिपले.

लोकांना कीर्तीच्या मनस्थितीची जाणीव नसल्यानें या भावनाविष्काराची त्यांना मौज वाटून हंसूंच आलें. कांहीं बायका म्हणाल्यासुद्धां कीं, इतक्या शिकलेल्या विलायतेला जाऊन आलेल्या नी प्रीतिविवाह करणाऱ्या मुलीलासुद्धां शेवटीं लग्नाच्या वेळीं रडूं यावं ना ?

त्या दोन अश्रूंनीं फार मोठें कार्य साधलें. त्यांनीं कीर्तीचें भारावलेलें मन हलकें केलें आणि तिला जरा ओशाळल्यासारखें होऊन हंसूंही आलें. मग शीलेनें हातीं दिलेला सुंदर हार कीर्तीनें सहास्य मुखानें कौस्तुभाच्या कंठांत घातला व कौस्तुभाच्या हाराचा स्वीकार करण्याकरतां तिनें मान खालीं केली.

हार घालीत असतां वेदीवरील सर्व दिवे मालवण्यांत येऊन, वधुवरांवर गुलाबी प्रकाशाचा झोत पाडण्यांत आला होता. हार घालून होतांच त्याच प्रकाशांत सोनेरी छटा मिसळण्यांत आली आणि लगेच वर टांगलेल्या विमानांतून उभयतां वधुवरांवर पुष्पवृष्टि झाली. ती जणूं सुवर्णपुष्पेंच दिसत होतीं !

तो सुरम्य देखावा बघत असतां लोकांनीं पुन्हां एकदां टाळ्यांच्या कडकडाटांत वधुवरांचें अभिनंदन केलें.

पुष्पवृष्टीच्या वेळीं रजिस्ट्रार जवळच असल्यामुळें त्यांच्याही डोक्यावर फुलें पडलीं, तेव्हां इतक्या घाईत आणि अशा हास्यकारक मुद्रेनें त्यांनीं डोकें झाडलें कीं कीर्तीसुद्धां सर्वांना हंसूं आलें.

पुन्हां वेदीवर सर्व विद्युद्दीप लागले.

मग आणखी थोडी गंमत झाली.

किर्ति आपली नवी सही, सौ. कीर्ति सहस्रबुद्धे अशी करीत असतां कौस्तुभ टेबलावर दोन्ही कोपर टेकून व पंजांवर तोंड टेकून हंसून बघत होता. ती जाणीव होतांच, पेन किंचित् थांबवून तिनें डोळ्यांच्या कोपऱ्यांतून त्याच्याकडे पाहिलें व लगेंच तिनें डाव्या हाताचा आडोसा करून कौस्तुभाला दिसूं न देतां बाकीची सही संपविली नी मग ती खोडसाळपणानें त्याच्याकडे बघून हंसली.

शीलेनें व्हायोलिनच्या साथीसह आपल्या सुरेल मधुर आवाजांत स्वतः रचलेलें पद म्हटल्यावर निमंत्रितांना पानसुपारी, अत्तरफुलें देण्यांत आलीं

मागून सर्वांचीं अभिनंदनें आणि शेकडों देणग्या स्वीकारतांना कीर्तिकौस्तुभांना पुरेसें होऊन गेलें.

सर्व लोक प्रसन्नपणें म्हणत होते, “ तुम्ही दोघे परस्परांना इतके अनुरूप आहां कीं, कुणाचं जास्त अभिनंदन करावं हेंच कळत नाहीं मुळीं. ”

" अरी, मैं क्या करूंगी ? मेरे मनमे फूले न समाते. " मेरीच्या डोळ्यांतून अश्रुधारांचा लोट चालला होता. घाईघाईनें उपाहाराची तयारी करण्याच्या गडबडींत असतांच ती इतर नोकरांबरोबर संधि साधून मंडपांतला लग्नसमारंभ बघत होती. आणि कुणी रडतेस कशाला म्हणून विचारल्यास " माझा आनंद मनांत मावत नाहीं " म्हणून ती एप्रनला डोळे पुसून हसत असे. पण तें हंसणें हुंदक्यांच्या भावंडांप्रमाणें भासत असे.

मागल्या व्हरांड्यांत आणि बागेंत टेबलें मांडून अल्पाहाराची तयारी करण्यांत आली होती. मध्यवर्ती असलेल्या मोठ्या टेबलावर वेडिंगकेक ठेवली होती. कौस्तुभानें कीर्तीला याच टेबलाशीं आणलें, त्यांच्याबरोबरच दादासाहेब, निवडक सन्मान्य पाहुण्यांशीं बोलत तेथें आले. युरोपिअन व पारशी स्त्रीपुरुष याच टेबलाशीं होते.

दादासाहेबांनीं स्वतः सर्वत्र हिंडून सर्वांची नीट सोय आहे कीं नाहीं तें पाहिलें. त्यांचे कित्येक मित्र सर्व समारंभाच्या तयारींत आपुलकीनें मदत करीत होते, ते आणि शीला व धारिणी सगळीकडे हिंडून काय हवें नको तें बघत होत्या.

क्रिश्चन लोकांच्या पद्धतीप्रमाणें कीर्तीनें कौस्तुभाच्या मदतीनें वेडिंगकेक कापली तेव्हां शीलाधारिणी तिच्याजवळच उभ्या होत्या. ती गंमत बघण्यासाठीं पुष्कळ मंडळी भोंवतीं जमली होती. भूषणही शीलेच्याजवळ येऊन उभा होता.

सर्वांना वेडिंगकेक वांटण्यांत आली. सर्वानाच विनोदाची लहर आल्यानें हंसण्याला नुसता पूर आला होता. निकेलचें नाणें कुणाच्या तुकड्यांत निघतें म्हणून सर्वांना मोठें कुतूहल वाटून राहिलें होतें. आणि तें नाणें शीलेच्या तुकड्यांत निघतांच ख्रिश्चन आणि पारशी स्त्रियांनीं " ओहो, मोठी भाग्यवान् आहेस तूं. " म्हणून तिचें अभिनंदन केलें. यावर भूषणानें सांगितलें, " आहे खरी. मला वाटतें मैत्रिणीपाठोपाठ तिचं लग्न होईल. " सिव्हिलसर्जनच्या पत्नीनें शीलेला हंसतहंसत विचारलें, " तुझें लग्न जमलेलें आहे काय ? " तेव्हां शीला फार लाजली आणि घाईनें नो नो म्हणाली. तेव्हां भूषण म्हणाला, " अलबत तिचें लग्न जमलेलें आहे. "

शीलेनें जो कांहीं रागारागानें त्याच्याकडे दृष्टिक्षेप केला. तो बघून सिव्हिल

सर्जनच्या बायकोनें मोठ्यानें चांदीच्या घंटेप्रमाणें हंसून भूषणाला विचारलें, " तूंच तिचा वाग्दत्त वर आहेस कीं काय ? "

तेव्हां भूषणानें " छे : छे: अगदीं मुळींच नाहीं. " म्हणून मोठ्या गडबडीनें अशा प्रकारें उत्तर दिलें कीं मंडळी हंसूं लागली.

एका धनाढ्य पारशाची बायको शीलेला म्हणाली, " तुझं लग्न जर अद्याप जमलेलं नसलं तर केकचा एक तुकडा रात्रीं उशींखालीं ठेऊन नीज म्हणजे तुझा प्रियकर तुला स्वप्नांत दिसेल. "

त्यावर भूषण शीलेला हळूंच म्हणाला, " जरूर तसं कर. मग तुला केसूभाई स्वप्नांत दिसेल. "

शीला खरोखर चिडली. तिच्या कपाळावर आंठ्या चढल्या. ती म्हणाली, " बरं बरं दिसूं दे केसूभाई मला. तूं पण केक उशीखालीं ठेव म्हणजे तुलापण गुलाब दिसेल. " भूषणानें हंसत हंसत बर्फीचा घांस तोंडांत असतांच उत्तर केलें, " आज दिवसभर तुला मी इतकी पाहिली आहे कीं बहुतकरून तूंच मला दिसणार. "

शीलेनें रागाचा अभिनय करून मोठाले डोळे करून मान उडवली. भूषण मिष्किलपणें हंसत दुसऱ्या टेबलाशीं गेला.

उपाहारानंतर निकटचे आप्तस्नेही खेरीज करून बाकी सर्व पाहुणे मंडळी वधु-वरांना शुभाशीर्वाद देऊन निघून गेली.

उरलेल्या मंडळींची आतां पांगापांग झाली. बरीच पुरुषमंडळी हिलवर फिरावयास गेली.

चर्मकार स्त्रिया बायाबरोबर एका खोलींत बसल्या.

कांहीं मंडळी मागल्या बागेंत तर कांहीं मंडपांत समूहानें बसून गप्पागोष्टी करूं लागली.

दादासाहेब मात्र आतां आपल्या लायब्ररींत विश्रांतीकरतां गेले.

लायब्ररीचें दार उघडतांच, कोपऱ्यांत जुडी करून बसलेल्या डयूकनें, विवळल्या-प्रमाणें भुंकून दादासाहेबांच्याकडे झेप घेतली. मागल्या पायावर उभें राहून पुढलें पाय त्यानें त्यांच्या छातीवर टेकले, आणि त्यांचें तोंड तो प्रेमानें चाटूं लागला.

दादासाहेबांना तोल गेल्याप्रमाणें होऊन त्यांनीं दाराचा टेका घेतला. ड्यूकच्या डोक्यावरून हात फिरवून, त्याला दूर सारून ते आपल्या आवडत्या आरामखुर्चीवर गलितगात्र झाल्याप्रमाणें जाऊन पडले.

दुपारपासून ड्यूकला आज लायब्ररींत कोंडलें होतें. कितीवेळ तरी त्याला दादासाहेब आणि कीर्ति यांचें दर्शनसुद्धां घडलें नव्हतें म्हणून ड्यूकला वाईट वाटलें होतें. बंगल्यांतल्या गडबडीनें आणि बँडवाजंत्रीच्या आवाजानें तर तो घाबरून थरथर कांपत कोपऱ्यांत पडला होता. खाण्याच्या बशीला त्यानें तोंड लावलें नव्हतें.

# — १७ —

कीर्तीही कांहींतरी सबबीवर आपल्या खोलींत निसटली.

कीर्तीच्या टेबलावर अभिनंदनपर तारांचा आणि पत्रांचा नुसता ढीग पडला होता. तीं उघडून बघायला कुणाला फुरसत झाली होती !

या वेळीं देखील कीर्तीला तें टपाल उघडून वाचण्याविषयीं अनुत्सुकताच वाटत होती. ती अगदीं दमून गेली होती. अर्धा तास स्वस्थ पडून रहावें असें तिला वाटत होतें. या बेतानुसार ती आरामखुर्चीवर बसली देखील. पण पांच मिनिटांत तिला वाटूं लागलें, बघूं या तर एकदां कुणी कुणी पत्रं नी तारा पाठवल्या आहेत त्या. अशी इच्छा होऊनही कीर्तीच्या शरिरानें दोन तीन मिनिटें उठावयाचें नाकारलेंच, पण शेवटीं तिच्या मनाला अगदीं चैन पडेनासें होऊन ती उठून टेबलाशीं येऊन बसली.

तारांतील मोजक्या शब्दांचीं अभिनंदनें वाचतांनाही कीर्तीचें चित्त खुलूं लागलें. हीं अनुपस्थित मित्रमंडळी या अभिनंदनपर शब्दांच्या द्वारें आपल्या मस्तकावर मंगलमय, शीतल कुंकुमाक्षतांचा वर्षाव करीत आहेत असें तिला वाटलें.

तारा वाचून झाल्यावर कीर्तीनें झराझर पत्रें फोडण्यास प्रारंभ केला. पत्रेंसुद्धां पांच दहा ओळींची व ठराविक मजकुराचींच होतीं. परंतु त्या ठराविक शब्दांच्या ठराविक वाक्यांतूनही कीर्तीला, प्रत्येक पत्र पाठविणाऱ्या व्यक्तीचें विशिष्ट स्वभावदर्शन होऊन, पत्रांत औपचारिकपणा, अंतःस्फूर्ति, खरा आनंद, अशा प्रकारच्या भावना प्रतीत होऊं लागल्या तेव्हां तिला मोठी मौज वाटून आणखी वाचण्यासाठीं तिला उत्सुकता वाटूं लागली. कदाचित् अगोदर सही व वरील मायना वाचल्यामुळें आपली अंतःकरणप्रवृत्ति आधींच तयार होऊन पुढील भावना आपोआपच आपल्याला जाणवत असाव्या तसा विचार मनांत येऊन मायना आणि सही न वाचतां आधीं पत्र वाचून मनावर काय परिणाम होतो तो अजमावून नंतर मग मायना आणि पत्राखालची सही वाचायची असें ठरवून ती सही आणि मायना यांवर हात ठेवून पत्रें वाचूं लागली. अर्थात् ओळखीच्या हस्ताक्षरांचीं थोडीं पत्रें आपोआपच गौप्यस्फोट करीत असत.

या गंमतीचा कंटाळा येतांच कीर्तीच्या मनानें एक नवीनच चाळा सुरू केला. पत्र वाचल्यावर, कुणाचं बरं हें असावं, असे तर्क तें लढवूं लागलें.

अशा प्रकारें कीर्ति रमली असतां शेवटीं एक पत्र शिल्लक राहिलें. हिमदुग्ध खातां खातां शेवटचा चमचा राहिला म्हणजे ज्याप्रमाणें मनुष्य क्षणभर थांबून, संपलं आतां, म्हणून मग त्याचें सावकाश सेवन करतो त्याप्रमाणें कीर्ति किंचित् थांबली. मायना व सही यांवर दोन्ही हात धरून मजकूर वाचण्यापूर्वी तिनें मनाला बजावलें, " आतां ही अभिनंदनपर शब्दांची शेवटली सुखमय सुमवृष्टि हं. शक्य तितकी मौज मानून घे. "

नंतर तिनें तें पत्र वाचण्यास सुरवात केली.

तें पत्र !

तें कीर्तीनें वाचण्यापूर्वीच जर कुणीतरी आल्यामुळें तें वाचण्याचें राहून गेलें असतें तर—

पण कुणीही त्यावेळीं आलें नाहीं.

कीर्तीनें मजकुरावरूनच दृष्टि फिरवण्यास सुरवात केली. पत्र इंग्रजींत होतें.

" आयुष्यांतील सहचर निवडून तूं आतां संसारोद्यानांत पहिलें पाऊल टाकण्यास उद्युक्त झाल्याबद्दल मी तुझें हार्दिक अभिनंदन करीत आहें. नंदनवनांतील सर्व स्वर्गीय सौख्यें तुम्हां उभयतांना तेथें उपभोगण्यास मिळोत अशी सदिच्छा आहे."

कीर्ति मनांत म्हणाली, " किती सुंदर लिहिलं आहे पत्र ! हार्दिक हा शब्द अगदीं कसा योग्य वाटतो. " ती पुढें वाचूं लागली.

" तुझं अभिनंदन करतांना मला जितका मन:पूर्वक आनंद वाटत आहे तितकाच अभिमानही वाटतो आहे. याचं कारण म्हणजे पांच वर्षांपूर्वी आपण जातिविषयक वादविवाद करीत असतां अत्यंत तेजस्वी वाणीनं उच्चारून दाखवलेलं तें प्रतिज्ञावजा वाक्य आम्हांला वाटत होतं त्याचप्रमाणें वाऱ्यावर विरून जाऊं न देतां, तूं तें अखेर पूर्णार्थानं सिद्ध करून दाखवलंस. "

कीर्ति आठवण करूं लागली, " मी कधीं बाई काय बोललें होतें ? नी मी काय सिद्ध करून दाखवलं आहे ? वाचूं या पुढें म्हणजे समजेल. "

" तूं आम्हांला जेव्हां ध्येयप्रेरित होऊन सांगितलंस—किंवा प्रतिज्ञा केलीस

असंच म्हणणं जास्त सयुक्तिक ठरेल—कीं मी एकाद्या सुशिक्षित हरिजन मुलीशीं लग्न करायला तयार आहें म्हणून तेव्हां—

" कौस्तुभाला आलंय हें पत्र ! एकूण त्यानं अशी प्रतिज्ञासुद्धां केली होती तर ?"

कीर्तीच्या हांतून तें पत्र गळून पडलें. डाव्या हाताचा तळवा तिनें कपाळावर दाबून धरला. तिच्या मस्तकांत विचार धुमसूं लागले.

" ॲडॅम आणि ईव्हच्या एडनप्रमाणें आपल्या संसा च्या नंदनवनांत ह्या ध्येयाचा अजस्त्र काळसर्प पहिल्या पावलाबरोबरच, नव्हे आपल्याला न कळतां आधींच शिरलेला आहे. त्याच्या विषारी फूत्कारांमुळं विषमय बनलेल्या त्या नंदनवनांत आपल्याला सुख कुठून लाभणार ? संसाराच्या उद्यानाचं द्वार फक्त प्रेमाच्या सुवर्णवर्णी गुरुकिल्लीनंच उघडलं पाहिजे. ध्येयवादाचा दंडुकेशाही धसमुसळेपणा उपयोगी आणून तें उद्यान बेचिराख झाल्यावर त्यांत रहाण्यांत मौज काय ? मग अजाणतां त्यांत घातलेलं पहिलं पाऊल जर मागें घेतलं तर कुठें बिघडलं ?

पण तें मागें घेतलेलं पाऊल आतां कुठें पडेल ?

कुठंही पडलं तरी तेथें आपल्या पावलाशेजारीं कौस्तुभाचं पाऊल पडतां कामा नये. तें मागें घेतलेलं पाऊल माझं एकटीचंच असलं पाहिजे ! "

कीर्तीनें खुर्चीच्या हातावरील गाद्या इतक्या गच्च पकडून धरल्या कीं तिचीं अंगुलिकाग्रें लालभडक दिसूं लागून नखांना लावलेला रंग ठिबकून आलेल्या रक्तबिंदूंप्रमाणें भासूं लागला.

जणुं कौस्तुभापासून तिला कुणी हट्टानें दूर ओढून नेत होत आणि कीर्ति संसारोद्यानाच दार गच्च पकडून प्रतिकार करीत होती.

" कौस्तुभावांचून आयुष्य ! नाहीं. नाहीं. कौस्तुभावांचून आयुष्य कंठणं मला शक्य नाहीं. शक्य नाहीं. "

असा उद्गार काढून कीर्तीनें मानसिक दृष्ट्या जणूं बाहेर काढलेलें पाऊल पुन्हां आंत टाकलें.

पण तेथेंही तिला प्रेमामृताविना बेचिराख झालेला प्रदेशच दिसूं लागला.

तेथें कीर्तीची अंतर्दृष्टि भिरीभिरीं हिंडून कौस्तुभाचा शोध घेऊं लागली.

बाह्यतः मात्र कीर्ति एकाद्या चित्रासारखी निश्चल बसली होती. तिचा प्रथम जलद चाललेला श्वास जड होतां होतां शेवटीं कांहीं क्षण जणूं अगदीं थांबल्यासारखा झाला होता. तिची मुखचर्या संगमरवरी पुतळीसारखीच पांढरीफटक पडली असून ओष्ठद्वयावरील रक्तरंगामुळें आणि कपोलभागावरील गुलाबी रंगामुळें ती पांडुरता द्विगुणितच झाल्यासारखी दिसत होती. जणुं पांढऱ्याशुभ्र टपोऱ्या मोगऱ्याचीं फुलें पसरून त्यांतच दोन गुलाबाचीं उमललेलीं फुलें आणि एक तांबडी गुलाबकलिका ठेवून दिली होती.

कीर्तीच्या अंतर्दृष्टीला तेथें कौस्तुभ सांपडला, परंतु त्याची पाठ कीर्तीकडे असून ध्येयदीपावर दृष्टि ठेऊन धीरगंभीर पावलें टाकीत तो चालला होता.

आणि कौस्तुभाच्या प्रीतीची सावली कीर्तीच्या पायदळीं आली होती.

रोबोटच्या यांत्रिक पुतळींत विद्युच्छक्तीनें चेतना निर्माण केल्याबरोबर तिचं सर्वांग थरथरावें त्याप्रमाणें कीर्तीचें सर्व शरीर क्रोधभरानें थरथर कांपूं लागलें. तिनें आपला उजवा पाय जोरान आपटला.

रात्रींची जेवणावळ व पानसुपारी आटपतांच मागील बागेंत आतषबाजीचें काम सुरू झालें. विजय बंगल्यांतील पाहुणेमंडळी बागेंत किंवा माडीवरील खिडक्यांमधून किंवा गच्चीवरून हौसेला येईल त्याप्रमाणें उभी होती. दारूकाम सुरू होतांच आस-पासच्या बंगल्यांतील खिडक्यांमधूनही गुजराथी, पारशी, मुसलमान मुलें व स्त्रीपुरुष दाटीवाटीनें मौज पहाण्याकरतां उभे राहिलेले दिसत होते. कांहीं मुलें तर बंगल्यांतच येऊन दारूकाम उडत असतां जवळ उभीं राहून आनंदोद्गार व मधून मधून भीत्युद्गार काढीत होती. कीर्ति बागेंतच वाचनालयाच्या बाहेरच्या भिंतीशीं आपल्या सख्या व आणखीही कांहीं स्त्रियांसमवेत गंमत पहात होती.

उद्यानोपहारानंतर कौस्तुभ एकटाच हिलवर निसटला होता. पण फार वेळ त्याला बाहेर रहावेना. बंगल्यांत येतांच कीर्तीच्या खोलींत मंडळी बसल्याचें त्याला समजलें पण त्याला तेथें जावेसें वाटेना. इकडेतिकडे हिंडून वाचून त्यानें कसातरी वेळ काढला. जेवणाच्या वेळींही तेथें सर्व मंडळी एकत्र जमली तेव्हांही कीर्तीच्या निकट सह-वासाची विलक्षण आतुरता वाटत असूनही तो तिच्यापासून शक्य तों दूरच राहिला. एक प्रकारचं लज्जापटल तिच्या आपल्यामधें निर्माण झालें आहे असें त्याला जाणवलें.

कीर्तीची खिन्नता त्याला गांभिर्याप्रमाणें वाटली. कीर्ति वर मान करून आपल्याकडे पहात नाहीं हें बघून कौस्तुभाला वाटलें तिच्याही मनावर लज्जेचें दडपण पडलें असावें, आणि आपल्या विषयींचें प्रेम उसन्या गांभिर्यानें ती इतरांच्या दृष्टिआड लपवीत आहे. या विचारामुळें तिचें गांभिर्य त्याला अधिकच मनोज्ञ भासूं लागलें.

कौस्तुभ यावेळीं भूषण, उमाकांत, दादासाहेब वगैरे मंडळीबरोबरच बागेंत होता.

चंद्रज्योत उजळतांच त्या प्रकाशांत विलक्षण सुंदर दिसत असलेल्या कीर्तीकडे पहात असतां कौस्तुभाला वाटल कीं, आकाशांत उगवण्यापूर्वी चंद्रमा येथेंच तर आधीं नाहीं ना आला ? अन् मग कौस्तुभाच्या हृदयाला सागराप्रमाणें आनंदाचें जसें भरतें आलें.

झाडामधून रंगीबेरंगी शोभिवंत गोळ उडून त्यांचे रंगीबेरंगी किरण सौंदर्य उधळूं लागले तेव्हां कौस्तुभाच्या मनांत विचार आला, “ माझ्या कीर्तीचे सद्गुणही असेच विविधपरीचे व मनोहर आहेत. त्यांची प्रभा अशीच सुखप्रेरक आहे. ”

जवळ जवळ येऊं लागलेल्या मुलांना मागें पिटाळून लावल्यावर शेजारीं शेजारीं ठेऊन दोन नळे लावण्यांत आले.

कारंज्यांतील जलधारांप्रमाणें त्या नळ्यांतून पांढरेशुभ्र फवारे वर उडून अपूर्व शोभा पसरवूं लागले. डोळे नुसते दिपून गेले. कौस्तुभ प्रसन्नपणें मनांत म्हणाला, " आमची उभयतांची प्रीति अशीच तेजस्वी आणि अप्रतिम शोभाशाली आहे. "

आणि दारूच्या झाडांतले चक्र जेव्हां गुलालगोटे उधळीत गरगरां फिरूं लागले तेव्हां कौस्तुभाला वाटलें कीं कीर्तीच्या निरंतर सहवासांत आपलें आयुष्यही असेंच विविध परीचें सौंदर्य व सुख उधळीत दिवसामागें दिवस करीत भराभर जाईल. केवढा मी भाग्यवान् ! "

इकडे चंद्रज्योत उजळतांच बागेंतून येणाऱ्या वाऱ्यानें तिचा सर्व धूर बायकांच्या बाजूला आणला. सगळ्याजणीं खोकूं लागल्या. कीर्ति तर धुरामुळें गुदमरून गेली.

कीर्तीचें मनही असेंच शोकजनक विचारांनीं गुदमरलें होतें. ती आतषबाजीची गंमत पहायला म्हणून उभी होती पण तिला यत्किंचित् मौज वाटत नव्हती. तिला वाटलें, " ही चंद्रज्योत उजळतांना पाहून लोकांना किती आनंद वाटतो. माझ्या आजच्या लग्नसमारंभानें लोक अगदीं खूष झाले आहेत. पण त्यांना कुठें कल्पना आहे कीं या दारूप्रमाणेंच माझ्या सुखाचीही होळी चालली आहे म्हणून. या झाडाच्या रंगीबेरंगी गोळ्यांप्रमाणेंच माझ्या भावी आयुष्यासंबंधींचीं मोहक मनोराज्येंही मनाला आकर्षून घेऊन क्षणभरांत साबणाच्या फुग्याप्रमाणें फटाफट फुटून नष्ट होणार. या शेजारीं शेजारीं उडणाऱ्या नळ्यांप्रमाणें आमचीं आयुष्यें जरी एकत्र गेलीं तरी तीं एकजीव कधीं होणार नाहींत. मला प्रेम हवं आणि कौस्तुभाला ध्येय सर्वश्रेष्ठ वाटतं. "

दारूच्या गरगरां फिरणाऱ्या चक्राप्रमाणें कीर्तीचें विचारचक्र फिरत होतें. त्यांतून तिच्या मनाला करपवून टाकणारे अग्निस्फुलिंग बाहेर पडत होते.

अर्ध्यापाऊण तासांत आतषबाजी खलास झाली. शीलाधारिणीनीं कीर्तीचा निरोप घेतला. कांहींच न बोलतां नुसती मान हलवून कीर्तीनें त्यांना होकार दिला. लगेच मेरीनें तिचा हात धरून माडीवरील रस्ता पकडला. कीर्ति निःशब्दपणें तिच्यामागें गेली.

मेरीनें आपल्याला आपल्या रोजच्या शयनगृहांत आणलेलें नाहीं हें कीर्तीच्या लक्षांतसुद्धां आलें नाहीं. त्या खोलींतील पुष्पमाला व गुच्छ यांची सजावट व मंचकाचा साजशृंगार मेरीनें खुबिदारपणें आणि अभिमानानें हंसून दाखविला, तेव्हां कीर्तीनें आपली नजर सर्वत्र फिरवली. पण पाहिलेल्या वस्तूंची नोंद तिच्या मेंदूकडे पोंचली नाहीं. आणि शेवटीं भिडस्तपणानें हळू आवाजांत व संकोचानें जरा हंसत मेरी चारसहा वाक्यें बोलली तींही तिनें ऐकलीं नाहींत आणि मेरीनें पुष्कळ वर्षांच्या नोकरीच्या अधिकारांत कीर्तीच्या पाठीवरून ममतेनें हात फिरवून तिला गुडनाईट करून जातां जातां दार ओढून घेतलें तरी कीर्ति जागच्याजागींच विमनस्क-पणें कुठेंतरी पहात उभी राहिली.

दोन तीन मिनिटें एकाच ठिकाणीं बघून तारवटल्यावर तिची दृष्टि आपोआपच खोलींत फिरूं लागली. इतका वेळ जणुं बेशुद्ध झालेल्या तिच्या अंतरिंद्रियानेंही हळू हळू नोंद करण्यास प्रारंभ केला.

प्रथम कीर्तीला समजलें कीं आपण खोलींत एकट्या असून मेरी निघून गेली आहे.

परिस्थितीची जाणीव होतांच ती त्वरेनें दाराकडे गेली व त्या बंद दाराला पाठ लावून ती उभी राहिली. तिच्या डाव्या हातानें सरककडीची मूठ गच्च पकडून धरली होती व ती कडी सरकविण्यासाठीं बोटें चाळवाचाळव करीत होतीं. कडी लावूं कीं नको हा विचार निश्चित होत नसल्यामुळें कीर्ति त्रस्त होऊन गेली. कडीची मूठ बोटांना लागेल इतक्या जोरानें आंवळून तिनें आपलें उजवें पाऊलही आपटलें. नंतर एकदम वळून असुरी विजयानें हंसत तिनें घरंदिशीं कडी सरकवून दार आंतून बंद करून घेतलें.

नंतर सर्व विचारांचें वादळ थांबून सर्व स्वच्छ दिसूं लागल्याप्रमाणें भिरीभिरीं तिनें इकडेतिकडे पाहिलें.

"आईची खोली ही !" असें अती आश्चर्यानें मनाशीं म्हणत, ड्रेसिंगटेबलावर टांगलेल्या गीताबाई आणि दादासाहेब यांच्या एकत्र काढलेल्या फोटोजवळ जाऊन ती उभी राहिली. किती वेळ तरी ती त्या फोटोकडे पहातच होती.

नंतर भावनोद्रेकानें तिनें हांक मारली, "आई ! दादासाहेब !"

कांहीं क्षणांनीं कीर्ति मंद गतीनें एका कोचावर जाऊन बसली.

पुन्हां तिच्या विचारांचा गोंधळ उडाला होता. कसें वागावें हेंच तिला समजेनासें झालें. दोन तीन वेळां दाराच्या कडीकडे संभ्रमानें बघून ती उठूं लागली होती पण पूर्ण निश्चय न होऊन ती पुन्हां बसली.

कौस्तुभाची प्रतिज्ञा, वाचनालयांत जातां जाता कौस्तुभाचें ऐकलेलें वाक्य आणि आपल्या स्वर्गस्थ आईला काय वाटेल, दादासाहेबांना काय वाटेल, लोकांना काय वाटेल या विचारांनीं तिच्या हृदयाची खेंचाखेंच चालवली होती. क्षणांत तिला कौस्तुभाविषयीं प्रेम वाटे, तर क्षणांत संतापानें ती जळूं लागे, आणि तिसऱ्या क्षणीं स्वत:विषयीं ती खिन्न होऊन जाई.

आणि अशा मनस्थितीत असतांच तिला दारावर टिकटिक आवाज ऐकूं आला.

* * *

लवकरच सर्व मंडळी निघून गेल्यावर दादासाहेबांच्या आज्ञेवरून केव्हांपासून भोंवतीं भोंवतीं घुटमळणाऱ्या एडीबरोबर कौस्तुभ वर गेला.

आणखी पंधरावीस मिनिटांनीं सर्वांची विचारपूस करून दादासाहेब आपल्या शय्यागृहाकडे निघाले. त्यांच्याशेजारींच असलेलें कीर्तीचें नेहमीचें शय्यागृह आज अंधारमग्न झालें होतें. असें कां या गोष्टीचा छडा लावण्याकरतां ड्यूक निघाला होता. पण दादासाहेबांनीं कमअलॉंग बॉय म्हणून त्याला परत बोलावलें. जिन्याच्या पलीकडल्या टोकाशीं असलेल्या दोन खोल्यांतून प्रकाशकिरण बाहेर पडत होते. त्या प्रकाशकिरणांनीं दादासाहेबांना जणुं पूर्वस्मृति दाखवून दिल्या.

त्या खोल्या गीताबाईंच्या वापरण्यांत पूर्वी होत्या. तेथें दादासाहेबांनीं पत्नीसमवेत कांहीं वर्षें अतीव सुखाचे क्षण घालवले होते. गीताबाई गेल्यापासून त्या खोल्या बंद करून ठेवलेल्या होत्या.

पण आज आपल्या लाडक्या कीर्तीकरतां दादासाहेबांनीं त्या खोल्या शृंगारून घेतल्या होत्या.

पूर्वस्मृतींच्या आठवणीनीं दादासाहेब क्षणकाल मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणें जिन्याशींच थांबून उभे राहिले, त्यांचें मस्तक आदरानें किंचित् विनम्र झालें. नंतर एक निश्वास टाकून त्यांनीं आपल्या शय्यागृहाकडे पावलें टाकण्यास प्रारंभ केला.

पावलागणिक आपल्या पायांत हरिणाजिनाच्या सपाता नसून जड शिशाचे बूट आहेत, आणि आपल्या हृदयाभोंवतींही घणाचे घांव घालीत कुणीतरी पोलादाचा पट्टा अधिकाधिक घट्ट आंवळीत आहे असा त्यांना भास होत होता.

त्यांची लाडकी-लाडकी कीर्ति ! आज परक्याची झाली होती.

**अर्थो हि कन्या परकीय एव ।**

कण्वमुनि आणि आपण ! शकुंतला ! किती दोघांच्या परिस्थितींत साम्य ! !

# — १९ —

सुस्वर संगीत कानावर पडत असलें कीं मनुष्याचीं पावलें आपोआपच तालांत पडूं लागतात. कौस्तुभाच्या अंतःकरणांत मधुमधुर भावनांच्या कोमल स्वरलहरी निनादून राहिल्या होत्या, आणि त्यांकडे लक्ष देतदेतच जणूं तो मंद गतीनें एडी-बरोबर चालला होता.

एडीनें कौस्तुभाला एका अपरिचित खोलीच्या दरवाजाशीं आणून सोडलें व मोठ्या गंभीरपणानें व अदबीनें सलाम करून व गुडनाईट म्हणून तो निघून गेला.

दारावर उजवा हात ठेऊन कौस्तुभ दोन चार क्षण तेथेंच थबकला. त्यावेळीं जर त्याला कुणी विचारलें असतें कीं स्वर्ग आणि पृथ्वी यांत अंतर किती तर त्यानें ताबडतोब सांगितलें असतें कीं फक्त या दाराइतकेंच.

नंतर विलक्षण उत्कंठेनें त्यानें दारावर टिकटिक केलें.

सुमारें अर्धें मिनिट तो थांबला नंतर अधीरतेनें त्यानें जरा जोरांतच टकटक केलें पुन्हां तो जरा थांबला. मग पुन्हां एकदां त्यानें हात वर उचलला.

तितक्यांत दाराची कडी सरकल्याचें त्याला ऐकूं आलें. यत्किंचित् विलंब न लावतां दार आंत ढकलून कौस्तुभानें आंत प्रवेश केला, व झटकन् दार लावून बाहू पसरून शेजारींच उभ्या असलेल्या कीर्तीला त्यानें गाढालिंगनांत घेऊन आपलें तोंड खालीं वांकवलें.

पण कौस्तुभाची मिठी आपोआप सैल पडली. कीर्तीकडे भयस्तिमिततेनें पहात पहातच तो चार पावलें मागें सरकला. जणूं ही कीर्तीच आहे कीं भावनाशून्य अशी संगमवरी पुतळी आहे असा भ्रम पडून खरें खोटें पहाण्यासाठींच तो जरा मागें झाला, आणि नीट बघूनही खात्री होत नाहीं अशाप्रकारें त्यानें हांक मारली, " कीर्ति. "

कीर्तीनें अशरणतेनें त्याच्याकडे पाहिलें. पण तिनें अवाक्षरही उच्चारलें नाहीं. डावी मूठ उजव्या पंजानें आंवळून धरून ती ती आणखी आणखीच आंवळीत होती.

कौस्तुभानें पुन्हां दबकलेल्या आवाजांत उच्चार केला, " कीर्ति. "

कीर्ति खालीं मान घालून उभी होती. धांप लागल्याप्रमाणें तिचें वक्षस्थळ वरखालीं होत होतें.

दोन पावलें पुढें होऊन कौस्तुभानें कोमलतेनें प्रश्न केला, " भ्यायलीस तूं ? "

कीर्तीच्या दोन भुंवयांमध्यें पडलेल्या दोन आंठ्या व ओठांची मुरड बघून त्यानें अगतिकपणें जरा त्रासूनच विचारलें, " कीर्ति, काय झालंय तुला ? "

कीर्ति संतापून म्हणाली, " काय व्हायचं राह्यलंय आतां कौस्तुभ ? "

" म्हणजे काय ? "

" म्हणजे काय असायचं ? तुझ्या जन्माचं ध्येय तुला साध्य झालं ना ? मग झालं तर. "

काय उत्तर आणि कशाप्रकारें द्यावें तेंच कौस्तुभाला समजेना. अनाठायीं विनोद सुचून तो उत्तरला, " माझी कीर्ति आणि माझं ध्येय दोन नाहींतच मुळीं. "

कीर्ति उपरोधानें म्हणाली, " खरं आहे कौस्तुभ, तुझं ध्येय म्हणजेच मी. यापेक्षां जास्त तुला माझी किंमत नाहीं. "

" तुझ्या बोलण्याचा रोख काय आहे तेंच मुळीं मला समजत नाहीं. " कौस्तुभ विषादमय हंसून म्हणाला.

कीर्ति जहरी स्वरांत बोलली, " तुझा ध्येयवाद मात्र समजतो ना नीट ? मग बाकी कांहीं समजून काय करायचं तुला ? "

हिरव्यागार तृणांकुरांच्या मृदु, शीतल स्पर्शासाठीं आसावलेलीं पाउलें प्रवाश्यानें त्यावर ठेवावीं तों तीं भेगेंत पडून खोल खोल रुतत जावीं तसेंच कौस्तुभाला वाटलें. जणुं अशाच व्याकुलतेनें तो उभा असलेल्या जागेवरून दोन पावलें मागें सरला. नंतर विचारांच्या भरांत डाव्या पंजाच्या बोटांनीं डाव्या कानशिलावरील एक केसगुच्छ पकडून त्याची चाळवाचाळव करीत तो खोलींत येरझारा घालूं लागला. दोन चार फेऱ्या घातल्यावर अगतिक झाल्याप्रमाणें टेबलाशेजारील कोचावर तो बसला आणि संभ्रमित दृष्टीनें त्यानें कीर्तीकडे पाहिलें. एक शब्दही तो बोलला नाहीं.

कीर्ति जागच्याजागींच उभी राहून कौस्तुभाची प्रत्येक हालचाल, तीवर आयुष्याचें सर्व सुखदुःख जणुं अवलंबून असल्याप्रमाणें निरीक्षित होती. आपल्या अंतःकरणांत उसळलेला आगीचा कल्लोळ विझवण्याकरतां कौस्तुभ तोंडाची वाफसुद्धां

द्यायला तयार नाहीं असें वाटून कीर्ति आणखीच दुःखदग्ध झाली. संतप्त मनःस्थितींत ती कौस्तुभापुढें येऊन उभी राहिली आणि तिनें सवाल टाकला, " कौस्तुभ, तूं बेंगलोरला शिकत असतांना अशी प्रतिज्ञा केली होतीस कीं लग्न करीन तर एखाद्या हरिजन मुलीशींच करीन म्हणून ? "

कीर्ति आपल्याकडे येत असलेली पाहून, कौस्तुभ स्तिमितपणें तिच्याकडे बघत होता. कीर्तीनें विचारलेला प्रश्न ऐकून त्याला ओशाळल्यासारखें होऊन गेलें. आपण ती प्रतिज्ञा करण्यांत कांहींतरी भयंकर चूक केली असें त्याला वाटूं लागलें, कीर्तीकडे बघणारी त्याची दृष्टि खालीं वळली. पण लगेच त्याला वाटूं लागलें, " मी ती प्रतिज्ञा केली ती अत्युच्च ध्येयानं प्रेरित होऊन केली. आणि तिची पूर्ती करण्यासाठीं मला मोलही जबर द्यावं लागलं आहे. मग ही गोष्ट मला कमीपणा आणणारी कशी ठरते ? "

आणि म्हणूनच कीर्तीनें जितक्या रोखून कौस्तुभाला प्रश्न विचारला होता तितक्याच रोखून कीर्तीच्या नजरेला नजर देऊन त्यानें उत्तर दिलें, " होय. केली होती. "

वास्तविक होकारार्थी उत्तरच अपेक्षित होतें; परंतु कौस्तुभाचें उत्तर ऐकून अगदीं अनपेक्षितपणें लोखंडी कारखान्यांतील भट्टीचें दार उघडून अंगावर ऊष्णतेचा लोळ यावा तशीच हालचाल कीर्तीनें केली. संभाळून धरणारा शेवटला आशाधारही होरपळून गेलेल्या वेलीप्रमाणें गलितगात्र होऊन कीर्ति खालीं बसली. कौस्तुभाच्या पायाशीं पसरलेल्या गालिच्यावर गुडघे टेकून, सूर्य मावळतांच वेलीवरील सुंदर पुष्प ज्याप्रमाणें नाजूक देठाशीं वांकून मान टाकतें त्याप्रमाणें तिनें आपलें मस्तक कोचाच्या बैठकीवर टेकलें. तिचे काळेभोर नेत्र आपोआप अर्धवट मिटल्यामुळें तिच्या पापण्यांवरील सुंदर व लांब केशपंक्ति तिच्या कपोलद्वयावर मलूल झालेल्या पुष्पकेसरांप्रमाणें भासूं लागून त्यावर अश्रुमाला थरथरूं लागली. नंतर दुःखावेग जरा कमी झाल्यावर वर मान उचलून, अश्रूंनीं तरल झालेल्या नेत्रांनीं कौस्तुभाकडे पहात, निराशेनें तिनें उद्गार काढला, " कौस्तुभ, काय केलंस तूं हें ? तुझ्या ध्येयपूर्तीसाठीं तूं माझ्या प्रेमाचा बळी घेतलासरे ! "

कीर्तीची विकलावस्था पाहून कौस्तुभाचें हृदय पिळवटून निघत होतें. उन्मळून पडलेल्या वेलीला आधार देऊन व जलसिंचन करून नवजीवन द्यावें तसेंच आतां आपल्या पायाजवळ बसलेल्या कीर्तीला उठवून आपल्या हृदयाशीं धरावें आणि

प्रेमामृतसिंचनानें तिला पुन्हां प्रफुल्लित करावी अशी त्याला तीव्र इच्छा झाली पण त्याचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं, आपण स्पर्श केला तर कदाचित् कीर्ति अधिकच संतापेल असें वाटून हात कोपरांत दुमडून छातीशीं धरून तो स्वस्थ राहिला. कीर्तीचा निराशेचा उद्गार ऐकून मात्र त्याला रहावेना. निषेधपूर्वक तो म्हणाला, " काय बोलतेस तूं हें कीर्ति ! तुझ्या प्रेमाचा बळी घेतला ! नाहीं, नाहीं. कीर्ति, उलट माझ्या ध्येयाच्या कोंदणांत तुझंमाझं प्रेम जडवल्यामुळें त्या कोंदणाचं महत्त्व वाढलं नी त्याला अपूर्व शोभा आली. "

खेदमिश्रित उपरोधानें कीर्ति म्हणाली, " मला असं वाटत नाहीं. माझं प्रेम कोंदणांत कोंडून घालण्यानं त्याचा अपमान झालासं मला वाटतं. तुझ्याजवळ कोंदण तयार होतं. त्याकरतां तुला योग्य खडा हवा होता. म्हणून तूं माझी निवड केलीस. "

" नाहीं. कीर्ति, विनाकारण येवढा मोठेपणा पदरांत घ्यायला माझी तयारी नाहीं."

" विनाकारण कसा ? "

कौस्तुक किंचित् हंसला. त्याच्या त्या हंसण्यांत किती तरी निरनिराळ्या विचारांचें मिश्रण होतें. जवळच्या टेबलावरून सिगारेट घेऊन काडीनें ती पेटवतां पेटवतां त्यानें प्रश्नांकित उत्तर दिलें.

" माझ्या प्रतिज्ञापूर्तीकरतां मी वाटेल तसल्या महारमांगाच्या मुलीशीं लग्न लावायला तयार झालों असतों असं वाटतं कां तुला ? "

" वाटेल त्या नव्हे पण सुशिक्षित महारमांगाच्या मुलीशीं तूं लग्न केलं असतंस ना ? "

जरा विचार केल्याप्रमाणें थांबून कौस्तुभानें शेवटीं म्हटलें, " बहुतकरून. "

" अन् मग मी ब्राम्हण असतें तर काय केलं असतंस ? "

कौस्तुभ हंसला.

कीर्तीनें संभ्रमितपणें पण तीव्र उत्कंठेनें विचारलें, " कां ? "

" तर मग मी तुझ्या वाटेलाच गेलों नसतों बहुतकरून. "

आपला कयास खरा ठरल्याचें बघून निराशेंतही कीर्तीला एक प्रकारच्या

विजयानें हंसूं आलें. वाळवंटांतली वाळू सूर्यतापामुळें मधूनच झळाळते तसेंच तें हास्य होतें.

तें हंसणें बघून एक धूम्रवलय हवेंत सोडून मग कौस्तुभानें संथपणानें उत्तर दिलें, " पण तुला वाटतं आहे त्या कारणासाठीं नव्हे. "

" मग कोणत्या कारणासाठीं ? " कीर्तीनें आश्चर्यानें विचारलें.

पुन्हां एकवार विचित्र हंसून कौस्तुभ उत्तरला, " तूं उच्चवर्णीय असतीस तर तूं माझ्यासारख्या साध्यासुध्या मनुष्यावर प्रेमाचा अनुग्रह करशील असं मला कधींच वाटलं नसतं. पहिल्यानं तुझी ओळख झाली तेव्हां मला तुझी जात माहीत नव्हती, म्हणून तुझं आकर्षण माझ्यावर पडूं नये या हेतूनं मी खरोखरींच चारसहा महिने तुझ्यापासून चार पावलं दूर राहिलों होतों. "

" पण समज मी उच्चवर्णीय असून देखील तुझं माझ्यावर प्रेम बसलं असतं तर तूं केलं असतंस माझ्याशीं लग्न ? " कीर्ति उत्कंठेनें उत्तर ऐकूं लागली.

" तुझंही माझ्यावर प्रेम आहे अशी खात्री झाल्यावर अर्थात् केलं असतं. म्हणूनच म्हटलं ना मी मघांशीं कीं उगीचच्या उगीच मोठेपणा पदरांत घ्यायला माझी तयारी नाहीं म्हणून. "

कीर्तीला एकदम हलकें वाटूं लागलें. तरी थोडी रुखरुख शिल्लक असल्याप्रमाणें आणखी एक प्रश्न विचारून मनाचें पूर्ण समाधान करून घ्यावयाची आतुरता तिला वाटूं लागली.

डोंगरावरील कब्याच्या टोंकाशीं उभें राहून सभोंवतालची अपार सृष्टिशोभा पहातां पहातां खालील दरींत लक्ष जाऊन तेथें खळखळाट करणारें नदीचें सुंदर पात्र व रम्य वृक्षराजींतील वनचरांचा स्वैर विहार दृष्टीस पडून तें दृश्य पहाण्याच्या मोहानं एकेक पाऊल पुढें घेऊन अधिकाधिक वाकून पहावं आणि असं करतां करतां एकाद्या पावलानें तोल सुटावा तशीच कीर्तीची अवस्था झाली.

तिनें विचारलें, " मी उच्चवर्णीय असतांनाही प्रेमाखातर तूं माझ्याशीं लग्न करायला कबूल झाला असतास. पण समज कीं माझ्याविषयीं तुझ्या मनांत पूर्ण आकर्षण उत्पन्न झाल्यानंतर आणि माझंही तुझ्यावर प्रेम असल्याबद्दल तुझी खात्री झाल्यानंतर, पण वाङ्निश्चयापूर्वी जर एकादी हरिजन जातींतली सुशिक्षित आणि

एकंदरीनें तूं लग्न करण्याला योग्य अशी हरिजन मुलगी तुला सांगून आली असती तर—कौस्तुभ, तर तूं आपलं प्रेम बाजूला सारून तिच्याशीं लग्न केलं असतंस ? ”

कौस्तुभ गप्प बसला. नाहीं म्हणून उत्तर देऊन कीर्तीला खूष करण्याचें त्याच्या मनांतही आलें नाहीं.

कीर्तीच्या मनांत उत्पन्न झालेले हे वादळी विचारतरंग कसे शांत करावेत हेंच त्याला समजत नव्हतें. कीर्ति आपल्यावर वृथा दोषारोप लादण्याचा अट्टाहास करीत आहे व त्यामुळें दोघांचीही नाजूक प्रेमकलिका विनाकारण चुरगळली जात आहे हें तिला कसें समजवावें याचा तो विचार करूं लागला.

जरा वेळानें त्यानें त्रस्तपणें विचारलें, “ पण कीर्ति, आमचं पूर्वी बंगलोरला झालेलं संभाषण तुला सांगितलं कुणी ? ” जणूं तो उपद्व्यापी मनुष्य या क्षणीं समोर असता तर कौस्तुभानें त्याची मानगुटी धरून त्याला जाब विचारला असता अशाप्रकारें कौस्तुभ बोलला.

“ कुणी नाहीं. आज तुला एक अभिनंदनपर पत्र आलेलं चुकून माझं समजून मी वाचूं लागलें तेव्हां त्यांत तुझ्या प्रतिज्ञेचा उल्लेख केलेला आढळला. प्रतिज्ञापूर्ती-बद्दल मोठं हार्दिक अभिनंदन केलेलं होतं. ” कीर्ति जरा खोचिक स्वरांत उत्तरली.

परंतु तिकडे लक्षही न देतां कौस्तुभानें विचारलें, “ कुणाचं पत्र होतं तें ? ”

“ मी सही नाहीं वाचली. ”

“ बंगलोरहून आलं होतं ? ”

“ तें पण मी नाहीं पाहिलं. ”

कौस्तुभ किंचित् उपरोधगर्भ हंसून बोलला, “ फक्त मुद्याचा मजकूर मात्र वाचलास म्हणायचा. ”

जरा चिडून कीर्तीनें उत्तर केलें, “ होय, पण त्यामुळेंच तुझ्या प्रेमाचं खरं स्वरूप मला कळून आलं. ”

“ खरं स्वरूप ? इतका तिरस्कार करण्याइतकं कां तें विकृत आहे ? ” इतकाच अर्धस्फुट उद्गार काढून पुन्हां हतबुद्ध झाल्याप्रमाणें कौस्तुभ स्तब्ध राहिला.

कीर्तीच्या मनांत विचार आले, “ खरंच कौस्तुभाचं प्रेम आपल्या अपेक्षेपेक्षां किती भिन्नस्वरूपी आहे ! आपली जात कळतांच आपल्या ध्येयसाधनाचा मार्ग

सुगम होईलसं वाटून त्यानं पुढील भवितव्याची रूपरेषा अगोदर मनाशीं आंखून मग पुढें पाऊल टाकलं. ”

कीर्तीच्या दर्शनानेंच कित्येक तरुणांचीं हृदयें हेलावून जात, आणि तिच्या स्नेहासाठीं त्यांची धडपड चाले, असा तिचा अनुभव होता. कौस्तुभ मात्र तिला या तरुणांच्या अगदीं उलट वाटला. ओळख झाल्यावर सहा महिनेपर्यंत त्यानें कीर्तीची ओळख वाढविण्यासाठीं मुळींच प्रयत्न केले नाहींत. त्यामुळेंच कीर्तीला त्याच्याविषयीं प्रथम उत्पन्न झालेलें आकर्षण फार वाढलें. कौस्तुभाच्या दूर दूर रहाण्याचें जें कारण त्यानें आतां सांगितलें तें तिला माहीत नव्हतें. पुढें कौस्तुभाची आणि कीर्तीची मैत्री अधिकाधिक जमत गेली. कीर्तीनें आपलें हृदयसर्वस्व कौस्तुभाला अर्पण केलें. आपलें प्रेम कदाचित् विफल होईल, जातीमुळें कौस्तुभ आपल्याशीं लग्न करणार नाहीं या विचाराला तिनें मनांत थारा दिला नाहीं. प्रेम करणें हेंच तिचें जीवनसर्वस्व होऊन बसलें. नंतर हळूं हळूं कौस्तुभाचे पुरोगामी विचार तिला कळून येऊन आपली प्रेमपूर्ती होण्याची आशा मनांत उद्भवून तिच्या प्रेमसरितेंत आनंदाची भर पडून शक्य तर ती आणखीच दुथडीं वाहूं लागली.

कीर्तीला वाटत होतें कीं कौस्तुभाचें आपल्यावर असेंच अव्यभिचारी प्रेम आहे म्हणून.

अन् आतां तिला समजत होतें कीं कौस्तुभाच्या आयुष्यमार्गात ध्येय गांठतां गांठतांच प्रेमाची सांवली त्याला मिळाली होती. ध्येयाच्या मार्गावर अंधारांत चांचपडत जातां जातां प्रेमाचं चांदणं पडून त्याची वाट उजळून निघाली होती. कौस्तुभाचें आपल्यावर निस्सीम प्रेम आहे याची ग्वाही तिचें मन तिला देत होतें, परंतु त्याचं प्रेम त्याचं जीवनसर्वस्व नव्हतं. आईबापांवरील प्रेम व कर्तव्य हेंही त्याचं जीवनसर्वस्व नव्हतं. त्यां सर्वांवरही स्वामित्व गाजविणारी आणखी एक सत्ता होती हें तिला आतां समजून आलं होतं.

ती सार्वभौम सत्ता म्हणजे त्याचं ध्येय !

आपल्यावरील त्याचं प्रेम म्हणजे त्या सार्वभौम सत्तेचं गुलाम !

या विचारांनीं कीर्तीचें हृदय विव्हल करून सोडलें.

दोन्हीं हातांनीं आपलें तोंड झांकून घेऊन कीर्तीनें आर्तपणें विचारलें, “ कौस्तुभ, ध्येय हेंच तुझं जीवनसर्वस्व होतं हें तूं मला आधींच कां कळवलं नाहींस ? ”

त्रस्तपणें कौस्तुभानें विचारलें, "वादविवाद करतांकरतां माझीं मतं तुला स्पष्टपणें नव्हतीं कां कळली ? त्याहून जास्त कांही सांगण्याची आवश्यकता होती असं मला वाटत नाहीं."

कीर्तीनें चिडून म्हटलें, "पण तुला प्रेमापेक्षां ध्येयाची किती जास्त किंमत वाटते याची तूं मला कल्पना दिली नाहींस. जाणून बुजून तूं माझी फसवणूक केलीस."

कीर्तीच्या आरोपानं कौस्तुभ क्रोधानें संतप्त होऊन गेला. त्याच्या कपाळावर निषेधाच्या आंठ्या उमटल्या. कोचावरून तो एकदम उठला. हातांतली जळती सिगरेट दोन बोटांच्या चिमटींत दाबून विझवून त्यानें दूर भिरकावून दिली, खालचा थरथरणारा ओठ दांताखालीं दाबून त्यानें जोरांत चावला. जणुं ओठावर येऊन बाहेर पडण्यासाठीं धडपडणारे रागाचे जहाल शब्द त्यानें जागच्याजागीं चिरडून टाकले. क्रोधस्फुलिंगाच्या योगानें जळजळणाऱ्या डोळ्यांनीं कीर्तीकडे एकवार पाहून दाराकडे जात तो म्हणाला, "जातों मी."

क्रुद्ध झालेल्या कौस्तुभाकडे कीर्ति भयचकितपणें बघत होती. कौस्तुभ दाराशीं जातांच ती विद्युत्वेगानें त्याच्याजवळ गेली, आणि तिनें भेदरून विचारलें, "कुठं निघालास तूं ?"

वरला ओठ डाव्या बाजूला तिरस्कारानें मुडपून हंसत कौस्तुभानें कीर्तीकडे पाहिलें. जणूं तो तिला विचारीत होता कीं, हा प्रश्न विचारण्याचा तुला अधिकार काय ? तशाच अर्थी त्यानें उत्तर दिलें, "वाटेल तिथें." आणि खर्रदिशीं दाराचा बोल्ट ओढला.

तो खरं असा कर्कश आवाज ऐकून कीर्ति केवढ्यानें तरी दचकली. तिला वाटलें, दादासाहेबांनीं तर नाहीं ना हा आवाज ऐकला ? निस्तब्ध असलेल्या आपल्या बंगल्यांत तो आवाज मोठ्यानें दुमदुमून, सर्व माणसं जागीं होऊन आश्चर्य करीत नसतील ना ? आणि आसपासच्या बंगल्यांतलीं माणसंही—"

क्षणार्धांत हे विचार मनांत येतांच कीर्तीनें कौस्तुभाचे दोन्ही हात आपल्या हातांनीं गच्च धरले, आणि केविलवाणीनें ती म्हणाली, " नकोरे जाऊं ! "

कौस्तुभानें बेपर्वाई दाखवून विचारलें, " नको जाऊं ? तें कां ? "

कीर्ति व्यथित अंतःकरणानें बोलली, " तूं अशा रीतीनें आत्तां यावेळीं निघून गेल्याचं कळलं तर तर दादासाहेबांना केवढा तरी धक्का बसेल ! "

" अस्सं ! " उपरोधानें मान हलवीत कौस्तुभ आपले हात कीर्तीच्या हातून सोडवून घेत म्हणाला. " म्हणून नको जाऊं म्हणतेस होय ? दादासाहेबांना वाईट वाटेल म्हणून तुला इतकं वाटतं पण तुझ्याकरतां माझ्या आईवडिलांना मी सोडलं, त्यांना मनस्वी दुःखांत लोटलं याची तूं किंमत केलीस ? काल मी निघून आलों तेव्हां माझ्या आईनं जो शोक केला, आणि तिचं रडणं बघून माझ्या अंतःकरणांत कसं तटतटां तुटलं याची तुला कल्पना तरी आहे ? " जणूं तें करुण दृश्य असह्य होऊन कौस्तुभानें डोळ्यांवरून झटकन् हात फिरवून तें पुसून टाकलें.

पण तें दृश्य क्षणकाल दिसल्यामुळेंच कौस्तुभाचा संताप लयाला गेला. आपल्या आईच्या दुःखावरून त्याला दादासाहेबांच्या दुःखाची कल्पना आली.

दादासाहेबांच्याबद्दल कौस्तुभाला आत्यंतिक आदर होता.

म्हणूनच त्याला वाटलें कीं कीर्तीच्या म्हणण्याप्रमाणेंच आज वागावें. दाराला पुन्हां कडी घालून दारापासून मागें परतून तो मृदुपणें म्हणाला, " बरं नाहीं जात मी. "

कीर्तीनें कृतज्ञतेनें त्याच्याकडे पाहिलें. पण तिच्याकडे पाहिलें न पाहिलेंसें करून कौस्तुभानें मेजावरील पेटी घेऊन एक सिगरेट पेटवली आणि तो गच्चीवर येऊन फेऱ्या घालूं लागला.

दोनचा सुमार असेल. थंडगार वाऱ्याच्या झुळकी येत असल्यानें कौस्तुभाला

पुष्कळ बरें वाटलें. बागेंतील आणि हिलवरल्या बागेंतील फुलझाडांचा मिश्र सुगंध वायुलहरींवर तरंगून येत होता. रात्रीचे कांहीं पक्षी चमत्कारिक आवाज काढीत मधूनच इकडेतिकडे फडफड पंख वाजवीत जात होते त्याखेरीज बहुतेक सर्वत्र निस्तब्ध शांतता पसरली होती. आकाश तारकांनीं कसें खचून गेल्यासारखें दिसत होतें. किती सुंदर सुंदर नक्षत्रें आकाशांत चमकत होतीं! "अत्यंत तेजस्वी ताऱ्यांनीं जडवलेलं तें धनुष्य! कोणाचें हृदय विद्ध करण्यासाठीं सजवलें होतें तें? त्यांतून विद्युद्वेगानें बाण येऊन दुःखी हृदयांतील दुःखें छिन्नभिन्न करण्याचं कार्य त्यांनीं केलं तर किती बहार होईल? असंख्य ताराबिंदूंनीं फेसाळलेल्या पाण्याप्रमाणें दिसणारी स्वर्गंगा! ठरींव चाकोरींतून रूढींचा फेस मस्तकावर डौलानं धारण करून चाललेले लोकच जणूं! त्या लोकगंगेच्या बाहेर पडून स्वतःच्याच तेजानें चमकणारा तो अभिजित्! –आपल्या आणि कीर्तीच्या लग्नाबद्दल लोक काय बरं बोलत असतील? आणि घडी विसकटलेली पाहून ते कुचेष्टेनें आणि विजयानें हंसतील कां?—ती मूळ राशींतली निंदकाच्या जिभेसारखी नांगी—खरंच लोकांना असंच भासवलं पाहिजे कीं आमचं सर्व अगदीं आनंदांत चाललं आहे म्हणून. आनंदांत चाललं आहे?" आनंद हा शब्द निवळ कविकल्पनेंतला भासून जणुं कौस्तुभ हंसला. पुन्हां तो आकाशाकडे बघूं लागला. "शर्मिष्ठा आणि देवयानी यांचं तें आकाशांतलं युद्ध प्रेम आणि ध्येय! कीर्तीला माझ्या ध्येयाबद्दल इतकं काय डाचतं आहे? माझ्या ध्येयाबरोबरच प्रेमसिद्धि झाल्यानं त्या प्रेमाला कमीपणा कसा येतो?

पूर्वक्षितिजावर शततारकांच्या कुंभांत तो चंद्राचा गोलार्ध, जणूं अमृतसिंचन करतो आहे. जवळच मोठ्या पुष्कराजाप्रमाणें शोभणारा गुरूचा तारा जणूं त्याला साहाय्य करतो आहे. त्यांचं सांनिध्य एकमेकांना किती खुलवतं आहे. एकामुळें दुसऱ्याचं तेज कमी थोडंच दिसतं! मग कीर्तीला ध्येय हें प्रेमाला साहाय्यकारी झालं तर इतकं वाईट काय वाटतं? तो चंद्र आपल्या प्रियतमेला तो प्रेमकुंभ देऊन खूष करूं पहात असेल. तिला भेटण्यासाठीं तो धांवाधांव करीत चालला आहे जसा. पण संकटांच्या राशींतून मार्ग काढल्याखेरीज त्याची रोहिणी त्याला कुठून भेटणार? आणखी या काळ्या ढगांनींही त्याचा मार्ग अडवण्याचा प्रयत्न चालवलेला दिसतो आहे,—कीर्तीच्या मनांत आज हे विचार आले तरी कसे? आपलं आयुष्य आतां असंच जाणार काय? आपण आतां कसं वागावं? काय करावं? कीर्तीला कसं समजवावं? सप्तर्षींचं तें अखंड प्रश्नचिह्न! मूळराशींतलं प्रश्नचिह्न!!"

कौस्तुभाच्या दृष्टीसमोर बघावें तिकडे ताऱ्यांच्या प्रश्नचिह्नाकृति नाचूं लागल्या. सिगरेटचीं धूम्रवलयेंसुद्धां आळोखेपिळोखे देत प्रश्नचिन्हें गिरवीत आहेतसें त्याला भासलें.

केसांतून डाव्या हाताचीं बोटें फिरवून त्यानें अशरणपणें स्वतःलाच प्रश्न केला, " काय करावं आतां ? "

त्यानें खोलींत दृष्टि टाकली तों कीर्ति टेबलाजवळच्या खिडकीशीं उजव्या बाजूच्या चौकटीवर खांदा रेलून व कपाळ चौकटीजवळच्या गजाला टेकून उभी होती.

किती उदासवाणें तिचें तोंड दिसत होतें ! दुःखाच्या तापानें जणूं होरपळून निघालेलं गुलाबाचें फूलच !

तें दृश्य बघून कौस्तुभाचें हृदय द्रवलें. तो आंत आला, व हळूंहळूं कीर्तीच्या शेजारीं जाऊन उभा राहिला. त्यानें कोमलतेनें प्रश्न केला, " कीर्ति, किती वेळ जागणार तूं ? "

कीर्ति किती वेळची तरी त्या खिडकींत उभी राहून विचार करीत होती. तिची दृष्टि आईवडिलांच्या फोटोकडे वरचेवर जात होती. तिनें कांहीं तरी निश्चय मनाशीं केला असून त्यांत धैर्य देण्यासाठींच ती जशी कांहीं त्या तजबिरींना विनंती करीत होती. तो निश्चय कौस्तुभाला सांगून टाकण्याकरतां तिच्या जिवाची तळमळ चालली होती म्हणून कौस्तुभाची ती क्षणाक्षणाला मार्गप्रतीक्षा करीत होती. तिला अधीरतेमुळें वाटूं लागलें होतें की कौस्तुभ आज आंत येणारच नाहीं कीं काय ? सकाळपर्यंत गच्चीवरच कां हिंडत रहाणार ?

त्याला आंत बोलवावें असें तिला वाटत असून तिकडे पाऊल घेण्याचेंही तिला धैर्य होत नव्हतें.

आणि असें असूनही कौस्तुभ आपल्याजवळ येत आहेसें पाहून तिच्या अंगातलें रक्त एका क्षणीं उसळून येऊन दुसऱ्या क्षणीं जणूं गोठून बसलें. धाडधाड उडणाऱ्या हृदयाचें स्पंदन जणूं क्षणभर थांबलें. कौस्तुभाची प्रत्येक हालचाल बघणारी तिची दृष्टि खालीं वळली, आणि दोन्हीं हातांचीं एकमेकांत गुंतवलेली बोटांची पकड दुखण्याइतकी घट्ट झाली.

कौस्तुभाच्या जवळ येण्यानें तिच्या मनांत उद्भवलेली भीति त्याच्या प्रश्नानें

पुष्कळच दूर झाली; परंतु आपल्या मनांतील निश्चय बोलून दाखवणें मात्र तितक्याच प्रमाणांत कठीण झाल्याची जाणीव तिला झाली.

कौस्तुभाच्या स्वरांतील कोमलतेमुळें धीर येऊन तिनें वर मान करून त्याच्याकडे पाहिलें. तिची दृष्टि जणूं करुणतेनें म्हणत होती, " आतां कुठली झोप ? "

परंतु ती उघडपणें म्हणाली, " अन् तूं काय करशील ? "

" मी या कोचावर आरामशीर पडतों कीं. " आरामशीर हा शब्द अगदीं आरामांत उच्चारून कौस्तुभ हंसला. कीर्तीलाही नकळत हंसूं आलें. लगेच गंभीर होऊन कौस्तुभ म्हणाला, " कीर्ति. "

कीर्तीनें दचकून विचारलें, " काय ? "

" आपण एकदां पुढें काय करायचं याविषयीं बोलूं या. दादासाहेबांच्या समाधानाच्या दृष्टीनं आणि लोकांच्याही दृष्टीनं आपण पूर्ण सुखी आहों असंच दिसणं तुला योग्य वाटतं ना ? "

" हो अन् त्याकरतां उद्यांच आपण महाबळेश्वरला जाऊं या. "

" जरूर आपण उद्यां निघूं. पण ये इकडे आपण इथें बसून बोलूं. "

नंतर कीर्ति आणि कौस्तुभ यांनीं मित्रत्वाच्या नात्यानं पांच दहा मिनिटें लोकाच्याचविषयीं बोलत असल्याप्रमाण स्वतःच्या पुढील आयुष्याबद्दल सुचतील ते बेत निश्चित केले.

सर्व ठरल्यावर कौस्तुभ कीर्तीला म्हणाला, " जा. नीज जा आतां. "

पण सर्व बोलून झालें तरी कीर्तीच्या मनांतील निश्चय तिनें अजून उच्चारला नव्हता.

तेव्हां आतां सर्व धैर्य एकवटून एक आवंढा गिळून ती म्हणाली, " कौस्तुभ. "

जरा आश्चर्यानेंच कौस्तुभानें प्रश्नार्थी मुद्रेनें कीर्तीकडे पाहिलें.

कौस्तुभाच्या दृष्टीला दृष्टीही न देतां, अडखळत अर्धस्फुट शब्दांत कीर्ति बोलली, " कौस्तुभ, तुझी जर तशी इच्छा असेल तर मी माझं कर्तव्य करायला तयार आहें. "

" कर्तव्य ? म्हणजे काय ? " अती विस्मय वाटून कौस्तुभानें विचारलें.

" म्हणजे—म्हणजे कौस्तुभ, पत्नी म्हणून माझं कर्तव्य—"

कौस्तुभाचा तिरस्काराचा हुंकार ऐकून कीर्तीनें वर पाहिलें.

कौस्तुभ कीर्तीकडे आपादमस्तक निरीक्षण करीत होता. जणूं त्यानें आजपर्यंत इतकी किळसवाणी वस्तू कधीं पाहिली नव्हती.

कीर्तीचें तोंड लाजेनें काळें पडलें. तिनें आपल्या दोन्ही पंजांनीं आपलें तोंड झांकून घेतलें. तरी कौस्तुभाचे तुच्छतेचे उद्गार तिच्या कानांत तेलाप्रमाणें सळसळत शिरलेंच.

" मला कोण समजतेस तूं कीर्ति ? पशू कीं राक्षस ? मला तुझं सत्त्व पहायचं नाहीं कीर्ति. तुझ्याकडून कोणत्याही कटु कर्तव्याची मला अपेक्षा नाहीं. " कौस्तुभ उठला. जणूं कीर्ति बसली होती त्याच कोचावर बसणेंसुद्धां त्याला रुचत नव्हतें.

कौस्तुभानें दोन तीन येरझारा खोलींत घातल्या तरी कीर्ति जागेवरून उठली नव्हती किंवा तिनें तोंडावरले पंजेही बाजूला काढले नव्हते. कष्टांनीं दाबून धरलेल्या हुंदक्यांनीं तिचें शरीर हादरत होतें.

कौस्तुभाला तिच्या मनःस्थितीची जाणीव झाली. हलकेच जवळ जाऊन तिचे हात धरून त्यानें बाजूला केले तों तिचें तोंड आणि बोटें आसवांनीं भिजलेलीं होतीं. तिच्याच हातांतल्या रुमालाला अधिकच जोरानें स्रवणाऱ्या अश्रुधारा पुशीत तो वाईट वाटून सांत्वनपर अशा कोमल स्वरांत म्हणाला, " ऊठ कीर्ति "

कीर्ति इच्छाशक्ति गारठून गेल्याप्रमाणें उठली, आणि पलंगावर जाऊन भिंतीकडे तोंड करून निजली.

किती वेळची तरी ती अश्रू ढाळीत होती. पण नंतर किंचित् गुंगल्याप्रमाणें ती झाली.

चाराचे ठोके ऐकून म्हणा किंवा कांहीं आवाजानें म्हणा तिला जाग आली आणि तिनें खोलीभर नजर फिरविली.

कौस्तुभ गालिच्यावरच पडला होता. कोचावर त्याला बहुधा अवघडल्यासारखं झालं असावं. तो उताणाच निजलेला असून त्यानें पावलावर पाऊल घातलें होतें, आणि हात कोपराशीं दुमडून पंजे एकांत एक गुंतवून मानेच्या जरा वरल्या बाजूला ठेवून त्यावर मस्तक टेकलें होतें. एक उशी उशाला घेतलेली होती.

कौस्तुभ खालीं गालिच्यावरच पडलेला पाहून कीर्तीला पश्चात्तापानें पोळल्याप्रमाणें वाटून ती उठून त्याच्याजवळ आली, आणि त्याच्याकडे पहातां पहातां त्याच्या शेजारीं गुडघे टेकून ती बसली.

मर्दानी सौंदर्याचा पुतळाच जणूं आपल्या बैठकीवरून खालीं पडला होता!

रेशमी पिवळट विजार आणि रेशमी अर्ध्या बाह्यांचा सदरा यांमुळें कौस्तुभाची उंचसडक अंगलट आणि सुंदर बांधा अधिकच शोभून दिसत होता. त्याच्या दंडावरले पिळदार स्नायू कसे डौलदार दिसत होते. निस्तेज चंद्राप्रमाणें त्याचें मुख अंतस्थ दुःखामुळें पांडुरवर्ण दिसत असून कपाळावर विसकटून आलेल्या केसांच्या बटा शशांकाप्रमाणें त्याची पांडुरता अधिकच भासवीत होत्या. भुंवयांच्यामध्यें दोन काळजीच्या रेषा स्पष्ट उमटल्या होत्या. जिवणीच्या कडा जणूं दुःखभरानें किंचित् खालीं लवल्या होत्या. आणि ती हनुवटीवरली खळी !

कीर्तिला यावेळीं त्याचें विलक्षण आकर्षण झालें.

अतृप्त नेत्रांनीं ती त्याच्याकडे बघत राहिली.

कौस्तुभाच्या विशाल भालपटलावरील त्या काळजीच्या रेषा बघून तिला अपराध्याप्रमाणें वाटूं लागलें. त्यावरील घर्मबिंदु बघून तिला रहावेना. आपला रुमाल तिनें खिशांतून काढला व ती पुसूं लागली पण तिनें लगेच तो बाजूस टाकला व नंतर आपल्या पदरानें तिनें ते घर्मबिंदु अतिशय हळुवारपणें टिपून काढले. त्या तिच्या कृतीनें भुंवयांमधल्या त्या दोन रेषा जरा कमी झाल्या पण पूर्ण लुप्त झाल्या नाहींत, हें पाहून कीर्ति खालीं वांकली आणि तिनें आपल्या ओठांचा मृदु स्पर्श त्या ठिकाणीं केला.

पण त्याच क्षणीं मर्मावर दंश झाल्याप्रमाणें कीर्ति उभी राहिली आणि घाईनें एकेक पाऊल मागें घेऊन ती पुन्हां पलंगावर जाऊन कोलमडली.

" कौस्तुभानें आपला शेवटीं अव्हेर केला नव्हता काय? आपल्याकडे त्यानं किती तिरस्कारानं पाहिलं होतं.

आणि असं असतां आपण त्याचं चुंबन घेतलं! किती शरमेची गोष्ट. मधेंच तो जागा झाला असता तर त्याला आपल्याबद्दल काय वाटलं असतं?"

जणुं कौस्तुभाची आपल्याकडे लागलेली तिरस्काराची नजर टाळण्याकरतांच कीर्तीनें डोळे मिटून घेतले.

पण कीर्ति आणखी एकच क्षण—नव्हे अर्धा क्षण जरी आणखी कौस्तुभाजवळ थांबली असती तर तिला कौस्तुभाच्या कपाळावरील त्या दुष्ट रेषा पूर्ण नष्ट झालेल्या तर दिसल्या असत्याच परंतु ओष्ठप्रांतावर किंचित् स्फुरण होऊन स्मित चमकूं लागल्याचेंही तिला समजलें असतें. कीर्तीच्या ओष्ठस्पर्शानें त्याच्या शरिरांत ज्या विद्युल्लहरी सळाळून गेल्या त्यामुळें त्याची छाती जोरांत वरखालीं उडत असून त्याचीं बुबुळें तिच्या दर्शनासाठीं उत्कंठित होऊन वरलें पापण्यांचें आवरण बाजूला करण्यासाठीं धडपडत असल्याचेंही तिला समजलें असतें.

आणि मग कदाचित् एकाकी मंचकावर अंग टाकण्याऐवजीं कौस्तुभाच्चा प्रेमळ बाहुपाशांतच तिला पहांटेची गुलाबी साखरझोप उपभोगतां आली असती.

पण तसं घडलं नाहीं.

कीर्तीनें पुसून टाकलेल्या रेषा पूर्वींइतक्या ठळकपणें नाहींत तरी थोड्या तरी पुन्हां आल्याच. ओठावरलें स्मित ढगाच्या कैदेंतून चोरून छपून आलेल्या किरणां-प्रमाणें भिऊन पुन्हां पळून गेलें.

पुन्हां झळझळीत उजेड पडून कीर्ति जागी झाली, तेव्हां तिला प्रथम वाटलें कीं आपण संध्याकाळीं आनंदाच्या भरांत खोलींत दिव्यांची रोषणाई केली अन् ते न मालवतांच आपण निजलों कीं काय ? झोपेंत स्वप्न तरी किती लांबलचक नी हुबेहुब पडलं. किती विलक्षण स्वप्न तें.

कौस्तुभाचं नी आपलं लग्न—

रसरशीत लोखंडावर हातोड्याचा एकच घांव पडतो पण त्या घांवासरशीं असंख्य अग्निस्फुलिंग इतस्ततः उडतात. कीर्तीला कितीतरी गोष्टी एकदम आठवल्या.

कौस्तुभ !

कीर्ति एकाकीपणाच्या जाणिवेनेंच एकदम उठून बसली. कौस्तुभ खोलींत नाहींसें पाहून तिनें झटदिशीं पलंगावरून उडी घेतली.

कौस्तुभ निजला होता त्या जागेकडे पहातांच कीर्तीला भडभडून आलें. कौस्तुभाच्या शरीरस्पर्शानें जणूं ती जागा पावन झाली आहेसं वाटून कीर्ति तेथें बसली.

तिला आपल्या एकलेपणाची क्षणाक्षणाला अधिकाधिकच जाणीव होत चालली.

भिरीभिरीं तिन खोलीभर नजर फिरवली तेव्हां निस्तेज निर्माल्य झालेल्या फुलांच्या माळा तिला दिसल्या. किती तरी सुकलेल्या पाकळ्या खालीं गळून पडल्या होत्या.

तितक्यांत पुढल्या हाताच्या पंजानें दार ढकलून ड्यूक आंत आला. कीर्तीजवळ उत्साहभरांत येऊन त्यानें तिच्या खांद्यावर आपला पुढला पंजा टेकला आणि आपलें झुपकेदार शेपूट हलवण्यास प्रारंभ केला.

कीर्तीनें त्याच्या गळयाभोंवतीं आपला डावा बाहू टाकला आणि त्याच्या पाठीवर तिनें मान टाकली.

तिच्या हृदयांतले मुके कढ जणूं ड्यूकला समजले आणि कीर्तीचा उघडा डावा दंड तो चाटूं लागला.

खेळणाऱ्या हंसऱ्या कीर्तीबरोबर अल्लडपणें धिंगामस्ती करून घर डोक्यावर घेणारा, किंवा मनाप्रमाणें गोष्ट घडली नाहीं म्हणून रुसून बसून कीर्तीकडून आणि दादासाहेबांच्याकडून आर्जवें करून घेणारा। किंवा त्या दोघांच्या आवडीनिवडी लक्षांत घेऊन आल्यागेल्याचें प्रतिष्ठितपणें स्वागत करून प्रेमाची देवघेव करणारा आतांचा ड्यूक नव्हता. तर सहानुभूतिपूर्ण अंतःकरणानें अंगावरून ममतेचा हात फिरवून आपल्या मुलीचें सांत्वन करणाऱ्या प्रेमळ मातेप्रमाणें या वेळीं ड्यूक वागत होता. हात फिरवण्याऐवजीं तो तिचा दंड चाटीत होता.

---

रात्रींचे दहा वाजून गेले असून चहूंकडे शांतता झाली होती. चंद्र उगवून लगेच अस्ताला गेल्यामुळें आकाश काळेभोर दिसत असून चांदण्यासुद्धां फारशा तेजस्वी वाटत नव्हत्या. पावसाळा अजून शेवटला निरोप घेऊन गेला नसल्यामुळें विद्युन्माला अजून आपलें भीषण नृत्यकौशल्य दाखवून मेघगर्जनांचीं घुंगरें मधूनच वाजवीत होती. या वेळीं आकाशांत अगदीं थोडें पाणी असलेले पांढुरके ढग इतस्ततः विखुरले असून एकप्रकारचें धुकें एकाद्या झिरझिरीत आवरणाप्रमाणें पृथ्वीवर पडलें होतें. त्या धुक्यामुळें बागेंतील झाडांचे व भोंवतालीं कुंपणासाठीं म्हणून भिंतींऐवजीं जवळ जवळ उभ्या केलेल्या दहा दहा फूट उंचीच्या चिऱ्यांचे आकार अधिक मोठाले भासून विलक्षण स्वरुपांतल्या राक्षसांप्रमाणें दिसत होते.

कीर्ति आणि कौस्तुभ बंगलोरला रहावयाला आल्याला चार महिने झाले होते. बंगलोरच्या लष्करहद्दींतील, नोकरीनिमित्त परगांवीं रहाणाऱ्या एका क्रिश्चनच्या स्वतंत्र आणि सुंदर बंगल्यांतील आपल्या बसण्याच्या खोलींत कीर्ति पत्र लिहिण्याचे श्रम करीत होती.

कीती वेळानें तरी टेबलावरील नोटपेपरवर तिचें पेन शब्द रेखाटूं लागलें.

" मत्प्रिय, परमपूज्य दादासाहेब—

तुम्हांला एक आनंदाची बातमी—एकच नव्हे तर दोन बातम्या सांगण्याकरतां उत्सुक होऊन मी लगेच पत्र लिहीत आहें.

अगदीं पहिली बातमी—म्हणजे वास्तविक ही बातमी अगोदर कळवण्यामुळं कार्य अगोदर आणि कारण मागून सांगितल्यासारखं होणार आहे, पण होऊंदे तसं—तर ही पहिली बातमी म्हणजे मी येत्या गुरुवारींच म्हणजे ता. २९ ला येथून निघून तुम्हां सर्वांच्या भेटीला येतें आहें. महाबळेश्वराहून इकडे बंगलोरला येतांना मी नी कौस्तुभ फक्त दोनच दिवस मुंबईला राहूं शकलों. आम्ही आणखी रहावं, निदान मी तरी कौस्तुभाच्या मागून बंगलोरला जावं असं तुम्हांला फार फार वाटत होतं पण मी नाहीं म्हटल्यावर तुम्हांला वाईट वाटलं. पण आतां मात्र त्या सगळ्याचं अगदीं उट्टं काढण्याचं मी ठरवलं आहे. चांगली सहा आठ महिने मी आतां मुंबईला रहाणार आहें.

या बेताचं कारण असं कीं कौस्तुभाला एक अगदीं आयुष्यांतली सुवर्णसंधि लाभते आहे. त्याबद्दल त्याला किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं ? ”

कीर्तीचा हात थांबला. तिच्या अंतःश्चक्षूसमोर संध्याकाळीं घडलेला प्रसंग उभा राहिला.

कीर्ति संध्याकाळच्या वेळीं बंगल्यापुढील बागेंत आरामखुर्चीवर पडून एक इंग्रजी पुस्तक वाचीत होती.

आफ्रिकेंतील नीग्रो लोकांमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं सर्व आयुष्य वेंचलेल्या एका मिशनऱ्यानें आपले अनुभव त्या ग्रंथामध्यें मोठ्या रसाळ आणि डोळ्यांसमोर स्पष्ट चित्रें उभी करून मनाची पकड घेणाऱ्या भाषेमध्यें लिहिले होते. त्यानें रानटी अवस्थेंत काळ कंठणाऱ्या लोकांत, प्रथम त्यांचा अत्यंत तीव्र विरोध असतांना देखील निर्भयपणानें राहून पराकाष्ठेची सहनशीलता बाळगून, त्यांना उच्च आचार विचारांची ओळख करून देऊन, आपल्या दयार्द्र आणि सौजन्यपूर्ण वागणुकीनें त्यांचें मत आपल्याविषयीं अनुकूल बनवून घेऊन आपला धर्म त्यांतील बहुतेकांच्या गळीं उतरवला होता. अशा रीतीनें त्या एकाच धर्मोपदेशकाचे नव्हे तर जगांतील ठिकठिकाणच्या मिशनऱ्यांचे धर्मप्रसारासाठीं चाललेले अखंड प्रयत्न, आणि त्या कार्यासाठीं सतत पाझरणारा द्रव्याचा झरा यांबद्दल साश्चर्य कौतुक करतां करतां कीर्तीला हिंदुधर्मीयांच्या बेजबाबदार वागणुकीविषयीं तुलनेमुळें खेद वाटल्याशिवाय राहिला नाहीं. आपल्या जातीच्या उद्धाराविषयीं चाललेले सर्वच्या सर्व प्रयत्न तिला अपुरे व निष्फळ वाटूं लागले. तिचें अंतःकरण तळमळूं लागलें.

याप्रकारें कीर्ति त्या पुस्तकाशीं समरस होऊन त्यामुळें हलूं लागलेल्या विचारांच्या हिंदोळ्यावर आंदोलनें घेत असतांच, एखाद्या लहान मुलानें नवीन मिळालेलें खेळणें आपल्या मैत्रिणीला उत्साहभरानें आणून दाखवावें, त्याप्रमाणें घाईघाईनें येऊन, “बघ कीर्ति, बघ तरी एकदां हें पत्र. माझ्या आयुष्यांतला केवढा तरी वंडरफुल चान्स मला मिळतो आहे. ” असें म्हणत एक पत्र कीर्तीसमोर धरून कौस्तुभ तिला तें वाचण्याबद्दल सांगूं लागला तेव्हां हिंदोळा अचानक कुणी थांबवल्याप्रमाणें ती दचकली.

कौस्तुभाला पहातांच ती हंसून म्हणाली, “काय एकदम येऊन दचकवलंस रे मला.”

कौस्तुभ थट्टेनें इंग्रजींत म्हणाला, " सॉरी, दारावर टिकटिक करायला विसरलोंच मी ? "

कीर्तीच्या डोळ्यांत हास्याचे तारे चमकले. तिनें डाव्या हाताची तर्जनी खालच्या ओठावर ठेऊन, भ्रुकुटि अधिकच धनुष्याकृति करीत विचारलें, " दारावर ? "

" हो. तुझ्या मनाच्या दारावर. " कौस्तुभ उसन्या गांभिर्यानें उत्तरला. नंतर लगेच खरोखरींच गंभीर होऊन तो अस्फुट स्वरांत म्हणाला, " म्हणजे शोधून मला तें सांपडलंच असतं असं कांहीं नाहीं. "

परंतु कीर्तीनें हें पुढील वाक्य न ऐकल्यामुळें त्याच्या पहिल्या वाक्याला हंसून उत्तर देऊन पत्र हातीं घेऊन, त्यांतील दोनचार ओळी वाचून ती म्हणाली, " तूंच सांग ना नीट समजाऊन. मला कांहींच समजत नाहीं. "

" अक्षर लागत नाहीं ? "

पत्र टाईपरायटरवर लिहिलें होतें.

कीर्तीनें पत्र कौस्तुभाच्या हातीं परत देऊन उत्तर केलें, " अगदीं मुळींच अक्षर लागत नाहीं. सांग बघूं लवकर कसला वंडरफुल चान्स आला आहे तुला ? केव्हां ऐकेनसं मला झालंय. " कीर्तीनें जवळच्या एका खुर्चीकडे बोट करून कौस्तुभाला बसण्यास सुचवलें.

खुर्चीवर बसून प्रसन्नपणें कौस्तुभ म्हणाला, " अनागोंदीच्या आसपासच्या प्रदेशांतील उत्खनन अलीकडे दोन वर्षं चाललेलें आहे. विजयनगरच्या साम्राज्याच्या इतिहासावर प्रकाश पाडणारे शिलालेख आणि ताम्रपट शोधून काढून, इतिहासाचीं आणि परधर्मीय बखरी लिहिणाऱ्यांनीं मुद्दाम 'ध' चा 'मा' केलेलीं, आणि काळानं पुसून टाकलेलीं किंवा हरवलेलीं पानं सुसूत्र जुळवण्याकरतां अनागोंदीच्या महाराजांनीं एका जर्मन तज्ञाच्या हातीं संशोधनाचं कार्य सोंपवलं आहे. त्याच्या हाताखालीं मृणालकांति चक्रवर्ति म्हणून एक बंगाली काम करीत होता. तो नुकताच महिन्यापूर्वी कलकत्त्याला कांहीं कामासाठीं म्हणून गेला आणि आतां बातमी आली आहे कीं कांहींतरी चारपांच वर्षापूर्वीच्या अत्याचारी कटाचा धागादोरा त्याच्यापर्यंत आणून सोडून संशयाला जागा असतांनासुद्धां सरकारनं त्याला वर्षा दीड वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा दिली आहे.

त्याच्या रिकाम्या झालेल्या जागेवर ताबडतोब नेमणूक करण्यालायक कुणी मनुष्य आहे काय म्हणून अनागोंदीच्या महाराजांनीं आमच्या इन्स्टिटयूटकडे विचारणा केली. अन् कीर्ति, आमच्या प्रिन्सिपॉलनीं आज मला, तूं जाशील कां ? म्हणून विचारलं. ”

बाहेर उष्मा होत असूनही कौस्तुभाचे उल्हासपूर्ण शब्द ऐकत असतां कीर्तीच्या हृदयाभोंवतीं जणूं बर्फाचे थरावर थर सांचत होते, आणि त्यामुळें तिचा कंठ रुद्ध झाला होता. औत्सुक्याच्या घणांनीं वाट फोडून तिचा शब्द उमटला, “अन् तूं काय उत्तर दिलंस ? ”

“ दुसरं कोणतं ? मी ताबडतोब होकार देऊन टाकला. मला एक आक्टोबरला तिथें कामावर रुजूं व्हावं लागेल. ”

एक आक्टोबरला ! म्हणजे आणखी पांचच दिवसांनीं कौस्तुभ जायचा तर !

“ तूं एकटाच जाणार ? ”

“ हो तर. एकट्यानंच जायला हवं. काम चालूं असेल तिथें तंबूराहुट्यांत नाहीं तर एकादे वेळीं गुहेंतसुद्धां निवारा बघावा लागेल. ”

शेवटीं कौस्तुभ स्वेच्छेनंच आपल्यापासून दूर चालला आहे तर ! रानावनांत, उन्हातान्हांत काम करून धोक्यांत जीव घालण्यांतसुद्धां त्याला उत्साह वाटत होता !

पण साहजिकच नव्हतं कां तें ?

पांच महिनेपर्यंत सर्कशींतल्या सिंहाप्रमाणें बंधनांत राहून खेळ करणाऱ्या त्याच्या भावना त्यांतून मोकळ्या होण्यासाठीं धडपडत होत्या. रानावनांत स्वैर संचार करायला मिळणार म्हणून त्या उतावळ्या झाल्या होत्या !

कौस्तुभ आपल्याला सोडून जाऊं पहातो आहे !

“ मग कौस्तुभ, मी कुठें रहायचं ? ”

कौस्तुभ विचारांत पडला. त्यानें आपल्या मनाशीं तो प्रश्न आधींच सोडवला होता पण तें बोलायला त्याला जड वाटूं लागलें. तो अडखळत म्हणाला, “ कीर्ति, मला तिथें किती दिवस रहावं लागेल त्याचा कांहींच नियम नाहीं. दीड वर्ष तर नक्कीच. नंतर दुसरा कोणी मनुष्य नेमला तर गोष्ट निराळी पण बहुतेक तसं

होणार नाहीं. आणि चक्रवर्तीला तुरुंगांतून सुटून आल्यावर पुन्हां कामावर नेमतील कीं नाहीं कोण जाणें ! तेव्हां मलाच पुढेंही तिथें रहाण्याची संधि मिळण्याची आशा करायला फार जागा आहे. तेव्हां—"

"मग तर मी घरीं—दादासाहेबांच्याकडे जाऊं ?"

"हो. तेंच बरं."

"तूं केव्हां निघणार ?"

"एकोणतीस तारखेला निघावं म्हणतों."

"मग मी पण त्याच दिवशीं निघूं ?"

"हूं."

कीर्तीला पुढें बोलवेना. कौस्तुभही किती तरी वेळ गप्प होता.

नंतर त्यानें हांक मारली, "कीर्ति."

"काय ?"

"कीर्ति, मला पत्र लिहिशील तूं ? मधून मधून, आपलं केव्हां तरी."

केवढा अनुनय होता त्या विचारण्यांत !

"हो, अगदीं जरूर पाठवीन. पण तूंही पाठवशील ना पत्र मला ? तुझ्या कामासंबंधीं मला सविस्तर कळवलं पाहिजे हं !"

विशेष महत्त्व न दाखवतां सहजपणें कौस्तुभानें उत्तर दिलें, "पाठवीन तर काय झालं." त्याला जणूं म्हणायचं होतं कीं तुला काय करायचीं माझीं पत्रें येऊन ? तूं थोडीच रानावनांत नातंगोतं सोडून निघाली आहेस !

"पण वाचीत होतीस काय तूं मी आलों तेव्हां ? अगदीं गढून गेली होतीस वाचण्यांत."

काय बरं वाचीत होतों आपण ? कांहींच कसं आठवत नाहीं ?

"मी होय ?" इकडेतिकडे पहात खालीं जमिनीवर पडलेलें पुस्तक कौस्तुभाच्या हातीं देत कीर्ति म्हणाली, "हें बघ. हें वाचीत होतें मी."

नेत्र मिटून एक उसासा सोडून कीर्ति पत्र पुढें लिहूं लागली.

"आपल्याला प्रत्यक्ष कुठेंतरी उत्खनन आणि संशोधन करायला सांपडावं असं

कौस्तुभाला नेहमीं वाटत असे पण ती महत्त्वाकांक्षा कधींकाळीं पूर्ण होईल असं त्याला कधींच वाटलं नव्हतं.

पण आतां ती महत्त्वाकांक्षा सफळ होण्याची खात्री उत्पन्न झालेली आहे. विजयनगरच्या स्मृतिशेष साम्राज्याच्या इतिहासावर प्रकाश पाडावा या सद्धेतूनं अनागोंदीच्या महाराजांनीं आसपासच्या प्रदेशांत उत्खनन चालवलं आहे. तेथील एक मनुष्य कांहीं कारणामुळें नोकरी करूं शकत नसल्यामुळें कौस्तुभाला ती नेमणुक मिळणार आहे.

कौस्तुभाबरोबर मी जाणें जमणार नाहीं. त्याच्याबरोबर वनवासांत जायला मी तयार आहें पण तो कांहीं मला न्यायला कबूल नाहीं. तो म्हणतो कीं, मला कांहीं रामासारखें सृष्टिसौंदर्य बघत, शिकार करीत, सीतेचे लाड पुरवीत भटकायचं नाहीं. मला काम करायचं आहे.

म्हणूनच आमचं दोघांचंही असं ठरलं कीं मी मुंबईलाच यावं अन् मनमुराद तुम्हां मंडळींत राहून घ्यावं.

आहेत ना पण या आनंदाच्या बातम्या ?

हो. आणि दादासाहेब, नुकतीच घडलेली एक गंमत मागलीं दोन पत्रं अगोदरच लांबल्यामुळें मला कळवणें जमलें नव्हतें. आज ती लिहितें हं.

कौस्तुभाच्या प्रिन्सिपॉलनीं त्याला एक नवीनच पदवी बहाल केली आहे. ती म्हणजे दगडाची.

पण थांबा. आधीं हंसूं नका. मी सगळीच हकिगत लिहितें. अलीकडे कौस्तुभ कसल्याशा मातीसंबंधीं एक नवीनच संशोधन करीत होता. म्हणे तीनचार वर्षें कित्येक शिक्षकांनीं आणि विद्यार्थ्यांनीं त्या बाबतींत प्रयत्न करून पाहिले पण कुणालाच यश लाभलं नव्हतं.

कौस्तुभालाही यश येईना. पण त्याला अशी आशा वाटूं लागली कीं अमुक एक प्रकारचं कांचेचं उपकरण जर आपल्याला मिळालं तर आपण हा प्रयोग यशस्वी करूं शकूं. पण तसलं उपकरण अजून कुणीही तयार केलेलं नव्हतं.

तरी निराश न होतां कौस्तुभानें स्वतः कांचेचा रस फुंकून विशिष्ट वळणें आणि विशिष्ट बारीक जाड आकाराच्या नळीचं उपकरण, बऱ्याचशा श्रमानंतर तयार केलं.

आणि कित्येक लोकांना जो शोध जमला नव्हता तो कौस्तुभानं आपल्या उपकरणाच्या साहाय्यानं अगदीं सर्वसुलभ करून टाकला.

सर्वांनीं कौस्तुभाचं केवढं तरी हार्दिक अभिनंदन केलं ! प्रिन्सिपॉल, प्रोफेसर्स, विद्यार्थी सर्व होते त्यांत सामील.

पण इतक्या जणांच्या अभिनंदनांचा वर्षाव झाला तरी कौस्तुभाला कुठं तो पुरा वाटला ? तो मला तें उपकरण दाखविण्यासाठीं म्हणून इन्स्टिटयूटमध्यें घेऊन गेला, आणि चांगला अर्धापाऊण तास मला तें समजून देण्यांत त्यानें खर्च केला. मी त्याला एकदोन वेळां म्हटलं कीं मला त्या प्रयोगाची कांहीं माहिती नसल्यानं मला तें कांहीं नीट समजत नाहीं. पण असं म्हणतांच तो थांबला कीं काय ? मुळींच नाहीं. त्यानं पुन्हां पहिल्यासून मला प्रयोगांची माहिती करून देण्यास सुरवात केली अन् त्यानं सांगितलेलं सर्व मी जेव्हां पोपटासारखं त्याला पुन्हां म्हणून दाखवलं आणि त्याचं अभिनंदन केलं तेव्हां त्याचं समाधान झालं.

हें प्रकरण आटपल्यावर मला त्यानं प्रिन्सिपालची ओळख करून देण्यासाठीं नेलं. कौस्तुभ त्यांचा फारच आवडता असल्यामुळें चांगले दहा मिनिटेंपर्यंत त्यांनीं त्याची तैलबुद्धि, चौकसवृत्ति, सहनशीलता आणि निरलस उद्योगप्रियता यांचं वर्णन केलं आणि शेवटीं ते म्हणाले, " मिसेस सहस्रबुद्धे, तुम्हांला हा एक महत्त्वाचा दगड नवरा म्हणून लाभला आहे. "

मला हंसू आलं तेव्हां लगेच त्यांनीं स्पष्टीकरण केलं कीं, " दगड म्हणजे अत्यंत महत्त्वाचा शिलालेख ज्यावर लिहिलेला सांपडला आहे असा दगड. "

प्रिन्सिपॉलसाहेबांनीं त्याच दिवशीं शिलालेख या विषयावर विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान दिलें होतें !

त्या दिवसानंतर दगड हें कौस्तुभाचें विशेषण म्हणजे आम्हांला कायमचा असा एक हास्यविषय मिळाला आहे.

आतां या आपल्या दगडाला विजयनगरच्या दगडांत वावरायला सांपडणार म्हणून आनंद होणं साहजिक नव्हे कां ? आणि त्याच्या आनंदानं मलाही अत्यंत आनंद वाटतो आहे. अर्थात् आतां पुष्कळ दिवस आमची गांठभेट होणार नाहीं या विचारानं तो मालवल्यासारखा होतो, ती गोष्ट निराळी.

तेव्हां मी आतां लवकरच तुम्हां सर्वांना भेटणार. शीला आणि धारिणी या दोघींना या पत्राबरोबरच मी लिहित आहें.

पण त्या लबाड ड्यूकला मात्र मी येणार याबद्दल मुळीं मुळींसुद्धां पत्ता लागूं देऊं नका. मला बघायची आहे त्याची गंमत.

मी इंग्लंडहून आलें तेव्हां त्यानं माझ्या अंगावर उड्या मारून अन् मला चाटून कसं बेजार करून टाकलं, ऊं ऊं करून आम्हांला कां सोडून गेलीस म्हणून तो कसा रुसला, भिरीभिरीं घरभर धांवत सुटला आणि शेवटीं एका कोपऱ्यांतून माझा एक, चाऊन जीर्णशीर्ण करून टाकलेला जुना बूट माझ्यासमोर मोठ्या आदरानं त्यानं कसा आणून ठेवला तें आठवतं ना? तो जणूं म्हणत होता, "हा तुझा जुना बूट माझ्या सोबतीला होता म्हणून मी इतके दिवस तुझ्यावांचून काढूं शकलों."

तेव्हां आतां यावेळेला तो कसा वागतो तें मला पहायचं आहे.

पण माझे आशीर्वाद त्याला सांगा हो. माझ्या पत्राचा वास त्याला घेऊ द्या म्हणजे समजेल त्याला माझंच पत्र आहे म्हणून.

बरं आतां पुरें करतें पत्र. आतां थोडेच दिवस उरले आहेत. मग प्रत्यक्ष भेटल्यावर खूप बोलायला मिळेलच.

तुमची कीर्ति."

कीर्तीनें तिन्हीं पत्रें पाकिटांत घालून त्यावर पत्ते घातले, तिकिटें चिकटवलीं आणि तीं पेपरवेटखालीं सारून दिलीं.

तिनें घड्याळांत पाहिलें तों बारा वाजले होते. तरी झोप एकाद्या भ्यालेल्या वैरिणीसारखी दूरदूर चालली होती. आंत जाऊन पलंगावर पडावें असेंसुद्धां तिला वाटेना.

पण तिचें मन जरी दमलें नसलें किंवा अती श्रमांमुळें विश्रांतीच्या मर्यादेबाहेर गेलें असलें तरी तिचें शरीर मात्र आणखी कोणतीही हालचाल करण्यास तयार नव्हतें. मनांत येरझारा कराव्या असें वाटत असूनही शारीरिक दुर्बलता जाणवून, मेजदिवा मालवून रातदिवा लावून ती खिडकीलगतच्या आरामखुर्चीवर पहुडली व तिनें डोळे मिटून घेतले.

तिचें मन मात्र, वेगांत आलेल्या व इच्छेबरहुकूम थांबण्यास असमर्थ असल्यामुळें सैरावैरा दौडत सुटलेल्या तेजाळ वारूप्रमाणें, नानाप्रकारचे विषय, विचारांच्या टापांनीं, भरधांव आक्रमूं लागलें.

तिच्या अंतश्चक्षूंना आतां स्मृतिपटलावरील लेखमाला दिसूं लागली. कुलुपबंद मेजाच्या कप्यांतील स्मरणवहीप्रमाणेंच ही स्मरणवहीही लोकदृष्टीपासून अबाधित होती. कुलपांतली वही काढून त्यांतील पानें चाळण्याचा मोह मनुष्याला कधीं कधीं आवरत नाहीं, मग त्यांतील अक्षरें सोनेरी असोत वा रक्तरंगी असोत.

कीर्तीलाही आज आपली स्मरणवही वाचून बघण्याची इच्छा झाली.

नको वाटत असूनसुद्धां तींतील रक्ताक्षरें भराभर वाचीत स्मृतीचें एकेक पान ती उलटूं लागली.

कीर्तीनें आपल्या स्मरणवहीचें पहिलें पान काढून अंतश्चक्षूंनीं वाचण्यास आरंभ केला.

महाबळेश्वर !

लग्नापूर्वी नंदनवनाप्रमाणें सुखविलासांनीं परिपूर्ण भासणारें तें कल्पनारम्य महाबळेश्वर !

अन् लग्नानंतर ओसाड सहारा बनलेलें ते रखरखीत महाबळेश्वर !

मंगलमय कुंकुमांच्या सड्यांनीं संमार्जित केल्याप्रमाणं न दिसतां अशुभ रक्ताचे सडे घातल्याप्रमाणं दिसणारं तें तांबड्या रस्त्यांचं महाबळेश्वर !

स्वर्गोद्यानांतली राखीव जागा आम्ही गमावली. मी गमावली, आणि कौस्तुभाला माझ्याबरोबरच तेथून पाऊल काढावं लागलं. ज्ञानाचं फळ चाखल्यामुळें ईव्हबरोबर ॲडमचीही नंदनवनांतून हकालपट्टी झाली ना तसंच अगदीं.

ईव्हनं ज्ञानाचं फळ चाखलं नसतं तर किती बरं झालं असतं ?

लग्नापूर्वी कौस्तुभ दादासाहेबांच्याजवळ जें वाक्य बोलला तें मी ऐकलं नसतं आणि त्याची प्रतिज्ञाही त्या अभिनंदनपर पण अंतीं अशुभ ठरलेल्या पत्रानं मला सांगितली नसती तर......

तर आम्ही नंदनवनांत मनसोक्त विहार केला असता. आम्हांला त्याला मुकावं लागलं नसतं.

आतां आम्ही या रक्तभूमीवर पावलं टाकीत चालत असतों.

आणि माझ्याबरोबर कौस्तुभालाही यावं लागतं.

पण माझा कौस्तुभ किती मोठ्या मनाचा आहे ! माझ्याबरोबर चालतांना तो असं भासवतो कीं आपण जणूं नंदनवनांतल्या सुवासिक, नाजूक फुलांच्या पखरणीवरच चाललों आहों.

मी त्याला स्वर्गातून ओढून काढलं पण तो माझ्यावर यत्किंचित् राग दाखवीत नाहीं.

माझा कौस्तुभ !

अशा रीतीनं तो माझ्याशीं वागतो कीं मी एकादी सार्वभौम महिषी असून तो माझा एक मांडलिकच आहे.

नाहीं रे कौस्तुभ ! तसं मुळींच नाहीं. तूं माझा सम्राट् आहेस अन् मी तुझी दासी आहे.

माझा राजा ! माझा सम्राट् !

लोकांना वाटतं आमच्यासारखं आदर्श नी सुखी जोडपं कुठं पहायला मिळायचं नाहीं. सर्वांना आमच्या अमर्याद प्रेमाचं अगदीं कौतुक वाटतं, आमच्या सद्भाग्याबद्दल सर्व आमचं अभिनंदन करतात !

सगळा अभिनय ! लताच्छादित गुहेप्रमाणें आंतून पोकळ नी काळंकुट्ट !

लोकांच्या डोळ्यांत आम्हांला इतकी धूळ टाकतां येते तरी कशी ? इतका हा बेमालूम अभिनय आम्हांला साधतो कसा ?

पण हा सगळाच कांहीं अभिनय नव्हे. माझं कौस्तुभावरलं प्रेम ध्रुवाप्रमाणें अढळच आहे. त्याच्या ध्येयनिष्ठेमुळें माझा प्रीतीचा तारा कांहीं मावळलेला नाहीं.

कौस्तुभाचं देखील माझ्यावर प्रेम आहे पूर्वींइतकंच प्रेम आहे.

म्हणूनच आमचा अभिनय यशस्वी होत असावा.

कौस्तुभाचं माझ्यावर अतिशय सुंदर प्रेम आहे. तसं नसतं तर तो माझ्याशीं इतका गोड वागूं शकला असता का ? एकाद्या पशूप्रमाणें......

* * *

माझ्या मनाचा गोंधळ दादासाहेबांना उमगूं नये, आमच्या वागण्यांत त्यांच्या मायेच्या दृष्टीला कांहीं विपरीत दिसूं नये म्हणून त्यांच्या आग्रहाला न जुमानतां आम्ही बंगलोरला आलों. कौस्तुभालाही मुंबईहून लवकर निघण्याची इच्छा होतीच.

किती सुंदर बंगला कौस्तुभानं शोधून काढला होता माझ्यासाठीं !

गांवांत बंगला मिळेना म्हणून कॅंपांत बंगला बघावा लागला.

माझ्या जातीमुळं नोकरचाकर मिळायलासुद्धां त्रास पडला. आप्ताप्रमाणें वागणाऱ्या कांहीं लोकांनीं कौस्तुभापासून चार हात लांब राहून, कसं काय ठीक, येवढ्यावर समाधान मानण्यास सुरवात केली.

कौस्तुभाला मनस्ताप होत असून या गोष्टी मला समजूं नयेत म्हणून तो आपल्याकडून पराकाष्ठा करतो पण त्या मला अशा ना तशा समजतातच. मीही पण मला त्या समजतच नाहींत असं दाखवतें.

माझा कुणी अपमान करूं नये म्हणून तो किती जपत असतो.

माझ्याशीं मैत्री करण्याइतक्या ज्या स्त्रिया प्रागतिक मताच्या आणि सुस्वभावी आहेत त्यांच्याशीं माझी ओळख वाढावी, मला मैत्रिणींची कमतरता पडूं नये म्हणून त्याची इच्छा असते. ओळखी वाढविण्याच्या बाबतींत माझी उदासीनता पाहून त्याला मोठं नवल वाटतं.

किती चांगला आहे माझा कौस्तुभ !

त्याच्या चांगुलपणाची फेड मी मात्र अगदीं उलट प्रकारानं देतें आहें.

माझ्यामुळं त्याला जो मनस्ताप होतो तो हलका करण्याकरतां मी कांहींतरी करतें कां ?

आमच्या दोघांमध्यें मी ही दरी कशाकरतां निर्माण केली ? आतां मला ती भरून काढणं अशक्य होत चाललं आहे. दिवसेंदिवस ती खोलखोलच होत चालली आहे.

काय करूं मी ? या दरीवर कसला पूल घालूं ?

* * *

त्या दिवशीं ही दरी भरून निघण्याच्या बेताला आली होती !

आम्ही संध्याकाळीं फिरत फिरत बसवनगुडींत गेलों. कांहीं शास्त्रीय शोधाचा प्रयोग सहज यशस्वी झाल्यामुळें कौस्तुभ अगदीं खुषींत होता. मलाही त्यामुळें आनंद वाटून माझ्याही चित्तवृत्ति उल्हसित झाल्या. गप्पागोष्टींना अगदीं रंग भरत चालला होता.

गवि गंगाधरेश्वराचें आणि जवळचेंच बसवण्णाचें देऊळ दिसतांच कौस्तुभ म्हणाला, “ चल, तुला या देवळांतलं कोरीव काम दाखवतों. गवि गंगाधरेश्वराचं देऊळ एकाद्या लेण्यासारखंच आहे. एका प्रचंड दगडांत खोदलेलं आहे तें. शिवाय एकेका शिळेंत त्रिशूळ डमरू, छत्रं अशीं घडवलीं आहेत. बसवण्णाच्या देवळांत अकरा फूट उंचीचा एका शिळेंत सुंदर कोरलेला नंदी आहे. ”

मी चकित होऊन विचारलं, " पण मी देवळांत कशी येऊं ? "

यावर तो निष्काळजीपणानं ऊं: म्हणून माझा हात धरून मला देवळांत घेऊन गेला. कौस्तुभाबद्दलच्या कृतज्ञतेनं माझं हृदय वायुलहरींवर डोलणाऱ्या फुलाप्रमाणें हंसत होतं अन् त्याच वेळीं कसल्याशा भीतीनं मधेंच वावटळ आल्याप्रमाणें थरथरत होतं.

देवालयांत पाऊल ठेवतांच बाकीच्या सर्व गोष्टी मी विसरून गेलें. माझं अंत:करण अगदीं भरून आलं. माझा देवावर विश्वास नसतांनाही देवळांतल्या गंभीर, आणि शतकानुशतकें पवित्र भावनांच्या परिमलानं सुवासिक झालेल्या त्या वातावरणामुळं माझ्या सात्त्विक मनोवृत्ति उचंबळून आल्या, हर्षलहरी नसांनसांतून नाचूं लागल्या. माझे हात भक्तिभावानं जुळले. सद्गदित होऊन मी उद्गारलें, " माझा विश्वास नाहीं तरी देवळांत येतांच मला इतका आनंद होतो, नी उदात्त गोष्टी मनांत स्फुरूं लागतात, मग ज्या माझ्या जातिबांधवांची देवावर अढळ श्रद्धा आहे त्यांना प्रवेश मिळाला तर त्यांना किती बरं आनंद होईल ! कधीं बरं असा सुदिन उगवेल ? कौस्तुभ—"

पण कौस्तुभाला मी हांक मारलेली त्यानं ऐकली नाहीं. देवळाचा गुरव दारांत उभा राहून माझ्याकडे आणि कौस्तुभाकडे पाहून नेत्रांवाटे जणूं अग्निस्फुलिंग टाकीत होता.

मला मेल्यापेक्षां मेलं होऊन गेलं. कौस्तुभ मात्र धैर्यानं म्हणाला, " भिऊं नको. नीट दर्शन घेतलंस म्हणजे आपण जाऊं. घाई करण्याचं कारण नाहीं. "

त्या वेळीं कौस्तुभ किती उंच नी धिप्पाड दिसत होता. त्याच्या मुद्रेवरील धीरोदात्तता नंदादीपांच्या सोज्वळ प्रकाशांत अधिकच पूजनीय दिसत होती.

त्याचे डोळे मनांतली तत्वनिष्ठा बोलून दाखवीत होते आणि त्याबरोबरच करारी-पणानें चमकत होते. त्याची आधींच करारी दिसणारी जिवणी कठोर दिसत होती.

कौस्तुभाचा मला त्या वेळीं केवढा अभिमान वाटला. मला वाटलं हा तेजस्वी, बाणेदार तरूण माझा आहे. हा माझा पती आहे.

मी त्याच्याकडे क्षणभर मुग्धपणें बघतच राहिलें.

पण कौस्तुभाचं बोलणं ऐकतांच दारांतला गुरव एकेक पाऊल पुढें घेत अद्वातद्वा बडबडूं लागला. त्या पवित्र स्थळीं त्याचे शब्द भयंकर वाटूं लागले. सगळ्या

देवळांतल्या दगडांचा कण नी कण तो शब्दध्वनि अकाळविकाळपणें आक्रंदत आहेसं भासून त्या आवाजानं सर्व रक्त सळसळूं लागलं, शीर न् शीर शिरशिरूं लागली.

देऊळ विटाळलं. महा पाप लागलं. याप्रमाणें हवें तसें बडबडत तो गुरव अस्पृश्य लोकांविषयीं अपमानाचे शब्द उच्चारीत होता.

मी कांपऱ्या आवाजांत म्हटलं, " चल कौस्तुभ. "

कौस्तुभानं माझा हात धरून मुकाट्यानं तो मला देवळाबाहेर नेऊं लागला तेव्हां तो गुरव उद्धटपणानें माझ्यासमोर उभा राहून मला पुढं पाऊल टाकूं देईना. देऊळ पावन करून घेण्यासाठीं पैसे द्या म्हणजे जाऊं देतों नाहींतर हांका मारून लोकांना मदतीला बोलावतों—लोक संतापून तुम्हांला नुसतं कुबलून सोडणार नाहींत तर जीवसुद्धां घेतील—गांवभर बेअब्रू होईल, याप्रमाणें तो धमक्या देऊं लागला.

मला वाटलं देऊन टाकावे त्याला मागेल तितके पैसे अन् या सगळ्या भयंकर किटाळांतून सुटावं. मी कौस्तुभाला तसं सांगूं लागलें.

पण कौस्तुभाला तें पटलें नाहीं.

तो म्हणाला, " नाहीं. मी एक पै देणार नाहीं. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला पटली ती गोष्ट मी केली. कीर्ति, तुझ्या पावलाजवळ बसायची ज्याची योग्यता नाहीं त्यानं देवाची पूजा करावी अन् तुझ्यासारखीला देवळांत प्रवेशसुद्धां नसावा ही किती शरमेची गोष्ट आहे. "

तो पुजारी वाट सोडीना. तेव्हां कौस्तुभानं करड्या स्वरांत त्याला बाजूला हो म्हणून आज्ञा केली. तो भेदरला होता पण त्याची गुर्मी अजून उतरली नव्हती. तो माझ्याजवळ खेटूं लागला. तेव्हां कौस्तुभानं माझ्या खांद्याभोंवतीं एक हात टाकून मला जवळ घेतलं आणि दुसऱ्या हातानं, सर्व शक्ति एकवटून त्या गुरवाला मागें ढकललं. गुरव दगडाच्या भिंतीवर आदळला. त्या मारानं कांहीं क्षण त्याचं भान हरपलं. तो उठून पुन्हां पुढें येतो कीं काय हें बघण्यासाठीं कौस्तुभ जरा उभा राहिला. पण तो मनुष्य जागच्याजागीं भीतीनं थरथर कांपत उभा होता. कौस्तुभाकडे भेदरल्या नजरेनं तो बघत होता.

कौस्तुभ त्याच्याकडे बघून तिरस्कारानं हंसला. नंतर मला घेऊन देवळा-बाहेर पडला.

रात्रीं जेवणानंतर कौस्तुभ मला अनुतप्त स्वरानें म्हणाला, "माझी चूक झाली. कीर्ति, माझ्या मूर्खपणामुळें तुला आजचा अनुचित प्रसंग पहावा लागला."

मी म्हणालें, "त्यांत तुझं काय चुकलं कौस्तुभ? त्या गुरवानं अद्वातद्वा बोलायला सुरवात केली म्हणूनच तूं रागावलास."

कौस्तुभ नकारार्थी मान हलवीत विषादगर्भ स्वरानें म्हणाला, "त्या गुरवाच्या मनावर पिढ्यानुपिढ्या जे संस्कार झाले आहेत त्यांना धरूनच तो बोलला. तो अद्वातद्वा बोलला हा त्याचा दोष खरा पण कांहींतरी भयंकर गोष्ट घडली अशा समजुतीनंच भावना दुखावून तो बोलला, हें जाणून मी त्या बिचाऱ्या गुरवावर रागवायला नको होतं."

मी निषेधानं म्हणाले, "बरा बिचारा असेल! अन् त्याच्या भावना कसल्या नी दुखावल्या कुठल्या! खुशाल पैसे मागूं लागला कीं."

कौस्तुभ खेदानें म्हणाला, "हा आमचाच दोष असं मी म्हणतों. जीं देवालयं आम्ही अत्यंत पवित्र मानतों त्यांत पवित्र मनोवृत्तीचे लोकच पूजेअर्चेला असले पाहिजेत असा आम्ही आग्रह कां धरीत नाहीं? आणि लांचखाऊ लोकांना उत्तेजन देऊन आम्हींच त्यांना आणखी लांच खायला प्रवृत्त करतों ना?"

ही विचारसरणी मला पूर्ण पटली. कुणाला पटणार नाहीं?

आणखी थोडा वेळ बोलणें झाल्यावर जणूं अनिच्छेनें उठून कौस्तुभ आपल्या खोलींत गेला. मला वाटलं त्याचीं पावलं जड पडताहेत. माझ्यापासून दूर जाणं आज त्याला फार कठीण जातं आहे.

रात्रीं पलंगावर मी तळमळत पडलें असतां कौस्तुभाच्या खोलींत जावं अशी मला तीव्र इच्छा उत्पन्न झाली.

पुढें व्हरांडा, मध्यें हॉल नी त्याच्या दोन बाजूला तीन तीन खोल्या अशा रचनेच्या या बंगल्यांत माझें शयनगृह आणि त्याचें शयनगृह यांत एक हॉल आहे.

तो हॉल म्हणजे एक दरीच होती जशी.

त्या रात्रीं ती दरी फक्त एका हॉलयेवढीच आहे असं मला जाणवूं लागलं. फक्त आठदहा पावलांचीच काय ती कथा.

पण मला धैर्य झालं नाहीं.

कौस्तुभ माझा पुन्हां तिरस्कार करील ही भीति मनांत उद्भवली आणि त्याबरोबर मधल्या त्या हॉलचं पुन्हां दरींत रूपांतर झालं. दुसऱ्या दिवशीं कौस्तुभ उशिरां उठला. मला दिवसभर तो दिसलासुद्धां नाहीं. मला शंका वाटली, मला भीति वाटली कीं त्यानं रात्रीं मद्य—

* * *

कौस्तुभ माझ्यापासून दूर दूर राहूं लागला आहे अशी मला शंका येते. माझं निकट साहचर्य त्याला नकोसं वाटतं आहे. आमच्यांतील निर्मल स्नेहावर कसलं तरी आवरण पडतं आहे, या गोष्टीची जाणीव असल्याप्रमाणें तें आवरण दूर करण्यासाठीं कौस्तुभाची चाललेली धडपड पाहून माझं हृदय पिळवटून निघतं.

आमचं नातं कृत्रिम आहे. त्याला कोणतंच नांव साजत नाहीं.

* * *

तें नवें उपकरण करण्याच्या नादांत कौस्तुभ पंधरा दिवसांत माझ्याशीं पंधरा शब्दही बोललेला नाहीं.

तो मुळीं रात्रींचें जेवण आणि झोप यांखेरीज घरीं असेल तर ना. जेवतांनासुद्धां त्याचे त्या शोधाबद्दल विचार चालतात. माझी जशी त्याला आठवणच नसते.

माझे दिवस कसे उदासवाणे चालले आहेत. गवताची काडी जशी निराधारपणें दरियांत वहावत असते तशीच मी अमर्याद वाटणाऱ्या एकेका दिवसाचा प्रवास करीत आहें. चित्रकला, गायनवादन, विणकाम कशाकशांत मन रमत नाहीं माझं.

कौस्तुभाचा सहवास, त्याचं भाषण मला किती प्रिय आहेत म्हणून सांगूं ?

* * *

संभाळ बरं कीर्ति, संभाळ. तुला लाभलेला अमोल ठेवा कसल्यातरी कल्पनांवर वहावत जाऊन गमावून बसशील.

सध्यांची परिस्थिति असह्य होऊन कौस्तुभ एके दिवशीं तुझ्याजवळून निघून जाईल. कायमचा निघून जाईल. कृत्रिम बंधनांत तो किती दिवस राहील ? एक दिवस असा उगवेल...

छे: छे: ती कल्पनासुद्धां सहन होत नाहीं.

बाई कीर्ति, वेळींच सावध हो.

* * *

कीर्तीनें झरझरां या पानांवरून दृष्टि फिरवली.

नंतर हृदयाला जखम झाल्यामुळें त्यांतून सांडणाऱ्या रक्तानें स्मृतीच्या वहींतील आणखी एक पान तिनें रेखाटलें.

* * *

शेवटीं तो नष्ट दिवस आला. कौस्तुभ मला सोडून चालला आहे. माझ्यापासून दूर जाण्याकरतां तो अधीर झाला आहे.

त्याच्या भावनांशीं, रिंगमास्टरनें सिंहाला खेळवावें तशी मी खेळलें. तें बंधन नकोसं वाटणं त्याच्या मानी मनाला साजेसंच आहे.

माझी योग्यता तरी आहे कां असं वागण्याची ? पण मोठी माणसं कांहीं वेळ लहान मुलाला खोड्या करीत असतांना अंजारून गोंजारून ठेवतात ना तसंच कौस्तुभानं माझ्या मूर्खपणाकडे दुर्लक्ष केलं. आतां अजून माझा खेळ थांबत नाहीसं पाहून तो कां त्रासणार नाहीं ?

अजून सावध हो.

काय करूं मी ? त्यानं ध्येयाकरतां जर माझ्याशीं लग्न केलं—माझ्या प्रेमापेक्षां जर त्याला ध्येयाची अधिक किंमत आहे तर मी तरी त्याच्या ध्येयाला बळी कां जावं ?

त्यानं माझ्या प्रेमाचा बळी घेतलाच आहे.

तो जातांना माझं हृदय घेऊन जाणार ! त्यानं मात्र आपलं हृदय ध्येयदेवतेला वाहिलेलं आहे.

कौस्तुभाच्या सहवासावांचून माझं जीवन म्हणजे हृदयावांचून शरीर ! राजावांचून राज्य !

ज्या दिवसाला भीत होतें तो दुर्दिन शेवटीं उगवलाच.

आतां फक्त तीनच दिवस माझं खरं जीवन. तीन सोन्याचे दिवस !

मग माझा कौस्तुभ मला सोडून जाणार, माझा राजा जाणार ! जाणार ! ! जाणार ! ! !

* * *

एक जोराचा हुंदका येऊन कीर्तीची अंतःकरणांतील स्मरणवही धक्क्यासरशीं बंद पडली.

डोळ्यावर हात धरून हुंदके आंतल्या आंत दाबून कीर्ति कळवळून अश्रुपात करूं लागली.



---

# — २३ —

याच वेळीं कौस्तुभ आपल्या मंचकावर तळमळत पडला होता. त्यानें आपणा स्वतःलाच हजार वेळां प्रश्न विचारला होता कीं, मी हें बरोबर करतों आहे कां? कीर्तीला वाऱ्यावर सोडून मी निघून चाललों आहें हें माझं करणं योग्य आहे कां? माझ्या प्रीतीची अमोल संपदा लाथाडून द्यायला मी उद्युक्त झालों आहें हें शहाणपणाचं आहे कां?

पण मी तरी काय करूं? सध्यांची ही परिस्थिति मला अगदीं असह्य झाली आहे. कीर्तीच्या सन्निध राहूनही तिच्यापासून अनंत योजनें दूर असल्याप्रमाणें वागतांना माझ्या मनालाही अनंत यातना होतात.

या कारणानं मनांत औदासिन्य कांठोकांठ कोंडून राह्यलं असतांना हर्षलहरी फेंसाळून येत असल्याप्रमाणें वागायचं, साहजिकपणें जे शब्द ओंठांवर नाचत असतात, ते ओठ चावून मागें ढकलायचे अन् या प्रसंगीं काय वरं बोलणं योग्य असा निमिषार्धात विचार करून बोलायचं. पुन्हां आपण बोललों यांत कांहीं चूक बर नाहीं ना झाली म्हणून कीर्तीच्या नेत्रांतील नाजूक मनोहर विलास बघण्याऐवजीं तिचे मनोविकार एखाद्या परीक्षकाच्या उदासीन पण कांटेकोर वृत्तीनं तपाशीत बसायचं!

हें कृत्रिम जीवन किती दिवस चालायचं? त्याला कांहीं अंत आहे कां?

मला आतां भीति वाटूं लागली आहे कीं एखादे दिवशीं मी पशूप्रमाणें......

त्या दिवशीं अगदीं मी घसरलों होतों.

मी तिला देवळांत नेलं तेव्हां देवासमोर भक्तियुक्त अंतःकरणानं ती उभी असतांना तिच्या मुखमंडलावर जें पावित्र्य आणि जी तेजस्विता दिसत होती ती मनाला मोह पाडीत होती. तिची गौरकांति जशी ओसंडून निघून त्या अंधाऱ्या देवळांत तेजोवलयें निर्माण करीत होती. ती स्वतःच एक देवता होती जशी.

तिचें श्वेतवस्त्र तिला किती खुलून दिसत होतें. त्याचे जरीचे कांठ चमचम चमकून अभिमानानें जणूं स्फुरत होते. मिटलेल्या कमळकळीप्रमाणें तिचे जुळलेले पंजे शोभत होते. देवळांतल्या कुबट वासाऐवजीं तिनं लावलेला नाजूक सुगंध सर्व देवळांत दरवळून राहिला होता.

तो गुरव येतांच मी तिला भिऊं नको, म्हणून म्हटलं तेव्हां तिनं माझ्याकड किती प्रेमानं पाहिलं ! त्या प्रेमदृक्पातानं माझं हृदय आपलं स्थान सोडून जसं वर वर तरंगत निघालं आहेसं मला क्षणभर भासलं.

दुसऱ्या क्षणीं गुरवाचे अपशब्द कानावर आदळूं लागले नी माझें ऊष्ण रक्त सर्वांगांत लोटच्या लोट वहावे तसें सळसळूं लागलें.

नंतर संरक्षणाच्या दृष्टीनं कीर्तीच्या खांद्याभोंवतीं मी एक हात घालून तिला जवळ ओढली.

त्या वेळीं त्या स्पर्शाची मला जाणीवही नव्हती. घडलेल्या प्रसंगाबद्दल माझा क्रोधाग्नि धुमसत होता तोंवर मला त्याची आठवणही नव्हती.

पण मागून मन शांत झाल्यावर त्या गोष्टीची आठवण होऊन कीर्तीचा सुखस्पर्श पुन्हां पुन्हां अनुभवीत असल्याप्रमाणें माझ्या नसांनसांतून सुखलहरी उठत होत्या आणि जणूं त्यांच्या शीतल स्पर्शानेंच माझें शरीर रोमांचित होत होतें.

रात्रीं मी अस्वस्थ झालों होतों. मला झोंप येईना.

माझ्या भावना अनावर होऊं लागल्या. मला वाटलं कीं उठून कीर्तीच्या खोलींत जावं आणि तिला सांगावं कीं तूं माझी पत्नी आहेस—

त्या वेळेच्या बेफाम भावनांना मी कसा लगाम घालून खेंचून धरलं तें माझं मला माहीत ! नंतर बेहोष होऊन मृतवत् पडण्याइतकं मद्य मी घेतलं.

या प्रसंगाची पुनरावृत्ति होते कीं काय म्हणून माझं मन भीतियुक्त झालं आहे. मी कीर्तीच्या सहवासापासून शक्य तोंवर दूर राहून शास्त्रीय शोधांत मन रमवतों आहें पण त्यांत माझें मन किती दिवस मी गुंतवूं शकेन ?

ही परिस्थितीही दीर्घ काळ टिकणारी नसल्यानें पुढें काय हा प्रश्न सोडवणें जरूर आहे.

कीर्तीचा सहवास पूर्णपणें टाळणें हाच यावर उपाय.

मद्यपी बनून आयुष्याचा सत्यानाश करून घेण्यापेक्षां, कीर्तीच्या प्रीतीचें तिरस्कारांत रूपांतर होण्यापेक्षां तिच्यापासून दूर दूर जावं, आणि आपलं आयुष्य उत्तम कारणीं लावावं हेंच इष्ट.

माझी कीर्ति ! माझ्यावर तिचं अढळ प्रेम आहे यांत मुळींच शंका नाहीं.

ट्रॅमगाडींत मनुष्याला बोजा घेऊन प्रवेश मिळत नाहीं, त्याप्रमाणें प्रेमाबरोबर ध्येय स्वीकारायला कीर्ति कबूल नाहीं.

मी प्रतिज्ञा केली नसती, माझ्यासमोर कांहींही ध्येय नसतं तरीही मी कीर्तीशीं लग्न केलं नसतं असं कुठें आहे ? तिच्यासारख्या देवतेवर प्रेम करायला ध्येयाचा पाठिंबा कां लागत असतो ?

पण हें मी कीर्तीला कोणत्या शब्दांनीं, कोणत्या कृतींनीं पटवून देऊं ?

कीर्ति, तुझ्यावांचून मी आयुष्य कसं साहूं ?

पण तुझ्याजवळ तरी मी कसा राहूं ?

जातों कीर्ति, माझ्या जीवनज्योति, तुझ्यापासून दूर दूर अंधारांत जातों मी. माझ्या प्रीतिसरिते, तुझ्यापासून निघून ओसाड वाळवंटांत जातों. माझ्या देवते, माझं हृदय तुझ्या पायावर वाहून शून्य अंतःकरणानं मी जातों. कीर्ति, कीर्ति !

तरळणारीं आंसवें पुसण्यासाठीं कौस्तुभानें दंडावर तोंड लपवलें.

---

कीर्ति मुंबईच्या प्रवासांत असतां आगगाडीच्या खिडकींत उजव्या हाताचें कोपर ठेऊन व त्याच हाताच्या पंजावर उजवें कानशील टेकून बसली होती.

दोन बर्थच्या त्या डब्यांत एक युरोपिअन ऑफिसरची बायको होती. पण नवीनच हिंदुस्थानांत आल्याप्रमाणें मोठ्या गुर्मीनं आणि मधून मधून एखाद्या अपरिचित सुंदर पक्ष्याची हालचाल कुतूहलानं बघावी तशी कीर्तीकडे दृष्टिक्षेप करीत, जणूं हिच्या अस्तित्वाची काय किंमत करायची अशा बेपर्वाईनं ती वागत होती. तिचें खाणेंपिणें, विणणें, गाणें व गायनाबरोबर अभिनय करणें मनसोक्त चालूं होतें.

कीर्तीचेंही या कोणत्याही गोष्टीकडे लक्ष नव्हतें. ती शून्य दृष्टीनें बाहेर पहात होती.

घरीं पुष्कळच अश्रुपात केल्यामुळें तिचे मूळचे सुंदर टपोरे डोळे आतां आरक्त व गढूळ दिसत असून, डोळ्यांच्या झांकण्यांवर फुगोटा आल्यामुळें, ते जरा आकुंचन पावले होते. मूळच्या गौरवर्णावर अंतःस्थ कांतीच्या अभावीं पांडुरता भासत होती. बाहेर झिमझिम पाऊस पडत असून कांहीं तुषार कीर्तीच्या अंगावरही उडत होते पण तिच्या तप्त अंतःकरणाला त्यामुळें जरासा थंडावा लाभत असल्या-प्रमाणें ती त्यांचा शिडकाव सहन करीत होती.

टेलिग्राफच्या तारांवर जलबिंदूंचा सरच्या सर पसरला होता. पाऊस असूनसुद्धां कांहीं पांखरें तारांवर किंवा खांबांवर बसून नयनमनोहर अंगविक्षेपानें पंखांची चोंचीनें साफसुफी करीत, जुनीं झालेलीं पिसें उपटून फेंकीत मधूनच पंखांचीं फडफड करीत होतीं. जलवर्षावानें सुख होत असल्याप्रमाणें त्यांचा किलबिलाट चालला होता. आणि एखादे वेळीं अंग भिजून फार गार झाल्याप्रमाणें मोठ्यानें ओरडत तीं भुर्रदिशीं उडून जात. आणि कोणत्या तऱ्हेनें तीं एकमेकांना संदेश देत कोण जाणें पण पांचपन्नास पांखरें एकसमयावच्छेदेंकरून उडत.

भराभर मागें रहाणारीं तीं लहानमोठीं गांवें ! एखाद्या देवदूताबरोबर फिरतांना भुर्रदिशीं अनंत विश्वें एकामागोमाग दिसावीं तसें एकेक गांव म्हणजे एकेक विश्वच होतें जसें.

चित्रपुस्तकाचीं पानें भराभर उलटून टाकावीं त्याप्रमाणें क्षणाक्षणाला पालटणारीं निसर्गदृश्यें दृष्टीसमोरून सरकत होतीं.

पण कीर्तीला या एकाही गोष्टीची जाणीव होत नव्हती.

दुःखाच्या अग्निकणांनीं ती पोळून निघत असतां पक्षांच्या जलक्रीडेकडे पाहून तिला आनंद कसा वाटणार? ज्या विश्वांत कौस्तुभाचा वास नव्हता त्या विश्वाविषयीं कीर्तीला औत्सुक्य तें कसलें? आणि जीं निसर्गचित्रें बघायला तिचा कौस्तुभ तिच्या सन्निध नव्हता तीं चित्रें बघून तिला काय करायचें होतें?

बाह्यचक्षूंनीं बघण्याजोगें आतां होतें काय?

ती आपल्या अंतश्चक्षूंनीं आपल्या स्मरणवहींतील भावनांच्या लिपींत लिहून काढलेलीं पानें रमतगमत वाचीत होती व दृष्टिकिरणांनीं मुद्रित करून घेतलेलीं कौस्तुभाचीं निरनिराळीं छायाचित्रें न्याहाळीत होती.

* * *

गेलाच शेवटीं कौस्तुभ.

हे चार दिवस माझं मन वादळांत सांपडलेल्या क्षुद्र नौकेप्रमाणें होऊन गेलं होतं.

कौस्तुभाचा सहवास पुन्हां मला लाभणार नाहीं या विचारानं त्याच्या सांनिध्यांत गेलेला क्षण न् क्षण मला प्रिय वाटतो. ते प्रसंग पुन्हां पुन्हां आठवण्यांत आनंद वाटतो.

माझं प्रेम माझ्या मनांत मावत नव्हतं.

सगळं सगळं विसरून आपलं प्रीतीचं पुष्प त्याच्या पायावर वहावं आणि त्याला जाऊं नको म्हणून विनवावं असं हजार वेळां माझ्या मनांत आलं. पण कौस्तुभानं आपल्याभोंवतीं जणूं वज्रकवच घातलेलं होतं. मनांतून त्याचीही चलबिचल झालेली होती हें खास.

प्रीतीचा झरा श्रीफळांतल्या पाण्याप्रमाणें आंत खळखळत होता पण त्यावरल्या कठीण कवचाप्रमाणें त्याच्या मनाभोंवतीं त्यानं कठीण आच्छादन घातलं होतं.

तरीसुद्धां किती गोड गोड वागत होता तो!

या तीन दिवसांत तो घरांतून फारसा कुठें गेला नाहीं. बाजार करण्यासाठीं गेला तरी मला घेऊन जाई.

मी बघत नाहींसें वाटून तो प्रेमार्द्र दृष्टीनें माझ्याकडे पाही अन् मी पहातें आहें असं कळलं कीं झरंदिशीं दुसरीकडे पाहूं लागे.

किती सोन्याचे दिवस ते !

सूर्याच्या सोनेरी प्रभेनें उजळलेल्या चार दिक्सुंदरीच. जिवलग सोबतिणीप्रमाणें त्यांनीं मला सोबत केली. त्या सोबतिणी मला पुन्हां भेटल्या नाहींत तरी त्यांचा गोड सहवास मात्र मी जन्मांत विसरणार नाही.

कौस्तुभ जातांना माझा निरोप घेण्याकरतां माझ्या खोलींत आला तेव्हां अस्थिर चित्तानं उभी राहून मी त्याची वाटच पहात होतें.

त्याची प्रवासी वेषांतसुद्धां शोभून दिसणारी मूर्ती डोळ्यांतील बाहुलीच्या लेन्समधून हृदयावर छापून काढावी अशी मला इच्छा झाली. खाकी अर्धी विजार आणि करड्या रंगाचे गरम पायमोजे यांच्यामधील स्त्रीहृदय आकर्षून घेण्याइतका सुडौल व भरदार दिसणारा गुडघ्यावरचा मांडीचा थोडा उघडा भाग, आणि कमानदार, प्रमाणबद्ध पोटऱ्या; खांद्यांची व छातीची रुंद व भरदार ठेवण; कमरेंतील निमुळतेपणा आणि पुन्हां सुडौल रुंदटपणा दाखविणारा उंची शिलाईचा गडद निळा ब्लेझरचा कोट; आणि त्याखालीं आपणच विणून दिलेला अस्मानी लोकरीचा स्कार्फ याप्रमाणें कौस्तुभ मोठा देखणा व रुबाबदार दिसत होता. आपली हॅट मोठ्या ऐटबाज पद्धतीनं त्यानं कोपराशीं दुमडलेल्या डाव्या बाहूमध्यें अंगाशी लगट अशी पकडून धरली होती आणि त्याच हाताच्या दोन बोटांमध्यें जळती सिगरेट होती. हॅट काढल्यामुळें त्याचा भांग पाडलेला काळाभोर, घनदाट व मृदु केशकलाप आपलें शिरोधार्यत्व सिद्ध करीत होता.

त्याचें रेखीव तेजस्वी मुखमंडल दिलदारपणा आणि करारीपणा यांच्या संमिश्र भावनांनीं मोठं आकर्षक बनलं होतं. त्याच्या हनुवटीची ठेवण तीवरील खळीमुळें विलक्षण सुंदर दिसत होती. त्याच्या ओठांवर मंद खेदमिश्रित हास्य चमकत होतं पण त्याचे पिंगट सुंदर नेत्र मात्र वेगळीच भाषा बोलत होते. त्यांत एक सूक्ष्म अशी कोमलतेची छटा आली होती.

मला भासलं कीं ते नेत्र मला अखेरचा गाढ प्रीतीचा संदेश देताहेत.

हंसत मुखानं माझ्याजवळ येऊन शेवटल्या हस्तांदोलनासाठीं त्यानं आपला

उजवा हात पुढें केला तेव्हां मात्र माझं दुःख उसळून येऊन अनावर झालं आणि मला रडूं कोसळलं.

कौस्तुभाच्या मनाचीही विलक्षण चलबिचल होऊन करुण स्वरानें कीर्ति म्हणून हांक मारून चारपांच क्षण, काय बरं करूं मी यावेळीं, अशा संशयाकुल मनस्थितींत तो उभा राहिला. मग एकादें नको असलेलें जड ओझें खांद्यावरून दूर झुगारून दिल्याप्रमाणें, ओठ घट्ट आंवळून धरून, त्या ओझ्यावर रागावल्याप्रमाणें कपाळावर आंठ्या घालून त्यानं मान आणि खांदे यांची कांही विशिष्ट हालचाल केली. लगेच हलकें वाटूं लागल्याप्रमाणें, त्याच्या मुद्रेवर समाधान झळकलें. संधिप्रकाशाच्या सुवर्णआरक्त किरणांप्रमाणें, कोमलता आणि प्रीति यांच्या मिश्र छटांनीं त्याचें मुख उज्वल दिसूं लागलें. त्याचे तेजस्वी डोळे मधुर भाव व्यक्त करूं लागले.

निमिषार्धांत त्यानं टोपी आणि सिगरेट टेबलावर टाकून मला बाहुपाशांत बद्ध करून टाकलं, हनुवटी नाजूकपणानं उजव्या हाताच्या बोटांनीं वर उचलून माझं दीर्घ चुंबन घेतलं, आणि तेवढ्यानं तृप्ति न होऊन माझ्या गालांवर, माझ्या कपाळावर त्यानं चुंबनांचा वर्षाव केला, आपल्या कोटाच्या खिशांतून रुमाल काढून माझीं आंसवें कोमलपणें पुसलीं, आणि माझ्या केसांवरून तो हात फिरवूं लागला.

त्याचे हात व ओठ थरथरत होते. त्याचा जोरानं चाललेला श्वास माझ्या श्वासाशीं जणूं प्रणयक्रीडा करीत होता. त्याच्या हृदयावर विसांवलेल्या माझ्या मस्तकाला त्याची धडधड जाणवत होती.

शेवटलेपणाच्या जाणिवेनं माझ्या हर्षलहरी अश्रुसिंचनानंच बाहेर उमटत होत्या. माझे हुंदके आणखीच वाढले.

अन् अखेर भावनावेगाच्या भरांत येऊन कौस्तुभानं माझं मस्तक वर उचललं आणि जातांना एकादी सुंदर वस्तू आठवणीदाखल देऊन ठेवावी त्याप्रमाणें त्यानं माझ्या उजव्या गालावर जोरानं दंतव्रण केला.

रुद्ध स्वरानं तो मला म्हणाला, " कीर्ति असं काय बरं करावं ? "

मी रडत रडत म्हटलें, " कौस्तुभ, नको रे जाऊं तूं. तुझ्यावांचून मी काय करूं ?"

त्या माझ्या शब्दाबरोबर जणूं तें प्रेमाचं स्वर्गीय वातावरण बिघडून गेलं. पुन्हां खांद्यावर ओझें येऊन पडल्याप्रमाणें कौस्तुभाची चर्या श्रमित झाली.

तो खेदानं म्हणाला, " मग काय करूं मी ! गेल्या पांच महिन्यांतलं जीवन पुढेंही घालवायला मला शक्ति नाहीं. मी जावं हेंच योग्य. "

असं बोलत असतांच आधीं निराशाजड वाटणाऱ्या त्याच्या स्वरांत निश्चयाची छटा आली.

किती तरी बोलायचं मनांत असून हुंदक्यांवर हुंदके येऊन " जाऊं नको. " यापलीकडे माझ्या तोंडांतून शब्द उमटेना.

" शक्य नाहीं तें आतां. मला गेलंच पाहिजे. " असं दृढपणें म्हणून, आपल्या मानेभोंवतीं पडलेला माझ्या बाहूंचा घट्ट विळखा निग्रहानं सोडवून, " गुडबाय माय डिअरेस्ट, " येवढं शेवटीं बोलून आपली हॅट उचलून तो पुन्हां मागें वळूनही न पाहतां निघून गेला.

अन् मी आतां एकटीच लांबच्या प्रवासाला निघालें आहें.

* * *

वेळोवेळीं किती तरी संमिश्र भावना कीर्तीच्या मुखावर उमटत होत्या पण सर्वांना कापून टाकणारी मुख्य भावना म्हणजे औदासिन्याची होती. भरतकाम करतांना इंद्रधनुष्याप्रमाणें विविधरंगी कितीही सुंदर पानं, फुलं, पक्षी, फुलपांखरं भरलीं तरी खालची काळी मखमाल मात्र कायमच असते. त्याप्रमाणें कीर्तीच्या निरनिराळ्या भावनांमागें औदासिन्याची पार्श्वभूमि कायम होती. मधून मधून ती फक्त झांकल्याप्रमाणें काय ती दिसे.

भावनाच्या इतक्या या खळखळाटांत शरीर जवळ जवळ निश्चलच होतें म्हटलें तरी चालेल. तिचा फक्त एक चाळा मधून मधून होत असे.

कानशिलापासला हात काढून त्याच्या बोटांचा नाजूक स्पर्श ती आपल्या उजव्या गालावर करीत होती. कौस्तुभाचे दंतव्रण ज्याठिकाणीं उमटले होते त्याभोंवतालची जवळजवळ पैशायेवढी जागा आरक्तवर्ण झाली होती. कीर्तीनें त्या जागीं गुलाबी रूज व पावडर लावून ती लोकदृष्टीपासून बरीचशी झांकून टाकली होती.

पृथ्वीमोलाची राजमुद्रा गुलाबी कापसांत ठेऊन तीवरून मलमलीचें आवरण घालावें आणि तिला वरचेवर स्पर्श करून, ती सुरक्षित आहे व आपलीच आहे या जाणिवेमुळें त्या स्पर्शापासून उत्पन्न होणाऱ्या सुखसंवेदनांचा लाभ करून घ्यावा त्याप्रमाणें, कौस्तुभाची ती अनंतविश्वांच्या मोलाची प्रेममुद्रा पुन्हां पुन्हां स्पर्शून कीर्ति नवनवोन्मेषशाली मधुर सौख्यस्मृति अनुभवीत होती.

कीर्तीला आणण्याकरतां म्हणून मोटर स्टेशनवर पाठविल्यापासूनच दादासाहेब, कमानीजवळच्या फरसबंदीवरील आरामखुर्चीवर रेलून पडून, एका हातीं पुस्तक आणि एका हातीं पाईप अशा थाटांत कांहीं वाचण्याचा प्रयत्न करीत होते.

सकाळचे सहा वाजले असून प्रभातकालीन पिंवळसर प्रकाशामुळें सर्व सृष्टि एकाद्या सुंदर जरतारी शालीखालीं आच्छादून घातल्याप्रमाणें दिसत होती. जिकडे तिकडे निर्मल प्रसन्नतेचा भास होत होता. परंतु त्या सुंदर आवरणाखालीं कोणकोणते दोष दडवून टाकले होते कोण जाणें! मन मानेल तसा मोकाटपणें वहाणारा वारासुद्धां कोणीतरी आज्ञा केल्याप्रमाणें मंद गतीनेंच वहात येऊन तें आवरण दूर न करण्याची काळजी घेत होता, व लोकांचीं मनें दुसरीकडे आकर्षून घेण्यासाठींच कीं काय सर्वत्र मधुर सौरभलहरी पसरवीत होता. पक्षीसुद्धां त्याला सामील होऊन भक्ष्य शोधीत उडत असतां गोड गाणीं गात होते व समुद्रवीचींचा नाद जणूं त्यांना एका सुराची सांथ करीत होता.

दादासाहेब अत्यंत उत्कंठेनें कीर्तीची मार्गप्रतीक्षा करीत होते. त्यांच्या अंतः-करणांत अस्वस्थता आलेली असून कसलें तरी बारीक सल कुठेंतरी खुपत होतें.

कीर्तिकौस्तुभांच्या पत्रांत ध्वनित होणारा सुखाचा सूर खरोखरींचाच होता काय, असा विचार डोकावून, सर्व कांहीं ठीक असेल ना, असा प्रश्न ते वरचेवर स्वतःच विचारून स्वतःच सर्व शंकांचें निरसन करण्याचा प्रयत्न करीत होते.

डयूकही त्यांच्याशेजारीं फरसबंदीवर बसून दादासाहेबांच्या इतक्याच अधीरतेनें कीर्तीची वाट बघत होता. त्याला कांहीं कळवूं नका म्हणून कीर्तीनें पत्रांत लिहिलें होतें खरें, पण दादासाहेबांच्या सांगण्याप्रमाणें, मेरीनें आदल्या दिवशीं तिच्या खोल्या उघडून, मोलकरणीकडून झाडलोट करून घेऊन, तजबिरा व सामानसुमान यांवरील आच्छादनें काढून, त्यांची साफसुफी करून सर्व सामान व्यवस्थित लावण्यास सुरवात केली तेव्हांच त्या स्वारीनें ती गोष्ट ताडून आनंदानें त्या दोन्ही खोल्यांत नाचूनबागडून, जें जें आच्छादन मेरी घडी करण्यासाठीं हातीं घेईल त्याच्याशीं हिसकाहिसकी करीत त्यानें तिला सतावून सोडलें.

मेरीच्या विशाल पण जगत्प्रेमानें अगोदरच व्यापून टाकलेल्या हृदयांत जेवढा म्हणून रागाचा प्रवेश होणें शक्य होतें तेवढ्या रागानें ती त्याला रागें भरत त्याच्या तोंडून कापडें सोडवून घेण्यासाठीं परत हिसकाहिसकी करीत होती. आणि दुसरीकडे चाललेल्या गंमतीला हंसत सुटलेल्या मोलकरणीला, "क्यंव हँसती है? यह काम करनेका वख्त है और मजा करनेका है?" असें वरचेवर म्हणून पुन्हां डयूकला, "अरे बेटा ये क्या करते तुम? तेरे मनमें क्या शैतान आया है? अरे शैतान, कैसी धूम मचाती है तुम?" अशी बडबडत होती. आणि रागावण्याला डयूक भीक घालीत नाहीं असें पाहून मेरीनें जेव्हां केक हा शब्द उच्चारला तेव्हां तो एकदम दूर होऊन कोपऱ्यांत बसून केकची मार्गप्रतिक्षा करूं लागला.

त्या वेळेपासूनच कीर्तीची तो सारखी वाट बघत होता. दादासाहेबांच्याकडे अपेक्षित मुद्रेनें पाहून तो वरचेवर प्रश्न विचारीत होता, आणि इतक्यांत नाहीं म्हणून ते त्याला उत्तर देत होते.

शेवटीं फरसबंदीवर येतांना, "चल आतां, आपण तुझ्या छोट्या धनिणीची वाट बघूं." असें सांगून दादासाहेबांनीं त्याला चांगलेंच आशांकित करून सोडलें होतें.

कान टंवकारून तो सारखा कानोसा घेत होता, नजर भिरींभिरीं सभोंवार फिरवीत होता आणि नाकपुड्यांची हालचाल करून त्याही इंद्रियानें आली कां बरं, म्हणून तो पहात होता, व या कोणत्याच प्रकारें कांहीं खबर मिळाली नाहीं कीं मालकाकडे प्रश्नांकित पाहून तो विचारी, "येणार आहे ना आपली छोटी मालकीण?" अन् दादासाहेब नुसतीच मान हलवून किंवा "होय अं. जरा थांब." असे म्हणून त्याला धीर देत.

शेवटीं डयूक अगदीं कंटाळला आणि त्यानें एका वेगळ्याच रीतीनें मन रिझवून त्याला लागलेली ओढ जरा कमी करण्याचा प्रयत्न चालवला.

आपल्या सभोंवार माशांचा मोठ्ठा थोरला घोळका आहेशी कल्पना करून त्यांतील एकेक माशीच्या उडण्यावर लक्ष ठेऊन नेम राखून आपण तिला दांताच्या कैचींत पकडून तिची मोठ्या शिताफीनें शिकार करीत असल्याचा खेळ खेळण्यास त्यानें प्रारंभ केला.

डयूकची हालचाल व त्याच्या दांतांचा झालेला आवाज ऐकून तो काय खातो आहे म्हणून दादासाहेबांनीं दोन तीन वेळां वळून नीट पाहिलें पण माशीचिलीट कुठेंच कांहीं नाहींसें पाहून ते म्हणाले, " काय रे उगीच कांहींतरी चाळा करतोस?"

यावर डयूकनें असें कांहीं हंसून आणि खोडसाळपणें त्यांच्याकडे पाहिले कीं, " कशी पण गंमत केली! खरोखरी आपल्या कीर्तीला भेटण्याकरतां तुम्ही अधीर झालां असतांना उगीचच वाचण्याचें मिष करून तुम्ही आम्हांला फसवीत होतां नव्हे कां? आम्ही पण मग माशा पकडण्याचं मिष करून तुम्हांला फसवलं. वास्तविक आपण दोघांनीं तिच्याचबद्दल बोलायला हवं."

नंतर लगेच निराशेची एक लहर येऊन डयूकनें आपले पुढले दोन पंजे दादासाहेबांच्या मांडीवर टेकले व कंठांतून कांही एक चमत्कारिकच भुंकार काढला. तो जणूं विचारीत होता, " पण खरोखरीं इतक्यांत येईल ना ती? कां आतां यायचीच नाहीं?"

पण दादासाहेबांनीं कांहीं बोलण्यापूर्वीच जणूं डयूकला उत्तर मिळालें. त्यानें कान टंवकारून दूरचा आवाज ऐकल्यासारखें केलें, दादासाहेबांच्या मांडीवरून पाय काढून घेऊन सर्व निराशा दूर फेंकून दिल्याप्रमाणें अंग झाडलें आणि आनंदानें गुरगुरून हळूंहळूं शेपूट हलवण्यास आरंभ केला.

दादासाहेबांना लगेच कळून चुकलें कीं आपली मोटार जवळपास आली आहे व ती रिकामी नसून कीर्तीला घेऊन येत आहे. त्यांनीं पुस्तक टेबलावर ठेवलें व ते फरसबंदीच्या पायऱ्यांजवळ येऊन उभे राहिले.

तितक्यांत मोटार बंगल्याच्या आवारांत शिरली व सफाईदार रीतीनें कमानींत येऊन उभी राहिली.

दादासाहेबांना पहिल्यापासूनच डावा हात बाहेर काढून हलवीत कीर्तीनें आनंदभरानें हॅलो हॅलो, म्हणून त्यांना अभिवादन केलें होतें. आतां गाडी कमानींत येतांच शोफरनें दार उघडण्याची वाटही न पहातां तिनें आंतून दांडा फिरवून तें उघडलें व खालीं उडी घेतली.

पण डयूक तिला कुठला सरळ पुढें जाऊं देणार होता. कीर्तीनें दार पुरतें उघडलें नाहीं तोंच त्यानें उड्या मारीत येऊन तिचें हार्दिक स्वागत केलें. कीर्तीच्या कटिभागावर पुढले पंजे ठेऊन, अंगाला आळोखेपिळोखे देऊन आपलें झुपकेदार शेपूट हलवीत व

निरनिराळ्या प्रकारचे भुंकार करून, ती आपल्याला निर्दयपणें इतके दिवस सोडून गेल्याबद्दलचा राग, ती गेल्यावर आपली झालेली शोचनीय अवस्था, ती नसल्यानें वाटणारी उदासीनता, तिच्या भेटीविषयीं सदैव वाटलेली आशा आणि उत्कंठा, शेवटीं भेट झाल्याबद्दलचा हर्ष, व अंगावरून आणि डोक्यावरून कीर्ति पूर्वीइतक्याच प्रेमभरानें हात फिरवीत आपल्याशीं बोलत असल्याबद्दल कृतज्ञता अशा सर्व गोष्टी आपल्या भाषेंत त्यानें तिला मोठ्या आवेगभरांत, दादासाहेबांच्या " चल इकडे ये आतां " म्हणण्याकडे दुर्लक्ष करून बोलून दाखवल्या.

अन् मग कांहींतरी तांतडीचें काम करावयाचें विसरून राहिल्याप्रमाणें ड्यूक मोठ्या वेगानें घरांत धांवत सुटला.

कीर्ति पायऱ्या चढून वर येतांना, ड्यूकच्या घरांत अदृश्य होणाऱ्या सुंदर व डौलदार आकृतीकडे, कौतुकानें हंसून पाहून म्हणाली, " आतां आम्हांला कांहींतरी चांगलासा आहेर मिळणार बहुतकरून. "

दादासाहेबही आनंदानें हंसले. कीर्तीचे दोन्ही हात धरून, वात्सल्यपूर्ण दृष्टीनें तिला आपादमस्तक न्याहाळीत ते म्हणाले, " बघूं बरं कशी काय परत आली आहेस ती. " मग लगेच काळजी वाटून ते उद्गारले, " कीर्ति, बरीच वाळलेली दिसतेस तूं. आणि मला वाटतं काळवंडली पण आहेस ! "

कीर्तीनें लडिवाळपणें अंगविक्षेप करून, मान डोलावीत, धनुष्याकृति भृकुटि अधिकच बांकदार करीत गोडपणें उत्तर दिलें, " वा. चांगलं ! वाळलेय कुठली मी ! मागल्या महिन्यापेक्षां दोन पौंडानं वाढलं आहे माझं वजन. प्रवासाचा शीण आला आहेना म्हणून तुम्हांला वाटत असेल उगीच तसं, दुसरं काय ? बाकी काळवंडलें असेन मी. तिकडली हवाच मुळीं तसली आहे. मुंबईच्या हवेला मनुष्य गोरं होतं तर तिकडल्या हवेनं काळं पडतं. "

" तसं आहे खरं " असें म्हणून समाधानाचा निश्वास सोडून दादासाहेबांनीं विचारलें, " कौस्तुभ रुजु झाला असेल नाहीं आपल्या कामावर ? बरी आहे ना त्याची प्रकृती ? "

यावर कीर्तीनें उत्तर दिलें, " हो तर. केवढा वंडरफुल चान्स त्याला मिळाला आहे. अगदीं फारच आनंद वाटला त्याला. आतां माझी तिथें रहाण्याची सोय नाहीं म्हणून जरासं—हें वाटलं आम्हांला—"

" बरं ठीक. थोडे दिवसांचा वियोग कांहीं वाईट नसतो. सहा महिनेच कीं नाहीं ? जातील केव्हांच. चल बघूं आतां आंत. तोंड वगैरे धुवून भोजनगृहांत ये लवकर. मेरीनं चहाची सुंदर तयारी केली आहे." असें म्हणत दादासाहेबांनीं हॉलमधें येऊन मेरीला हांक मारली.

जवळपास कुठेंतरी येऊन उभी असल्याप्रमाणें मेरी झटकन् पुढें आली. आपल्या रुंद चेहेऱ्यानें ती तसेंच रुंद हंसत होती परंतु काळा वर्ण असूनही तिचें हास्य मात्र तिच्या अती शुभ्र दंतपंक्तीमुळें आणखीच निर्मळ दिसत होतें. तिचे मोठाले डोळे-सुद्धां आनंदाश्रूंनीं डबडबून आले होते. कीर्तीला लहानपणापासून वाढवल्यामुळें मेरीला सामान्य नोकरापेक्षां पुष्कळच जास्त अधिकार मिळाले होते. त्याच अधिकारांत तिनें कीर्तीजवळ येऊन व तिचा हात आपल्या दोन्हीं हातांनीं धरून दाबीत कीर्तीचें स्वागत केलें.

कीर्ति तिला म्हणाली, " मेरी, दादासाहेब म्हणतात कीं मी वाळलें आहें म्हणून. पण खरं सांगूं, मला तिकडल्या स्वैपाकीबाईचं जेवण कधीं रुचलंच नाहीं. आतां तूं मला आवडीचे पदार्थ खायला घालून चांगली लठ्ठ केली पाह्यजेस."

" ठीक तो. आपके लिये अच्छा पदार्थ मैं अवश्य करूंगी. अभी देखो तो सच मै ब्रेकफस्टके लिये कितना सुंदर पदार्थ बनाई है. ओ मसालेदार ताजी मच्छी, आमलेट, चीज, कुरकुरीत टोस्ट, धीमें पकायेली शेवई, मेरी खास पद्धतके बादाम बिस्किट और नारीयलकी केक. ऐसा कितना भी जिन्नस आपके लिये करी हूं "

मेरी मनापासून आठवून आठवून सर्व जिनसांचीं नांवें सांगत होती, आणि कीर्ति उत्सुकता दाखवून असं कां ? अरे वा ! असे हंसून उद्गार काढीत तिला प्रोत्साहन देत होती.

मेरीची यादी संपल्यावर कीर्ति हंसत म्हणाली, " मेरी, तूं तर मला एकाच दिवसांत अवाढव्य लठ्ठ करून टाकायचं ठरवलेलं दिसतंय. माझ्या तोंडाला विलक्षण पाणी सुटलंय. पण एडी कुठेय ? "

असें कीर्तीनें म्हणतांच छोट्या मालकिणीच्या आगमनानें झालेला आनंद, मोठ्या कष्टानें उसन्या गांभिर्याखालीं छपवीत एडी पुढें आला व झोकदार सलाम करून, " गुड मॉर्निंग ताईसाब. व्हेरी हॅपी टु सी यू बॅक. " म्हणून म्हणाला.

त्याच्याशीं हंसून थोडें बोलून कीर्तीनें इतरही नोकरांना बोलावून घेऊन त्यांचें कुशल विचारलें. माळ्याला आपल्या आवडत्या झाडांचा समाचार विचारला आणि तेवढ्यावर समाधान न झाल्याप्रमाणें बागेंत जाऊन दहापांच झाडें भिरीभिरीं हिंडून ती बघून आली.

कीर्ति कितीतरी हंसत होती, कितीतरी विनोदी बोलत होती. तिचा आनंद बघून नोकरमंडळीच काय पण दादासाहेबसुद्धां फसले.

पण तसें पाहिलें तर कीर्तीच्या या वेळच्या आनंदांत कृत्रिमता फारशी नव्हतीच. एकाकी, लांब प्रवासानंतर ती इतक्या प्रेमळ जगांत येऊन पडली होती, आणि त्यामुळें तिला खरोखरींच आनंद वाटत होता. सर्वांशीं बोलणें संपतांच उड्या मारीतच ती वर आपल्या खोलीकडे निघाली.

कीर्ति मेरीशीं बोलत होती तेव्हांपासूनच ड्यूक तिचें लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यासाठीं प्रयत्न करीत होता. पण त्या प्रयत्नांत यश येत नाहींसें पाहून जरा खट्टू होऊनच तो हॉलमधल्या टेबलाखालीं बसून कीर्तीच्या सर्व हालचाली लक्षपूर्वक पहात होता व कान वरखालीं करून सर्व बोलणीं ऐकत होता.

पण कीर्ति वर जाऊं लागतांच तो झटकन् उठला व धांवत तिच्यापुढें तिच्या खोलींत गेला, व ती आंत येतांच तोंडांत धरलेली एक वस्तू तिच्या हातांत कोंबण्याचा तो प्रयत्न करूं लागला.

मळकट फडकें पहातांच कीर्ति हात मागें घेऊं लागली परंतु लगेच तिला वाटलें कीं तसें केल्यास ड्यूकला मोठा अपमान वाटेल व अपमानाची ती जखम कदाचित् जन्मभर त्याला दुखवील. हा विचार मनांत येतांच ड्यूकनें आणलेल्या त्या वीतभर लहानशा ठिकठिकाणीं भोकें पडलेल्या मळकट फडक्याचा आहेर तिनें मोठ्या गौरवानें स्वीकारला.

तें मळकट फडकें हातीं घेतांच तिला कळून आलें कीं तें रेशमी होतें. जरा आश्चर्यानें तिनें तें गोळा झालेलें फडकें उलगडून पाहिलें तेव्हां तिच्या ध्यानांत आलें कीं तो आपलाच हातरुमाल आहे. आणि आणखीही एक गोष्ट विजेच्या धक्क्यासारखी तिला समजली.

तो हातरुमाल महाबळेश्वरला जाण्यापूर्वी तिनें किती शोधला होता. महाबळेश्वराहून

बंगलोरला जाण्यापूर्वी ती आणि कौस्तुभ मुंबईला राहिले असतांही तिनं त्याचा शोध मोठ्या कसोशीनं केला होता.

कारण लग्नदिवसानंतर पहांटे त्या हातरुमालाला कौस्तुभाच्या विस्तीर्ण भालप्रदेशाचा स्पर्श लाभलेला होता, अन् म्हणून तिला त्या हातरुमालाचें महत्त्व वाटत होतें.

कीर्तीनें तर्क केला कीं, आपल्याकडून विस्मरणानें तो तेथेंच गालिच्यावर पडला असावा आणि पुढें ड्यूकला तो सांपडला असावा आणि नंतर त्या रुमालाच्या वासानें दोन प्रिय व्यक्तींचें लाक्षणिक अर्थानें सांनिध्यसुख लाभणार असल्यामुळें ड्यूकनें तो जतन केला असावा आणि केव्हां केव्हां अती प्रेमानें तो चावून चावून जीर्ण केला असावा.

कीं तो रुमाल आपल्याला प्रिय असणार हें ओळखून ड्यूकनें तो आपल्या समजुतीप्रमाणें जतन केला ?

कोणतेंही कां खरें असेना कीर्तीनें खालीं बसून आपले दोन्ही हात ड्यूकच्या मानेभोंवतीं टाकले व ती त्याला प्रेमभरानें कुरवाळूं लागली.

---

मी आलें आहें, असा निरोप जातांच, सवड करून शीला आणि धारिणी दोघीही कीर्तीला भेटावयास आल्या. संध्याकाळीं धारिणी शीलेला घेऊनच मुळीं आली.

कीर्तीला पहातांच धारिणी म्हणाली, " कीर्ति, वाळलीस बाई तूं. " नंतर लगेच जरा हंसून तिनें विचारलें, " कांहीं बेतबीत तर नाहींना केलेला ? "

कीर्तीचें तोंड गोरेंमोरें झालें तें पाहून शीला टाळी वाजवून मान डोलवीत कीर्तीपुढें तर्जनी हलवून खिदळत म्हणाली, " हो गडे हो. चांगलाच चोर पकडलास गऽ तूं धारिणी. "

" इश्श. बेत कसला केला नी चोर कसला पकडला ? " आपल्याला कांहींच समजत नाहीं असा बहाणा करून कीर्तीनें विचारलें.

" अहाहा. जसं कांहीं अगदीं समजलंच नाहीं कांहीं. " धारिणी म्हणाली. " आतां ग दुसरा कसला बेत करायचा असतो ? " धारिणीनें पाळण्याची दोरी ओढण्याचा अभिनय करून म्हटलें, " हा हो बेत. "

इतक्यावेळांत कीर्तीनें आपलें मन पूर्ण कह्यांत आणलें होतें. ती दोन्ही पंजे नमस्कारांत जुळवून कपाळापर्यंत आणून बोलली, " आतां मात्र अगदीं कमाल झाली तुमची. लग्न झालं कीं मूल. याखेरीज बायकांना दुसरं कांहीं ध्येय नाहींच जसं. "

" खरं. हें मात्र आम्ही विसरलोंच. अत्यंत उदात्त ध्येय डोळ्यांसमोर ठेऊन वागणारे वडील. तेव्हां तुझ्या हाडींमासीं ध्येयवादी जीवन मुरलेलं. अन् शिवाय आतां पतिराजही तसेच लाभलेले. मग तुझ्या ध्येयवादित्वाला अगदीं बहर आला असेल यांत नवल तें काय ? सामान्य स्त्रियांच्याप्रमाणें लग्न नी मुलंबाळं येवढंच ध्येय न ठेवतां कसलं उच्च ध्येय तूं डोळ्यांसमोर ठेवलेलं आहेस तें तरी सांग. " शीला म्हणाली.

" बंगलोरला तूं आपल्या जातींत वगैरे हिंडलीस कां ? " धारिणीनें विचारलें.

कीर्तीनें नकारार्थी मान हलवीत उत्तर दिलें, " नाहीं बाई जमलं तें. मला त्या लोकांची भाषा कुठं समजत होती ? "

कीर्तीनें आपल्या मैत्रिणींना हें उत्तर दिलें. पण मोठ्या आश्चर्यानें ती स्वतःलाच प्रश्न करीत होती, " माझं ध्येय ? "

" माझं ध्येय—"

पाण्यांत एकच पान पडतें पण तें तरंगांवर तरंग उठवीत असतें. त्याप्रमाणें या एकाच शब्दाच्या योगानें किती तरी विचार कीर्तीच्या मनांत गर्दी करूं लागले होते. पण तिकडे दुर्लक्ष करून तिनें शीलेला म्हटलें, " तें राहूंदे शीले. तुझ्याबद्दल सांग बघूं सगळं. "

" आतां काय आणखी सांगूं ? दर आठवड्याला दोन दोन नोटपेपर तर पाठवीत होतें कीं. "

" तें खरं. पण तूं भूषणाला कां नाकारलंस तें सांग मला. "

" तीं कारणंही लिहिलीं होतीं मी. " शीला उडवाउडवीनें उत्तरली.

" हो. पण तीं पटत नाहींत ना मला. म्हणून विचारतें. तूं फार मोठी चूक केलीस असं वाटतं मला. "

शीला कंटाळा दाखवीत म्हणाली, " तूं दर पत्रांत माझी चुकी मला पटवून देण्याचा प्रयत्न केलास तीं पत्रं मला अगदीं मुखोद्गत आहेत म्हणेनास. अन् या धारिणीनंही कितीक वेळां मला त्याबद्दल धारेवर धरलं आहे. मग आतां पुन्हां कशाला तो प्रश्न काढतेस ? "

" पण शीला, तुला जी गोष्ट अत्यंत प्रिय ती घडून येण्याची वेळ येतांच तूं ती लाथाडलीस कशी ? तुझं भूषणावर इतकं प्रेम ! मग त्यानं मागणी घातल्यावर तूं त्याला नाकारलंस कसं हेंच मुळीं मला समजत नाहीं. " कीर्तीनें न राहवून पुन्हां पृच्छा केलीच.

उत्तर दिल्याशिवाय, तें कीर्तीला नीट पटवून दिल्याशिवाय सुटका नाहीं या जाणिवेनेंच कीं काय, शीला म्हणाली, " कीर्ति, अत्यंत प्रिय गोष्ट खरी पण ती गौरवपूर्वक घडली तरच तिचा स्वीकार करावासा वाटतो ना ? मोठ्या प्रयत्नपूर्वक मिळवलेलं पारितोषिक कां असेना, आपल्याला तें कितीका हवं असेना, कितीका त्याचं मोल वाटेना; पण तें मानासन्मानानं मिळालं तरच त्याचा स्वीकार आपण करतो ना ? तें तिरस्कारानं आपल्या अंगावर कुणी भिरकावलं तर त्याची पायमल्ली

करून तें दूर लाथाडून द्यावं असं नाहीं कां वाटणार ? " शीला शेवटीं संतापून बोलूं लागली होती.

अत्यंत विस्मयानें कीर्तीनें विचारलें " काय ? हें तूं भूषणाच्या मागणीविषयींच बोलते आहेस ? "

" होय. भूषणाच्या मागणीविषयींच बोलतेंय. " शीलेचा संताप विरल्यासारखा होऊन ती उद्वेगानें उत्तरली. " मी माझ्या घरीं रहात होतें, तेव्हां भूषणानं मला लग्नासंबंधीं विचारलं असतं तर मला केवढा मान वाटला असता. पण तेव्हां त्यानं कधीं अवाक्षर काढलं नाहीं. केसूभाईबद्दल माजलेलीं रणं त्याच्या कानावर नित्य जात असून त्यानं सगळं हंसण्यावारीं घालवलं. तुझ्या लग्नाच्या वेळीं भाऊसाहेबांनीं मला घातलेला निर्वाणीचा पेंच तुम्ही दोघीनीं त्याला सांगितला तरी त्यानं माझी केसूभाईवरून थट्टा केली. मी रागावलें तरी त्याला त्यांत कांहीं महत्त्व वाटलं नाहीं. अन् मी जेव्हां प्रत्यक्ष घर सोडून शाळेच्या वसतिगृहांत राह्यला गेलें, महिनाभर राह्यलें, तेव्हां एकदम जागा झाल्याप्रमाणं भूषणानं मला भेटून मागणी घातली. "

शीला थांबली. तिनें आपल्या गालावर ओघळलेले अश्रु चटदिशीं पदराला पुसले.

कीर्तीला शीलेनें पत्रांत याच गोष्टी लिहिल्या असतां तिला त्या उथळ वाटल्या होत्या, पण आतां शीलेच्या तोंडून भावनावेगाच्या संगतींत त्या ऐकतांच तिला पूर्णपणें पटल्या. काय बोलावें हेंच तिला सुचेना. धारिणीला तर शीलेनें पूर्वीच निरुत्तर केलेलें होतें.

जरा थांबून शीलाच पुन्हां सांगूं लागली.

" कीर्ति, भाऊसाहेबांनीं मला घराबाहेर काढलं त्यावेळीं माईशीं वाद नको अन् स्वतःला त्रास नको हीच काय ती भावना त्यांच्या मनांत प्रमुख होती. माझ्या दृष्टीनं ती गोष्ट किती अहितकारक होती याचा त्यांनीं काडीइतका विचार केला नाहीं. माझं पाऊल बाहेर पडायचा अवकाश, आमच्या जातींत ज्या कांहीं माझ्याबद्दल घाणेरड्या कंड्या उठल्या त्या काय सांगूं ! माईसाहेबांनीं घाणेरीचं पीकच काढलं जसं. शाळेंतून हांकलून देतील कीं काय अशी भीति पडली होती मला. आणि इतका हा कल्लोळ माझ्या डोक्यावरून गेल्यावर भूषणानं मला मागणी घातली. सांग कीर्ति, मला कां त्याच्या मागणीची किंमत वाटावी ? भूषणानं मला विचारतांच मी

त्याच्याशीं लग्न केलं तर त्याच्यावरूनसुद्धां लोक कांहींबाहीं बोलूं लागतील. काय त्या मागणीची नी लग्नाची शोभा! घरांतून पाऊल निघण्यापूर्वी त्यानं मला विचारलं असतं तर सगळं मानासन्मानानं नसतं झालं?"

"मग त्याचं शौर्य काय दिसलं असतं? सगळं सरळ झालं असतं ना!" धारिणी अर्धवट थट्टेंत म्हणाली.

पण कीर्ति गंभीरपणें उद्गारली, "खरंच. पुरुष हे असे कां वागतात? स्त्रीचें अबलत्व त्यांना इतकें प्रिय कां वाटावें?" या विचारावरून लगेच तिला लयलेची आठवण झाली. तिनें काळजीनें धारिणीला उद्देशून प्रश्न केला, "काय ग लैलीचं दुखणं असं महिनेन् महिने कां चाललं? चार महिने झाले ना आजाराला? कांहींच कसा गुण नाहीं? हवेवर पाठवणार होतीस ना तिला?"

"पाठवली ना तिला. कालच लैली परगांवीं गेली, तुम्हांला भेटावंसं मनांत होतं तिच्या पण फार आजारी असल्यामुळं जमलं नाहीं."

"गुरुरावांचं काय म्हणणं आहे?"

"गुरुरावांचं ना? चांगल्या हवेशिवाय तिला गुण पडणार नाहीं असं म्हणून त्यांनीं अगदीं हलवलीच इथून म्हणेनास. रक्तक्षयासारखं चिकट, त्रासदायक दुखणं. पहायचं काय होतं तें. इलाज करणं आपल्या हातीं. दुसरं काय आपण करणार?"

धारिणी इतरांना फसवूं शकली तरी डॉ. गुरुरावांना फसवूं शकली नव्हती. लैली पितृतुल्य डॉ. गुरुरावांपासून भीतीनें व लज्जेनें दूरदूर राहूं लागली. धारिणीही तिला बुद्धिपुरस्सर दूर ठेऊं लागली होती.

गुरुराव वरचेवर धारिणीला विचारीत कीं, लैली कां हल्लीं आमच्याकडे येत नाहीं?

इतर सबबी सांगून संपल्यावर धारिणीनें लैलीच्या प्रकृतीची सबब सांगण्यास सुरवात केली. मग मला नाहीं तर उदयाला तिची प्रकृति दाखवीत कां नाहींस असें विचारतां, दाखवीन म्हणतां म्हणतां कांहीं दिवस गेले.

परंतु गुरुरावांची माया भाडोत्री नव्हती. लैली आपल्याला भेटायला येत नाहीं तर तेच एके दिवशीं उठून तिच्या घरीं गेले.

गुरुरावांना पहातांच धारिणी आणि लयला यांना धरणीमातेनं पोटांत ठाव दिला तर बरं असें होऊन गेलें. लैलीनें त्यांचे पाय धरले.

पण सज्जन गुरुरावांनीं तिचा मर्मभेद केला नाहीं. उलट तिला आणि धारिणीला धीर दिला.

लयलेच्या परगांवीं जाण्याची व्यवस्थाही गुरुरावांनींच जमवली होती. लोकांना सांगण्यासाठीं त्यांनीं रक्तक्षय हा रोग सुचवला होता.

कीर्तीनें विचारलें, " तुमचे ते इंगलवाडकर नाहीं ना आपला हट्ट सोडीत ? "

" छे, मुळींच नाहीं. "

" अन् जगन्नाथाचं काय वृत्त ? "

धारिणी तिरस्कारानें कपाळाला आंठ्या घालून म्हणाली, " आहे पणोद्यालाच अजून. पण जरा चमत्कारिक बातम्या येतात मधून मधून. "

" तें कां ? "

" पणोदेकरांच्यासारख्या बेजबाबदार संस्थानिकांच्या दिमतींत जन्म काढायचा म्हणजे सुळावरची पोळी ती. "

" आणि तुझं कसं काय चाललं आहे ? "

" माझं ? "

" हो. म्हणजे दवाखान्यांतल्या कामाबद्दल विचारलं ग मी. "

" हं हं काम हो माझं ? " धारिणीनें स्मितपूर्वक समाधानानें उत्तर दिलें, " फारच छान ! तेवढाच काय तो विरंगुळा आहे मनाला. "

शीला व धारिणी निघून गेल्यावर कीर्ति झालेल्या संभाषणाविषयीं पुन्हां पुन्हां विचार करीत होती.

आणि नभोमंडळांत चांदण्या चमक चमक चमकून सूर्योदयाची वेळ झाली कीं एकीपाठोपाठ एक अस्तंगत होऊन, फक्त शुक्राचा तारा काय तो शिल्लक रहातो व लक्ष संपूर्णपणें वेधून घेतो, त्याचप्रमाणें शेवटीं एकच गोष्ट कीर्तीच्या चित्ताकाशांत उरून सर्व विचारांचा ओघ तिनें आपणांकडे ओढून घेतला.

कीर्तीनें पुन्हां स्वतःशींच उद्गार काढला, " माझं ध्येय ! "

ज्या शब्दानें तिला अलीकडे त्रासवून सोडलें होतें, तोच शब्द तिच्यासंबंधीं उच्चारतांच त्याची बोच मुळींच कुठें शिल्लक राहिली नव्हती असें कीर्तीच्या लक्षांत

आलें. बाहेरून उद्यानांत प्रवेश करूं पहाणाराला सभोंवतालचें शोभिवंत कापलेलें सुगंधित कुंपण प्रतिरोध करणाऱ्या शत्रुसैन्याच्या खड्या तुकडीसारखें दिसतें परंतु आंत असलेल्या माणसाला मात्र शत्रूपासून बचाव करणारी ती सुहृदांची रांग वाटते. कुंपण तेंच परंतु बाहेरच्या मनुष्याला त्याचा राग येतो व आंतल्या मनुष्याला त्याचें महत्त्व वाटतें.

कौस्तुभाच्या भोंवतालीं त्याचा ध्येयवाद चौफेर पसरला असून तो आपल्याला त्याच्या अंतर्मनाचा ताबा घेऊं देत नाहीं म्हणून कीर्तीला त्याचा राग वाटत होता, असलें हें कांटेरी कुंपण आपणांभोंवतीं घालून घेतल्याबद्दल तिला कौस्तुभाचाही राग आला होता.

परंतु आपल्या भोंवतालच्या कुंपणाच्या कल्पनेनें मात्र ती मुळींच बिचकली नाहीं. उलट तिला त्या कल्पनेंत सौंदर्य दिसूं लागलें.

आपल्या निरर्थक आयुष्याच्या उद्यानाभोंवतीं असें एकादें संरक्षक ध्येयाचें कुंपण आहे काय याचा ती शोध घेऊं लागली.

एक उसासा सोडून ती मनाशीं म्हणाली, " माझ्या आयुष्यांत अर्थ तरी काय आहे ? कां बरं ? आतांच माझ्या आयुष्यांत कांहीं अर्थ नाहीं असं कां मला वाटूं लागलं ? हं समजलें. कौस्तुभावर प्रेम करणं आणि त्याच्याकडून प्रेम करून घेणं हीच माझ्या जीवनाची इतिकर्तव्यता होती. आतां तें ध्येय बाजूला गेल्यावर मला असहाय वाटूं लागलं. खांबाशिवाय पटई तसंच आतां माझं आयुष्य.

त्यापेक्षां माझ्या जातीबद्दल मी अधिक जिव्हाळ्यानं कांहीं केलं तर ? माझ्या आयुष्याला जर ध्येयाचं कुंपण मिळालं तर—

पण मग दादासाहेबांना खरी हकिगत सांगावी लागेल ना ? कौस्तुभ कांहीं दिवसांपुरताच अनागोंदीला गेला आहे या गोष्टीवर ते विश्वास कसा ठेवतील ?

नकोच तें इतक्यांत.

जितके दिवस मी सुखांत आहें, माझा संसार व्यवस्थित आहे असं दादासाहेबांना वाटेल तितकं मला हवं आहे. कालहरणच केलं पाहिजे कसंतरी ! "

एकाद्या खोलगट जमिनीच्या ठिकाणीं पाण्याचा थेंबथेंब झिरपून येऊन कालांतरानें त्याचें गढुळकें तळें तयार होतें त्याप्रमाणें आधींच भीतीनें पोखरून काढलेल्या दादासाहेबांच्या मनांत संशय वाढवणाऱ्या एकेक क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टी सांचतां सांचतां त्यांनीं काळजीचें जसें एक तळेंच निर्माण केलें.

एकेक चमत्कारिक वाटणारा प्रसंग घडला कीं दादासाहेबांना वाटे कीं कीर्तीला एकदां विचारून घ्यावें आणि विचारांतीं ती गोष्ट अगदीं क्षुद्र व दुर्लक्ष करण्याजोगी वाटून त्यांनीं स्वत:लाच हंसून गप्प बसावें असें सहा महिने चाललें होतें.

आजचें कौस्तुभाचें पत्र वाचून मात्र त्यांच्या मनांतल्या काळजीच्या तळ्यानें ज्वालामुखींत रसरसणाऱ्या धातुरसाच्या तळ्याचें भयानक स्वरूप धारण केलें होतें.

पांच वाजतां कुठेंतरी आठदहा व्यापाऱ्यांची सभा होती तेथें दादासाहेब गेले होते तरी त्यांचें चाललेल्या भाषणांकडे किंवा कामकाजाकडे लक्ष नव्हतें. त्यांच्या भाषणांतून सूचित होणाऱ्या बाबीं इतर लोक मोठे लक्षपूर्वक ऐकत, परंतु आज त्यांचें चित्त ठिकाणावर नसल्यानें ते बोलायलासुद्धां उठले नाहींत. इतर व्यवसाय-बंधूंनीं काय तब्येत बरोबर नाहीं कीं काय, असें विचारतां, त्यांनीं, जरा दोन दिवस बेचैन आहें, असें सांगून वेळ मारून नेली.

सभा संपतांच आपल्या क्रिसलरमध्यें एका कोपऱ्यांत दोन मऊ रेशमी उशांवर श्रमल्याप्रमाणें अंग रेलून व मस्तक गादीच्या पाठीवर टेकून ते हुश्श करून बसले व नंतर त्यांनीं शोफरला हुकूम सोडला, “ मरीन ड्राइव्ह. ”

मोटर वेगांत चालूं लागली, आणि थोड्याच वेळांत समुद्राच्या धक्क्याजवळ शेकडों मोटारी ओळीनें उभ्या होत्या त्या ओळींत शेवटीं जाऊन उभी राहिली.

शोफरनें दार उघडून धरतांच दादासाहेब आपली छडी व फेल्टहॅट घेऊन उतरले. त्यांचा या वेळचा सर्व पोषाख युरोपीय पद्धतीचा होता.

आपल्या लांब लांब टांगांच्या रुबाबदार चालीनें ते धक्क्यावर फिरूं लागले, फिरतां फिरतां त्यांनीं छडी कांखेंत धरून एक चिरूट खिशांतून काढला, व धूम्रपान करणाऱ्यांच्या पद्धतीप्रमाणें जोरांत वारा वहात असूनही मोठ्या शिताफीनें काडी

पेटवून धरून तिनें तो शिलगावला. नंतर पुन्हां छडी उजव्या हातीं घेऊन ते चालूं लागले.

सूर्यास्त होऊन गेल्याकारणानें रस्त्याच्या पलीकडल्या नवीनच बांधलेल्या सुंदर व प्रशस्त इमारतींतून विद्युद्दीपांचा लखलखाट झाला होता. धक्यावरील थोड्या थोड्या अंतरावरील लावलेल्या दिव्यांचीं प्रतिबिंबें जलपृष्ठावर नाचत असतांना फारच मनोहर दिसत होतीं. धक्क्यावर हिंदु, पारशी, युरोपियन, मुसलमान वगैरे जातींचे शेंकडो लोक निरनिराळ्या भाषांमधून मित्रमैत्रिणींबरोबर संभाषण करण्यांत गुंग झाले होते. सुंदर चित्रविचित्र वेषभूषा केलेल्या स्त्रिया विद्युद्दीपांप्रमाणेंच चमकत होत्या.

फिरावयास आलेल्या लोकांच्या संभाषणांचा ध्वनि, मुलांचा कलकलाट, पानीवाला नारिअेऽल, भेळ, शेंगा खेळणीं वगैरे विकणाऱ्यांच्या आरोळ्या, येणाऱ्या जाणाऱ्या मोटारींचा घर्रर्र, पोंपों आवाज आणि त्यांतच मिसळणारा समुद्राच्या लाटांचा खळबळाट यांचा मिळून एक विलक्षण कोलाहल कानावर येत होता. समुद्राच्या खाऱ्या हुषारी आणणाऱ्या उग्र गंधयुक्त वायुलहरींत आणखी कितीतरी प्रकारच्या वासांचें मधून मधून मिश्रण होत होतें. ओहोटी असल्यामुळें लाटा मागेंमागेंच विराम पावून फेसाच्या ओळीच्या ओळी समुद्रतळांतून निघालेल्या मोत्यांच्या तेजःपुंज सरांप्रमाणें शोभत होत्या.

धक्यावरून फिरत असतां आजूबाजूच्या देखाव्यानें व थंड वहाणाऱ्या वाऱ्यामुळें व मधूनच अंगावर उडणाऱ्या शीतल जलतुषारांच्या स्पर्शामुळें दादासाहेबांचें मन प्रथम बरेंच स्वस्थ झालें. कांहीं ओळखीची मंडळी भेटून कुशल समाचारांतही आपल्या काळजीचा त्यांना जरा विसर पडला.

पण चालून थकल्यावर ते विश्रांतीसाठीं एका ठिकाणीं बसले तेव्हां धक्यावर आदळणाऱ्या लाटांप्रमाणें त्यांचे खिन्न विचार त्यांच्या मेंदूला धक्के देऊं लागले. सतत उसळणाऱ्या लाटांकडे आणि हलणाऱ्या पाण्याकडे पहातां पहातां आपण बसलों आहों तो धक्कादेखील हलत असल्याचा त्यांना भास होऊं लागला.

त्यांना वाटलें कीं कीर्तीवर आधारलेल्या आपल्या सुखाशांचें आसन असेंच अस्थिर झाल्याप्रमाणें आपल्याला वाटतें आहे तें खरें आहे कीं निवळ भास आहे ?

छे; पण तो निवळ भास कसा असेल ? ओहोटीला लागलेल्या या समुद्राच्या लाटा कितीही धांवत नाचत पुढें उसळून येतांना दिसल्या तरी मागून येणारी लाट

पहिल्या लाटेपेक्षां पलीकडेच थांबून परत जाते. त्याजागीं फेसाची एक रेषा मात्र शिल्लक रहाते.

कीर्तीचें सध्यांचें आयुष्यही असेंच चाललें आहे. कीर्ति पूर्वीसारखीच हंसत बागडत आहेसें दिसतें परंतु त्यांतील आनंदाला ओहोटी लागून दिवसादिवसाला तो कमी होतो आहे. एकेक दिवस या फेसासारखा शेवटीं निरर्थक ठरतो आहे.

पूर्वीचें तिचें आयुष्य म्हणजे पौर्णिमेच्या शुभ्र प्रकाशांत गगनस्पर्शी लाटांना भरती देणाऱ्या अथांग समुद्रासारखें होतें.

पूर्वीची ती हंसरी, अल्लड कीर्ति. तिच्यामुळें घर कसं सदैव गजबजलेलं वाटायचं. ती मग आपल्या खोलींत असली तरी, एखाद्या पानाआड दडलेल्या सुकुमार सुमाच्या सुगंधानें जसें त्याचें अस्तित्व कळून येतें तसाच तिचा अमूर्त आनंद घरांत गजबजून राहिल्यासारखा वाटे.

आतां कीर्ति संधि मिळेल तेव्हां बाहेर जाई. शीलाधारिणींना वेळ नसला तर दुसऱ्या कुणा मैत्रिणींना सोबतीला घेऊन हिंडणेंफिरणें, बोलपट पहाणें, सफरी काढणें किंवा कधींमधीं दादासाहेबांच्याबरोबर सभांना वगैरे जाणें, भाषण करणें, चर्मकार जातीच्या मुलांकरतां ज्या शाळा होत्या त्यांतून बोलावणें आल्यास बक्षिस-समारंभांना जाऊन बक्षिसें वाटणें, उपदेश करणें या गोष्टींत कीर्ति आपलें मन रिझविण्याचा प्रयत्न करीत असे.

या सर्व गोष्टी समोरच्या फेसाच्या बुडबुडयांइतक्या तरी तिचें मनरंजन करण्यास समर्थ होत्या कीं नाहीं याबद्दल शंकाच होती.

कीर्ति घरीं असली आणि हंसत बोलत असली तरी कांहीं चमत्कारिकच वाटे. आपली कीर्तीच कां ही असा प्रश्न दादासाहेबांच्यापुढें उभा राही.

ते वारंवार स्वतःला विचारीत, कुठें गेली ती माझी हंसऱ्या डोळ्यांची, लडिवाळ बोलणारी, गोड हंसणारी, आनंदीआनंद उधळणारी कीर्ति ? माझ्याभोंवतीं हवा आहे पण मला दिसत नाहीं, कळत नाहीं तशी कीर्ति माझ्या सन्निध असून मला सांपडत नाहीं.

तिचं सुख कुठं हरपलं ? तें कौस्तुभाजवळ राह्यलं कां ?

त्यांच्या प्रेमाला ओहोटी लागली काय ?

हा विचार मनांत येतांच दादासाहेब केवढ्यानें तरी दचकले. पाण्याचे तुषार उडाल्याच्या निमित्तानें त्यांच्या अंगावर कांटा उभा राहून शहारल्यासारखें झालें.

बसल्या जागेवरून ते उठले. केव्हांच विझून गेलेलें चिरुटाचें थोटूक त्यांनीं नकळतच दोन बोटांनीं दाबून चुरमडून टाकलें होतें. चिरूट म्हणून तें ओळखतसुद्धां नव्हतें. तो तुकडा दादासाहेबांनीं दूर भिरकावून दिला.

त्या कृतीबरोबरच मनांत त्यांनीं निश्चय केला, " बस, आज काय तें नक्की करून घ्यायचंच. आजचं कौस्तुभाचं पत्र. किती विलक्षण. त्याला कीर्तीच्या भेटीची यत्किंचित् आतुरता दिसत नाहीं. आणि कीर्तीलासुद्धां......" लगेच उठून दादासाहेब झपझप आपल्या मोटारींत येऊन बसले आणि मोटार बंगल्याकडे निघाली.

मोटारींत पुन्हां कांहीं वेळ गाढ विचारांत ते मग्न झाले. विचारांतीं पुन्हां ते म्हणाले, " हं, असंच केलं पाहिजे. कीर्तीकडून ही गोष्ट कळणार नाहीं. "

बंगल्यावर येतांच त्या विचाराला मूर्त स्वरूप देण्याला पूर्ण निश्चय व्हावा म्हणूनच जणूं त्यांनीं कौस्तुभाचें पत्र खिशांतून काढून त्याची घडी उलगडली व ते वाचूं लागले.

" परमपूज्य दादासाहेब यांस कृतानेक न. वि. वि.

आजचें पत्र लिहितांना मला फार आनंद वाटतो आहे. कारण तात्पुरती असलेली माझी नेमणूक आणखी एक वर्षानें महाराजांनीं वाढवली आहे. म्हणजे आणखी निदान वर्षभर तरी माझा अत्यंत आवडीचा व्यवसाय मला करायला सांपडणार आहे.

माझं काम किती यशस्वी रीतीनं चाललेलं आहे तें मी आपल्याला वरचेवर सविस्तर कळवीत आलोंच आहें. खरोखर मला वाटतं दिवसेंदिवस या कामांतला आकर्षकपणा वाढत आहे. काम करतांना तहानभूक हरपून जाते. जेवणाखाण्याची वेळेवर आठवणसुद्धां होत नाहीं.

मी आणि हर हॅनस् ओद्रान असे आम्ही दोघे हल्लींच्या जगांत वावरत नसून, विजयनगरांतील हिंदूसाम्राज्याच्या वैभवाचा उत्तुंग प्रासाद पाहऱ्या भराभर चढून कळसापर्यंत पोंचला आणि नंतर तेथून पुन्हां घसरत जमीनदोस्त झाला त्याच काळांत जणूं समरस होऊन गेलों आहों. ज्या ज्या प्रकारानें आमच्या संशोधनाचा

काळ पालटेल त्या मानानें आमच्या डोक्यावरून शतकेंच्या शतकें दिनदर्शकावरील फडफडत उडून जाणाऱ्या क्रमांकांप्रमाणें उडून जातात.

माझा वरिष्ठ हर ओद्रान किती उमद्या स्वभावाचा, किती दिलदार, आणि प्रेमळ आहे, जगांतील पुरातन संस्कृतींचें त्याचें ज्ञान किती शास्त्रीय आणि सखोल आहे हें मी मागल्या पत्रांतून लिहिलेलेंच आहे. त्याचा दुर्दम्य उत्साह, आणि कोणत्याही अडचणींना व संकटांना न जुमानतां पुढें जाण्याचा धीरगंभीर स्वभाव पाहून त्याच्या बरोबर काम करायला मिळतें म्हणून मला फार आनंद वाटतो. खरोखर माझें तें मोठे भाग्य असें मी समजतों.

कामाच्या बाबतींत तो जितका निष्ठुर आहे तितका एरवीं प्रेमळ मित्र आहे. नुकताच एका दरडीवरून घसरून पडल्यामुळें माझ्या पायाला दुखापत झाली आणि पाय सुजून थोडा ताप आला. त्यावेळीं हॅनसनें एकाद्या प्रेमळ स्त्रीप्रमाणें माझी शुश्रूषा केली.

पण यावरून नेहमींच असे अपघात आम्हांला होतात असें समजू नये.

माझी प्रकृति पूर्वीपेक्षांही कणखर बनली आहे. आमचे सहकारी व नोकरचाकर फारच चांगले आहेत. ते सर्व एतद्देशीय आहेत.

कीर्तीला पत्र पाठवीतच आहें. मी माझ्या कामांत कितीही गढलों असलों तरी तिचा क्षणभरही मला विसर पडत नाहीं.

आपला

**कौस्तुभ ”**

---

हेंच त्या दिवशीं दादासाहेबांना आलेलें कौस्तुभाचें पत्र होतें. नीट घडी करून त्यांनीं तें पाकिटांत घातलें आणि तें पाकीट आपल्या खिशांत ठेवलें.

दादासाहेबांनी कीर्ति घरीं आहे कां म्हणून एडीजवळ पृच्छा करतां ती शीले-बरोबर टॉकीला गेल्याचें कळलें.

दादासाहेब सरळ उठले व कीर्तीच्या खोलींत गेले. त्यांनीं दार ओढून घेतलें व बाहेरच्या खोलींतून ते आंतल्या शयनगृहांत गेले. दोन तीन किल्ल्यांचा जुडगा कीर्तीच्या वेषभूषेच्या मेजावर पडला होता.

दादासाहेबांनीं प्रथम त्याचाच कप्पा उघडला, पण त्यांत कांहीं सुगंधांच्या कुप्या, कर्णफुलें, मण्यांच्या माळा वगैरे वस्तू ठेवलेल्या होत्या.

लेखनाच्या मेजांतही दादासाहेबांना हवी ती वस्तू सांपडली नाहीं. दहा दहांच्या कांहीं नोटा, मैत्रिणींचीं कांहीं पत्रें, नोटपेपर, पुस्तकें असें तेथें कप्यांकप्यांतून मांडून ठेवलें होतें. मग क्षणभर इकडेतिकडे बघून दादासाहेबांनीं तिसऱ्या किल्लीनें एक शिसवीचें नकशीदार व सुंदर लहानसें कपाट उघडलें.

त्या कपाटांत वरल्याच कप्यांत कौस्तुभाचें छायाचित्र मांडून ठेवलें होतें. तें पूर्वी कीर्तीच्या बाहेरल्या खोलींतील मेजावर असे. त्या चित्राच्या एका बाजूला गुलाबी रेशमी फितीनें सुंदर गांठ मारलेलें एक पत्रांचें पुडकें होतें. आपलें उद्दिष्ट हेंच असें लक्षांत येऊनही दादासाहेब तें पुडकें हातीं घेऊन क्षणभर घोटाळल्याप्रमाणें त्याकडे बघत उभे राहिले. नंतर किंचित् निश्चयदर्शक मान हलवून त्यांनीं फीत सोडली व कपाटाजवळ खुर्ची ओढून तीवर बसून तीं पत्रें चाळण्यास आरंभ केला.

इंग्लंडांत असतां कौस्तुभ जेव्हां कांहीं कामासाठीं म्हणून कीर्तीला सोडून परगांवीं गेलेला असे किंवा कीर्ति परगांवीं गेली असे तेव्हां कौस्तुभानें कीर्तीला लिहिलेलीं पत्रें होतीं तीं. त्या उभयतांच्या प्रीतीचा मोहरत चाललेला अंकुर होता त्यांत.

त्यानंतरची पत्रें कौस्तुभानें बंगलोरहून लिहिलेलीं होतीं. इंग्लंडहून आल्यावर नोकरी निमित्तानें कौस्तुभ बंगलोरला गेला तेव्हांपासून लग्नाकरतां म्हणून तो मुंबईला यईपर्यंतचीं तीं सर्व पत्रें होतीं. कौस्तुभाच्या अंतःकरणांत प्रीतीचा नुसता वसंतबहार

फुलला होता आणि त्याच्या अमूर्त सुगंधानें त्या पत्रांची शब्दसृष्टि दरवळून राहिली होती. किती लांब लांब पत्रें होतीं तीं. पुष्कळ मजकूर मावावा म्हणून अक्षरही बारीक काढलें होतें.

दादासाहेबांनीं तें सबंद पुडकें चाळून टाकलें.

" पण अलीकडलीं पत्रं कुठें आहेत तर ? " असें मनाशीं म्हणत दादासाहेबांनीं हातांतलें पुडकें व्यवस्थित बांधून जागच्याजागीं ठेवलें. त्या कप्प्यांत दुसरीकडे दोन चित्रपुस्तकें होतीं. एकांत कीर्तिकौस्तुभांचीं कितीतरी छायाचित्रें होतीं. दुसऱ्यांत कीर्तीनें काढलेले फोटो व रंगचित्रें होतीं. दादासाहेबांनीं तीं पूर्वी पाहिलेलींच होतीं म्हणून तीं चित्रपुस्तकें तशींच ठेऊन त्यांनीं खालच्या कप्प्यांत पहाण्यास सुरवात केली.

तेथें बरींच पत्रें पडलेलीं होतीं. दादासाहेबांनीं पाहिलें तों तीं कौस्तुभाचींच होतीं. पण तीं पत्रें कीर्तीनें व्यवस्थित जुळवून रेशमी फितीनें सुंदर गांठ मारून बांधून ठेवलीं नव्हतीं. पत्रें आलीं तशीं वाचून तीं त्या कप्प्यांत टाकून दिलीं होतीं. त्या पत्रांना त्या शिशवी कपाटांत स्थान लाभलें होतें ही गोष्ट खरी, परंतु त्यांना त्या वरल्या कप्प्यांत जागा मिळाली नव्हती !

कां बरं ?

दादासाहेबांनीं तारखा जुळवून तीं पत्रें एकामागून एक वाचण्यास सुरवात केली.

पत्रापत्रागणिक दादासाहेबांची मुखचर्या अधिकाधिक खिन्न होत चालली. त्यांच्या कपाळावर काळजीच्या रेषांचें जाळें जमूं लागलें. पहिल्या पहिल्या पत्रांत अनागोंदीच्या अरण्यांतील मौजा एकाद्या मित्राला कळवाव्या तशा लिहिलेल्या होत्या.

पत्रांत लिहिलेल्या ओळींपेक्षां न लिहिलेल्या ओळी दादासाहेब आपलें बुद्धि-सर्वस्व खर्चून वाचूं लागले तेव्हां त्यांना वाटलें कीं पत्रांत उमटूं पहाणाऱ्या प्रीतिच्छटेवर कौस्तुभानें मोठ्या प्रयत्नपूर्वक मैत्रीचा पांढरा रंग फासलेला होता. वाटत असलेल्या गाढ निराशेचा काळा कुळकुळीत रंगही त्यानें कृत्रिम आनंदांत धुवून काढण्याचा प्रयत्न केलेला होता.

दादासाहेबांना वाटलें, कशासाठीं हा अट्टाहास ? पत्नीविषयींच्या प्रेमभावना कौस्तुभाला लपवण्याची जरूर कां पडावी ? प्रेयसी कीर्तीला जीं पत्रें त्यानें लिहिलीं तशीं पत्रें—नव्हे त्याहूनही प्रेमफलांनीं बिटलेलीं पत्रें कौस्तुभ कां लिहीत नाहीं ?

आणि या दहाबारा पत्रानंतरचीं पत्रें !

तीं पत्रें पहातांच दादासाहेबांचे हात थरथर कांपूं लागले व पत्र हलूं लागल्यामुळें नीट वाचणेंही त्यांना जमेना.

पण वाचायला होतें तरी काय त्या पत्रांत ? चार सहा फार तर दहाबारा ओळींचीं औपचारिक पत्रें होतीं तीं !

" प्रिय कीर्ति,

तुझें पत्र पोंचलें.

आमचें काम अगदी जोरांत चालूं आहे. माझं काम मला किती आवडतं आहे तें वर्णन करतां यायचं नाहीं.

विशेषतः माझा वरिष्ठ हर हॅनस् ओद्रान याच्या उत्साही आणि आनंदी स्वभावामुळें काम करतांना अतिशय उल्हास उत्पन्न होतो व श्रम हलके झाल्यासारखे वाटतात.

हॅनस्चे गुणविशेष जणूं त्याच्या मुद्रेवर रेखून काढले आहेत. त्याचे ते कपाळावर एका बाजूला बरेंच खालीं वळवून आणून भांग पाडलेले लाब पिंगट सोनेरी केस, तो जर्मन असल्याची खात्री पटवितात. तें विस्तीर्ण दोहीं बाजूला केसांना हटवून डोक्यांत पोचलेलें कपाळ ! किती शास्त्रें त्याच्यामागल्या मेंदूंत सामावलीं असतील ! सर्व चेहऱ्यावर ओसंडणारें विद्वत्तेचें आणि विशाल बुद्धिमत्तेचें तेज ! आकाशाप्रमाणें शांत, स्निग्ध, नीलवर्ण डोळे ! आकाशाला ज्याप्रमाणें कालस्थलमर्यादा लागत नाहीं त्याप्रमाणें हॅनस्च्या मानवतेलाही मर्यादा नसल्याचेंच जणुं ते दर्शवितात. कुठें जर्मनीचा हा नागरिक आणि कुठें हिंदुस्थानांतलें कित्येक शतकांपूर्वी लयाला गेलेलें विजयनगरचें साम्राज्य ! पण हॅनस् आत्मीयतेनें संशोधनाचें कार्य करीत असतो आणि त्यासाठीं हालअपेष्टा भोगतो. त्याची ती हनुवटी आपल्या चौकोनी भक्कमपणानें व नासिका सरळपणानें व वर आलेल्या हाडानें त्याच्या स्वभावांतील तडफ आणि करारीपणा दाखवते तर पिंग्या मिशा आणि दाट पिंग्या भुंवया हा स्वभाव अधिकच उठावदारपणें दर्शवून देतात.

पण थांब पुढल्या खेपेला त्याचा फोटोच पाठवीन तुला. मग तूं त्याचे स्वभावविशेष पडताळून पहा. असो. मी अगदीं खुशाल आहें.

कौस्तुभ "

* * *

" प्रिय कीर्ति,

तुझें पत्र पोंचलें.

मी अगदीं खुशाल आहें. माझी प्रकृति उत्तम आहे. काम मजेंत चालूं आहे. हल्लीं माझी दोन वानरांशीं मैत्री जमली आहे. त्यांपैकीं एकाला झाडावरून पडून जखम झाली होती. तेव्हां तें व त्याची बायको माझ्याकडे येऊन ती जखम अर्थपूर्ण दृष्टीनें दाखवून करुण वटवट करीत मला विनवूं लागली. मी ती जखम नीट धुवून बांधली तेव्हांपासून तें जोडपें माझ्यावर बेहद्द खूष आहे. तीं दोघें मला फळांचे अहेर आणून देतात. आणि अगदीं मोठा फायदा त्यांच्या मैत्रीपासून कोणता झाला असेल तर तो म्हणजे आम्हांला सतत होणारा माकडांचा उपद्रव बंद झाला आहे. पूर्वी माकडांनीं आम्हांला नुसतं सतावून सोडलं होतं.

हॅनसूशींसुद्धां तीं माकडें मैत्रीनें वागतात.

त्या दोघांचीं नांवें मी तारा आणि सुग्रीव अशीं ठेवलीं आहेत आणि मौज ही कीं त्या नांवानें हांक मारली कीं तारा किंवा सुग्रीव बोलावल्याप्रमाणें दूर असलीं तरी येऊन समोर हजर होतात. असो.

आपल्या प्रकृतीची काळजी घेत जा.

तुझा

**कौस्तुभ** "

* * *

" प्रिय कीर्ति,

तुझें पत्र पोंचलें.

तुम्हां मैत्रिणींची एलेफन्टा लेण्यांची छोटी सफर फार मजेची झाली तर. आमचें काम जोरांत चालूं आहे. आज एका गुहेंत जाण्याचा प्रयत्न केला पण फसला. उद्यां पुन्हां प्रयत्न करणार आहों.

मी अगदीं खुशाल आहें.

तुझा

**कौस्तुभ** "

* * *

" कीर्ति,

मी अगदीं खुशाल आहें. तूं कळवल्याप्रमाणें दादासाहेबांना पत्र लिहिलें आहें. काळजी करूं नये.

तुझा

**कौस्तुभ** "

* * * *

" प्रिय कीर्ति,

परवा तारेनं मोठाच गोंधळ केलान्. कांहीं प्रयोग करतांना तुझी हिऱ्याची अंगठी मी बाजूला काढून ठेवली होती. ती तारेनें खुशाल पळवून नेली अन् मग झाडावर चढून ती कांहीं खाण्याची वस्तू वाटूनच कीं काय ती चावूं लागली.

मी तिला हांका मारल्या, दरडावलें तरी ती ऐकेना. मग मीच झाडावर चढलों आणि तारेचीं आर्जवें करून ती अंगठी हस्तगत केली.

या खोडीबद्दल मी दोन दिवस तारेवर सपाटून रागावलों होतों पण तिनें वटवट करून रडून माझी विनवणी केली. तिचा प्रियकर सुग्रीव यानेंही तिच्याबद्दल रदबदली केली तेव्हां मग तारेवरला राग सोडणं मला भागच पडलं.

तुझाच

**कौस्तुभ** "

* * *

" प्रिय कीर्ति,

तुझें पत्र वाचून मी अगदीं कमालीचा हंसलों. हॅनसनें मला हंसण्याचें कारण विचारलें तेव्हां तुझ्या पत्रांतील मजकूर मी त्याला सांगितला आणि मग तो देखील सारखा हंसत सुटला.

तारेला तुझा मत्सर वाटून तिनं तुझी अंगठी पळवली असावी असं तूं लिहिलं आहेस तें ऐकून हॅनस् काय म्हणाला सांगूं कां ? तो म्हणाला, " तारेला काय वाटलं असेल कोण जाणें पण तुझ्या बायकोला मात्र तारेचा मत्सर वाटतोसं दिसतं.

तेव्हां संभाळ."

हॅनसनें मुद्दाम तारेला माझ्या मांडीवर बसवून फोटो काढला आहे तो तुला पाठवीत आहें.

अगदीं मजेंत आहें मी.

तुझा

**कौस्तुभ**"

* * *

" प्रिय कीर्ति,

आज आम्हांला एक ताम्रपट सांपडला आहे. आम्हांला अगदीं सोन्याची खाण सांपडल्यासारखा आनंद झालेला आहे.

तुझी प्रकृति आतां बरी आहे हें वाचून समाधान वाटलें. मला फार काळजी वाटत होती. आतां प्रकृतीला नीट जपत जा.

तुझा

**कौस्तुभ**"

* * *

" प्रिय कीर्ति,

मी खुशाल आहें.

तुझा

**कौस्तुभ**"

* * *

अशीं नुसत्या खुशालीचीं दहा पंधरा पत्रें होतीं.

आणि शेवटीं—

* * *

" प्रिय कीर्ति,

मला आणखी एक वर्षपर्यंत सध्यांच्या जागीं काम करायला मिळणार आहे. हॅनसूनें माझ्याकरतां फार खटपट केली. मला जणूं स्वर्गांतलं अमृत हातीं आल्यासारखं वाटतं आहे.

दादासाहेबांना मी पत्र लिहिलेंच आहे. मी मुंबईला येण्याचें नांव काढीत नाहीं म्हणून त्यांना चमत्कारिक वाटत असावेसें तूं लिहिलें आहेस पण—

नाहीं तरी त्यांना खरी परिस्थिति समजल्यावांचून किती दिवस जातील ?

कीर्ति "

कीर्ति हा शब्द लिहून पुन्हां खोडला होता. आपल्या सर्व उचंबळून आलेल्या कोमल भावनाच जणूं एका निषेधपूर्ण रेषेनं त्यानं खोडून नष्ट केल्या होत्या.

पुढें वाक्य लिहिलें होतें.

" तूंच त्यांची कशीतरी समजूत घाल.

कौस्तुभ "

* * *

दादासाहेबांना आज पत्र आलें होतें त्याच तारखेचें हेंही पत्र असून हें शेवटलें पत्र होतें.

हें पत्र वाचतांच दादासाहेब सुन्नपणें कपाळाला हात लावून क्षणभर स्तब्ध राहिले. पण त्यांचें हृदय धडधडत होतें. कानशिलावरल्या शिरा ताडताड उडत असून ऊन रक्त सळसळ आवाज करीत जणूं मेंदूंतून वहात होतें. घामानें सर्व शरीर ओलें झालें होतें.

नाहींतरी त्यांना खरी परिस्थिति समजल्यावांचून किती दिवस जातील ! असें कौस्तुभानें लिहिलें होतें.

म्हणजे आपल्या भीतीला इतका बळकट आधार आहे तर !

जी दोरी साप नव्हे म्हणून आपण आपल्या मनाची समजूत घालूं पहात होतों ती दोरी नसून विषारी सापच आहे तर !

आणि कीर्तीनें आपल्याला या फसवणुकींत मदतच केली.

मला दुःख होऊं नये म्हणूनच ना ?

वेडी वेडी कीर्ति !

कीर्तीच्या सुखासाठीं मी काय करणार नाहीं ?

आजपर्यंत हृदयाच्या कपाटांत प्राणाप्रमाणें जपून ठेवलेलं तें गौप्यसुद्धां तिच्या सुखाखातर हृदय फोडून बाहेर काढायला मी तयार आहें.

पण—पण मला शंका हीच आहे कीं त्या गौप्यकथनानं कीर्तिकौस्तुभ सुखी होतील कां ?

कीर्ति आणि शीला आज टॉकीला गेल्या त्या खरोखरीं लैलीविषयीं ऐकलेल्या दुःखद बातमीमुळें मनाला आलेली उदासीनता घालवण्याकरतांच. धारिणीनें चिठी पाठवून त्यांना हकिगत कळवली होती.

कौस्तुभाचें आलेलें पत्रही कीर्तीची उदासीनता मनस्वी वाढविणारेंच होतें. आणि त्यावर आणखी लैलीबद्दलच्या बातमीचा आघात झाला होता.

त्यामुळें चित्रपट आनंदपर्यवसायी असूनदेखील शीला त्याशीं पूर्ण समरस होऊन गेली असून कीर्तीची उदासीनता यत्किंचित् कमी झाली नाहीं.

परत आल्यावर आपल्या खोलीचें दार उघडून कीर्ति आंत शिरली तेव्हां आंतल्या खोलींत प्रकाश पाहून तिला जरा नवल वाटलें. कारण आपण दिवा लावला नव्हता हें तिला आठवत होतें. मग तिनें तर्क केला कीं मोलकरीण झाडायला किंवा गादी नीट करायला आली असेल ती जातांना दिवा मालवायला विसरली असेल. कीर्तीनें बाहेरला दिवा लावला आणि पोषाख बदलण्यासाठीं म्हणून ती शयनगृहांत जाऊं लागली.

पण ती दाराशींच थबकून उभी राहिली. आपला डावा हात धडधडणाऱ्यां वक्षस्थलावर तिनें दाबून धरला.

तें उघडलेलें शिशवी कपाट, त्यापुढें खुर्ची घेऊन बसलेले दादासाहेब, त्यांच्या मांडीवर पडलेली तीं कौस्तुभाचीं पत्रें, आणि एका तासाच्या अवधींत सबंद वर्षांतील काळज्यांनीं ग्रासून जर्जर करून सोडल्याप्रमाणें दिसणारी दादासाहेबांची पांडुर मुखचर्या. एकेक पाऊल कीर्ति पुढें टाकीत होती परंतु तिचें मनच तिचीं पावलें जणूं मागें खेंचून धरीत असल्याप्रमाणें तिला भास होत होता. डोळे तारवटल्या-प्रमाणें विस्फारून ती समोरलें दृश्य बघत होती. श्वास जलद होऊनही कष्ट पडत असल्याप्रमाणें नाकपुड्या फुगीर झाल्या होत्या. घशाला कोरड पडून आवंढा गिळतां येत नव्हता.

आपण आंत आलों तरी दादासाहेबांना तें समजलेलें नाहीं हें पाहून कीर्ति फारच घाबरली व तिनें अस्फुट किंचाळल्याप्रमाणें हांक मारली, "दादासाहेब."

दादासाहेब या हांकेनें एकदम इतके दचकले कीं त्यांच्या मांडीवरलीं पत्रें जमिनीवर इतस्ततः विखरून पडलीं. हातांतलें पत्र मात्र त्यांनीं आणखीच गच्च आंवळून धरलें आणि वर मान करून समोर उभ्या असलेल्या कीर्तीकडे त्यांनीं पाहिलें.

व्हेसुव्हिअस पर्वतावर चढून वरल्या लहानशा विवरांतून आंतील धडधड शिजणारे धातुरस आणि अग्नीचे लोळच्या लोळ उसळतांना बघून मनुष्याची जी अवस्था होईल तशीच अवस्था, दादासाहेबांच्या दृष्टीच्या द्वारें त्यांच्या मनांतील दुःखनिराशांचा माजलेला कल्लोळ पाहून कीर्तीची झाली.

कळवळून तिनें विचारलें, "दादासाहेब, कशाला वाचलींत हीं पत्रं तुम्हीं ?"

तिच्या प्रश्नांत रागाची रेषामात्र छटा नव्हती. ती जणूं म्हणत होती, "दादासाहेब, तुमच्या डोक्यावर लटकत असलेली तलवार मी इतके दिवस मोठ्या काळजीनं अगदी बारीकशा तंतूनं कां होईना वरल्यावर थांबवून धरली होती. पण तुम्ही उगीचच्या उगीच घाई करून त्या तंतूला धक्का लावून, तो तोडून टाकून कां बरं मस्तकावर तिचा आघात करून घेतलांत ?"

हातांतल्या जवळ जवळ चुरगळून घट्ट धरलेल्या पत्राकडे पाहून घोगऱ्या आवाजांत दादासाहेबांनीं विचारलें, "तूं मला आधींच हें सारं कां सांगितलं नाहींस ?" त्यांच्या उद्गारांत निराशा असली तरी रोषाचीही एक सूक्ष्म छटा त्यांत उमटली होती. तिचेंच प्रतिबिंब त्यांच्या कपाळावरील रेषांवरून उघड होत होतें.

एकाद्या अपराध्याप्रमाणें कीर्ति त्यांच्यासमोर उभी होती. तिचीही दृष्टि दादासाहेबांच्या हातांतील पत्राकडे लागली होती. त्या पत्रांतला मजकूर ती मनाशीं घोळून पहात होती.

कीर्तीकडून उत्तर आलें नाहीं तेव्हां दादासाहेबांनीं पुन्हां तिच्याकडे बघून विचारलें, "कीर्ति, तुमच्यामधलं हें वितुष्ट किती दिवस चाललं आहे ?"

दादासाहेबांच्या स्वरांतील तीव्रतेनें चलितचित्त झालेल्या कीर्तीची अस्थिर दृष्टि वर सरकतां सरकतां कपाटांतील कौस्तुभाच्या तजबिरीवर खिळून गेली.

किती गोड गोड हंसत होता तो !

अस्तंगत झालेल्या शुक्राच्या चांदण्याप्रमाणें कित्येक महिन्यांत तें हंसणं दिसलेलं नाहीं आपल्याला !

" लग्नदिवसापासूनच." कीर्ति उदासपणें उत्तरली.

" काय लग्नदिवसापासून ? " आश्चर्यातिरेकानें दादासाहेबांनीं विचारलें. " काय कारणामुळें ? "

" लग्नाच्या आदल्या दिवशीं मी सांगितलं नाहीं कां तुम्हांला ? " कौस्तुभाच्या तजबिरीवरून बळेनें दृष्टि वळवून कीर्तीनें उत्तर दिलें.

" काय ? त्या क्षुल्लक कारणासाठीं तूं आपल्या सुखाची होळी करायला निघाली आहेस ? कीर्ति, लग्नदिवशीं भांडण झालं तुमचं ? "

" भांडण ! " हा शब्द कीर्तीला कसासाच वाटल्याप्रमाणें तिनें त्याचा उच्चार केला. नंतर तिनें सांगितलें, " हो भांडणच तर काय ! "

" मग काय म्हणाला कौस्तुभ ? "

कीर्ति तिरस्कारमिश्रित हंसून म्हणाली, " तुम्ही म्हणालां होतां तेंच. "

" आणि तरी तूं त्याच्या प्रेमाचा धिक्कार केलास ! तुमचं वितुष्ट लपवण्याकरतांच तुम्ही लगेच महाबळेश्वरला गेलांत ? "

" हो. "

" अन् बंगलोरलाही तुमचं वितुष्ट कायम होतं ? "

" हो. "

हातांतल्या पत्राचा चोळामोळा करून दादासाहेबांनीं तें दूर फेंकून दिलें. नंतर तीक्ष्ण स्वरांत त्यांनीं म्हटलें, " किती मूर्ख आहेस तूं कीर्ति. कौस्तुभासारख्या उदात्त स्वभावाच्या तरुणाचं प्रेम तूं अजाणतां लाथाडून टाकते आहेस ! " निषेधपूर्वक मान हलवून ते जणूं स्वगत बोलल्याप्रमाणें बोलूं लागले, " हातांत बहुमोल हिरा आला तरी तो तळहातावर आहे तोंपर्यंत त्याची किंमत ओळखून तो रक्षण केला पाहिजे. त्याला क्षुद्र लेखून तो पायदळीं टाकून दिला तर तो कुठें दृष्टिआड होईल त्याचा कांहीं नेम नसतो. मग कदाचित् तो शोधूनही सांपडणं कठिण ! "

आपल्या या विचारांनींच भिऊन गेल्याप्रमाणें दादासाहेबांनीं हातानें अंगावर कोसळूं पहाणाऱ्या धोंड्याचें निवारण करूं पहावें तशी थोडीशी हालचाल करून ते

घाईनें म्हणाले, "कीर्ति, कौस्तुभाचं जोंपर्यंत तुझ्यावर अढळ प्रेम आहे तोंपर्यंतच तुला काळजी घेतली पाहिजे. नाहींतर कीर्ति—"

कीर्तीचें रुक्ष हंसणें ऐकून चमकून दादासाहेब थांबले व त्यांनीं तिच्याकडे पाहिलें.

कीर्ति तिरस्कारानें हंसत होती. तिचा वरोष्ठ डाव्या बाजूला दुमडून वर गेला होता आणि डोळे अर्धवट मिटले होते. ती म्हणाली, "दादासाहेब, जी गोष्ट कधीं लाभलेलीच नाहीं तिची काळजी कशी करणार?"

"लाभलेलीच नाहीं? कौस्तुभाच्या प्रेमाविषयींच बोलते आहेस तूं?"

"होय. कीर्ति या व्यक्तीवर कौस्तुभाचं प्रेम आहे पण त्यापेक्षांही तिच्या जाती-करतां ती त्याला हवीशी आहे. ध्येयसिद्धीकरतां त्याला मी हवी आहे."

"ध्येयसिद्धि! ऊं:!" येवढाच उद्गार काढून दादासाहेब कित्येक क्षण स्तब्ध राहिले.

डयूक दारावर नखानें खरडीत होता. दादासाहेबांनीं कठोरपणानें, गो अवे, म्हणून सांगतांच या विनाकारण उद्भवलेल्या मालकांच्या नाराजीमुळें घाबरून जाऊन बिचारा डयूक शेपूट व मान खालीं घालून, विवळल्यासारखा शब्द करून तेथून निघून खालीं गेला व टेबलाखालीं जाऊन गुपचूप बसला.

"कीर्ति, लहान मुलं समुद्रकिनाऱ्यावर वाळूचा किल्ला बांधतात त्याला जितका मजबूत पाया असतो तितकाच मजबूत पाया तुझ्या कौस्तुभाविषयींच्या गैरसमजाला आहे. कीर्ति, शहाणी असलीस तर माझं ऐक. उद्यां माझ्याबरोबर अनागोंदीला चल."

विस्मयचकित होऊन कीर्तीनें विचारलें, "कशाला?"

"कशाला? कौस्तुभाचं तूं लाथाडलेलं प्रेम पुन्हां शोधायला."

"कौस्तुभाचं प्रेम!" उदासपणें हंसून नंतर दादासाहेबांच्या पायाशीं पडलेल्या कौस्तुभाच्या पत्रांकडे अंगुलिनिर्देश करून कीर्तीनें विचारलें, "हीं पत्रं वाचलींत ना तुम्ही? कौस्तुभाला माझी गरज आहे कुठें? त्याच्या संशोधनांत तो किती रमला आहे तें पाह्यलंत ना? कित्येक शतकांपूर्वीचं जीवन जगतो आहे तो, त्याला माझी आठवणसुद्धां होत नसेल."

"केवढी चूक करते आहेस तूं. बघ बघ हीं पत्रं कीर्ति." दादासाहेबांनीं खालीं वांकून पत्रें गोळा केलीं आणि एकेक कीर्तीपुढें धरून ते त्यांतील मजकूर वाचून

आव्हानपूर्वक बोलूं लागले, "बघ हें काय लिहिलं आहे त्यानं. तूं हीं पत्रं नीट वाचलेली नाहींस. गैरसमजानं बिघडलेल्या दृष्टीनं तूं तीं वाचलीस. प्रत्येक शब्द नी शब्द प्रेम बाहेर उमटूं नये म्हणून मोठ्या कष्टानें शोधून लिहिला आहे. त्या शब्दांआड ज्या उचंबळणाऱ्या भावना दडल्या आहेत त्या तुला समजल्या नाहींत. कीर्ति, कौस्तुभ तुझ्यासाठीं वाट पहातो आहे. तुझ्या शब्दाखातर तो आपलं संशोधनसुद्धां सोडून देईल."

"दादासाहेब, तसं असतं तर तो अनागोंदीला गेलाच नसता."

दादासाहेब या बोलण्याचा अर्थ न कळून प्रश्नार्थी मुद्रेनें कीर्तीकडे बघूं लागले.

कीर्तीच्या डोळ्यांसमोर जणूं तो शेवटला निरोप घेण्याचा प्रसंग उभा राहिला. तिच्या नेत्रयुगुलांत अश्रुबिंदु तरंगूं लागले. उजव्या हाताचीं बोटें उजव्या गालावर तिनें दाबून धरलीं त्यावर ते बिंदू ओघळले. अंतःकरण भरून येऊन ती म्हणाली, "कौस्तुभ अनागोंदीला जायला निघाला तेव्हां मी त्याला तूं जाऊं नको अशी विनवणी केली. पण तो निघून गेला."

"तूं त्याला जाऊं नको म्हणून विनवणी केलीस पण तो निघून गेला?" कानावर जे शब्द पडले त्यांवर विश्वास बसत नसल्याप्रमाणें पुन्हां जणूं खात्री करून घेण्यासाठीं दादासाहेबांनीं कीर्तीच्याच शब्दांचा प्रश्नार्थी पुनरुच्चार केला.

कीर्तीनें हुंकार देतांच क्षणभर विचारांत पडल्याप्रमाणें स्तब्ध राहून नंतर चाणाक्षपणें त्यांनीं विचारलें, "तूं त्याला जाऊं नको म्हणालीस तें कोणत्या हेतूनं?"

दादासाहेबांच्या प्रश्नाचा रोख लक्षांत येतांच अधोमुख होऊन कीर्ति स्तब्ध राहिली.

ती कीर्तीची अवस्था जाणून, वात्सल्यभरांत तिचा हात दाबून दादासाहेबांनीं कोमलपणें विचारलें, "कीर्ति, कौस्तुभावांचून जीवन असह्य होईल असं वाटूनच ना?"

तरीही कीर्ति निरुत्तर राहिली.

दादासाहेब तिच्या मुखावर तरंगून येणाऱ्या भावलहरींच्या द्वारें जणूं उत्तरें अजमावीत होते. त्यांनीं पुन्हां प्रश्न विचारला.

"तूं जाऊं नको म्हटल्यावर कौस्तुभाच्या मनाची यत्किंचितूही चलबिचल झाली नाहीं?"

दादासाहेबांच्या हातीं असलेला कीर्तीचा हात कंप पावूं लागला. कीर्तीच्या मुखमंडलावर उसळून आलेली आरक्तछटा व तिच्या ओष्ठद्वयाची झालेली नाजूक हालचाल पाहूनच दादासाहेबांना आपल्या प्रश्नाचें पूर्णपणें उत्तर मिळाल्याप्रमाणें वाटलें. समाधानाचें मंद हास्य त्यांच्या मुद्रेवर आलें व त्यांनीं एक निश्वास सोडला.

तितक्यांत कीर्तीनें आपला हात त्यांच्या हातांतून ओढून घेतला. तिच्या मुखावरील रक्तिमा पार लोपून तेथें विलक्षण पांडुरता आली. एकाद्या सुंदर स्वप्नांतून जागृति आल्याप्रमाणें त्रासून तिनें आपला अधरोष्ठ दांताखालीं दाबून धरला. जड उसासा टाकून मान हलवीत कीर्ति उद्गारली, " कौस्तुभाची चलबिचल झाली पण ती क्षणिक होती. "

" पण तूं त्याला रहा म्हणालीस तें कोणत्या अर्थानं ? "

प्रश्न लक्षांत येऊनही उत्तर टाळण्यासाठीं तो लक्षांत न आल्याप्रमाणें दाखवून कीर्ति अर्थशून्य स्वरांत बोलली, " कोणत्या अर्थानं. "

या टाळाटाळीला जरा त्रासूनच दादासाहेबांनीं स्पष्ट विचारलें, " ज्या निष्प्रेम परिस्थितींत तुम्ही बंगलोरला राह्यलां तीच परिस्थिति पुढें चालूं ठेवण्याचं तुझ्या मनांत होतं ना ? मग कौस्तुभ निघून गेला यांत नवल तें काय ? " जरा वेळ थांबून दादासाहेबांनीं खेदोद्गार काढले, " आपल्या आयुष्याचं काय हें केलं आहेस तूं कीर्ति ? कौस्तुभदेखील मूर्खच आहे असं मी म्हणतों. तुझ्याकरतां त्याचा जीव व्याकुळ झाला असतां तो तुझ्यापासून दूरदूर पळतो आहे. पतिपत्निप्रेमाचं मांगल्य, त्याचं सौंदर्य तुम्ही पाहिलेलं नाहीं म्हणून हा गैरसमजाचा अंतरपट तुम्ही हट्टानं मध्यें धरून ठेवला आहेत. "

दादासाहेबांच्या बोलण्याचा यत्किंचित् परिणाम न होऊन कीर्ति म्हणाली, " गैरसमजाचा अंतरपट नव्हे. कौस्तुभाच्या ध्येयाचा अंतरपट आमच्यामध्यें आलेला आहे.

" मग त्याच्या क्षणार्धांत चिंध्या चिंध्या करून टाकायचं माझ्या हातांत आहे. " कीर्तीचे दोन्ही पंजे घट्ट पकडून एक आवंढा गिळून दादासाहेब कृतनिश्चयानें बोलूं लागले. अत्यंत तीक्ष्ण दृष्टीनें, कीर्तीच्या नेत्रांद्वारें तिच्या अंतर्हृदयांत आपल्या बोलण्याचा काय परिणाम होतो तें जणूं अजमावून पहाण्याकरतांच ते एकेक शब्द स्पष्ट उच्चारीत होते.

" कौस्तुभाच्या ध्येयवादाला तूं इतकी बिचकून गेली आहेस, तुझ्या प्रेमांत त्यामुळं बिब्बा पडल्यासारखं तुला वाटतं आहे, पण अंतःकरणावर हात ठेऊन, नीट विचार करून मला उत्तर दे. "

दादासाहेबांनीं दम लागल्याप्रमाणें बोलणें थांबवलें. एक दीर्घ श्वास घेऊन पुन्हां आवंढा गिळला.

ते काय बोलणार आहेत म्हणून कीर्ति आश्चर्यनिर्भर होऊन गेली होती. प्रत्येक शब्द ती अती उत्कंठेनें जवळ जवळ श्वासनिरोध करून ऐकूं लागली.

दादासाहेब पुन्हां भेदक दृष्टीनें कीर्तीकडे पहात म्हणाले, " नीट विचार करून मला उत्तर दे. कीर्ति, समज तूं माझी मुलगी नसून कौस्तुभाच्या जातीची, एक ब्राह्मणकन्याच असतीस अन् इंग्लंडमध्यें तुझी नी कौस्तुभाची गांठ पडली असती तर काय त्यानं तुझ्यावर प्रेम केलं नसतं ? त्यानं काय तुझ्याशीं लग्न केलं नसतं ? ध्येयाला त्यानं तुझ्या प्रीतीपेक्षां जास्त किंमत दिली असती ? "

पिशाच्चकल्पनेनें भेदरून गेलेल्या मनुष्याला तें पांढरें वस्त्र आहे असें कळून आल्यावर तें वस्त्र हातीं घेऊन तो जसा विचित्र हंसूं लागतो तशीच कांहींशी कीर्ति हंसत असलेली पाहून दादासाहेबांनीं विस्मयाचा एक धक्का बसल्याप्रमाणें डावा हात आपल्या छातीवर धरला. आपल्याला अपेक्षित असा कोणताच परिणाम कीर्तीच्या मुखावर न दिसल्यानें नानाप्रकारच्या शंकांनीं भांबावून ते स्तब्ध राहिले.

कीर्ति मोठ्यानें पोकळ हंसून म्हणाली, " ऊः येवढंच होय ? दादासाहेब, तुमच्या मनांत आतां ही विचित्र कल्पना जशी आली तशीच ती लग्नाच्या दिवशीं माझ्याही मनांत आली. "

स्वप्नांत असल्याप्रमाणें दादासाहेबांनीं त्याच शब्दांचा पुनरुच्चार केला, " विचित्र कल्पना ? " नंतर लगेच जागृति आल्याप्रमाणें त्यांनीं विचारलें, " तुझ्या मनांत ही कल्पना आली कुठून ? "

कीर्तीनें हंसून पंजे उघडून पसरले. ती म्हणाली, " तुमच्या मनांत जशी आतां आली तशीच. "

" अन् मग ? "

" मग मी कौस्तुभाला तुम्ही आतां म्हणालांत तसंच विचारलं. "

कौल मागतांना अधीर झालेल्या मनानें परंतु कोणत्यातरी अदृश्य शक्तीच्या भीतीनें तोंडांतल्या तोंडांत ईप्सिताविषयीं प्रश्न मांडावा आणि लावलेल्या फुलाकडे डोळ्यांत प्राण आणून बघावें तसें दादासाहेबांनीं कीर्तीकडे बघून विचारलें, " मग काय म्हणाला तो ? "

" तो म्हणाला कीं तूं जर ब्राह्मण असतीस तर तूं मला मिळणार नाहींस या भयानं मी तुझ्यापासून चार पावलं दूर राह्यलों असतों. आणि आणखीही तो म्हणाला कीं तुझी जात मला ब्राह्मण वाटत होती तेव्हां मी खरोखरच कांहीं महिने तुझ्यापासून दूर राहिलों होतों. "

" ॐ येवढंच ना ? "

" येवढंच नाहीं. मी त्याला पुन्हा म्हटलं कीं येवढं तूं जपूनही आपली ओळख वाढून तुझं माझं प्रेम जमून आपण वाङ्निश्चय केला असता आणि मग जर एखादी सुशिक्षित हरिजन तरुणी तुला भेटली असती आणि तिनं तुला लग्नाची विनवणी केली असती तर तूं काय केलं असतंस ? "

" हूं ? "

" तेव्हां तो सरळ म्हणाला कीं, ध्येयाकरतां मी आपलं लग्न मोडून तिच्याशीं लग्न केलं असतं. "

" त्यानं असं कधींच केलं नसतं. अतिशय त्रासून तो तसं बोलला असेल. "

" पण लग्नाच्या आदल्या दिवशीं तुम्हांला तो काय बोलला लक्षांत आहे ना ? "

" काय बोलला ? "

" कौस्तुभ तुम्हांला म्हणाला, माझा ध्येयवाद जर माझ्या मदतीला नसता तर मी आईवडिलांच्या इच्छेखातर कीर्तीला कायमची सोडायला तयार झालों असतों. "

निरुत्तर झाल्याप्रमाणें काय बोलावें तें न सुचून दादासाहेब थोडा वेळ स्तब्ध राहिले. पण गप्प न बसवून ते म्हणाले, " किती वेडी आहेस तूं कीर्ति ! येवढ्यावरून कौस्तुभाचं तुझ्यावर प्रेम नाहीं असं वाटतं कां तुला ? मनुष्य पंचप्राण हातावर घेऊन देशासाठीं लढतो तें त्याचं प्राणांवर प्रेम नसतं म्हणून ? " दादासाहेब कीर्तीची समजूत घालण्याकरतां म्हणून बोलत होते परंतु त्यांचेंच मन द्विधा झालें होतें.

" दादासाहेब, मला नाहीं हें पटत. "

" तूं जन्म कसा घालवणार मग ? " दादासाहेबांनीं त्रस्तपणें विचारलें.

कीर्तीलाच त्याचें उत्तर माहीत नव्हतें मग ती काय सांगणार ?

दादासाहेबांनीं उठून दोन्ही हात पाठीमागें वळवून पंजे एकावर एक घालून खोलींतल्या खोलींत येरझारा घालण्यास आरंभ केला.

आपलें बोलणें दादासाहेबांना पटलें हें बघून कीर्तीला यत्किंचित् समाधान वाटलें नाहीं. हतबल झाल्याप्रमाणें होऊन ती पलंगावर बसली व डाव्या हातानें पलंगाचा कठडा धरून त्याच दंडावर कपाळ टेकून तीही आपल्या भवितव्याविषयीं विचार करूं लागली. दादासाहेबांच्या हालचालींकडे तिचें पूर्ण लक्ष होतें.

चांगले दहा मिनिटें दादासाहेब फेऱ्या घालीत होते. इतका वेळ बावरून गेलेल्या त्यांच्या मुद्रेवर कांहीं मार्ग सांपडल्याप्रमाणें शांतपणा दिसूं लागला.

नंतर फेऱ्या थांबवून ते कीर्तीजवळ येऊन उभे राहिले. " कीर्ति " त्यांनीं हांक मारली.

कीर्तीनें दंडावरून मान उचलून दादासाहेबांच्याकडे पाहिलें.

" कीर्ति, आपल्या गांवाकडे येशील तूं ? "

जरा आश्चर्यानेंच कीर्तीनें विचारलें, " कशाकरतां ? "

" कालच मला नांदवडचं पत्र आलं. त्या प्रांतांत आपली जात पुष्कळ आहे. आपल्या गांवाच्या आसपासच्या दहाबारा गांवांत मिळूनच दोन अडीच हजार वस्ती आहे. कालच्या पत्रांत अशी बातमी आहे कीं त्या सात आठ गांवांत मिळून जवळजवळ दहा बारा कुटुंबं मुसलमानी धर्माची दीक्षा घेण्याची भाषा बोलताहेत म्हणून. "

कीर्तीनें धक्का बसल्याप्रमाणें विचारलें, " दहाबारा कुटुंबं मुसलमानी धर्मांत जाणार ? "

" हो. त्याकरतां मी परवां तिकडे जाऊन सर्व परिस्थिति पाहून त्या लोकांशीं बोलून कांहीं जमलं नाहीं तर कुणीतरी कार्यकर्ता या आपत्तींतून ह्या कुटुंबांचं रक्षण करायला तिथें कायम कांहीं महिने ठेवून पहाणार होतों. तूं तें काम अंगावर घेशील ? '

" हो हो. अगदीं जरूर. "

दादासाहेबांना कीर्तीच्या या उत्तरानें अत्यंत समाधान वाटून त्यांच्या मुद्रेवर थोडें हास्य झळकलें. नंतर सूचना देण्याकरतां ते म्हणाले, " पण कीर्ति, लक्षांत ठेव. आजवर तूं आपल्या जातींत फारशी मिसळलेली नाहींस. नुसत्या सभा आणि बक्षिससमारंभांना जाऊन चार सुशिक्षित लोकांशीं बोलणं आणि भाषण करणं हें वेगळं आणि आतां त्या लोकांचीं मनं धर्मांतरापासून परावृत्त करणं निराळं. शिवाय ज्या मुसलमानांनीं ही फितुरी आंतून चालवली आहे त्यांच्याबद्दलही तुला सावधगिरी बाळगली पाहिजे."

कीर्ति निश्चय दर्शवून म्हणाली, " तुम्ही कांहीं एक काळजी करूं नका. मी अतिशय सावधगिरीनं वागेन अन् कार्याची हेळसांड करणार नाहीं."

जरा थांबून कीर्ति पुन्हां म्हणाली, " दादासाहेब, मी अवश्य कार्यसिद्धि करून दाखवीन."

कीर्तीच्या मुखावर आतांपर्यंत पसरलेल्या निराशेचा, दुःखाचा कुठें लवलेशही शिल्लक नव्हता. एक प्रकारची निश्चयाची तेजस्विता तेथें झळकत असून तिचे नेत्र पाणिदारपणानें चमकत होते.

दादासाहेब कौतुकानें कीर्तीकडे क्षणभर पहात राहिले. ते मनांत म्हणाले, " कीर्तीच्या आयुष्यांत एकादं ध्येय हवं आहे. तरच तिला सुखाचा मार्ग सांपडेल."

साडेदहा वाजले होते. जेवायला बोलावण्याकरतां दोन वेळां येऊन टकटक करून गेलेला एडी पुन्हां टकटक करीत होता. त्याच्या चेहेऱ्यावर ओढून ताणून आणलेलें नव्हे तर खरोखरीचेंच गांभिर्य या वेळीं दिसत होतें.

पण या वेळीं त्याची टकटक निरर्थक झाली नाहीं.

दादासाहेबांनीं उत्तर दिलें, " अच्छा एडी, अबि आते है सपरकेवास्ते. कीर्ति, कपडे बदलून ये लवकर हं."

दादासाहेब खोलीबाहेर जाऊं लागले तेवढ्यांत कीर्ति एकदम म्हणाली, " हो खरंच मी सांगायचं विसरलेंच."

जागच्या जागींच थबकून दादासाहेबांनीं जरा कुतूहलानें विचारलें, " काय तें?"

आपल्या रक्तरंगीं नखांकडे टक लावून पहात, आंसवें आंवरण्याचा प्रयत्न करीत कीर्ति म्हणाली, " लैलीबद्दल फार वाईट बातमी कळली आज."

" होय ? फार आजारी आहे ती ?"

" लैली गेली."

" अरेरे !" दादासाहेबांनीं मान हलवून खेदोद्गार काढला. नंतर ते तळतळून बोलले, " आपल्या हिंदुधर्मांतल्या एका जुनाट दुष्ट रूढीला बिचारी बळी पडली. हंऽ" क्षणभरानें त्यांनीं पुन्हां विचारलें, " धारिणीला फार धक्का बसला असेल."

" हो तर. पण आम्हांला भेटलीच नाहीं ती. लैली आजारी म्हणून तिला हवा पालटण्याकरतां म्हणून पाठवली होती ना, आज पत्र पाह्यल्याबरोबर तिकडेच धारिणी दुपारच्या गाडीनं गेली. तिनं माझ्याकडे चिठ्ठी पाठवली तशी."

" कोणतं बरं गांव ?"

" नांव नाहीं आठवत. पण शिर्क्यांचं तांबडा मळा म्हणून इनामगांव आहे ना त्याजवळच गुरुरावांचं लहान घर नी शेतीवाडी आहे वाटतं. तिथें ठेवली होती लैलीला.

" केव्हां वारली ती ?"

" तीनचार दिवस झाले म्हणे."

अतिशय आश्चर्य वाटून दादासाहेबांनीं विचारलें, " तीन चार दिवस झाले ?"

" हो म्हणे."

" अन् तारबीर न येतां आज पत्र आलं ?"

" हो. धारिणीच्या चिठ्ठीवरून तसाच अर्थ वाटतो."

" आश्चर्य आहे." येवढेंच म्हणून दादासाहेब खोलींतून बाहेर आले व डयूक डयूक म्हणून हांक मारून कपडे बदलण्याकरतां ते आपल्या खोलींत गेले.

---

सायंकाळच्या त्या प्रशांत समयीं कीर्ति ज्या चांदवडच्या टेकडीवर एका चिमुकल्या निर्झराजवळील शिलाखंडावर बसलेली होती तेथून दिसणारें निसर्गदृश्य नितांतरमणीय होतें. तें अवर्णनीय सृष्टिसौंदर्य कीर्ति आपल्या चित्रफलकावर रेखाटण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु कित्येक वेळां चित्रफलकाची पार विस्मृति होऊन ती अनिमिष लोचनांनीं व अतृप्त अंतःकरणानें तें निसर्गचित्रच पहात राही.

सभोंवार पसरलेल्या त्या सह्यासात किल्यांचे अवशेष अंगावर धारण करणाऱ्या चांदवडच्या डोंगरांच्या रांगा, त्यांवरून हरिततृणानें व रंगीबेरंगी फुलांफळांनीं बहरलेली वनराजी, मधूनच वळणें घेऊन वहाणारे लहान लहान निर्झर ! एकादा सम्राट् आनंदोत्सवसमयीं आपल्या अफाट रत्नभांडारांतील बहुमोल जडजवाहीर, सुवर्णमुद्रा व मोत्यांच्या माळा शृंगारलेल्या हत्तींच्या अंबारीवर लादून उदारपणें चहूंबाजूंला उधळून देत असतो तसाच ऋतुराज वसंत आपली अपार निसर्गसंपत्ति डोंगररूपी हत्तींवर चढवून आसमंताद्भागीं जणूं उधळीत होता, आणि त्यामुळेंच दऱ्यांखोऱ्यांतून मधून मधून वसलेल्या खेड्यांपाड्यांतून आणि शेताबागांतून त्यांतील पुष्कळच संपत्ति सांडल्यासारखी दिसत होती. पक्षिगण मंजुळ गीतांनीं भाटांप्रमाणें त्याच्या औदार्याची स्तुति करीत होते.

आणि या सर्व देखाव्यावर सायंकालीन आरक्त, सोनेरी किरणांनीं एक मनोहर आवरण घातलें होतें. प्रेमळ माता आपल्या पंचप्राणाधिक बाळसेदार, गुटगुटीत व सुंदर बालकाला पापीचांडाळांची दृष्ट लागूं नये म्हणून ऐन उन्हाळ्यांतसुद्धां ज्याप्रमाणें विरविरीत अंगांतलें घालतें आणि त्यामुळें तें बाळ अधिकच शोभून मात्र दिसतें त्याचप्रमाणें सृष्टिदेवीनें आपल्या सर्वांगसुंदर बालवसंतावर, रात्रींच्या वेळीं कुणा निशाचरांची दृष्टि पडूं नये म्हणून विरविरीतसें वस्त्र जणूं घातलें होतें पण त्यामुळें त्याचें स्वरूप अधिकच आकर्षक बनलें होतें.

हा सुरम्य देखावा पहात असतां कीर्ति इतकी तल्लीन झाली कीं सूर्य डोंगराआड पार अदृश्य होऊन सर्वत्र अंधकार पसरला तेव्हां ती भानावर आली. ती आपल्याशींच किंचित् हंसली नी मग जरा त्रासून, अजून नीटसा आरंभही न झालेल्या आपल्या चित्राकडे बघून पुटपुटली, " च्, आज दोन दिवस हें अस्सं

चाललंय. चित्र काढण्याकरतां या अडचणीच्या जागीं मी येऊन बसतें अन् इथें आलें म्हणजे चित्र काढायचं मुळी विसरूनच जातें. आतां उद्यांपासून मात्र चित्राकडे लक्ष द्यायचंच." असें म्हणत तिनें आपलें चित्र नीट आच्छादून टाकलें व आपलें सामान एका लहान सूटकेसमध्यें घालून शेजारच्या दगडावर ठेऊन ती जवळच झुळझुळ वहाणाऱ्या चिमुकल्या निर्झराजवळ पाणी पिण्याकरतां आली.

एक महिन्यापूर्वीची कीर्ति आणि आतांची कीर्ति यांच्यांत केवढें तरी अंतर पडलें होतें!

म्हणजे तिच्या शरीरसौष्ठवांत कांहीं कमतरता आली होती किंवा तिचें सौंदर्य रतिमात्र कमी झालें होतें असें नव्हे. उलट निसर्गाच्या सांन्निध्यांत साध्यासुध्या रहाणीमुळें त्यांत थोडी भरच पडली होती. कार्यप्रवणतेमुळें तिच्या मुखावर एकप्रकारची तेजस्विता व कर्तृत्व विलसूं लागलें होतें. स्वतःचें दुःख बाजूला सारून दुसऱ्याच्या दुःखाविषयीं सहानुभूति व तें दुःख हलकें करण्याविषयीं तळमळ लागून राहिली म्हणजे जें उदात्त गांभिर्य मुद्रेवर येतें व नेत्रांमध्यें जी प्रेमळ, दुसऱ्याचें मन आकर्षून टाकणारी अंतःकरणाची विशालता प्रतिबिंबित होते, तें गांभिर्य व नेत्रांचा आकर्षकपणा कीर्तीला पहातांच कुणालाही जाणवला असता. या एकंदर सर्व परिणामांत तिचें साध्या कांठाचें पांढरें पातळ व साधी वेषभूषा यांनीं भरच टाकली असती.

पूर्वीची ती अल्लड, हळुवार मनाची, स्वतःच्या दुःखांनीं दडपून गेलेली विलासप्रिय कीर्ति क्वचितच कुणाच्या दृष्टीस पडली असती.

एक महिन्यांतच तिच्यांत इतकें स्थित्यंतर पडण्यास कारणेंही महत्त्वाचीं घडलीं होतीं. निदान कीर्तीच्या कोमल, व आधींच कोमेजलेल्या हृदयावर आघात करून तें सहनशील बनविण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत होतें.

मध्यंतरीं धर्मांतराचा जो आगीचा डोंब डॉ. आंबेडकर यांनीं उसळून दिला होता त्याचाच हा धूर चांदवडाच्या आसपास भागांत पसरलेला असावा असा दादासाहेबांनीं कयास बांधला होता. दादासाहेब कीर्तीला घेऊन प्रथम चांदवडानजीक असलेल्या आपल्या नांदवड गांवीं आले. वाटली होती त्यापेक्षां परिस्थिति फारच गंभीर असल्याचें त्यांना आढळून आलें. बायाचा म्हातारा नवरा म्हादबा आणि मुलगा मारुती दादासाहेबांचे कट्टे भक्त होते. त्यांच्याचप्रमाणें गेनू गाडेकर, येसू

हारळे हेही दादासाहेबांचे एकनिष्ठ भक्त व शिवाय नात्यानेंही जोडले गेलेले होते. बाकी तसें पाहिलें तर आसपासच्या गांवांतले सर्वच चर्मकार त्यांच्या भक्तगणांपैकीं होते म्हटलें तरी कांहीं फारशी अतिशयोक्ति होणार नव्हती. आजपर्यंत बाहेरून त्यांना फोडण्याचे प्रयत्न होऊनही कुणी त्यांत यशस्वी झालेला नव्हता.

या आसपासच्या चर्मकार लोकांत दोनतीन मत्सरी, स्वार्थलोलुप व्यक्ति अर्थातच होत्या. दादासाहेब त्यांना पूर्णपणें ओळखून होते; परंतु आपल्या जातीच्या रोषाच्या भयानें ते जोंवर डोकें वर करीत नव्हते, उलट वरून वरून गोडीनें वागत होते तोंवर त्यांना आडून आडून उपदेशामृताचे घुटके पाजण्याखेरीज कांहीं विशेष करण्याची आवश्यकता त्यांना भासली नव्हती.

आतांची धर्मद्रोही हुल्लड त्याच दोघांतिघांनीं उठवली होती. त्यांनींच चिथावणी चालवली होती. दादासाहेबांना मुंबईहून निघतांना वाटलें होतें कीं आपण स्वतः आल्याचें पहातांच शिद्या चांभार, लख्या गावडा व संभू नांदवडकर हे घाबरून जातील आणि जरा मन वळवतांच आपला दुष्ट बेत सोडून देतील.

पण ती आशा फोल ठरली. त्या तिघां द्रोही लोकांनीं आपला बेत तर सोडला नाहींच पण उलट दादासाहेबांना तोंडावर यथेच्छ दोष दिले. मुंबईत निकडीचीं कामें असल्यामुळें त्यांना परत जाणें भागच होतें. ते गेले तेव्हां अगदीं पूर्ण निराशा त्यांना वाटली नव्हती. शिद्या चांभार, गावडे आणि नांदवडकर हे आज नाहीं तरी थोड्या दिवसांनीं शुद्धीवर येतील, त्यांचें मन वळवण्याचे जर आटोकाट प्रयत्न चालवले तर अखेरीला त्यांत यश लाभेल आणि हे तिघे नाहींत तरी निदान यांनीं चिथावलेलीं बाकीचीं कुटुंबें तरी परधर्मांत जाणार नाहींत अशी आशा अंधारांतल्या मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशाइतकी त्यांच्या अंतःकरणांत अंधुकशी तेवत होती.

कीर्ति प्रथम नांदवडला आली तेव्हां आपल्या जातीची रहाणीवागणी जवळून पाहून व अनुभवून प्रथम बरीच गोंधळली. दादासाहेबांना तिला तेथें ठेवावें की नाहीं हा मोठाच प्रश्न पडला. परंतु कीर्तीनें येथेंच राहून यथाशक्ति कार्य करण्याचा कृतनिश्चय त्यांना कळवून ती राहिली. मग बायाचा नवरा म्हादबा आणि मुलगा मारुती यांचेबरोबर आसपासच्या गांवीं जाऊन सर्व परिस्थिति तिनें बारकाईनें पाहिली, प्रमुख कुटुंबांतील स्त्रीपुरुषांच्या भेटी घेऊन त्यांच्याकडून खरी माहिती काढण्याचा प्रयत्न केला, दहाबारा कुटुंबांच्या धर्मांतराच्या घोषणेनें व भुलावणीनें

सर्वांची झालेली चलबिचल शांत करून, आपल्या जातीवर आणि पर्यायानें देशावर-सुद्धां हें केवढें घोर संकट ओढवत होतें याची तिनें मोठ्या कळकळीनें परोपरीनें जाणीव करून दिली.

जे लोक मुलांबाळांसह धर्मांतराला तयार झाले होते, त्यांच्या घरांत म्हादबा, मारुती वगैरेंचा प्रवेश झाला नव्हता. ते लोक मुळीं त्या बाबतींत कुणाशीं बोलायला-सुद्धां तयार नव्हते. पण कीर्तीला त्यांना नाहीं म्हणणें अशक्य झालें. त्यांच्याही घरीं कीर्ति गेली. शिद्या चांभार, लख्या गावडे आणि संभू नांदवडकर यांच्याशीं देखील तिनें वाद केला.

तुमच्या मनांत हा विचार कां आला म्हणून विचारतां म्होरक्यांनीं शिकवून ठेवल्याप्रमाणें आंबेडकरांची नक्कल ते म्हणून दाखवीत, आणि हिंदुधर्माला शिव्या देऊन दुसऱ्या धर्मांत जास्त महत्त्व प्राप्त होईल, महारोग्यांप्रमाणें आम्हांला लोक दूर ठेवणार नाहींत असा वाद ते घालूं लागत.

कीर्तीनें त्यांना सांगावें, " तुम्ही कोणत्याही धर्मांत गेलांत तरी तुम्ही जोंवर स्वतः कांहीं कर्तबगारी करून दाखवीत नाहीं, शिक्षण घेत नाहीं किंवा रहाण्यावागण्यांत सुधारणा करीत नाहीं तोंवर तुम्ही महत्त्व वाढण्याच्या गोष्टी कशाला सांगाव्या ? तुम्ही मुसलमान झालां कीं लगेच आगाखान, जिनांच्या मांडीला मांडी लावून तुम्हांला जेवायला मिळेल नाहींतर अशाच मोठ्या लोकांच्या मुलीबाळी तुम्हांला मिळतील आणि ते तुमच्या मुली करून घेतील असं वाटतं कां तुम्हांला ? "

निरुत्तर होऊन गुळमुळीतपणें ते लोक म्हणत, " पण आम्हांला पुष्कळ सवलती मिळतील. आमचं दारिद्र्य नाहीसं होईल. "

" तें कसं ? अंगांत धमक असेल तर कोणत्याही धर्मांत पैसा मिळवतां येतो. मुसलमान धर्मामुळें श्रीमंती लाभती तर त्या धर्मांत हजारों लोक दरिद्री आहेत ते कसे ? "

" पण ताई, अंगांत धमक असून चहूंबाजूनं ती दडपून घातली तर मग कसं करावं ? "

" खरं आहे तुमचं म्हणणं. हरिजनांना हिंदुधर्मानं दडपून टाकलं आहे, त्यांना डोकं वर करायला अवसर नाहीं ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे. पण बाबांनों, धर्मांतर

ह्या त्याचा उपाय नाहीं. धर्मांतर म्हणजे भेकड पळपुटेपणा होईल. कांहीं झालं तरी आपल्या देशाशीं आणि धर्माशीं द्रोह करतां कामा नये. त्यांत काडीचाही पुरुषार्थ नाहीं. आपल्याला आतां ज्या थोड्याबहुत सवलती मिळाल्या आहेत त्यांचा आपण पूर्ण फायदा करून घेतला पाहिजे. आणि जास्त सवलतीसाठीं आपल्या हिंदुबांधवांशींच भांडलं पाहिजे. पाय दुखतो म्हणून आपणच त्यावर कुऱ्हाडीचा घांव घालायचा कां ? ”

कीर्ति अनेक बिनतोड मुद्यांनीं त्या लोकांना निरुत्तर करून टाकी.

गेल्या महिन्यांत कीर्तीनें आपल्या जातीच्या लोकांना बाहेरच्या जगाचें बरोबर ज्ञान व्हावें म्हणून पुष्कळ परिश्रम घेतले. त्यांची रहाणी सुधारण्यासाठीं व ज्ञानलालसा वाढविण्यासाठीं दादासाहेबांनीं, ज्या सोई करून दिल्या असूनही निरुपयोगी होऊन राहिल्या होत्या, त्यांचा नीट उपयोग सर्वांनीं करून घ्यावा म्हणूनही तिनें अनुकूल वातावरण निर्माण केलें.

धंद्याच्या बाबतींत नाविन्य, प्रामाणिकपणा व कष्टाळूपणा यांची किती जरुरी आहे हेंही तिनें इंग्रज व इतर पाश्चात्त्य राष्ट्रांचीं उदाहरणें देऊन त्यांना पटवून दिलें.

दादासाहेबांचें उदाहरण ती मोठ्या भक्तिभावानें प्रत्यहीं सांगत असे आणि चर्मकार लोकांच्या मनांत तिचा मुद्दा मग एकदम पटे.

सारांश कीर्तीनें चांदवड भागांत जोराची इष्ट ती चळवळ सुरू केली. सर्व लोकांत अत्यंत स्फूर्तिदायक वातावरण निर्माण होऊन शक्य तेवढें ज्ञान मिळविण्यासाठीं मोठी अहमहमिका सुरू झाली.

परंतु कीर्तीचें मुख्य कार्य मात्र फारसें यशस्वी झालें नव्हतें. चार कुटुंबांनीं धर्मांतर न करण्याच्या आणाशपथा घेतल्या होत्या पण बाकीचे लोक मात्र कोणत्याही उपायानें वळत नव्हते. भीतीमुळें किंवा कांहीं कारणामुळें ते अजून परधर्मांत गेले नसले तरी केव्हां जातील याचा नेम नव्हता.

या सर्वांच्या बुडाशीं कांहींतरी वेगळाच प्रकार असावा असा कीर्तीला हळूं हळूं दृढ संशय येऊं लागला होता. बाया, तिचा नवरा, मुलगा, गेनू, येसू वगैरेनाही या तिच्या संशयांत कांहीं तथ्य असावेसें वाटूं लागलें होतें परंतु अंतस्थ बातम्या

काढण्याचा प्रयत्न करूनही कांहीं सुगावा लागत नव्हता. नवलाची आणखी एक गोष्ट अशी कीं मुसलमानांनीं कांहीं चिथावणी चालवलेली दिसत नव्हती.

मग शिद्या चांभार, लख्या गावडे आणि संभू नांदवडकर यांनीं जो एकदम धर्मांतराचा बनाव घडवून लोकांचीं मनें वळविण्यांत यश मिळवलें होतें तें कसें ?

या पेचप्रसंगांत कीर्ति मोठ्या धैर्यानें व चातुर्यानें कार्य करीत होती. प्रेमळ कर्तबगार बाया तिला उल्हासानें कार्यप्रवृत्त करीत होती.

एक महिन्याच्या अवधींतच कीर्तीविषयीं तिच्या जातींतच काय पण इतर हिंदूंमध्येंसुद्धां मनस्वी आदरभाव उत्पन्न झाला होता. बापासारखीच लेकही चांगली निघाली म्हणून सर्व तिला धन्यवाद देत. चर्मकार मुलांना तर ती देवताच वाटे. ती सांगेल तें करण्यासाठीं तीं मुलें अहमहमिकेनें झटत.

दिवसभर कीर्ति काम करी. मग पांचानंतर मात्र ती विश्रांति घेई किंवा जवळपास फिरावयास जाई. बहुतकरून ती एकटीच जाई. तिनें दोन तीन रेखाचित्रें तयार केलीं होतीं.

या दोन दिवसांत ती नांदवड गांवीं परत आलेली असून चांदवड डोंगरावरून दिसणाऱ्या निसर्गशोभेचें रेखाचित्र तयार करण्याविषयीं, तिला त्या गांवीं प्रथम आल्यापासून लागलेली उत्कंठा पूर्ण करण्याचा तिनें निश्चय केलेला होता.

चित्राला योग्य तो कोन साधावा म्हणून आदल्या दिवशीं ती डोंगरावर खूप भटकली होती. आणि मोठ्या कठिण पायवाटेनें गेल्यावर तिला ती निर्झराजवळची जागा सांपडली होती. त्या जागेवर उभी राहून तिनें जेव्हां सभोंवार नजर फिरवली तेव्हां आनंदानें नृत्यगायन करावेसें तिला वाटूं लागलें. इतकी तेथून अपूर्व शोभा दिसत होती. किती वेळ तरी ती उभी राहून ती शोभा बघत होती. मग तिला चित्र काढण्याची आठवण झाली.

लगेच तिनें सूटकेसमधून चित्राचें साहित्य काढलें व थोडें कामही केलें पण थोड्याच वेळांत सूर्य मावळल्यामुळें तिला आपली उत्कंठा दाबून परत जावें लागलें होतें. जातांना, उद्यां अगदीं लवकर येऊन चित्र तयार करायचंच, असें तिनें मनाशीं ठरवून टाकलें होतें.

आणि आजही सृष्टिशोभा बघतां बघतां तिचें चित्राचें काम कांहींसुद्धां झालें नव्हतें.

त्या निर्झराचें अमृतासारखें मधुर व थंडगार पाणी पिऊन कीर्तीला फार आल्हाद वाटला. कडेला असलेल्या फळभारानें लवलेल्या आम्रवृक्षाच्या पुन्हां नवीनच आलेल्या मोहोराचा सुवास दरवळत असून तो मोहोर व आम्ररस प्राशन करून त्या वृक्षाच्या फांदीवर बसून दोन कोकिलपक्षी बेहोषपणें कूंजन करीत होते. उन्हाळ्याचे दिवस असूनही सुंदर, शीतल वारा वहात असल्यानें कीर्तीचें मन फारच प्रसन्न झालें. तो लहानसा झरा तेथल्या कड्यावरून उडी घेऊन वहात वहात खालीं कुठपर्यंत जातो हें पहाण्याविषयीं तिला कुतूहल वाटूं लागलें.

" हा पैंजणा नदीचा उगम तर नव्हे ना ? विचारलं पाहिजे म्हादबाला. बाकी हा झरा वहातांना जो मंजुळ आवाज होतो आहे तो ऐकून मात्र वाटतं कीं येथें जलदेवता नृत्य करीत असून त्यांच्या पैंजणांचाच हा मधुर रुणझुण आवाज असावा."

या आपल्या सुंदर कल्पनेमुळें अधिकच मन प्रसन्न होऊन कीर्तीनें अस्फुट असें मंद हास्य केलें आणि ती आम्रवृक्षाच्या जवळच्या फांदीला धरून वांकून खालीं पाहूं लागली.

एकदम त्या स्वप्नाप्रमाणें सुंदर सृष्टीचा भंग झाला !

आजूबाजूच्या मंजुल कलरवाचा नाश करणारें एका भसाड्या गळ्यांतून निघालेलें भेसूर हंसणें पहाडांपहाडांमधून शतपटीनें मोठें होऊन जिकडे तिकडे कोंदाटून राहिलें आहे असा कीर्तीला भास झाला.

प्रथम तें हंसणें ऐकतांच धसका बसून कीर्तीचा हात फांदीवरून निसटून ती पडणार होती पण लगेच तिनें तोल सांवरून फांदी गच्च धरली आणि डोळ्यांना दिसलेला बागुलबोवा खरा कीं खोटा हें आजमावण्यासाठीं ती जपून पुन्हां खालीं बघूं लागली.

कीर्तीला प्रथम दिसलेला बागुलबोवा खराच होता. आणि पुन्हां पाहिल्यावर एकाऐवजीं दोन मनुष्यदेहधारी राक्षस तेथें उभे असल्याचें तिला दिसून आलें. त्यांपैकीं एक तिच्या पूर्ण परिचयाचा होता.

त्याचें नांव शिदू चांभार. तें पिसाटासारखें हास्य त्याचेंच होतें हें आवाजावरून कीर्तीला आतां समजलें.

तो दुसरा मुसलमान होता. शिद्यापेक्षांही तो विरूप, खुनशी, आणि बोजड पण बोकडासारख्या टणक शरीरयष्टीचा होता. त्याचें स्वरूप बघूनच कीर्तीच्या अंगावर शहारे आल्यासारखें झालें.

त्या दोघांचें भाषण ऐकून तर तिच्या जिवाचा थरकांप उडाला.

वास्तविक त्या दोघांचें संभाषण ऐकण्याचा कीर्तीचा मुळींच हेतू नव्हता. परंतु येथें आपण असून त्या दोघांना आपण एकत्र पाहिलें आहे असें जर त्यांना कळलें, किंबहुना आपणच काय पण कुणीही व्यक्ति जवळपास आहे असा नुसता संशय जरी त्या दोघांना आला तरी ती कांहीं बरी गोष्ट होणार नाहीं असा विचार कीर्तीच्या मनांत आला. ते दोघे स्नेही नव्हते किंवा त्या अवघड ठिकाणीं शिळोप्याच्या गप्पा मारायला आले नव्हते हेंही अगदीं उघड होतें. अशा परिस्थितींत आपण एकाकी स्त्रीनें, आपलें अस्तित्व मोठ्या काळजीपूर्वक रीतीनें गुप्त राखलें पाहिजे अशा विचारानें कीर्ति शक्य तोंवर निश्चल उभी राहिली.

म्हणूनच तिला त्या दोघांचें संभाषण ऐकणें भाग पडलें आणि मागून तर ती तें सावधानतेनें ऐकूं लागली.

कीर्ति उभी होती तेथून खालीं कडा तुटल्यासारखाच साधारण उभाच्या उभा उतार होता त्यावरून एकादें विरविरीत पांढरें पातळ वाळत घातल्याप्रमाणें अडीच तीन हात रुंद पसरलेला जलस्रोत पंधरा सोळा हात उंचीवरून खालीं वहात गेला असून, मग एकदम झाडांच्या गर्दींत दिसेनासा झाला होता. त्याच्याखालीं बहुधा दरीच असावी.

जलस्रोत ज्या ठिकाणीं अदृश्य झाला होता तेथें जाण्यास वाट नव्हती किंवा उभें रहाण्यास जागाही नव्हती. परंतु मध्यें खिंडीसारखी दिसणारी चार पांच हात

जागा सोडून पलीकडे जरा काटकोनांत डोंगराचें एक दहाबारा हात रुंदीचें टोंक पुढें आलें असून डोंगराच्या भिंतींत कोनाड्यासारखी निसर्गनिर्मित जागा होती. त्या कोनाड्याशीं जाण्याकरतां कुठून वाट होती कोण जाणें पण शिद्या आणि तो मुसलमान तेथेंच उभे राहून बोलत होते. पायथ्याशीं वसलेल्या गांवच्या लोकांना किंवा पलीकडल्या कुरणांत गुरें चरावयास आणणाऱ्या लोकांना तो कोनाडा मुळींच दिसण्यासारखा नव्हता. आतां कीर्तीनें हंसणें ऐकून शोधक दृष्टीनें पुढें वांकून पाहिलें म्हणूनच तिला तो कोनाडा दिसला नाहींतर ती ज्या अवघड वाटेनें आली त्या वाटेनें क्वचित् येणाऱ्या एकाद दुसऱ्या गुराख्यालासुद्धां ती जागा सहसा दिसली नसती.

अशा त्या जागीं उभे राहून ते दोघे राक्षस काय बोलत असावे याचा कीर्ति मनाशीं तर्क करूं लागली पण तिच्या भयंकर तर्कापेक्षांही भीषण गोष्टी तिला हळूंहळूं ऐकूं येऊं लागल्या. त्या ऐकतांना तिला आपलें मन पोलादासारखें कणखर करावें लागलें.

शिद्या म्हणत होता, " तें इच्चारीत व्हतास ना मला लई दिस. थोरा-मोठ्यांच्या जातींतली मिळवलीय बग. अरे ममद्या, दोस्त, काय सांगूं तुला. अशी खुबसुरत आवा हाये बग. अक्षी पायल्याबराबर कुनीबी माल उचलून न्येईल. तिकडे मोंगलाईत म्हनशील तो भाव घ्येऊन जाईल. "

महंमद मोठ्या आनंदानें म्हणाला, " असं होय रे ? पण काय शिताफी लढवून तूं पकडलीस तिला ? कारण थोरामोठ्यांची आहे म्हणतोस. आणि तिला ठेवली आहेस तरी कुठं ? "

शिद्या नकारार्थी मान हलहीत उत्तरला, " त्ये नग इच्यारु ह्या शिद्याला. माज्यापाशीं येकच युगुत हाये व्हय ? जशी येळवखत पडल तसा हा शिद्या काम लढवनारा हाये समजलास. " शिद्यानें प्रौढीनें समाप्ति केली आणि मोठ्या धूर्तपणानें महंमदच्या प्रश्नाला सरळ उत्तर देण्याचें टाळलें. आपल्या धंद्यांतली मेख तो महंमदाला कशी दाखवणार ? महंमदाच्या सांथीनें हा धंदा पुढेंही चालू ठेवण्याचा त्याचा विचार होता.

महंमदाला ही टाळाटाळी समजली नाहीं असें नव्हे पण शिदू धूर्त असला तर महंमद महा धूर्त होता. तो शिद्याच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन म्हणाला,

" तूं इतका हुषार आहेस म्हणूनच तर आमच्या मालिकसाहेबांनीं तुला आमच्यांत सामील करून घेतला. पण तें असूं दे. तूं ती परी माझ्या ताब्यांत देणार केव्हां ?"

" कवां तूं म्हनशील तवा. असा या हातीं दाम घ्येयाचं आन् या हातानं ती आवा तुज्या सवाधीन करायाची. कवां आनूं तिला ?"

महंमदनें मोठ्या विचारांत पडल्यासारखें केलें. पण त्याला हा सौदा हातचा जाऊं द्यावयाचा नव्हता. तेव्हां तो म्हणाला, " बरं बरं कुठें येऊं तें सांग तूं म्हणजे पन्नास रुपये घेऊन येतों."

शिद्या मनांतून जरा निराश झाला, पण तसें न दाखवतां उपहास दाखवून तो हंसून म्हणाला, " पन्नास रुपये. ऊंः तीनशें रुपयांखालीं पैबी घ्येनार नाय. सौदा पटत असला तर हो म्हन नायतर राह्यलं."

या आंकड्याबाबत दोघांची जरा बोलाचाली झाली. नंतर अडीचशेंला सौदा ठरल्यावर त्यांनीं स्थलनिश्चय करून टाकला.

मग महंमद म्हणाला, " हें एक काम जमलं. पण त्या दुसऱ्या कामाचं काय रे ? आणखी लोक मिळायचं राह्यलंच बाजूला पण एकही दीक्षा घेईना."

शिद्यानें कडाकड बोटें मोडून रागांत म्हटलें, " अरं म्यां तरी काय करावं ? ती बया आल्यापून समदा बिबा पडलाय जनूं. समदे बिथरून गेल्यात. मागं म्यां त्येन्ना खोटी लालूच दाखवली व्हती कीं मुसलमान झालां तर डोईमागं शंभर रुपये मिळत्याल म्हनून. त्येन्ना त्ये पटलं व्हतं. पन ती बया आल्यापून दीडशाणे झाले न्हवं का. अन् माला म्हंत्यात अदुगर पैका टाक मंगशिनी मुसलमान होतों. तो लख्या न् नांदवडकर वरून वरून ग्वाड दाखवत्यात पन् त्येबी पैकां टाक म्हनत्यात."

" मोठी पंचाईत झाली म्हणायची. आमच्या मालिकसाहेबांच्याजवळ मी केवढी फुशारकी मारून बसलों, त्यांनीं तुला न् मला मोठी बक्षिशी द्यायचं कबूल केलं होतं."

शिद्या ज्याप्रमाणें कबूल करून कुणाला एक पैदेखील देणार नव्हता त्याचप्रमाणें महंमदही शिदूला सफाई फसवणारच होता; परंतु त्याचें सर्व कार्य शिदूवरच अवलंबून असल्यानें त्याला नाखूष करून भागणारें नव्हतें. म्हणूनच तो गोडगोड बोलत होता व शिदू स्वतःला धूर्त समजत असूनही त्या गोड बोलण्याला भुलत होता.

बक्षिशीच्या शब्दानें आतांही खुशालून तो म्हणाला, " ममद्या, दोस्ता, जरा दम धर ल्येका. मी काय असा त्या इलायतवाल्या आवाला भिऊनशान गप बसनारा नाय. तिला उधळून लावतों बग. "

" पण जपून सगळं कर हं. नाहीं तर फुटाफूट होऊन सगळाच बाजार आटपेल. आमचे मालकसाहेब हिंदुधर्माचे चहाते म्हणून सगळीकडे सांगतात म्हणून सगळं जमतं नाहींतर सांगून देशील सगळं. "

" बाबा. अरं जपन नाय तर काय करीन रं. आजवर त्या आंबेडकराचं नांव म्होरं घातलं न्हवं का. तसा अजागळ हाये व्हय मी ? समदं जपूनश्येनीच चाललं या. त्या दादासायबाच्या पोरीशींबी अक्षी मिठास बोलतों ना. जपायचं नसतं ना तर असा तिचा हात धरून सातमाळयाच्या शेंड्याला चढलों असतों नी दिली असती तिला ढकलूनशानी. "

शिद्या भेसूर अन् खुनशीपणानें हंसला.

कीर्तीचें रक्त गोठल्यासारखें झालें होतें. सर्वत्र अंधार पडल्यामुळें तर ती फारच घाबरली होती. तिची छाती येवढ्या मोठ्यानें धडधडत होती कीं तिला भय वाटलें, खालच्या त्या सैतानांना ऐकूं तर जाणार नाहीं ना ? आतां रात्रभर हे इथेंच आपल्या सैतानी मसलती करणार कीं काय ? आपली सुटका आज या जागेवरून होते कीं नाहीं ?

पण ते दोघे सैतान लवकरच पलीकडल्या बाजूनें खालीं उतरूं लागले.

नंतर बऱ्याच वेळानें आपली जागा सोडण्याचें धैर्य कीर्तीला आलें. त्या भयाण जागीं अंधारांत रहाणें तिला अशक्य झालें. रातकिड्यांचा किर्र आवाज चालला होता. हवेंत झाडपाल्याचा कुबट वास भरत चालला होता. रात्रींचे पक्षी फडाफडा पंख वाजवीत, कर्कश व भेसूर आवाज काढीत होते. दरींत कुठेंतरी भालूचेंसुद्धां ओरडणें एकदां दुमदुमलें.

दरीजवळून गेलेल्या दोनअडीच फुटांच्या त्या अडचणीच्या वाटेंतून, हातीं सूटकेस घेऊन, कीर्ति कशी खालीं उतरली तें तिचें तिलाच माहीत !

पायथ्याला आल्यावर नांदगांवचे दिवे जेव्हां दिसूं लागले तेव्हां तिच्या थोडा जिवांत जीव आला.

घरांत शिरतांना ती हंसून मनाशीं म्हणाली, "आज कळलेल्या गोष्टी बायाला सांगितल्या कीं ती शिद्याला उद्देशून कानशिलावर कडाकड बोटें मोडून म्हणेल, 'म्येल्या थूत् तुज्या जिनगानीवर. ह्ये असलं अमंगळ वागतोस, आपल्या धर्माशीं इसवासघात करतोस त्यापरीस रांडिच्या, नरकांत कां जाईनास ? थू: म्येल्या."

कीर्तीला पहातांच बाया प्रेमळ शब्दांत तिला रागें भरली, "किती उशीर क्येलास ग पोरी ? लई घोर लागला ना माला. धन्याल्ली हुडकायाला पाटवनार व्हत्यें इक्त्यामंदीं. कुटं ग्येलतीस ?"

"बाया, आधीं जेवायला वाढ मला. भुकेनं जीव कासावीस झालाय. मग सांगतें सगळं तुम्हांला. अगदीं सोन्याच्या मोलाची बातमी कळली बघ आज मला. आपल्याला एक मोठं महत्त्वाचं काम पण करायचं आहे. अगदीं गुप्त बातमी आहे हो पण. म्हादबा, तूं नी मारुती येवढ्यांनाच सांगायची."

एका बसकणापुढल्या थाळींत वाढतां वाढतां बाया आश्चर्यानें म्हणाली, "असं व्हई ?" नंतर कीर्ति जेवायला बसल्यावर विचारांच्या भरांत तिला जेवण जात नाहींसें पाहून ती बोलूं लागली, "माजी बया, जेव ग आतां प्वाटभर. तुझ्यासाठीं आज कालवणाला मसाला लावलाय. बग तरी जरा चाखून. किती तरास करून घ्येशील जिवाला ? शीक झालीस तर तुझा दादला माज्या नांवानं हांका मारील ना !"

---

म्हातारा म्हादबा आणि मारुती झुंजुमुंजु होतांच उठून न्याहारी आटोपून आपल्या झोपडीवजा घराच्या ओसरीवर बसून चढावांचे तळवे करण्यांत गढून गेल्यासारखे दाखवीत होते. अंगणांत कोंबड्यांना दाणेपाणी घालून बाया शेळ्यांचें दूध काढीत होती, तिची सून स्वैपाघरांत नाचणी दळीत 'धुरपता जितली त्येन्नीं, पांडवांन्नीं' हें गाणें आपल्या गोड गळ्यानें पण हेल काढून गाण्यांत अगदीं रंगून गेली होती. तिचा पांच वर्षांचा मुलगा गोव्या स्वच्छ स्नान करून व सदरा, चड्डी घालून, कीर्तीनें पाटीवर काढून दिलेलीं अक्षरें गिरवीत बसला होता. आणि कीर्ति आपल्या मोठ्या ट्रंकेचा मेजासारखा उपयोग करून माजघरांत पत्रें लिहीत बसली होती. रानवट जातीचा वाघ्या कुत्रा जवळच झोप घेत पडला होता. गरिबींतही तें घर कसें स्वच्छ नीटनेटकें दिसत होतें.

म्हादबा आणि मारुती आपलें काम जरी काळजीपूर्वक करीत असले तरी त्यांचें लक्ष मात्र पेरूच्या बागेपलीकडे असलेल्या शिद्याच्या खपरेलाकडे वारंवार जात होतें. त्यांनीं आज शिद्यावर पाळत ठेवली होती. दोन प्रहरीं एकदम आंत जेवायला न जातां ते आळीपाळीनें जेवून पुन्हां जागेवर येऊन बसले होते.

पण शिद्या सबंद दिवसभर ओटीवर बसून पायतणें बांधीत होता. कोरड्यास भाकर खाणें, बायकापोरांवर खेकसणें, बायको आणि बहीण यांच्या चाललेल्या भांडणांत भाग घेणें किंवा अभद्र शिव्या देऊन गप्प करू पहाणें, पानतंबाकू खाऊन अंगणांत थुंकीच्या पिचकाऱ्या टाकणें, आणि सारख्या भोंकणाऱ्या कुत्र्याला आणि केंकाटणाऱ्या कोंबड्यांना पडीक भिंतींतले दगड खडे मारून अभद्र शिव्या देणें हे सर्व त्याच्या रोजच्या जीवनांतील प्रकार व्यवस्थित चालू होते.

त्या लहानशा गांवांतला कुणीही शेतकरी, कुळंबी किंवा ब्राह्मण वगैरे कामानिमित्त म्हादबाच्या घरावरून जात असला कीं गति मंदावून म्हादबाकडे ओळख दाखवून, हंसून, काय म्हादबा, म्हणून कुशल विचारल्याशिवाय पुढें जात नसे व म्हादबाही आपल्या नम्र स्वभावाला अनुसरून उजवा हात कपाळाशीं वरखालीं हलवून स्मितपूर्वक, रामराम दादा, ठीक हाये आपल्या किरपेनें, असें उत्तर देत असे.

सद्या मात्र हल्लीं गांवांत एक तिरस्कारविषय होऊन बसला होता. त्याच्या घरावरून जातांना त्याच्या दोस्तांखेरीज कुणीही त्याच्याकडे ढुंकून पहात नसे.

त्यांच्या या वागण्याची आपल्याला यत्किंचित् परवा नाहीं असें दाखविण्यासाठीं शिद्या कुचेष्टेने हंसून उगीचच डोळे मिचकावी आणि जाणाऱ्या लोकांकडे बघत बघत पिंक्या फेंकी. पण मनांतून तो सर्वांवर जळत असे. त्यामुळेंच त्याच्या तोंडून दिवसभरांत या ना त्या कारणानें शिव्यांची लाखोली वाढत्या प्रमाणांत निघत असे.

आपल्यावर म्हादबा आणि मारुती यांनीं पाळत ठेवली असेल याची सद्याला मुळींच कल्पना नव्हती.

त्या कारणानेंच सूर्य मावळतीकडे झुकून जरा ऊन उतरल्याबरोबर सदू काम आवरून उठला. त्यानें पंचाचा कांचा कसून, अंगरखा व मुंडासें बांधलें आणि उपरण्याच्या टोंकाला कांहींतरी बांधून केलेली गांठोडी पाठुंगळीला टाकून हातीं घुंगराची उंच काठी घेऊन व पायांत कुणबाऊ चढाव घालून तो निघाला.

तो थोडा पुढें जातांच मारुती कपडे करून त्याच्या मागावर मोठ्या सावधगिरीनें निघाला आणि जरा वेळानें म्हातारा म्हादबाही मारुतीच्या मागून जरा अंतर ठेऊन चालूं लागला. गांवांत एका दोस्तानें शिद्याला हटकलें तेव्हां त्यानें गांठोडीकडे हात वळवून सांगितलें, "पिपुरीच्या भटानं कराया सांगितलीं पायताणं. तीं त्याला वोपाया जातुंया."

पण शिद्या वेशीबाहेर पडला आणि पिंपुरी गांवाची वाट सोडून पारठाण्याच्या वाटेला लागला, व पारठाण्याजवळ येतांच त्याही खेड्याची वाट सोडून तो गांवालगतच्या डोंगरपायथ्याशीं असलेल्या रानांत शिरून आडवाटेला लागला. थोडी वाट चालून गेल्यावर एका गुहेंतल्या लेण्यासारख्या दिसणाऱ्या पडीक देवळाशीं येऊन शिद्या थांबला. त्यानें एकवार चहूंकडे कावळ्यासारखी नजर फिरवली व तो आंत शिरला.

म्हादबा व मारुती पाठलाग करीत येथवर येऊन जवळच झाडींत लपून बसले. आंत काय आहे तें बघण्यासाठीं ते अधीर झाले होते पण शिद्याच्या मागोमाग पडक्या देवळांत एकदम शिरणें इष्ट नव्हतें.

सुमारें एका घटकेंत सदू देवळाबाहेर आला. त्याच्या मागोमाग एक स्त्रीही बाहेर आली होती. म्हादबा आणि मारुती ज्या झुडपामागें छपून बसले होते तेथेंच तीं दोघें येऊन कुजबुजूं लागलीं.

ती स्त्री म्हणाली, "सदोबा, आतां जास्त दिवस निभणं कठीण जाईलसं वाटतं. बाईनला तुजाच संशय यायाला लागलाय जनुं."

"माजा संशय यायाला लागलाय? मग तुजं काम तूं नीट बजावीत नाहींस असं वाटतंया मस्नी." सदू नाराजीनें म्हणाला.

"वा, सदोबा, ये चांगलं बोलतुयास की रं बाबा. तुजं ऐकूनशान बिचारीला पवळ्याहून हिथं आणून घातली आन् आज चार दीस तिच्यासंगं या भयांकर जागीं सोबतीविना राह्यलें. रातपारीला काल अशी कोल्हकुई वाह्वळ ऐकली. बया बया, जीव नुसता जायाला झाला. बाईची तर सूदबी ग्येली. आन् इत्त्यावर पुन्हां म्हंगतोस काम नीट बजावीत नाहींस म्हून."

उपहासानें हंसून पण लगेच भुलावणीच्या स्वरांत सदू म्हणाला, "पन मजे, तूं ह्ये संमदं क्येलंस तरी काय माज्या उपकारापायीं करशिल व्हय? काम खलास झालं कीं माज्याकून पन्नास रुपये खुळखुळून घ्येशील तवां ग."

तो रुपयांचा आवाज ऐकत असल्याप्रमाणेंच त्याचें जणूं अनुकरण करून मंजुळा हंसली. "आन् बाईनला वोपून रुपयांचे तोडे घेशील तवां र तूं? बरं न्हाऊं दे तें. जा. निचिंत न्हा दोन दीस. मी बाईनला तुजा इसवास वाटल अशाच गोष्टी सांगन. बरं कां पाटीलदादा. त्या तुला सदोबा पाटीलच समजत्यात."

यावर मंजुळा आणि सद्या दोघेंही खदखदां हंसलीं.

मग सदू काळजीनें म्हणाला, "हें बघ मंजे, दोनच दिसांची कळ काढ बग. कसंबी कर. तुज्या बाईनला इसंबूं नको क्षनभरबी. आन् असं करीनास. उद्यां तुला टाळं आनून देतों, तें लाव झडपेला अन् चावी ठ्येव तुज्याजवळ."

"लई ब्येस. आन उद्यां टाळं. बरं आतां जाऊं मी? बाईनला नायतर संशय येईल वाह्वळ काय बोलत्यात म्हून. लई मन संशयी झालंय त्येंचं. जपाया होवं."

"खरं ग खरं! जा तर बिगीबिगी. मलाबी घरला निघाया होवं. फिरं झालंया समदं. कायबी दिसंना." नंतर जरा घाबरून एकदम सदू उद्गारला, "तकडं काय सळसळलं ग?"

मंजुळा निष्काळजीपणानें म्हणाली, "असंल जिवानूं बिवानूं, जाईल आपल्या वाटेनं. बरं जाती हं."

मंजुळा गुहेंत गेल्यावर सदू जरा वेळ कानोसा घेत राह्यला. नंतर निश्चिंत होऊन जरा हंसून म्हणाला, " मोठी फटाकडी हाये ही मंजुळी. त्या दुसऱ्या बिजलीपुढं हिची जनूं सईच नाय मला. इच्यारावं तर ममद्याला. काय पन्नाससाठ रुपये मंजुळीचे येईल तितकीच धन. बस. असंच करावं. दोगींन्नाबी वोपून टाकतों. अन् मंग सदोबा खरोखरच्या पाटलावानीच शिरमंत व्हईल नी मिजाशींत ऱ्हाईल. "

या स्वार्थी, दुष्ट पण सद्याला हर्षनिर्भर करणाऱ्या विचारांच्या भरांत तो झपझप पावलें टाकीत आलेल्या मार्गानें परत निघाला.

म्हादबा आणि मारुती मात्र या वेळीं त्याच्या मागोमाग गेले नाहींत. त्याचा पायरव थांबण्याची त्यांना वाट पहावयाची होती. पण थोड्याच वेळांत बाई बाई म्हणून हांका ऐकूं आल्या. मंजुळा गुहेच्या तोंडाशीं येऊन हांका मारीत होती. ओ येते कीं काय म्हणून ती जरा थांबली नंतर पहिल्यापेक्षां मोठ्यानें तिनें हांका मारण्यास सुरवात केली. पण फक्त तिच्या हांकेचे प्रतिध्वनि बरीक रानांत दुमदुमून परत येत होते. हळूं हळूं मंजुळेच्या हांका घाबरल्या आवाजांत उमटूं लागल्या. त्यांत रडणेंही मिसळलें. आणि शेवटीं धीर न निघून, सद्या गेला त्या वाटेनें ती पळत सुटली व सदोबा, सदोबा म्हणून हांका मारण्याचा तिनें सपाटा चालवला.

ती गेल्यावर म्हादबा हळहळून उद्गारला, " घात झाला रे मारत्या, घात झाला. मघां सळसळ वाजलं ना तवांच त्या बाईनं या दोघांचं बोलनं ऐकून ती निसटली असावी. पन बिचारी या रानावनांत कुठं जाणार? येकांद्या जनावराच्या तोंडीं पडली तर कसं व्हईल?"

" बाबा, गुलाम म्हून इकल्यावर देह जाळायाचा त्यापरीस जनावराच्या त्वांडी ग्येलेलं काय जास्त खराब हाये? असा जिवाचा मघां तिळपापड होत होता कीं त्या हरामखोराचं मानगूट पकडून त्येचा परान घ्यावा. हात असे वळवळताहेत. "

" खरं मारत्या, मलाबी तसंच वाटतं. पन आपला दुसरा मनसुबा हाये ना म्हनून जपायाचं. "

" पन बाबा, आतां कसं रं करायाचं? असंच परत जायाचं व्हय हात हालवीत. "

" जरा दम तर तूं. चल आमंदीं जाऊनशान बगूं तरी काय परकार हाये. मंग

जरा हिकडं तिकडं हुडकून बगूं. मग नाय गवासली तर जाऊं परत. तिचं नशीब असंल तसं व्हईल. कोन बाई हाये येव जानं."

गुहेंत कोणी नव्हतें. दगडी जमिनीवर कांहीं शिधासामुग्री पडलेली होती. बहुधा शिदूनेंच ती आणलेली असावी. देवळांतल्या कांहीं कोनाड्यांत मूर्ती कोरल्या असून त्या आतां हातातोंडाचें कळपे जाऊन भंगून गेलेल्या होत्या. पणतीच्या मिणमिण हलत्या प्रकाशांत त्या मूर्ती लहानमोठ्या बदलत्या आकारांच्या व मोठ्या भीषण दिसत होत्या. एकेक पिशाच्चच जणू तेथें बसून या दोघांच्या निष्फळ शोधाशोधीकडे पाहून विद्रूप तोंडें करून त्यांना भेवडावीत होतें.

" चल बा मारत्या भाईर. हथं काय धुंडायाचं ! भाईरच ती गेली न्हवं कां ? पर पनती घ्येईनास हातीं."

मारुतीनें पणती उचलून डाव्या हातीं घेतली व उजव्या हातानें वाऱ्याच्या झोतापासून तिचें रक्षण करीत तो बापाबरोबर बाहेर आला. मग दोघेजण झाडांच्या सांवल्यांनीं अधिकच अंधारगुडुप झालेल्या त्या किर्र भयाण रानांत पणतीच्या तुटपुंज्या उजेडांत शिदूच्या तावडींत सांपडलेल्या व आतां निसटलेल्या त्या अबलेला शोधूं लागले. वाळूंत सांडलेला एकादा धान्यकण शोधण्यापैकींच प्रकार होता तो !

बऱ्याच वेळानें ते दोघे बापलेक अपयश पत्करून घराकडे जाण्यास निघाले. पणतींतलें तेल संपून ती विझल्यामुळें त्यांनीं टाकून दिली होती. पण आतां नवोदित चिमुकली चंद्रकोर त्यांचा मार्ग थोडथोडा सुप्रकाशित करीत होती.

आणि—

निःशब्दपणें त्या रानांतून ते दोघे चालले असतां जवळजवळ अर्ध्या वाटेंत, शिद्या पाठीवर एक मोठी मोटळी घालून परत येत असून, मंजुळी त्याच्याबरोबर चालत आहेसें त्यांना दिसलें.

ती पाठीवरली मोटळी त्या दुर्भागी स्त्रीचीच असावी, ती या सैतानापासून दूर म्हणून सैरावैरां चालली असतां, दिशेचें भान न राहून नेमकी त्याच्या बाजूलाच गेल्यानें, आणि मंजुळेनें त्याला लवकर गांठून सावज पळाल्याची वार्ता दिल्यामुळें, तो तिच्या शोधांत असतांच त्याला ती अचानक सांपडली असावी इतका कयास म्हादबा आणि मारुती यांनीं एका क्षणांत केला, आणि मग मात्र मारुती पुढला

मागला विचार न करतां एकाद्या वाघानें मस्त बैलावर तुटून पडावें तसा शिद्यावर तुटून पडला.

शिद्या आणि मंजुळा या दोघांनीं म्हादबा व मारुती यांना पाहिलेंच नव्हतें. त्यामुळें हा अचानक हल्ला होतांच मंजुळेनें एक कर्णकर्कश किंकाळी फोडली. शिद्या तर इतका गांगरला कीं त्याच्या हांतून पाठीवरली मोटळी पडणार होती. पण म्हादबानें पुढें होऊन त्या पडणाऱ्या स्त्रीला सांवरलें.

चांगली दहा मिनिटें मारुती आणि शिद्या यांची झटापट चालली होती. शिद्या खरोखरीच एकाद्या मस्त बैलासारखा झुंझत होता.

मारुतीही कांहीं कमी नव्हता. आखाड्यांत त्यानें कुस्त्या जिंकलेल्या होत्या. त्यामुळें शेवटीं गुद्दे खाऊन खाऊन शिद्या अर्धमेला होऊन विवळत खालीं पडला. मारुती त्याला पुन्हां उठवून मारण्याच्या बेतांत होता. त्याच्या अंगांत रग आली होती. पण म्हादबा त्याच्या दंडाला धरून म्हणाला, "राहूंदे त्या शिंच्याला. या बाईला लवकर घरीं नेयाला हावं." नंतर शेजारीं थरथर कांपत उभ्या असलेल्या मंजुळेला त्यानें सांगितलें, "पोरी, शानी असलीस तर या शिद्याला पटकीवाणी टाळ अन् आपल्या घरीं जा. नायतर तुलाबी तो मुसलमानाला वोपूनशान पैसा मिळवील."

मंजुळा रडून म्हादबाच्या हातापायां पडूं लागली, आणि नंतर म्हादबा व मारुती त्या बेशुद्ध स्त्रीला पाठुंगळीं घेऊन चालूं लागले तेव्हां ती पण शिद्याला रानांत तसाच विवळत टाकून त्यांच्या मागोमाग गांवांत आली.

आपलें घर जवळ येतांच दयाळूपणानें म्हादबा म्हणाला, "पोरी बरी शहान्यावानी आलीस. आजची रात ऱ्हा इथं. मंग उद्यां जा आपल्या मानसांकडं."

तेवढ्यांत मंजुळेनें विचारलें, "कोन्या जातीचा तूं जनूं ?"

"जात व्हय ? तुज्या त्या सदोबा पाटलांच्या जातीचाच न्हवं का."

हें ऐकतांच नाक मुरडून मंजुळा तुच्छतेनें फणकारून म्हणाली, "हात म्येल्यांनों. चांगली मावळ्यामराठ्याची मी. आन् तुज्यावानी चांभाराकडं ऱ्हाऊं व्हय ? तूं बोलवणारा बी लई शाणाच दिसतोस कीं रं."

म्हादबा तिरस्कारानें नुसता हंसला. पण मारुती संतापानें देहभान हरपून बोलला, "मग जा × × मष्णांत. तें पल्याड तुज्या सदोबाचं घर हाय. त्यो दावील तुला वाट. जा. काळं कर. नायतर—"

त्याचा आवेश बघून मंजुळा जी घाबरून पळाली. आणि मग म्हादबा व मारुती आपल्या घरीं गेले.

कीर्ति, बाया, मारुतीची बायको आणि मुलगासुद्धां अत्यंत काळजींत जागत राहिले होते. अंथरुणावर पडूनही कुणाचा डोळ्याला डोळा लागला नव्हता.

त्या दोघांना या संकटांत घातल्याबद्दल कीर्ति स्वत:लाच दोष लावून घेऊं लागली होती.

तेव्हां म्हादबा आणि मारुतीची चाहूल लागतांच सर्वांना जो आनंद झाला तो अवर्णनीय आणि त्यांच्याबरोबर त्या सोडवून आणलेल्या स्त्रीला पाहून तर तो आनंद द्विगुणितच झाला. म्हादबानें त्या स्त्रीला जाजमावर ठेवतांच कीर्तीनें तांब्यांत पाणी आणून तिच्या तोंडावर शिंपडण्यास प्रारंभ केला. बायानें भिंतीची चिमणी हातीं घेऊन त्या स्त्रीच्या तोंडावर प्रकाश पाडला मात्र—

कीर्तीच्या हांतून तांब्या गळून पडला.

ती कांपऱ्या स्वरांत उद्गारली, " कोण लैलाताई ? "

" कीर्ति ! "

---

कीर्तीला पहातांच लैली एकदम उठून बसली आणि ताडकन् कपाळावर हात मारून घेऊन म्हणाली, " देवा, कशाला मला या जगांत आणलंस पुन्हां ? "

कीर्ति स्नेहभरानें तिच्या अंगावरून हात फिरवीत तिला पुन्हां निजवून म्हणाली, " लैलाताई, तूं त्या चांडाळाच्या हातीं सापडलीस तरी कशी ? आणि—आणि तुझ्याबद्दल जी अशुभ बातमी उठली ती कोणी उठवली आणि कां ? हे कोडं आहे तरी काय ? धारिणी, बायजाबाई आणि सर्वच मंडळी समजताहेत कीं तूं—तूं " पुढले शब्द न उच्चारतांच कीर्तीनें गोंधळून लयलेकडे पाहिलें.

लयला पडल्यापडल्याच आवेगानें म्हणाली, " मी मेलें म्हणून तीं सर्व समजताहेत ना ? मग तेंच चांगलं आहे तर. मी जगून कुणाचं काय चांगलं झालेलं आहे आणि होणार आहे ? धारिणी माझ्या दुःखाकडे पाहून आणि माझ्या जबाबदारीच्या ओझ्याखालीं दडपून जाऊन प्रेमळ अन् उत्तम स्वभावाच्या उदयाशींसुद्धां लग्न करीत नाहीं. माझ्यासाठीं ती येवढा जबर स्वार्थत्याग करते. आजी सारखी माझ्याकडे पाहून तळमळते. आणि—" लयलेच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या होत्या. पदरानें त्या पुशीत लयला गद्गद स्वरानें म्हणाली, " धनंजय माझ्या प्रेमांत गुरफटून खऱ्या संसारसुखाला आंचवत आहेत. मी जगण्यामुळें कुणालाच कांहीं फायदा नाहीं. म्हणूनच माझ्या मरणाची हूल उठवण्याचा व्यूह मी रचला. " कीर्तीचा आपल्या अंगावरला हात बाजूला झुगारून पुन्हां उठून बसून आवेगानें ती बोलली, " जाऊं दे मला कीर्ति, जाऊं दे मला इथून. "

पुन्हां लयलेला बायाच्या मदतीनें बळेनें निजवून कीर्तीनें रुष्टपणें निषेध करून विचारलें, " कुठें जाणार तूं लैले ? पुन्हां त्या शिवाचा फायदा करून द्यायला ? "

लैली शहारून उद्गारली, " नाहीं नाहीं. कीर्ति, या दोघांनीं मला त्या चांडाळाच्या हातून सोडवलं त्याबद्दल यांचे किती आभार मानले तरी ते अपुरेच ठरतील. त्यांचं ऋण जन्मभर फेडीन म्हटलं तरी फिटायचं नाहीं. पण खरंच कीर्ति, मला आपल्या वाटेनं जाऊं दे ना. "

" किती वेडी आहेस तूं लैले? तूं एकाकी स्त्री. एकटीनं आयुष्य कंठण्याचं धैर्य तुला आहे कां? आज तूं शिदूच्या हांतून सुटलीस तर उद्यां आणखी दुसऱ्या कुणा चांडाळाच्या हातीं सांपडशील. या वेळीं सुदैवानं आमच्या हातीं तूं सुरक्षित लागलीस, पण तूं दूर गेल्यामुळें तुझ्या संकटाची वार्ताच आम्हांला लागली नाहीं तर तुझी सुटका कशी व्हायची?"

कांहीं विचित्रच हंसून व चमत्कारिक दृष्टीनें कीर्तीकडे बघून लयला उत्तरली, " आतां पुन्हां असल्या संकटांत न सांपडण्याची मी पूर्ण काळजी घेईन."

कीर्तीनें चमकून विचारलें, " म्हणजे?"

" मी मृत्यूचंच साहाय्य मागेन."

लयलेच्या केसावरून हात फिरवीत कीर्ति ममतेनें म्हणाली, " लैलाताई, मृत्यूनं आधींच तुला साहाय्य करून ठेवलं आहे."

या शब्दांनीं जरा भानावर आल्याप्रमाणें लैलीनें विचारलं, " काय? मृत्यूनं मला साहाय्य करून ठेवलं आहे?" लगेच वेड्यासारखें हंसून तिनें म्हटलें, " माझ्या बाळाला माझ्यापासून ओढून नेऊन केवढे तरी उपकार केले त्यानं. माझा बाळ—अभिमन्यु—मनू, लवकरच येईन हं तुझ्या भेटीला मी."

या उद्गारांनीं कीर्ति स्तंभितच होऊन गेली. लयला भ्रमांत तर बरळत नाहीं ना असें प्रथम तिला वाटलें. मग निमिषांत पूर्वीच्या सर्व गोष्टी आठवून सर्व कांहीं तिच्या ध्यानीं आलें. पण तिनें लगेच मनाचा गोंधळ आंवरला. शांत, स्मितयुक्त मुद्रेनें व संथ स्वरानें, कीर्ति लयलेच्या दृष्टीला दृष्टी देऊन म्हणाली, " लैलाताई, तुझ्या बाळाला नेऊन मृत्यूनं तुला दुःख दिलं तरी त्यानं त्या बाळावर उपकारच केले असं म्हटलं पाहिजे. आयुष्यभर त्याला जन्माचा डाग लागला असता. त्या दृष्टीनं पहातां अभिमन्यू गेला हें बरंच झालं नाहीं कां?"

हा अगदीं नवीनच विचार पटल्याप्रमाणें मान हलवीत लयला उद्गारली, " हेंही खरंच!"

" शिवाय लैलाताई, ज्या प्रकारानं आपल्या मरणाची हूल उठवून तूं मृत्यूचं साहाय्य घेतलंस आणि यानंतर ज्याप्रकारें मृत्यूला कवटाळण्याचा विचार तुझ्या मनांत आलेला आहे त्या प्रकारांची आतां कांहींच जरुरी नाहीं. मी मघां म्हटलं त्याप्रमाणें मृत्यूनं खरोखरीच तुझ्यावर उपकार करून ठेवले आहेत. आतां तूं

जगल्यामुळेंच तुझ्या भोंवतालचीं प्रेमाचीं माणसं सुखी होणार आहेत. तुझ्या सुखाचा मार्ग मृत्यूनंच मोकळा करून दिलेला आहे. ''

अधिकाधिक विस्मयानें लयला कीर्तीचें भाषण ऐकत होती. नंतर अनावर उत्कंठेनें तिनें विचारलें, " काय म्हणते आहेस तूं हें कीर्ति ? " थरथरणाऱ्या हातानं कीर्तीचा हात दुखेइतका गच्च पकडून तो जोरानें हलवीत लहान मुलाप्रमाणें चिडक्या स्वरांत तिनें पुन्हां म्हटलें, " सांग सांग लवकर कीर्ति, काय झालं आहे ? "

ती गोष्ट लैलीला सांगण्यासाठीं कीर्तीही उत्सुक होती, परंतु त्या बातमीचा आघात सहन करण्याइतकी शक्ति लैलीच्या मेंदूंत सध्यां नाहीं असें तिच्या मानसिक आवेगावरून कीर्तीला समजून चुकलें. म्हणून ती म्हणाली, " सांगेन ती बातमी तुला. पण आतां तूं जरा विश्रांति घे. चांगली झोंप आली म्हणजे तुला बरं वाटेल. आम्हांलाही जागरणामुळं गांगरल्यासारखं झालं आहे. अन् हे दोघे तर—" जवळच बसलेल्या म्हादबा आणि मारुतीकडे मान वळवून कीर्तीनें म्हटलें. " अगदीं दमून गेले असतील. त्यांना आतां जागवणं बरं नव्हे. दोन घटका तरी त्यांना अंथरुणावर पडूं दे. पहांटे उठून पुन्हां त्यांना कामधंद्याला लागलं पाहिजे. "

लयला निराशेनें निश्वास टाकून आर्जवून म्हणाली, " पण तेवढं एकदोन वाक्यांत सारं सांगून टाकीनास. नाहींतर तें समजेपर्यंत माझ्या जिवाला घोर लागून राहील. सांग ना कीर्ति. "

" बरं सांगते. पण एका अटीवर. "

" कोणती अट ? " लयलेनें अधीरपणें विचारलें.

" आधीं तूं आपली सारी हकिगत मला मोकळेपणानं सांग बघूं. तूं या सदूच्या तावडींत कशी सांपडलीस आणि तुझ्या मृत्यूची हूल तूं कशी उठवलीस? धारिणीला पत्र कुणी पाठवलं ? "

नाइलाजानें लयला म्हणाली, " बरं तर सांगतें. " असें म्हणून तिनें सभोंवतीं बसलेल्या लोकांकडे दृष्टि फिरवून कीर्तीकडे साभिप्राय पाहिलें. कीर्तीनें त्यांतील अर्थ ओळखून सर्व मंडळींस तेथून जाऊन झोंपण्यास खुणावलें.

लयलेची हकिगत कळावी अशी उत्सुकता असूनही कीर्तीच्या खुणेबरोबर सर्व आपापल्या अंथरुणाकडे रात्रींच्या उरलेल्या तीनचार घटका घालवण्याकरतां गेले.

दिवसभरांच्या श्रमानें आणि काळजीनें थकलेल्या त्या माणसांना अंथरुणाला पाठ लावतांच झोपेनें घेरलें.

त्या शांत घरांत फक्त लयला आणि कीर्ति जागत राहिल्या. गतगोष्टींची जरा आठवण करून मग बसती होऊन लयला कांहीं एक आडपडदा न ठेवतां अतिशय मोकळेपणानें सांगूं लागली, व कीर्ति एकाग्र चित्तानें ऐकूं लागली.

लयलेच्या हकिगतीचा गोषवारा असा—

धारिणीनें सर्वांची समजूत करून दिल्याप्रमाणें लयलेला रक्तक्षयासाठीं गुरुरावांच्या शेतवाडीच्या गांवीं ठेवण्यांत आलें नसून गुरुरावांच्या निकट स्नेह्यांपैकीं एक सज्जन डॉक्टर मनमाडला यशस्वी तऱ्हेनें धंदा चालवीत असत त्यांच्या देखरेखीखालीं मनमाड नजीकच्या एका चांगल्या हवापाण्याच्या ठिकाणीं आडनांव बदलून, व खरी वस्तुस्थिति झांकण्यासाठीं कपाळीं कुंकुमतिलक लावून एक स्वतंत्र लहानसें घर भाड्यानें घेऊन, स्वैपाकपाण्यासाठीं एक कुळंबीण नेमून तिला ठेवण्यांत आलें होतें. डॉक्टर नेन्यांना मात्र सर्व खरी हकिगत माहीत असून लयला प्रसूत होतांच तिचें मूल तिजपासून तोडून, कुठेंतरी सुस्थळीं पैशाच्या मोबदल्यांत त्याचा योग्य तो सांभाळ होण्याची व्यवस्था करण्याचीही हमी त्यांनीं घेतली होती. लयलेला ही गोष्ट माहीत होती.

पण बाळंतपण जवळ येत चाललें तसतसें आपल्या मुलापासून आपण वेगळें होऊं नये अशी तीव्र इच्छा तिला होऊन, प्रसूतिसमय होतांच ठरल्याप्रमाणें दवाखान्यांत न जातां घरींच ती मोलकरणीच्या साहाय्यानें प्रसूत झाली.

तिला झालेला मुलगा हुबेहुब धनंजयासारखा सुदृढ अंगापिंडाचा असल्यामुळें तर या बाळाला आपण अंतरणार होतों या कल्पनेनें ती भयभीत झाली आणि आपण दवाखान्यांत गेलों नाहीं हें फारच चांगलें केलें अशी तिची खात्री झाली.

नंतर डॉक्टरांनीं कितीही समजूत घालण्याचे प्रयत्न केले, डॉक्टरांच्या पत्रावरून धारिणीनें स्वतः येऊन तिला परोपरीनें विनवलें तरी ती आपल्या बाळाला सोडण्यास तयार होईना. या लोकांनीं फार त्रास देऊं नये म्हणून लयलेनें धारिणीला आश्वासन दिलें कीं आणखी दोन महिन्यांनीं बाळ चांगला सशक्त झाला **कीं मी** त्याला दूर करीन. यामुळें लयलेला दोन महिने निश्चिंत काढतां आले. नंतर महिनाभर धारिणी व गुरुराव यांच्या वरचेवर येणाऱ्या समजुतीच्या पत्रांनीं व त्यांना थोपवून

धरण्यासाठीं, विनंत्या आर्जवें करून लिहाव्या लागणाऱ्या उत्तरांनीं लयला त्रासून गेली. धारिणी किंवा गुरुराव लवकरच स्वतः येऊन आपल्यापासून बळेंनें आपल्या बाळाला हिरावून घेतील अशी तिला धास्ती वाटूं लागली. मातृप्रेमानें कांठोकांठ भरून राहिलेल्या तिच्या हृदयांतील वात्सल्य दिवसादिवसाला दुथडी वाहून जात होतें. बाळ अभिमन्यूपासून केव्हांहीं आपणांला दूर होणें शक्य नाहीं, तेव्हां त्याला सोडण्याऐवजीं आपणच बाळासह नाहींसें व्हावें असा निश्चय करून तिनें एके दिवशीं मोलकरणीचा डोळा चुकवून घर सोडलें व रस्त्यानें जाणाऱ्या एका कडब्याच्या गाडीवरल्या गाडीवानाला थोडे पैसे देण्याचें कबूल करून त्या गाडींतून ती सकाळीं सहा कोसावरल्या एका गांवीं आली. तेथें एक दिवस एका शेतकऱ्याकडे मुक्काम करून ती पुन्हां एका गाडीवर चढून दुसऱ्याच गांवीं गेली. याप्रमाणें चारपांच गांवीं हिडत हिडत ती नांदवडानजीक एका गांवीं आली. धारिणीनें किंवा नेने डॉक्टरांनीं शोध केला तरी आपला पत्ता कुणाला लागूं नये, सर्व सुगावा पार पुसला जावा हाच लयलेचा उद्देश होता.

पण ज्या आपल्या अभिमन्यूसाठीं तिनें ही यातायात केली त्या अर्भकाला ती दगदग सहन न होऊन तोच आजारी पडला. त्याच्या पोटांत बिघाड होऊन जुलाबांनीं तो हैराण होऊन गेला. आणि शेवटीं वैद्याचे उपचार निरुपयोगी ठरून आपल्या आईला दुःखसागरांत लोटून मनूबाळ स्वर्लोकीं निघून गेला.

लयलेला त्या दुःखानें वेड्यापिशासारखें होऊन गेलें. तिला अन्नपाणी नकोसें झालें. तिच्या मनानें हाय खाऊन ती आजारी पडली.

वासंब्याला लयला आल्यापासून तिनें मंजुळेला नोकरीला ठेवली होती. अभिमन्यूच्या आजारांत आणि नंतर लयलेच्याही आजारांत तिनें मनापासून प्रेमळपणानें सेवाशुश्रूषा करून लयलेला धीर दिला त्यामुळें लयलेचा तिच्यावर फार विश्वास बसला.

आजारीपणांत लयलेच्या विचारांना पूर्ण वाव मिळाला व त्याच वेळीं तिनें ठरवून टाकलें कीं जगाच्या दृष्टीनें आपण मेलों तर सर्वांनाच ती गोष्ट सुखाची होईल. आतां घरीं परत जाऊन तरी आपण काय करणार ? आपल्या अभागीपणानें दुसऱ्याच्या सुखांत बिब्बाच घालणार कीं नाहीं ? त्यापेक्षां मोलमजुरी करीत तीर्थक्षेत्रांचें दर्शन करून पापक्षालन तरी करावें.

लयलेनें मग एक बेत ठरवला व मंजुळेलाही त्यांत सामील करून घेतलें. त्या बेतापासून मालकिणीला परावृत्त करण्याचा मंजुळेनें प्रयत्न केला, पण ती ऐकत नाहींसें पाहून व द्रव्याच्या लोभानें लयलेनें सांगितल्याप्रमाणें सर्व कांहीं करण्याचें तिनें आश्वासन दिलें इतकेंच नव्हे तर सर्व बनाव तिनें यशस्वी रीतीनें पारही पाडला.

वासंब्यापासून बऱ्याच दूर असलेल्या एका गांवीं जाऊन तेथल्या धंदेवाईक पत्रें लिहिणाऱ्यापासून तिनें एक पत्र लिहून घेतलें. त्यामध्यें लयलाबाई या नांवाच्या बाई दोन दिवसांपूर्वी वारल्याची बातमी लिहिलेली होती.

तें पत्र पोंचतांच धारिणी त्या गांवीं आली. बहिणीची मध्यंतरीची हकिगत तरी कळावी हाच तिचा येण्याचा उद्देश होता.

पण लयला त्या गांवीं कधींच गेली नव्हती तर धारिणीला तिचा शोध लागणार कसा? लयला नाहींशी झाल्यापासून नेन्यांच्या मदतीनें तिनें तपास चालवलाच होता आणि आतां तिचा पत्ता लागला तो तिचें मृत्यूचें वर्तमान कळण्याकरतां आणि पुन्हां गौडबंगाल निर्माण करण्याकरतां!

धारिणी दुःखजड व निराश अंतःकरणानें परत मुंबईला गेली, आणि गुरुरावांच्या सल्याप्रमाणें पोलिसांत कळवून गुप्त शोध तिनें चालू केला.

निदान मंजुळेनें तुमच्याकरतां पोलीस शोधाशोध करताहेत अशी शेजारच्या गांवच्या पाटलाला वर्दी लागली आहे व ती त्या पाटलानें सहज मला सांगितली अशी बातमी लयलेला सांगून तिला घाबरून सोडलें, आणि मग धीराच्या गोष्टी सांगून तो पाटील फार चांगला आहे, तो तुम्हांला पोलीसच्या स्वाधीन करणार नाहीं उलट तुम्हांला चारआठ दिवस सुरक्षित ठिकाणीं लपवून ठेऊन मग पोलिसांचा वास कमी झाला कीं गुप्त रीतीनें तेथून काढून नेऊन तुम्हांला दूर गांवाला पोंचती करील अशा गोड गोड भुलथापा सांगितल्या.

कीर्ति व लयला यांनीं तर्क केला कीं सदू आणि मंजुळा यांची पायतणें घेण्याच्या निमित्तानें आणि जवळच्या गांवीं रहात असल्यामुळें बरीच ओळख असावी. नंतर सदूनें, लयला अचानक या गांवांत एकाकी येऊन राहिल्याबद्दल संशय येऊन मंजुळेकडून तिला हळूहळू पैसे चारून सर्व हकिगत काढून घेतली असावी आणि

आणखी पन्नास रुपयांच्या आशेनें आपल्या दुष्ट बेताला तिला अनुकूल करून घेतली असावी.

मंजुळेवर दृढ विश्वासून असलेली लयला तेव्हांच फसली आणि मंजुळेबरोबर ती सरळ आपल्या पायांनीं चालत जाऊन सदूच्या बंदीखान्यांत पडली. तीन दिवस तिनें तेथें घालवले. शिदू जेव्हां पहिल्या दिवशीं शिधा घेऊन तेथें गेला तेव्हां त्याला पाहूनच लयलेचा त्याच्यावरला विश्वास डळमळला. आणि हळूं हळूं मंजुळेबद्दलही तिला निर्धास्त वाटेना. म्हणूनच सदू जायला निघाला कीं मंजुळा त्याच्याशीं काय बोलते हें ऐकण्याविषयीं कुतूहल वाटून तिनें त्यांच्यावर पाळथ ठेवण्याचें ठरवलें. पुन्हां सदू तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आला आणि शिधा देऊन अजून दोन दिवस कुठं जाणं बरं नव्हे, पोलीस अजून जवळपास मागावर आहेत असें सांगून तो जाऊं लागला व नित्याप्रमाणें मंजुळा त्याच्याशीं बोलण्याकरतां बाहेर आली तेव्हां अंधाराचा फायदा घेऊन लायलाही बाहेर येऊन एका झाडाआड होऊन ऐकूं लागली.

जें काय तिच्या कानावर पडलें तें इतकें भयंकर होतें कीं त्या दोघांच्या हातून निसटून जाण्यासाठीं ती पळत सुटली.

किती वेळ तरी भीतीनें वेडावल्यासारखी होऊन ती पळत होती. आणि आतां आपण त्या सैतानाच्या तडाक्यांतून पुरत्या सुटलों असें वाटून ती जरा दम खायला उभी रहाते तोंच समोर सदू व मंजुळा तिला दिसून तिनें एक किंकाळी फोडली व ती बेशुद्ध होऊन पडली. पुढें काय झालें तें लयलेला कांहींच ठाऊक नव्हतें. येवढी हकिगत सांगून लयला स्वस्थ राहिली.

लयलेची हकिगत संपली तेव्हां दिशा फांकून कोंबडा आरवूं लागला असून जवळच्या रहाटाची घरघर मधून मधून ऐकूं येऊं लागली होती. मारुतीची बायको अंगणांत शेणसडा टाकीत होती त्याचा बुडबुडू व सडसड आवाज आळीपाळीनें चालला होता. जवळपास जात्याची घरघर ऐकूं येत असून, बाया स्वैपाकघरांत गोवरी लावून विस्तव पेटवीत फूं फूं करीत होती.

हकिगत ऐकल्यावर कांहीं वेळ कीर्ति निरनिराळ्या विचारांत गर्क होऊन गेली. नंतर ती उद्गारली, " केवढ्या घोर संकटांतून बचावलीस तूं लैलाताई ? "

लयला कृतज्ञतेनें हंसली, मग तिनें म्हटलें, " माझ्या सुटकेचं श्रेय तुझ्याकडेच आहे कीर्ति. पण तुला माझा पत्ता लागला कसा ? "

कीर्तीनें लयलेला थोडक्यांत सर्व हकिगत सांगितली.

ती ऐकून घेतल्यावर लयलेनें अनुनयानें विचारलें, " आतां सांगतेस ना, मघांशीं काय सांगणार होतीस तें ? "

कीर्तीला तिच्या त्या अधीर प्रश्नाचें हंसूं आलें पण लगेच ती गंभीर झाली. क्षणभर विचार करून ती बोलली, " लयलाताई, एका परीनं ती गोष्ट तुला सर्वस्वी सुखदायक असली तरी ती ऐकून तुला दुःखही होणार आहे हें लक्षांत असूंदे. "

या प्रस्तावानें लयला बुचकळ्यांत पडली व अधिकच कुतूहलानें म्हणाली, " आहे तरी काय ही अशी बातमी ? "

" ऐक तर. चार दिवसांपूर्वीच मला धारिणीचं पत्र आलं. त्यांत तिनें बातमी लिहिली होती कीं तुमच्या प्रभाताईचे पति विक्रमसिह हे अर्धांगवायूनं आजारी पडून दोन झटके येऊन आठ दहा दिवसांपूर्वीच वारले. "

" आई ग. प्रभाताईवर केवढा हा प्रसंग कोसळला आहे. " लयला दुःखावेगानें बोलली.

कीर्ति स्वयंस्फूर्त प्रशंसेनें तिजकडे बघत बोलली, " लैलाताई, प्रभाताईच्या दृष्टीनं ही गोष्ट वाईट झाली असेल. पण तसा नीट विचार करून पाह्यलं तर तिचा संसार झालेला आहे. आणि लयलाताई, तुझा संसार अजून व्हायचा आहे. "

" माझा ? अन् संसार ? " ते दोन शब्द एकत्र विसंगत वाटत असल्याप्रमाणें लयलेनें त्यांचा कांहीं विचित्रपणेंच उच्चार केला.

" होय. तुझा संसार ! आतां तुझ्या अन् बॅ. धनंजयांच्या लग्नाला अडचण राहिली कुठें ? "

कांहीं विचार मनांत येऊन भयचकितपणें लयला उद्गारली, " पण धनंजयांचं अजून माझ्यावर प्रेम असेल कां ? मी जी सर्वांची फसवणूक केली त्यानं त्यांचं मन माझ्या बाबतींत विटणार तर नाहीं ना ? "

" मुळींच नाहीं. तूं कोणत्या हेतूनं ती लबाडी केली असावीस याची सर्वांना जाणीव आहे. त्याबद्दल तुझ्याविषयींचा सर्वांचा प्रेमादर द्विगुणित मात्र झाला."

" होय ?"

" होय ! लयला, धनंजय स्वतः जातीनं तुझा शोध लावण्याकरतां मनमाडला आले आहेत."

लयला आनंदभरानें म्हणाली, " माझा शोध करताहेत ते ? अन् इतक्या जवळ आले आहेत ?"

" आणि पंचवीस तारखेला म्हणजे-म्हणजे उद्यांच कीं-उद्यां कुठलं ? आजचा दिवस उजाडलासुद्धां. आज ते इथं मला भेटायला म्हणून येणार आहेत."

लयलेनें हर्षभरानें हात जोडले, " परमेश्वरा, हें सर्व निव्वळ सुखमय स्वप्न ठरूं देऊं नको."

इकडे ते शब्द ऐकत असतांच कीर्ति कांहीं चमत्कारिकच उदास हंसून मनाशीं म्हणत होती, " एकूण काल एप्रिलची चोविसची तारीख होऊन गेली तर. काल आमच्या लग्नाचा वर्षदिवस !"

लयला धनंजयाबरोबर मुंबईला गेल्याला चार दिवस झाले होते. ती मुंबईला पोंचल्यावर धारिणीनें आनंदानें कांठोकांठ भरून गेलेल्या हृदयानें आणि कीर्तीनें आपली बहीण आपल्याला परत मिळवून दिल्याबद्दल कृतज्ञ बुद्धीनें जें पत्र पाठवलें होतें त्यांतच असें लिहिलें होतें कीं, दादासाहेब पंधरा दिवस थोडे आजारी होते पण आतां हिंडूंफिरूं लागले आहेत. अर्थात् काळजी करण्याचें कांहींच कारण नाहीं. तूं काळजी करीत बसशील, घाबरशील म्हणूनच त्यांनीं ही गोष्ट तुला अगोदरच कळवली नव्हती.

पण कीर्तीला उगीचच काळजी वाटूं लागली. आणि मग दुसऱ्या दिवशीं रात्रीं सर्व मंडळी जेवावयास बसलीं असतां कीर्तीनें बाया आणि म्हादबा यांच्याकडे आळीपाळीनें पाहून म्हटलें, " परवां जाऊं कां मी मुंबईला ? इथें आतां सगळं स्थिरस्थावर झालेलं आहे. तेव्हां आठ पंधरा दिवस मी तिकडे जाऊन आलें तरी चालेल मला वाटतं. "

बाया चिंचेचें सार कीर्तीच्या वाटींत वाढीत ममतेनें हंसून संमतिदर्शक मान हलवून म्हणाली, " जा बरं बाई. निचिंत मनानं ममईला राहून ये. तुजा बापूस शीक हाय, तर तुला इथं कसं ग्वाड लागंल ? "

म्हादबा मोठ्या आदरानें कीर्तीकडे पाहून कीर्तीच्या बेताला अनुमतिदर्शक बोलला, " ताई, इथली कायबी आतां काळजी नाय. परवांच्या दिशीं आपुन चांगलीच जितली. सावज हातचं गमावलं म्हून तो सद्या आपल्या दोस्ताला सांगायासाठीं आपल्या ठरल्याजागीं ग्येला तर तुज्या सांगन्या बरहुकूम आपन अदुगरच बाटाया निघालेल्या चार म्होरक्या लोकांना वर झऱ्याजवळ न्येऊन बसवलं आन् सद्याममद्याचं काळंबेरं आपसूक त्येंच्या कानीं पडलं. ताई, तुजी कल्पना लई ब्येस व्हती. भडाभड त्येच्या त्ये दिशीं समद्या लोकांनीं बायामानसांनिशीं चांदवडच्या खंडूबाचा भंडारा लावून आणभाक क्येली कीं आमी आमच्या धर्माला जागूं. "

" ताई, येकेकाची आणभाक ऐकतांना असा जीव थरारून निघाला म्हणतेस. " तो उदात्त देखावा स्मरत असून पुन्हां स्फुरण आल्याप्रमाणें अभिनय करून मारुती बोलला. " आपल्या शिवाजी महाराजांच्या येळीं येकेका जवान गड्यानं आपल्या देशासाठीं, धर्मासाठीं जीव कुर्बान करून अशाच आणाशपथा घेतल्या असतील नाय ?"

या भाषणानें सर्वांचींच मनें थरारुन गेल्यामुळें नंतर दोन चार क्षण कुणीच कांहीं बोलले नाहींत.

मग दुसराच कांहीं विचार मनांत येऊन कीर्ति म्हणाली, " त्या मंजुळीचा कांहींच पत्ता नाहीं कां ? "

" नाय बा. " म्हादबानें सांगितलें. " ती कांई आपल्या गांवीं ग्येलेली नाय. माझा कयास हाये कीं सद्यानं पुन्हां भुलथापा देऊन तिला शेवटीं फसवली असल. कुठ असंल त्ये तिलाच ठावं. "

" ब्येस झालं. पिडा गेली. " मारुती म्हणाला. " मरंनाका ती तिकडं. तिच्या-वांचून काय जग सुनं पडायाचं हाय ! "

" अरं पन कशी झाली तरी येक आवा हाये ना ती. " बाया म्हणाली.

" आवा ? " मारुती तुच्छतेनें हंसत म्हणाला. " पुतनामावशी म्हन तिला तर, इसवासघातकी, फितूर बया. आवा पडली म्हून नायतर त्या सद्यावानी तिला ठोकलं असतं. "

यावर आपले ओष्ठद्वय नापसंतीनें मुडपून कीर्ति म्हणाली, " पण आपल्या धर्माशीं विश्वासघात करणार नाहीं अशी शपथ सदू घेईना तेव्हां चिडलेल्या लोकांनीं मारमारून त्याला शपथ घ्यायला लावली तें नाहीं बाई मला आवडलं. "

" खरं हाये ताईचं म्हननं. त्यो सद्या सांपाच्या जातीचा हाये." बाया म्हणाली.

" म्हनून त्याला पुरता ठ्येचाया हवा होता. त्या दिशीं रातपारीं पारठाण्याच्या रानामंदींच म्यां त्याचा जीव घ्यायाला हवा होता. पन बाबानं मला आडवलं." मारुती आवेशांत नाराजी दर्शवीत म्हणाला.

त्यावर शांतपणें हंसून म्हादबा म्हणाला, " अरं माज्या येड्या, हा काय आपल्या शिवाजीम्हाराजांचा काळ न्हाई कीं हिंदुधर्माशीं इसवासघात करील त्येचं हातच्या तरवारीनं शीर उडवायाचं नायतर सातमाळ्यावरून कडेलोट करायाचा. त्या काळीं मर्दुमकी करनाऱ्याला कलगी तुरा मिळायाचा, मुसलमानाकून गड जिंतणाऱ्याला मनसबदारी मिळायाची. पन मारत्या, आतांच्या काळीं या सद्या-सारख्या लोकांनाच मानमरातब मिलन्याचे दीस हायेत. "

" खरं रं खरं बाबा. " आपल्या दांताखालीं सद्याची नरडी असल्याप्रमाणें, नाचणीच्या भाकरीचा तुकडा कचाकचा खात मारुती चवताळून म्हणाला, " त्येचा

काय नेम ! उद्यां हा सद्या मोठ्या गवन्येराच्या खुर्चीला खुर्ची लावून मायदेशाला कसं सुधरावं म्हनून बातचीत करीत बसायाचा. ”

मारुतीच्या कल्पनेची ही भरारी ऐकून कीर्ति इतकी हंसूं लागली कीं तिच्याबरोबर मग म्हादबा, बाया, स्वतः मारुती आणि त्याची बायको व मुलगा गोट्या हे सुद्धां हंसत सुटले. तें लहानसें घर हंसण्यानें थोडा वेळ दुमदुमून गेलें. ही गडबड ऐकून वाघ्याही जोरजोरानें भुंकूं लागला अन् मग कोंबड्यांचें क्कक्क क्कक्क व बकऱ्यांचें बें बें यांनींही मोरे कोलाहल करून सोडला.

कीर्ति जायची हें कळलें तेव्हां सर्वांनाच फार वाईट वाटलें. नांदवडच्या व जवळपासच्या गांवांत बातमी पोचतांच कित्येक लोक तिला भेटायला आले आणि कित्येकांनीं तिला निरोप पाठवला, कीं मुंबईला जाऊन तिकडल्याच होऊं नका. इकडे परत या. तुमच्या मदतीवांचून आमच्या गांवांची सुधारणा पुढें कशी चालू रहाणार ?

कीर्तीनें त्या सर्वांना मी अगदीं लवकर परत येईन असें आश्वासन दिलें. पण तें आश्वासन देतांना व घेतांना पुढील खेदजनक घटनांची कुणाला काय कल्पना होती ?

सदू म्हणजे दुखवलेला साप असून तो दंश घ्यायला नुसता टपला होता !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कीर्ति निघाली तेव्हां बायानें कीर्तीला अष्टांगभेट देऊन म्हटलें, “ ताई, तूं चाललीस पन आमांला चटका लावून चाललीस कीं ग. समद्यांनला लई जीव लावलास. आमच्या गरिबाघरली कोंडाभाकरबी गोड करून घेतलीस. आमां अनाड्यांचा कंटाळा केला नाईस. ममईला आमी आलतों तर आमांला वाटलं ही नुसती दिखाऊ मड्डम हाये झालं. पन् बाई, बापावानीच चांगली निघालीस तूं. लई आनंद वाटतो. ” म्हाताऱ्या म्हादबानें कीर्तीच्या कर्तबगारीबद्दल आणि चतुराईबद्दल धन्यवाद काढले. गोट्यानें तर कीर्तीला बिलगून आकांत चालवला आणि, मला ममईला ने म्हणून भुंगाणा लावला. त्याची आई त्याला समजावीत स्वतः पदराला आंसवें टिपीत होती.

त्यांची समजूत घालतां घालतां कीर्तीला पुरेवाट झाली आणि शेवटीं तिच्या ट्रंका मोटरस्टँडवर नेण्याकरतां डोईवर घेण्याच्या वेळीं अत्यंत सद्गदित कंठानें मारुती जेव्हां तिला म्हणाला, “ ताई, चाललीस तूं आमांला सोडून ? लई जड वाटतंया ग, ” तेव्हां मात्र कीर्तीनें इतका वेळ आंवरून धरलेलें रडें एकदम हुंदक्याच्या रूपानें बाहेर पडलें.

कीर्ति मुंबईला आली तेव्हां दादासाहेब चांगले हिंडतफिरत होते. पण कीर्तीला ते बरेच थकलेले दिसले. याबद्दल तिला जितकें आश्चर्य वाटलें तितकीच भीतीही वाटली. तिनें आजाराविषयीं प्रश्न विचारून विचारून दादासाहेबांना आणि डॉक्टरना पुरेसें करून सोडलें. आणि डॉक्टरांनीं जेव्हां सांगितलें कीं दादासाहेबांचा आजार शारीरिक नसून मानसिक असावा म्हणून तेव्हां तिला विलक्षण विस्मय वाटला.

डॉक्टरांच्या या निर्णयाबद्दल कीर्तीला जसें नवल वाटलें तसेंच, दादासाहेबांनीं तिच्या अंगावर सोपवून दिलेलें कार्य त्यांच्या अपेक्षेपेक्षांही लवकर आणि सर्वतोपरी उत्कृष्ट बजावलें याबद्दल त्यांनीं तिची जी वरचेवर प्रशंसा केली ती ऐकतांना तिला नवल वाटूं लागलें.

दादासाहेब प्रशंसा करतात म्हणून तें नवल नव्हतें तर त्या प्रशंसेंत कल्चर मोत्याप्रमाणें हृदय नव्हतें; तर वरल्यावर असलेला दिखाऊ, झगझगीत पाण्याचा, वाटोळा, सुबकसा शाब्दिक पापुद्रा मात्र होता असा तिला भास होत होता म्हणून.

आपलें या महिन्यांत कुठें काय चुकलें हें विचार करूनही तिला समजेना.

कौस्तुभाचें आणि आपलें किती तुटलेलें आहे हें कळल्यामुळेंच तर या महिन्यांत त्यांना मानसिक त्रास नसेल ना झाला?

पण कांहीं असलें तरी आपल्या गांवाकडे जाऊन आपण जें कार्य केलं त्याबद्दल त्यांना खरें समाधान कां वाटूं नये?

कीर्तीला कसें समजणार कीं दादासाहेबांनीं तिला ध्येयाच्या मार्गावर सोडली त्यांत त्यांचा दुहेरी हेतू होता आणि कीर्तीनें त्यांतील फक्त एकच भाग यशस्वी केला होता म्हणून? मार्गामध्यें जे इतर प्रवासी असतील त्यांच्याबद्दल मनांत आदरभाव बाळगून त्यांना मदत करणें व प्रेक्षणीय स्थलें पाहून फलपुष्पांचा आस्वाद घेतांघेतां, खांचखळग्यांतून, कांट्यांकुट्यांतून आपापली वाट चालत असतां सहानुभूतीनें आनंदाची देवघेव करून तो द्विगुणित करणें आणि दुःखांत समभागी होऊन तें हलकें करणें या गोष्टींकडे लक्षही न देतां कीर्ति सरळ आपल्या मार्गानें चालली होती.

कौस्तुभाच्या ध्येयवादित्वाबद्दल तिला आदर वाटत असेल पण त्यांत त्याला मदत करावी, त्यांत सुहृदाप्रमाणें आनंद मानावा, निदान सहानुभूति तरी बाळगावी अशी कीर्तीची मनोभूमि तयार झाली होती काय ? कीर्तीच्या कोणत्याही पत्रांत असा उल्लेख नव्हता. तीं पत्रें फक्त तिच्या स्वतःच्या कार्याच्या विस्तृत वर्णनांनीं भरलेलीं असत. त्यांत अहंभाव यत्किंचित् नव्हता, फक्त यशस्वितेमुळें वाटणारा आनंद होता. कौस्तुभाच्या ध्येयवादित्वाबद्दल, ध्येयाच्या त्याला वाटणाऱ्या आकर्षणाबद्दल आतां मला नवल वाटत नाहीं किंवा वाईटही वाटत नाहीं, आतां माझ्या आयुष्याचें ध्येय मला सांपडलें आहे, तुम्हीच तें मला दाखवून दिलें आहे असें तिनें नांदवडला गेल्यावर दुसऱ्याच आठवड्यांत लिहिलें होतें परंतु कौस्तुभाच्या ध्येयवादित्वाशीं समरस होण्याची तिला मुळींच इच्छा नव्हती. आपला ध्येयमार्ग किती लांबवर गेलेला आहे याची तिला त्यावेळीं कल्पना नसली तरी आतां आली होती.

पण तरीही धैर्यानें एकटीनेंच पुढें जाण्याचा निश्चय ती बोलून दाखवीत होती.

आपला आणि कौस्तुभाचा मार्ग एकच आहे हें तिला पटावें, कौस्तुभाच्या हातांत हात घालून तिनें तो मार्ग आनंदानें आक्रमावा ही दादासाहेबांची इच्छा नकळत तिनें पायदळीं टाकली होती.

दादासाहेबांची मनस्थिति म्हणूनच बिघडली होती. कीर्तीच्या सुखाकरतां ते आपलें हृदय तिच्या हातावर काढून द्यायला तयार होते, काय वाटेल तें करायला तयार होते.

पण काय करावें हेंच न समजून ते चिंतानलांत पोळत होते.

* * *

अशा मानसिक वावटळींत दोघांचीं मनें सांपडलीं असतांच मारुतीचें नांदवडाहून पत्र आलें कीं, नांदवड आणि आसपासच्या भागांत पुन्हां अत्यंत गंभीर परिस्थिति निर्माण झाली असून सवड असल्यास स्वतः दादासाहेबांनींच पुन्हां एकदां यावें अशी विनंती त्या पत्रांत केली होती.

लोकांत दोन तट पडले होते.

जे लोक धर्मत्याग करायला निघालेले होते त्यांनीं शपथा घेतल्या असूनसुद्धां कांहीं अविचारी लोक त्यांना वाळींत टाकल्याप्रमाणें वागून त्यांची वेळीं अवेळीं

धर्मबुडवे म्हणून कुचेष्टा करूं लागल्यामुळें ते सर्व लोक भयंकर चिडले होते. म्हादबासारख्या लोकांनीं दोन्हीं बाजूंच्या लोकांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगून सर्व मिटवून टाकण्याचा प्रयत्न केला परंतु या दुहीचा फायदा शिदूनें ताबडतोब घेतला.

कीर्ति मुंबईला गेल्यानंतर पंधराच दिवसांत पूर्वीपेक्षांही सर्व वातावरण बिघडून गेलें होतें.

दादासाहेबांनीं ताबडतोब जाण्याचें ठरवलें. कीर्तीही मी येते म्हणून म्हणूं लागली.

तूं यावेळीं येऊं नको म्हणून दादासाहेब तिला सांगत होते पण कीर्तीनें शेवटीं त्यांचें मन वळवलें. दादासाहेबांनाही वाटलें कीं खरंच ही तेथें राहून आलेली आहे तेव्हां लोक हिचं ऐकतीलही !

आणि बांधाबांधीला सुरवात होतांच कीर्तीच्या बरोबरीनें ड्यूकनें जेव्हां येण्याचा हट्ट धरला तेव्हां त्याची कशी समजूत घालावी तेंच कुणाला समजेना.

दादासाहेब कुठें शेजारच्या गांवीं गेले तर ड्यूकला नेत असत. पण यावेळीं ड्यूकला नेणें त्यांना शक्य वाटेना.

ड्यूकनें गळा काढून रडण्यासच आरंभ केला, तेव्हां सर्वांनाच विलक्षण वाटूं लागलें. खाऊं, गोड बोलणें, मार कशानेंही तो ऐकेना. दादासाहेबांना तो सोडीनाच.

तेव्हां कांहींतरी चमत्कारिक वाटून कीर्ति म्हणाली, " दादासाहेब, तुम्ही नकाच येऊं. मी एकटीच जातें. "

" छेः तसं कसं चालेल ? मला गेलंच पाहिजे. मला वाटतं तूंच इथं राहून ड्यूकला संभाळीनास ? "

कीर्ति निर्धारानें म्हणाली, " या खेपेला येतेंच मी. नी आपण ड्यूकलाही नेऊं या. कारनं जाऊं म्हणजे झालं. "

आपल्याला न्यायचें हें समजतांच ड्यूकनें शेपूट हलवून दादासाहेब, व कीर्ति यांच्या अंगावर उड्या मारून, लाडकेपणीं गुरगुरून आपला आनंद व्यक्त केला.

---

चांदवड भागांत खरोखरच फार गंभीर वातावरण निर्माण झालेलें होतें. घराघरांत आणि चावडी देवळांतून एकच विषय धुमसत होता. ज्वालामुखींतून प्रथम येणाऱ्या नुसत्या धुरांच्या लोटांप्रमाणें खोडसाळपणाचे विचार सर्वत्र फैलावले असून हळूंहळूं त्या विचारांचें रूपांतर खोडसाळ क्रियांमध्यें होऊं लागलें होतें.

दादासाहेब आणि कीर्ति यांनीं तेथें जातांच गांवोगांवीं हिंडून लोकांना जमवून ही यादवी थांबवा म्हणून कळकळीनें व्याख्यानें देण्यास सुरवात केली. त्यांचीं व्याख्यानें अत्यंत परिणामकारक होऊन वातावरण भडकलेल्या आठ गांवांत हवा निवळली होती.

पण दोनतीन गांवांत शिदूवगैरेंचें वर्चस्व अजून जोरांत होतें.

यांपैकीं नांदवडशेजारच्याच एका गांवीं दादासाहेब एके दिवशीं लोकांना जमवून व्याख्यान देत असतांच अचानक दंगल माजली. शिदूनेंच ती चिथावणी केलेली होती. थांबा थांबा म्हणून दादासाहेबांनीं पुष्कळ ओरडून सांगितलें पण व्यर्थ. उलट दगडविटांचा मारा होऊं लागला. तेव्हां म्हादबा, मारुती वगैरेंनीं, कीर्तीला व दादासाहेबांची अनिच्छा असतां त्यांनाही त्यांच्या जवळच उभ्या असलेल्या मोटारीकडे मोठ्या शिकस्तीनें नेलें. ड्यूक मोटारींतच होता. दंगल चालू असतां मोठमोठ्यानें भुंकून चाललेल्या प्रकाराबद्दल तो निषेध व्यक्त करीत होता. किंवा आपल्या मालक मालकिणीला तो जोरजोरानें भुंकून धोक्याची इशारत देऊन लवकर परत या म्हणून सांगत होता कीं काय कोण जाणें !

कीर्ति सुरक्षित मोटारींत चढली आणि पुन्हां कांहीं बोलण्यासाठींच कीं काय दादासाहेब जरा थांबून मागें वळून थांबा थांबा म्हणून दोन्ही हात वर करून म्हणतात तोंच कुणीतरी नीच चांडाळानें आंब्यायेवढा एक दगड त्यांच्या रोखानें मारला.

पण डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों ड्यूकनें मध्यें झेंप घातली. क्षणाचा विलंब झाला असता तर तो दगड नेमका दादासाहेबांच्या डोक्यावर आपटला असता; परंतु ड्यूकनें तो प्रसंग टाळला !

आपल्या प्राणांची पर्वा न करतां ड्यूकनें तो दगड आपल्या अंगावर घेतला. दादासाहेब वांचले. परंतु त्यांचा आवडता ड्यूक मात्र त्या धोंड्याला बळी पडला. दगड नेमका डोक्याला लागल्यामुळें त्याची कवची फुटून भयंकर रक्तस्राव होऊं लागला.

धोंडा लागतांच ड्यूकनें जी मर्मभेदक किंकाळी फोडली ती दादासाहेब आणि कीर्ति यांचें हृदय भेदून गेली.

ज्या भेकडानें दादासाहेबांच्यावर दगड मारला होता तो शिद्याच होता. त्याच्या-भोंवतीं लोकांनीं गराडा घालून त्याला कुबलून काढण्यास सुरवात केली होती. त्याच्याबरोबर दंगल करणारे लोक त्याच्या मदतीला न येतां पसार झाले होते. दादासाहेबांनीं ओरडून, सोडून द्या त्याला, म्हणून करड्या आवाजांत सांगतांच मारणारे लोक थांबले व शिदू मातींत लोळणारें मुंडासें उचलून खालीं मान घालून चालता झाला. एकवार त्यानें खुनशी नजरेनें दादासाहेबांकडे पाहिलेंच.

पण तिकडे लक्षही न देतां दादासाहेबांनीं मातींत विवळत पडलेल्या ड्यूकला हलक्या हातांनीं उचलून गाडींत मागल्या बाजूला अलगद निजवलें. कीर्ति व ते त्याच्या समोरच्या दोन बैठकी उघडून बसले.

"चांदवडच्या गुरांच्या दवाखान्यांत चल. क्षणही गमवूं नको." अशी शोफरला आज्ञा करून दादासाहेब आपल्या उपरण्यानें ड्यूकचा रक्तस्राव थांबावा म्हणून प्रयत्न करूं लागले.

डोळ्यांतून अश्रुधारा चाललेल्या असतांच कीर्ति त्यांना मदत करूं लागली. ड्यूकचें विवळणें व मालकमालकीण आपल्या करीत असलेल्या शुश्रूषेबद्दल आत्यंतिक कृतज्ञता दाखवण्यासाठीं हलकेंहलकें शेपूट हलवणें चालूंच होतें. आपण आपल्या मालकाचे प्राण वांचवले आहेत याची त्याला जाणीवच नव्हती. त्याच्या प्रेमानें ओसंडून बघणाऱ्या दृष्टीला दृष्टी देववत नव्हती इतकी ती कारुण्यानें हृदयाला पीळ पाडीत होती.

दवाखान्यांत डॉक्टरनें जखम पहातांच कांहीं उपाय चालणार नाहीं म्हणून खेदानें मान हलवली. तो निकाल ऐकतांच कीर्तीनें मोठ्या शिकस्तीनें आंवरून धरलेले अश्रू पुन्हां वाहूं लागले.

दादासाहेबांनीं काय वाटेल तितके पैसे देतों पण याला वांचवा असें डॉक्ट-रनां विनविलें.

डॉक्टरनीं सांगितलें कीं, " मी माझ्याकडून शिकस्त करतों पण आतां प्रत्यक्ष तो परमेश्वरच फक्त त्याला वाचवूं शकेल. "

डॉक्टरांनीं मग ड्यूकला स्वतंत्र खोलींत नेऊन औषधोपचार सुरू केले. जखम बांधीत असतां याला काय झालें म्हणून त्यांनीं विचारतां गहिंवरून दादासाहेबांनीं सर्व हकिगत सांगितली. ती ऐकून डॉक्टरांच्यासुद्धां डोळ्यांना पाणी आलें.

दादासाहेब आणि कीर्ति ड्यूकजवळ बसून होती, त्याच्या अंगावरून हात फिरवून त्याच्याशीं ममतेनें बोलून त्याला धीर देत होती, त्याचें अंग व पाय चेपीत होती पण ड्यूकचें विवळणें चालूंच होतें. हळूं हळूं ड्यूकचा शक्तिपात होऊन त्याचा आवाज अधिकाधिक क्षीण होऊं लागला. त्याचे ते एरवीं तेजस्वी दिसणारे डोळे निस्तेज दिसूं लागले, व जड होऊन मिटूं लागले. समोर बसलेल्या कीर्तीकडे आणि दादासाहेबांच्याकडे पहाणारी त्याची स्निग्ध दृष्टि तारवटल्यासारखी अनोळखी होऊं लागली. सतत हलणारें तें झुपकेदार सुंदर शेपूट शक्तिहीनतेनें हलण्याचें बंद होऊन फक्त ड्यूक म्हणून हांक मारल्यावर काय तें उगीच थोडें हलल्यासारखें दिसूं लागलें. इतका वेळ हात चाटणारी जीभ बाहेर पडून धांप लागून किती पाणी घातलें तरी कोरडी पडूं लागली.

आणि थोड्याच वेळांत आपल्या मालकमालकिणीकडे एकवार मोठ्या कष्टानें डोळे उघडून आळीपाळीनें पाहून व शेवटला निरोप म्हणून शेपूट हलवण्याचा प्रयत्न करून ड्यूकनें प्राण सोडला. आपल्या स्वामीकरतां सांडलेल्या रक्तानं भिजलेला तो सुंदर अंगबांध्याचा करड्या केसांनीं आच्छादलेला, डौलदार देह कायमचा अचेतन होऊन पडला.

तें पाहून दादासाहेबांनीं मान वळवली आणि कीर्तीचे हुंदके अनावर झाले.

*　　　*　　　*　　　*

आपल्या लाडक्या ड्यूकच्या नांवानें दादासाहेबांनीं दवाखान्याला हजार रुपयांची देणगी दिली.

जें काम दादासाहेब आणि कीर्ति यांच्या व्याख्यानांनीं झालें नाहीं तें काम दुसऱ्याच एका घटनेनें यशस्वी झालें.

शिदूची बहीण महंमदबरोबर पळून गेल्यामुळें त्याचे डोळे खाडकन् उघडले

त्याची फूसलावणी, आणि महंमदाची लालचावणी बंद होतांच नांदवडनजीक पसरलेली सर्व वावटळ चार दिवसांत शांत होऊन गेली.

त्या शांततेचा दादासाहेबांनीं चांगलाच फायदा घेऊन सर्व गांवांत माजलेली दुही मोडून टाकली आणि मैत्रीचें एक जेवण व बक्षिसें लावून खेळ वगैरे कार्यक्रम केले. धंद्यांत संघटना होऊन तो उर्जितावस्थेला यावा, म्हणून त्यांनीं योग्य ती उपाययोजना लवकरच अमलांत आणण्याकरतां मंडळ नेमलें. या बाबतींत कीर्तीचा त्यांना फार उपयोग झाला.

याप्रमाणें सर्व स्थीरस्थावर झाल्यावर कीर्ति व दादासाहेब परत मुंबईला आले.

दारांत पाऊल टाकतांच, ड्यूक धांवत स्वागतार्थ येऊं लागला म्हणजे त्याच्या गळ्यांतलीं घुंगरें जशीं वाजत तशींच तीं वाजताहेत कीं काय असा कीर्तीला भास झाला.

दादासाहेबांनाही तसेंच झालें कीं काय कोण जाणें! त्यांनीं एक जड निश्वास टाकला.

मान गोडशी वांकडी करीत, कान टंवकारून कानोसा घेऊन ड्यूक आज त्यांच्या स्वागतार्थ धांवत येणार नव्हता, त्यांच्या अंगावर उड्या मारून आनंदभरानें तो भिरीभिरीं हिंडणार नव्हता. तो मूर्तिमंत घरांत वावरणारा आनंद–ड्यूक आतां त्या घरांत पुन्हां दिसणार नव्हता.

त्यांच्यावर प्राणापलीकडे प्रेम करणारा त्यांचा लाडका ड्यूक, त्यांचा सहचर त्यांना कायमचा अंतरला होता.

नांदवडाकडल्या प्रवासांत झालेला शीण, मानसिक त्रास, ड्यूकविषयींचें तीव्र दुःख व तशांत नांदवडला जाण्यापूर्वींचा आजार यांमुळें आतां घरीं आल्यावर दादासाहेब बरेच आजारी पडले. त्यांच्या मधुमेहाच्या दुखण्यानें उचल खाल्ली होती.

दंगल चालू असतांना व नंतर ड्यूक भयंकर जखमी झाल्यामुळें दादासाहेबांच्या प्रथम कांहीं लक्षांत आलें नाहीं आणि मागून त्यांना त्या गोष्टीचें महत्त्व वाटलें नाहीं परंतु दगडाविटांच्या माऱ्यांत त्यांच्या पायाच्या नळीला ओझरतासा एक दगड लागून थोडी जखम झाली होती. तीच आतां वाढूं लागली होती.

आठ दिवस तर ते निजूनच होते. डॉक्टरसुद्धां जरा जास्त काळजी घेतली पाहिजे म्हणून कीर्तीला म्हणाले होते.

दुःखानें व चिंतेनें भारावून गेल्याप्रमाणें ती मनोभावानें त्यांची सेवाशुश्रूषा करीत होती. दादासाहेब हेच काय ते एकमेव प्रेमस्थान आतां कीर्तीला होतें.

कीर्ति जवळ नसतांना डॉक्टर दादासाहेबांना सारखे सांगत कीं तुम्ही मानसिक चिंता सोडाल तर तुम्हांला जास्त गुण पडेल.

यावर दादासाहेब हंसून म्हणत, " मला काय काळजी आहे डॉक्टर ? "

पण दादासाहेबांना आतां वाटूं लागलें होतें कीं या आजारांतून आपण उठणार नाहीं. दिवसेंदिवस त्यांना अधिक थकवा वाटत होता. म्हणूनच त्यांना हा प्रश्न सतत भेडसावीत होता कीं आपल्या मागून कीर्तीवर मायेची पांखर कोण घालील ? दादासाहेबांना कीर्तीच्या भावी आयुष्याबद्दल अतोनात काळजी वाटत होती कीं आपण आहों तोंवर ठीक. मग पुढें प्रेमळ हळव्या मनाच्या कीर्तीचें कसें होईल ? या विचारानें त्यांना चैन पडत नव्हतें.

मोटारीला दोन दिवे असले तर ती सुलभतेनें रस्त्यानें पुढें जाते. दोन्ही दिवे नसले तर मोटर पुढें जाण्यापेक्षां अपघाताचाच संभव अधिक. एका दिव्यावर अपघात न होतां ती पुढें जाऊं शकेल खरी पण—

मनुष्याच्या आयुष्यालाही उजवीकडे ध्येय आणि डावीकडे प्रेम यांची आवश्यकता असते. हीं दोन्हीं ज्यांच्या आयुष्यांत दुर्दैवानें नसतात ते अंधारांत चांचपडत जात असतात. ते केव्हां संकटांत सांपडतील आणि आपल्या

भोंवतालच्याही माणसांना दुःख देतील, वेळीं सर्वांचा जीवही धोक्यांत घालतील याचा नेम नसतो. ध्येय किंवा प्रेम ही एकच गोष्ट ज्यांच्या आयुष्यांत असते असेही लोक थोडेथोडके नसतात. पण ध्येय प्रेमाशिवाय अत्यंत कष्टतर भासतें तर नुसतें प्रेम डाव्या बाजूच्या एकल्या एक दिव्याप्रमाणें मनुष्याचा बहुतेक मार्ग अंधारांत बुडलेला असतां, बाकीचें कांहींहीं न दिसून फक्त डावी कड पहात पहात आयुष्य समाधानांत पण विफलतेंत कंठण्यास भाग पाडतें. दुसऱ्या कुणालाही त्या मनुष्याचा कांहीं उपयोग नसतो.

कीर्तीला आतां अंधारांत चांचपडावें लागणार नव्हतें. सूर्याप्रमाणें दैदीप्यमान ध्येयदीप तिला आतां मिळाला होता. परंतु चंद्राप्रमाणें मोहक, आल्हाददायक प्रेमदीपही उजळल्यावांचून तिचें आयुष्य खडतर होणें अपरिहार्य होते.

तो प्रेमदीप कीर्तीला सहजसाध्य होता परंतु तिनें त्यावर दुराग्रहाची काळी कांच बसवून टाकली होती, आणि पुढील आयुष्य तसेंच कंठण्याचा ती विचार करीत होती !

शेवटीं दादासाहेब स्वतःची समजूत घालूं लागले कीं, बरं ध्येय तर ध्येय. तेवढं तरी असूंदे. दुर्दैवानें ती प्रेमाला मुकणारच असेल तर तिचें ध्येय तरी अधिकाधिक उज्वल होवो म्हणजे मग तिला प्रेमाची कमतरता तितकी जाणवणार नाहीं, एकाकी जीवन तिला कठीण वाटणार नाहीं.

याच विचारांच्या भरांत दादासाहेबांनीं कीर्तीला एकदां दुपारच्या वेळीं झोंप न घेण्याचें ठरवून आपल्या खोलींत बोलावून घेतलें. पूर्वीच्या दृष्टीनें पहातां यांत नवल करण्यासारखें कांहींच नव्हतें किंवा दादासाहेबांनीं बोलतां बोलतां हरिजनांच्या उन्नतीबद्दल बोलण्यास आरंभ केला यांतही विशेष कांहीं नव्हतें. तो विषय त्यांना नेहमींच प्रिय वाटे. त्या विषयावर बोलतांना ते अत्यंत कळकळीनें, अत्यंत प्रामाणिकपणें व अत्यंत सहृदयतेनें बोलत. पुष्कळ वेळां भावनाविवष होऊन त्यांच्या डोळयांत आंसवेंही येत आणि स्वराचें कंपन होई. पण आज आजारी असतां दादासाहेबांनीं पुष्कळ बोलावयास सुरवात केली तें कीर्तीला बरें वाटलें नाहीं. तुम्ही स्वस्थ विश्रांति घ्या. मग बरे झालां, की आपण बोलूं असें तिनें सांगून पाहिलें पण ते ऐकेनात.

आजची त्यांची भावनाविवशता कीर्तीला अतिरिक्त वाटली. आरामखुर्चीवर डोळे

मिटून स्वस्थ पडून केव्हां दादासाहेबांनीं भराभर मुद्यांवर मुद्दे बोलावे, केव्हां उठून झपझप फेऱ्या घालीत पाईप जोरजोरानें ओढीत, वादळांत समुद्रानें लाटांवर लाटा उसळून द्याव्या आणि गर्जना करावी त्याप्रमाणें धूम्रवलयें खोलीभर सोडीत उचंबळलेल्या अंतःकरणानें साभिनय बोलत सुटावें. केव्हां कीर्तीसमोर उभें राहून तिला प्रश्नांवर प्रश्न करावे तर केव्हां उपदेश करूं लागावें, आणि केव्हां आराम-खुर्चीवर दमल्याप्रमाणें स्वस्थ पडून कीर्तीच्या बोलण्याकडे एकाग्रतेनें लक्ष पुरवावें याप्रमाणें आजचें दादासाहेबांचें वर्तन पाहून कीर्ति भयभीत झाली. तिच्या मनांत अस्वस्थतेचें वादळ माजलें. दादासाहेबांना आतां कांहीं बोलूं देऊं नये आणि आपण कांहीं ऐकूंही नये असें तिला वाटूं लागलें.

परंतु दादासाहेबांच्या या उचंबळून आलेल्या मनोवृत्तींमुळें, त्यांच्या पराकाष्ठेच्या भावनोद्रेकामुळें, त्यांचा शब्द इतका ओजस्वी, इतका स्फूर्तिप्रद बनला होता कीं त्यानें तिच्या अंतःकरणाचा ठाव घेतला.

दादासाहेब कीर्तीशीं फक्त अर्धापाऊण तास बोलत असावे पण हें तिला मागून समजलें. या वेळीं मात्र तिला तो कालावधि शतगुणित झाल्याप्रमाणें वाटला होता.

बोलून संपल्यावर दादासाहेब मग थकल्याप्रमाणें आरामखुर्चीवर डोळे मिटून पडले.

कीर्तीनें नोकराला कांहीं सूचना करून दाराशीं बसवलें. मग लगेच कपडे बदलले आणि आपली मोटार घेऊन ती बाहेर पडली.

शोफरला पाठीमागें बसवून ती स्वतःच आज मोटार चालवीत असून मन मानेल तशी रस्त्यारस्त्यांतून किंवा समुद्रकांठाच्या रस्त्यानें जात होती. शोफर मागें बसून विचार करीत होता की आज काय सबंद मुंबई पालथी घालण्याचा ताई-साहेबांचा विचार आहे कीं काय? आणि हें फिरणं आतां संपायचं कधीं?

परंतु कीर्तीच्या या भ्रमणापेक्षांही विलक्षण वेगानें तिचे विचार भ्रमण करीत होते. दादासाहेबांच्या भाषणांतील शब्द न् शब्द पुन्हां पुन्हां आठवून पारायणें करीत जणूं शब्दांवर शब्द रचून भरभक्कम पाया बांधून त्यावर ती आपल्या विचारांचा किल्ला उठवीत होती.

दादासाहेब म्हणाले होते, "कीर्ति, एकदां ध्येयसूर्य आयुष्यांत उगवला कीं

कोणत्या मार्गानें कुठें जाऊं म्हणून चिंता करण्याचं कारण उरत नाहीं. खांचखळग्यांत पडण्याची भीति रहात नाहीं.

आपल्या हरिजनबांधवांच्या उन्नतीचं ध्येय तूं शिरावर घेतलं आहेस तें सतत चालूं ठेव. दलितांच्या उन्नतीमुळेंच आपल्या देशाचं कल्याण होणार आहे. हरिजन अजूनही अज्ञानाच्या गर्तेत लोळत आहेत, शाळा उघडूनही त्यांच्यांत शिक्षणाची फारशी वाढ झालेली नाहीं, त्यांच्यांत महत्त्वाकांक्षा नाहीं किंवा उन्नतीची हौस उत्पन्न झालेली नाहीं. कीर्ति, मला जें झालं तें मी केलं. पण मला आतां असं वाटतं कीं मी फार थोडं केलं. पैसा आणि मानमरातब यांकडे जास्त लक्ष दिलं. लहानपणीं जातीमुळें जितका अपमान मला सोसावा लागला तेवढा सर्व पुढें मानमरातबाच्या मद्यानं विसरण्याचा मी यत्न केला. कुठें थांबावं हें मला समजलं नाहीं, मिळालेल्या पैशानं, मानमरातबानं समाधान न वाटून मी अधिकाची हांव धरून राह्यलों. मी फक्त कांहीं गांवांच्या चर्मकार मंडळीसाठींच खटपट केली, शाळा उघडल्या आणि व्याख्यानं दिलीं. पण कीर्ति, मानमरातबाच्या हांवेनं आंधळा होऊन मी ही जी संकुचित वृत्ति बाळगली त्यामुळेंच सर्व जातीच्या उद्धाराकडे माझं दुर्लक्ष झालं. दुसऱ्या लोकांना यामुळें आपलं घोडं पुढें दामटून लोकांची दिशाभूल करायला वाव मिळाला.

मी केलेली ही भयंकर चूक कीर्ति, तूं धुवून काढण्याचा प्रयत्न कर. दलित बंधूंची अज्ञानामुळें चाललेली दिशाभूल नष्ट करून तूं त्यांना योग्य मार्ग दाखव. एकच गांव, किंवा दहाबारा गांवांचं मर्यादित क्षेत्र तूं स्वतःसाठीं आंखून घेऊं नको तर सर्व हिंदुस्थानाचं क्षेत्र आपलं समज.

आपला मायभूमीरूपी वृक्ष बांडगुळांनीं सत्त्वशोषण चालवल्यामुळें कसा जीर्ण झाला आहे! निरनिराळ्या जाति या त्या झाडाच्या शाखाविस्ताराप्रमाणें आहेत. त्यांपैकीं हरिजन जर असे म्हणूं लागले कीं हें झाड आम्हांला नीट पोशीत नाहीं तेव्हां याच्याशीं संबंध तोडून टाकून आम्ही या पोसलेल्या बांडगुळांकडूनच जास्त चांगलं अन्नपाणी मिळवून बहराला येऊं तर तें कितीसं शहाणपणाचं ठरेल?

कीर्ति, तुझ्या अंगांत कर्तबगारी आहे ती तूं या सत्कार्यांत खर्च कर.

कीर्ति, करशील ना हें तूं? काय वाटेल तें झालं, कितीही विलक्षण गोष्टींमुळें आयुष्याचा पाया हादरल्यासारखा वाटला तरी हें कार्य पुढें नेशील ना? कीर्ति, करशील ना हें? कीर्ति, करशील ना हें?......"

तींच तींच वाक्यें पुन्हां पुन्हां आठवून आपण दिलेलीं उत्तरेंही कीर्ति उजळा दिल्यासारखी मनाशीं घोकीत होती.

" होय होय. ध्येय, ध्येय, ध्येय ! तुम्हीं सांगितलंत तेंच कार्य मी पुढे चालवीन. कांहींही त्याच्या आड मी येऊं देणार नाहीं. ध्येय हेंच आतां माझं आयुष्य ! "

या विचारांच्या भरांत कीर्ति मोटार चालवीत असतां तिनें कांहींतरी निश्चय केला. तिनें आपलें स्थलकालनिरपेक्ष हिंडणें थांबवलें.

कोटांतील आपल्या नेहेमींच्या जवाहिऱ्यांच्या इंग्लिश फर्मेशीं कीर्तीनें गाडी उभी केली, व शोफर दार उघडून धरण्यासाठीं खालीं उतरणार तोंच तिनें पुन्हां बटण दाबून गाडी सुरू केली. त्यामुळें शोफरच्या शरिराला धक्का बसून तो मागें कलंडला, त्याप्रमाणें त्याच्या मनाचीही विलक्षण अवस्था झाली.

पण काय करणार बिचारा ! गुपचुप बसून राहिला.

नंतर कीर्ति क्रॉफर्ड मार्केटासमोर गोवर्धनदास जव्हेरीच्या दुकानाशीं येऊन थांबली.

आतां उठून दार उघडण्याकरतां उतरावें कीं मघांप्रमाचेंच पुन्हां गाडी सुरू होऊन आपण धपकन मागें पडणार आहोंत अशा गोंधळलेल्या मनस्थितींत क्षणभर तो शोफर आहे तोंच शेजारलें दार खाडकन् उघडून कीर्ति शू खटखट वाजवीत दुकानांत शिरलीसुद्धां.

शोफर ओशाळल्यासारखा मागून खालीं उतरला, व पेट्रोल पहाण्याच्या निमित्तानें बॉनेट उघडून त्यानें त्यांत तोंड लपवलें.

सुमारें दहा मिनिटांनीं कीर्ति दुकानाबाहेर पडली. तिच्या हातांत एक लहानशी बंदिस्त डबी होती. शोफरनें लगेच पुढलें दार उघडून धरलें, पण तिकडे लक्षही न देतां कीर्तीनें मागलें दार उघडलें व एका कोपऱ्यांत आपली देहलतिका टाकीत शोफरला सांगितलें. " पोस्ट ऑफिस. "

पोस्टऑफिसशीं उतरूं कीं नको या मनस्थितींत कीर्ति उघडून धरलेल्या दाराला डाव्या हातानें पकडून दोन तीन मिनिटें तरी थांबली. नंतर ती उतरली. तिनें हातांतली डबी ऑफिसांत जाऊन रजिस्टर केली व ती परत गाडींत येऊन बसली.

शोफरनें गाडी सुरूं करून चाकावर हात ठेऊन अदबीनें विचारलें " अब किधर जानेका है ? "

कीर्तीनें थाडथाड उडणाऱ्या कानशिलांवर बोटें दाबीत इंग्रजींत उत्तर दिलें, " कुठेंही ने तुला वाटेल तिथें. "

शोफर कांहीं क्षण गोंधळून स्तब्ध राहिला.

नंतर जरा घसा साफ करून त्यानें पुन्हां धीर करून म्हटलें, " ताईसाब, अब–अब—"

त्याला थांबवून कीर्तीनें त्रासून म्हटलें, " कायकूं देर करते ? जलदी घरको चलो. "

शोफरनें सहनशीलतेची कमाल झाल्याप्रमाणें चेहेऱ्यावर भाव आणला व खर्रकन् कर्णा वाजवून गाडी चालू केली.

दादासाहेब वाचीत असल्याचें समजतांच कीर्ति त्यांच्याकडे गेली.

कीर्तीच्या तोंडाकडे पहातांच दादासाहेबांना कांहीं चमत्कारिकच वाटलें. त्यांनीं विचारलें, " काय झालं कीर्ति ? "

" कांहीं नाहीं दादासाहेब. " कीर्तीचा स्वर एखाद्या निर्जीव बाहुलींतून व्हेंत्रिलोक्विस्ट शब्द उमटवितो तसा वाटत होता. तिचें हंसणेंसुद्धां भयाण होतें. " तुम्ही मला आज काय काय जें सांगितलंत तें मला किती पटलं त्याचं प्रत्यंतर हें पाह्यलंत ? आतां यापुढें ध्येय हेंच माझं जीवन. "

असें बोलतांना आपल्या डाव्या हाताचीं बोटें उघडून उजव्या तर्जनीनें अनामिका दाखवीत, कीर्ति शून्य दृष्टीनें त्या शून्य बोटाकडे पहात होती.

" कीर्ति, तुझी निळाची अंगठी काय झाली ? "

" मी ती रजिस्टर पोष्टानं कौस्तुभाकडे परत पाठवली आहे. दादासाहेब, आतां माझ्या ध्येयाच्या मार्गांत प्रेमाची अडचण कधींही होणार नाहीं. "

हातापायांतली सर्व शक्ति नाहींशी झाल्याप्रमाणें दादासाहेब खुर्चीवर पडले. डाव्या हाताचा तळवा कपाळावर आपटून विवळल्याप्रमाणें ते बोलले, " अरेरे कीर्ति, काय केलंस तूं हें ? माझ्या बोलण्याबद्दल किती गैरसमज करून घेतलास तूं ? ध्येयाच्या मार्गात प्रेम आड येतं असं मी कधीं बोललों तुला ? कीर्ति, चुकते आहेस तूं. लग्नदिवसापासून तूं चूक करीत आहेस. कीर्ति, माझं वाक्य लक्षांत ठेव कीं तुला आपलं ध्येय सफळ करायचं असेल तर तुला कौस्तुभाच्या हातांत हात घालूनच पुढें गेलं पाहिजे. तुझं आणि कौस्तुभाचं ध्येय वेगळं नाहीं, त्यांमध्यें विरोध नाहीं त्याप्रमाणें तुझं ध्येय आणि प्रेम यांतही विरोध नाहीं. हेंच तुला मी समजविण्याचा प्रयत्न करीत आलों. पण तें जमत नाहींसं पाहून मी तुला ध्येयमार्गाची उज्वलता पटवून द्यायला गेलों तर कीर्ति, तूं आणखीच भयंकर चूक केलीस. कीर्ति, काय हें केलंस तूं ? कीर्ति, काय हें केलंस ? "

कीर्ति इतक्या वेळांत आतांच भानावर आल्याप्रमाणें आर्त स्वरानें उद्गारली, " काय केलं ? कौस्तुभाचा आणि माझा संबंध मी कायमचा तोडून टाकला. "

दादासाहेब तोंडावर धोतराचा सोगा धरून एखाद्या स्त्रीप्रमाणें अश्रू ढाळीत होते आणि आपण केलेल्या कृतीचा अर्थ नीट लक्षांत येऊन कीर्तीचें हृदय भांबावून गेलें होतें. दादासाहेबांच्या खुर्चीजवळ ती गुडघे टेकून बसली असून, धरणीकंपानें भूमि हादरावी तशा हादरणाऱ्या त्यांच्या हृदयावर तिनें मस्तक टेकलें होतें.

पण एकही अश्रू तिच्या डोळ्यांत नव्हता.

दादासाहेबांचे आजवरचे शेकडो शब्द जो आयुष्याचा अर्थ कीर्तीला पटवून देण्यास समर्थ झाले नाहींत तो संदेश तिला त्या अश्रूंकडून मिळत होता. त्या अश्रूंनीं कीर्तीच्या विचारांचा किल्ला पार धुवून टाकला. कांहीं नवीनच विचार तेथें उद्भवूं लागले.

" मी पाठवलेली अंगठी बघून कौस्तुभाला काय वाटेल ? काय समजेल तो ? या एका कृतीचा किती भयंकर अर्थ होतो आहे ! माझ्या इच्छेखातर कौस्तुभ लगेच घटस्फोट–मग कदाचित् कांहीं वर्षांनीं दुसरं लग्न–मग कौस्तुभ माझा रहाणार नाहीं."

कीर्तीचें हृदय हत्तीनें सोंडेंत धरलेल्या कमलाप्रमाणें जणूं गदगदां हलूं लागलें. धाडधाड ठोके पडत असतां तिचें रक्त सळसळां अंगभर धांवत होतें. तिचें विशाल नेत्र कांहीं भयंकर दृश्य दिसत असल्याप्रमाणें तारवटले होते. मानसिक जगांत जणूं तिच्यावर अकल्पित प्रसंग ओढवला होता. तिनें जणूं संकटांच्या अथांग दरियांत अजाणपणें उडी टाकली होती !

नवशिका पोहणारा बेसावध असतांना डुबला कीं त्याच्या नाकातोंडांत पाणी जाऊन जीव गुदमरून तो जोराचा श्वास घेतो तसाच गुदमरलेला श्वास कीर्तीनें आंत ओढला.

पाण्यांत भीतीनें डोळे ताणल्यावर हिरव्या सापांच्या वेटोळ्यांप्रमाणें दिसणारें, तें हिरवें हिरवें, अपरिचित, जलमय असूनही सहारा वाळवंटाप्रमाणें भयाण व ओसाड वाटणारें विश्व ! कीर्तीला अशाच एका नव्या काल्पनिक जगांत डुबी मिळाली होती. आणि त्या जगांत कौस्तुभावांचून एकाकी जीवनाची कल्पनासुद्धां तिला सहन होईना. तिच्या जिवाचा अगदीं थरकांप उडाला. आजवर आपण याच विचारांत कशा भ्रमण करीत होतों, नी कौस्तुभाच्या सहवासावांचून आपण इतके दिवस कसे काढले याचेंच तिला महा आश्चर्य वाटूं लागलें.

" कौस्तुभावांचून जीवन ? छे—

जीवन कसलं ? मरणच तें !

किती मी आंधळी ? केवढाल्या भयंकर चुका मी केल्या ? " विचारलहरींच्या ओघानें कीर्तीच्या मनांत विचारांचे तुषार उडत होते आणि त्या अनुरोधानेंच तुटक तुटक वाक्यें ती स्वगत बोलत होती. " कौस्तुभावांचून माझं जीवन, माझं ध्येय सर्व व्यर्थ होईल हें मला आजवर कसं समजलं नाहीं ? कौस्तुभ अजून माझाच आहे अशी माझी पूर्ण खात्री होती तोंवर मी अविचारीपणानं वागत आलें ! आणि जन्मांत पुन्हां त्याचा सहवास मला लाभणार नाहीं, असं भवितव्य, माझी कृती मला ओरडून सांगूं लागली तेव्हां आतां माझे डोळे उघडले. काय करून ठेवलं हें मी ? काय करूं आतां मी ?–ती अंगठी तिथं पोंचण्यापूर्वीच मला जातां आलं तर–जाऊं कां मी तिकडे ? " कीर्तीनें हांक मारली, " दादासाहेब—दादासाहेब ! "

आपल्या तोंडावरलें आच्छादन बाजूला न करतांच दादासाहेबांनीं उदासीन स्वरांत विचारलें, " काय कीर्ति ? "

अगदीं हलक्या आवाजांत कीर्ति म्हणाली, " मी कौस्तुभाकडे जाऊं ? "

" काय ? "

एकदम तोंडावरलें आच्छादन बाजूला करून स्वप्नांत कांहीं भास झाल्याप्रमाणें मुद्रा करून खात्री करून घेण्याकरतां दादासाहेबांनीं विचारलें, " काय म्हणालीस तूं ? "

कीर्तीनें तोंड बाजूला वळवलें. दादासाहेबांच्या दृष्टीला दृष्टी देऊं नयेसें तिला वाटलें. लहानपणीं एकादी वस्तू मागितली तर त्यांना चमत्कारिक वाटेल परंतु आपल्याला तर ती हवी अशा मनोवृत्तीनें कीर्ति जशी बिचकत बोलत असे तशीच ती म्हणाली, " मी विजयनगरला जाऊं ? "

दादासाहेबांच्या चेहेऱ्यावर कित्येक महिन्यांत दिसली नव्हती अशी समाधानाची छटा उमटली. कित्येक महिने कीर्तीच्या सुखाच्या काळजीनें म्लान झालेली त्यांची मुद्रा, काळ्या ढगाआड चंद्र उगवून तो उजळून निघावा तशी एक प्रकारच्या मंद हास्यानें प्रसन्न दिसूं लागली. त्यांच्या खिन्न नेत्रांतील तारेही हळूंहळूं चमकूं लागले.

कीर्तीला वाटलें कीं, ही समाधानाची छटा यांच्या मुद्रेवर अशीच कायम रहाण्याकरतां आपण काय वाटेल तें करायला नको काय ? पण पहातां पहातां ती समाधानाची छटा अदृश्य होत होत पार नष्ट झाली.

खिन्नपणें दादासाहेबांनीं विचारलें, "कीर्ति, माझ्याकरतां असं म्हणतेस तूं ? तुला ज्या गोष्टीपासून कांहीं आनंद नाहीं ती तूं करावीस असं मला कसं वाटेल ? तुला त्यापासून सुख व्हावं अशी मला इच्छा आहे."

दादासाहेबांचे दोन्ही हात आपल्या दोन हातांनीं घट्ट दाबून आवेगानें कीर्ति बोलली, "होय होय दादासाहेब, त्यांतच माझं सुख आहे. आजवर मी आंधळी होतें हो. अगदीं मूर्खपणानं वागलें मी."

"पण तुझ्याशीं लग्न करतांना कौस्तुभाच्या हृदयांत प्रेमाबरोबरच ध्येयदृष्टि होती त्याबद्दल तुझ्या मनात उद्भवलेलं वादळ—"

"अगदीं शांत झालं आहे दादासाहेब. कौस्तुभावांचून माझ्या जीविताला कांहीं अर्थच रहणार नाहीं. माझं ध्येयसुद्धां मी साध्य करूं शकणार नाहीं. कौस्तुभाचं प्रेम मला हवं आहे. मग तें ध्येयवादानं जखडलेलं असलं तरी मला चालेल."

"मग जा तूं कीर्ति." एकाद्या आशीर्वादाप्रमाणें दादासाहेबांनीं हे शब्द उच्चारले. "पण कीर्ति ?"

"काय ?"

"कीर्ति, तूं जाण्यापूर्वीं तुला मी एक रहस्य सांगणार आहें."

"काय ? रहस्य ?"

"होय रहस्य. आतां तें तुला सांगायला कांहीं हरकत नाहीं. पण तुला मी तें सांगितलं तरी तें सर्व लोकांना समजलं पाहिजे असं समजूं नकोस. तुझ्या आणि कौस्तुभाच्या सुखाकरतां वाटलं तर, आजवर मी तें जसं गुप्त राखलं तसंच तूंही गुप्त राख. किंवा त्या रहस्यफोटामुळं तुमच्या दोघांच्या सुखांत रतिमात्र फरक पडणार नसून कौस्तुभाला अधिकच सुख होईल असं तुला वाटलं तर खुशाल तूं त्याची परिस्फुटता करून टाक."

कीर्ति टकमकां दादासाहेबांच्या तोंडाकडे पहात होती. दादासाहेब असें काय रहस्य सांगणार आहेत या कुतूहलापेक्षांही हे असे कां बोलत आहेत हा विचार तिच्या मनांत जास्त टोंचत होता.

दादासाहेब पुढें म्हणाले, "कीर्ति, मी जें काय सांगणार आहें तें ऐकून तुला विलक्षण आश्चर्य वाटेल आणि वाईटही वाटेल. तेव्हां मन अतिशय घट्ट करून तुला सर्व ऐकलं पाहिजे."

कशाचाच कांहीं बोध होत नसल्याप्रमाणें कीर्ति दादासाहेबांचें बोलणें निःशब्दपणें ऐकत होती.

दादासाहेबांनीं पुन्हां सांगितलें, "मी तुला एकदां मागें म्हणालों होतों ना कीं तुझा आणि कौस्तुभाचा मतभेद हा वाळवंटांत बांधलेल्या वाळूच्या किल्यासारखा पायारहित आणि फोल आहे म्हणून. तेंच मी तुला आतां पटवून देणार आहें. जा. सर्व नोकरांना सांगून ये कीं कुणी आलं तरी जाम्ही घरांत नाहीं म्हणून सांगायचं. अन् येतांना या दाराला कडी लावून घे."

दादासाहेबानीं कीर्तीला आपल्या शेजारच्या खुर्चीवर बसवून घेतलें. नंतर आपल्या उजव्या हातानें कीर्तीनें गच्च आंवळून धरलेली उजव्या पंजाची मूठ हळूंच उलगडून, आपण जें कांहीं सांगणार आहों त्यामुळें तिजवर होणारा आघात धीर देऊन कमी करावा म्हणूनच जणूं तिचीं बोटें वात्सल्यभरानें दाबीत, कीर्तीचा जणूं आपण शेवटला निरोप घेत आहों इतक्या भारावलेल्या व करुण स्वरानें दादासाहेब सांगूं लागले. पण ते कांहीं बोलणार तितक्यांतं दारावर टिकटिक आवाज ऐकूं आला. तीक्ष्णपणें दादासाहेबांनीं दाराकडे पहात विचारलें, "हें काय? तूं सांगून आलीस ना सगळ्यांना?"

कीर्ति चुळबुळ करीत म्हणाली, "हो. पण कांहीं तरी महत्त्वाचं काम असेल मला वाटतं. त्याशिवाय कुणी आलं नसतं."

"बरं जा बघ बरं काय आहे तें."

कीर्ति बाहेर गेली आणि दोनतीन मिनिटांतच खोलींत परत आली. तिची चर्या पांढरीफटफटीत पडली असून हातांतल्या तारेंतील मजकूर डोळे शक्य तितके विस्फारून ती पुन्हां पुन्हां वाचीत होती. तिचे हात थरथर कांपत होते.

"कुणाची तार?" कीर्तीची अवस्था बघून घाबरून दादासाहेबांनीं विचारलें.

कीर्तीनें तार त्यांच्या हातीं दिली आणि "देवा, कौस्तुभाला माझ्यापासून हिरावून नेऊन माझ्या चुकीबद्दल मला हें भयंकर शासन देतो आहेस कां?" असा उद्गार आर्त स्वरानें काढून ती मूर्छित होऊन पडली.

तारेंत मजकूर होता, "कौस्तुभ अत्यवस्थ आहे. तावडतोब यावें." तार कीर्तीच्या नांवची होती.

कौस्तुभाला पहातांच कीर्तीचा सर्व धीर गळाला. राहुटींतील घडीच्या नवारीच्या पलंगावर पडलेला कौस्तुभाचा विकलांग देह पाहून कीर्तीच्या मनांत विलक्षण कालवाकालव झाली.

उन्हातान्हांत हिंडून श्रम केल्यामुळें त्याचें श्यामलवर्ण झालेलें मुख आतां वेदनाजर्जरतेमुळें, एकाद्या जलहीन, पांडुर मेघखंडाप्रमाणें दिसत होतें. त्याचें मस्तक पांढऱ्या पट्ट्यानें बांधल्यामुळें त्याचे केस अधिकच काळेभोर वाटत होते. भांग मोडून विखुरलेल्या केसांतील एक वळणदार बटीचा झुपका, कौस्तुभाच्या विस्तीर्ण कपाळावर डाव्या भुंवईपर्यंत येऊन पडला होता. हवेंतील ऊष्मा आणि वेदनाव्याकुलता यांमुळे उमटलेल्या घर्मराजीनें डबडबलेल्या कपाळावर, एरवीं शोभिवंत दिसणारा तो झुपका भिजून यावेळीं कसा केविलवाणा दिसत होता! ते नेहेमीं हंसणारे नेत्र आतां ग्लानीमुळें मिटले असून जड निश्वासामुळें नाकपुड्या जरा फुगीर झाल्या होत्या. ओठ जरा अलग राहिल्यामुळें शुभ्र दंतपंक्ति किंचित् चमकत होती. परंतु मंदस्मिताची मोहकता दाखवण्याऐवजीं शारीरिक वेदनांची मात्र ती जाणीव करून देत होती. सर्व शरीरयष्टि उजवा हात खेरीजकरून किरमिजी शालीनें गळ्यापर्यंत आच्छादिलेली असून, उजवा मोडलेला हात हाड बसवून बांधून टाकल्यामुळें पांघरुणाबाहेर सरळच्या सरळ बेढबपणें पडला होता.

पलंगाशेजारीं उभी राहून कौस्तुभाला निरेखीत असतांच बंगलोरच्या देवळांतील, नसांनसांतून उदात्त वीररसाच्या लहरी उसळत असल्यामुळें अत्यंत तेजस्वी व धैर्यशाली मनोवृत्तीनें आपल्या संरक्षणासाठीं उण्यापुऱ्या उंचीनें उभ्या ठाकलेल्या कौस्तुभाची मूर्ती कीर्तीच्या अंतश्चक्षूला ओझरती दिसून गेली.

"अरेरे, काय झालं हें?" असे मनाशींच आर्त उद्गार काढून कीर्तीनें आपला डावा हात धडधडत्या हृदयावर दाबून धरला. कौस्तुभ अशी ओठांतल्या ओठांत हांक मारून पुढें होण्यासाठीं तिनें कांहीं हालचाल केली.

पण तेवढ्यांत शेजारीं उजव्या हाताला उभ्या असलेल्या हॅनसनें तिच्या डाव्या खांद्यावर हळूं हळूं थोपटून सहानुभूतिपूर्ण स्वरानें उत्तम इंग्रजींत म्हटलें, "नको नको. त्याला आतांच स्पर्श करूं नको. त्याला डॉक्टरांनीं मुद्दाम गुंगीचें औषध दिलें

आहे. रात्रभर त्याला झोप लागली नाहीं. तेव्हां आतां त्याला जितकी विश्रांति मिळेल तितकी चांगली. ”

कीर्तीनें काकुळतीनें हर ओद्रानकडे पाहिलें. जणूं आतांपर्यंत किती वेळां तरी त्याला विचारलेला प्रश्न ती पुन्हां विचारीत होती, “ खरंच होईल ना हा पूर्ण बरा ? ”

हा प्रश्न आज कीर्तीनें किती वेळां तरी हर ओद्रानला विचारलेला होता.

होसपेठवर गाडी येतांच कीर्तीनें फलाटावर सभोंवार पाहिलें तोंच हर ओद्रान् बगलेंत सूर्यटोपी घेऊन स्मितहास्य करीत तिच्या डब्याकडे येत होता. त्याला पहातांच कीर्तीनें ओळखलें होतें कीं हाच कौस्तुभाचा वरिष्ठ हॅनस् ओद्रान असावा म्हणून. कारण कौस्तुभानें पाठवलेल्या फोटोशीं त्याचें स्वरूपसाम्य हुबेहुब वठलें होतें. त्याचप्रमाणें तिला व दादासाहेबांना आलेल्या पत्रांत कौस्तुभानें रेखाटलेल्या त्याच्या स्वभाववर्णनाला हॅनसचें स्वरूप किती जुळतें होतें !

हॅनस्नें कीर्तीला प्रथम ओळखलें त्याचें कारण त्यानें तिचा फोटो पुष्कळ वेळां पाहिला होता. हॅनस्ला पूर्वी वाटत असें कीं क्यूसच्या बायकोचा फोटो पुष्कळ टच केलेला असावा म्हणून ती इतकी चांगली दिसते पण आतां प्रत्यक्ष कीर्तीला पाहून त्याला वाटलें कीं, “ छे: हिच्या या सौंदर्यापुढें तो फोटो कांहींच नाहीं. ”

यथोचित अभिवादन होतांच कीर्तीनें अधीरपणें त्याला प्रश्न केला, “ कसा काय आहे माझा पती ? ”

यावर हॅनस्नें तिची काळजी निरसन व्हावी या हेतूनें सहास्य उत्तर केलें, “ आतां काळजी करण्याइतकी परिस्थिति राहिलेली नाहीं. ”

मग होसपेठच्या स्टेशनवरून मोटारीनें हर ओद्रानबरोबर विजयनगरच्या वाटेवर असतांनाच त्यानें सांगितल्यावरून कीर्तीला हलकें हलकें घडलेल्या अपघाताची हकिगत कळली होती.

अनागोंदीच्या एका टेकडीवर कौस्तुभाला अचानक एका गुहेचें तोंड सांपडलें; किंवा खालून अठरावीस फूट उंचीवर झाडांच्या फांद्यांनीं व करवंदाच्या जाळीनें आच्छादून टाकलेलें एक लहानसें विवर दिसून तेथें एकादी गुहा असावी आणि त्यांत कांहीं पूर्वकालीन अवशेष आपल्याला खास सांपडतील अशी आशा कौस्तुभाच्या मनांत उद्भवली. त्यानें हर ओद्रानलाही त्या आशेनें भारून टाकलें.

आणि मग काय ? दोघेही त्या अवघड ठिकाणीं चढण्यासाठीं हरप्रयत्न करूं लागले. विवर दिसत होतें त्याच्या वर दहा फुटांवर थोडें उभें रहाण्यास जागा होती. पण तेथून खालीं उतरण्याची कांहींच सोय नव्हती. एक बारीक झाडाची फांदी मात्र जवळ लोंबत होती. तिच्याच आधारानें कौस्तुभ सरकत खालीं येऊं लागला. विवरापासून दोन फुटांवर येईपर्यंतच ती फांदी उपयोगीं आली. नंतर ती सोडून कौस्तुभानें एका कपारीला धरून खालीं उतरण्याचा यत्न केला. पण तेथला दगड गुळगुळीत असावा किंवा पुरता जड नसल्यामुळें निसटून आला असावा. कांहीं असो, कौस्तुभाचा हात त्या दगडावरून घसरला. फांदीचा हात सोडतांच ती वर गेल्यामुळें कांहीं धर न सांपडून तो चांगला वीस फुटांवरून खालीं कोसळला.

हर ओद्रान वेगानें खालीं उतरला. निपचित पडलेल्या कौस्तुभाला पाहून प्रथम त्याला भय वाटलें कीं त्याचा प्राण गेला. पण नीट तपासल्यावर त्याला झालेल्या भयंकर दुखापती हर ओद्रानच्या ध्यानीं आल्या. मग खुणेच्या शिट्या वाजवून त्यानें जवळपास असलेल्या नोकरांना बोलावून घेतलें व त्यांच्या मदतीनें कौस्तुभाला अलगद स्ट्रेचरवर घालून त्याच्या राहुटींत नेऊन बिछान्यावर निजवलें. मग ताबडतोब एका नोकराला दरबारसर्जनला बोलावून आणण्यास पाठवून देऊन हर ओद्राननें प्रथमपरिचर्येला सुरवात केली.

सुदैवानें दरबारसर्जन घोडदौडीनें आला. मोठ्या कुशलतेनें त्यानें हाडें बसवलीं आणि प्लास्टरनें बांधून टाकलीं. डोक्याचीही जखम धुवून, रक्तस्राव थांबवून ती बांधून मग इंजेक्शन वगैरे टोचून योग्य तें औषधपाणी देण्याची व्यवस्था केली. आणि ममतेचें कुणी जवळपास असल्यास बरें, कारण रोग्याला हलवण्यास दिवस-गत लागणार आहे असें सांगूनच तो थांबला नाहीं तर ओद्राननें विनंती केल्यावरून सांगितलेल्या पत्त्यावर तार करण्याचीही व्यवस्था त्यानें अंगिकारली.

हर ओद्राननें सर्व सांगतांना दरबारसर्जन प्रथम डोक्याची जखम पाहून किती घाबरला होता आणि कौस्तुभ शुद्धीवर येईना तेव्हां त्याच्या डोक्याला कशा प्रकारें मार बसला असावा आणि त्याचा परिणाम दुर्दैवानें कुठवर जाईल याबद्दल कुकल्पना मनांत येऊन त्यानें कौस्तुभाच्या मायेच्या माणसांना बोलावून घेण्याची कशी घाई केली, हें मात्र सांगण्याचें वगळून फक्त मागूनचे आशादायक निर्णय मात्र त्यानें कीर्तीला वारंवार सांगितले होते.

तार आल्यापासून गाडींत बसेपर्यंतच्या बारा तासांत आणि प्रवासांत काढलेल्या तीस तासांत कीर्तीनें बेचाळीस वर्षांच्या काळज्या एकत्रित भोगल्याप्रमाणें मनाची विलक्षण घालमेल सहन केली होती. कौस्तुभ आपल्याला पुन्हां भेटेल ना ? या सतत अनुत्तरित रहाणाऱ्या प्रश्नानें तिचें डोकें घणाचे घाव घातल्याप्रमाणें फुटूं पहात होतें. स्वतः ओद्रान आल्याचें पाहून ती मनांतून जास्तच घाबरली होती.

अन् मग हर ओद्राननें कौस्तुभ बरा होण्याच्या मार्गावर आहे म्हणून सांगतांच तिला जें कांहीं एकदम हलकें वाटूं लागलें कीं ती एकटी असती तर चांगलीं पंधरा मिनिटें एकदम हंसण्यांत आणि रडण्यांत तिनें घालवलीं असतीं. पण आतां तिनें मोठ्या शिकस्तीनें मन आवरलें.

पण तिचें अधिरें मन स्वस्थ राहीना. सर्व हकिगत ऐकल्यावर ती वरचेवर विचारूं लागली, "खचित होईल ना तो बरा ? त्याला चांगलं चालतां येईल ना ? हाताचा पहिल्याप्रमाणेंच उपयोग होईल ना ?"

आणि आत्यंतिक सहानुभूतीनें आणि सहनशीलतेनें हर ओद्राननें तिला धीर दिलेला होता कीं अगदीं खचित क्यूस पूर्ण बरा होईल. आतां तूं आल्याचं कळल्यावर तर त्याची सुधारणा झपाट्यानं होईल."

आतां कौस्तुभाला प्रत्यक्ष पहात असलेल्या कीर्तीच्या नेत्रांतील मूकप्रश्न ओळखूनच जणूं हर ओद्राननें तशाच रीतीनें आपल्या आकाशाप्रमाणें नीलवर्ण, स्नेहमय नेत्रांनीं तिला आशादायक संदेश दिला. नंतर शेजारच्या राहुटींत तिला नेऊन तो म्हणाला, "स्टेशनवरून येतांना मी सांगितलं ना कीं भिण्याचं कांहीं कारण नाहीं म्हणून ? तूं त्याला एकदम पाहिलास ना म्हणून तुला काळजी वाटते आहे दुसरं कांहीं नाहीं."

या आश्वासनाबद्दल कीर्तीनें कृतज्ञतेनें हर ओद्रानकडे बघून म्हटलें, "तुम्ही ताबडतोब काळजी घेतली आणि त्याची शुश्रूषा केली म्हणूनच हा आशादायक संदेश मला ऐकायला मिळतो आहे. खरोखर तुमचे फार उपकार आहेत आमच्यावर."

हर ओद्रान जरा संकोचून हंसत म्हणाला, "ऊं, त्यांत काय मोठं उपकार मानण्यासारखं आहे ? मी असा पडलों असतों तर क्यूसनं नसती कां केली माझी

शुश्रूषा ? बरं पण चल आतां स्नानभोजन उरकून घे. आणि कांहीं एक काळजी करूं नको."

हॅनस्च्या आश्वासनानें कीर्तीला पुष्कळच बरें वाटूं लागलें होतें.

पण स्नानाच्या वेळीं तिला एक नवीनच भीति जाचूं लागली. तिला वाटूं लागलें, "आपल्याला बघून कौस्तुभाला आनंद होईल कां ?"

आणि यामुळेंच संध्याकाळीं कौस्तुभाची गुंगी उतरल्यावर त्याचें पथ्यपाणी करून हर ओद्रान जेव्हां त्याला कीर्ति आल्याची बातमी कळवूं लागला तेव्हां ती पडद्याजवळ येऊन डोळ्यांत व कानांत प्राण आणून कौस्तुभाच्या चेहेऱ्यावरील भावना पहाण्याकरतां व त्याचे शब्द ऐकण्याकरतां उभी राहिली.

हॅनस् म्हणत होता, "क्यूस, मी तुला आज एक सुंदर भेट आणली आहे."

क्षीण आवाजांत व क्षीण हंसून कौस्तुभानें विचारलें, "भेट ? लांकडी हात नाहीं तर पाय नाहीं ना आणलास ?"

"क्यूस, मी तुला किती वेळां सांगितलं कीं तुझा पाय फक्त दुखावला आहे म्हणून ? आणि हाताचें हाड तर छान सांधत चाललें आहे. तेव्हां तुला लांकडी हातापायांची भेट मुळींच लागणार नाहीं. दुसरीच एक भेट मी आणली आहे."

"असं ?" कौस्तुभानें जरा उत्सुकतेनें विचारलें. "मला सांपडलेल्या गुहेंत जाऊन कांहीं शोध मिळवलास कीं काय ?

"मण्णांत गेली ती गुहा. तिच्यामुळेंच तर तूं असा आजारी झालास. त्यापेक्षां कितीतरी छान वस्तू आहे."

"काय बुवा मग नाहीं ओळखत."

"मुंबईहून आली आहे."

"पत्र ?"

"पत्र नव्हे. पण पत्र लिहिणारीच आली असली तर ?"

"ओ. डॅम् यू हॅनस्. आजारांत काय अशी भलतीच चेष्टा करतोस ! ती कुठली यायला !" कौस्तुभनें एक निश्वास सोडला.

" चेष्टा नाहीं क्यूस. खरंच तुझी बायको इथं आली आहे."

" तूं बोलावलंस तिला ? होय ?" रागावूनच कौस्तुभानें हे प्रश्न केले. " तार बीर केलीस तिला तूं ?"

हर ओद्रानला कसं उत्तर द्यावं हें सुचेना.

पण तितक्यांत कीर्ति पुढें येऊन म्हणाली, " कौस्तुभ, तार आली म्हणून मी आलें नाहीं. तार आली नसती तरी मी येणारच होतें इकडे. तार आल्यामुळें फक्त मी येण्याची घाई केली इतकंच."

" खरंच कीर्ति, हें ?" कीर्तीला बघून आणि तिचे शब्द ऐकून कौस्तुभाला जो कांहीं आनंद झाला कीं त्यामुळें त्याची चर्या किती तरी सुप्रसन्न दिसूं लागली आणि निस्तेज नेत्रांत एक प्रकारची चमक आली.

कौस्तुभाचा उत्सुक प्रश्न ऐकून कीर्ति त्याच्या अगदीं जवळ आली आणि उजव्या हाताचीं बोटें त्याच्या कपाळावरून हळुवारपणें फिरवून तिनें रुद्ध कंठानें कौस्तुभाच्या दृष्टीला दृष्टी देऊन अंतःकरणपूर्वक उत्तर दिलें, " अगदीं खरं."

हर ओद्रान समाधानाचा एक निश्वास टाकून तेथून निघून गेल्याचें पाहून कौस्तुभानें आपला डावा हात पांघरुणाबाहेर काढला आणि कीर्तीचा हात धरून तो आपल्या ओठांजवळ नेऊन त्यानें तिच्या नाजुक गौर बोटांचें चुंबन घेतलें.

पण कीर्तीनें खालीं वांकून आपले ओष्ठद्वयच त्याला अर्पण केले.

* * * *

पांच मिनिटांत कीर्तीनें बाहेर येऊन कौस्तुभाला स्वस्थ झोप लागल्याचें हॅनसूला सांगून त्याला दोन तारा पाठविण्याची व्यवस्था करण्याविषयीं विनंती केली.

एक तार मुंबईला दादासाहेबांना पाठवावयाची असून तींत " सर्व ठीक. तुम्ही येण्याची जरूर नाहीं." असा मजकूर होता व दुसरी स्वतःच्या जबाबदारीवर कीर्ति पाठवणार होती, ती पुण्यास कौस्तुभाच्या वडिलांकडे जावयाची असून तींत "कौस्तुभ अत्यवस्थ. उभयतां ताबडतोब यावें." असा मजकूर घालावयाचा होता.

तारांविषयीं सांगितल्यावर कीर्तीनें कौस्तुभाचा नोकर शेषय्या याला विचारलें " कौस्तुभाच्या नांवचीं पत्रें वगैरे कांहीं आहेत काय ?"

कीर्तीच्या अपेक्षेप्रमाणें शेषय्यानें उत्तर केलें, " आज सकाळींच रजिस्टरनें कांहीं तरी वस्तू आली आहे. ती मी साहेबांच्या पेटींत ठेवली. दाखवूं काय ? नाहींतर ही किल्लीच घ्या. "

मग शेषय्या गेल्यावर कीर्तीनें पेटींतून निळाच्या अंगठीची बांधलेली डबी काढली व ती तशीच कौस्तुभाच्या उशीखालीं सरकवून देत म्हणाली, " शुभशकुनासाठीं. "

तितक्यांत कोकिळेनें कुहूं कुहूं म्हणून कुठेंतरी गाण्यास सुरवात केली.

दुसऱ्या दिवशीं कौस्तुभ झोंपला असतांना शेषय्याला त्याच्याजवळ बसवून हर ओद्रान मुद्दामच कीर्तीला बाहेर घेऊन गेला. कौस्तुभ ज्या ठिकाणावरून पडला ती जागा तो तिला दाखवणार होता.

बंगलोरच्या बाजूला दगडाशिळांच्या टेकड्या कीर्तीनें पाहिलेल्या होत्या पण येथील एकावर एक रचून घातल्याप्रमाणें दिसणारे प्रचंड शिळांचे डोंगर, टेकड्या बघून तिला मोठा विस्मय वाटला. रामाच्या वानरसेनेनें जमवलेले हे दगड आहेत अशी दंतकथा असून वालीसुग्रीवांची किष्किंधा म्हणजेच विजयनगर असें इतिहास सांगतो.

जों जों आंत जावें तों तों दाट झाडी लागून शेकडों माकडें इकडून तिकडे उड्या मारतांना व फळें खात वटवट करीत असतांना दिसूं लागलीं.

त्यांपैकीं दोन हॅनसूला बघून टुणदिशीं झाडावरून खालीं उडी मारून त्याच्या खांद्यावर येऊन बसलीं, व कीर्तीकडे टंवकारून बघूं लागलीं.

हॅनस्नें त्या माकडांकडे बोट दाखवीत हंसून सांगितलें, “ ही टारा आणि हा सुगिरीव. ”

कीर्तीनें स्मित करून विचारलें, “ तें कसं बाई तुम्हांला ओळखायला येतं ? मला तर हीं सारीं माकडं आणि हीं दोन माकडं यांच्यांत कांहींच फरक दिसत नाहीं. ”

हॅनस् खदखदून हंसून म्हणाला, “ प्रथम तसं होतं खरं. पण माकडांचंच कशाला ? नवीन देशांतलीं माणसं पाहिलीं तरीदेखील प्रथम असंच होतं नाहीं कां ? ”

“ हो खरंच. मी प्रथम इंग्लंडला गेलें तेव्हा सर्व पुरुष सारखे नी सर्व बायकाही सारख्या वाटायच्या. अशी भीति वाटे कीं ओळख ठेऊं तरी कशी ? ”

यावर दोघेंही खूप हंसलीं.

जातांना कांहीं ठिकाणीं कीर्तीला आपलें नांव कांहीं दगडांवर कोरलेलें दिसतांच मोठा विस्मय वाटला. कांहीं कौस्तुभाच्या हस्ताक्षरांत असून कांहीं अपरिचित हस्ताक्षरांत होतीं.

कीर्तीनें विचारलें, " हें कुणी लिहिलं आहे. ? "

" मी. "

" तें कां ? "

" ज्या ठिकाणीं आम्ही कांहीं संशोधन केलेलं असेल तेथें खुणेसाठीं हीं अक्षर कोरून ठेवतों. मी पूर्वी फुली मारून ठेवीत असे पण क्यूस म्हणाला, क्रॉस म्हणजे दु:खाचं चिन्ह आहे. उलट कीर्ति म्हणजे फेम असा अर्थ होतो. मग क्यूसप्रमाणें गंमतीनें मी पण तसंच लिहूं लागलों. तुमचंही नांव आहे नव्हे काय तें ? "

कीर्तीचें अंत:करण भरून आलें होतें. तें खुणेदाखल लिहिलेलें नांव म्हणजे कौस्तुभाच्या प्रेमाचें एकेक कोरीव लेणेंच होतें जणुं !

कौस्तुभ पडला होता ती जागा पाहून कीर्ति म्हणाली, " किती अवघड जागीं चढला होता तो. "

यावर प्रशंसेनें हॅनसनें सांगितलें, " हो तर. क्यूस मोठा धाडसी आहे, त्याचा उत्साह फार दांडगा आहे. "

* * * *

दोन दिवसांनीं आपल्या आईवडिलांना बघून कौस्तुभाचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. तो म्हणाला, " तार केली तरी तुम्ही याल असं मला नव्हतं वाटलं. "

" कां बरं ? " अण्णासाहेबांनीं रुद्ध कंठानें विचारलें. " तूं इतका आजारी आहेस असं समजल्यावरसुद्धां आम्ही येणार नाहीं असं वाटलं तुला ? "

" पण–पण–मागें—"

" मागला प्रश्न नांवलौकिकाचा होता. आणि मध्यंतरींच्या काळांत–" येवढेंच अर्धवट ठेऊन अण्णासाहेब मूळ रेषेवर येऊन म्हणाले, " तूं अत्यवस्थ म्हणून तार आल्यावर आमचा जीव कसा राहील ? तुझ्या आईनं किती नवस केले तें विचारून घे तिला. चामुंडादेवीला तुझ्यावर सोन्याचीं फुलं उधळीन, माझा मुलगा बरा कर म्हणून नवस केला आहेन् तिनं. "

पार्वतीबाई मुलाच्या उशाजवळ बसून त्याच्या कपाळावरून व अंगावरून वात्सल्यभरानें व साश्रुनयनांनीं हात फिरवीत होत्या.

कौस्तुभानें हंसून विचारलें, "होय आई?"

"अरे उगीच काय प्रश्न विचारावेत? केले नवस तरी मुलखावेगळं कां कांहीं केलं मी?" आईनें स्वरांत ओढूनताणून आणलेली उसनी कठोरता ती. पुडींत कस्तुरी घातली म्हणून तिचा मधुर गंध कां लोपत असतो?

कौस्तुभ व अण्णासाहेब दोघेही हंसले.

अण्णासाहेबांनीं मग विचारलें, "तुझी शुश्रूषा कोण करतं?"

कौस्तुभ जरा गोंधळला. त्यानें उत्तर दिलें, "माझा वरिष्ठ फारच प्रेमानं माझी शुश्रूषा करतो. माझा नोकर व आणखी कांहीं कामावरलीं मंडळी, सर्वच आळीपाळीनं शुश्रूषा करतात."

"आणखी?"

कांहींच उत्तर न देतां कौस्तुभानें दृष्टि वळवली.

"कौस्तुभ, तुझी बायको कुठं आहे?"

जरा दबकूनच कौस्तुभानें उत्तर दिलें, "पलिकडल्या राहुटींत असेल."

"कां?"

"तुम्हांला कदाचित् तिला भेटायला आवडणार नाहीं म्हणून असेल.

"मग बोलावीनास तिला."

"कशाला?" जरा तीव्र स्वरांत कौस्तुभानें प्रश्न केला.

पार्वतीबाईसुद्धां जरा भयभीत झाल्या होत्या.

अण्णासाहेब हंसून म्हणाले, "वेड्या, तुझी बायको आम्हांला बघायला नको कां? हिला सुनमुख दाखवणार आहेस ना?"

कौस्तुभाला वाटलें, आपण अगदीं पूर्ण बरें झालों आहों. अत्यंत समाधानानें तो हंसला.

पार्वतीबाईंची सर्व भीति नष्ट होऊन त्याही हंसून म्हणाल्या, "अरे बाबा, तुला ज्यांत सुख तेंच आमचं सुख समजलास!"

"आई, मग हांक मारीनास तिला."

"हो. केवढा पण भिडस्त. कधीं नांव घेतच नसशील जसा कांहीं."

कीर्तीला पाहून अण्णासाहेब प्रशंसापूर्ण स्वरांत उद्गारले, " आमची कल्पना किती निराळी होती हिच्याबद्दल. कोण म्हणेल ही उच्चवर्णीय नाहीं म्हणून ?"

" मग मी सांगत नव्हतों ?"

" ऊं : आम्हांला वाटलं तूं आंधळा झाला होतास तेवढ्यापुरता." अण्णासाहेब हंसून उत्तरले.

कीर्तीच्या सहवासांत थोडे दिवस राहिल्यावर तर अण्णासाहेब आणि पार्वतीबाई दोघें आपल्या सुनेवर निहायत खूष होऊन गेलीं.

कीर्तीनें आपल्या खाण्यापिण्याची यत्किंचित् पर्वा न करतां कौस्तुभाची शुश्रूषा चालवली होती, ती पाहून त्याच्या मातापितरांना अत्यंत सुखसमाधान वाटलें.

कौस्तुभाची त्याच प्रांतांत असलेली बहीणही येऊन सर्वांना भेटून गेली.

कीर्तीला तर कौस्तुभाची हळूंहळूं सुधारत चाललेली प्रकृती पाहून स्वर्गच हातीं येत असल्याप्रमाणें धन्यता वाटत होती.

कीर्ति आणि कौस्तुभ, रहा रहा म्हणत असतां पंधरा दिवसांनीं अण्णासाहेब पत्नीसह परत पुण्याला गेले.

एके दिवशीं कीर्ति हॅनस्‌सह हिंडत असतां हॅनस् कौस्तुभावरून बोलतां बोलतां खेदानें म्हणाला, " त्याच्यासारखा उत्साही जोडीदार मिळाला असून मला येथलं काम पुढें चालवणं अशक्य व्हावं ही मोठी दुःखाची गोष्ट होय."

" एकादा मदतनीस दोन तीन महिन्यांपुरता कां नेमीत नाहीं ? कारण आणखी दोनतीन महिने तरी कौस्तुभाला काम नीट करतां येणार नाहीं. कारण त्याला बरं व्हायलाच महिना लागेल. नंतरसुद्धां लगेच त्यानं कामाला लागून उपयोग नाहीं. त्याला विश्रांति घेतली पाहिजे. मी त्याला लवकरच मुंबईला घेऊन जाईन म्हणतें."

हॅनस् जरा गुटमळून म्हणाला, " नाहीं. तेवढ्यावरूनच नाहीं मी हें बोलत."

" म्हणजे मी नाही समजलें."

" मी लवकरच स्वदेशीं जाणार आहें."

" तें कां ?"

हॅनस् गूढार्थानें म्हणाला, " तें लवकरच सर्व जगाला समजेल."

" लढाई ? "

" हुं "

" केव्हां जाणार ? "

" एक महिन्याची सूचना मी महाराजांना देऊनही टाकली. "

" मग त्यांना फार वाईट वाटलं असेल ? "

" छे: उलट बरंच वाटलं. "

" तें कसं ? " कीर्तीनें विस्मयानें विचारलें.

" महाराजांच्या मनांत हें संशोधनकार्य मुळीं आतां बंदच करून टाकावं असं आलं आहे. पण तें कसं अंमलांत आणावं हें त्यांना समजत नव्हतं. आतां आयती त्यांना सबब सांपडली. "

" पण मग खरी सबब काय आहे ? "

" लढाईकरतां पैशाचा झरा लागेल ना ? त्यासाठीं पैशाची बचत नको करायला ? "

" हं हं आलं लक्षांत. "

कीर्ति व हॅनस् दोघेंही जरा वेळ आपापल्या विचारांत स्तब्ध राहिलीं.

नंतर कीर्ति म्हणाली, " कौस्तुभाला फार वाईट वाटेल. "

" हो. मलासुद्धां कांहीं कमी वाईट वाटणार नाहीं. पण कसं झालं तरी हें स्मृतिशेष साम्राज्य आहे. अन् "—हॅनस्नें आपलें वाक्य अर्धवटच सोडून दिलें. त्या अनुच्चारित वाक्यांत काय काय अर्थ सांठवले होते तें त्याचें त्यालाच माहीत !

* * * *

मुंबईहून कीर्तीला इतक्या दिवसांत किती तरी आनंददायक पत्रें आलीं होतीं.

दादासाहेबांची प्रकृति चांगली असल्याबद्दल नित्य पत्रें येतच होतीं.

कीर्तीला अत्यानंद जर कोणत्या बातमीनें झाला असेल तर लयलाधनंजयांच्या विवाहाबरोबरच झालेल्या धारिणीउदयांच्या विवाहामुळें.

जगन्नाथ आपल्या दोन्ही आत्याबाईंच्या लग्नाला हजर होता. खालचें द्रव्य नष्ट झाल्याबरोबर शिंक्यापर्यंत बेछूट उड्या मारणाऱ्या उंदराची जशी हतबल स्थिति होते त्याप्रमाणें जगन्नाथाची अवस्था झाली होती. पणोद्याच्या संस्थानिकांची त्याच्यावर इतराजी होऊन त्याची सर्व इनामी, घरदार जप्त झालें होतें. पश्चात्तापानें

जगन्नाथ दग्ध होऊन गेला होता. त्याची सर्वतोपरीं झालेली दुर्दशा पाहून त्याच्या प्रभाताईला त्याचा कळवळा आला व तिनें आपल्या संस्थानांत त्याला कांहीं कामावर नेमणूक करून दिली.

प्रभाताई नुकत्याच ओढवलेल्या पतिनिधनाच्या आपत्तीमुळें स्वतः जरी बहिणींच्या लग्नाला येऊं शकल्या नाहींत तरी जगन्नाथाबरोबर आपल्या दोघां धाकट्या मुलांना त्यांनीं चांगल्या आहेरासह पाठवून दिलें होतें.

बायजाबाई समाधानाचे सुस्कारे टाकतां टाकतांच मला आतां मरायला मोकळीक झाली म्हणून म्हणत होत्या.

इकडे शीलेकडे तर फारच मौजेची हकिगत घडली होती.

केसुभाईनीं आपल्या बहिणीला किंवा आईला काडीमात्र सल्लामसलत न विचारतां वऱ्हाडांत कुठेंतरी कामानिमित्त हिंडत असतांच लग्न करून घेतलें व पत्नीला घेऊनच ते घरीं आले. या गोष्टीमुळें त्यांच्या घरीं तर गोंधळ माजलाच, परंतु कावेरीबाईंनीं मुंबईला आपल्या घरीं जो गोंधळ घातला तो अगदीं औरच. आतां केसुभाईला आणि त्याच्या अद्यापि न पाहिलेल्या परंतु ऐकीव माहिती असलेल्या पत्नीला नांवें ठेवतां ठेवतां त्यांना दिवस पुरत नसे.

पूर्वी केसुभाईची स्तुती ऐकतांना भाऊसाहेब कंटाळत तसेच आतां या निंदेलाही कंटाळूं लागले. पण आपल्या गरीब स्वभावाला अनुसरून ते गप्प राहून किंवा फार तर हूं हूं म्हणून वेळ साजरी करीत. आणि आगींत तेल ओतण्यासाठीं म्हणूनच कीं काय बहिणीकडून गुलाबच्या लग्नाची निमंत्रणपत्रिका एके दिवशीं येऊन थडकली. मग काय विचारतां !

भाऊसाहेबांनीं येवढें मात्र केलें कीं या बहिणभावंडांच्या भांडणाचा फायदा घेऊन शीलेला घरीं आणण्याची त्यांनीं परवानगी मिळवली. शीला घरीं आली.

कावेरीबाई शीलेवर आतां एकदम प्रेम करूं लागल्या.

घरीं शीला येतांच भूषणानें भाऊसाहेबांच्याकडून लग्नाचें बोलणें पुन्हां सुरू केलें. कावेरीबाईंनीं शीलेची मनधरणी केली आणि या सर्व घडामोडींचा गोड परिणाम म्हणजे शीलभूषणांचें लग्न लवकरच थाटामाटानें व्हावयाचें होतें.

या गोडगोड बातम्या वाचीत असतां आपल्या अंगावर जणुं जाईजुईच्या नाजूक, शीतल, सुगंधी सुमांचा वर्षाव होत आहे असें कीर्तीला वाटे.

———————

*

## — ४१ —

कौस्तुभाच्या जखमांच्या पट्ट्या सुटल्याला चार दिवस झाले होते. जवळपास फिरावयाला त्याला डॉक्टरांनीं परवानगी दिली होती.

आज रात्रीं पौर्णिमा असल्यामुळें कीर्ति व कौस्तुभ दोघे फिरावयासाठीं तुंगभद्रेच्या तीरावर आले होते. एका शिलाखंडावर बसून दोघेही सभोंवतालची शोभा पहाण्यांत तल्लीन झाले होते.

चांदणें कसें अगदीं टिपूर पडलें होतें. कीर्तिकौस्तुभांच्या आनंदकला जशा आज पूर्णावस्थेपर्यंत पोंचल्या होत्या त्याप्रमाणें चंद्रमाही आपल्या सर्वषोडशकलांनीं युक्त झालेला दिसत होता आणि आपल्या या आनंदोत्सवांत सर्व सृष्टि सामील करून घ्यावी म्हणूनच कीं काय विमलसुधारसाचा वर्षाव तो सर्वत्र करीत होता.

या वेळीं तुंगभद्रेच्या आसमंतातभागीं नितांतरमणीय शोभा विलसत होती. सकाळींच पावसाची जोराची वृष्टि होऊन गेल्यामुळें वनराजी कशी न्हाऊनमाखून निघाल्यासारखी स्वच्छ झाली होती. इतस्ततः पसरलेल्या काळ्या शिळांच्या टेकड्या व नदीच्या दोन्ही कांठावर विखुरलेले निरनिराळ्या आकाराचे लहानमोठे दगड व गुळगुळीत गोटेसुद्धां स्नानामुळें तुळतुळीत दिसत होते. या सर्वांवर व नदीच्या पाण्यांत चंद्रकिरणांची प्रभा पसरल्यामुळें, सृष्टिदेवी स्नान करून आतां प्रियकराच्या भेटीच्या वेळीं चंदन अर्गजांची उटी लावून सजली असावी व आपल्या भावनोद्दीपित देहाला ती वायूच्या विंझण्यानें जणूं शीतलता आणूं पहात असावीसें भासत होतें.

किंवा तुंगभद्रेचा चंद्रप्रकाशांत जललहरींवर हिरे चमचमत असल्याप्रमाणें शोभणारा तो प्रवाह म्हणजे प्रत्यक्ष आकाशगंगाच, आणि झाडांच्या पानांवरून व शिळापाषाणांतून ठिकठिकाणीं दिसणारी चमक म्हणजे असंख्य तारकाच जणुं, इंद्राच्या अमरावतीप्रमाणें एका काळीं वैभवयुक्त असणारें विजयनगरचें साम्राज्य जेथें होतें, तें स्थल एकदां बघून, तेथें आजच्या पौर्णिमेला क्रीडा करून, अवशेष बघून तरी यावें म्हणून आकाशांतून खालीं अवतरल्या होत्या. तुंगभद्रेच्या पाण्याचा खळखळाट म्हणजे त्यांच्या हास्यविनोदाचाच मंजुळ ध्वनी असावासें वाटत होतें.

आपल्या आवाजानें बिचकून या स्वर्गसुंदरी कदाचित् पळून जातील आणि येथील सर्व शोभाही अदृश्य होईल या भयानेंच कीं काय कीर्ति हलक्या स्वरांत आपला नितांत आनंद सामावून म्हणाली.

" काय अवर्णनीय सृष्टिशोभा ही ! अशा वेळीं वाटतं कीं या सर्व रमणीय निसर्गाचाच आपण एक भाग होऊन रहावं. " आपले तारकांप्रमाणें तेजस्वी टपोरे डोळे भोंवतालच्या निसर्गावरून वळवून कौस्तुभाकडे रेखून तिनें प्रश्न केला, " नाहीं कौस्तुभ ? तुला नाहीं असं वाटत ? "

कौस्तुभानें गंभीर पण विशिष्ट हंसून म्हटलें, " नाहीं. "

परंतु तें गांभिर्य तितकेसें न जाणवून कीर्तीनें चेष्टेनें म्हटलें, " हं. एकादा दगड व्हवासं वाटत असेल तुला ! "

पण एकवार सभोवार दृष्टि फिरवून, सुस्कारून कौस्तुभ गंभीरपणें म्हणाला, " तूं चेष्टेनं विचारते आहेस कीर्ति. पण आतां यावेळीं हा सर्व देखावा बघून माझ्या मनांत काय कल्पना आली आहे तें सांगूं ?

" हूं ? "

" हे सर्व प्रचंड दगड आणि शिळा पाहून असं वाटतं कीं, अहिल्या जशी शापामुळें शेंकडों वर्षें शिळेचं रूप पावली होती त्याप्रमाणें विजयनगरच्या साम्राज्यांतले हे स्त्रीपुरुष तर पाषाणरुपानं इतस्ततः पडलेले नाहींत ना ? आणि त्यांवरली ही चमक म्हणजे हीन स्वरूपांतून मुक्त होण्यासाठीं धडपडणारे नी उफाळून बाहेर ओसंडूं पहाणारे त्यांचे आत्मेच नव्हेत ना ? ही चमचमणारी खळखळाट करणारी नदी म्हणजे पूर्ववैभवाचं आणि पराक्रमाचं स्थलकालनिरपेक्ष ओजच जणूं वहाताहे—कुणीं सांगावं ? या भरतभूमींतील कोट्यावधि पराक्रमी पावलांच्या स्पर्शानं या सर्व निर्जीव धुळीला मिळालेल्या साम्राज्याच्या योग्य काळीं उद्धार होणार असेलही ! "

कौस्तुभाच्या शरिरावर रोमांच उभे राहिल्याप्रमाणें त्याचें शरीर थरारलें.

त्या आवेगाच्या भरांत दोन क्षण थांबून कौस्तुभ स्वतःच पुन्हां बोलूं लागला, " नानाप्रकारच्या शिळागोट्यांची बनलेली समोरली ही उत्तुंग रास पहा. कशी एकरूप दिसते आहे. स्निग्ध, सोज्वल, अशा रुपेरी चांदण्याच्या अजब जादूमुळं निळ्या

तेजस्वी आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्या टेकडीचं काळं छायाचित्र एकाकृति भासताहे. त्या सर्वांभोंवतीं तेजकिरणांची एकच प्रभा पसरली आहे. त्यांतील वेगवेगळ्या शिळांचें विभिन्नत्व ओळखूंही येत नाहीं. तसंच एकजीव हिंदु साम्राज्य जाति-"

कौस्तुभ एकदम थांबला. त्याच्या वेगानें धांवणाऱ्या कल्पनावारूला जणूं ठेंच लागल्याप्रमाणें तो अडखळला. आवेगाच्या आटोक्यांत गेल्याप्रमाणें त्यानें आकुलतेनें हांक मारली, " कीर्ति. "

रसिकाला रिझविणाऱ्या अशा रम्य रागदारीचे स्वर कानीं पडत असतां अवचित विसंवादी सूर त्यांत मिसळले जाऊन एकतानतेचा भंग व्हावा तसेंच कीर्तीचें यावेळीं झालें. तिनें जरा स्तिमितपणें कौस्तुभाकडे पाहिलें.

तिच्या त्या दृष्टीनें, आपण कोणती चूक केली तें कळून येऊन वादकानें ती सुधारण्यासाठीं पुन्हां सुरेल स्वरमाला वाजवूं लागावें, त्याप्रमाणें कौस्तुभालाही आपल्या अकालीं बदललेल्या मनोवृत्तींची जाणीव होऊन पुन्हां वातावरण प्रसन्न करण्याच्या हेतूनेंच कीं काय तो मोठ्यानें हंसून म्हणाला, " जाऊं दे तें सगळं कल्पनासाम्राज्य या तुंगभद्रेंत बुडून. काय विचारला होतास तूं प्रश्न मला ? या रमणीय निसर्गाचाच एक भाग व्हावासं मला वाटतं कां म्हणून ना ? सांगूं खरं ? या वनराजींतला एकादा पुष्पगुच्छ होण्यापेक्षां तुझ्या केशराजींतला एकादा केशगुच्छ होण्याचं, आकाशांतला तारा होण्यापेक्षां तुझ्या नेत्रांत चमकणारा तो हंसरा तारा होण्याचं, किंवा या नदींतला एकादा जलबिंदु होण्यापेक्षां तुझ्या गालांतल्या खळीमधला सुधाबिंदु होण्याचं भाग्य जर मला लाभलं तरच मला अधिक आनंद होईल."

कौस्तुभानें कीर्तीचा हात आपल्या हातीं घेऊन हळूंच दाबला.

परंतु त्याच्या अपेक्षेप्रमाणें कीर्ति हंसली नाहीं. तिनें कौस्तुभाच्या हांतून आपला हात सोडवून घेऊन जरा त्रस्तपणें त्याला विचारलें, " राहूंदे ही फ्लॅटरी. मघां काय म्हणत होतास तें सांग आधीं."

कांहीं वेळ निःशब्दपणें नदीच्या तरंगतुषारांकडे बघून नंतर कीर्तीकडे न पहातांच एक लहानसा गोटीसारखा दगड पाण्यांत दूरवर फेकून त्यानें उमटविलेल्या तरंगमालांकडे बघत कौस्तुभानें म्हटलें, " मला तुझी क्षमा मागायची आहे कीर्ति."

" ती काय म्हणून ?" कीर्तीनें विस्मयानें विचारलें.

कीर्तीकडे पाहून कौस्तुभानें विचारलें, " लग्नाच्या दिवशीं तूं मला एक प्रश्न विचारला होतास आठवतं ? "

ओशाळल्याप्रमाणें खालीं मान घालून, आपल्या शुभ्र पातळाची पदरापासली जरीकिनार चुरमडीत एक निश्वास टाकून कीर्तीनें उत्तर दिलें, " एकच कां ? मी तुला त्यादिवशीं कितीतरी मूर्ख प्रश्न विचारले. पण गतवर्षीच्या आयुष्यांतील अनुभवांनीं मला सर्वांचीं उत्तरं मिळालीं आहेत. "

" अगदीं सर्वांचीं ? "

" होय. "

" मग त्या उत्तरांनीं समाधान झालं तुझं ? "

कीर्ति स्तब्ध राहिली. आपल्या डाव्या मनगटावरील चमकणाऱ्या तासांची पैलूदार नागमोडी सोन्याची बांगडी उजव्या हातानें ती गरगर फिरवीत राहिली.

तिचा तो चाळा थांबवण्याकरतां तिच्या हातांवर आपली तर्जनी व अंगठा दाबून कौस्तुभानें विचारलें, " माझ्या ध्येयामुळें तुझ्यावरील माझ्या प्रेमांत कमतरता आली असली पाहिजे असं वाटत होतं ना तुला ? "

" मला आतां समजलं कौस्तुभ, कीं मनुष्याचे जसे प्राण तसंच त्याचं ध्येय. नुसतीं सिंहाचीं दांतनखं किंवा मनुष्याची तरवार नव्हे तर मनुष्याच्या बुद्धीची जी किंमत तीच त्याच्या ध्येयाची. बुद्धिजड मनुष्य तसा ध्येयशून्य मनुष्य. प्रत्येक मनुष्याला कमजास्त बुद्धि असते तसंच त्याला बरं वाईट ध्येय हें असतंच, असायलाच हवं. "

" हो. पण ध्येयविषय होणं तुला अप्रिय वाटलं ना ? कीर्ति, मी दादासाहेबांना पुण्याकडली हकिगत सांगत असतांना म्हणालों कीं, माझ्या मदतीला जर माझं ध्येय नसतं तर आईवडिलांच्या सुखाकरतां मी कीर्तीलाही सोडायला तयार झालों असतों. खरोखर कीर्ति, मी जरी तसं केलं असतं तरी मला कधीं यत्किंचित् सुख लागलं नसतं. "

"पण तुझ्या बोलण्यांत चूक कुठेंच नव्हती. कौस्तुभ, मी तुझी ही निळाची अंगठी परत पाठवली " कौस्तुभाच्या बोटांतल्या अंगठीला अंगुलिस्पर्श करून कीर्ति

म्हणाली. "ती लाभत नाहीं अशा समजुतीनं पाठवली नव्हती. ती कल्पना मागून मला त्रासवूं लागली, नी विषाची परीक्षा नको म्हणून तुला परत दिली. तर माझ्या ध्येयपूर्तीच्या मार्गांत मनाची चलबिचल नको म्हणून पाठवली."

कौस्तुभाचा चेहेरा जरा पडलेला पाहून कीर्ति घाईनें म्हणाली, "पण कौस्तुभ, आपल्या अत्युच्च ध्येयाकरतां मनुष्य आपल्याला अती प्रिय अशा वस्तूचा बळी द्यायला सदैव सिद्ध असतो हें उज्वल तत्त्व तूंच मला शिकवलंस. श्रियाळचांगुणेनीं आपल्या बाळाला सत्त्वरक्षणासाठीं कांडलं किंवा हरिश्चंद्रानं तारामतिरोहिदासांना विकलं तसाच मानसिक उदात्ततेनें मनुष्य ध्येयरक्षणासाठीं किंवा कोणत्याही सत्त्वरक्षणाच्या वेळीं वागत असतो."

जरा थांबून कीर्ति पुन्हां बोलूं लागली, "आपण लंडनच्या आर्टगॅलरींत एक चित्र पाहिलं होतं ना? एक इंग्लिश सैनिक आपल्या देशाप्रित्यर्थ आपल्या जीवितावर—आपल्या सर्वस्वावर तिलांजली देऊन रणांगणावर निघालेला आहे." जणूं चित्र समोर असल्याप्रमाणें कीर्ति वर्णन करूं लागली. "खाकी पोषाख, उपयोगी सामानाच्या पिशव्या, शस्त्रास्त्रें, काडतुसांचा पट्टा याप्रमाणें तो अगदीं सुसज्ज आहे. त्याच्या उजव्या खांद्यावर ऐटदारपणें बंदूक टाकलेली असून ती त्यानं उजव्या पंजानं गच्च आंवळून धरलेली आहे. आणि—आणि उरलेल्या डाव्या बाहूनं आपल्या प्रियपत्नीभोंवतीं त्यानं विळखा घातलेला आहे. आपल्या पत्नीचा तो निरोप घेत आहे. आपण पुन्हां भेटूं कीं नाहीं याची शाश्वती वाटत नसल्यामुळें डाव्या हाताच्या बोटांनीं पत्नीच्या डाव्या खांद्याजवळचा भाग त्यानें गच्च आंवळून धरला आहे. तो इतका कीं त्या बोटांच्या फटींतून पाठीचा मांसल भाग वर आलेला आहे. ओठांनीं पत्नीच्या ओठांचं तो दृढ चुंबन घेतो आहे आणि त्याचे नेत्र प्रीतीचा अखेरचा संदेश देत आहेत. सैनिकाच्या अंगावरील सामानामुळें त्याला पत्नीला पुरतें हृदयाशीं घेतांसुद्धां आलेलं नाहीं. त्याच्या पत्नीनं आपले दोन्ही बाहू आपल्या प्रियपतीच्या मानेभोंवतीं आंवळले आहेत.

यःकश्चित् टॉमी असून चित्र पहातांच आपल्याला असं भासतं कीं त्याच्या नसानसांतून वीरश्री, आणि रणांगणावर जाऊन पराक्रम गाजविण्याची उत्सुकता स्फुरत आहे, त्याच्या मुद्रेवर जाज्वल्य देशाभिमान तळपत आहे, आणि इषारा मिळतांच निमिषार्धांत मिठी सोडून तो पुढें पाऊल टाकायला सिद्ध आहे, उत्सुक आहे.

त्याच्या पत्नीच्या चेहेऱ्यावर दुःखाची छाया पडलेली आहे पण त्यावरही देशाभिमान झळकत आहे. तीही आपली मिठी क्षणार्धांत सोडून पतीला देशाकरतां समरांगणीं पाठवायला तयार आहे." कीर्तीचे डोळे पाण्यानें भरून आले. क्षणभरांत अंतस्थ तेजस्वितेनें तीं आंसवें चमकूं लागलीं. अर्थपूर्ण दृष्टीनें कौस्तुभाकडे बघत कीर्ति मृदु स्वरांत म्हणाली, "असलेच ध्येयवादी पुरुष स्त्रियांना प्रिय होतात नी प्रिय व्हायला हवेत." कीर्तीचा मुखचंद्र यावेळीं उदात्ततेनें प्रकाशत होता. तिचे नेत्र बुद्धिवैभवानें चमकत होते. कौस्तुभ क्षणभर दिपल्यासारखा तिच्याकडे पहातच राहिला.

नंतर कीर्तीचा मांडीवर असलेला उजवा हात आपल्या हातीं घेऊन कौस्तुभानें म्हटलें, "अन् अशा पुरुषांना स्त्रियाही ध्येयवादीच मिळायला हव्यात."

"समजलें मी कौस्तुभ. अगदीं अगदीं खरं आहे तुझं म्हणणं. गुणी माणसालाच गुणांची पारख होते. त्याचप्रमाणें ध्येयवादी माणसालाच ध्येयवादाची साक्ष पटते. तुझ्या प्रीतीला तुल्यबल अशी प्रीति माझ्यापाशीं होती परंतु तुझ्या ध्येयवादाला अनुरूप असा निस्वार्थ ध्येयवाद मात्र माझ्याजवळ नसल्यामुळें माझ्या मोलाचं पारडं खालीं झालं आणि ती रुखरुख मनाला नकळत बोचूं लागल्यामुळें तुझाही ध्येयवाद मी उधळून द्यायला सिद्ध झालें. माझ्यापेक्षां वरल्या पायरीवर तूं उभा होतास तें मला सहेना म्हणून मी बळेबळेनं तुला खालीं ओढण्याचा प्रयत्न केला. मला मूर्खेला हें समजलं नाहीं कीं ध्येयावांचून कौस्तुभ तो माझा प्रिय कौस्तुभ राहिला नसता. पण माझं सुदैव म्हणून तूं अचल राहिलास. माझं भाग्य म्हणून ऐन वेळीं, मी लहान असतां ज्याप्रमाणें माझ्या बोटाला धरून दादासाहेब मला पायरीवर चढायला शिकवीत त्याप्रमाणें याही वेळेला त्यांनीं मला हात दिला आणि तुझ्या ध्येयवादाला सर्वस्वीं जुळता असा ध्येयवाद मला शिकवला, पटवला."

"खरंच कीर्ति, दादासाहेबांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. तूं जेव्हां मला सोडून गेलीस आणि नंतर नांदवडाला गेलीस तेव्हां तर माझी निराशा इतकी गाढ झाली होती कीं, दादासाहेब सतत आशादायक पत्रें लिहून तुझ्या प्रेमाबद्दल मला ग्वाही देऊन आपलं पुनर्मीलन खास होणार असा मला धीर देत म्हणून मी कसाबसा दिवस कंठीत राहिलों. पण कीर्ति, आतां इतक्यांत तूं म्हणालीस कीं ध्येयपूर्तीच्या मार्गांत मनाची चलबिचल नको म्हणून निळाची अंगठी परत पाठवून

तूं आपला संबंध सोडायला तयार झालीस. कीर्ति, अजून तुला तसंच वाटतं? नांदवडलाच तुला रहाण्याची इच्छा आहे? मी जर बंगलोरला परत गेलों, तर–" शेवटीं आशंकेमुळें कौस्तुभाच्या स्वरांत कंप आला.

"बंगलोरला काय हरिजन नाहींत काय? आपल्या हिंदभूमीच्या दुर्दैवानं सर्वत्र ते गवतासारखे पायदळीं पडलेले आहेत. मी मुद्दाम तेलगू, कानडी भाषा शिकेन." कीर्ति सहास्यवदनानें कौस्तुभाचे दोन्ही हात आपल्या हातीं धरून कोमल स्वरानें म्हणाली, "पण कौस्तुभ, कांहीं झालं तरी आतां तुला सोडून मी कुठें कधीं रहाणार नाहीं. तुझ्याकरतां मी माझ्या ध्येयाचासुद्धां त्याग करायला तयार आहें."

"पण कीर्ति, मी तुझ्या त्या त्यागाची अपेक्षा करीत नाहीं. उलट मी तुला त्यांत मदतच करीन. कारण माझं नी तुझं ध्येय यांत भेद आहे कुठं? पण कीर्ति, खरं सांगू? तूं आतां म्हणालीस ना तसंच मलाही वाटतं. अन् हें न समजूनच मी लग्नदिवशीं तुला दुखवलं. आणि त्याबद्दलच मी तुझी क्षमा मागणार आहें.

"त्याबद्दल म्हणजे कशाबद्दल?"

"तूं मला विचारलंस कीं मी ब्राम्हण असतें आणि आपलं प्रेम असतां दुसरी कुणी सुशिक्षित हरिजन मुलगी तुला सांगून आली असती तर तूं लग्न केलं असतंस कां? अन् मी मूर्खासारखं हो म्हणून उत्तर दिलं. अगदीं चूक होतं तें उत्तर, खरोखरीं तशी वेळ आली असती तर मी तसा वागलों नसतों अशी मला खात्री वाटते. म्हणूनच मला तुझी क्षमा मागायची आहे."

"पण मी तुला क्षमा करूं कशी? तूं म्हटल्याप्रमाणें वागला असतास ही माझी खात्री आहे." कीर्ति सहास्य वदनानें व हंसऱ्या नेत्रांनीं कांहीं मनोहर रीतीनें ओठ मुरडून म्हणाली, "अन् तूं असा आहेस म्हणूनच मला प्रिय आहेस. ध्येयविहीन कौस्तुभ तो माझा कौस्तुभ नव्हेच मुळीं."

कौस्तुभाकडे कीर्ति सप्रेम प्रशंसेनें बघत होती. तिला वाटलें, माझा कौस्तुभ यावेळीं किती देखणा दिसतो आहे. आजारानं जरा वाळलेला असूनही किती पीळदार बांधा दिसतो आहे. ती हनुवटीवरली आकर्षक खळी नी सुंदर भावनांनीं चमकणारे नेत्र. भांग पाडलेल्या मृदु केशकलापाच्या सुंदर वळणामुळें त्याची भव्य कपाळपट्टी किती उठून दिसते आहे. कपाळावर ओघळून रुळत असलेली ती

वळणदार बट. ती हळुवारपणें आपल्या अंगुलींनीं कुरवाळून स्वस्थानीं सारण्याकरतां कीर्तीच्या बोटांत स्फुरण उत्पन्न होऊन, वायुलहरीमुळें गुलछबूच्या गुच्छांतील फुलें किंचित् कंपित होतात तशीं तीं जरा कंप पावलीं.

हे विचार गनांत असतांच कीर्ति उघड म्हणत होती, " तूं असा आहेस म्हणूनच—"

कीर्तीच्या प्रेमकोमल दृष्टींतील मनोहर भावनांचा सुंदर संगम पहात असतांच कौस्तुभाला गोड गोड हंसूं आलें. कीर्तीची या वेळची बसण्याची पद्धतही अतिशय आकर्षक होती.

कौस्तुभाशेजारीं उजव्या हाताला ती बसली होती. तिनें आपला डावा पंजा शिलातलावर मनगटाशीं वांकवून पसरून ठेवला असून तिच्या गोंडस गौरवर्ण हाताला त्यामुळें सुरेख बांक आला होता, व त्याचा सुंदर आकार खुलून दिसत होता. तिची मानही डाव्याच बाजूला किंचित् कलली असून, सहजपणें बसून तिनें पावलें घोट्यापासून एकावर एक टाकल्यानें व तिच्या पातळाचे ओचे शेजारीं पंख्याप्रमाणें पसरून पडल्यानें मत्स्यकन्येचा जसा मनोहर आकार दिसतो तसाच कीर्तीच्या शरिराचा आकार दिसत होता. तिच्या पांढऱ्याशुभ्र पातळाचा हिरव्या रेशमांत विणल्यामुळें अत्यंत खुलून दिसणारा जरीचा कांठ ओच्यावर आणि डाव्या खांद्यावरून उजव्या पोटरीपर्यंत वळणें घेत गेल्यामुळें तिचा अंगबांधा अधिकच गोंडस दिसत होता. बसण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळें तिच्या उजव्या वक्षस्थलावरील पदर किती वेळां सारखा केला तरी पुन्हां पुन्हां घसरून खालीं येत होता. उजव्या हातानें ती कधीं वेणीच्या लांबसडक मृदु शेपट्याशीं खेळे तर कधीं कपाळावरल्या बटा बोटांवर गुंडाळी, केव्हां बांगडीशीं चाळे करी तर केव्हां हात मांडीवर स्वस्थ ठेवी. तिचें तें गौरवर्ण सुंदर मुखमंडल तर खरोखरीं चंद्राशींच स्पर्धा करीत होतें.

कौस्तुभ कीर्तीचें सौंदर्य अतृप्तपणें न्याहाळीत होता.

कौस्तुभाच्या प्रेमकोमल दृष्टिकिरणांनीं कीर्तीच्या कपोलयुगुलावर रक्तिमा आणला. चटकन पदर सांवरून तिनें आपल्या गालावरील गुलाब आणि डोळ्यांतील तारका लपवण्याकरतां मान जरा वळवली व आपला अधरोष्ठ वरल्या दंतपंक्तीनें दाबून जरा लाजून हंसत कीर्ति उठून उभी राहूं लागली. पण तिचीं दोन्हीं मनगटें

पकडून तिला आपल्या जवळ ओढीत हंसून कौस्तुभानें विचारलें, "कुठें पळून चाललीस ?"

"तें बघ आकाशातलं चंद्रबिंब किती सुंदर दिसतंय"

कीर्तीकडे सप्रेम पहात कौस्तुभ म्हणाला, "मला नाहीं त्याची किंमत. हें च चंद्राबिंब जास्त सुंदर दिसतंय."

त्याचें बोलणें न ऐकल्यासारखें दाखवून पुन्हां उठण्याचा प्रयत्न करीत कीर्ति म्हणाली, "अन् पाण्यांत चंद्राचं प्रतिबिंब कसं चमकतंय बघ. आणि—"

"लबाड कुठली !"

संभ्रमाचा अभिनय करून कीर्तीनें विचारलें, "काय झालं ?"

कांहीं उत्तर देण्याऐवजीं कौस्तुभ उठून उभा राह्यला. कीर्तीच्या देहलतिके-भोंवतालीं आपल्या बाहूंनीं विळखा घालून त्यानें तिला एकाद्या लहान मुलीप्रमाणें दोन हातांवर अलगद उचलून घेतली आणि अत्यंत कोमलपणें "माझी कीर्ति, माझी, माझी कीर्ति." असें म्हणून तो राहुटीकडे चालूं लागला.

कीर्तीनेंही आपल्या करपल्लवानीं कौस्तुभाच्या मानेभोंवतीं दृढ मिठी घातली, आपल्या मुखावर खिळलेल्या त्याच्या दृष्टीला दृष्टी देण्याची अत्यंत लज्जा वाटून तिनें आपले नेत्र मिटून घेतले व त्याच्या धडधडत्या हृदयावर मस्तक टेकलें.

दोन दिवसांनींच विजयनगरच्या सौख्यसाम्राज्यांतून कीर्तिकौस्तुभ मुंबईला निघालीं.

कौस्तुभानें मोठ्या कष्टानें हॅनस्‌चा, इतर मंडळींचा व आपल्या संशोधनकार्याचाही निरोप घेतला. तो निघण्याच्या आदल्या दिवशीं कीर्तिकौस्तुभ व हॅनस् वगैरे सर्वांना महाराजांनीं थाटाची मेजवानी दिली. महत्त्वाचें कार्य बंद ठेवावें लागतें म्हणून त्यांना खरोखरीं वाईट वाटत होतें. पुढेंमागें आपण तें कार्य पुन्हां हातीं खास घेऊं व हॅनस् आणि कौस्तुभ दोघांनींही जरूर यावें म्हणून त्यांनीं सांगून ठेवलें, व कायमचा निरोप न देतां कांहीं वर्षांपुरता निरोप घेतला. हॅनस् व कौस्तुभ यांनींही हंसत हंसत, जरूर आम्ही येऊं म्हणून आश्वासन देऊन, तसाच तात्पुरता निरोप घेतला.

मुंबईच्या गोडगोड बातम्या, विजयनगरचे गोड गोड दिवस अशाप्रकारें सर्वत्र आनंदाचा बहार उमलला असतां, सुखाचें पीक सर्वत्र दिसत असतां, आपल्यापुढें केवढें दुःखाचें ताट वाढून येत आहे त्याची कीर्तीला कल्पना तरी कशी होणार? जागृतींत नव्हेच पण स्वप्नांत तरी कशी येणार?

पण केवड्याचें बन फुललें म्हणजेच तेथें साप येतो ना?

फूल उमललें म्हणजेच गांधिलमाशी येते ना?

दादासाहेबांनीं वरचेवर पाठविलेलीं खुशालीचीं पत्रें म्हणजे, कीर्तीनें घाबरून जाऊं नये, तिच्या कौस्तुभाच्या शुश्रूषेंत व्यत्यय येऊं नये, कौस्तुभाबद्दलच्या तिच्या काळजींत आणखी भर पडूं नये, आणि सुखाची वाट चालत असलेली कीर्ति पूर्णपणें सुखी व्हावी, या इच्छेनें केवळ तिला शांत ठेवण्याकरतां घेतलेली सावधगिरी होती हें कीर्तीला कुठून कळणार? दादासाहेबांनीं सर्वांना अशी ताकीदच देऊन ठेवली होती कीं आपल्या आजाराबद्दल विनाकारण कांहीं लिहून कीर्तीला घाबरवण्याचें कारण नाहीं म्हणून.

तेव्हां कीर्तीनें जेव्हां दादासाहेबांची अंथरुणावर खिळलेली जर्जर देहयष्टि पाहिली तेव्हां तिला मोठाच धक्का बसला.

"हें काय दादासाहेब, तुम्ही मला कांहींच कसं हो कळवलं नाहीं?" असें जेव्हां तक्रारीच्या पण रडव्या स्वरांत कीर्तीनें विचारलें तेव्हां ते क्षीण हंसून

समजुतीच्या स्वरानें म्हणाले, " तुला उगीच घाबरून सोडण्यांत काय अर्थ म्हणून नाहीं कळवलं. "

" उगीच कसं म्हणतां दादासाहेब ? कळवलं असतंत तर आम्ही जरा लवकर नसतों कां आलों ? "

" काय करायचं होतं लवकर येऊन ? येथें माझी व्यवस्था अगदीं उत्तम आहे. पण माझं राहूं दे. कौस्तुभ, तुझी प्रकृति अगदीं खुशाल आहे ना ? "

" हो. अगदीं खुशाल आहे. पण तुमच्या प्रकृतीबद्दल तुम्ही कांहीं कळवलं नाहीं, हें बरं नाहीं केलंत. "

दादासाहेब पुन्हां हंसून म्हणाले, " पण मी म्हटलं ना माझं सध्यां राहूं दे म्हणून ? तुझ्या तोंडून एकदां सर्व हकिगत ऐकूं दे बरं मला. तुझे आईवडील आले होते तें समजल्यावर मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ? कीर्तीबद्दल ते काय काय म्हणाले सांग बरं पुन्हां. "

मग कौस्तुभानें आपल्या आजारासंबंधीं, कीर्तीच्या प्रेमळ शुश्रूषेसंबंधीं व आपल्या कामासंबंधीं व अण्णासाहेब आणि पार्वतीबाई यांचें कीर्तीबद्दल किती अनुकूल मत झालें, त्यासंबंधीं पुष्कळ हकिगती सांगितल्या.

कीर्ति मध्यें एकदां आपल्या खोलींत गेली तेव्हां दादासाहेबांनीं साभिप्राय कौस्तुभाकडे पाहून विचारले, " एव्हरीथिंग ओके ? " ( अगदीं सर्व ठीक ? )

यावर कौस्तुभानें सहास्यमुद्रेनें जेव्हां " होय " म्हणून उत्तर दिलें तेव्हां समाधानाचा उद्गार काढून दादासाहेब म्हणाले, " आतां मला सुखानं मरण येईल. कौस्तुभ, कांहीं झालं तरी माझ्या कीर्तीला अंतर देऊं नको बरं. कौस्तुभ, कीर्ति म्हणजे मला प्राणापेक्षां प्रिय आहे. तिचं सुख मी तुझ्या हातीं सोंपवून जात आहें. "

सद्गदित होऊन कौस्तुभ म्हणाला, " दादासाहेब, मलाही कीर्ति प्राणापेक्षां प्रिय आहे. तिचं सुख तेंच माझं सुख आहे. पण इतक्यांत मरणाच्या गोष्टी कशाला बोलतां ? येवढ्यांतच तुम्ही जाऊन कसं चालेल ? "

दादासाहेब खूप मोठ्यानें हंसून म्हणाले, " नातवंड पहाण्याची माझी इच्छा नाहीं असं नाहीं कौस्तुभ. " नंतर लगेच गंभीर होऊन ते म्हणाले, " पण आतां तशी आशा करणं व्यर्थ आहे. मला समजून चुकलं आहे कीं मी आतां फार थोड्या दिवसांचा सोबती आहें. "

---

## — ४३ —

आज सकाळपासूनच धों धों करीत पर्जन्यधारा कोसळत होत्या. भर दुपार असून सर्वत्र काळोखानें साम्राज्य पसरून दिलें असल्यामुळें मुंबापुरींत रात्रीसारखे सर्वत्र विद्युद्दीप लागले असून त्या उजेडावरच सर्व कामें चाललीं होतीं. पावसानें भिजलेल्या गुळगुळीत काळ्या रस्त्यांवर दिव्यांचीं प्रतिबिंबें पडून डोळ्याला त्रासवीत असून कित्येक व्हिक्टोरियांच्या घोड्यांचे पाय निसरत होते. गाड्याघोड्यांच्या गर्दीतून, निसरड्या पदपथावरून किंवा रस्त्याच्या कडेनें चालत असतां, कडेला लावलेल्या झाडांच्या पानांवरून टपटपां पाण्याचे थेंब अंगावर पडत असून इतर लोकांच्या छत्र्या फार जवळ आल्यानें एकादे वेळीं पाण्याची धारची धार खांद्यावर किंवा डोक्यावर अभिषेक करीत असे.

पण कशीही हवा असली, कितीही त्रास झाला तरी मुंबईच्या उद्योगधंद्यांत कधीं खंड पडत नाहीं. सर्व कामें झपाझप उरकून टाकण्यांत सर्व जीव गुंतलेले असतात.

अशा त्या दुर्दिनीं, दिवसाच्या उदासवाण्या अंधाराला घालविण्याचा प्रयत्न करणाऱ्या विजेच्या कृत्रिम व यावेळीं चमत्कारिक भासणाऱ्या उजेडांत, अंथरुणावर उशांना टेकून आरामशीर बसून, दादासाहेब आपली करुणाद्भुत हकिगत कीर्तीला निवेदन करीत होते. कौस्तुभ पुण्याला गेला होता.

दादासाहेबांच्या पलंगाशेजारीं खुर्ची घेऊन कीर्ति बसलेली होती. तिच्या मनांत ती विलक्षण हकिगत ऐकतांना नानाप्रकारचे विचारतरंग व भावनांचे भोंवरे उत्पन्न होत होते. पण कांहीं उद्गारांपलीकडे ती अवाक्षरही काढीत नव्हती. अधीरपणें ती सर्व हकिगत ऐकून घेत होती. त्यांपैकीं कांहीं कांहीं गोष्टी दादासाहेबांनीं पूर्वी सांगितल्या असूनही आज त्या पुन्हां ऐकाव्याशा तिला वाटत होत्या, त्यांत तिला एक नवीनच जिव्हाळा भासत होता.

“ विद्येसारखी पवित्र गोष्ट, पण ती मिळवण्याकरतां मला कित्येक वेळां मी ब्राह्मण आहें म्हणून खोटं सांगावं लागलं आणि विद्येकरतां मी घराबाहेर पडलों तेव्हां कधीं कधीं उपासमार होऊन ब्राह्मण मुलाप्रमाणें लंगोटीजानवं लावून मी प्रतिष्ठितपणें माधुकरी मागून जेवलों आहें. माझं गौप्य बाहेर फुटलं कीं मला शाळाच नव्हे तर गांवसुद्धां बदलावे लागत. आणि माझं गौप्य केव्हां फुटेल या

धास्तीनें जणूं साप उशागतीं ठेऊन निजल्याप्रमाणें माझी झोप रात्रीच्या रात्रीं उडून जाई.

इतके कष्ट करून मी माझी विद्या संपादन केली. त्याबद्दल मला मनस्वी आनंद होई, अभिमान वाटे, अधिकाधिक विद्या मिळवून, कीर्ति मिळवावी, पैसा मिळवावा अशी महत्त्वाकांक्षा मनांत अखंड नंदादीपाप्रमाणें माझ्या मनांत तेवत असे.

पण माझ्या जातीमुळें मला जो अपमान वारंवार सोसावा लागे तो सहस्र इंगळ्यांप्रमाणें माझ्या हृदयाचा चावा घेऊन मला बेजार करून सोडीत असे.

त्या अपमानाच्या कांचामुळें माझी महत्त्वाकांक्षा आणखी आणखीच दुर्दम्य होत गेली. मी माझ्या हीन जातीवर विजय मिळवीन, उच्चवर्णीयांनाही मला मान द्यावा लागेल इतका मी मोठा होईन अशा ईर्षेनें मी अभ्यास करून कित्येक शिष्यवृत्त्या आणि प्रशंसा मिळवली.

देवाच्या कृपेनं माझ्या मनाचं समाधान होण्याइतकी माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली. उच्च विद्या, मानमरातब, वैभव सर्व कांहीं माझ्या अपेक्षेबाहेर मला मिळालं आहे. माझ्या जातीकरतांही शाळा वगैरे उघडून, धंद्यांत सरकारी मदत मिळवून देऊन मी थोडेंबहुत कार्य करूं शकलों आहें."

दादासाहेब जरा थांबले. त्यांच्या मुद्रेवर अभिमान व समाधान झळकत होतें. कीर्तीनें त्यांच्या कपाळावरील घर्मबिंदू पुसल्यावर तिच्याकडे पहात ते पुन्हां बोलूं लागले.

"माझ्या पहिल्या खडतर दिवसांत गीतेचं मला अत्यंत साहाय्य झालं. आमचं लग्न मी आठ वर्षांचा आणि गीता सहा वर्षांची असतांनाच झालं होतं. माझे आईवडील लहानपणींच वारल्यामुळें म्हादबा आणि बाया यांनींच माझा संभाळ केला आणि माझं लग्नही करून दिलं. पुढें मी त्या कोणाचं न ऐकतां धंदा सोडून विद्येसाठीं गांवोगांव हिंडूं लागलों तेव्हां त्या दोघांनींच गीतीचा संभाळ केला, आणि सवड होईल तसें मला ते द्रव्यसाहाय्यही करीत. पण बहुतेक मलाच विद्येबरोबर पैशाचीही काळजी करावी लागे आणि नोकरीकरतांही मला खोटी जात सांगावी लागलेली आहे.

पुढें एका मिशनस्कूलमध्यें मला लहानशी नोकरी लागली आणि गीताला आणून विद्या, नोकरी आणि संसार या तिन्ही गोष्टी मी संभाळूं लागलों.

आणि त्या वेळेपासून गीतेचा स्वभाव किती सोन्याच्या मोलाच्या होता हें मला कळून आलं. तिनं धीर दिला नसता तर कदाचित् मी पैशाच्या विवंचनेनंच खचून गेलों असतों. धर्मद्रोही ठरलों असतों. पण एका वेळीं तर कामकाज करून गीतीनं चार पांच महिने निभावून नेले." दादासाहेब साश्रु नयनांनीं म्हणाले, "खरोखर माझी गिती दिसायला सुरेख नव्हती, अडाणीही होती पण तिच्या स्वभावाचं सौंदर्य फार थोर होतं, तिची बुद्धि फार तीव्र होती, आणि वागण्यांत अतिशय साधीभोळी असून मोठी धीराची होती ती.

आम्हांला दोन मुलं झालीं पण तीं दोघंही आम्हांला अंतरलीं." मुद्दामच अशाप्रकारें उच्चारलेल्या या वाक्याचा आपल्या श्रोत्यावर काय परिणाम होतो हें पहाण्यासाठींच जणू दादासाहेबांनीं तीक्ष्णपणें कीर्तीकडे दृष्टिक्षेप केला.

त्यांच्या अपेक्षेप्रमाणें तिच्या मुद्रेवर कांहीं विस्मयाचें चिन्ह दिसलें नाहीं तेव्हां ते स्वतःशींच हंसून म्हणाले, कुठून तिला तशी कल्पना येणार ?

दादासाहेब पाण्याचा एक घोट घेऊन पुढें सांगूं लागले, "आमचे दोन्ही मुलगे वारले तेव्हां आम्हांला अतोनात दुःख झालं. गितीची तर वेडावल्यासारखी अवस्था झाली. तिला वाटूं लागलं कीं मी जातिधर्म सोडला म्हणून आमची कुलस्वामिनी यल्लाम्मा कोपली असावी आणि तिनं आमचा कुलक्षय करून घोर शिक्षा दिली असावी. ही भावना वाढतां वाढतां आजूबाजूच्या नातेवाईकांनीही गितीच्या म्हणण्याला दुजोरा द्यायला सुरवात केली. त्या वेळीं मी विलायतेला जाऊन आलों होतों आणि मुंबईला सरकारी नोकरी सोडून व्यापारधंद्यांत चांगला सधन झालों होतों. माझ्या बायकोची धर्मभोळी विचारसरणी मला पटत नव्हती म्हणून मी तिची कित्येक वेळां चेष्टाही करीत असे. शिवाय कामधंद्यामुळें मला वेळही होत नसे. पण गीता जेव्हां सारख्या विनवण्या करून डोळ्याला पाणी आणूं लागली आणि तिची प्रकृति खालावूं लागली तेव्हां मात्र मग मी कांहीं झालं तरी तिच्या मनाप्रमाणें तिला एकदां सौंदत्तीला घेऊन जायचं असं ठरवलं. धंद्याचीं सूत्रें जरा आंवरून घेऊन बाकीचीं एका विश्वासू माणसाकडे सोपवून देऊन मी गीताला घेऊन, आगगाडी, बैलगाडी असा खडतर प्रवास करून एकदांचा यल्लाम्माच्या यात्रेच्या वेळींच सौंदत्तीला पोंचलों. यल्लाम्माची यात्रा दत्तजयंतीच्या पौर्णिमेला ठिकठिकाणीं जिथें देवस्थानें आहेत तेथें भरते. त्या वेळीं सौंदत्तीवर

निरनिराळया जातीच्या लोकांची सव्वालाखपर्यंत यात्रा जमते. कारण यल्लाम्मा ही आमच्या जातीचं कुळदैवत असली तरी इतरही जाती तिला दैवत मानतात, नवससायासही करतात, आणि तिचे कुळधर्म यथासांग पाळतात.

हल्लीं ही यात्रा पुष्कळच सोइस्कर झाली आहे म्हणतात पण त्या वेळीं यात्रा करायची म्हणजे फार अवघड आणि त्रासदायक गोष्ट होती.

खरोखर गीतीच्या धर्मश्रद्धेमुळंच ती सुखरूप यात्रा करूं शकली असं मला वाटतं.

शेवटीं डोंगर चढून आम्ही कुंडांतल्या त्या देवीचं दर्शन घेतलं, आमच्या चालीप्रमाणें बकरं बळी दिलं तेव्हां गितीला जें समाधान झालं तें बघूनच माझा सारा शीणभाग हरल्यासारखं झालं. गीतानं मागणं मागितलं कीं, आई, आमचे कांहीं अपराध असले तर पोटांत घाल. मुलगा नशिबीं नसला तर मुलगी दे पण वंशक्षय होऊं देऊं नको.

मग प्रसाद, कुंकू घेऊन आम्ही खालीं उतरलों. ”

दादासाहेब पुन्हां जरा थांबले. आपल्या भोंवतालच्या परिस्थितीऐवजीं त्यांना जणूं ती सत्तावीस वर्षांपूर्वींची यात्राच दिसूं लागली.

“ भर दोनप्रहरची वेळ होती. ऊन कडकडीत पडलं होतं. अजून दर्शनासाठीं लोकांची झिम्मड चाललं होती. जाणाऱ्या येणाऱ्यांची नुसती रीघ लागली होती. नाना प्रांतांतले, नाना देशींचे, नाना जातींचे, नाना वेषभूषेचे लोक, नानापरीचे भाव मनांत ठेऊन यात्रेला आले होते. रस्त्यांच्या कडेला मेवामिठाईचीं दुकानं, पाळणे, चक्कर, गारुड्यांचे खेळ यांची गडबड सुरू होती. कांहीं लोक तासे वांजंत्र्या लावून मिरवत कसला तरी देहदंड भोगीत•आईच्या दर्शनाला चालले होते तर कांहींनीं दर्शनाहून आल्यावर झाडाचा आडोसा घेऊन खाणेंपिणें करून पथाऱ्या पसरून दिल्या होत्या.

आम्हालाही अजून फराळ करायचाच होता, आणि गीतीला फार शीण आला होता, म्हणून लवकर कुठें तरी आडोसा शोधून विश्रांति घेणें आवश्यक होतें.

जरा चालून गेल्यावर आम्हांला चांगला आडोसा सांपडला. हमरस्त्यापासून जरा बाजूलाच ही जागा असल्यामुळें आसपास विशेष वर्दळ नव्हती. आंब्याच्या झाडाची छान सांवली पसरली होती त्या झाडाखालींच आम्ही आलों.

त्या झाडाखालीं आम्ही फराळ केला आणि विश्रांति घेण्याकरितां म्हणून जरा आडवे झालों. दगदगीमुळें असो किंवा कशानेंही असो आमचा लवकरच डोळा लागला. चांगली दोन घटका तरी मला झोप लागली असेल.

अन् झोपेंत असतांच मला घाबऱ्याघाबऱ्या गितीनें हांक मारली तेव्हां प्रथम मला वाटलं कीं आमचं सामानाचं गांठोडंच चोरीला गेलं असावं."

दादासाहेब कांहीं गूढार्थप्रेरित असे किंचित् हंसले. स्वतःशींच पुटपुटल्याप्रमाणें ते बोलले, "पण आमचं सामान गेलं नव्हतं तर आम्हांला पृथ्वीमोलाचा ठेवा देवीच्या प्रसादानं लाभला होता.

गीता अचानक जागी होऊन उठून पहाते तों एका ब्लँकेटांत गुंडाळलेलं मूल आपल्या शेजारीं पडलेलं आहे असं तिला दिसून आलं. तिनं इकडे तिकडे विस्मयानं पाहिलं. जरा वेळानं कुणीतरी येऊन इथें ठेवलेलं आपलं मूल घेऊन जाईल असं वाटून ती थोडा वेळ तशीच गप्प राहिली. पण कुणीच येत नाहीसं पाहून तिनं मला जागं केलं न् तें मूल दाखवलं. काय गोजिरवाणं नी देखणं, गोरंपान मूल होतं तें. गलुत्यांतून लांब कुरळे केस कपाळावर विखरून आले होते. उपोरे डोळे भिरिभिरीं चहूंकडे फिरत होते.

मूल पाहून मलाही वाटलं कीं लवकरच कुणीतरी येईल म्हणून. पण एक दीड तास गेला तरीही कुणी येईना. बरं आम्हांला जाण्याची घाई असून मूल तिथें टाकून उठवेना. तें मूल रडूं लागलं तेव्हां गीताला रहावेना. तिनं तें उचलून घेतलं आणि मी मुकाट्यानं त्याला घालण्याकरतां दूध विकत आणलं.

दूध पाजण्याकरतां म्हणून जेव्हां गीतीनं ब्लँकेट उलगडलं तेव्हां ही चिठी त्यांतून बाहेर पडली."

दादासाहेबांनीं शेजारच्या मेजावरली एक लहानशी कागदांची जंत्री उचलली व एक पाकीट घेऊन त्या पाकिटांतला पिंवळा पडलेला एक चतकोर कागद कीर्तीच्या हातीं दिला.

कीर्तीनें तो कागद वाचला, नी तिचे डोळे पाण्यानें भरून आले.

"माझी ही प्राणापलीकडे असलेली ठेव मी आपल्या स्वाधीन करीत आहें. आपण स्वतःच्या मुलीप्रमाणेंच हिचा प्रतिपाळ करावा अशी मी आपल्या पायाशीं

याचना करीत आहें. या मुलीच्या कुलाबद्दल किंवा जन्माबद्दल यत्किंचित् किंतू बाळगूं नये. ही उच्च कोकणस्थ घराण्यांतली असून माझे पती अत्यंत सुशील वेदांती होते. माझ्या आणि या त्यांना जीव कीं प्राण असलेल्या मुलीच्या दुर्दैवानें ते दरवर्षाप्रमाणें पंढरपूरच्या वारीला गेले असतां पटकीनं दगावले. मला माझ्या दीरजावांच्या तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग आला. माझी बाळ फक्त महिन्याची होती. तेव्हां मी तरी काय करणार ? मगच्या त्या हालअपेष्टा माझ्या वैऱ्यावरसुद्धां येऊं नयेत. मुलीकडे पाहून मी काबाडकष्टांना न जुमानतां दिवस काढीत होतें. पण आमच्या जाऊबाईंनीं माझ्या गोजिरवाण्या मुलीचा दुःस्वास करायला आरंभ केला. एके दिवशीं त्यांनीं माझी नजर चुकवून मुलीच्या पोटावर बिब्बा घालून ठेवला तेव्हां मात्र मी घाबरलें. मी रागानं बोलूं लागलें तेव्हां त्या म्हणाल्या कीं खुशाल सकेशा राह्यलांत ना. पापी माणसाच्या मुलांवर असा आपोआप बिबा उठतो बरं. तेव्हांपासून त्या घरांत राहूं नये असं मनांत येऊं लागलं पण कुठें जावं तें समजेना. पुढें माझ्या दिराची पापी नजर माझ्याकडे वळली, आणि एके दिवशीं जाऊबाई घरांत नसतांना माझ्या पावित्र्यावर घाला घालण्यासाठीं तो नराधम उठला तेव्हां मात्र माझ्या सहा महिन्यांच्या मुलीला घेऊन मी घराबाहेर पडलें, पण पुढल्या चारपांच महिन्यांच्या अवधींतही मला कळून चुकलं कीं माझं स्वरूप माझा जिथें तिथें घात करणार. मोलमजुरीला राह्यलें तर तिथेंसुद्धां मला सुखानं काम करूं देत नाहींत.

मला आतां जिवाचा कंटाळा आला आहे. मुलीकरतां जीव अडकतो पण कुणा सज्जनांच्या पदरीं तिला घालून आपण पतीच्या भेटीला जावं म्हणून मी उत्कंठित झालें आहें. म्हणूनच मी या यात्रेच्या ठिकाणीं आलें. आपल्याकडे पाहूनच मला वाटतं कीं आपण माझ्या मुलीचा योग्य तो प्रतिपाळ कराल. मुलीचें नांव शकुंतला आहे. आडनांव मुद्दामच कळवीत नाहीं. माझा शोध करण्याच्या भरीला कृपा करून पडूं नये. जास्त काय लिहूं ? ही मुलगी म्हणजे माझा प्राणच मी आपल्या स्वाधीन केला आहे. आई यल्लाम्माचा प्रसाद म्हणून तिचा स्वीकार करा. ”

पत्राखालीं सही नव्हती. कीर्तीनें पत्र वाचून दादासाहेबांच्या हातीं दिल्यावर त्यांनीं व्यवस्थित घडी करून तें पुन्हां पाकिटांत ठेवलें. दादासाहेबांच्या पुढील बोलण्याकडे तिचें लक्ष खिळून राहिलें होतें. तिची उत्कंठा पराकोटीला पोंचली होती.

" त्या मुलीला संभाळण्यावांचून आम्हांला दुसरा योग्य मार्गच नव्हता. आणि यल्लाम्माचा प्रसाद म्हणून या मुलीचा स्वीकार करा, या शब्दांनीं गीतीच्या भाविक मनावर फार परिणाम केला. तिला खास वाटूं लागलं कीं, आई यल्लाम्मानंच माझं गाऱ्हाणं ऐकलं आणि या मुलीच्या आईला तशी प्रेरणा करून आपल्या ओटींत हा प्रसाद घातला.

मलाही त्या गोजिरवाण्या मुलीला दूर करावसं वाटेना. त्या मुलीची आई आम्हांला ब्राह्मण समजली असावी हें उघड होतं पण कांहीं झालं तरी मी मुलीला सोडायला तयार नव्हतों, आणि गितीही तयार नव्हती.

आम्ही त्या मुलीला–शकुंतलेला घेऊन आमच्या बिऱ्हाडीं आलों आणि लोकांनीं उगीच प्रश्न विचारूं नयेत म्हणून तडक प्रवासाला लागलों.

मग एका गांवीं राहून दोनतीन दिवस आम्ही सर्व गोष्टींचा खल केला. त्यावेळीं ठरलेल्या बेताप्रमाणें मी मुंबईला परत आलों पण एकटाच आलों. गितीला आणि मुलीला मी महाबळेश्वरला बंगला घेऊन त्यांत ठेवली. आमचें ठरल्याप्रमाणें ही माझीच मुलगी असं गीता सांगे अन् तिथें ही तुमची नाहीं असं म्हणायला होतं कोण ?

गिताची प्रकृति बरोबर नाहीं, ती गरोदर आहे असं मी पत्नीसंबंधीं कुणी विचारल्यास किंवा गांवच्या लोकांनीं विचारल्यास सांगत असे. पुढें सात महिन्यांनीं मी त्या मुलीचा जन्म माझी मुलगी म्हणून महाबळेश्वरला म्युनिसिपॅलिटींत नोंदवून टाकला.

गीताला मुलगी झाली म्हणून कळतांच बाया तिला भेटण्याकरतां आणि मुलीला पहाण्याकरतां अधीर झाली होती पण मी लवकरच तिला आणतों असं सांगून मी तिला थोपवून धरली.

आमच्यापुढें मोठा प्रश्नच येऊन पडला होता. पण मोठ्या सुदैवानं मला सुरतेला कांहीं दिवस रहाणं भाग आलं. मी अर्थातच सुरतेला गेलों तेव्हां गीताला आणि मुलीला घेऊनच गेलों. नंतर मी मुंबईला आलों तरी त्यांना तिथेंच ठेवलं.

पुढें सातआठ महिने मी व्यापारानिमित्त मुंबईसुरतेच्या खेपा करीत होतों. मग माझं काम संपल्यावर मी परत आलों तेव्हां मात्र गीताला आणि मुलीला घेऊनच आलों. मुलीचा अंगबांधा नाजूक असल्यामुळें तिला बघून शंका कुणालाच आली

नाहीं. पण सर्वांना वाटलें कीं वर्षाची मुलगी पण कशी दीड वर्षाच्या मुलीसारखी आहे अन् चपळ आहे." दादासाहेब थांबले.

कीर्तीनें अती उत्कंठेनें आणि कांपऱ्या आवाजांत प्रश्न केला, "अन् ती मुलगी म्हणजे—म्हणजे ?"

"म्हणजेच तूं. कीर्ति !"

कीर्ति स्फुंदत उद्गारली, "दादासाहेब, कशाला हें सारं सांगितलंत हो ? मी तुमची मुलगी नाहीं, ही कल्पनासुद्धां मला सहन होत नाहीं."

तिच्या अंगावरून हात फिरवून दादासाहेब समजुतीच्या स्वरानें म्हणाले, "कीर्ति, तूं माझीच आहेस. पण तूं माझी आहेस तसाच कौस्तुभ पार्वतीबाई आणि अण्णासाहेब यांचा आहे. तूं ब्राह्मणकन्या आहेस हें कळल्यानं त्यांना आनंद"—

"नाहीं हो. आतां तो प्रश्नच राहिलेला नाहीं. अण्णासाहेब आणि अम्मा दोघांच्याही मनांत आतां जातीबद्दल किंतू नाहीं. आणि कौस्तुभाला जर हें कळलं तर उलट-नाहीं दादासाहेब, कौस्तुभानं उच्च ध्येयानं प्रेरित होऊन माझ्याशीं लग्न केलं—अर्थात् त्याचं प्रेमही आहेच माझ्यावर—तें ध्येय या गौप्यस्फोटामुळें वाळूंतल्या किल्ल्याप्रमाणेंच वाहून गेलं तर त्याला कदाचित् वाईटच वाटेल !"

"माझ्याही मनांत तशी शंका आली म्हणूनच मी आज तुला एकटीला ही हकिगत सांगायला प्रवृत्त झालों. तुला हें सांगावं, तूं माझी मुलगी नाहींस असं म्हणावं हें मलासुद्धां जड वाटत होतं. पण मला असं वाटलं कीं तूं ब्राह्मणकन्या आहेस हें कळल्यावरही कौस्तुभाचं तुझ्यावर अढळ प्रेम आहेसं पाहून तुझ्या सुखांत भर पडेल. म्हणूनच मी ही हकिगत तुला सांगितली. कीर्ति, आज नाहीं तरी मी गेल्यावर केव्हां तुला वाटलं, गरज उत्पन्न झाली तर हें तुझ्या आईचं पत्र राहूं दे तुझ्याजवळ." दादासाहेबांनीं तें पाकीट पुन्हां कीर्तीच्या हातांत ठेवलें.

"नाहीं. त्याची आमच्या आयुष्यांत केव्हांही गरज उत्पन्न होणार नाहीं. दादासाहेब, तुम्हीच आम्हां दोघांना सौख्यशिखरावर चढवलं आहे आणि—आणि तसं जरी नसतं तरीसुद्धां मी तुमची नाहीं असं म्हणून घेऊन मला सुखाची वाट कधींही सांपडणार नाहीं."

हा दुःखाचा आघात सहन होत नसल्याप्रमाणें कीर्ति केविलवाणी रडत होती. दादासाहेब तिच्या पलंगावर ठेवलेल्या हातावर हळूं हळूं थोपटीत होते.

कीर्तीनें तें पत्र पाकिटांतून काढून पुन्हां वाचलें. त्याला वंदन करीत ती म्हणाली, " आई, तूं किती चांगली होतीस, तुझं माझ्यावर किती प्रेम होतं हें या पत्रावरून मला समजलं. पण तुझा किंवा वडिलांचा सहवास मला लाभला नाहीं. तेव्हां क्षमा करा. पण ब्राह्मणकन्या म्हणून घेण्यापेक्षां दादासाहेबांची मुलगी म्हणून घेण्यांतच मला जास्त आनंद होणार आहे, जास्त धन्यता वाटणार आहे. "

नंतर काडयाची पेटी घेऊन तिनं फर्रकन् काडी पेटवली आणि त्या पत्राची रक्षा करून टाकली.

मग तिनें दादासाहेबांच्या मानेभोंवतीं हात टाकून. सद्गदित कंठानें विचारलें, " दादासाहेब, सांगा आतां मी तुमचीच मुलगी ना ? "

" होय होय. माझीच—माझीच मुलगी. " असें म्हणून आत्यंतिक समाधानानें निर्माण झालल्या अश्रुपूर्ण नयनांनीं तिच्याकडे पहात, तिच्या केसांवरून दादासाहेब ममतेनें हात फिरवूं लागले.

---

यानंतर दादासाहेबांची प्रकृती झपाट्यानें खालावत चालली, परंतु त्यांच्या चेहेऱ्यावर अपूर्व समाधान विलसत असे.

कीर्तीचें मात्र कसें समाधान करावें हेंच कुणाला समजत नसे. धारिणीउदय, शीलाभूषण, लयलाधनंजय, आणि बाकीची मित्रमंडळी बहुतेक एकदोन दिवसांआड येऊन जात. पुण्याहून कौस्तुभाबरोबर अण्णासाहेबपार्वतीबाईही येऊन गेलीं. नांदवडहूनही बाया, म्हादबा, मारुती, जाई, गोट्या वगैरे मंडळी आली होती आणि कीर्तीच्या आग्रहावरून बाया मुद्दाम पंधरा दिवस राहून गेली. सर्वांनी कीर्तीची समजूत घालण्याचा प्रयत्न करावा आणि तो व्यर्थ जावा.

आई, वडील, भाऊ, बहीण या सर्वांच्या जागीं असलेल्या, ज्यांनीं कीर्तीवर पोटच्या मुलीप्रमाणेंच काय पण पंचप्राणाधिक प्रेम केलें, तिच्या बारीकसारीक आवडीनिवडीसुद्धां पुरवल्या आणि तिच्या सुखापुढें स्वतःच्या सुखाचीसुद्धां कधीं पर्वा केली नाहीं, त्या दादासाहेबांच्या कायम विरहाला कीर्तीचें मन मुळीं तयारच होईना.

दादासाहेब स्वतःच तिचें परोपरीनें सांत्वन करीत पण कीर्तीच्या डोळ्यांतून अधिकच अश्रुधारा वाहूं लागत.

दादासाहेबांची सेवाचाकरी करतांना तिनें दिवसरात्र पाहूं नये कीं स्वतःचें खाणेंपिणें पाहूं नये.

मेरी, एडी व सर्व नोकरचाकर जणूं दादासाहेबाना मृत्यूच्या जबड्यांतून ओढून काढायचंच अशा निश्चयानें त्यांच्या शुश्रूषेंत मनोभावेंकरून हातभार लावीत असत. पण आपले प्रयत्न व्यर्थ होत आहेत हें बघून सर्वांना मनस्वी दुःख होत असे. मेरीचे डोळे कित्येक वेळां रडून रडून लाल झालेले दिसत तर एडीला आपलें दुःख लपवून चेहरा गंभीर ठेवण्याकरतां शिकस्त करावी लागे.

मोठमोठे नामांकित पुढारी, धनाढ्य शेटसावकार आणि दादासाहेबांचा प्रचंड मित्रपरिवार, व जातींतले लोक सारखे भेटायला येत, व ते बरे होवोत म्हणून मनापासून प्रार्थना करीत.

दादासाहेबाच्या प्रकृतीची चवकशी करण्याकरतां शेकडों पत्रें रोज येत, ध्वनियंत्र सारखें खणखणत राही व त्यांचें प्रकृतिमान कळण्याला उत्सुक असलेल्या हजारों लोकांना ताज्या बातम्या कळाव्या म्हणून वार्ताहर नित्य येत.

सर्वांची एकच इच्छा होती कीं दादासाहेब लवकर बरे होवोत.

परंतु मृत्यू ही घटनाच अशी आहे कीं तिथें कुणाचाच कांहीं उपाय चालत नाहीं.

एके दिवशीं रात्रीं दादासाहेबांनीं कीर्तीला आर्त उत्सुकतेने विचारलें, "कीर्ति, तूं आपल्या जातीच्या—सर्व अस्पृश्य बांधवांच्या हिताकरतां सदैव प्रयत्न करशील ना?"

"दादासाहेब, तुम्ही मला जो ध्येयमार्ग दाखवला आहे तो मी कधींही सोडणार नाहीं. चर्मकार जातीकरतां—दादासाहेब, तुमच्या आणि माझ्या जातीच्या उन्नति-प्रित्यर्थ तर मी झटेनच पण सर्व हरिजन हेही माझेच आप्तसोयरे आहेत असं मी समजेन."

दादासाहेबांनीं कीर्तीचा हात धरून अत्यंत अभिमानाने कीर्तीकडे पाहिले. त्या दृष्टीनेंच कीर्तीला कृतार्थ वाटलें.

नंतर ते म्हणाले, " कीर्ति, हा विजय बंगला तुझाच आहे आणि माझी सर्व संपत्तीही तुझीच आहे."

कीर्ति दुःखावेगाने म्हणाली, "दादासाहेब, नका असं निरवानिरवीचं बोलूं. तुम्ही नाहीं तर त्या विजय बंगल्याची काय शोभा?"

"कीर्ति, आतां मी तुला किती दिवस पुरणार? आणि कीर्ति, तुझ्या लग्ना-नंतरच्या त्या मधल्या काळांत मरण आल असतं तर खरोखरीं माझा जीव गुटमळत राह्यला असता पण आतां मला तुझ्या बाबतींत अगदीं निश्चित वाटतं आहे. कौस्तुभ तुझ्या सुखांत अंतर पडूं देणार नाहीं ही माझी पूर्ण खात्री आहे. कीर्ति, सांग बरं मला. तूं अगदीं पूर्ण सुखी आहेस ना? माझ्याबद्दल कांहीं मनांत न आणतां उत्तर दे."

"होय दादासाहेब. अगदीं पूर्ण सुखी आहें मी. पण दादासाहेब तुम्ही—"

कीर्तीला पुढें बोलवेना. तिला अनावर हुंदका आला.

तेव्हां दादासाहेबांनीं तिच्या पाठीवरून हात फिरवून म्हटलें, "किल्यामाल्या, खुळा कां रे तूं?"

× × ×

कौस्तुभाला त्यांनीं "माझा हा प्राणाधिक ठेवा नीट जतन कर बरं." म्हणून पुन्हा पुन्हां कळकळीनें सांगितलें व त्यानेंही मनापासून पुन्हां पुन्हां तशीं वचनें दिल्यावर दादासाहेबांना समाधानानें जरा हंसूं आलें.

दुसऱ्या दिवशीं अरुणोदयसमयींच दादासाहेबांचें देहावसान झालें.

अरुणप्रभेनें उजळलेल्या त्यांच्या मुखाकडे कीर्ति टक लावून पहात होती. दादासाहेब जणूं आत्यंतिक समाधानाने डोळे मिटून नुसते पडले होते. रोगजर्जर झालेली त्यांची चर्या रोगरहित मनुष्याप्रमाणें टवटवीत दिसत होती. त्यांच्या मंद हास्य करणाऱ्या ओठांतून जणूं अस्फुटपणें शब्द बाहेर पडून हवेच्या लहरींवर तरंगून आसमंतात् फिरत सांगत होते कीं, "कीर्ति, माझं अपुरं राह्यलेलं कार्य आतां तूं पुरं कर. ही उषःप्रभा ज्याप्रमाणें उजळत जाऊन मग दैदीप्यमान सूर्यप्रभेनें दशदिशा सुप्रकाशित होतात त्याचप्रमाणं तुझं कार्यही यशस्वी होवो, उत्तरोत्तर अपूर्व विजय मिळवो. जा कीर्ति, तुझ्या कौस्तुभाच्या मदतीनं ध्येयमार्गावर चालूं लाग."

आणि जणूं हा संदेश समजूनच कीर्तीचा हात आपल्या हातीं घेऊन कौस्तुभ अत्यंत कोमलपणें तिला म्हणाला, "चल कीर्ति."

# सौ. शांताबाई नाशिककर यांचें लेखन

## १ कादंबऱ्या

१ **लग्नाचा बाजार** (सामाजिक) नागपूर युनिव्हर्सिटीनें मॅट्रिकच्या अभ्यासक्रमांत नेमली होती. किंमत २ रु.

२ **हाच कां धर्म ?** (सामाजिक) किंमत २ रु.

३ **साम्राज्यासाठीं** (ऐतिहासिक) पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजनें व इतर कांहीं शाळांनीं इतिहासाच्या पुरवणी-वाचनासाठीं मंजूर केलेली. किंमत २॥ रु.

४ **कौमुदी** (इतिहासकालीन) डे. व्हरनॅक्युलरनें पारितोषिक दिलेली. किंमत १ रु.

५ **चिखलांतलें कमल** (सामाजिक) किंमत २ रु.

६ **माझीं कोरीव लेणीं** (सामाजिक) किंमत २ रु.

## कथासंग्रह

७ **नीलेचा दिलरुबा** किंमत १॥ रु.

## निबंधसंग्रह

८ **शांतिकुंज** (भाग १ ला) निबंधपखरण किंमत १ रु.
शाळाखात्यानें मंजूर केलें आहे.

## कवितासंग्रह

९ **शांतिकुंज** (भाग २ रा) कवितापखरण किंमत ८ आ.
शाळाखात्यानें मंजूर केलें आहे.

## २ प्रवासवर्णन

१० **म्हैसूरकडील प्रवास** किंमत १२ आणे.

## ३ बालवाङ्मय

११ **लहान मुलांकरितां सुबोध गोष्टी** (इसापनीतींतील)
या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. किंमत ४ आणे.